

लालबहादुर शास्त्री जन्मशताब्दी
१९०४ २००४
विशेष आवृत्ती १०० रु.

# लालबहादुर शास्त्री

## राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम

लेखक: सी.पी. श्रीवास्तव ▫ अनुवाद: अशोक जैन

# लालबहादुर शास्त्री

## राजकारणातील मर्यादापुरुषोत्तम

## अनुक्रम


*प्रकाशकाचे मनोगत : छोटी छोटी बातें...*
*अनुवादकाचे मनोगत : अंधारयुगातील कवडसा..*
*लेखकाचे मनोगत : 'आपने मुझे पहचाना नहीं?*

'वर्मा' झाले 'शास्त्री' / २३
जनसेवेचं व्रत / ३६
विश्वासू सल्लागार / ४१
पहिलं मंत्रिपद / ६८
पंडित नेहरूंचा ओव्हरकोट / ७३
पंतप्रधान! / ८९
नव्या जबाबदाऱ्या, नवी आव्हाने / ९९
दोन पंतप्रधानांची कार्यशैली / १०२
चौफेर वाटचाल / १०७
युद्धाच्या सावल्या / १३८




ऑपरेशन डेझर्ट हॉक / १४५
ऑपरेशन जिब्राल्टर / १५५
ऑपरेशन ग्रॅंड स्लॅम / १७३
आले ऊ थांट / १९९
चीनचा खलिता / २१०
युनोतील घडामोडी / २२०
क्रिकेट व 'नॅट' / २२६
धगधगले रणांगण / २३१
पाकिस्तानवर सरशी / २४२
युद्धबंदी / २४६
अयूब यांची 'गुप्त' चीन भेट / २५२
तीन 'वामनमूर्ती'/ २५८
ताश्कंदची तयारी / २७०
अयूब रिक्तहस्ते परतले / २७६
कोसिजिन यांचा पुढाकार / २८२
टी. टी. के. यांचे राजीनामा नाट्य / २८६
ताश्कंद : रोमहर्षक वाटाघाटी / २९१
ऐतिहासिक कामगिरी / ३२९
ते अंतीम क्षण... / ३३४
हमी सो गये दास्ताँ कहते कहते... / ३४१
उपसंहार / ३५०  ऋणनिर्देश / ३५२
* *छायाचित्रे : पृष्ठ क्र. ४३ नंतर (१६ पाने)*



।। प्रकाशकाचे मनोगत ।।

# छोटी छोटी बातें...

''कभी कभी छोटी चीजें भी बडा काम कर जाती है।'' जाहीर सभेतील लालबहादुर शास्त्रींच्या या उद्‌गारांनी श्रोत्यांमध्ये खसखस पिकली. (हे हास्य अर्थातच शास्त्रीजींच्या लहानशा शरीरयष्टीकडे निर्देश करणारे)... आणि शास्त्रीजींनीही ते उमजून, मनमोकळे हसून दाद द्यावी... आणि प्रेक्षकांनी पुनः निरागस हसावे... निरागस व्यक्तिमत्त्व, सभोवतालच्या वातावरणात निरागसता आणू शकते, याचा प्रत्यय येणारा हा सुमारे तीस वर्षापूर्विचा प्रसंग... पाकिस्तान युद्धाची धुमश्चक्री– सायरन्स... विमानांची घरघर... ''ब्लॅक-आऊट''... घराघरातील खिडक्यांवर काळे कागद... पेट्रोलिंग... ''जय जवान जय किसान'' चा गजर– भय, असुरक्षितता, शौर्य, देशाभिमान वगैरे संमिश्र भाव निर्माण करणाऱ्या त्या वातावरणात शास्त्रीजींची ही निरागसता, सच्चेपणा, वेगळीच हिंमत द्यायचा.
पंतप्रधानपद भूषविणाऱ्या व्यक्तीची ही निरागसता, सर्वसामान्यांना भावली होती, भिडली होती याची प्रचीती आली ती शास्त्रींच्या मृत्यूची बातमी येऊन थडकली तेव्हा! त्या संस्कारक्षम वयातही मला चांगलेच जाणवले होते... तीव्र दुःखाची स्तब्धता सर्वत्र पसरली होती.
पंतप्रधान म्हणून एकोणीस महिन्यांच्या अल्पशा कारकिर्दीत शास्त्रीजींनी सर्वसामान्यांशी कसे आपुलकीचे नाते जोडले जाऊ शकते याची झलक दाखवून दिली होती... अशी मंद झुळूक नंतर कधी जाणवलीच नाही... त्यानंतरच्या भ्रष्ट वातावरणाचा

इतिहास सर्वांसमोर आहे... त्यानंतरच्या कलकलाटात राजकीय नेते आणि सर्वसामान्यांमधील आपुलकीचे झरे जणू आटूनच गेले... आणि शास्त्रीजींच्या मृत्यूनंतर जी स्तब्धता निर्माण झाली... त्या स्तब्धतेत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर पैलूही दडून गेले असेच वाटत राहिले... त्या बाबत फारशा चर्चा कानावर आल्या नाहीत... लिखाण वाचनात आले नाही... 'Low Key' मध्ये राहणाऱ्या या पंतप्रधानांचा इतिहास, चरित्र सर्वत्र 'Low Profile' मध्ये राहावे याबद्दल एक खंत वाटत होती.

त्यामुळेच ऑक्टोबर १९९५ मध्ये डॉ. सी. पी. श्रीवास्तव लिखित 'LAL BAHADUR SHASTRI - A Life of Truth in Politics' या इंग्रजीतील चरित्रावर अशोक जैन यांनी लिहिलेला समीक्षात्मक लेख माझ्या वाचनात आला, तेव्हा मी तात्काळ ते पुस्तक मिळवले... श्रीवास्तव शास्त्रींचे सचिव असल्याने अनेक घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार होते... शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वातील इतर पैलू मला त्यात उलगडताना दिसले... हे संयत, समतोल व अभ्यासपूर्ण चरित्र मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्याचा माझा मानस पक्का झाला. त्यानंतर चक्रे सुलभतेने फिरली... श्रीवास्तवांशी संपर्क, इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशक 'ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस' शी करार, अशोक जैनांचा अनुवाद करण्यास होकार... आणि नंतर पुस्तक निर्मितीची पूर्ण प्रक्रिया!

पण ही निर्मिती प्रक्रिया अनेकांच्या सहकार्यानेच आज सिद्ध झाली. डॉ. सी. पी. श्रीवास्तव व त्यांच्या इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे डॉ. रुकून अडवानी यांनी 'रोहन प्रकाशन' वर मराठी आवृत्तीचे हक्क देताना जो विश्वास दर्शविला, त्यामुळे सुरुवात सुलभ झाली. अशोक जैन यांनीही आपल्या व्यस्ततेतून वेळ काढून अत्यंत तळमळीने अनुवाद करून दिला आणि गाडी मार्गी लागली. ज्येष्ठ आणि जाणकार अशा श्री. पुरुषोत्तम धाक्रस यांनी हस्तलिखित तपासण्याचे व संपादनाचे काम आत्मीयतेने केले. श्री. प्रेम वैद्य यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी बहुमोल, दुर्मिळ छायाचित्रे उपलब्ध करून दिली.

**जन्मशताब्दीच्या निमित्ताने विशेष आवृत्ती :** या चरित्राच्या आजवर चार आवृत्त्या संपल्या आहेत. महाराष्ट्र राज्य सरकारचा सर्वोत्कृष्ट अनुवादाचा पुरस्कारही प्राप्त झाला आहे. ही पाचवी आवृत्ती शास्त्रीजींच्या जन्मशताब्दीनिमित्त वाचकांना विशेष स्वस्त आवृत्ती म्हणून देण्याचे औचित्य साधत आहे. यात व्यवसायाचे गणित नाही. केवळ किमान मूल्यात जास्तीतजास्त वाचकांपर्यंत या थोर नेत्याचे कार्य, त्यांचे विचार, त्यांचा प्रामाणिकपणा पोचवावा, याच हेतूने ही विशेष अवृत्ती प्रसिद्ध करीत आहे.

एका सत्शील परंतु प्रभावी नेत्याचे हे गुंगवून टाकणारे चरित्र मराठी भाषिकांपर्यंत पोहचविण्याची संधी 'रोहन प्रकाशन'ला मिळत आहे... तितकेच छोटेसे योगदान... आणि त्याचे एक आगळे समाधान आहेच.

– प्रदीप चंपानेरकर



।। अनुवादकाचे मनोगत ।।

# अंधारयुगातील कवडसा...

देशातील राजकारण सध्या रसातळाला पोचले असून जणू अंधारयुगच सुरू आहे. "अलीकडे राज्य-राजकारण-राज्य शासन-राजकीय पक्ष वगैरे शब्द भ्रष्टाचार, गुंडगिरी, खुनाखुनी, जाळपोळ यांना पर्यायी शब्द झाल्यासारखी अवस्था झाली आहे." हे पु. ल. देशपांडे यांनी 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार स्वीकारताना काढलेले उद्गार सद्यःस्थितीचे अचूक वर्णन करणारे आहेत. त्यागाची जागा भोगाने व ध्येयाची जागा धनाने घेतली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशासाठी अनेक नेत्यांनी कारावास पत्करला तेव्हा त्यांच्या भाळी तेजस्वी त्यागाचा तिलक होता. आता मात्र भावी भ्रष्टाचाराचा कलंकटिळा मिरवीत नेते समाजाच्या सर्व थरांत शहाजोगपणे वावरत आहेत. देशाच्या इतिहासात प्रथमच एक माजी पंतप्रधान आरोपीच्या पिंजऱ्यात उभे आहेत व एका माजी मुख्य मंत्र्यांची रवानगी तुरुंगात झाली आहे!

अशा परिस्थितीत भारताच्या याच धरतीवर महात्मा गांधी नावाचा एक युगात्मा तेजाची पाऊलवाट चालत होता आणि लालबहादुर शास्त्री नावाचा एक सत्यान्वेषी पंतप्रधान काही काळ देशाचे नेतृत्व करीत होता, यावर विश्वासच बसत नाही. महात्मा गांधी हे जागतिक नेते होते व त्यांचा अहिंसेचा मंत्र अजूनही स्फूर्तिदायी आहे. लालबहादुर शास्त्री यांची कारकीर्द दुर्दैवाने अल्पजीवीच ठरली.

भारताच्या पंतप्रधानांची नावं घेताना पं. नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी अशी

नावं घेतली जातात. 'जय जवान, जय किसान' अशी घोषणा देणारे व भारत-पाक युद्धाच्या वेळी खंबीर नेतृत्व करणारे शास्त्री यांचा काही काळ विसर पडला हे एकूणच आपल्या राजकीय व सांस्कृतिक ऱ्हासाचे चिन्ह वाटते. अलीकडे मात्र अण्णा हजारे यांना पाहून लालबहादुर शास्त्री यांची आठवण होते असे म्हटले जात आहे हे विशेषच.

काही मोजकेच अपवाद वगळले तर स्वच्छ, चारित्र्यवान, आदर्श प्रतिमा असलेल्या नेत्यांची तीव्र उणीव भासते आहे. अशा वेळी शास्त्रींचे स्मरण करणे, त्यांच्या चारित्र्याची, जीवनकार्याची ओळख करून देणे अत्यावश्यक वाटते. सोज्वळ, विनयशील व्यक्तिमत्त्वाच्या या वामनमूर्तीने देशाच्या कठीण काळात समर्थ व खंबीर नेतृत्व दिले. सत्तेच्या मोहमयी विश्वातही ते 'उपभोगशून्य स्वामी' होते. सर्वार्थाने ते राजकीय क्षेत्रातील 'मर्यादापुरुषोत्तम' होते. ना पैशाचा लोभ, ना सत्तेची हाव. त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला तेव्हा महागड्या भाज्या त्यांनी तत्काळ वर्ज्य केल्या, अन्नटंचाईच्या काळात दर सोमवारी केवळ एकच वेळ भोजन घेण्याचा निर्धार त्यांनी पाळला, मुलाच्या शिकवणीला पैसे हवेत म्हणून स्वतःचे कपडे ते स्वतःच धुऊ लागले. आजच्या जमान्यात या साऱ्या गोष्टी खुळेपणाच्या वाटतात! सी. पी. श्रीवास्तव यांनी लिहिलेले हे चरित्र वाचताना शास्त्रींच्या जीवनाचे असे अनेक पैलू उमगतात. सत्तेचे परमोच्चपद मिळाले तरी सत्याकडून सत्याकडे चाललेला त्यांचा प्रवास कसा थांबला नाही हे समजतं.

श्रीवास्तव यांनी बरीच वर्षं संशोधन करून अत्यंत परिश्रमपूर्वक हे चरित्र लिहिलं. दंतकथा, भाकडकथा, कौतुककथा, सांगोवांगी ऐकलेल्या कथा यांचा आधार न घेता सर्व घटनांची शहनिशा त्यांनी केली, असंख्य पुरावे गोळा केले. शास्त्रींचे कुटुंबीय, स्नेही, सहकारी यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी तपशीलवार चर्चा केली. बनारसला जाऊन शास्त्रींचे मित्र पं. राजाराम शास्त्री यांची तर त्यांनी भेट घेतलीच, पण थेट मॉस्कोला जाऊन तत्कालीन ताश्कंद शिखर परिषदेचे प्रवक्ते झामियातिन यांच्याशी चर्चा केली. शास्त्रींच्या आकस्मिक मृत्यूनंतर त्यांच्यावर विषप्रयोग करण्यात आला होता काय अशी शंका व्यक्त केली गेली होती. रशियन डॉक्टरांच्या पथकानं हा तर्क फेटाळून लावला होता. श्रीवास्तव यांनी केवळ त्यांच्या अहवालावर विसंबून न राहता लंडन येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तज्ज्ञ डॉक्टरांचेही मत घेऊन या शंकेत काही तथ्य नाही असं साधार विवेचन केलं आहे.

ताश्कंद येथील शिखर परिषदेचं अत्यंत साद्यंत, तपशीलवार, नाट्यपूर्ण, रोचक वर्णन श्रीवास्तव यांनी केलं आहे. परिषदेत क्षणोक्षणी सतत उंच-सखल होत जाणारं ताण-तणावाचं वातावरण त्यांनी मूर्तिमंत उभं केलं आहे. शास्त्रींच्या अंतिम यात्रेचं वर्णन तर हेलावून टाकणारं आहे.

लेखकानं कोठेही आत्मस्तुतीची तुतारी फुंकलेली नाही की शास्त्रींच्या कर्तृत्वाचा अकारण ढोल बडवलेला नाही. शास्त्रींच्या कारकीर्दीतील अनेक ऐतिहासिक क्षणांचे

श्रीवास्तव स्वत: साक्षीदार होते. तेव्हा प्रत्यक्ष अनुभव व पुरावे यांच्या साह्याने त्यांनी एक अभ्यासपूर्ण, पारदर्शी चरित्र लिहिलं. शास्त्रींवर फारशी पुस्तकं उपलब्ध नाहीत. त्यामुळे आधुनिक भारताच्या इतिहासाच्या दृष्टीनं त्यांच्या समग्र, साक्षेपी व समतोल चरित्राची आवश्यकता होती. ती पुरी करण्याचं मौलिक कार्य श्रीवास्तव यांनी केलं आहे.

श्रीवास्तव यांनी लिहिलेलं इंग्रजी चरित्र वाचून मी झपाटून गेलो. प्रकांड पांडित्य, वैचारिक वलय, मंत्रमुग्ध करणारं व्यक्तिमत्त्व नसूनही नैतिक बळ, शुद्ध चारित्र्य व स्फटिकवत प्रामाणिकपणा या जोरावर एखादा नेता कशी उत्तुंग कामगिरी करू शकतो याचं दर्शन भारावूनच टाकणारं होतं. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये या ग्रंथाचं मी केलेलं परीक्षण वाचून 'रोहन प्रकाशन'चे प्रदीप चंपानेरकर प्रभावित झाले. शास्त्रींच्या जीवनाचं त्यांनाही जबर आकर्षण, त्यामुळे मराठीत हे चरित्र आणण्याचा ध्यासच त्यांनी घेतला. मी अनुवाद करावा अशी कल्पना त्यांनी मांडली व जिद्दीनं पाठपुरावा केला. तेव्हा या अनुवादाचं मुख्य श्रेय चंपानेरकरांचं आहे. या ग्रंथातील उर्दू शेराचा अनुवाद करताना कै. विद्याधर गोखले यांनी तत्परतेने मदत केली. संत कबीर यांचा एक दोहा या पुस्तकात आहे. प्रख्यात कवी मंगेश पाडगावकर यांनी कबीरांच्या रचनांचा समर्थ अनुवाद केला आहे. त्यातील एक अनुवादित दोहा या चरित्रात समाविष्ट केला आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार.

भारत-पाक युद्धाचं पुस्तकात वर्णन असून त्यातील इंग्रजी शब्दांचा अचूक अनुवाद करण्यासाठी कर्नल श्याम चव्हाण, 'महाराष्ट्र टाइम्स'मधील माझे सहकारी दिवाकर देशपांडे यांनी साहाय्य केलं. तसंच वैद्यकीय शब्दांवर डॉ. रवी बापट यांनी 'शब्दशल्यक्रिया' केली. या सर्वांचा मी ऋणी आहे. अनुवादाचं संपूर्ण हस्तलिखित वाचून मौलिक सूचना व संपादन संस्कार केल्याबद्दल पुरुषोत्तम धाक्रस यांचाही मी आभारी आहे.

मूळ इंग्रजी ग्रंथातील चार प्रकरणं मराठी अनुवादात समाविष्ट केलेली नाहीत. अर्थात तसं करताना एकूण चरित्राचा ओघ कुठे खंडित होणार नाही वा अपुरेपणा येणार नाही याचं भान बाळगण्यात आलं आहे. मूळ ग्रंथ केवळ भारतीयच नव्हे, तर परदेशी वाचक डोळ्यांसमोर ठेवून लिहिला आहे. त्यामुळे काही बाबींचा सविस्तर तपशील दिलेला आहे. मराठी अनुवाद करताना त्याची गरज वाटली नाही, म्हणून ही प्रकरणं अंतर्भूत न करण्यास श्रीवास्तव यांनी संमती दिली आहे. तसंच वेळोवेळी शंकांचं निराकरण करणं व आवश्यक तेथे माहिती तत्परतेने उपलब्ध करून देणं आदी सहकार्यही सर्वतोपरी त्यांनी दिलं. त्यांचा मी फार आभारी आहे.

भारताच्या आधुनिक इतिहासातील 'शास्त्रीपर्व' हा एक तेजस्वी टप्पा आहे. सध्याच्या वातावरणात प्रकाशाचे एकेक दिवे मालवत असताना हे सात्विक निरांजन दिपवून टाकणारे आहे. या अंधारयुगातला हा कवडसा दिलासादायक वाटला तर हा अनुवाद सत्कारणी ठरेल.

१ जानेवारी १९९७. — अशोक जैन

॥ निमित्त पाचव्या आवृत्तीचे ॥



## जन्मशताब्दी आणि विशेष आवृत्ती

**ला**लबहादुर शास्त्री देशाच्या पंतप्रधानपदी अल्पकाळच होते. परंतु त्याच काळात भारत-पाक युद्ध झाले व सबंध देशाला त्यांनी प्रेरणा दिली. चैतन्याच्या संजीवनीनं अवघा देश सळसळू लागला. देशभक्तीची भावना प्रत्येक नागरिकाच्या धमन्यांतून वाहू लागली. राष्ट्रऐक्याच्या ऊर्मी उचंबळून आल्या. शास्त्रींकडे नव्हती राजघराण्यांची पुण्याई, नव्हती ओजस्वी वक्तृत्वाची जादू, नव्हते छाप टाकेल असं व्यक्तिमत्त्व; पण त्यांच्यापाशी होता निखळ, पारदर्शी प्रामाणिकपणा व सचोटी. त्यामुळं कोट्यवधी भारतीयांची मनं त्यांनी जिंकली. शास्त्रींच्या कारकिर्दीचा काळ भारावून टाकणाराच होता. अशा या सुशील, सज्जन, सत्शील, सुसंस्कृत नेत्याचे चरित्र प्रकाशित करावे, असा ध्यासच रोहन प्रकाशनचे प्रदीप चंपानेरकर यांनी घेतला व त्याच आंतरिक प्रेरणेतून त्यांनी हा अनुवाद प्रकाशित केला. मीदेखील शास्त्रींच्या कार्यानं भारावून गेलेल्या पिढीतीलच. एका उदात्त उत्साहानंच मी अनुवाद केला. इतिहासातील विस्मृतीच्या काळदरीत गेलेल्या या नेत्याचं चरित्र वाचण्यात कोणाला स्वारस्य असणार, अशी शंका काही मित्रांनी व्यक्त केली. परंतु चंगळवादी युगातदेखील चांगुलपणाची कदर केली जाते, याचा सुखद अनुभव आला. वाचकांनी या पुस्तकाला चांगला प्रतिसाद दिला.

आजही देशातील राजकीय वातावरण कलंकित, कलहांकित व कलुषित आहे. त्यामुळं शास्त्री यांच्यासारख्या राजकारणातील मर्यादापुरुषोत्तमाचं चरित्र आजही तितकंच स्फूर्तीदायी ठरेल अशी आशा आहे. शास्त्रीजींच्या शताब्दी वर्षाची सांगता होत असताना त्यांचं चरित्र अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावं म्हणून ही खास 'जयजनता' आवृत्ती काढण्याचा रोहन प्रकाशनचा उपक्रम निःसंशय कौतुकास्पद आहे. या उपक्रमास वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभो अशी अपेक्षा.

२ ऑक्टोबर २००४ — अशोक जैन



॥ निमित्त तिसऱ्या आवृत्तीचे ॥

## तीन प्रसंग...

सद्वर्तन आणि प्रामाणिकपणं केलेलं काम हे नेहमीच लक्षात राहतं. परवा एक प्रख्यात तरुण हुशार ॲडव्होकेट महिल्या भेटल्या. आज माझा उपवास आहे असं त्यांनी सांगताच आश्चर्य वाटलं. "एकविसाव्या शतकाकडं वाटचाल चालू आहे व तुमचा मात्र उपवास बिपवास यावर विश्वास दिसतोय." असं मी गंमतीनं म्हणताच त्या पट्‌कन म्हणाल्या, "या उपवासाचा धर्माशी काही संबंध नाही तर राष्ट्रधर्माशी आहे. पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी युद्धाच्या वेळी एक दिवस उपवास पाळायचं आवाहन केलं होतं ना, तेव्हांपासून मी हा उपवास करतेय." दुसऱ्या एका प्रसंगात विख्यात जाहिरात कंपनीतील क्रिएटिव डायरेक्टर म्हणाला, "आमच्या किशोरवयात शास्त्रींच्या सोज्वळ पण खंबीर व्यक्तित्वाने आम्ही एवढे भारून गेलो होतो की आमच्या क्रिकेटटीमचं नाव आम्ही 'जय जवान, जय किसान' असं ठेवलं होतं." बड्या कलावंतांच्या चटपट मुलाखती (तुमचं आवडतं गाणं कुठलं? पदार्थ कोणता आवडतो टाइप) नेहमी प्रसिद्ध होत असतात. एका प्रख्यात अभिनेत्यानं सर्वात आवडता नेता कोण याचं उत्तर देताना म्हटलं होतं, "लालबहादुर शास्त्री!"

तीन वेगवेगळ्या क्षेत्रातील तीन भिन्न भिन्न घटना! उपवास असो, क्रिकेट सामना असो वा आदर्श पुढाऱ्याचे स्वप्न असो, त्या सर्वांना अजूनही आठवण येते लालबहादुर शास्त्री यांची! त्यांचे स्मरण असे कृतीकृतीतून अंमलात आणले जाते आहे.

अशा असंख्य वाचकांच्या प्रेमामुळंच अवघ्या दीड वर्षात पुस्तकाच्या दोन आवृत्या संपून आज ही तिसरी आवृत्ती काढायचा योग आला. हे प्रेम असच वाढत राहो!

११ जानेवारी १९९९

– अशोक जैन



।। लेखकाचे मनोगत ।।

## 'आपने मुझे पहचाना नहीं?'

**मा**झी व लालबहादुर शास्त्री यांची पहिली भेट झाली जून १९५० मध्ये. त्याआधी काही आठवड्यांपूर्वीच लखनौला शहर दंडाधिकारी म्हणून माझी नियुक्ती झाली होती. शास्त्री तेव्हा उत्तर प्रदेशचे गृह व वाहतूक मंत्री होते. माझे वरिष्ठ म्हणजे लखनौचे जिल्हाधिकारी यांनी शास्त्रीजींना भेटून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे असा सल्ला मला दिला होता.

त्यानुसार मी त्यांच्या मुलाखतीची परवानगी मागितली. तेव्हा दुसऱ्या दिवशी सायंकाळी सहा वाजता बंगल्यावर भेटायला यावं असा निरोप मला देण्यात आला. ठरलेल्या वेळेच्या पाच मिनिटं आधीच मी पोहोचलो. गृहमंत्र्यांची गाडी पोर्चमध्ये सज्ज होती. गाडीचं मागचं दारही उघडून ठेवलेलं होतं. गृहमंत्री कुठं तरी तातडीनं जाण्याच्या तयारीत आहेत हे माझ्या लक्षात आलं. त्याच वेळी गृहमंत्र्यांचा खासगी सचिव बाहेर आला. मुख्य मंत्र्यांनी अचानक ठरवलेल्या बैठकीसाठी गृहमंत्र्यांना जावं लागत आहे, तेव्हा तुम्हाला मुलाखतीची दुसरी वेळ कळविली जाईल, असं त्यानं मला सांगितलं. शास्त्रीजींनी भेटायला आलेल्या दुसऱ्या एका गृहस्थांनाही त्यानं असाच निरोप दिला.

इतक्यात स्वतः शास्त्रीच बाहेर आले. मी त्यांना पूर्वी कधीच पाहिलं नव्हतं. त्यांची वामनमूर्ती व त्यांचा नीटनेटका पोशाख यानं मी प्रभावित होऊन गेलो. हातानं सूत

कातून बनवलेल्या खादीचा अत्यंत स्वच्छ व कडक इस्त्रीचा कुडता, धोतर व गांधी टोपी असा त्यांचा पोशाख होता. भेटायला आलेल्या त्या गृहस्थांना त्यांनी प्रेमळ स्मित करीत नमस्कार केला. त्यांच्याशी ते अत्यंत सौजन्यानं बोलत होते. त्यांनी शास्त्रींना काही कागदपत्रं दिली व निरोप घेऊन ते निघून गेले. खासगी सचिव शास्त्रीजींपाशी गेला व माझ्याकडे निर्देश करीत त्यांच्या कानात काहीतरी पुटपुटला.

मी काहीसा दूरवरच उभा होतो. ते झपझप पावलं टाकीत माझ्याजवळ आले व त्यांनी अगदी प्रेमभरानं मला नमस्कार केला. एक कॅबिनेट मंत्री एका कनिष्ठ सनदी नोकराला नमस्कार करतो हे पाहून मी क्षणभर अवाकच झालो. शास्त्रीजींच्या या वागण्याचा माझ्या मनावर खोलवर ठसा उमटला. मी तत्काळ त्यांना आदरपूर्वक अभिवादन केलं खरं, तरी पण मी भांबावूनच गेलो होतो. त्यांनी मला दिवाणखान्यात नेलं. तेव्हा माझ्या मनावरचा ताण काहीसा कमी झाला. त्यांना तातडीच्या बैठकीला जायचं आहे हे ठाऊक असल्यानं मी पुन्हा कधी तरी येईन असं सुचवून पाहिलं. पण ते घाईत नव्हते. "आताच बसून बोलू या" असा आग्रह त्यांनी धरला. लखनौत राहायला घर मिळालं की नाही, मी स्थिरस्थावर झालो की नाही याची त्यांनी आस्थेनं चौकशी केली. "माझ्या कामाच्या संदर्भात काही सूचना आहेत का?" अशी विचारणा मी केली. क्षणभर विचार करून ते म्हणाले, "लखनौ ही राजधानी असल्यानं इथं खूप राजकीय व अन्य घडामोडी घडत असतात. त्यामुळं स्वच्छ व प्रभावी प्रशासन राखणं अत्यंत महत्त्वाचं आहे. कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवरही सतत काळजीपूर्वक लक्ष ठेवण्याची गरज आहे. जनता आणि पोलिस यांच्यातील संबंध परस्परांबद्दल आदराचे असले पाहिजेत. तुमचे जिल्हाधिकारी हे अत्यंत कार्यक्षम व अनुभवी अधिकारी असून तेच तुम्हाला उत्तम मार्गदर्शन करू शकतील."

त्यांचं बोलणं संपताच मी उठून उभा राहिलो. माझ्यामुळं त्यांना उशीर झाला म्हणून दिलगिरी व्यक्त केली. "पुन्हा भेटा" असं त्यांनी मला सांगितलं. आम्ही दोघे बरोबरच बंगल्याबाहेर आलो. क्षणभर थांबून त्यांनी मी वाहन आणलंय की नाही याची चौकशी केली. मी गाडी आणलेली होती. त्यांनी मला गुडबाय केलं व त्यांची गाडी हळूहळू सुरू झाली. मी हात जोडून त्यांना निरोप दिला.

क्षणभर वाटेतच उभा राहून मी विचार करू लागलो. एका ज्येष्ठ नेत्यानं व कॅबिनेट मंत्र्यानं माझ्यासारख्या कनिष्ठ सनदी अधिकाऱ्याचं स्वागत इतक्या प्रेमळपणानं करावं याचं मला फारच अप्रूप वाटलं. दिल्लीतील काही मंत्री आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांशी कसं वागतात हे मला ठाऊक होतं. अधिकाऱ्यांकडे जाता जाता एखादा कटाक्ष टाकणं किंवा नुसतीच मान हलवणं अशी त्यांची सर्वसाधारण वर्तणूक असे. लालबहादुर शास्त्री मात्र सर्वांशी– मग त्यांचा दर्जा, पद काहीही असो– सारख्याच सौजन्यानं व प्रेमळपणानं वागत हे मला नंतर उमगलं.

काही महिन्यांतच माझी अतिरिक्त जिल्हाधिकारीपदावर बढती झाली व माझी

मीरतला बदली करण्यात आली. शास्त्रींना पुन्हा भेटायला पाहिजे असं काही मला वाटलं नाही, तेव्हा त्यांचा निरोप न घेताच मी लखनौ सोडलं. शास्त्रींशी आलेला संबंध आता संपला असं मला वाटलं होतं. परंतु माझ्या सुदैवानं तसं घडायचं नव्हतं.

दोन वर्षांनंतरची म्हणजे १९५२ सालची गोष्ट आहे. माझी पत्नी निर्मला व कन्या कल्पना आणि साधना नागपूरहून येणार होत्या, म्हणून त्यांना घ्यायला मी दिल्ली रेल्वे स्टेशनवर गेलो होतो. त्यांची गाडी आली व मी त्यांचं स्वागत केलं. प्लॅटफॉर्मवर एकच गर्दी उसळली होती. गाडीतून उतरणारे प्रवासी घाईघाईनं स्टेशनबाहेर पडू पाहत होते. जरा गर्दी ओसरू द्यावी या विचारानं आम्ही प्लॅटफॉर्मवरच थांबून राहिलो. आमच्या मुली लहान होत्या. त्यांची वयं होती चार व दोन वर्षं. त्यांना जवळ घेऊन आम्ही दोघं उभी होतो. इतक्यात प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या बाजूला लखनौहून एक गाडी आली. बरेचसे रेल्वे अधिकारी आधीच तिथं येऊन दाखल झाले होते. कोणा तरी बड्या असामीच्या स्वागताला ते आले होते हे उघड होतं. एवढ्यात एका डब्यातून लालबहादुर शास्त्री उतरले. त्या वेळी ते पंडित नेहरूंच्या केंद्रीय मंत्रिमंडळात रेल्वे व वाहतूक मंत्री होते. रेल्वे अधिकाऱ्यांची त्यांच्या स्वागतासाठी लगबग उडाली. शास्त्री प्लॅटफॉर्मवरून निघाले. अचानक त्यांची नजर आमच्याकडे गेली. परंतु क्षणभरच. कारण कोणी तरी त्यांच्याशी बोलू लागलं.

त्यांना भेटून ओळख दाखवावी का असा प्रश्न मला पडला. दोन वर्षांपूर्वी आम्ही लखनौला भेटलो होतो व तेही जेमतेम तीन-चार मिनिटं. तेव्हा ते नक्कीच मला विसरले असणार अशी मला खात्री वाटत होती. माझ्या मनात असे विचार घोळत असतानाच शास्त्रींनी पुन्हा एकवार माझ्या दिशेनं पाहिलं. ते कोणाचा बरं शोध घेत असावेत, असा प्रश्न मला पडला आणि मी दुसरीकडेच पाहू लागलो. त्यानंतर जे घडलं त्यामुळं मी पार शरमिंदाच होऊन गेलो. अधिकाऱ्यांचा घोळका सोडून शास्त्री माझ्याजवळ आले. पूर्वीच्याच स्नेहाळपणे त्यांनी मला नमस्कार केला आणि म्हणाले, *"श्रीवास्तव साहब, नमस्ते. आपने मुझे पहचाना नहीं? मैं लालबहादुर हूँ।"*

मी अवाक झालो. माझ्या तोंडून शब्दच फुटेना. स्वतःला काहीसं सावरून मी म्हणालो, "तुम्हाला ओळखणार नाही असं कसं होईल? परंतु दोन वर्षांनंतरही तुम्ही मला ओळखाल असं वाटलं नव्हतं!"

तेव्हा लखनौ इथं झालेल्या भेटीचं त्यांनी मला स्मरण करून दिलं. माझी मीरतला बदली झाल्याचीही त्यांना माहिती होती. त्यांनी माझ्या कुटुंबियांच्या ख्यालीखुशालीची विचारपूस केली. मी काही तरी पुटपुटत उत्तरं दिली. पुन्हा स्मित करीत ते अधिकाऱ्यांच्या घोळक्यात सामील झाले.

१९५२ मध्ये अचानक झालेल्या या भेटीनंतर १९५७ पर्यंत त्यांना भेटायचा काही योग आला नाही. तेव्हा शास्त्री केंद्रीय वाहतूक व दळणवळण मंत्री झाले होते व माझी केंद्र सरकारच्या सेवेत बदली झाली होती. नौकानयन खात्याचा उपमहासंचालक

म्हणून मी मुंबईत काम पाहत होतो.

नौकानयन विभाग हा शास्त्रींच्याच अखत्यारीत होता. नौकानयन महासंचालक म्हणून डॉ. नगेन्द्रसिंग दिल्लीत काम पाहत होते. आपला खासगी सचिव म्हणून काम करण्यासाठी एखाद्या आय. एस. ए. अधिकाऱ्याचं नाव सुचवा अशी विनंती शास्त्री यांनी डॉ. नगेन्द्रसिंग यांना केली तेव्हा त्यांनी माझं नाव सुचवलं. तत्काळ दिल्लीत येऊन मंत्र्यांना भेटा असा निरोप मला देण्यात आला. त्यानुसार मी दिल्लीला गेलो. शास्त्रींच्या दालनात शिरताच त्यांना प्रथम अभिवादन करण्यात मात्र या खेपेस मला यश आलं. माझ्याबद्दलचा गोपनीय अहवाल त्यांना ठाऊक होता. माझ्या पात्रतेविषयी त्यांना काही शंका नव्हती. नेहमीच्याच आपुलकीनं त्यांनी माझं स्वागत केलं व "माझा मदतनीस म्हणून काम कराल काय," अशी विचारणा केली. "तुम्ही माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी कृतज्ञ आहे. तुमची सेवा करण्यात मला अभिमानच वाटेल." असं उत्तर मी दिलं. थोड्याच दिवसांत त्यांचा खासगी सचिव म्हणून कामावर मी रुजू झालो.

कार्यालयीन कामासंबंधी त्यांच्या अपेक्षा जसजसे दिवस जाऊ लागले तसतशा मला चांगल्या समजू लागल्या. अविचल निष्ठा व सत्य या आधारावरच सारी कामं केली जावीत असा त्यांचा आग्रह असे. त्यामुळं मीही आनंदून गेलो. रात्री उशिरापर्यंत काम करण्याची त्यांची पद्धती होती. मी पण त्यांना आनंदानं सोबत देई.

तसं सारं कसं सुरळीत चाललं होतं. पण एका घटनेनं मला आणखी एक धडा मिळाला. शास्त्रींकडून शिकलेला तो तिसरा धडा!

एके दिवशी दुपारी मी शास्त्रींशी त्यांच्या कार्यालयात चर्चा करीत होतो. इतक्यात पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचा फोन आला. नव्या फॉकर फ्रेंडशिप विमानाचं दुसऱ्या दिवशी सकाळी प्रात्यक्षिक होणार होतं. ते डच राजदूताला दाखवायचं पंडितजींनी ठरवलं होतं व त्या उड्डाणात शास्त्रींनीही सामील व्हावं म्हणून त्यांनी फोन केला होता. शास्त्रींनी हे आमंत्रण स्वीकारलं. नेहरूंच्या आधीच शास्त्री विमानतळावर पोचतील अशा बेतानं व्यवस्था करावी अशा सूचना मी शास्त्रींच्या मुलाखतींचं काम पाहणाऱ्या वैयक्तिक मदतनीसाला दिल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता शास्त्रींच्या बंगल्यावर पोचलो तेव्हा त्यांची व पंतप्रधानांची मुलाखत चुकली असं कळलं. मला धक्काच बसला. शास्त्रींना भलत्याच विमानतळावर नेण्यात आल्यानं हा घोटाळा झाला होता. आपल्यामुळंच त्यांच्यावर हा अनवस्था प्रसंग ओढवला या विचारानं मी खजील झालो. आता आपली काही धडगत नाही, चांगलीच खरडपट्टी निघेल असं वाटू लागलं.

पण मी आल्याचं समजताच खुद्द शास्त्रीच बाहेर आले. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचंच स्मित झळकत असलेलं पाहून मी आश्चर्यचकित झालो. जणू काही घडलेलंच नाही असं त्यांचं वागणं होतं. सहसा माझ्या भावना लपून राहत नाहीत. मी किती

अस्वस्थ आहे हे माझ्या चेहऱ्यावरूनच लक्षात येत होतं. माझ्याकडे पाहत शास्त्री म्हणाले, "तुम्हाला बरं वाटत नाहीसं दिसतंय... ठीक आहात ना तुम्ही?" बिनशर्त दिलगिरी प्रकट करीत मी म्हणालो, "पंतप्रधानांच्या भेटीबाबत मी नीट व्यवस्था केली नाही, याचा मला अत्यंत खेद होतो..." त्यावर ते उत्तरले, "त्याची काही चिंता करू नका. मी पंडितजींना वेळेवर निरोप पाठवला. डच राजदूतासमवेत विमानोड्डाणाचा कार्यक्रम त्यांनी ठरल्याप्रमाणं पार पाडला. मी पुढं केव्हा तरी त्या विमानाची पाहणी करीन!"

"हा तुमचा चांगुलपणा झाला. परंतु अशी गफलत व्हायला नको होती. मला त्याबद्दल खूप वाईट वाटतंय." मी म्हणालो. त्यावर ते उत्तरले, "माझ्या भेटीगाठी ठरवण्याची जबाबदारी तुमची नाही. तेव्हा या गफलतीबद्दल तुम्ही स्वतःला बोल लावण्याचं काही कारण नाही. तसंच या प्रकाराबद्दल तुम्ही खासगी मदतनीसालाही काही बोलू नका. तो आधीच खूप अस्वस्थ झालेला आहे. या प्रकरणात त्यानं आधी सारी माहिती घेतली होती. पण अनेकदा सर्व काळजी घेऊनही काहीतरी घोटाळा होतोच. तेव्हा आता फार विचार करू नका. चला, आपण बरोबरच ऑफिसला जाऊ या."

शास्त्री कधी हातवारे करीत नसत. त्यांच्या नजरेतून त्यांचे भाव प्रकट होत. त्यांच्या प्रेमळ, कनवाळू नजरेतून त्यांच्या आत्म्याची मनस्वी उदारता व्यक्त होई. त्यांची नैतिक उंची, शालीनता, क्षमाशील वृत्ती, त्यांच्यातील मानवता यांचं दर्शन मला झालं.

या तिन्ही घटनांचा माझ्यावर खोल ठसा उमटला. किंबहुना माझ्या जीवनाचं सूत्रच त्यामुळं ठरून गेलं. पूर्ण निष्ठेनं मी त्यांच्याबरोबर काम करू लागलो. चर्चेत मी निःपक्षपातीपणे मत प्रदर्शित करी. त्याचं ते कौतुक करीत. ते माझ्यावर विश्वास टाकू लागले. हळूहळू मी त्यांचा वैयक्तिक सल्लागारच बनून गेलो.

१९५९ मध्ये लालबहादुर शास्त्री यांची वाणिज्य व उद्योगमंत्री म्हणून नियुक्ती झाली. त्या वेळीही खासगी सचिव म्हणून त्यांनी माझी नेमणूक केली. या खात्यात माझ्या कामाचा बोजा एवढा वाढला की, रात्री दहाच्या आधी काम संपतच नसे. कामाच्या या रगाड्यानं काही महिन्यांत माझी प्रकृती ढासळली. दिल्लीचं विषम हवामान, विशेषतः कडक उन्हाळा, धूळ यांचा मला फार त्रास होऊ लागला. त्या मानानं मुंबईचं हवामान मला अधिक मानवणारं होतं. माझी मुंबईच्या नौकानयन खात्यात पुन्हा बदली करायला डॉ. नगेन्द्रसिंग उत्सुक होतेच. त्यांनी मुंबईला पाठवण्यासाठी मला मुक्त करावं अशी विनंती शास्त्रींना केली.

काहीशा भावुक अवस्थेतच मी शास्त्रींचा निरोप घेतला. ते आपल्या भावनांचं प्रदर्शन कधी करीत नसत. "यापुढे आपला पुन्हा संबंध येणारच नाही असं मानू नका, अधूनमधून भेटत जा." असं त्यांनी मला प्रेमानं सांगितलं. माझं दिल्लीला जाणं झालं

किंवा शास्त्री मुंबईत आले तर आमच्या भेटीगाठी होत असत. त्यामुळं आमच्यातील वैयक्तिक संबंध टिकून राहिले.

शास्त्री यांना १९५९ मध्ये हृदयविकाराचा झटका आला. त्यांना अलाहाबाद येथील रुग्णालयात दाखल केल्याची बातमी वाचून मी बेचैन झालो. मला त्यांची खूप काळजी वाटू लागली. शास्त्रींची प्रकृती स्थिर आहे असं मित्रांनी कळवलं तरी मी अलाहाबादला जायचं ठरवलं.

रुग्णालयातील त्यांच्या खोलीत शिरताना काहीशी काळजी वाटत होती. ते आराम करीत होते व त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचं स्नेहाळ स्मित तरळत होतं. मला पाहून त्यांना साहजिकच आनंद झाला. "मला आता बरं वाटतंय" असं ते म्हणाले. त्यांचा आवाज स्पष्ट होता आणि त्यातून कसल्याही चिंतेची छटा डोकावत नव्हती. काही मिनिटं त्यांच्याशी बोलून मी निरोप घेतला. माझ्या मनावरचा ताण हलका झाला होता. तीन आठवड्यांनंतर शास्त्री दिल्लीत परतले व कामावर रुजू झाले.

१९५९ ते १९६३ या काळात त्यांच्या व माझ्या अधूनमधून भेटी होत राहिल्या. एप्रिल १९६१ मध्ये त्यांची गृहमंत्रिपदी नियुक्ती झाली व त्यांचं राजकीय महत्त्व वाढलं. १९६३ मध्ये 'कामराज योजना' आली. पक्ष बळकट करण्यासाठी काही मुख्य मंत्र्यांनी व ज्येष्ठ केंद्रीय मंत्र्यांनी आपल्या पदांचे राजीनामे देऊन संघटनेच्या कार्याला वाहून घ्यावं असं काँग्रेस कार्यकारिणीनं आवाहन केलं. सहा मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत असं ठरलं. पं. नेहरू शास्त्रींना मुक्त करायला तयार नव्हते, परंतु शास्त्रींनीच आग्रह धरल्याने त्यांचा राजीनामा पंडितजींनी स्वीकारला. मात्र काही महिन्यांनीच म्हणजे जानेवारी १९६४ मध्ये त्यांनी शास्त्रींचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश केला. पं. नेहरूंची प्रकृती बरी नव्हती व आपल्या कामात शास्त्रींनी मदत करावी अशी त्यांची इच्छा होती.

पं. नेहरूंचं २७ मे १९६४ रोजी निधन झालं. त्या वेळी एका नौकानयनविषयक परिषदेला हजर राहण्यासाठी मी ब्रिटनला गेलो होतो. सबंध देशाचे 'हीरो' असलेले पं. नेहरू माझेही लाडके नेते होते. त्यांच्या मृत्यूनं मलाही अतीव दुःख झालं. त्यांच्याशिवाय देशाची कल्पनाच करवत नव्हती. देशाच्या भवितव्याबद्दल काळजी व्यक्त केली जात होती. एकमतानं नेत्याची निवड व्हावी म्हणून प्रयत्न केले जात आहेत अशा बातम्या येत होत्या. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेतेपदी लालबहादुर शास्त्री यांची निवड झाली असून ते लवकरच पंतप्रधानपदाची सूत्रं हाती घेतील असं वृत्त २ जून १९६४ रोजी येऊन थडकलं. त्यामुळं साहजिकच मी आनंदून गेलो.

मी मुंबईला परतलो आणि पंतप्रधान आजारी असल्याचं समजलं. डॉक्टरांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे असं वर्तमानपत्रातील बातमीत म्हटलं होतं. त्यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला असावा अशी अफवा होती. मी व माझी पत्नी काळजीत पडलो. मी तत्काळ दिल्लीला जाऊन पंतप्रधानांना शक्य त्या प्रकारे साहाय्य करावं असा आग्रह माझ्या पत्नीनं धरला. परंतु एक सनदी अधिकारी म्हणून

स्वतःच पुढाकार घेण्यास माझी तयारी नव्हती. काही कारणास्तव आपल्या मदतनीसांत पंतप्रधानांना माझा अंतर्भाव करायचा नसेल तर उगाच त्यांच्यापुढं अडचण निर्माण करण्याची माझी इच्छा नव्हती.

काही दिवसांनी एका बैठकीसाठी मला दिल्लीला जावं लागलं. दिल्लीला जाऊनही त्यांच्या प्रकृतीची विचारपूस न करताच परतलो असतो तर मलाच चुकल्याचुकल्यासारखं वाटलं असतं. तेव्हा मी त्यांची भेट घ्यायचं ठरवलं.

पंतप्रधानांच्या निवासस्थानी मी गेलो तेव्हा डॉक्टरांनी भेटीगाठींवर निर्बंध घातले आहेत; पण तुम्ही आल्याचं शास्त्रींच्या कानावरं घालतो असं त्या वेळी कामावर असलेल्या पंतप्रधानांच्या वैयक्तिक मदतनीसानं मला सांगितलं. थोड्या वेळानं तो परतला व शास्त्रींनी मला भेटायचं मान्य केलंय असा निरोप त्यानं दिला. मात्र एक-दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळ थांबू नका असं त्यानं सुचवलं. मी आत गेलो. शास्त्री पलंगावर पहुडले होते. त्यांची तब्येत बरी वाटत होती. नेहमीप्रमाणेच स्मित करीत त्यांनी माझं स्वागत केलं. देशाचं नेतृत्व त्यांनी स्वीकारलं याबद्दल मी त्यांचं अभिनंदन केलं व प्रकृतीला आराम पडावा म्हणून शुभेच्छा दिल्या.

त्या खोलीत शास्त्रींचे दोन मदतनीस उपस्थित होते. मी जास्त वेळ थांबू नये अशी त्यांची रास्त अपेक्षा होती व मलाही त्याचं भान होतं. तेव्हा काही क्षणांतच नमस्कार करून 'मी आता निघतो' असं मी म्हणालो. मदतनीसांनी होकारार्थी मान डोलावली. परंतु शास्त्रींच्या मनात काही वेगळंच असावं. त्यांनी त्या मदतनीसांना बाहेर जाण्याची विनंती केली व मला थांबायला सांगितलं. मला आश्चर्यच वाटलं. जेव्हा आम्ही दोघेच खोलीत उरलो तेव्हा शास्त्री म्हणाले,

*"आपको तो बम्बई बहुत पसंद है, अभी वहाँ कबतक रहनेका इरादा है?"*

*"जबतक आप मुनासिब समझे." मी उत्तरलो.*

त्यावर क्षणभर माझ्याकडे पाहत ते म्हणाले,

*"मैं सोचता हूँ कि, अब आप यहाँ आ जाइये, और मेरी मदद करिये।"*

*"जी, अच्छा."* मी तत्काळ उत्तरलो. शास्त्री खूष झाले. माझ्या बदलीची तत्काळ व्यवस्था केली जाईल असं त्यांनी मला सांगितलं.

त्यांचा निरोप घेऊन मी मुंबईला परतलो. सनदी नोकरांच्या आचारसंहितेचा भंग न होता आपोआपच गोष्टी जुळून आल्या म्हणून मी आनंदून गेलो होतो. निर्मलाही खूष झाली.

थोड्याच दिवसांत माझ्या बदलीचा आदेश हाती पडला व मी दिल्लीला पंतप्रधानांच्या संयुक्त सचिवपदावर रुजू झालो. भारतीय सनदी सेवेतील सर्वांत ज्येष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जाणारे एल. के. झा आणि राजेश्वर प्रसाद यांची पंतप्रधानांच्या कार्यालयात अनुक्रमे सचिव व संयुक्त सचिव या पदांवर नियुक्ती झाली होती. तेव्हा माझ्याकडे नेमकं काय काम असणार हे जाणून घेण्यास मी उत्सुक होतो. शास्त्रींना

"माझ्या कामाचं स्वरूप काय," असं विचारता ते म्हणाले, "तुम्ही खासगी सचिव म्हणून जी कामं पूर्वी करीत होतात, मला मदत करीत होतात तसंच काम इथंही करायचं."

याचा अर्थ अगदी निकटचा मदतनीस म्हणून मी काम करावं अशी त्यांची अपेक्षा होती. कॅबिनेट मंत्र्यांपेक्षा पंतप्रधानांच्या जबाबदाऱ्या व्यापक व वेगळ्या असतात याची मला जाणीव होती. तेव्हा "माझ्यासाठी काही विशिष्ट सूचना आहेत का," असं मी विचारलं तेव्हा ते म्हणाले, "पूर्वीप्रमाणेच तुम्ही नेहमी माझ्याबरोबर राहायचं. साउथ ब्लॉक, संसद भवन व माझ्या निवासस्थानातील कार्यालय या तिन्ही ठिकाणी तुमचीही कार्यालयं स्थापन करा. गरज पडेल तेव्हा मी तुमची मदत घेईन. तसंच माझ्या विचारार्थ असलेल्या कोणत्याही बाबीबद्दल सल्ला देण्यास वा मतप्रदर्शन करण्यास अनमान करू नका. माझी पत्रं, निवेदनं यांत एकही अनावश्यक शब्द असता कामा नये हे तुम्हाला ठाऊक आहेच. आपण कमी बोलावं व अधिक काम करावं." क्षणभर विचार करून ते पुढं म्हणाले, "पंतप्रधानाचं काम अवघड आहे, पण अशक्य नाही. आपण प्रयत्न करू या. जर आपल्याला यश आलं तर उत्तमच, पण जर मला अपयश आलं तर मी राजीनामा देऊन निघून जाईन."

त्यांचे हे शब्द अजूनही माझ्या कानात घुमत आहेत. त्यांच्यातील कमालीची निष्ठा व प्रामाणिकपणा हीच त्यातून व्यक्त होत होती. यश आलं तर त्याचं श्रेय ते सर्वांना द्यायला तयार होते ("जर आपल्याला यश आलं") आणि अपयश मिळालं तर त्याची सारी जबाबदारी स्वतःवर घ्यायची त्यांची इच्छा होती ("जर मी अयशस्वी झालो–"). त्यामुळं त्यांचे हे शब्द माझ्या लक्षात राहिले. अशा प्रकारे आमच्या कामाला सुरुवात झाली आणि दिवसेंदिवस आमचं नातं अधिकच दृढ बनत गेलं.

रोज सकाळीच पंतप्रधानांच्या १०, जनपथ या निवासस्थानी मी हजर होई व त्यांच्याबरोबरच कार्यालयात जाई. लोकसभेच्या व राज्यसभेच्या बैठकीला ते हजर असत तेव्हा त्यांना हवी ती माहिती तत्काळ पुरवण्यासाठी मी अधिकारी कक्षात उपस्थित असे. आपल्या बंगल्यावरील कार्यालयात ते रात्री उशिरापर्यंत काम करीत बसत. भारत-पाक युद्धाच्या वेळी तर मध्यरात्रीच्या आधी काम संपतच नसे. अनेकदा पहाट होई. तेव्हा मीही शेजारच्याच माझ्या कार्यालयात काम करीत बसे.

त्यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता व माझीही त्यांच्यावर संपूर्ण निष्ठा होती. त्यामुळं आमचे संबंध दृढ बनत गेले. अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील बाबींचीही चर्चा ते माझ्याशी विश्वासानं करू लागले. अशी माहिती मी कोणालाही सांगणार नाही, विश्वासघात करणार नाही अशी खात्री त्यांना होती. "तुम्ही प्रामाणिकपणे खराखुरा सल्ला देत जा" असं त्यांनी मला बजावलं होतं. मीही जास्तीत जास्त निःपक्षपातीपणे मतप्रदर्शन करीन, केवळ त्यांना खूष करण्यासाठी काही सांगणार नाही याची खात्री त्यांना होती. अर्थात माझी मतं जरी त्यांनी ऐकून घेतली तरी प्रत्येक गोष्टीवर सखोल

विचार करूनच ते त्यांच्या मतानुसार निर्णय घेत. रोज संध्याकाळी आम्ही दिवसभरातील महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेत असू व दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांची चर्चा करीत असू. विविध विषयांवर त्यांचे विचार काय आहेत याची कल्पना मला असल्यानं पत्रांचे वा भाषणांचे मसुदे तयार करणं सोपं जाई.

त्यांना सरकारी कार्यालयातील चाकोरीची फारशी आवड नव्हती. बोलणं व लिहिणं याबाबत ते अत्यंत काटेकोर असत. गुळगुळीत भाषा, शब्दबंबाळपणा याचं त्यांना वावडं होतं. स्पष्ट, निःसंदिग्ध व नेमक्या शब्दांत लिहिलेले मसुदे त्यांना आवडत. त्यांना जे अभिप्रेत असेल तेच ते नेमकेपणानं सांगत आणि ते जे सांगत तेच त्यांना नेमकं अभिप्रेत असे. आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहण्याचं धैर्य त्यांच्यापाशी होतं. माणसं ओळखण्याचं, त्यांचे हेतू जाणून घेण्याचं अद्‌भुत कसब त्यांच्यापाशी होतं. त्यामुळं हांजी हांजी वा खुशामत करून त्यांना खूष करणं कोणालाही शक्य नसे. एखाद्याच्या हातून चूक घडली किंवा गफलत झाली तर ते क्षमाशीलता दाखवीत, परंतु जर कोणी अप्रामाणिकपणा केला, बनवाबनवी करण्याचा प्रयत्न केला तर ती व्यक्ती त्यांच्या मनातून उतरलीच असं समजावं.

त्यांच्याबरोबर काम करणं म्हटलं तर सोपं व म्हटलं तर अवघडही होतं. सौजन्यानं, प्रामाणिकपणं व स्पष्ट वागलं तर काम करणं सोपं होतं, परंतु सर्वस्वी मनःपूर्वक व आत्मनिष्ठेनं कामाला वाहून घ्यावं लागत असल्यानं ते कठीणही होतं. आपल्या कुटुंबियांसाठी, मित्रांसाठी, वैयक्तिक बाबींसाठी शास्त्रींजवळ फारच थोडा वेळ असे. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्यांचीही अशीच गत होई. पंतप्रधानांच्या जितक्या जवळ जावं तितकं या तत्त्वाचं ओझं वाढत जाई. सारा वेळ सार्वजनिक जबाबदारीला ते वाहून घेत. आपल्याबरोबर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनीही तसंच करावं अशी सक्ती ते करीत नसले तरी कर्मचाऱ्यांना आपणही तसंच वागायला हवं असं अंतःकरणातून वाटू लागे!

त्यांच्या पत्रांचे, भाषणांचे मसुदे तयार करणं, त्यांनी सांगितलेल्या बाबींचा पाठपुरावा करणं हा माझ्या कामाचा एक भाग होता. संसदीय व वृत्तपत्रांशी संबंधित बाबींकडे अधिक लक्ष पुरवायला ते मला सांगत. त्यांच्या बहुतेक परदेश दौऱ्यांत माझा समावेश असे. त्यांच्या अखेरच्या ठरलेल्या ताश्कंदच्या भेटीत मी त्यांच्या समवेत होतोच. तेथील वाटाघाटींच्या काळात बहुतेक सारा वेळ ते उतरलेल्या बंगल्यातच मी घालवला. रोज रात्री उशिरा आम्ही दिवसभराच्या घडामोडींचा आढावा घेत असू व दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची आखणी करीत असू. पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान व सोविएत युनियनचे पंतप्रधान अलेक्सी कोसिजिन यांच्याशी झालेल्या चर्चेचा तपशीलवार वृत्तांत ते मला दररोज सांगत. त्या वेळच्या काही आठवणी माझ्या स्मृतिपटलावरून कधीच पुसल्या जाणार नाहीत.

शास्त्री यांच्याबरोबर दोन टप्प्यांत (१९५७ ते १९५९ व १९६४ ते १९६६)

काम करताना माझ्या व त्यांच्या कुटुंबियांत चांगलीच जवळीक निर्माण झाली. सणासुदीच्या वेळी, अनेकदा भोजनासाठी त्यांच्या निवासस्थानी आम्हाला आमंत्रित केलं जाई. माझी पत्नी निर्मला हिची देशभक्ती, तिची आध्यात्मिकता यांबद्दल शास्त्रींना आदर होता. निर्मलानं १९४२ च्या म. गांधींच्या 'चले जाव' चळवळीत भाग घेतला होता. तिचे वडील पी. के. साळवे हे मध्य प्रदेशातील प्रमुख काँग्रेस नेते होते. त्यांनी राष्ट्रासाठी खूप त्याग केला, कारावास भोगला. त्यांची ही प्रखर राष्ट्रीयता निर्मलात उतरली होती. शास्त्री तिच्याशी धर्म, आध्यात्मिकता, साधू, संत या विषयांवर बोलत. अर्थशास्त्र, राजकारण या विषयांवरही चर्चा करीत. तिनं काँग्रेसमध्ये सामील व्हावं असंही त्यांनी १९६५ मध्ये सुचवलं होतं, पण राजकारणापेक्षा निर्मलाला अध्यात्माचं विशेष आकर्षण होतं.

शास्त्रींच्या कुटुंबियांचं आमच्याशी वागणं अत्यंत प्रेमळ होतं. शास्त्रींच्या पत्नी ललिता यांना आम्ही 'माताजी' म्हणत असू. त्यांचे चिरंजीव हरिकृष्ण, अनिल, सुनील व अशोक हे तर मला भावासारखेच वागवीत. त्यांचे जावई कौशलकुमार व व्ही. एन. सिंग यांचंही वागणं जिव्हाळ्याचं, आदराचं असे. सर्वांशी आमची एवढी जवळीक असूनही माझ्या कार्यालयीन कामात कोणीही यत्किंचितही हस्तक्षेप करीत नसे.

आम्ही ३ जाने. १९६६ रोजी ताश्कंदला गेलो. १० जानेवारी १९६६ ला शांतता करारावर स्वाक्षरी करून शास्त्रींनी इतिहासच घडवला. त्यानंतर काही तासांतच त्यांचं देहावसान झालं. त्याच वेळी सेवानिवृत्त झाल्यावर शास्त्रींचं चरित्र लिहिण्याचा संकल्प मी केला होता. त्या संकल्पाची पूर्ती म्हणजेच प्रस्तुतचं चरित्र.

या ग्रंथात शास्त्रींच्या जीवनाचा पूर्ण वेध घेतला असला तरी मुख्य भर त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीवर आहे. पेचप्रसंगांनी भरलेला, ऐतिहासिक भारत-पाक युद्ध व त्यानंतरची शांतता अशा घडामोडींचा हा काळ होता. शास्त्री हे किती महान व मुत्सद्दी नेते होते याचं दर्शन याच काळात जगाला घडलं.

शास्त्रींचं कर्तृत्व, त्यांचं यश यांबरोबरच त्यांच्या स्वभावातील उणिवा, दुबळेपणा याबद्दलही मी लिहावं असा सल्ला काहींनी मला दिला होता. परंतु त्यांच्यात दुबळेपणा, एकनिष्ठतेचा अभाव मला कधी सापडलाच नाही. लहानपणीच त्यांनी अगदी कडक अशा नैतिक मूल्यांचं आचरण करायचा निर्धार केला व तो अखेरपर्यंत पाळला. त्यांना सत्तेची लालसा, पैशाचा लोभ, स्त्रियांबद्दल लोलुपता नव्हती. त्यांच्या कारकीर्दीत काही गैर घडलं अशी टीका कोणीही केली नाही. तसं काही असतं तर राजकीय क्षेत्रातील मंडळींनी अशा भानगडी बाहेर काढल्याच असत्या. अमेरिकेचे जॉन केनेडी हे साऱ्या जगाचे लाडके नेते होते, परंतु त्यांच्या हत्येनंतर काय काय भानगडी बाहेर आल्या हे सर्वश्रुतच आहे!

मग शास्त्रींमध्ये उणिवा तरी काय होत्या? त्यांची उंची जेमतेम पाच फूट, दोन इंच होती. ते पंतप्रधान झाले तेव्हा त्यांच्या या बुटकेपणाची गंमत वाटे! ईजिप्तचे

जाडसर व उंचेपुरे अध्यक्ष नासर यांच्या शेजारी शास्त्री उभे राहिले तेव्हा ते दृश्य किती तरी विचित्र दिसत होतं! शास्त्रींच्या सौम्य व्यक्तिमत्वातील माधुर्य वेगळं असलं तरी पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्वातील भारून टाकणारी जादू त्यांच्यापाशी नव्हती. नेहरूंसारखं सुंदर इंग्रजी त्यांना लिहिता येत नसे. नेहरू हे उच्चभ्रू कुटुंबातील. त्यामुळं एक प्रकारची खानदानी ऐट त्यांच्यात होती. याउलट शास्त्री गरीब कुटुंबातून वर आलेले. आरंभीच्या काळात त्यांना फार धडपड करावी लागली. अर्थात त्यामुळं शास्त्रींमध्ये कधी न्यूनगंड निर्माण झाला नाही. त्यांच्यात आत्मविश्वास भरलेला होता. ईश्वरानंच बनवलेली त्यांची लहानखुरी मूर्ती, आरंभीच्या काळात दारिद्र्यामुळं आलेल्या अडचणी यांसारख्या 'उणिवा' असल्या तरी राजकीय क्षितिजावर ते एखाद्या ताऱ्याप्रमाणे लखलखले. शुद्ध चारित्र्य, एकनिष्ठा व सत्यप्रियता या बळावर इतिहासानं सोपवलेली जबाबदारी त्यांनी विनयानं व धैर्यानं पार पाडली.

भारताच्या या सामान्य माणसाची असामान्य कहाणी या ग्रंथात मांडली आहे. २ ऑक्टोबर २००४ रोजी शास्त्रीजींच्या जन्मशताब्दीनिमित्त या ग्रंथाच्या मराठी अनुवादाची पाचवी आवृत्ती 'विशेष आवृत्ती' म्हणून प्रसिद्ध होत आहे याचा मला विशेष आनंद आहे. यानिमित्ताने शास्त्रीजींची ही असामान्य कहाणी जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहचावी हा प्रकाशकांचा दृष्टीकोन स्तुत्य आहे.

सध्याच्या राजकीय व सामाजिक वैफल्याच्या धुक्यात हरवलेल्या वातावरणात हे चरित्र स्फूर्तिदायी व लखलखीत ठरेल अशी मला आशा वाटते.

**—सी. पी. श्रीवास्तव**



।। एक ।।

## 'वर्मा' झाले 'शास्त्री'

**ला**लबहादुर शास्त्री यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी मोगलसराई इथं झाला आणि ११ जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद इथं त्यांचं निधन झालं. त्यांचं ६१ वर्षांचं आयुष्य हे भारताच्या इतिहासातील अत्यंत निर्णायक व महत्त्वपूर्ण अशा काळाशी निगडित होतं. शास्त्रींचा जन्म झाला त्या वेळी म्हणजे १९०४ साली भारतावर ब्रिटिशांचं पूर्ण अधिराज्य होतं व त्यांच्या सत्तेला कोणी आव्हान देऊ शकत नव्हतं. तरीही अशी काही परिस्थिती निर्माण झाली की पुढच्याच वर्षी म्हणजे १९०५ साली जवळजवळ क्रांतीचीच सुरुवात झाली. स्वराज्याच्या चळवळीला आरंभ झाला. ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम यांनी १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली होती. या काँग्रेसनं स्वराज्य चळवळीची पताका खांद्यावर घेतली. १९२० मध्ये काँग्रेसचं नेतृत्व महात्मा गांधीजींकडे आलं. सत्याग्रहाचा व अहिंसेचा नवा संदेश घेऊन सबंध देशात त्यांनी झंझावाती संचार सुरू केला. सारा देश महात्माजींच्या पाठीशी उभा राहिला. लालबहादुर शास्त्री हे या क्रांतिकारी पर्वाचं अपत्य होतं.

योगायोग म्हणजे महात्मा गांधींची २ ऑक्टोबर हीच शास्त्रींचीही जन्मतारीख. फरक एवढाच की, म. गांधींनंतर शास्त्री पस्तीस वर्षांनी जन्मले. लालबहादुर यांचे वडील शारदाप्रसाद हे अलाहाबाद इथं शिक्षक होते, तर त्यांची आई रामदुलारी देवी या मोगलसराई येथील रेल्वेच्या शाळेतील मुख्याध्यापक व इंग्रजीचे शिक्षक मुन्शी हजारीलाल यांच्या कन्या. लालबहादुर हे रामदुलारींचं दुसरं अपत्य. त्याआधी त्यांना

एक कन्यारत्न झालं होतं. तिचं नाव होतं कैलासी देवी. लालबहादुर यांचा जन्म आजोळी झाला तेव्हा कैलासी देवी होती चार वर्षांची.

शारदाप्रसाद यांचे वडील बाबू नंदनलाल हे सब-पोस्टमास्तर होते. त्यांचे पूर्वज बनारस जिल्ह्यातील रामनगर संस्थानात नोकरीला होते. रामनगरला त्यांचं छोटंसं घर होतं. तिथं अजूनही त्यांचे नातेवाईक राहतात. लालबहादुर कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबातील होते. शाळा, टपाल खाते अशा ठिकाणी या कुटुंबातील सदस्य नोकऱ्या करून उपजीविका करीत होते.

लालबहादुर यांच्या जन्मानंतर काही महिन्यांनी आपल्या दोन्ही अपत्यांसह रामदुलारी देवी अलाहाबादला आपल्या घरी परतल्या. लालबहादुर अवघा एक महिन्याचा असतानाची गोष्ट आहे. गंगेच्या काठावर भरलेल्या जत्रेला रामदुलारी लालबहादुरला घेऊन गेल्या होत्या. प्रचंड गर्दी झालेली होती व रेटारेटीत आईच्या कडेवरचा लालबहादुर खाली पडला. तिच्या काळजाचं पाणी पाणी झालं. कितीतरी शोध केला तरी तो सापडेनाच. अखेर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. सर्वत्र शोधाशोध सुरू झाली. शेवटी नजीकच्याच खेड्यातील एका गुराख्याच्या झोपडीत तो सापडला. जत्रेत लालबहादुर आईच्या कडेवरून निसटला तो नेमका त्या गुराख्याच्या टोपलीत पडला होता. त्याला काहीच मूलबाळ नव्हतं. त्यामुळं ही तर गंगामैयाचीच कृपा असं मानून तो आनंदून गेला होता. पोलिसांनी हा जत्रेत हरवलेला मुलगा आहे याची जाणीव करून दिल्यावर त्या गुराखी दांपत्यानं मोठ्या जड अंतःकरणानं लालबहादुरला त्याच्या आई-वडिलांच्या सुपूर्द केलं.

लालबहादुर जेमतेम दीड वर्षांचा असतानाच, १९०६ साली त्याचे वडील प्लेगच्या साथीत दगावले. तेवीस वर्षांची पत्नी, साडेपाच वर्षांची कन्या व दीड वर्षांचा मुलगा यांना मागे ठेवून घरातील कर्ता पुरुषच निघून गेला. खरं तर शारदाप्रसाद यांची नुकतीच नायब तहसीलदारपदी बढती झाली होती. त्यांनी मागं काहीच पैसा-अडका व मालमत्ता ठेवली नव्हती. त्यामुळं रामदुलारी देवींची परिस्थिती मोठी बिकट झाली. एरवी हिंदू कुटुंबातील प्रथेनुसार शारदाप्रसादांचे वडील बाबू नंदनलाल यांनी रामदुलारीला मुलांसह आपल्या घरी आणायला हवं होतं. परंतु त्यांनी दुसरं लग्न केलं होतं. दुसऱ्या पत्नीला शारदाप्रसाद व त्यांच्या कुटुंबाबद्दल काही प्रेम नव्हतं. त्यामुळं तिनं रामदुलारीला घरी आणायला विरोध केला.

मुन्शी हजारीलाल यांचं आपली कन्या रामदुलारी हिच्यावर अतिशय प्रेम होतं. ते तिला आपल्या घरी तिच्या मुलांसह घेऊन आले. त्या वेळी रामदुलारी गरोदर होत्या. तीन महिन्यांनंतर त्यांना मुलगी झाली. तिचं नाव सुंदरीदेवी असं ठेवण्यात आलं.

परंतु दुर्दैव असं की दोनच वर्षांनी म्हणजे १९०८ साली मुन्शी हजारीलाल यांना अर्धांगवायूचा जबरदस्त झटका आला व त्यातच त्यांचा मृत्यू झाला. रामदुलारी, लालबहादुर व त्यांच्या दोन बहिणी यांच्यावर जणू आकाशच कोसळलं. परंतु या वेळेला त्यांच्या मदतीला रामदुलारीचे चुलते मुन्शी दरबारीलाल धावून आले!

दरबारीलाल हे त्यांचे बंधू हजारीलाल यांच्यासारखेच प्रेमळ, दयाळू होते. त्यांनी साऱ्या कुटुंबाची आर्थिक जबाबदारी उचलली. उत्तर प्रदेशाच्या 'ओपियम' खात्यात गाझीपूर इथं ते मुख्य कारकून होते. लालबहादुरचं वय तेव्हा केवळ तीन वर्षांचं होतं व आपल्या कुटुंबावर कोसळलेल्या संकटाची त्याला काही कल्पना नव्हती. त्याला या आघातांची झळ पोचू नये म्हणून आई पराकाष्ठेचे प्रयत्न करी. मुन्शी दरबारीलाल यांचा मुलगा बिंदेश्वरी प्रसाद हा मोगलसराई इथं शिक्षक होता. रामदुलारी व तिची मुलं यांचा तोच स्थानिक पालक बनला. त्यांच्या खर्चासाठी दरबारीलाल नेमानं बिंदेश्वरी प्रसादकडे पैसे पाठवीत असत.

लालबहादुर हा कुटुंबातील सर्वांचाच लाडका होता. बिंदेश्वरीप्रसाद पण अत्यंत प्रेमळ होते व ते लालबहादुरची विशेष काळजी घेत. लालबहादुरचा मामा पुरुषोत्तमलाल (त्याला सारे जण 'लल्लन' म्हणत) हा सात वर्षांचा होता. त्याची व लालबहादुरची चांगलीच गट्टी जमली.

मुन्शी हजारीलाल व मुन्शी दरबारीलाल यांच्या घरात मौलवीच्या हाताखाली मुलांना शिक्षणाचे पहिले धडे देण्याचा रिवाज होता. त्यामुळं मुलांना आधी उर्दू शिकावं लागे. शिक्षणाची दीक्षा देण्याचा मोठा समारंभच असे. त्याला 'बिस्मिल्ला' म्हणत. लालबहादुरचा 'बिस्मिल्ला' समारंभ नजीकच्या पढझा गावचे मौलवी बूढामियां यांच्या हस्ते पार पडला. त्यांच्या हाताखाली केवळ उर्दूचेच नव्हे तर 'तहजीब'चंही शिक्षण लालबहादुरनं घेतलं. तहजीब म्हणजे सामाजिक शिष्टाचार व कॉस्मॉपॉलिटन संस्कृती यांचं मिश्रण. उर्दू साहित्याची– विशेषतः कवितेची– खास गोडी लालबहादुरला वाटू लागली. मिर्झा गालिब यांच्या कवितांवरचं त्यांचं प्रेम तर अखेरपर्यंत टिकून राहिलं.

वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत लालबहादुर मोगलसराईला राहिला. मधूनमधून तो मिर्झापूरला जात असे. आई, आजोबा, आजी, काका यांनी त्याला शिक्षण घ्यायला प्रोत्साहन दिलं. त्यामुळं वडील हयात नसल्याचा त्याच्या जीवनावर फारसा परिणाम झाला नाही.

लालबहादुर यांच्या बालपणातील तीन घटना मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण व त्यांच्या स्वभावाचे पैलू दर्शवणाऱ्या आहेत. लालबहादुर व लल्लनमामा मिर्झापूर इथं एकदा फेरफटका मारत होते. गंगेच्या काठाजवळ त्यांना एक म्हातारा डोक्यावर टोपली घेऊन चाललेला दिसला. "टोपलीत काय आहे?" असं लालबहादुरनं त्याला विचारलं. त्यानं डोक्यावरील टोपली खाली ठेवली व तो म्हणाला, "हे पाहा, माझ्याकडे अगदी उत्तम आंबे आहेत. हा घे एक आंबा तुला व एक तुझ्या मित्राला. चाखून तर पाहा, तुला खूप आवडेल. आता सायंकाळ झाली आहे व घरी परतायच्या आधी हे सारे आंबे विकून टाकायचे आहेत. म्हणून केवळ एका आण्याला शंभर आंबे द्यायला मी तयार आहे."

लालबहादुरनं व लल्लनमामानं आंबे चाखून पाहिले. ते अत्यंत मिट्ठास होते.

तेव्हा सौदा करायचा असं त्यांनी ठरवलं. दोघांनी खिशातून प्रत्येकी दोन दोन पैसे काढले. लालबहादुरनं त्याला पैसे दिले. तो म्हातारा आंबे मोजून देऊ लागला. पन्नास आंबे देऊन झाले तेव्हा लालबहादुरनं सांगितलं, "बस्स, एवढेच आंबे पुरेत!" तेव्हा तो म्हातारा म्हणाला, "तू मला एक आणा दिलायस ना? तेव्हा अजून पन्नास आंबे द्यायचेत! एक आण्याचे शंभर आंबे देईन असं मी सांगितलं होतं." त्यावर लालबहादुर उत्तरला, "एक आणा तुम्ही ठेवून घ्या, त्याचा काही प्रश्न नाही. आम्हाला पन्नासपेक्षा जास्त आंब्यांची गरज नाही." म्हातारा अविश्वासानं त्याच्याकडे पाहतच राहिला. डोक्यावर पुन्हा टोपली घेऊन, लालबहादुरचे आभार मानून तो निघून गेला. दहा वर्षांचा लल्लनमामा हे सारं बोलणं ऐकत होता. आंबेवाला निघून गेल्यावर तो लालबहादुरला म्हणाला, "मूर्खच आहेस तू. आपण त्याला शंभर आंब्यांसाठी एक आणा दिला होता, पण तू पन्नासच आंबे घेतलेस!" त्यावर लालबहादुरनं उत्तर दिलं, "सायंकाळ झाल्यानं तो नाइलाजानं एक आण्यात शंभर आंबे द्यायला तयार झाला होता. त्याच्या अडचणीचा फायदा कशाला घ्यायचा? आणि आपल्या कुटुंबाला पन्नास आंबे पुरेत." तेव्हा लालबहादुर होता केवळ सहा वर्षांचा. घरातील नैतिक वातावरणामुळं, सुसंस्कारांमुळं त्याच्या अंगी ही न्यायबुद्धी, समंजसपणा आला असावा.

दुसरा एक प्रसंग अशाच नैतिक तत्त्वनिष्ठेचा निदर्शक आहे. बिंदेश्वरीप्रसाद हे खवय्ये होते. चांगलंचुंगलं खायला त्यांना मनापासून आवडे. कबुतरांचं मांस तर त्यांना खूप प्रिय. त्यांनी बरीच कबुतरं पाळली होती. लहर येईल तेव्हा त्यांतील एखाद्याची ते निवड करीत, त्याला ठार मारून ते जेवणात वाढण्याचं फर्मान सोडीत. एकदा बिंदेश्वरी प्रसाद यांनी एक कबूतर पिंजऱ्यातून बाहेर काढलं, परंतु ते उडून छपरावरच्या कौलात जाऊन दडून बसलं. बिंदेश्वरी प्रसाद यांनी लालबहादुरला ते कबूतर कुठे गेलं, ते पाहायला सांगितलं. कबूतर दिसताच लालबहादुरनं ते काकांना सांगितलं. तेव्हा ते पकडून खाली आण असा हुकूम त्यांनी सोडला. परंतु लालबहादुर जागचा हलेना. तो कडक शाकाहारी होता. त्या दोघांत पुढील संभाषण झालं :

**बिंदेश्वरी प्रसाद :** नानकू, जा आणि ताबडतोब कबूतर पकडून आण पाहू.

**लालबहादुर :** नाही, मी आणणार नाही.

**बिंदेश्वरी प्रसाद :** का?

**लालबहादुर :** तुम्ही त्याला ठार मारून खाऊन टाकणार म्हणून.

**बिंदेश्वरी प्रसाद :** कबुतरं खाण्यासाठीच असतात. जा, झटकन पकडून आण पाहू त्याला.

**लालबहादुर :** मी नाही आणणार, तुम्ही त्याला ठार माराल.

**बिंदेश्वरी प्रसाद :** ठीक आहे. मी नाही त्याला मारणार. आता तर आणशील?

त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून त्यानं छपरावर उडी मारून कबूतर पकडून आणलं. परंतु बिंदेश्वरी प्रसाद यांनी आपला शब्द पाळला नाही. कबूतर मारायला लावून ते शिजवून त्यांनी खाल्लं. लालबहादुरला धक्काच बसला. त्याला खूप राग

आला. वयानं मोठ्या व घरातील प्रमुखाच्या पुढं आपली डाळ शिजणार नाही हे त्याला ठाऊक होतं. परंतु काही करून त्यांना धडा शिकवायचा असं त्यानं ठरवलं. त्यानं उपोषण सुरू केलं. आईनं आणि घरातील इतर नातेवाइकांनी आग्रह केला तरी तो काही खाईना. घरातील स्त्रियांचा लालबहादुर अत्यंत लाडका होता. त्या पण या उपोषणात सामील झाल्या व त्यांनीही काही खाण्यास नकार दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी बिंदेश्वरी प्रसाद यांना सारा प्रकार उमजला. त्यांनी लालबहादुरला बोलावलं व वडीलधाऱ्या सुरात ते म्हणाले, "तू काल काही खाल्लेलं नाहीस. आता खूप भूक लागेली असेल तुला, तेव्हा आज मुकाट्यानं जेव पाहू."

त्यावर लालबहादुर उत्तरला, "मी जेवणार नाही. कबुतराला ठार करणार नाही असं वचन देऊनही तुम्ही त्याला का मारलंत?"

बिंदेश्वरी प्रसाद निरुत्तरच झाले. क्षणभर थांबून ते म्हणाले, "नानकू, तुझं बरोबर आहे. यापुढं मी कधीही कबूतर मारणार नाही असं तुला वचन देतो. किंबहुना मी कधीही कबूतर खाणार नाही, मी यापुढं शाकाहारी बनेन." बिंदेश्वरी प्रसाद यांनी पुढं आपलं हे वचन पाळलं. लालबहादुरचा सत्याग्रहाचा हा पहिलाच प्रयोग होता!

हे दोन्ही प्रसंग घरगुती स्वरूपाचे असले तरी ते लालबहादुरच्या वृत्तीतील नैतिक शक्तीचं व सदसद्विवेक बुद्धीचं दर्शन घडवणारे आहेत.

तिसरा प्रसंग मात्र काहीसा वेगळ्या स्वरूपाचा आहे. लालबहादुर मोगलसराई येथील शाळेत सहावीत शिकत होता. त्याचं वय बारा वर्षांचं होतं. शाळेत त्याचं नाव घातलं होतं 'लालबहादुर वर्मा' असं. पण "वर्मा हे जातिवाचक आडनाव लावण्याची माझी इच्छा नाही, मला जातिभेद आवडत नाही." असं लालबहादुरनं आईला सांगितलं. मुन्शी दरबारीलाल यांनी लालबहादुरच्या या म्हणण्याला आक्षेप घेतला नाही. त्यांचा मुलगा बिंदेश्वरी प्रसाद हा आडनाव लावतच नसे. त्याला लालबहादुरची कल्पना आवडली. तेव्हा 'वर्मा' हे आडनाव शाळेच्या रेकॉर्डमधून वगळावं असा अर्ज लालबहादुरनं मुख्याध्यापकांना दिला. मुख्याध्यापकांपुढं अडचणीचा प्रश्न निर्माण झाला. कारण तेही 'वर्मा' होते. त्यांचं नाव होतं बसंतलाल वर्मा. त्यांनी अर्ज मान्य केला आणि लालबहादुर वर्माचं केवळ लालबहादुर असं नाव झालं. १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठातील 'शास्त्री' ही पदवी लालबहादुर यांनी मिळवली व तेव्हापासून त्यांच्या नावाला 'शास्त्री' ही उपाधी जोडली गेली.

१९१७ मध्ये बिंदेश्वरी प्रसाद यांची बदली झाली व लालबहादुरना मोगलसराई सोडावं लागलं. कुटुंबातील बहुतेक जण मिर्झापूर येथील आपल्या घरी गेले; पण लालबहादुर पुढील शिक्षणासाठी बनारसला राहू लागले. रामदुलारी आपल्या तिन्ही मुलांना घेऊन बनारसला आल्या. तेथे त्यांच्या चुलत्याच्या दोन विवाहित कन्या राहत होत्या. सुरुवातीला एका नातेवाइकाकडे त्या राहू लागल्या व लालबहादुर दयानंद हायस्कूलमध्ये जाऊ लागला. नातेवाइकांच्या घरातील वातावरण फारसं बरं नव्हतं. तेव्हा रघुनाथप्रसाद या आपल्या पुतण्याकडे रामदुलारीनं मुक्काम हलवला. रघुनाथप्रसाद

बनारस नगरपालिकेत नोकरीला होते. रामदुलारीच्या कुटुंबाशी त्यांचं जवळचं नातं नसलं तरी त्यांनी आनंदानं या कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी उचलली. १९२५-मध्ये आपलं शिक्षण पुरं होईपर्यंत लालबहादुर त्यांच्याचकडे राहिला.

लालबहादुर हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये सातवीच्या वर्गात दाखल झाला. दहावीपर्यंत तो या शाळेत होता. १९१७ ते १९२१ ही या शाळेतील त्याची वर्षं अत्यंत महत्त्वाची, त्याच्या चारित्र्याची जडण-घडण करणारी होती.

काशी विश्वनाथाचं मंदिर, पवित्र गंगा, साधु-संतांची गर्दी यांमुळं बनारस हे मुळात प्रख्यात तीर्थस्थानाचं ठिकाण. १९०५ साली अखिल भारतीय काँग्रेसचं एकविसावं अधिवेशन गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली बनारसला भरलं होतं. त्यामुळं बनारसला राजकीय परिमाणही मिळालं. तेव्हा बंगालचं विभाजन झालेलं होतं. गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यावर घणाघाती टीका केली. स्वदेशी चळवळीत सामील होण्याचं त्यांनी जनतेला आवाहन केलं. लाला लजपत राय, बाळ गंगाधर टिळक व बिपिनचंद्र पाल यांची प्रभावी भाषणं झाली. त्या वेळेपासून देशातील राजकीय घडामोडींत बनारसला महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं.

बनारसच्या अशा वातावरणात लालबहादुरचं शिक्षण सुरू झालं. तेरा वर्षांचा लालबहादुर हा हुशार, सद्वर्तनी विद्यार्थी म्हणून ओळखला जाई. निष्कामेश्वर मिश्रा या शिक्षकाचं लालबहादुरकडे लक्ष गेलं. मिश्रा हे एक उत्तम शिक्षक तर होतेच, त्याचबरोबर ते प्रेमळ स्वभावाचे व कट्टर देशभक्त होते. रविवारी व सुट्टीच्या दिवशी ते मुलांच्या सहली काढीत. या सहली ऐच्छिक असत व त्यासाठी प्रत्येकी एक आणा वर्गणी द्यावी लागे. लालबहादुर शिस्तप्रिय, निष्ठावान विद्यार्थी असल्यानं मिश्रांनी त्याची वर्गाचा 'मॉनिटर' म्हणून नियुक्ती केली. सहलीसाठी विद्यार्थ्यांची नावं नोंदणं व वर्गणी जमा करणं ही जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. एकदा सहलीला जाणाऱ्या मुलांच्या यादीत लालबहादुरनं स्वतःचं नाव घातलेलं नाही असं मिश्रांच्या लक्षात आलं. त्यांनी त्याला बाजूला घेऊन "तू सहलीला का येणार नाहीस?" अशी विचारणा केली. तेव्हा "माझ्याकडे पैसे नाहीत" असं उत्तर त्यानं दिलं. लालबहादुर आपल्या 'मौसा'कडे राहत होता व त्याचं कुटुंबात पालनपोषण होत असलं तरी 'पॉकेटमनी' त्याला मिळत नसे. तेव्हा मिश्रागुरुजींनी स्वतः त्याची सहलीची वर्गणी भरली.

सहलीहून परतल्यावर मिश्रा त्याला आपल्या घरी घेऊन गेले. "याला आपला मुलगा समजूनच वागव" असं त्यांनी पत्नीला सांगितलं. तेव्हा 'घरात आपली मुलं पुरेशी आहेत की!' असं ती म्हणाली. परंतु नंतर मात्र लालबहादुर तिला आवडू लागला. मिश्रांच्या घरी त्याचं येणं-जाणं वाढलं. आपल्या एका मुलाची शिकवणी घेण्यास त्यांनी लालबहादुरला सांगितलं. त्यानं आनंदानं ही जबाबदारी पत्करली. तो शिकवणीचे पैसे घेणार नाही हे मिश्रांना ठाऊक होतं. तेव्हा दरमहा त्याचे पैसे ते एका पेटीत ठेवून देऊ लागले. काही वर्षांनी लालबहादुरच्या बहिणीच्या लग्नाच्या वेळी

त्यांनी ही कमाई लालबहादुरची आहे असं सांगून ते पैसे त्याच्या आईच्या स्वाधीन केले. लग्नाच्या खर्चासाठी ते पैसे उपयोगाला आले.

याच काळात अनेक राजकीय घडामोडी घडत होत्या. १९१५ साली महात्मा गांधी भारतात परतले व १९१७ पासून त्यांनी राजकीय कार्य हाती घेतले. १९२१ मध्ये त्यांनी असहकाराची चळवळ सुरू केली.

निष्कामेश्वर मिश्रा हे कट्टर देशभक्त होते. शाळेचे नेहमीचे काम संपल्यावर ते खास वर्ग भरवून मुलांना भारताच्या संपन्न सांस्कृतिक परंपरेची माहिती देत. ब्रिटिशांच्या आक्रमणापूर्वी आपला देश किती समृद्ध होता, ब्रिटिशांनी कसं शोषण चालविलं आहे हे ते सांगत. महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी यांच्या स्फूर्तिदायक गोष्टी ऐकवीत. गोपाळ कृष्ण गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बाळ गंगाधर टिळक, लाला लजपत राय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष या नेत्यांनी हाती घेतलेल्या चळवळींची ते माहिती देत. स्वातंत्र्य आंदोलनासाठी देशाला तरुणांची गरज आहे असं सांगत.

लालबहादुरचं कुटुंब राष्ट्रीय चळवळीची पार्श्वभूमी असलेलं नव्हतं. स्वातंत्र्याच्या आंदोलनात सामील होणं हे प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे या मिश्रांच्या आवाहनानं लालबहादुरला भारावून टाकलं. त्यानं भारताचा आधुनिक इतिहास, विशेषतः काँग्रेसचा इतिहास वाचून काढला. स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद यांची पुस्तकं वाचली. बंकिमचंद्र चटर्जी यांची 'आनंदमठ' कादंबरी त्याला अतिशय आवडली. ॲनी बेझंट यांच्या थिऑसॉफीवरील प्रवचनांचा प्रभाव त्याच्यावर पडला.

देशभक्तीचा स्फुल्लिंग त्याच्या मनात धगधगू लागला. भारताला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी चळवळीत झोकून द्यायला हवं असं त्याला वाटू लागलं. "संपत्ती जमा करणं हा माझा हेतू नाही, चैनीत दिवस घालवणं हा माझा उद्देश नाही, सरकारी सन्मान मिळवणं ही माझी महत्त्वाकांक्षा नाही. माझा देश, माझे देशबांधव यांच्यासाठी मला त्याग करायचा आहे. ज्योतीवर पतंगानं आत्मसमर्पण करावं तसं मला वाटतंय," असं लाला लजपतराय म्हणत. लालबहादुरला तसंच वाटत असे.

१९१९ साली आविष्कारस्वातंत्र्याची गळचेपी करणारा रौलट कायदा आला. त्याच वर्षी जालियानवाला बाग येथे स्वातंत्र्यप्रेमी जनतेची कत्तल झाली. या दोन्ही घटनांचा लालबहादुरच्या मनावर खोलवर परिणाम झाला. महात्मा गांधींच्या भाषणांनी चळवळीत सामील व्हावं हा विचार अधिकाधिक दृढ होऊ लागला. परंतु राजकारणात सहभागी होण्याआधी शालेय शिक्षण पुरं करावं असं त्याला वाटत होतं. तो दहावीत होता व परीक्षेला तीन महिनेच राहिले होते. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यानं सरकारी नोकरी पत्करावी किंवा शाळेत शिक्षक व्हावं अशी त्याच्या कुटुंबियांची अपेक्षा होती. तो एकदा कमवू लागला की आपली आर्थिक हलाखी संपुष्टात येईल असं साहजिकच त्यांना वाटत होतं. परंतु नियतीच्या मनात काही वेगळंच होतं.

नागपूर इथं १९२० साली डिसेंबरमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचं अधिवेशन पार पडलं व असहकाराच्या चळवळीचा प्रचार करण्यासाठी महात्मा गांधींनी देशभर झंझावाती

दौरा सुरू केला. पं. मदनमोहन मालवीयांच्या निमंत्रणावरून १९२१ च्या जानेवारीत महात्मा गांधी बनारसला आले. त्यांच्या जाहीर सभेला लालबहादुर आपले मित्र त्रिभुवन नारायण सिंग, राजा राम व अलगू राय यांच्यासमवेत गेला होता. म. गांधींनी देशभर अहिंसा चळवळ सुरू करण्यामागील उद्दिष्टं आपल्या भाषणात सांगितली. विशेषतः सोळा वर्षावरील तरुणांना (त्या वेळी लालबहादुरनं नुकतीच १६ वर्षं पुरी केली होती.) आवाहन करताना म. गांधीजींनी सरकारी अनुदानावर चालणाऱ्या वा सरकारी नियंत्रणाखालील शाळा वा संस्था यांतून परिणामांची पर्वा न करता बाहेर पडा असं सांगितलं. "या संस्था-शाळा सोडून चळवळीत सामील होणं हा तुमचा युगधर्म आहे. तेव्हा घरातील वरिष्ठ मंडळींनी काहीही सांगितलं तरी तुम्ही तुमचं कर्तव्य बजावलंच पाहिजे, भारतमातेला आज तुमची गरज आहे," असं त्यांनी ठासून सांगितलं. सभेचे अध्यक्ष पंडित मदनमोहन मालवीय यांनी गांधीजींच्या आवाहनाला दुजोरा दिला. "या ऐतिहासिक चळवळीत सामील होण्याची मी कळकळीनं विनंती करतो" असे ते म्हणाले. परंतु "तरुणांनी आपल्या पालकांच्या मतांचा अनादर करावा असं मला वाटत नाही. तुमच्या आई-वडिलांचं हितही तुम्हाला लक्षात घेतलं पाहिजे." अशी पुस्ती त्यांनी जोडली.

या दोघांची भाषणं लालबहादुरनं अगदी लक्ष देऊन ऐकली. सभेनंतर तो आपल्या मित्रांना घेऊन मिश्रा गुरुजींच्या घरी गेला. राजकीय चळवळीत पडावं की नाही यावर तेथे बराच उहापोह झाला. मालवीयांची सूचना लालबहादुरनं लक्षात घेतली तरी त्याला गांधीजींच्या आवाहनानुसार वागावं असं वाटत होतं. परीक्षेला तीनच महिने राहिले असल्यानं ती द्यावी व मगच आंदोलनात सामील व्हावं असं बऱ्याच जणांचं मत होतं, तर परिणामांची पर्वा न करता तत्काळ राजकारणात उडी घ्यावी असं काहींना वाटत होतं.

लालबहादुर शिकत असलेल्या हरिश्चंद्र हायस्कूलला सरकारी अनुदान मिळत होतं. तेव्हा शाळा सोडून देऊन गांधीजींच्या आवाहनानुसार आंदोलनात सामील व्हावं असं त्याला वाटत होतं. रघुनाथ प्रसादना व कुटुंबातल्या बाकी ज्येष्ठ मंडळींना त्यानं आपला विचार सांगितला. "देशसेवा करण्यासाठी मला काँग्रेसचा स्वयंसेवक व्हायचंय" असं तो म्हणाला. त्याची आई सोडून बाकी सर्वांना त्याचे हे विचार ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला. "तुला तुझ्या आईची जबाबदारी उचलायला हवी, परीक्षा न देता तू शिक्षण अर्धवट सोडलंस तर तुला नोकरी कोण देणार? आई व बहीण यांचं काय होईल? वडिलांच्या मृत्यूनंतर अत्यंत काबाडकष्ट करून आईनं तुझं पालनपोषण केलं, आता तिची देखभाल करणं हे तुझं मूलभूत कर्तव्य नाही का?" अशा नाना प्रश्नांचा भडिमार त्याच्यावर करण्यात आला. रामदुलारी देवीनं मात्र त्याला सांगितलं, "हे बघ, कोणता मार्ग स्वीकारावा याबद्दल शांतपणं नीट विचार कर, निर्णय घे आणि त्या निर्णयाला खंबीरपणं चिकटून राहा."

आपल्या आईचा हा सल्ला लालबहादुरनं मानला. किंबहुना त्याच्या सबंध आयुष्याचंच

ते मार्गदर्शक तत्त्व ठरलं. त्या दिवशी रात्रभर त्यानं खूप विचार केला, आपला 'आतला आवाज' त्यानं ऐकला व मनोमनी निर्णय घेऊन टाकला. कितीही स्वार्थत्याग करावा लागला तरी हरकत नाही. पण या क्षणी भारतमातेची सेवा करणं हा आपला मुख्य धर्म आहे असं त्यानं ठरवलं. दुसऱ्याच दिवशी शाळेत जाऊन त्यानं आपलं नाव काढून टाकलं आणि काँग्रेस पक्षात स्वयंसेवक म्हणून तो भरती झाला.

पक्षाच्या निदर्शनांत तो सामील होऊ लागला. सोळा वर्षांचा असतानाच त्याला अटक करण्यात येऊन तुरुंगात पाठवण्यात आलं. त्याचा हा पहिला कारावास अत्यंत अल्प असला तरी त्यामुळं स्वातंत्र्य चळवळीतला एक शिलेदार म्हणून त्याच्या प्रवासाला आरंभ झाला!

आचार्य जे. बी. कृपलानी यांच्या हाताखाली काम करण्याची लालबहादुरला संधी मिळाली. सरकार-अनुदानित संस्थांवर बहिष्कार टाकावा या काँग्रेसच्या आदेशानुसार कृपलानी यांनी बनारस हिंदू विद्यापीठातून राजीनामा दिला होता. खादीच्या प्रचारासाठी त्यांनी बनारसला गांधी आश्रम स्थापन केला होता. त्यांच्या या कार्यात लालबहादुर व त्याचे मित्र त्रिभुवन नारायण सिंग, अलगू राय आणि राजा राम हे मदत करू लागले. तिघे उत्साहानं खादीची विक्री करू लागले. आचार्य कृपलानी यांनी मात्र त्यांचं शिक्षण पुढं चालू ठेवण्याचं ठरवलं. अर्थात त्या काळातील शालेय शिक्षण नव्हे, तर या मुलांना राष्ट्रीय शिक्षण देण्याचा निर्धार त्यांनी केला. कृपलानी यांनी त्यांचे मित्र विचित्र नारायण शर्मा (बनारस हिंदू विद्यापीठातील नोकरीला राजीनामा देऊन तेही काँग्रेसमध्ये सामील झाले होते.) यांच्या मदतीनं आश्रमातच एक अनौपचारिक शाळा सुरू केली. तेथे नेहमीच्या विषयांबरोबरच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, राष्ट्रवाद, देशभक्ती यांचंही शिक्षण दिलं जाऊ लागलं. दिवसा गांधी आश्रमात हे विद्यार्थी खादीविक्रीचं काम करीत व सायंकाळी शाळेत शिकत. निष्ठावान देशभक्तांची फौज निर्माण व्हावी म्हणून मॅझिनी, गॅरिबाल्डी, डी व्हॅलेरा यांच्या जीवनावरील व्याख्यानं या शाळेत दिली जात. लाला लजपतराय यांचे स्नेही लाला हरदयाळ यांनी या स्वातंत्र्यसैनिकांसाठी वरील स्वातंत्र्यवीरांची पुस्तकं खास इंग्लंडहून पाठविली होती.

महात्मा गांधींनी सरकारी अनुदानित शाळा-संस्थांतील विद्यार्थ्यांना शिक्षण सोडून देण्याचं आवाहन केलं. तेव्हा त्यांनी एक प्रकारे मोठी नैतिक जबाबदारीच उचलली. सरकारी अनुदान न घेता राष्ट्रीय शिक्षण संस्था काढण्याच्या कार्याला प्रोत्साहन द्यायचं त्यांनी ठरविलं होतं. बनारसचे एक दानशूर गृहस्थ शिवप्रसाद गुप्ता यांनी त्यांचे बंधू हरप्रसाद यांच्या स्मृत्यर्थ मोठी जमीन या संकल्पित शिक्षण संस्थेसाठी देणगी म्हणून दिली. ट्रस्टचं प्रतिवर्षी येणारं चाळीस हजार रुपयांचं उत्पन्न संस्थेच्या देखभालीसाठी वापरायचं होतं. या देणगीतून काशी विद्यापीठाची स्थापना झाली. हिंदी हे शिक्षणाचं माध्यम असलेलं भारतातील ते पहिलंच विद्यापीठ होतं.

काशी विद्यापीठाचं उद्घाटन १० फेब्रुवारी १९२१ रोजी महात्मा गांधींच्या हस्ते झालं. भाड्याच्या एका इमारतीत हे विद्यापीठ सुरू करण्यात आलं. समारंभाला पं.

जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलम आझाद आदी मान्यवर नेते उपस्थित होते. त्या वेळी भाषण करताना गांधीजी म्हणाले, "या विद्यापीठाची काही मोठी इमारत नाही, एका झोपडीवजा जागेत ते आहे. परंतु ती जागा राष्ट्रीय आहे. असहकाराच्या चळवळीचं ते प्रतीक आहे. परकीयांच्या झेंड्याखाली आपण झुकत आहोत असं तुम्हाला इथं वाटायचं नाही. इथं राष्ट्रीय भाषेत, राष्ट्रीय हिताचं शिक्षण दिलं जाईल. सरकारी अनुदानित संस्था सोडा आणि या विद्यापीठात प्रवेश घ्या."

तरुण लालबहादुर या उद्‌घाटन सोहळ्याला हजर होता. या विद्यापीठात प्रथम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांत तो होता. त्याचे मित्र टी. एन. सिंग, राजा राम व अलगू राय यांनीही या विद्यापीठात नावं दाखल केली. खास प्रवेश परीक्षा घेण्यात येऊन चार वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी त्यांना प्रवेश देण्यात आला.

काशी विद्यापीठात भारतीय तत्त्वज्ञानाचे गाढे पंडित डॉ. भगवान दास (त्यांना नंतर मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब बहाल करण्यात आला), यज्ञ नारायण उपाध्याय (संस्कृत), जग मोहन वर्मा (हिंदी), डॉ. संपूर्णानंद (पाश्चिमात्य तत्त्वज्ञान आणि आंतरराष्ट्रीय कायदा) आणि डॉ. गोपाल शास्त्री (पौर्वात्य तत्त्वज्ञान) अशी नामवंत अध्यापक मंडळी होती.

डॉ. भगवान दास यांचा लालबहादुरवर विशेष प्रभाव पडला. डॉ. दास हे उत्तम अध्यापक होते, त्यांनी जगातील सर्व मुख्य धर्मांचा अभ्यास केला होता व त्यांचं एकात्मिक विवेचन त्यांनी आपल्या 'द इसेन्शियल युनिटी ऑफ ऑल रिलिजन्स' या ग्रंथात केलं होतं. 'समन्वयवाद' नावाचं स्वतःचं तत्त्वज्ञानही त्यांनी मांडलं. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना "यह बातही ठीक है।" ऐवजी "ये बात भी ठीक है।" असं म्हणण्याचा दृष्टिकोन शिकविला. त्यामुळं कोणाला आपण अवमानित झालो, पराजित झालो असं वाटत नाही. लालबहादुरनं हा समन्वयवाद अंगिकारून तो पारदर्शीपणाने, प्रामाणिकपणाने अमलात आणला.

शास्त्री ही पदवी मिळवण्यासाठी मुख्य विषयांचा अभ्यास लालबहादुरनं सुरू केला, त्याचबरोबर इंग्रजी, हिंदी व उर्दूतील साहित्याचं अध्ययनही केलं. गालिबच्या काव्यानं त्यांच्यावर जबरदस्त मोहिनी टाकली. त्याचा 'दिवान-ए-गालिब' हा संग्रह तो सतत बरोबर बाळगी. गालिबच्या पुढील ओळी तो नेहमी गुणगुणत असे :

*रहिये अब ऐसी जगह चलकर जहां कोई न हो।*
*हम सुक्खन कोई न हो और हम जुबाँ कोई न हो।*
*बे दरो दीवार सा इक घर बनाना चाहिये।*
*कोई हम साया न हो और पासबाँ कोई न हो।*
*पडिये गर बीमार तो कोई न हो तीमारदार।*
*और अगर मर जाइये तो नौहा-रव्वां कोई न हो।*

(आम्हाला अशा विजन जागी जावंसं वाटतं की, जिथे कोणीही नसेल, संभाषण

करणारं कुणी नसेल, आमची भाषा जाणणारं कुणी नसेल, दरवाजा व भिंती नसलेलं घर बांधायला आम्हाला आवडेल. जिथे कोणी शेजारी नसतील, कोणी जागं करायला नसेल आणि आम्ही जर आजारी पडलो तर कोणी शुश्रूषा करणारं नसेल आणि आम्ही मरण पावलो तर कोणी अश्रू ढाळणारंही नसेल.)

लालबहादुर ही कविता गुणगुणत असताना राजा राम शास्त्रींनी ऐकली व त्यांनी त्याला विचारलं, "ये क्या बात है? यह नज्म क्यों बारबार दोहराते हो?" त्यावर लालबहादुर उत्तरले, "जो गालिब ने लिखा है वही मैं अपने लिए चाहता हूँ. अंतिम वैराग्य यही तो असली चीज है।" वयाच्या अठराव्या वर्षीच लालबहादुरना वैराग्य, त्याग यांची ओढ होती असं यावरून दिसतं.

लालबहादुर यांचं बालपण अत्यंत दारिद्र्यात गेलं असं मानलं जातं. होडीचं भाडं द्यायला पैसे नसल्यानं ते दररोज डोक्यावर पुस्तकांचा भारा घेऊन गंगा नदी पोहून पलीकडे शाळेत जात, अशा दंतकथाही प्रसृत केल्या गेल्या आहेत. एक तर दररोज गंगा पोहून पार करणं अशक्यप्राय आणि तशी गरजही नव्हती. लालबहादुरची शाळा ही त्याच्या घराजवळच थोड्या अंतरावर होती व तो राहत होता त्याच नदीच्या बाजूला होती, नदीच्या पलीकडे नव्हती. आपण एकदाच गंगा नदी पोहून पलीकडे गेलो होतो असं खुद्द त्यांनीच मला एकदा सांगितलं होतं. रामनगर इथं त्यांची आई राहत होती. ती आजारी होती म्हणून तिला भेटायला त्यांना जायचं होतं. त्या वेळी होडीच्या भाड्याइतके पैसे नसल्यानं ते पोहून गेले होते.

'गरिबी हा काही मिरवायचा अलंकार नव्हे,' असं त्यांच्या शिक्षकानं एकदा सांगितलं होतं. लालबहादुर यांनी हा सल्ला मानला होता. मी त्यांच्याबरोबर काम करीत असताना त्यांनी एकदाच आपल्या गरिबीचा उल्लेख केला. ऑक्टोबर १९६५ मध्ये कलकत्ता इथं एका जाहीर सभेत बोलताना ते म्हणाले होते, "दारिद्र्याच्या चटक्यांबद्दल माझ्याइतकी कोणाला कल्पना नसेल." गरिबीबद्दल त्यांनी उल्लेख केला तोही इतकाच!

गरिबीमुळं त्यांच्यात कटुता आली नव्हती. किंबहुना आरंभीच्या काळातील गरीब परिस्थितीचा त्यांना लाभच झाला. त्यांनी नेहमीच आपल्या गरजा कमीत कमी ठेवल्या. सकाळचा व दुपारचा चहा आणि मोजकंच जेवण याहून त्यांच्या काही जादा गरजाच नव्हत्या. महात्मा गांधीजींच्या 'असंग्रह' या तत्त्वाचा त्यांनी अंगिकार केला होता व त्यातूनच अपरिग्रह तत्त्वाचाही त्यांनी स्वीकार केला होता. रघुनाथ प्रसाद यांच्या घरात अगदी स्वादिष्ट शाकाहारी भोजन बने. ते लालबहादुरना खूप आवडे. परंतु नंतर त्यांना या आसक्तीबद्दल असमाधान वाटू लागलं. चवदार पदार्थांच्या आपल्या मोहाबद्दल राजा राम शास्त्री या आपल्या मित्राशी त्यांनी चर्चा केली. त्याचा खुद्द राजा राम शास्त्रींनी मला सांगितलेला तपशील असा :

**लालबहादुर :** मला चवदार अन्न फारच आवडतं. परंतु ही सवय वाईट आहे. कॉंग्रेसच्या स्वयंसेवकाला हे न शोभणारं आहे. खेडोपाडी प्रवास करण्याची व मिळेल

ते खाण्याची आपल्याला सवय हवी.

**राजा राम शास्त्री :** मला तर यात काहीच अडचण वाटत नाही. चांगलंचुंगलं चवदार अन्न मिळेल तेव्हा ते खावं. एरवी जे काही मिळेल ते खावं. कायमच चवदार अन्न टाळायची गरज नाही.

**लालबहादुर :** पण मला ही वाईट सवय लागलीय, त्यावर मात करायची आहे.

**राजा राम शास्त्री :** ठीकाय. परंतु तू हे कसं करणार?

**लालबहादुर :** मी काही तरी मार्ग शोधून काढीन.

सुमारे महिन्याभरानंतर राजा राम शास्त्री व लालबहादुर यांची गाठ पडली. तेव्हा थट्टेच्या सुरात त्यांनी विचारलं, "तुझ्या चवदार अन्नपदार्थांच्या मोहाचं काय बरं झालं?" त्यावर लालबहादुर म्हणाला, "मला यश आलं ना! एक दिवस छान छान स्वादिष्ट पदार्थांनी भरलेल्या थाळीत मी लोटाभर पाणी ओतलं. सारे पदार्थ एकत्र कालवले. घट्ट सुपासारखं ते मिश्रण बनलं. ते थंड व बेचव मिश्रण मी पिऊन टाकलं! त्यानंतर मी दोन-चारदा हा प्रयोग केला. आता माझी चवदार पदार्थांना चटावलेली जीभ काही त्रास देत नाही." त्याच्या या प्रयोगानं राजा राम शास्त्रींना धक्काच बसला. ते म्हणाले, "परंतु तू साधं, बिनमसाल्याचं भोजन बनवायला घरच्यांना सांगायचं..." त्यावर लालबहादुर म्हणाला, "मला तसं करायचं नव्हतं. कारण सर्वांनाच ते बेचव अन्न खाण्याची सक्ती झाली असती. ते काही काँग्रेसचे स्वयंसेवक नाहीत. तेव्हा त्यांच्यावर असं अन्न का लादायचं?"

महात्मा गांधींनीही चवीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी 'स्वादरहितते'चा प्रयोग केला होता. वर्धा येथील गांधी आश्रमात तयार केलं जाणारं अन्न हे बेचव असे. केवळ तगून राहण्यासाठी आवश्यक म्हणून त्याचा उपयोग होई. लालबहादुरनं पण असाच 'चवत्यागा'चा प्रयोग करून गांधीजींचा कट्टर शिष्य बनण्याच्या दिशेनं आणखी एक पाऊल उचललं.

या प्रसंगातून लालबहादुर यांची दोन वैशिष्ट्यं लक्षात येतात असं राजा राम शास्त्री म्हणतात. एक तर आपल्यातील उणीव, दुबळेपणा काढून टाकण्याचा ठाम निर्धार व दुसरं म्हणजे दुसऱ्यांच्या भावनांबद्दल खरीखुरी असलेली काळजी.

काशी विद्यापीठातील वातावरण एखाद्या गुरुकुलासारखं होतं. वाद-विवाद, गटचर्चा यांची नुसती रेलचेल असे. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या तुलनेनं कमी असे व अध्यापक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊ शकत. 'शास्त्री' पदवीच्या अभ्यासक्रमात असलेल्याच विषयांवर वाद-विवाद होत असत असं नव्हे. अनेकदा राजकीय विषयांवर चर्चा झडत. सुशिक्षित व निष्ठावान स्वातंत्र्यसैनिकांची फौज निर्माण करणं हा मुख्य हेतू होता. लालबहादुर वाद-विवाद, चर्चा यांमध्ये सक्रिय भाग घेई. साध्याच पण सुस्पष्ट व विचारपूर्वक योजलेल्या वाक्यांतून तो आपली मतं व्यक्त करी. उगाच भावनात्मक विश्लेषण तो करीत नसे. तसंच दुराग्रहानं न बोलता, श्रोत्यांचा पाठिंबा मिळवण्याच्या दृष्टीनं त्याचे विचार असत. वादविवादाच्या किंवा चर्चेच्या अखेरीला निष्कर्षांचा गोषवारा

तो मांडी आणि बहुतेक वेळा तो मान्य होई. सौम्यपणं तो प्रश्न विचारी. कारण दुसऱ्याचं मत जाणून घेण्याचा त्याचा प्रामाणिक हेतू असे. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं तो शालीनतेनं देई. उगाच जोरदार, आवेशपूर्ण भाषण करण्याची त्याची पद्धत नव्हती.

लालबहादुर हा एकलकोंडा, माणूसघाणा वगैरे मुळीच नव्हता. अलगू राय, त्रिभुवन नारायण सिंग, राजा राम आदी मित्रमंडळीच्या कोंडाळ्याचं लालबहादुर हे जणू सळसळतं चैतन्य होतं. तो मनानं दिलखुलास व गमत्याजमत्या स्वभावाचा होता. मात्र त्याचे बरेचसे विनोद स्वतःवरच असत. अर्थात त्याचा हा खेळकरपणा या मित्रमंडळींपुरताच मर्यादित होता. बाहेरच्या लोकांच्या दृष्टीनं तो काहीसा शिष्ट, शांत, शालीन असायचा. मोजकेच कपडे असूनही त्याचा पोशाख नीटनेटका असे. त्याच्याकडे कुडता व धोतराचे दोनच जोड होते. एक जोड तो वापरी व दुसरा धुऊन दुसऱ्या दिवसासाठी तयार ठेवी.

लालबहादुरकडे चांगली रसिकता होती. विशेषतः वास्तुकलेत त्याला खास रुची होती. अलाहाबाद इथं राणी व्हिक्टोरियाचा पुतळा होता. त्याच्यावरची मेघडंबरी हा वास्तुकलेचा एक उत्तम नमुना होता. लालबहादुर व राजा राम तास न् तास तो पुतळा व मेघडंबरी निरखीत बसत. ''लखनौला गेलो की आम्ही तेथील प्रख्यात इमामवाड्याला भेट देत असू. उत्तम स्मारकं पाहिली की कसं शांत, प्रसन्न वाटतं,'' असं लालबहादुर नेहमी म्हणायचा, असंही राजा राम शास्त्री सांगतात.

लालबहादुरला भारतीय संगीताचीही आवड होती. अधूनमधून तो गातही असे. अभिजात संगीत शिकण्याची त्याला संधी मिळाली नाही, तरी तो काही गायकांच्या छान नकला करीत असे, असंही राजा राम शास्त्री सांगतात.

लालबहादुरनं 'डॉ. भगवानदास यांचं तत्वज्ञान' या विषयावर शास्त्री पदवीसाठी प्रबंध लिहिला. १९२५ साली शास्त्री परीक्षा पहिल्या वर्गात तो उत्तीर्ण झाला. राजा राम शास्त्री यांनीही असंच नैपुण्य मिळवलं. लालबहादुरच्या नावापुढं शास्त्री पदवी जोडली गेली. कालांतरानं हे शब्द त्यांच्या नावाचाच एक भाग बनून गेले. ते लालबहादुर शास्त्री किंवा नुसते 'शास्त्री' म्हणून ओळखले जाऊ लागले.

□□

॥ दोन ॥



# जनसेवेचं व्रत

*''द सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या सभासदत्वामुळं मला देशाची अत्याधिक सेवा करण्याची संधी मिळाली. 'जनसेवक' याचा खरा अर्थ अंगी बाणवण्याला सोसायटी कारणीभूत आहे.''*

*– लालबहादुर शास्त्री*

काशी विद्यापीठातून १९२५ मध्ये पदवी घेतल्यावर काँग्रेसचा स्वयंसेवक म्हणून देशसेवेला वाहून घेण्यासाठी शास्त्री सज्ज झाले. ते कर्मयोगी बनले होते व योग्य कार्यक्षेत्राच्या शोधात होते. त्यांना फार काळ वाट पाहावी लागली नाही. अलगू राय या मित्रानं लाला लजपत राय यांना भेटण्यासाठी शास्त्रींना लाहोरला बोलावलं. लाला लजपत राय यांनी 'द सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी' स्थापन केली होती, तिचं उद्‌घाटन ९ नोव्हेंबर १९२१ रोजी महात्मा गांधींच्या हस्ते झालं. गोपाळ कृष्ण गोखले यांनी पुण्यात १९०५ साली 'द सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' स्थापन केली होती व त्यापासूनच लाला लजपत राय यांनी स्फूर्ती घेतली होती. दोन्ही संस्थांची उद्दिष्टं जवळपास सारखीच होती. लाला लजपत राय यांनी आपल्या सोसायटीचा उद्देश पुढीलप्रमाणं स्पष्ट केला होता :

*''राष्ट्रीय कार्यासाठी सर्वस्वी वाहून घेणारे राष्ट्रीय मिशनरी तयार करण्याची*

*अगदी पहिल्यापासून कल्पना होती. सेवेच्या हेतूनं हे कार्यकर्ते काम करतील, कोणत्याही बढतीची अथवा आपल्या भौतिक हिताच्या वाढीची अभिलाषा बाळगणार नाहीत. सोसायटी त्यांना जे भत्ते देईल त्यात ते समाधान मानतील व तुलनेनं गरिबावस्थेत राहतील. त्यागाच्या आणि सेवेच्या भावनेनं कार्य करीत राहून त्यांनी इतरांपुढं दीपस्तंभासारखं बनूनं राहावं अशी अपेक्षा आहे.''*

अलगू राय आदल्याच वर्षी शास्त्री झाला होता. तो या सोसायटीचा सदस्य झाला होता. त्याच्याच निमंत्रणावरून लालबहादुर लाहोरला गेले होते, तेव्हा तेथे सोसायटीच्याच मुख्य कार्यालयात त्यांना उतरवण्यात आलं. लाला लजपत रायना भेटायला ते अत्यंत उत्सुक होते. अगदी शालेय जीवनापासून लजपत राय यांचं जीवन त्यांना स्फूर्तिदायक वाटत आलं होतं. सोसायटीचं सदस्यत्व मिळवणं ही साधीसुधी बाब नव्हती. दरवर्षी चार-पाचच पात्र व्यक्तींना सभासद करून घेतलं जाई. लाला लजपत राय नव्या उमेदवारांची तपशीलवार मुलाखत घेत. त्यानुसार त्यांनी लालबहादुर यांचीही मुलाखत घेतली. त्यांना हवे तसेच शास्त्री हे मिशनरी वृत्तीचे, निष्ठावान वाटले. त्यांना मुझफ्फरनगर इथे काम करायला पाठवण्यात आलं. तिथे 'सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी'चं अस्पृश्योद्धार केंद्र होतं. शास्त्रींना या केंद्राचे प्रमुख करण्यात आलं. एकवीस वर्ष वयाच्या शास्त्रींनी तिथे अत्यंत परिश्रमपूर्वक व निःस्वार्थीपणं काम केलं. त्यामुळं लाला लजपत राय अत्यंत खूष झाले व १९२७ च्या आरंभी त्यांनी सोसायटीचा प्रशिक्षणार्थी सदस्य म्हणून शास्त्रींना प्रवेश दिला. १९३० मध्ये त्यांना सोसायटीचे आजीव सदस्य करण्यात आलं. त्या वेळी शास्त्रींनी पुढील शपथ घेतली :

*''आजीव सदस्यत्व मिळेल त्या तारखेपासून वीस वर्ष सोसायटीसाठी मी काम करीन. या काळात मी सोसायटीचे नियम पाळीन, सोसायटीच्या विकासासाठी मनःपूर्वक झटेन आणि सोसायटीची उद्दिष्टं, हित यांविरुद्ध वर्तन करणार नाही.*

*चारित्र्य शुद्ध राखण्याचा मी कायम प्रयत्न करीन. देशातील जनतेच्या उन्नतीसाठी कसलाही जातिभेद न मानता, पक्षपात न करता मी काम करीन.*

*मला व माझ्या कुटुंबियांना सोसायटी जे काही भत्ते देईल त्यात मी समाधान मानीन व स्वतःसाठी अथवा माझ्या कुटुंबियांसाठी जादा उत्पन्न मिळवण्यासाठी अन्य काहीही काम करणार नाही.*

*कामावर रुजू होताना मी माझ्या मालमत्तेविषयीचं लेखी निवेदन अध्यक्षांना देईन. तसंच दर पाच वर्षांनी असं निवेदन देत राहीन.''*

मुझफ्फरनगर इथं अस्पृश्यांसाठी एक सामाजिक कल्याण केंद्र सोसायटीनं चालवलं होतं. दलितांच्यामध्ये राहून शास्त्री तिथं काम करू लागले. महिला व बालकं यांच्यासाठी कल्याण कार्यक्रम तसेच प्रौढांसाठी साक्षरता वर्ग तुटपुंज्या स्थानिक मदतीच्या आधारावर चालवावे लागत. शास्त्रींना अगदीच कमी वेतन मिळत असल्यानं त्यांचं जीवन काबाडकष्टाचं,

जवळजवळ गरिबीतच चाललेलं होतं. अर्थात त्यांना त्याची खंत वाटत नसे. किंबहुना समाजकार्य करण्याची संधी दिली म्हणून लाला लजपत राय व अलगू राय यांच्याबद्दल त्यांना कृतज्ञताच वाटत होती. लाला लजपत राय यांनी लालबहादुरना जेव्हा प्रशिक्षणार्थी सदस्य केलं तेव्हा त्यांना आरंभी दरमहा ५० रुपये भत्ता मिळू लागला. नंतर तो ६० रुपये करण्यात आला. लालबहादुर प्रथमच आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाले. बनारसला शिक्षण घेताना आश्रय देणारे चुलते रघुनाथ प्रसाद यांना आपला पहिला पगार शास्त्रींनी पाठवून दिला. रघुनाथ प्रसादना त्याचं खूप कौतुक वाटलं. मात्र त्यांनी त्यातील केवळ एक रुपया ठेवून घेतला व उरलेली रक्कम शास्त्रींना परत पाठवून दिली.

१९२७ व १९२८ मध्ये शास्त्री मुझफ्फरनगर इथंच काम करीत होते. असहकार आंदोलनाचा भाग म्हणून निदर्शनाचं नेतृत्व करताना लाला लजपत राय यांना बेदम लाठीमार सहन करावा लागला. त्यामुळं झालेल्या गंभीर जखमा प्राणघातक ठरल्या व १९२८ मध्ये त्यांना मृत्यू आला. देशसेवेला वाहून घेण्याचा शास्त्रींचा निर्धार त्यामुळं आणखीच दृढ झाला.

लजपत राय यांच्या अचानक मृत्यूनं 'सर्व्हंट्स ऑफ द पीपल्स सोसायटी'त पोकळी निर्माण झाली. ते सोसायटीचे केवळ अध्यक्ष नव्हते, तर त्यांनी आपली मालमत्ता, पैसे, ग्रंथालय सोसायटीला देणगी म्हणून दिलं होतं. त्यांच्यानंतर कोणाची निवड करावी याबद्दल सोसायटीच्या ज्येष्ठ मंडळींनी म. गांधींना सल्ला विचारला. गांधीजींनी पुरुषोत्तमदास टंडन यांचं नाव सुचवलं. टंडन हे लाला लजपत राय यांचे राजकीय सहकारी होते. ते प्रखर देशभक्त होते व मोठ्या पगारी नोकरीचा त्याग करून त्यांनी देशसेवेला वाहून घेतलेलं होतं. त्यांना अनेक जण ऋषी मानीत. म्हणून टंडन यांना सोसायटीचे अध्यक्षपद घेण्याची विनंती करण्यात आली व १ जानेवारी १९२९ रोजी त्यांनी आपल्या पदाची सूत्रं हाती घेतली.

टंडन अनेकदा लाहोरला येत, परंतु सोसायटीचा अध्यक्ष म्हणून अलाहाबादला राहून काम करायचं त्यांनी ठरवलं. त्यांना मदत करण्यासाठी शास्त्रींची अलाहाबादला नियुक्ती करण्यात आली आणि अशा प्रकारे शास्त्रींच्या जीवनातील दुसऱ्या टप्प्याला आरंभ झाला.

अलाहाबादला असताना स्थानिक नगरपालिका बोर्डाचा सदस्य म्हणून शास्त्रींची निवड झाली. सोसायटीचं मुख्य काम ते करीत होतेच. गुंतागुंतीची परिस्थिती हाताळण्याची संधी त्यांना मिळू लागली. टंडन त्यांचे 'राजकीय गुरू' बनले. शास्त्रींच्या कामावर टंडन खूष होते.

१९२९ ते १९६२ या काळात टंडन हे सोसायटीचे अध्यक्ष होते, तर ६२ ते ६५ या काळात बलवंतराय मेहता यांनी अध्यक्षपदाची धुरा वाहिली. त्यांच्यानंतर शास्त्री सोसायटीचे अध्यक्ष झाले. लाला लजपत राय शताब्दी समितीचे पं. नेहरू अध्यक्ष होते. त्यांच्यानंतर तिथेही शास्त्री अध्यक्ष झाले. या दोन्ही भूमिका पार पाडताना

शास्त्रींनी सोसायटीचा आर्थिक पाया भरभक्कम केला.

शास्त्रींचं वेतन हे एका तरुण दांपत्याला पुरेल एवढं आहे असं लक्षात आल्यावर त्यांना विवाहयोग्य मानलं जाऊ लागलं. तेव्हा ते चोवीस वर्षांचे होते. १९२८ च्या आरंभी शास्त्रींच्या मातोश्री मिर्झापूरला माहेरी आल्या असताना त्यांच्याकडे शास्त्रींसाठी एक मुलगी सांगून आली. शाळांचे उपनिरीक्षक सीताराम यांची कन्या कुमारी ललिता देवी हेच ते स्थळ होतं. सीताराम मिर्झापूरचेच रहिवासी होते व मोहल्ला चेतगंज इथे त्यांचं घर होतं. ते सुस्थितीतील मध्यमवर्गीय होते. त्यांच्या मालकीची दोन घरं होती. स्वतःची घोडागाडी होती व आर्थिक स्थिती चांगली होती. तेव्हा लग्नाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. आपल्या आईची निवड शास्त्रींनी स्वीकारली. आर्थिक दृष्ट्या फारशी चांगली स्थिती नसलेल्या मुलाशी लग्न केलं जातंय, म्हणून ललिता देवीच्या नातेवाइकांनी काहीशी कुरकुर केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. १६ मे १९२८ रोजी लालबहादुर व ललिता यांचा विवाह झाला. त्या वेळी ललितादेवींचं वय १७ वर्षांचं होतं. हुंडा म्हणून काहीही घेण्यास शास्त्रींनी नकार दिला. केवळ चरखा व खादीचं कापड त्यांनी स्वीकारलं.

श्रीमती ललिता शास्त्री यांना मी 'माताजी' म्हणत असे. "विवाहाच्या वेळच्या काही गोष्टी आठवतात काय?" असं मी त्यांना विचारलं असता त्यांनी विवाहानंतर एकांतात शास्त्रींशी झालेलं एक संभाषण सांगितलं. शास्त्री त्या वेळी त्यांना म्हणाले होते, "तू चांगल्या सधन कुटुंबातली असून तुला दुसऱ्या कोणा श्रीमंत मुलाशी लग्न करता आलं असतं. आता तू माझी पत्नी आहेस. तेव्हा आपल्यापेक्षा कमी भाग्यवान मंडळींकडे प्रेमानं पाहिलंस तर तू समाधानी राहशील."

शास्त्रींपेक्षा ललितादेवी सात वर्षांनी तरुण असल्या तरी समजूतदार होत्या. त्यांनी आपल्या पतीचा हा सल्ला मानला. "तू तुझ्या सर्व रेशमी साड्या वाटून टाक आणि खादी वापरायला लाग," असं शास्त्रींनी त्यांना सांगितलं. तेव्हा त्याच दिवसापासून त्यांनी खादीच्या साड्या वापरायला सुरुवात केली ती अखेरपर्यंत.

विवाहानंतर बरीच वर्षं हे दांपत्य अलाहाबादला राहिलं. नंतर शास्त्री लखनौला गेले आणि तेथून दिल्लीला स्थायिक झाले. "आम्हाला परस्परांविषयी अत्यंत आदर होता. मी त्यांना आदर्श मानी व ते माझी वैयक्तिक काळजी घेत, अत्यंत प्रेमळपणानं वागत." असं ललितादेवींनी सांगितलं. शास्त्री नेहमी पत्नीला 'तुम' म्हणत, पण काही घरगुती बाबींवरून नाराज झाले तर 'आप' असं संबोधत. 'तुम'च्या ऐवजी ते 'आप' म्हणू लागले की काही तरी बिनसलं आहे हे ललितादेवींना उमजे. कारण शास्त्री कधी शब्दांतून राग वा नाराजी प्रकट करीत नसत.

जीवनातील भल्या-बुऱ्या दिवसांना, सुखाच्या व कसोटीच्या क्षणांना दोघेही आनंदानं सामोरी जात. शास्त्री नऊ वर्षं तुरुंगात होते. त्या काळात ललितादेवींनी घर सांभाळलं, मुला-बाळांचं संगोपन केलं. त्या खरोखर अत्यंत पतिनिष्ठ, परिपूर्ण हिंदू गृहिणी होत्या.

शास्त्री पंतप्रधान झाल्यानंतर त्यांच्या सोविएत रशिया व युगोस्लाव्हिया येथील दौऱ्यांत ललितादेवी त्यांच्या समवेत होत्या. त्यांना इंग्रजी येत नव्हतं तरी श्रीमती कोसिजिन (सोविएत रशियाच्या पंतप्रधानांच्या पत्नी) व मादाम टिटो (युगोस्लाव्ह अध्यक्षांच्या पत्नी) यांच्याशी त्यांची चांगली गट्टी जमली.

ललितादेवी कपाळावर मोठं कुंकू लावायच्या. त्यांचं निरलस हास्य आणि विनयशील वागणं यामुळं त्यांचा सर्वत्र आदर केला जाई. १३ एप्रिल १९९३ रोजी त्यांचं निधन झालं. विजयघाट येथील लालबहादुर शास्त्रींच्या समाधीच्याच शेजारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

□□

| | तीन | |



# विश्वासू सल्लागार

अलाहाबाद इथं 'सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी'चे नवे अध्यक्ष पुरुषोत्तमदास टंडन यांच्या हाताखाली शास्त्री जाने. १९२३ पासून काम करू लागले. टंडन हे कॉंग्रेसचे नेते व अलाहाबाद जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. लाला लजपत राय यांच्यासारखीच विचारसरणी असलेले टंडन हे निर्भय देशभक्त होते. हिंदू मूल्यांचे ते समर्थक असले तरी जातीयवादी नव्हते, तर हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. हिंदी भाषेचा प्रसार करण्याला ते कटिबद्ध असले तरी उर्दू व पर्शियन भाषेचे तज्ज्ञ होते. शुद्ध नैतिक आचरणाचा ते आग्रह धरीत आणि भारताच्या प्राचीन सांस्कृतिक वारशाचं अध्ययन सर्व अभ्यासक्रमांत समाविष्ट करावं असं त्यांचं मत होतं.

टंडन यांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली हे शास्त्रींचं भाग्यच. लजपत राय आणि टंडन हे दोघेही कट्टर देशभक्त, देशसेवेसाठी निष्ठेनं झगडणारे होते. शास्त्री पण जणू त्याच मुशीतून घडले होते. मात्र शास्त्री हे आक्रमक पद्धतीनं विचार न मांडता समन्वयाचा मार्ग अनुसरणारे होते. टंडन यांच्यातील कोणत्या गुणांचं अनुकरण करायचं याचं त्यांना भान होतं.

अलाहाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागात काम करण्याची जबाबदारी टंडन यांनी शास्त्रींवर सोपविली. शास्त्रींचा आत्यंतिक वक्तशीरपणा व कामाला अखंडितपणं वाहून घेण्याची त्यांची वृत्ती पाहून टंडन प्रभावित झाले. त्यांना शास्त्रींचं काम आवडू लागलं आणि हळूहळू कॉंग्रेस पक्षाचंही काम ते त्यांच्यावर सोपवू लागले. पक्षाच्या

कामातही समंजस दृष्टिकोन व मनमिळाऊपणा शास्त्री दाखवू लागले. त्यामुळं अपेक्षित यश त्यांना मिळू लागलं.


याच सुमाराला शास्त्रींचा नेहरू घराण्याशी संबंध आला. नेहरू कुटुंबियांनी आपलं 'स्वराज्य भवन' काँग्रेस पक्षाला देणगीदाखल दिलं होतं. याच स्वराज्य भवनात अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचं कार्यालय होतं. तेथील कार्यालयात शास्त्रींनी कर्मचारी म्हणून काही काळ काम केलं. शालीन व प्रेमळ स्वभावाचे शास्त्री नेहरूंच्या नजरेत भरले. नेहरू तेव्हा शहर काँग्रेसचे अध्यक्ष होते व त्यांना एका मदतनीसाची गरज होती. त्यांनी पक्षाची काही कामं शास्त्रींवर सोपवली. त्यांनी ती नेटकेपणे पार पाडली व त्याबाबतचे पद्धतशीर, व्यवस्थित अहवालही सादर केले. त्यामुळं नेहरू प्रभावित झाले.

१९२९ मध्ये पंडित नेहरू यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांना बराच पत्रव्यवहार करावा लागे. हे काम त्यांनी शास्त्री व विश्वंभरनाथ पांडे यांच्यावर सोपवलं. शास्त्री आपल्या सुरेख अक्षरात हिंदी, उर्दू व इंग्रजी अशा तिन्ही भाषांमध्ये मसुदे बनवीत. पं. नेहरू त्यांची याबद्दल प्रशंसा करीत असं पांडे सांगतात.


उगाच सबबी सांगून टाळाटाळ करणारे लोक नेहरूंना आवडत नसत. त्यामुळं पूर्ण निष्ठेनं कायावाचामने काम करणाऱ्या शास्त्रींवर ते खूष असत. गुंतागुंतीचे, कठीण प्रश्न ते शास्त्रींवर सोपवीत. हळूहळू शास्त्रींनी नेहरूंचा विश्वास संपादन केला. नेहरूंना मदत करताना शास्त्रींनी टंडन यांच्याशीही जवळचे संबंध ठेवले होते. बहुतेक दररोजच ते टंडनना भेटत. तसंच पक्षाबरोबरच ते सोसायटीचं कामही करीत. टंडन म्हणजे अगदी कडक शिस्तीचे गृहस्थ. स्वतः ते अत्यंत उच्च मूल्यं पाळीत व सहकाऱ्यांनीही तसंच वागावं अशी त्यांची अपेक्षा असे. टंडन व शास्त्री यांच्यात गुरु-शिष्याचं नातं निर्माण झालं व हळूहळू शास्त्रींनी टंडन यांचाही विश्वास संपादन केला.

नेहरू व टंडन यांचं मात्र एकमेकांशी फारसं पटत नव्हतं. किंबहुना महत्त्वाच्या राजकीय व सामाजिक प्रश्नांविषयी दोघांची मतं अगदी भिन्न होती. हॅरो व केंब्रिज येथे शिकलेले पं. नेहरू हे पाश्चिमात्य वळणाचे निधर्मवादी होते आणि भारत हे स्वतंत्र समाजवादी राष्ट्र बनावं असं त्यांचं मत होतं. भारतीय शिक्षण हे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांवर आधारित असावं, राजकारण व धर्म यांची सरमिसळ करता कामा नये, असं पंडितजींचे मत होतं. याउलट टंडन हे भारतीय परंपरा, संस्कृती यांनी पुरेपूर घडवलेले होते. हिंदुत्वाच्या मूल्यांचे ते ठाम पुरस्कर्ते होते. भारताचा प्राचीन नैतिक पाया हिरावून घेणारी निधर्मवादी अशी कोणतीही कल्पना त्यांना मंजूर नव्हती.

एकाच वेळी नेहरू व टंडन यांच्यासमवेत काम करणं, दोघांचाही विश्वास संपादन करणं हे महाकठीण काम होतं. दोघांची मतं ठाम होती, दोघांच्या आवडीनिवडी तीव्र होत्या आणि दोघेही आपल्या तत्त्वांशी तडजोड करायला तयार नसत. दोघेही अलाहाबादच्या राजकीय व नागरी कार्यात गुंतलेले होते. आपल्या समन्वयवादाचं तत्त्वज्ञान अमलात आणायला शास्त्रींच्या दृष्टीनं ही अगदी अनुकूल परिस्थिती होती. ते या दोघांच्यामधील



त्रिमूर्ती : राष्ट्रपती डॉ. एस. राधाकृष्णन,
पंतप्रधान पं. नेहरू व
मंत्री लालबहादुर शास्त्री.




पंतप्रधानपदाची शपथ घेताना शास्त्री.
(छायाचित्र : राष्ट्रपतींचे वृत्तपत्र सचिव एस. जयशंकर, आय. एफ. एस.)

माता, पत्नी व सर्वांत धाकटे चिरंजीव अशोक यांच्या समवेत.






पत्नी ललिता शास्त्री यांच्या समवेत.



मुंबईतील एका समारंभात लेखकाच्या पत्नी निर्मला या काही पाहुण्यांची शास्त्रींशी ओळख करून देत आहेत.



दिवाळीच्या दिवशी श्रीवास्तव कुटुंब शास्त्रींच्या निवासस्थानी, शास्त्रींच्या उजवीकडे त्यांची कन्या सुमन व दोन नातवंडे, शास्त्रींच्या डावीकडे लेखक, त्यांची पत्नी निर्मला व कन्या कल्पना (अगदी डावीकडे) व साधना (अगदी उजवीकडे).



काही तातडीच्या कागदपत्रांवर नजर टाकताना पंतप्रधानांसमवेत यशवंतराव चव्हाण आणि लेखक.

ब्रिटनचे पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन शास्त्रींचे लंडन येथे स्वागत करताना. डिसेंबर, १९६४.






युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो व सायप्रसचे मॅकॅरिऑस यांच्यासमवेत शास्त्री.




हवाई दलाचे प्रमुख एअर मार्शल अर्जुनसिंग व सरसेनानी जनरल जे. एन. चौधरी.

भारत-पाक युध्दाच्या वेळी एअर मार्शल अर्जुनसिंग यांच्याशी चर्चा करताना.





लालबहादुर शास्त्री

ताश्कंद येथे कोसिजिन शास्त्रींचे
स्वागत करताना.
३ जानेवारी १९६६



लेखक सी. पी. श्रीवास्तव यांचे कोसिजिन ताश्कंद येथे स्वागत करताना.
३ जानेवारी १९६६



ताश्कंद येथील ऐतिहासिक परिषदेत भाषण करताना.
शेजारी यशवंतराव चव्हाण, सरदार स्वर्णसिंग प्रभृती, ४ जानेवारी १९६६



पाकिस्तानचे अध्यक्ष अयूब खान
यांच्या समवेत
५ जानेवारी १९६६
दोघांच्या चेहऱ्यावरील तणावाच्या
छटा, उभयतात तोपर्यंत असलेले
मतभेद दर्शवितात.




तो ऐतिहासिक क्षण ! ताश्कंद करारावर स्वाक्षरी करताना. शेजारी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण. १० जानेवारी, १९६६




करारावर स्वाक्षऱ्या झाल्यानंतर, १० जानेवारी रोजी कोसिजिन यांनी आयोजिलेल्या स्वागत सोहळ्याच्या वेळी रात्री ९-४५ वाजता घेतलेल्या छायाचित्रात शास्त्री व अयूब किती प्रसन्न दिसत आहेत ! अवघ्या पाचच दिवसांपूर्वी असलेले चिंतेचे सावट सरले व हास्य उमटले. मध्यभागी उभे आहेत रशियाचे परराष्ट्रमंत्री.

लालबहादुर शास्त्री



शास्त्री यांचे ताश्कंद येथे ११ जानेवारी रोजी पहाटे १ वाजून ३२ मिनिटांनी निधन झाले.

ताश्कंद विमानतळाकडे शास्त्रींचे राष्ट्रध्वजामध्ये आच्छादिलेले पार्थिव तोफगाडीवरून नेत असताना



सेतू बनू शकले काय?

शास्त्री हे टंडन यांच्या अगदी निकटवर्ती आहेत हे पं. नेहरूंना ठाऊक होतं आणि नेहरूंच्या ते विश्वासातील आहेत याची टंडनना जाणीव होती. दोघांचाही शास्त्रींची निष्ठा व निःपक्षपातीपणा यांवर पूर्ण विश्वास होता. त्यामुळं दोघांनीही शास्त्रींना तुम्ही 'त्यांच्या'पासून दूर राहा असं सुचवलं नाही. किंबहुना शास्त्रींसारखी व्यक्ती मध्यस्थ म्हणून मोलाची कामगिरी करू शकेल असं दोघांचंही मत होतं.

जेव्हा आपल्या मतांचा ठाम आग्रह धरणाऱ्या दोन व्यक्ती एकमेकांचे विरोधक बनतात तेव्हा ते बहुधा दुसऱ्याचं ऐकून न घेता स्वतःच बोलत राहतात. नेहरू व टंडन हे कमालीचे देशभक्त व ध्येयवादानं भारलेले होते. मात्र आपली तत्त्वं सोडून देऊन समान मुद्द्यांवर त्यांच्यात एकमत होणं कठीण आहे असं शास्त्रींना वाटत होतं. नेहरू व टंडन दोघेही काँग्रेस पक्षाच्या आणि अलाहाबादच्या नागरी व जिल्ह्याच्या समस्या सोडवण्यात गुंतले होते. त्यामुळं कधी कधी नेहरूंना टंडन यांच्या कार्यक्षेत्रात अमुक एखादी गोष्ट वेगळ्या तऱ्हेनं करावी असं वाटे. तसंच टंडन यांनाही नेहरूंच्या कार्यक्षेत्रात ढवळाढवळ करावीशी वाटे. अशा परिस्थितीत बरेचदा पं. नेहरू टंडनना पाठवण्यासाठी पत्राचा मसुदा करायला शास्त्रींना सांगत. टंडन यांची विचारसरणी ठाऊक असल्यानं त्यांना मान्य होईल असा मसुदा शास्त्री बनवीत. बऱ्याच वेळा शास्त्रींनी सुचवलेला मसुदा मान्य करून नेहरू टंडनना पत्र पाठवीत. या पत्राला पाठवायच्या उत्तराचा मसुदा तयार करायलाही टंडन शास्त्रींनाच सांगत!

अशा प्रकारे दोघांच्या पत्रांचे मसुदे शास्त्री बनवू लागले. उभयतांना समाधानकारक ठरेल अशी पत्रं पाठवण्याच्या शास्त्रींच्या कौशल्यामुळं अनेक कामं सुरळीतपणं पार पडत असत.

हळूहळू नेहरू व टंडन यांचा शास्त्रींवरील विश्वास दृढ होत गेला व जवळजवळ अढळ बनला. पंचवीस वर्षांच्या तरुण शास्त्रींवर दोघेही सारख्याच जिव्हाळ्याचा वर्षाव करू लागले. एक वर्षाच्या काळात दोघांनीही शास्त्रींना सल्लागाराचं स्थान दिलं. भारतीय राजकारणात पुढं येण्यास या दोघांनीही शास्त्रींना प्रोत्साहन दिलं.

पाश्चात्य विचारांचा पगडा असलेल्या पं. नेहरूंना भारतीय विचारांशी पूर्णतः एकनिष्ठ असलेले शास्त्री आवडत. शास्त्रींना स्वतःला कसलीच अभिलाषा नव्हती. निःस्वार्थी सेवा व सर्वसंगपरित्याग हा त्यांचा स्वभावच आहे हे नेहरू जाणून होते. नेहरू हळूहळू कौटुंबिक बाबींविषयीही शास्त्रींचा सल्ला घेऊ लागले. नेहरूंच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित आणि नेहरूंची कन्या यांचं मुळीच पटत नसे. त्या दोघींत दिलजमाई व्हावी म्हणून शास्त्रींनी प्रयत्न केले अशी आठवण बिशंभर नाथ पांडे सांगतात. नेहरूंचा शास्त्रींवरचा हा विश्वास अखेरपर्यंत टिकला.

टंडन यांच्याशी शास्त्रींचे असेच जवळिकीचे संबंध होते. मूल्यं, वैचारिक पार्श्वभूमी या दृष्टीनं शास्त्री नेहरूंपेक्षा टंडन यांच्या अधिक जवळचे होते. दोघेही साधुवृत्तीचे. टंडन बाहेरून तर शास्त्री आतून. टंडनना शास्त्री आपले पहिले राजकीय गुरू मानीत.



ताश्कंद येथे प्रेम वैद्य व नारायणस्वामी
यांनी घेतलेले हे छायाचित्र दुर्दैवाने
अखेरचे ठरले !
१० जानेवारी १९६६ रात्री ११ वाजता.

मात्र या दोघांत एक मूलभूत फरक होता. टंडन हे फार तीव्र भाषेत बोलत तर शास्त्री भावनिक समतोल साधीत. ते कधीही उर्मट शब्द वापरीत नसत.

१९२९ हे साल शास्त्रींच्या दृष्टीनं महत्त्वाचं ठरलं. त्या वर्षी ते अलाहाबादला गेले तेव्हा साधे समाजकार्यकर्ते होते, पण वर्षाच्या अखेरीस दोन बड्या नेत्यांचे ते सल्लागार बनले. त्याच वर्षाच्या शेवटी लाहोर इथे पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचं ऐतिहासिक अधिवेशन भरलं. शास्त्री त्याला हजर होते. या अधिवेशनात नेहरूंनी काँग्रेसचा ध्वज फडकवला व देशाची पारतंत्र्यातून मुक्तता करणं हे काँग्रेसचं उद्दिष्ट आहे असं घोषित केलं. तो प्रसंगच अविस्मरणीय होता, तो अनुभव रोमांचकारी होता. इथून पुढं भावी दिशा निश्चित झाली होती.

१९३० साली नेहरू अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष होते तसेच अलाहाबाद जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष व शहर काँग्रेसचेही अध्यक्ष होते. काँग्रेसच्या क्षितिजावरचा एक तळपता तारा होते. टंडन हे 'द सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी'चे तसेच अलाहाबाद जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. शास्त्रींकडे संघटनात्मक जबाबदारी सोपवावी असं उभय नेत्यांना वाटलं व त्यांची अलाहाबाद जिल्हा काँग्रेसच्या चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. त्यामुळं त्यांच्यावरील जबाबदाऱ्या वाढल्या. सामान्य कार्यकर्ता आता जिल्हा पातळीवरील नेता बनला. लाहोर येथील काँग्रेस अधिवेशनातील संदेश घरोघरी पोचवणं हे त्यांचं कार्य बनलं.

त्या सुमाराला राजकीय घटना वेगानं घडत होत्या. काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनात महात्मा गांधींनी १२ मार्च १९३० रोजी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. त्यांनी मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी दांडी यात्रा आरंभिली. त्यामुळं कायदेभंगाच्या चळवळीला एक नवं चैतन्य प्राप्त झालं. नेहरू व टंडन यांच्या संमतीनं शास्त्रींनी अलाहाबाद जिल्ह्यात 'भाडे न देण्या'ची चळवळ आरंभिली. गावोगावी काँग्रेस कार्यकर्ते जाऊन शेतकऱ्यांना भाडं देऊ नका असं आवाहन करू लागले. ही चळवळ उखडून टाकण्यासाठी सरकारनं त्वरित पावलं टाकली. आपल्या चळवळीच्या समर्थनार्थ शास्त्रींनी पहिलं भाषण केलं, तेव्हा त्यांना अटक करण्यात येऊन अडीच वर्ष तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. परंतु नंतरच्या राजकीय घडामोडींमुळं त्यांची वर्षभरातच मुक्तता झाली.

व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी चळवळीनं उद्‌भवलेली परिस्थिती निवळावी म्हणून भारतीय राजकीय नेते व ब्रिटिश सरकार यांच्यात चर्चा घडवून आणली. गांधी-आयर्विन करार झाला. १९३१ साली लंडनमध्ये गोलमेज परिषद भरली. तिथं ठामपणं आपले विचार मांडताना गांधीजी म्हणाले,

*"भारताचं सैन्यदल व परराष्ट्र विभाग यांवर आमचं पूर्ण नियंत्रण हवं असं मी काँग्रेसच्या वतीनं नम्रतापूर्वक सांगू इच्छितो. परकीय शासनकर्ते तलवारीच्या जोरावर काही काळ भारतावरचा आपला कब्जा टिकवून ठेवू शकतील, परंतु ती एक*

*तात्पुरती अवस्था असेल आणि त्या अवस्थेतही परकीय जोखड कोणत्याही क्षणी झुगारून देण्याच्या तयारीत असलेल्या बंडखोर, असंतुष्ट धगधगत्या भारताला सामोरं जावं लागेल.''*

भारताची ही मागणी मान्य करायला ब्रिटिशांची तयारी नव्हती. हिंदू-मुस्लीम प्रश्नाला खतपाणी घालून त्याची सबब ब्रिटिशांनी पुढं केली. ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी 'कम्युनल ॲवॉर्ड' जाहीर केल्यानं परिस्थिती आणखीच बिघडली. देशाच्या या दोन बड्या जमातींत त्यामुळं आणखी एक दरी निर्माण झाली.

लंडनहून हात हलवीतच गांधीजींना परतावं लागलं व त्यामुळं देशात नैराश्याचं वातावरण पसरलं. परिस्थितीची चर्चा करण्यासाठी गांधीजींनी व्हाइसरॉयची मुलाखत मागितली, पण त्यांना नकार देण्यात आला. सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू करणं व परदेशी मालावर बहिष्कार घालणं असा निर्णय १ जाने. १९३१ ला काँग्रेस कार्यकारिणीनं घेतला. पुन्हा देश आंदोलनानं धगधगू लागला. गांधीजी व अन्य नेत्यांना अटक झाली व काँग्रेस ही बेकायदा संघटना असल्याचं जाहीर करण्यात आलं. शास्त्रींनाही पकडण्यात येऊन त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली.

१९३० ते १९४५ या काळात स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतल्याबद्दल शास्त्रींना सात वेळा कारावास भोगावा लागला. त्यांची तुरुंगवासातील नऊ वर्षं हा त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा, अर्थपूर्ण भाग ठरला. तुरुंगात त्यांचं वर्तन आदर्श होतं. त्यांनी स्वतःसाठी कसल्याही सोयी-सवलती मागितल्या नाहीत. तुरुंगातील सहकारी काँग्रेसजनांना शक्य ती मदत ते करीत. तुरुंगात ते भरपूर वाचनही करीत.

ते तुरुंगात असताना त्यांची थोरली कन्या मंजू ही आजारी पडली. तिची प्रकृती काहीशी गंभीर होती. तिला भेटण्यासाठी शास्त्रींची पॅरोलवर तात्पुरती सुटका होऊ शकली असती. परंतु त्या अवधीत आपण राजकीय कार्यात भाग घेणार नाही असं लिहून द्यावं लागलं असतं. स्वातंत्र्यसैनिकानं असं लिहून देण्यास शास्त्रींचा विरोध होता. तुरुंगनिरीक्षकाला शास्त्रींबद्दल आदर होता. त्यानं त्यांच्याकडून लेखी निवेदन न घेताच स्वतःच्या अधिकारात पंधरा दिवसांच्या पॅरोलवर त्यांना सोडलं. शास्त्री नियम पाळतील अशी त्याला खात्री असल्यानं त्यानं हा धोका पत्करला होता. शास्त्री ज्या दिवशी घरी गेले त्याच दिवशी दुर्दैवानं त्यांच्या कन्येचं निधन झालं. शास्त्रींनी अंत्यसंस्कार केले व पंधरा दिवसांचा पॅरोल असूनही त्याचा वापर न करता ते पुन्हा तत्काळ तुरुंगात रुजू झाले!

एकदा त्यांचा चार वर्षं वयाचा मुलगा हरिकृष्ण हा टायफॉइडनं आजारी होता. त्याला १०४ डिग्रीपर्यंत ताप चढत होता व त्याची तब्येत काही सुधारत नव्हती. शास्त्रींची आठवड्याच्या पॅरोलवर सुटका करण्यात आली. त्यांनी सबंध आठवडाभर हरिकृष्णाची शुश्रूषा केली. परंतु त्याचा ताप १०५ अंशांवर गेला व दिवसेंदिवस त्याची प्रकृती ढासळतच चालली. शास्त्रींचा पॅरोल वाढवून देण्याला तुरुंगनिरीक्षक तयार होते, पण त्यासाठी आपण राजकीय कामात भाग घेणार नाही असं लेखी

आश्वासन द्यावं लागणार होतं. पण तसं करण्यास शास्त्रींनी नकार दिला. आपल्या वडिलांनी आपल्यासोबत राहावं असं लहानग्या हरिकृष्णाला वाटत होतं. परंतु शास्त्रींनी पॅरोल वाढवून न घेता ते ठरलेल्या दिवशी पुन्हा तुरुंगात रुजू झाले. कुटुंब की देश यात निवड करण्याचे असे अनेक प्रसंग शास्त्रींवर आले.

सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा भाग असलेल्या विविध आंदोलनांत शास्त्री हिरिरीने सहभागी झाले. १९३०, १९३२ व १९३४ मध्ये विविध मुदतींच्या कारावासाची त्यांना शिक्षा झाली. 'ना-भाडे' आंदोलन, मिठाचा सत्याग्रह यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचं अलाहाबाद हे अत्यंत महत्त्वाचं केंद्र बनलं होतं आणि अलाहाबाद येथील पक्षसंघटनेत शास्त्री महत्त्वाची भूमिका पार पाडीत होते. अत्यंत उच्च नैतिक मूल्यं पाळणारे, समन्वयाची, सामंजस्याची भूमिका घेणारे, अथक परिश्रम करणारे अशी शास्त्रींची प्रतिमा निर्माण झाली होती. अलाहाबाद जिल्हा काँग्रेसचे सचिव म्हणून ते यशस्वी ठरले होते व अप्रतिम संघटनकौशल्याचा त्यांनी प्रत्यय आणून दिला होता. यापुढं आणखी मोठी जबाबदारी उचलण्यास ते सिद्ध होते. त्यासाठी त्यांना काही फार वेळ वाट पाहावी लागली नाही.

पंडित नेहरू हे १९३५ मध्ये उत्तर प्रदेश प्रॉव्हिन्शियल काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बनले. तिचं कार्यालय लखनौ इथे होतं. या नव्या जबाबदारीमुळं पं. नेहरूंना खूप लोकांना भेटणं, त्यांचं म्हणणं ऐकून घेणं, प्रश्न सोडवणं, निर्णय घेणं आवश्यक होतं. परंतु तोवर राष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणात ते अत्यंत व्यग्र झाले होते. प्रादेशिक काँग्रेसच्या दैनंदिन कामात लक्ष घालायला त्यांच्यापाशी वेळ नव्हता. त्यांना मदत करणारा, त्यांची जबाबदारी वाटून घेणारा विश्वासू माणूस हवा होता. त्यांनी त्यासाठी शास्त्रींची निवड केली व उत्तर प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीसपदी त्यांना नेमलं. अशा प्रकारे जिल्हा पातळीवरून प्रादेशिक पातळीवर शास्त्रींची बढती झाली. असं असलं तरी त्या वेळच्या प्रथेप्रमाणं त्यांनी अलाहाबाद येथील आपलं कार्यक्षेत्र कायम ठेवलं. १९३६ मध्ये अलाहाबाद जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी ते निवडून आले. तसंच अलाहाबाद म्युनिसिपल बोर्डावरही त्यांची निवड झाली. या बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांनी सात वर्षं काम पाहिलं. त्या वेळी पं. नेहरूंच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित याही बोर्डाच्या सदस्या होत्या. अलाहाबाद इम्प्रुव्हमेंट ट्रस्टचे सदस्य म्हणूनही शास्त्रींनी चार वर्षं काम पाहिलं. समितीचं कार्य कसं करावं याचं कौशल्य त्यांनी याच काळात आत्मसात केलं, असं डी. आर. मंकीकर यांनी म्हटलं आहे.

शास्त्रींचं राजकीय कार्य आता लखनौहून सुरू झालं. जिल्हा समित्यांची संघटनात्मक कामं करणं, प्रादेशिक नेत्यांशी संपर्क राखणं हा त्यांच्या कामाचा भाग होता. गोविंद वल्लभ पंत, संपूर्णानंद, चंद्रभानू गुप्ता हे प्रादेशिक नेते राष्ट्रीय पातळीवर चमकू लागले होते. हे तिघेही नंतर उत्तर प्रदेशचे मुख्य मंत्री झाले. रफी अहमद किडवाई, सईद अली जहिर आणि हाफिज मोहम्मद इब्राहिम हेही महत्त्वाचे पुढारी होते, ते नंतरच्या काळात कॅबिनेट मंत्री बनले.

शास्त्री तेव्हा अवघे तीस वर्षांचे होते. त्यांच्यापेक्षा अधिक काळ पक्षाचे कार्य करणारे पुढारी होते. त्यामुळं शास्त्रींची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानं ज्येष्ठ मंडळीत काहीसे नाराजीचे सूर उमटलेही, परंतु त्यामुळं काही अडचण निर्माण झाली नाही. शास्त्रींचा लौकिक चांगला होता व त्यांना नेहरूंचा पाठिंबा आहे हे सर्वांना ठाऊक होतं. त्यामुळं शास्त्रींच्या कामाला सुरुवात तर चांगली झाली. आता सर्वांच्या सदिच्छा मिळवायच्या होत्या. तेव्हा त्यांनी नेहमीच्याच निष्ठेनं कार्याला आरंभ केला. लोकांच्या भेटीगाठी ते घेऊ लागले. लक्षपूर्वक त्यांचं म्हणणं ऐकून घेऊ लागले. बैठकांची ते थोडक्यात टाचणं काढीत व आवश्यक ती कारवाई करीत. आश्वासनं देताना ते अत्यंत काळजी घेत व दिलेला शब्द पाळण्याची दक्षता बाळगीत. त्यांचा स्वभाव पारदर्शी होता. भेटायला येणाऱ्या व्यक्तीला, मग ती कोणत्याही पदावरील असो, ते समान आदरानं वागवीत. हळूहळू शास्त्रींची कीर्ती पसरू लागली व पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांचा अधिकाधिक विश्वास त्यांनी संपादन केला.

त्यापूर्वी अलाहाबादला त्यांनी पक्षसंघटनेचं काम केलं असलं तरी त्यांचं कार्यक्षेत्र मर्यादित होतं आणि पुरुषोत्तमदास टंडन व पंडित नेहरू यांचे आदेश अमलात आणण्यापुरतं सीमित होतं. उत्तर प्रदेश हे देशातील सर्वांत मोठं राज्य असल्यानं प्रदेश काँग्रेसची जबाबदारी मोठी होती. विविध मतांचा समन्वय साधणं, नेहरूंना घडामोडींची वेळोवेळी माहिती देणं, काँग्रेसचा संदेश घरोघरी पोचावा म्हणून जिल्हा नेते व कार्यकर्ते यांनी जनतेच्या संपर्कात राहावं म्हणून प्रयत्न करणं आदी कामं शास्त्रींना करावी लागत. उत्तर प्रदेशातील प्रत्येक खेडं काँग्रेसमय झालं याचं श्रेय पं. नेहरू, पुरुषोत्तमदास टंडन आणि लालबहादुर शास्त्री यांना जातं, असं मंकीकर यांनी लिहून ठेवलं आहे.

१९३६ साली शास्त्रींवर आणखी एक जबाबदारी सोपविण्यात आली व त्यामुळं उत्तर प्रदेशच्या राजकारणात त्यांना मध्यवर्ती महत्त्व प्राप्त झालं. जमीनदारी पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याचा काँग्रेस पक्षानं संकल्प केला होता. नवीन कायदा आणूनच कुळांची स्थिती सुधारणं शक्य होतं. तेव्हा या प्रश्नाची पाहणी करून शिफारशी करण्यासाठी प्रदेश काँग्रेसची एक अनौपचारिक समिती स्थापन करण्यात आली व तिचे निमंत्रक म्हणून शास्त्रींची नियुक्ती केली गेली. जमीनविषयक कायदा सुधारण्याचा प्रश्न केवळ उत्तर प्रदेशापुरता मर्यादित नव्हता. तो सबंध देशाच्या दृष्टीनं महत्त्वाचा होता.

या अत्यंत गुंतागुंतीच्या व राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या प्रश्नाला शास्त्रींनी वाहूनच घेतलं. उपलब्ध कागदपत्रं, कायद्यातील तरतुदी यांचा त्यांनी कसून अभ्यास केला. जमीनदारी पद्धतीच्या दुष्परिणामांची यादी केली. परंतु सर्वांत महत्त्वाचं काम होतं शिफारशी करण्याचं. त्यासाठी कल्पक विचारशक्तीची गरज होती. शास्त्रींनी तपशीलवार अहवाल तयार केला आणि अनेक व्यवहार्य शिफारशी केल्या. अनेक वर्षांच्या शोषणानंतर आपल्या जीवनात नव्या आशेची पहाट उगवावी म्हणून शेतकरी वर्ग उत्सुक होता.

त्यांच्या दृष्टीनं हा अहवाल ऐतिहासिक महत्त्वाचा गणला गेला. १९३७ साली उत्तर प्रदेशात जेव्हा काँग्रेसचं राज्य आलं तेव्हा त्यानं शास्त्री समितीच्या अहवालाच्या आधारावर जमीन सुधारणा कायदा केला. नंतरच्या काळात इतर राज्यांतही शास्त्रींचा अहवाल आदर्श मानून जमीन सुधारणा कायदे केले गेले.

सविनय कायदेभंगाच्या चळवळींचं दडपण वाढत गेलं व काही घटनात्मक बदल करून बरीचशी सत्ता भारतीयांच्या हाती द्यावी असा विचार ब्रिटिश सरकारनं केला. त्यानुसार ब्रिटिश संसदेनं १९३५ मध्ये 'भारत सरकार कायदा' मंजूर केला. या कायद्यात राज्यात निवडणुका घेऊन विधिमंडळं स्थापन करणं, राज्यात जबाबदार सरकार स्थापन करणं (अर्थात काही खास जबाबदाऱ्या ब्रिटिश गव्हर्नरांकडे ठेवून) अशी तरतूद होती. १९३५ च्या कायद्यान्वये खरोखरच स्वायत्तता लाभेल अशी खात्री पटल्यावर काँग्रेसनं तो स्वीकारला आणि प्रादेशिक विधान सभांच्या निवडणुकांत भाग घेण्याचं ठरविलं. १९३७ मध्ये या निवडणुका झाल्या आणि अलहाबादमधील एका मतदार संघातून लालबहादुर निवडून आले. त्यामुळं अलाहाबादेतील त्यांचा राजकीय पाया आणखी दृढ झाला.

उत्तर प्रदेश विधानसभेत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळालं व त्यानं सरकारही स्थापन केलं. परंतु ते दोनच वर्षं सत्तेवर राहिलं. १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटलं. भारताला युद्धात सहभागी करण्याच्या ब्रिटिशांच्या निर्णयाविरुद्ध सर्व राज्य सरकारांनी राजीनामे दिले. जर्मनीतले नाझी व इटलीतील फॅसिस्ट यांच्या विरुद्ध भारत असला तरी युद्धात सामील होण्याचा निर्णय भारतीयांनीच घ्यायला हवा, परकी सत्तेनं नव्हे असं भारतीय नेत्यांचं म्हणणं होतं. तेव्हा ब्रिटिश सरकारनं देशाचं प्रशासन चालविण्यासाठी तसंच युद्धाची आघाडी बळकट करण्यासाठी व्हाइसरॉय लिनलिथगो यांच्याकडे अभूतपूर्व अधिकार सोपवले. त्यांनी काँग्रेसशी संपर्क ठेवण्यासच नकार दिला. एका जमातीविरुद्ध दुसऱ्या जमातीला झुंजवणं हाच जुना खेळ पुन्हा सुरू करण्यात आला. मुस्लीम लीगला त्यांचं मागणीपत्रक सादर करण्यास सांगण्यात आलं. तेव्हा प्रादेशिक सरकारांनी राजीनामे दिले. विधानसभा बरखास्त झाल्या. शास्त्री यांनी त्यानंतर अलाहाबादला जाऊन पक्षयंत्रणेच्या पुनर्रचनेस आरंभ केला. परंतु या वेळी त्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्याबद्दल डी. आर. मंकीकर म्हणतात :

"अधूनमधून भोगावा लागलेला कारावास, तुरुंगात व तुरुंगाबाहेर पोषक आहाराचा झालेला अभाव आणि सततचे परिश्रम यांचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. तसे मुळात ते काही धट्टेकट्टे, मोठ्या सुदृढ प्रकृतीचे असे नव्हतेच. गंभीर आजार होईस्तोवर त्यांनी आपल्या तब्येतीकडे लक्षही दिलं नव्हतं.

बनारसला काही कामासाठी गेल्यावर नदीपलीकडच्या रामनगर येथील आपल्या नातेवाइकांना भेटायला जायचं त्यांनी ठरवलं. होडी पकडण्यासाठी ते घाटावर गेले, पण त्यांच्या पोटात असह्य कळा येऊ लागल्या. छातीतही कळा येऊ लागल्या व ते बेशुद्ध पडले. आजूबाजूच्या लोकांनी त्यांना रुग्णालयात नेलं व बनारस काँग्रेसच्या

कार्यालयात हे वृत्त कळवलं.

शास्त्रींच्या मातोश्रींना एका स्नेह्यानं तत्काळ रुग्णालयात नेलं. त्यांची पत्नी ललिता देवी प्रवासाच्या भाड्यासाठी पैसे नसल्यानं जाऊ शकत नव्हत्या. तेव्हा पुरुषोत्तमदास टंडन यांनी त्यांच्या व मुलांच्या तिकिटाचे पैसे दिले. ललिता देवी बनारसला पोचल्या तोवर शास्त्रींना रुग्णालयातून स्थानिक काँग्रेस नेते कमलापती त्रिपाठी यांच्या घरी हलवण्यात आलं होतं. शास्त्रींना प्लूरसीचा झटका आला होता व तो एवढा तीव्र होता की तीन दिवस त्यांची वाचा जवळजवळ गेली होती.

ललिता देवींनी पतीच्या शुश्रुषेकडे पूर्ण लक्ष दिलं, तरी शास्त्रींना बरं व्हायला महिना लागला. नंतर शास्त्री कुटुंब अलाहाबादला परतलं. उन्हाळा सुरू झाला होता. त्यामुळं शास्त्रींना उकाड्याचा त्रास होऊ लागला. ''थंड हवेच्या ठिकाणी जाऊन राहा'' असा सल्ला डॉक्टरांनी त्यांना दिला. ही सूचना दुर्लक्षून चालणार नव्हतं, परंतु पुन्हा पैशाची अडचण होती. आपण पैसे उसने घेऊन जाऊ असा आग्रह ललिता देवींनी धरला. मोठ्या मुश्किलीनं शास्त्री तयार झाले. पैसे जमा केले गेले, एका मित्रानं राणीखेत इथं राहायची जागा स्वस्तात मिळवून दिली. शास्त्री महिनाभर तिथं राहिले. तिथं त्यांची प्रकृती सुधारली.

काँग्रेसनं १९४१ मध्ये राजकीय चळवळीची नीट आखणी केली व काही निवडक नेत्यांना वैयक्तिक सत्याग्रह करण्यास सांगण्यात आलं. त्यांत शास्त्रींचा अंतर्भाव होता. ते सत्याग्रहात सामील झाले. १९ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांना अटक करण्यात येऊन पाच महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. १४ डिसेंबर रोजी त्यांची तुरुंगातून सुटका झाली.

त्या वेळी दोस्त राष्ट्रांच्या दृष्टीनं युद्धाची परिस्थिती प्रतिकूल होती. नाझींनी जवळजवळ पश्चिम युरोपवर कब्जा मिळवला होता. इंग्लंडवरच आक्रमण होण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळं भारतात काही राजकीय तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीनं ब्रिटिश सरकारनं सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचं शिष्टमंडळ भारतात धाडलं. केंद्रात जबाबदार सरकार स्थापावं, सर्व भारतीय सदस्यांचाच अंतर्भाव असलेल्या मंत्रिमंडळाच्या हाती खरी सत्ता असावी व व्हाइसरॉय हे नाममात्र प्रमुख असावेत अशा मागण्या काँग्रेसनं ब्रिटिशांपुढं मांडल्या. पण या प्रस्तावावर चर्चा करण्याचा क्रिप्स मिशनला अधिकार नव्हता. क्रिप्स मिशननं जे देऊ केलं ते पाहून महात्मा गांधी म्हणाले, ''कोसळणाऱ्या बँकेच्या नावावर पुढील तारखेचा चेक द्यावा असे हे प्रस्ताव आहेत!'' अर्थात क्रिप्स मिशन अपेशी ठरलं.

पुढील कार्यक्रम ठरवण्यासाठी १९४२ च्या ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात मुंबई इथे काँग्रेसचं अधिवेशन घ्यायचं ठरलं. या अधिवेशनाला पक्षाचे सर्व नेते, देशाच्या विविध भागांतून आलेले कार्यकर्ते हजर होते. स्वातंत्र्यासाठी मोठं जनआंदोलन उभारावं असं सर्वांचं मत होतं. ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'भारत छोडो' ठराव अधिवेशनात मंजूर झाला. ९ ऑगस्टला पहाटे चार वाजता म. गांधींना अटक झाली.

पंडित नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभःई पटेल, राजेंद्र प्रसाद यांचाही अटक झालेल्या नेत्यांत समावेश होता.

ब्रिटिशांनी तत्काळ देश सोडून निघून जावं या मागणीनं सबंध देश जणू विद्युतसंचार झाल्यासारखा भारला गेला. म. गांधी व अन्य नेते यांना अटक केल्यामुळं लोक संतापले. मुंबई व अन्य शहरांत लोक रस्त्यावर आले, निदर्शनं करू लागले. मुंबई हे त्या वेळी राष्ट्रीय उत्थापनाचं केंद्र बनलं. मुंबईत ब्रिटिश सरकारनं अनेक भागांत संचारबंदी जाहीर केली. जमावाला पांगवण्यासाठी अश्रुधूर, गोळीबार यांचा वापर करण्यात आला. पोलिसांच्या अमानुष वागणुकीनं आगीत तेलच ओतलं गेलं. असेच प्रसंग देशात जागोजागी घडले. परंतु त्यामुळं राष्ट्रवाद दडपला गेला नाही. या स्वातंत्र्ययुद्धात आबालवृद्ध सारेच सामील झाले होते. अवघा देशच चैतन्यमय झाला होता.

देशातील विविध भागांत पोलिसांनी ५३८ वेळा गोळीबार केला, त्यात ९४० जण ठार व १६३० जण जखमी झाले. १९४२ च्या डिसेंबरपर्यंत ६०,२२९ जणांना अटक झाली, असं निवेदन व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे गृह खात्याचे सदस्य सर रेजिनाल्ड मॅक्सवेल यांनी केलं. आंदोलन चिरडून टाकल्याचाही दावा ब्रिटिश सरकारनं केला. पंतप्रधान चर्चिल यांनी अशी बढाई मारली की, "कोणाला शंका वाटू नये म्हणून मला एक गोष्ट स्पष्ट करायलाच हवी. आमचं जे आहे ते आम्हाला आमच्याजवळच ठेवायचं आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या विलयाचा मी धनी होऊ इच्छीत नाही."

चर्चिल यांच्या या वल्गनेनंतर पाच वर्षांच्या आतच भारत स्वतंत्र झाला.

मॅक्सवेल व चर्चिल यांनी कितीही दावा केला तरी 'चले जाव' चळवळ चिरडली गेली नव्हती. अनेक काँग्रेस नेत्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आलं असलं तरी अनेक जण तत्काळ भूमिगत झाले होते व त्यांनी चळवळ पुढं चालू ठेवली होती.

लालबहादुर शास्त्री यांनी ९ ऑगस्ट १९४२ला गुपचुप मुंबई सोडली. अलाहाबाद स्टेशनवर आपण उतरलो तर आपल्याला तत्काळ अटक होईल याची कल्पना त्यांना होती. तेव्हा पोलिसांना हुलकावणी देण्यासाठी ते एका छोट्या उपनगरी स्टेशनवर उतरले. दिवस उजाडल्यावर ते आनंद भवनातील काँग्रेस कार्यालयात गेले. त्यांनी लागलीच भूमिगत माहिती केंद्र सुरू केलं. चळवळीची, पोलिसांच्या अत्याचारांची, आंदोलन चालवताना स्त्री-पुरुषांनी दाखवलेल्या शौर्याची माहिती देणारी पत्रकं ते काढू लागले. शक्य त्या मार्गानं आंदोलन चालू ठेवण्याचं आवाहन या पत्रकांतून केलेलं असे.

सांकेतिक आकडे, बनावट नावं यांचा वापर करून भूमिगत संपर्काचं जाळंच उभारण्यात आलं. टेलिफोनच्या, टेलिग्राफच्या वायर्स कापणं, रेल्वे वाहतुकीत अडथळे आणणं, सरकारी मालमत्तेची होळी करणं अशा हिंसक घटनाही घडू लागल्या. जणू गनिमी युद्धच सुरू झालं. परंतु शास्त्री मात्र शांततापूर्ण निदर्शनं आयोजित करीत होते. शक्य तेव्हा वेषांतर करून ते खेडोपाड्यांत जात, लोकांना भेटत, काँग्रेसनं सुरू

केलेल्या आंदोलनाची माहिती देऊन त्यात जनतेनं सहभागी होण्याचं आवाहन करीत.

एके दिवशी शास्त्री आनंदभवनच्या वरच्या मजल्यावरील एका खोलीत लपून बसले असता अचानक पोलिसांची धाड पडली. तळमजल्यावर विजयालक्ष्मी पंडित होत्या. पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यांनी आनंदभवनाची कसून तपासणी केली नाही, त्यामुळं शास्त्री बचावले. परंतु थोड्याच दिवसांनी, १९ ऑगस्ट १९४२ रोजी शास्त्रींनाही अटक होऊन तीन वर्षं कारावासाची शिक्षा झाली. या तीन वर्षांच्या काळात शास्त्रींच्या कुटुंबियांना खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. 'द सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी'चे शास्त्री आजीव सदस्य असल्यानं त्यांना दरमहा शंभर रुपये भत्ता मिळे. कुटुंबाचं उत्पन्न एवढंच. त्यात जेमतेम उदरनिर्वाह चाले. कुठलाही जादा खर्च परवडत नसे. कोणी आजारी पडलं तर औषधं आणायला पैसे नसत.

याच काळात सरकारनं काँग्रेसच्या सर्व कार्यक्रमांवर बंदी घातली. 'द सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी'चं कामही बंद करायची पाळी आली. अनेकांना अटक झाल्यानं नेहमीची कामं करायला वा निधी जमवायलाही कोणी नव्हतं. त्यामुळं शास्त्रींच्या कुटुंबाला मिळणारा शंभर रुपयांचा भत्ताही बंद झाला. ललिता देवी मिर्झापूरला आपल्या माहेरी गेल्या. तिथं मुलांचं कसंबसं पालन-पोषण त्या करीत होत्या. आपल्या पतीची तुरुंगात तब्येत कशी असेल, त्यांना धड अन्नही मिळत असेल की नाही या चिंतेनं त्यांना ग्रासलं व त्या आजारी पडल्या. त्यांना क्षयरोगानं पछाडलं. शास्त्रींपासून ही गोष्ट लपवून ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु कोठून तरी त्यांच्या कानांवर ही बातमी गेलीच. ते कमालीचे बेचैन झाले. अरुणा असफ अलींच्या भगिनी पूर्णिमा बॅनर्जी यांना त्यांनी ललिता देवींना मदत करण्याची विनंती केली. ललिता देवींना अलाहाबादला हलवण्यात आलं व पूर्णिमा बॅनर्जींनी त्यांच्या उपचाराची सोय केली. काही महिन्यांनी ललिता देवींची प्रकृती सुधारली. अलाहाबाद इथं मुलांसमवेत शास्त्री कुटुंबाच्या काही मित्रांच्या मदतीनं त्या उपजीविका करू लागल्या. एका मुस्लीम शेजाऱ्यानं त्यांना शेगडीसाठी जळण देऊ केलं. ललिता देवींनी संकोचून ही मदत स्वीकारायला आधी नकार दिला, परंतु शास्त्रींनी देशासाठी केलेल्या त्यागाच्या बदल्यात केलेली ही छोटीशी सेवा आहे, असं त्या मुस्लीम कुटुंबानं सांगितलं व ललितादेवींना ती स्वीकारायला भाग पाडलं.

□□



।। चार ।।

# पहिलं मंत्रिपद

दुसरं महायुद्ध संपलं आणि ब्रिटिश सरकारनं पुन्हा भारताच्या प्रश्नात लक्ष घातलं. चले जाव चळवळीला चिरडण्याचा प्रयत्नही सरकारनं केला. तरी पण आता फार काळ भारताला पारतंत्र्याच्या शृंखलांत दडपशाहीनं जखडून ठेवता येणार नाही याची जाणीव ब्रिटिशांना होऊ लागली होती. म. गांधी व अन्य नेते यांना कारावासातून मुक्त करावं व भारताशी राजकीय वाटाघाटी सुरू कराव्या असा प्रस्ताव घेऊन व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल हे लंडनला रवाना झाले.

जागतिक युद्धाच्या भीषण अनुभवातून जग नुकतंच बाहेर पडलं होतं. जगात शांतता व सुरक्षा नांदावी म्हणून संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली होती. आरंभी ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळू देणार नाही, असा निर्धार करणारे चर्चिल यांना देखील आता भारताला स्वातंत्र्य द्यावं लागेल असं वाटू लागलं होतं. तसा विचार करायला त्यांना अमेरिका प्रोत्साहन देत होती. अर्थात चर्चिल काही मोठ्या खुषीनं तसा विचार करीत नव्हते. त्यांनी व्हाइसरॉयना चार आठवडे ताटकळत ठेवलं. नंतर त्यांच्याशी चाळीस मिनिटं केलेल्या चर्चेच्या वेळी भारताचे हिंदुस्तान, पाकिस्तान व प्रिन्सेस्तान असं तीन विभागांत विभाजन करावं लागेल असं त्यांनी सूचित केलं. राजकीय स्थानबद्धांची सुटका करून कॉंग्रेस कार्यकारिणीशी वाटाघाटी सुरू करण्याच्या वेव्हेल यांच्या प्रस्तावाला मात्र त्यांनी मान्यता दिली.

वेव्हेल यांनी १५ जून १९४५ रोजी नेत्यांची सुटका केली व सिमला इथं त्यांना

चर्चेसाठी पाचारण केलं. अन्य राष्ट्रीय नेत्यांसमवेत मुस्लीम लीगचे जिना व लियाकत अली यांनाही त्यांनी आमंत्रित केलं.

या वाटाघाटी निष्फळ ठरल्या. दरम्यान ब्रिटनमध्ये निवडणुका होऊन चर्चिल सरकार कोसळलं. क्लेमंट ॲटली यांचं सरकार सत्तेवर आलं. त्यांनी भारताच्या केंद्रीय व प्रादेशिक विधानसभा यांच्या निवडणुका घेतल्या. जानेवारी १९४६ च्या सुमाराला एक कॅबिनेट मिशन भारतात पाठवण्यात आलं. भारताला स्वातंत्र्य देण्याचं ब्रिटिश सरकारनं ठरवलं. २४ मार्च १९४७ रोजी लॉर्ड मौंटबॅटन यांचा नवे व्हाइसरॉय म्हणून शपथविधी झाला. स्वातंत्र्य मिळालं, पण देशाची फाळणी झाली. भारत व पाकिस्तान असे दोन देश निर्माण करण्यात आले. परंतु उभय देशांतून उसळलेल्या दंगलींनी लोकांचे लोंढेच्या लोंढे बाहेर पडले. रक्तपात, कत्तली यांचा वणवा पेटला. अशा परिस्थितीत पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भारताचं पहिलं सरकार सत्तेवर आलं.

१९४५ ते १९४७ मधील या घडामोडींच्या वेळी लालबहादुर शास्त्री हे उत्तर प्रदेश काँग्रेसचे नेते म्हणून काम पाहत होते. १९४५ मध्ये राज्य विधानसभांच्या निवडणुका जाहीर झाल्या. उत्तर प्रदेशातील निवडणुकांची जबाबदारी काँग्रेसनं शास्त्रींवर सोपवली. उत्तर प्रदेशच्या काँग्रेस संसदीय मंडळाच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. योग्य उमेदवारांची निवड करणं, व्यापक प्रचारमोहीम आखणं, उत्तर प्रदेशातील लोकांशी संपर्क राखणं व संसदीय मंडळाचं कार्यालय अक्षरशः अहोरात्र चालवणं अशा विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर येऊन पडल्या.

शास्त्रींवर सोपविलेल्या कामांपैकी सर्वांत महत्त्वाची अशी ही कामगिरी होती. इच्छुक उमेदवारांच्या परस्परविरोधी दाव्यांचा साधक-बाधक विचार करून उमेदवार ठरवणं हे सर्वांत कठीण काम होतं. १९४६ साली उत्तर प्रदेशची लोकसंख्या ५ कोटी होती. उत्तर प्रदेश हे मोठं राज्य असल्यामुळं त्याची विधान सभेतील सदस्यसंख्याही मोठी होती. त्यामुळं उमेदवारांची निवड आणखीच अवघड होती.

शास्त्री काँग्रेस कमिटीच्याच कचेरीत राहत होते. त्यामुळं पुढारी, इच्छुक उमेदवार, कार्यकर्ते यांना चोवीस तास भेटायला ते उपलब्ध होते. ही कामगिरी त्यांनी चोखपणं बजावली. उमेदवारांची निवड, पक्षाची प्रचार-मोहीम आदी कामं त्यांनी समाधानकारक रीतीनं पार पाडली. काँग्रेस पक्षाला दणदणीत विजय मिळाला. अलाहाबादच्या एका मतदार संघातून स्वतः शास्त्री पुन्हा निवडून आले. शास्त्रींची वर्तणूक न्याय्य व निःपक्षपाती असल्यानं निवडणुकीतील पराभूत उमेदवारांनी त्यांना दोष दिला नाही. या निवडणुकीतील शास्त्रींची कामगिरी अभूतपूर्वच होती. प्रचंड स्मरणशक्ती, एकनिष्ठता व विनयशीलता हेही गुण त्यांच्यात आहेत असं यानंतरच्या काळात दिसून आलं.

त्यांची विनम्रता ही अगदी शुद्ध होती. त्यात कृत्रिमता नव्हती, ती मुद्दाम घडवलेली नव्हती की तो देखावा नव्हता, तर त्यांच्यातील सद्गुणांचा तो बाह्य आविष्कार होता. सारी परमेश्वराची लेकरं असून सर्वांना समभावानं वागवावं यावर त्यांचा दृढ विश्वास

होता. सामान्य माणसाबद्दल, त्याच्या भावनांबद्दल त्यांना आस्था होती. भेटायला येणाऱ्याचं स्वागत करण्याची त्यांची स्वतःची अशी खास पद्धत होती. कोणीही भेटायला आलं की ते खुर्चीतून उठून नमस्कार करीत, हसून त्याचं स्वागत करीत. त्याच्या ख्यालीखुशालीची चौकशी करीत. त्यामुळं त्याच्या मनावर काही ताण असलाच तर तो दूर होई. त्याचं म्हणणं ते लक्षपूर्वक ऐकत, गरज असेल तर लिहून घेत. आवश्यक तर प्रश्न विचारीत. भेटायला आलेला मनुष्य समोर बसलेला असताना ते कधीही कागदपत्रं वा फायली चाळत नसत की अचानक टेलिफोन करीत नसत! आपल्याला घाई आहे व भेटायला आलेला कधी जाईल असं झालं आहे असं ते कधीही दर्शवीत नसत. त्यांचं वागणं नेहमीच आदराचं, विनयाचं असे.

अर्थात त्यांच्यापाशी तारतम्य होतं. गुप्त गोष्टींची ते वाच्यता करीत नसत. मुलाखत संपली की ते पुन्हा उठून नमस्कार करून त्या व्यक्तीला निरोप देत. आपल्या मंत्रिमंडळ सहकाऱ्यांइतकंच ते सामान्य जनांशीही सौजन्यानं वागत असल्यानं त्यांचा मित्रपरिवार फार मोठा होता.

त्यांची एकनिष्ठताही कमालीची होती. १९४६ साली उत्तर प्रदेशच्या मुख्य मंत्र्यांच्या संसदीय सचिवपदी त्यांची नियुक्ती झाली. नंतर ते गृह व वाहतूक खात्याचे मंत्री झाले. १९५१ मध्ये पं. नेहरूंनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतलं व काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीसपदी त्यांची नेमणूक केली. त्यामुळं १९५१-५२ मध्ये भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत काँग्रेसच्या प्रचारमोहिमेची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. उमेदवार-निवडीचा अंतिम निर्णय पक्षाच्या संसदीय मंडळाकडे होता, तरी मुख्य जबाबदारी जवळजवळ शास्त्रींनाच पार पाडावी लागली. १९५२ नंतर त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात रेल्वे व वाहतूक, दळणवळण व वाहतूक, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रिपद ही पदं भूषविली.

१९६४ साली पंडित नेहरूंच्या निधनानंतर ते पंतप्रधान झाले. पं. नेहरू वगळता दुसऱ्या कोणाच्याही हाती सरकार व संघटनेतील एवढी सत्ता नव्हती. अर्थात इतर काही नेत्यांप्रमाणे शास्त्री कधीही सत्तेमुळे मदांध बनले नाहीत. सत्तेचा त्यांच्यावर काही परिणाम झाला नाही. आपल्याला मिळणाऱ्या वेतनातच सारा खर्च भागविण्याची त्यांना सवय होती. १९५१, १९५६ व १९६३ या साली त्यांनी मंत्रिपदांचे राजीनामे दिले. शास्त्रींचं उत्पन्न त्यामुळं घटलं. तेव्हा महागड्या भाज्यांचा वापर त्यांच्या कुटुंबानं बंद केला. शास्त्रींच्या एका मुलाला शिकवणी ठेवायची होती. तेव्हा कपडे धुण्यावरील खर्च कमी करून ते पैसे शिकवणीसाठी वापरावे असा आदेश शास्त्रींनी दिला! एवढंच नव्हे तर स्वतःचे कपडे स्वतः धुऊन त्यांनी उदाहरण घालून दिलं. आपलं चारित्र्य शुद्ध राखण्यासाठी त्यांनी आनंदानं त्याची किंमत मोजली. १९६६ साली शास्त्रींचा मृत्यू झाला तेव्हा त्यांच्यापाशी पैसे, घर, जमीन यांपैकी काही नव्हतं. बँकेत फारशी रक्कम नव्हती. किंबहुना कुटुंबाच्या वापरासाठी घेतलेल्या जीपचे पैसे ते हप्त्याहप्त्याने फेडत होते, त्या कर्जाचे काही हप्ते द्यायचे राहिले होते!

शास्त्रींची स्मरणशक्ती अत्यंत दांडगी होती. डॉ. के. एल. झारिया हे १९५३ मध्ये दिल्लीतील तिबिया कॉलेजमध्ये शास्त्रींना काही थोडी मिनिटं भेटले होते. त्यानंतर सहा वर्षांनी, १९६५ साली शास्त्री कॅनडाला गेले असता नायगारा धबधबा पाहायला गेले होते. झारियाही त्या वेळी तिथे गेले होते. शास्त्रींनी त्यांना ओळखलं व त्यांच्याशी गप्पाही मारल्या! असाच आश्चर्यकारक अनुभव अनेकांना येत असे. मला तर तो केव्हाच आला होता.

शास्त्रींचं जीवन म्हणजे एक खुलं पुस्तकच होतं. महात्मा गांधीजींप्रमाणं शास्त्रीही भारतीय राजकारणातील एक महान नैतिक व्यक्तिमत्व होतं.

१९४५ च्या प्रादेशिक निवडणुकांत उत्तर प्रदेशात काँग्रेसला बहुमत मिळालं. गोविंद वल्लभ पंत यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमतानं निवड झाली व ते मुख्य मंत्री बनले. पंत हे काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य होते. राजकीय कौशल्याबद्दल त्यांची ख्याती होती व महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर पंडित नेहरू त्यांचा सल्ला घेत असत.

पंत यांना एक कार्यक्षम व विश्वासू संसदीय सचिव हवा होता. त्यांनी शास्त्रींची निवड केली. शास्त्री यांना प्रामुख्यानं विधिमंडळ कामकाजाबाबत मुख्य मंत्र्यांच्या मदतनीसाचं काम करावं लागे. एक प्रकारे हा मंत्रिपदाच्या प्रशिक्षणाचा काळ होता. विरोधी पक्षांसह सर्व आमदारांशी शास्त्रींचा संबंध येऊ लागला. त्यांनी सर्वांचा विश्वास संपादन केला. विधिमंडळविषयक नव्हे, तर त्यांच्या इतर कामावरही पंत खूष झाले. शास्त्री खूप कष्टाळू, निष्ठावान, विश्वासू व वादग्रस्त नसलेले असे आहेत असं पंत म्हणत, असं डी. आर. मंकीकर यांनी लिहून ठेवलं आहे. ते म्हणतात :

*"कार्यालयात उशिरापर्यंत काम करण्याची पंत यांची सवय होती. लालबहादुरही उशिरापर्यंत काम करीत बसत. अन्य संसदीय सचिव व मंत्री मात्र सायंकाळ होताच घरोघरी निघून जात. गोविंद वल्लभ पंत व शास्त्री उशिरापर्यंत काम करीत असल्यानं बऱ्याचदा पंतांच्या मोटारीतूनच ते घरी जाऊ लागले. त्यामुळं दोघांत जवळीक वाढली, पंतांना लालबहादुर यांना जवळून अभ्यासता आलं आणि त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात खूप जिव्हाळा निर्माण झाला.*

१९२९ मध्ये अलाहाबाद इथे असताना टंडन व नेहरू या दोघांचा विश्वास शास्त्रींनी संपादन केला होता. आता शास्त्रींनी पंतांची मर्जी मिळविली. अर्थात ज्येष्ठ नेत्याला रुचेल अशा पद्धतीनं स्वतःत बदल घडवून आणणारे ते नव्हते. ते जसे होते तसेच राहिले. शास्त्री हे आता मंत्री बनण्यास पात्र आहेत अशी पंतांना खात्री वाटू लागली व १९४७ मध्ये त्यांनी त्यांना गृह व वाहतूक खात्यांचे कॅबिनेट मंत्री केलं.

शास्त्रींची मंत्री बनण्याची ही पहिलीच वेळ. त्यांना बऱ्यापैकी वेतन मिळू लागलं आणि कुटुंबीय मंडळी काहीशा आरामात राहू लागली. अर्थात शास्त्रींची राहणी मात्र अखेरपर्यंत बदलली नाही.

गृह व वाहतूकमंत्री असताना त्यांनी आपल्या काही कल्पना अमलात आणल्या. पोलिस हे दडपशाहीसाठी वापरले जातात अशी ब्रिटिशांच्या काळात प्रतिमा होती. कायदा व सुव्यवस्था यांवर कडकपणं नियंत्रण ठेवायलाच हवं, परंतु तसं करताना मानवी दृष्टिकोन बाळगावा असा आग्रह शास्त्रींनी धरला. जमाव पांगवण्यासाठी लाठीमारापेक्षा पाण्याचे फवारे मारण्यावर भर द्यावा. अगदीच नाइलाज झाला तर अखेरचा उपाय म्हणून लाठीचा अवलंब करावा. अशा सूचना त्यांनी पोलिस खात्याला दिल्या. काही वेळा शास्त्री जखमी झालेल्या पोलिसांना संयम पाळायला सांगत. त्यानंतर प्रत्येक जखमी पोलिसाला व्यक्तिशः भेटून अशी सूचना देण्यामागील आपली भूमिका ते समजावून देत. 'चले जाव' चळवळीत ज्यांना शिक्षा झाली होती अशा तरुणांना त्यांनी वरच्या श्रेणीत भरती करून घेतलं. त्यामागं पोलिसांची प्रतिमा सुधारण्याचा त्यांचा उद्देश होता. आपली परिणामकारकता कमी न लेखता राष्ट्राभिमान बाळगण्याची दृष्टी त्यांनी पोलिस दलाला दिली.

शास्त्रींची नैतिक विश्वासार्हता व त्यांची विनोदबुद्धी यामुळं गंभीर पेचप्रसंग- विशेषतः जातीय तणाव- निवळायला मदत होई. शास्त्रींनी निमशासकीय स्वरूपाचं प्रांतीय रक्षा दल संघटित केलं. आणीबाणीच्या परिस्थितीत नागरी संरक्षणासाठी तरुणांना प्रशिक्षण देणारी ही ऐच्छिक संघटना होती.

सध्याची बससेवा ही अकार्यक्षम व बेभरवशाची आहे; ग्रामीण भागात ती अत्यंत तुटपुंजी आहे, असं वाहतूक खात्याचं काम पाहताना त्यांना आढळलं. त्यांनी सबंध राज्यभर वाहतूक करणारी सरकारी मालकीची बससेवा सुरू केली. त्यामुळं जनतेची खूपच सोय झाली.

ज्येष्ठ सनदी अधिकारी, खातेप्रमुख यांनी स्पष्टपणं व निःपक्षपातीपणं आपली मतं मांडावीत म्हणून ते प्रोत्साहन देत. या अधिकाऱ्यांनी फायलींवर मारलेले शेरे ते लक्षपूर्वक वाचीत. त्यांचं म्हणणं नीट ऐकून घेत. ते स्वतः निःपक्षपातीपणं निर्णय घेत व त्याची सारी जबाबदारी उचलीत. बाह्य दडपणाचा त्यांच्यावर काहीही परिणाम होत नसे.

पुढील तीन वर्षांत म्हणजे १९५० सालापर्यंत शास्त्रींचं राजकीय स्थान मोठं होत गेलं. दिल्लीत जाऊन 'राष्ट्रीय मंचा'वर काम करण्याची आता वेळ आली होती.

□□



। पाच ।।

# पंडित नेहरूंचा ओव्हरकोट

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी १९५० साली मोठी अटीतटीची लढत होणार होती. पंतप्रधान पं. नेहरू यांनी आचार्य जे. बी. कृपलानी यांना पाठिंबा दिला होता, तर उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल हे पुरुषोत्तमदास टंडन यांच्या मागं उभे राहिले होते. दोघे उमेदवार दिग्गज व त्यांना पाठिंबा देणारेही दिग्गजच. किंबहुना ही लढत नेहरू व पटेल यांच्यातच होती. आपला टंडनना ठाम विरोध असून ते जर निवडून आले तर तो आपल्यावरचा अविश्वास मानून पंतप्रधानपदाचा आपण राजीनामा देऊ, असं पं. नेहरूंनी स्पष्ट केलं होतं. २९ ऑगस्ट १९५० रोजी मतदान झालं व १ सप्टेंबरला निकाल जाहीर झाला. पं. नेहरूंचा प्रखर विरोध असूनही टंडन प्रचंड बहुमतानं निवडून आले. नेहरू अत्यंत खवळले व त्यांनी मी काँग्रेस कार्यकारिणीत सामील होणार नाही, असं सांगितलं. पंतप्रधानच कार्यकारिणीत नसले तर कार्यकारिणीचं कामकाज सुरळीतपणं व परिणामकारक रीतीनं पार पडणं शक्य नव्हतं. आधी इशारा दिल्याप्रमाणं पंडितजींनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला नसला तरी राजकीय पेचप्रसंग हळूहळू निर्माण होऊ लागला.

त्या वेळी शास्त्री उत्तर प्रदेशात गृहमंत्री होते. या घडामोडींमुळे ते अस्वस्थ झाले. नेहरू व टंडन या दोघांशी मित्रत्वाचे संबंध असलेले बहुधा ते एकमेव नेते होते. दोघांतील मतभेद दूर करण्याचं काम मुश्किल असलं तरी प्रयत्न करायला हरकत नाही असं त्यांनी ठरवलं. पंडित नेहरूंना भेटण्यासाठी मी लखनौहून दिल्लीला गेलो, असं

आपले चरित्रकार डी. आर. मंकीकर यांच्यापाशी शास्त्री बोलल्याचा उल्लेख मंकीकरांनी केला आहे. ते म्हणतात :

*"माझ्या पंडितजींबरोबर तीन भेटी झाल्या. सकाळी, दुपारी व रात्री. मतभेद विकोपाला जाऊ नयेत, काही तरी मार्ग काढायला हवा असं मी त्यांना सांगितलं. त्याचा काहीसा परिणाम पंडितजींवर झाला. परंतु तेवढ्यात टंडन यांनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन हा पेचप्रसंग सोडवला."*

पक्षात सुसंवाद टिकून राहावा म्हणून टंडन यांनी अध्यक्षपद सोडलं. नेहरूंनी पक्षाध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतली. आता सरकार व संघटना यांवर त्यांचं पूर्ण नियंत्रण आलं. सरदार पटेल आजारी होते. १५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचं निधन झालं. १९५१ मध्ये नेहरू युगाची निर्विवाद सुरुवात झाली!

नेहरूंनी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस म्हणून शास्त्रींची नेमणूक केली. गृहमंत्रिपदाचा राजीनामा देऊन शास्त्री लखनौहून दिल्लीला आले, आणि राष्ट्रीय मंचावर त्यांचं पदार्पण झालं. काँग्रेस पक्षात अध्यक्षांनंतर सर्वांत महत्त्वाचं व प्रतिष्ठेचं पद सरचिटणीसाचं होतं. पंडितजी पंतप्रधानाच्या कार्यात अत्यंत मग्न असल्यानं संघटनात्मक बाबींची बरीचशी जबाबदारी ते शास्त्रींवर टाकू लागले.

१९५२ मध्ये प्रौढ मतदानाच्या तत्त्वावर स्वतंत्र भारतातील पहिली सार्वत्रिक निवडणूक होणार होती. त्यासाठी पक्षाची तयारी करण्याची जबाबदारी शास्त्रींवर येऊन पडली. देशभर दौरे काढणं, पक्षकार्यकर्त्यांना भेटणं, त्यांना मार्गदर्शन करणं, उमेदवारांच्या याद्या तयार करायला राज्य काँग्रेसला मदत करणं असा कामांचा व्याप ते सांभाळू लागले. कार्यकर्त्यांची बाजू न कंटाळता ते तासन् तास ऐकून घेत व मतभेद मिटविण्याचा प्रयत्न करीत.

१९५२ च्या निवडणुकीत काँग्रेसला घवघवीत यश मिळालं. त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा लालबहादुर यांच्याकडे जातो.

साहजिकच निवडणुकीनंतर एक आदरणीय राष्ट्रीय नेता म्हणून शास्त्री ओळखले जाऊ लागले. विविध राज्यांतील काँग्रेसचे मुख्य मंत्री व कॅबिनेट मंत्री यांच्याशी त्यांचे उत्तम संबंध निर्माण झाले. पं. नेहरूंचे ते अत्यंत विश्वासातील सहकारी आहेत, हे सर्वश्रुत असलं तरी त्यांनी त्याचा कधी बडेजाव मिरवला नाही. इथेही त्यांची विनयशीलता कमी पडली नाही. किंबहुना ते अत्यंत विनयशील नेते म्हणूनच ओळखले जात.

सार्वत्रिक निवडणुकींनंतर लोकसभेची बैठक बोलावण्यात आली. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी पंडित नेहरूंना पंतप्रधानपदाची शपथ घेण्यास व सरकार स्थापन करण्यास पाचारण केलं. नेहरूंनी शास्त्रींना मंत्रिमंडळात सामील करण्याचं ठरवलं. शास्त्रींनी निवडणूक-प्रचार-मोहीम आखली असली तरी ते स्वतः मात्र निवडणुकीला उभे राहिले नव्हते. ते एकाही सभागृहाचे सदस्य नव्हते. राज्यसभेवर ते निवडून येतील अशी व्यवस्था पं. नेहरूंनी केली. १३ मे १९५२ रोजी रेल्वे व वाहतूक खात्याचे मंत्री

म्हणून शास्त्रींचा शपथविधी झाला.

उत्तर प्रदेशात मंत्री म्हणून काम केलेलं असल्यानं केंद्रीय मंत्रिपदाची जबाबदारी पेलणं त्यांना अवघड गेलं नाही. उशिरापर्यंत काम करीत बसणं, प्रश्नांची पार्श्वभूमी तपशीलवारपणं समजावून घेणं हा त्यांचा नित्यक्रम सुरू झाला. आता राजकारणी, सनदी अधिकारी, पत्रकार यांच्याशी त्यांचा मोठ्या प्रमाणावर संपर्क येऊ लागला. पं. नेहरूंशी केवळ सरकारी कामासाठीच नव्हे, तर संघटनात्मक बाबींबद्दलही त्यांना सतत संबंध ठेवावा लागे. स्वतःसाठी त्यांनी काही मार्गदर्शक तत्त्वं घालून घेतली व त्यांचं पालन केलं.

आपल्या खात्याच्या मर्यादेबाहेर जायचं नाही व केवळ मंत्रिमंडळाच्या बैठकीतच अन्य मंत्र्यांच्या कार्यक्षेत्राबद्दल मत व्यक्त करायचं, असा त्यांनी आपल्यावर दंडक घालून घेतला. त्यामुळं अन्य मंत्र्यांशी संघर्ष निर्माण होण्याचा प्रश्न उद्‌भवत नसे. परंतु विकासकामांचं नियोजन, सर्वसाधारण आर्थिक धोरण, परराष्ट्र धोरण यांबद्दल त्यांना काही मतंच नसावीत असा गैरसमज निर्माण झाला. या बाबतीत त्यांना मतं होती, पण ती स्वतःपाशीच ठेवण्याचा शहाणपणाचा निर्णय त्यांनी घेतला होता!

केवळ आपल्याच नव्हे तर सर्वच पक्षांच्या खासदारांकडे विशेष लक्ष पुरवण्याचं धोरण त्यांनी अंगिकारलं. त्यांना भेटणाऱ्या बहुतेक खासदारांना त्यांच्याबद्दल कमालीचा आदर वाटत असे. पं. नेहरूंचा वारसदार शोधण्याचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा खासदारांतील या आदरभावनेचा त्यांना उपयोग झाला.

तिसरी गोष्ट म्हणजे उत्तर प्रदेशातल्याप्रमाणं त्यांनी सनदी नोकरांशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केले. त्यांना मनमोकळेपणं मतं मांडण्यास ते प्रोत्साहन देत. सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाला अग्रक्रम देण्याचं त्यांचं धोरण होतं. सुरुवातीपासूनच त्याची जाणीव त्यांनी नोकरशाहीला करून दिली, हा त्यांचा चौथा दंडक होता. प्रशासनात एकनिष्ठतेला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा त्यांचा पाचवा दंडक होता. वृत्तपत्रांशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. पत्रकार व संपादक यांच्याशी ते मनमोकळेपणे बोलत.

फाळणीनंतर उद्‌भवलेला रचनात्मक प्रश्न सोडवण्यात रेल्वे खातं तेव्हा मग्न होतं. प्रवासी व मालवाहतूक-क्षमता वाढवण्यासाठी कार्यक्रम हाती घेतले जात होते. वाहतुकीचं जाळं व्यापक व सुदृढ करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज होती. नियोजन मंडळाकडे त्यांनी तशी मागणीही केली. पण अखेर तरतूद केलेल्या निधीवरच त्यांना समाधान मानावं लागलं.

रेल्वेच्या सुधारणेच्या सर्व योजनांना त्यांनी उत्तेजन दिलं. दूर अंतरावरील गाड्यांतून तिसऱ्या वर्गातील उतारूंसाठी जादा शायिकांची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली. सामान्य माणसांच्या दृष्टीनं ही महत्त्वाची सोय होती. त्यांनी भोजनालय व कंडक्टर यांची सोय असलेली जनता 'कॉरिडॉर ट्रेन' सुरू केली. त्यांच्याच काळात कमी अंतरावरील गाड्यांना पहिल्या वर्गाच्या डब्यांची जोड सोय आणि दिल्ली-मुंबई,

मद्रास व कलकत्ता या स्टेशनांदरम्यान वातानुकूलित द्रुतगतीनं धावणाऱ्या गाड्या सुरू झाल्या. तिसरा वर्ग रद्द करण्याची घोषणा त्यांनी केली. रेल्वे खात्याकडे रेल्वेवरील खानपान सेवा सोपवून त्यांनी खाद्यपदार्थांचा दर्जा सुधारला.

सेंट्रल स्टँडर्ड्स ऑफिसच्या संशोधन विभागाची फेररचना करण्यात आली. संशोधन संचालनालय लखनौ इथं स्थापण्यात आलं व त्याचं एक केंद्र चित्तरंजन इथं तर दुसरं लोणावळा इथं स्थापन करण्यात आलं. रेल्वेतील भाड्यांची फेररचना व तदनुषंगिक बाबींचा फेरविचार करण्यासाठी डॉ. रामस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली शास्त्रींनी एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशी नंतर अमलात आणण्यात आल्या. रेल्वे बोर्डात त्यांनी एक 'कार्यक्षमता विभाग' स्थापन केला. त्याच्या कामामुळं रेल्वेच्या कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचं आढळून आलं.

रेल्वेची मालमत्ता व वाहून नेला जाणारा माल यांच्या सुरक्षेत सुधारणा व्हावी म्हणून रेल्वे बोर्डावर त्यांनी एक सुरक्षा सल्लागार नेमला. त्याच्या सल्ल्यानुसार वॉच अँड वॉर्ड विभागाचं रेल्वे सुरक्षा पथकात रूपांतर करण्यात आलं. स्थानिक पोलिसांच्या मदतीनं हे पथक काम करू लागलं व सुरक्षा सुधारली. उत्तर व दक्षिण बिहारला जोडणाऱ्या गंगा पूल योजनेला त्यांनी मंजुरी दिली. त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन येथील रेल्वे कारखान्याचं उत्पादन वाढलं. तिथं दर वर्षी १२० ऐवजी २०० इंजिनांचं उत्पादन सुरू झालं.

एका बाजूला रेल्वेचा कारभार हळूहळू सुधारत असला तरी वारंवार होणाऱ्या अपघातांची जनतेला व सरकारला चिंता वाटत होती. ऑगस्ट १९५६ मध्ये मेहबूबनगर इथं भीषण रेल्वे अपघात होऊन ११२ जण ठार झाले. त्यामुळं शास्त्री बेचैन झाले. रेल्वेमंत्री या नात्यानं या अपघाताची जबाबदारी पत्करून त्यांनी मंत्रिपदाचा राजिनामा पंतप्रधानांकडे पाठवून दिला. परंतु पंतप्रधानांनी तो स्वीकारला नाही. दुर्दैवानं नोव्हेंबर १९५६ मध्ये दक्षिण भारतातील अरियालूर इथं दुसरा रेल्वे अपघात होऊन १४४ जण मरण पावले. त्याची नैतिक जबाबदारी पत्करून शास्त्रींनी पुन्हा राजिनामा दिला. या वेळी शास्त्रींनी आग्रहच धरल्यानं पं. नेहरूंना तो स्वीकारणं भाग पडलं. मंत्र्याचा तसा थेट संबंध नसूनही नैतिक जबाबदारी पत्करून कॅबिनेट मंत्र्यानं राजीनामा देण्याची ही पहिलीच घटना होती. शास्त्रींच्या राजिनाम्याबाबत निवेदन करताना पं. नेहरूंनी लोकसभेत असं सांगितलं :

*"केवळ सरकारमध्येच नव्हे तर काँग्रेस संघटनेत त्यांच्यासारखा सहकारी लाभणं हे आमचं भाग्यच. एकनिष्ठता, तत्त्वांशी बांधिलकी, सदसद्विवेक बुद्धी व कमालीचे परिश्रम करणारा असा सहकारी मिळणं अशक्य. सदसद्विवेक बुद्धी असल्यानं आपल्याकडे दिलेल्या कामात अपयश आलं तर त्याचं त्यांना अत्यंत दुःख होतं. मला त्यांच्याबद्दल अत्यंत आदर आहे. म्हणूनच भविष्यात कोठल्या ना कोठल्या स्वरूपात आम्ही एकत्र काम करीत राहू अशी मला खात्री वाटते."*

शास्त्रींच्या राजिनाम्यामुळं त्यांची नैतिक प्रतिमा अधिकच उंचावली. राजकीय वर्तनाचा नवा पायंडाच त्यांनी घालून दिला. या राजीनाम्यामुळं पं. नेहरूंशी त्यांची अधिकच जवळीक निर्माण झाली.

१९५७ मधील दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकींच्या वेळी पंडितजींनी काँग्रेस पक्षाच्या प्रचारमोहिमेच्या प्रमुखपदी शास्त्रींची नियुक्ती केली. १९५२ प्रमाणेच त्यांच्यावर पुन्हा ती जबाबदारी पडली. रात्रंदिवस त्या कामात ते गढून गेले. या खेपेस नेहरूंनी त्यांना निवडणूक लढवायला सांगितलं. अलाहाबादहून ते उभे राहिले. परंतु पक्षाच्या प्रचार-मोहिमेत गुंतल्यानं स्वतःच्या मतदार संघात त्यांना फारसं जाताच आलं नाही. तरीही ते प्रचंड बहुमतानं विजयी झाले. काँग्रेसलाही घवघवीत यश मिळालं. पूर्वीपेक्षाही संघटनेत त्यांचं महत्त्व वाढलं. पंडित नेहरूंनी त्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला. वाहतूक व दळणवळण खात्याचे मंत्री म्हणून १७ एप्रिल १९५७ रोजी त्यांचा शपथविधी झाला. (त्यानंतर लौकरच मी त्यांचा खाजगी सचिव म्हणून काम पाहू लागलो.)

भारतातील नौकानयन विकासाला, बोटी बांधण्याला त्यांनी महत्त्व दिलं. अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांच्या संमतीनं त्यांनी एक फिरता नौकानयन विकास निधी स्थापन केला. बोटी खरेदी करण्यासाठी कमी व्याजदरानं बोट कंपन्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी हा निधी होता. त्यामुळं बोट कंपन्यांना आर्थिक तणावातून मार्ग काढता आला. कर्जाच्या परतफेडीची रक्कम पुन्हा निधीत जमा केली जाऊन त्याचा वापर नवी कर्ज देण्यासाठी केला जाऊ लागला.

मुंबईच्या 'नॉटिकल अँड इंजिनियरिंग कॉलेज'मध्ये योग्य त्या शिक्षण सोयी उपलब्ध करून देण्याच्या कामी त्यांनी पुढाकार घेतला. या कॉलेजला नंतर त्यांचं नाव देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

वाहतूक व दळणवळण खात्यात शास्त्री एक वर्षाहून कमी काळ होते. त्या वेळच्या मुदंडा भानगड प्रकरणी टी. टी. कृष्णम्माचारी यांना १९५८ च्या सुरुवातीला राजीनामा देणं भाग पडलं. त्या वेळी वाणिज्य व उद्योग मंत्री असलेले मोरारजी देसाई यांची अर्थमंत्रिपदी नेमणूक करण्यात आली आणि शास्त्रींकडे वाणिज्य व उद्योग खातं सोपविण्यात आलं (२८ मार्च १९५८). या बढतीमुळं नेहरूंच्या मंत्रिमंडळातील एक महत्त्वाचं स्थान त्यांना मिळालं. देशात औद्योगिक स्वावलंबनाचा पाया घालणं व आधुनिक दृष्टीची कार्यक्षम अर्थव्यवस्था तयार करणं ही महत्त्वाची जबाबदारी त्यांना पार पाडायची होती.

उशिरापर्यंत काम करण्याचा त्यांचा परिपाठ चालूच होता. आता तर कधी रात्री दहाच्या पूर्वी त्यांचं काम संपत नसे. नेहरूंच्या कानावर ही गोष्ट गेली. एके दिवशी संध्याकाळी उशिरा त्यांनी फोन केला. अजूनही कार्यालयात काम करीत बसलेल्या शास्त्रींना त्यांनी प्रेमानं दटावलं आणि एवढ्या उशिरापर्यंत काम करीत जाऊ नका असं सांगितलं. त्या दिवशी ते लौकर घरी गेले खरे, परंतु उशिरापर्यंत काम करण्याची

त्यांची सवय बदलली नाही. वरून त्यांची प्रकृती चांगली वाटे. परंतु अतिपरिश्रमांचा परिणाम होतच होता. १९५८ मध्ये अलाहाबादच्या दौऱ्यावर असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तेथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. काही आठवड्यांत प्रकृती सुधारल्यावर ते दिल्लीला पुन्हा कामावर रुजू झाले.

निर्यातीला प्रोत्साहन देणं, नवे औद्योगिक प्रकल्प उभारणं या गोष्टींकडे ते विशेष लक्ष देऊ लागले. नव्या प्रस्तावांवर विचार करताना त्यांचा जनतेच्या कल्याणावर काय परिणाम होईल याची ते चौकशी करीत. डी. आर. मंकीकर यांनी शास्त्रींच्या या मंत्रालयातील कामाची प्रशंसा केली आहे. नेहरू सरकारची औद्योगिक धोरणं त्यांनी अमलात आणली. कंपनी कायद्याविषयीचा त्यांचा निर्णय उद्योगपतींना रुचला नाही तरी त्यांच्याविषयीचा आदर कमी झाला नाही. त्यांच्याच काळात एच. एम. टी. ची स्थापना झाली, नानगल खत कारखान्यात उत्पादन सुरू झालं. शास्त्रींनी कृषी व उद्योग यांच्या एकात्मीकरणाची योजना आखली असंही त्यांनी म्हटलं आहे.

वाणिज्य व उद्योग मंत्रालय हे मंत्र्याच्या प्रामाणिकपणाची कसोटी पाहणारं खातं. मंत्र्याला मुबलक अधिकार असतात आणि कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प मंजुरीसाठी त्यांच्याकडे येत असतात. अशा या मंत्रालयात सुद्धा शास्त्रींचं वर्तन निष्कलंक सचोटीचं होतं.

१९६१ च्या आरंभी गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत हे आजारी पडले, तेव्हा पं. नेहरूंनी २५ फेब्रुवारी १९६१ रोजी गृह खात्याचा अतिरिक्त कारभार शास्त्रींकडे सोपवला. पंतांची प्रकृती आणखीच बिघडली व एप्रिलमध्ये त्यांचं निधन झालं. तेव्हा शास्त्रींची नवे गृहमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली.

अन्य मंत्र्यांच्या तुलनेनं शास्त्री यांची आगेकूच झपाट्यानं होत होती. केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंधांची जबाबदारी आता त्यांच्यावर आली. त्यामुळं राज्यपाल, मुख्य मंत्री यांच्याशी सतत संपर्क साधावा लागे. सरकारी नोकरशाही व देशाचं सर्वसाधारण प्रशासन ही त्यांच्या देखरेखीखाली आली.

शास्त्री यांनी गृहमंत्रिपदाची सूत्रं हाती घेतली तेव्हा आसाममध्ये भाषेच्या प्रश्नावरून आंदोलन धडधडत होतं. सरकारी कामकाजात आसामी, बंगाली व इंग्रजी या भाषांचा वापर होत होता, परंतु आसाम साहित्य सभेनं आसामी ही राजभाषा घोषित करावी अशी मागणी केली. हे आंदोलन विशेषतः बंगाली भाषकांविरुद्ध होतं. एप्रिल व जुलै या दोन महिन्यांत तिकडे भाषिक दंगे उसळून बरेच जण मृत्युमुखी पडले. अखेर राज्य सरकारनं कायदा करून आसामीला राजभाषेचं स्थान दिलं. त्यामुळं बंगाली भाषकांनी आपल्या भाषेला अतिरिक्त दर्जा मिळावा म्हणून आंदोलन सुरू केलं व मे ६१ मध्ये पुन्हा भाषिक दंगे उसळले.

या पार्श्वभूमीवर शास्त्रींनी आसामला भेट द्यायचं ठरवलं. ३१ मे १९६१ रोजी ते गोहाटीला पोचले. आसामी व बंगाली भाषांच्या प्रतिनिधींशी त्यांनी वाटाघाटी केल्या आणि उभयतांना समाधानकारक तोडगा काढला. या 'शास्त्री' तोडग्यानुसार इंग्रजी,

आसामी व बंगाली या तिन्ही भाषांचा वापर केला जाणार होता. काचार जिल्ह्यात बंगाली भाषकांची सर्वाधिक वस्ती होती. तेव्हा काचार जिल्हा व आसामची राजधानी या ठिकाणी इंग्रजीत पत्रव्यवहार करावा, बंगालीला प्राधान्य दिलं जाईल, जिल्हा कार्यालय, शाळा यांतून आसामीतून व बंगालीतून व्यवहार केले जातील असं या तोडग्याचं स्वरूप होते.

अकाली दलाचे मास्टर तारासिंग यांनी ऑगस्ट १९६१ मध्ये स्वतंत्र पंजाबी सुभ्यासाठी आंदोलन सुरू केलं. तेव्हा शास्त्रींनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश एस. आर. दास. यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोगाची नियुक्ती केली. सी. आर. रामस्वामी अय्यर व एम. सी. छगला या आयोगाचे सदस्य होते. पंजाबमधील शिखांच्या बाबतीत पक्षपात केला जात नाही, पंजाबात व पंजाबबाहेर शिखांना सन्मानानंच वागवलं जातं, असा स्पष्ट निर्वाळा या आयोगानं दिला. मास्टर तारासिंग यांचं उपोषण अठ्ठेचाळीस दिवस चाललं, परंतु ते निष्फळ ठरलं. शास्त्रींनी खंबीरपणं हा प्रश्न हाताळला त्याचं ते फळ होतं.

फुटीर प्रवृत्तींना वाव मिळू नये, राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्वांनी झटावं या हेतूनं सर्व पक्षांची राष्ट्रीय एकात्मता परिषद २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर १९६१ पर्यंत दिल्ली इथे शास्त्रींनी आयोजित केली. पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या परिषदेत सर्व राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता संमत करण्यात आली. मतभेदांना खतपाणी न घालणं, हिंसेला चिथावणी न देणं, जमाती-जमातीत कटुता वाढेल अशी आंदोलनं न करणं आदी कलमं या संहितेत होती. हिंदीचा सर्वांना जोडणारी राष्ट्रभाषा म्हणून विकास व्हावा, परंतु इंग्रजीचा माध्यम म्हणून वापर चालू राहावा असंही या परिषदेत ठरलं

राष्ट्रीय एकात्मता परिषदेतील भाषाविषयक निर्णयानं दक्षिणेतील राज्यांचं समाधान झालं नाही आणि हिंदीविरोधी आंदोलनाचे ढग जमू लागले. घटनेतील ३४१ व्या कलमानुसार जानेवारी १९६५ पासून हिंदीचा वापर करण्यास या राज्यांची तयारी नव्हती. आपल्या इच्छेविरुद्ध हिंदी लादण्यात येऊ नये अशी त्यांची मागणी होती. इंग्रजीच्या वापराला अनिश्चित कालपर्यंत मुदतवाढ दिली जावी असं त्यांचं म्हणणं होतं. सप्टेंबर १९६२ मध्ये तिरुपती इथे भरलेल्या पाचव्या अखिल भारतीय युवक परिषदेपुढं बोलताना शास्त्री म्हणाले, "जोवर हिंदीची पुरेशी वाढ होत नाही व जनता जोवर ती नीट आत्मसात करीत नाही तोवर प्रशासनात व व्यापारात, राज्या-राज्यात माध्यमासाठी इंग्रजीखेरीज दुसरी भाषा नाही. देशातील सर्व राज्यांत इंग्रजीचा वापर केला जातो." शास्त्रींनी दिलेली ही आश्वासनं १९६३ च्या राजभाषा कायद्यात अंतर्भूत करण्यात आली.

ऑक्टोबर १९६२ मध्ये चीननं भारतावर आक्रमण केलं व देशात आणीबाणी लागू करण्यात आली. गृहमंत्री या नात्यानं शास्त्रींवरच आणीबाणी अमलात आणण्याची जबाबदारी होती. या आणीबाणीत सरकारनं अनेक अधिकार स्वतःकडे घेतले असले

तरी लोकांच्या स्वातंत्र्याला धक्का पोचणार नाही अशी काळजी शास्त्रींनी घेतली. काही अतिरेकी कम्युनिस्टांवर कारवाई करण्यात आली इतकंच. डिसेंबर १९६२ मध्ये चीननं फौजा काढून घेतल्या तरी भारतात आणीबाणी काही काळ चालूच ठेवण्यात आली होती. शास्त्रींचा बराच वेळ त्यासंबंधीच्या कामात जाई.

देशातील प्रशासन कार्यक्षम बनवण्याच्या दृष्टीनं आपल्या काही कल्पनांचा पाठपुरावा करण्याचं शास्त्रींनी ठरवलं. देशातील राजकीय व आर्थिक सत्ता ही काही राजकीय नेते आणि काही सरकारी अधिकारी यांच्या हातात केंद्रित झालेली होती. ज्येष्ठ सनदी अधिकारीही लवकर बढती मिळावी, आपल्या आवडीच्या जागी बदली व्हावी म्हणून नेत्यांच्या मर्जीनुसार वागू लागले होते. शास्त्रींनी जून १९६३ मध्ये प्रशासनातील मूलभूत बाबींबद्दल एक टाचण तयार केलं. लाल फितीचा कारभार कमी व्हावा म्हणून अमेरिकेच्या धर्तीवर एक उच्चस्तरीय आयोग स्थापावा असं त्यांनी त्यात सुचवलं होतं.

"सरकारी कर्मचाऱ्यांतील बेशिस्त वाढत असून त्याला वेळीच पायबंद घालायला हवा. कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रभावी व कडक कारवाई एवढ्यापुरतीच उपाययोजना मर्यादित असता कामा नये, कारण प्रश्न सोडवण्याचा तो खरा मार्ग नव्हे. अधिकारी व कर्मचारी यांच्यात चर्चा होईल असं व्यासपीठ निर्मिलं पाहिजे. केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी देखील बढतीसाठी वा छोट्याछोट्या गोष्टींसाठी 'कॅनव्हासिंग' करताना दिसतात. त्याचा परिणाम त्यांच्याच नव्हे तर त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांच्या नैतिक धैर्यावर होत असतो. तेव्हा याविरुद्ध प्रभावी कारवाईचा विचार व्हायला हवा. मंत्री व अधिकारी यांच्या संबंधांबाबत काही तत्त्वं ठरवून द्यायला हवीत. अधिकाऱ्यांना आपली मतं स्पष्टपणं मांडता आली पाहिजेत. परंतु अखेर त्यांनी मंत्र्याचे आदेश पाळायला हवेत. मंत्र्यांनी आचारसंहिता स्वीकारावी. त्यांनी तोंडी आदेश वा सूचना देणं टाळावं. तसंच अधिकाऱ्यांनी गटबाजीच्या राजकारणातून दूर राहावं." असं शास्त्रींनी या टाचणात नमूद केलं होतं.

सरकारी निर्णयप्रक्रिया ही फारच मंद बनली होती व त्यात भ्रष्टाचार फोफावत होता. सनदी सेवेत कार्यक्षमता असली व कर्मचाऱ्यांत देशभक्तीचा दृष्टिकोन असला तरी या सेवेत सुधारणांची गरज होती. त्याकरिता एक उच्चस्तरीय यंत्रणा नेमण्याचा शास्त्रींचा विचार होता. परंतु तेवढ्यात वयस्क नेत्यांना 'खाली बसवणारी' कामराज योजना पुढं आली. त्यांना राजीनामा द्यावा लागल्यानं हा विचार मागं पडला. पुढं स्वतः पंतप्रधान झाल्यावर त्यांनी या विषयाला पुन्हा चालना दिली व ५ जानेवारी १९६६ रोजी मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणा आयोगाची नियुक्ती केली.

सरकारमधील वाढत्या भ्रष्टाचाराकडे त्यांनी विशेष लक्ष दिलं. सरकारी अधिकाऱ्यांसाठी कडक आचारसंहिता होतीच. तसंच फेब्रुवारी १९६३ मध्ये सी. बी. आय.ची स्थापना करण्यात आली होती. प्रशासकीय व राजकीय पातळीवरील भ्रष्टाचाराच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी शास्त्रींनी संथानम समिती स्थापन केली. तिनं केलेल्या शिफारशींनुसार

मंत्र्यांसाठी आचारसंहिता तयार करण्यात आली.

आतापावेतो परराष्ट्र संबंध या विषयाशी शास्त्रींचा संबंध आला नव्हता. वाणिज्य मंत्री असतानाही ते कधी परदेशी गेले नव्हते. पंडित नेहरूंनी त्यांना मार्च १९६३-मध्ये नेपाळला पाठवलं. चीन व पाकिस्तान यांच्या बाजूला नेपाळ झुकत आहे अशी चिन्हं दिसू लागली होती. तेव्हा नेपाळशी भारताचे संबंध सुधारावेत म्हणून शास्त्रींना पाठवण्यात आलं होतं. नेपाळी वृत्तपत्रांनी काहीशा अविश्वासाच्या सुरातच भारताच्या गृहमंत्र्यांचं स्वागत केलं. परंतु शास्त्रींनी आपल्या सौजन्यपूर्ण वागणुकीनं त्यांचं मन जिंकलं.

राजे महेन्द्र यांनी शास्त्रींचं प्रेमानं स्वागत केलं. उभयतांत दोन वेळा चर्चा झाली. नेपाळचे पंतप्रधान तुलसी गिरी व गृहमंत्री विश्वबंधू थापा यांच्या भेटी त्यांनी घेतल्या. आपल्या छोट्या शेजाऱ्याच्या सार्वभौमत्वाची फिकीर न करता भारत 'बिग ब्रदर'-सारखी वागणूक नेपाळला देऊ पाहत आहे असा समज निर्माण झालेला होता. तो दूर करणं हे शास्त्रींचं काम होतं व त्यात ते बरेचसे यशस्वीही झाले. त्यांच्या भेटीच्या अखेरीस काढण्यात आलेल्या पत्रकात भारत व नेपाळ यांच्यामधील भौगोलिक, सांस्कृतिक व पारंपरिक नातं अतूट आहे, यावर भर दिलेला होता. नेपाळ चीनकडे झुकत आहे का? असा प्रश्न एका पत्रकारानं विचारला असता शास्त्री स्पष्टपणं उत्तरले, "आपलं धोरण व कृती ही कशी असावी हे सर्वस्वी नेपाळनंच ठरवायचं आहे."

पुढं उभय देशांत सलोख्याचे संबंध निर्माण झाले व शास्त्रींची पहिली परराष्ट्रीय कामगिरी यशस्वी झाली.

एका बाजूला चिनी आक्रमणाच्या धक्क्यातून देश सावरत असताना दुसऱ्या बाजूला काँग्रेस हा जनतेची सेवा करणारा पक्ष आहे ही प्रतिमा ढासळत चालली होती, याबद्दल ज्येष्ठ नेत्यांना चिंता वाटत होती. काँग्रेसचा मोठ्या प्रमाणावर असलेला प्रभाव लोप पावू लागला आहे, अशी शंका व्यक्त केली जाऊ लागली. पक्षातील ज्येष्ठ नेते मंत्री झाले होते व संघटनात्मक कार्य ज्यांना फारशी प्रतिष्ठा नाही अशांच्या हाती सोपवलं गेलं होतं.

या संदर्भात तमिळनाडूचे मुख्य मंत्री के. कामराज यांनी काँग्रेस कार्यकारिणीपुढं एक प्रस्ताव सादर केला. काही मुख्य मंत्री व केंद्रीय मंत्रिमंडळातील काही ज्येष्ठ मंत्री यांनी राजीनामे देऊन पक्षकार्यास वाहून घ्यावं अशी ही 'कामराज योजना' होती. कार्यकारिणीनं या प्रस्तावाचं स्वागत केलं व नवी दिल्ली इथे १० ऑगस्ट १९६३ रोजी भरलेल्या बैठकीत त्याला एकमतानं मंजुरी दिली.

पं. नेहरूंच्या सल्ल्यानुसार सहा मुख्य मंत्री व सहा केंद्रीय मंत्री यांची संघटनात्मक कार्य करण्यासाठी पक्ष कार्यकारिणीने २४ ऑगस्ट १९६३ रोजी यादी तयार केली. त्यांचे राजीनामे मंजूर करण्यात आले. त्यातील केंद्रीय मंत्री पुढीलप्रमाणे– मोरारजी देसाई (अर्थ), जगजीवन राम (वाहतूक व दळणवळण), लालबहादुर शास्त्री (गृह),

स. का. पाटील (अन्न व कृषी), बी. गोपाल रेड्डी ( माहिती व नभोवाणी), के. एल. श्रीमाळी (शिक्षण). मुळात या यादीत पं. नेहरूंनी शास्त्रींच्या नावाचा समावेश केला नव्हता. पण शास्त्रींनीच त्याचा आग्रह धरला म्हणून शेवटी त्यांचाही अंतर्भाव करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षात झालेला हा फार मोठा फेरबदल होता. त्यामुळं देशात आश्चर्याची लाट उसळली. काँग्रेसमधील सर्वोच्च नेत्यांनी आपापल्या पदांवरून निवृत्त होऊन संघटनेमार्फत वा अन्य प्रकारे लोकांची सेवा करावी असा याचा अर्थ आहे असं पं. नेहरूंनी या प्रस्तावाचं समर्थन करताना म्हटलं होतं.

अशा तऱ्हेनं गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यावर शास्त्री यांची पक्षाच्या संसदीय मंडळावर त्याचप्रमाणं संघटनात्मक समितीवर नियुक्ती झाली. शास्त्रींनी आता पक्षकार्याला पूर्णतः वाहून घेतलं.

कामराज योजनेचं सर्वसाधारणतः देशभर स्वागत झालं. परंतु ही योजना दिसते तितकी साधी नाही, असं काही टीकाकारांचं म्हणणं होतं. गैरसोयीच्या ज्येष्ठ मंत्र्यांना काढून टाकण्याची ही युक्ती आहे असंही सुचवलं जाऊ लागलं. शास्त्रींच्या बाबतीत मात्र हे मुळीच खरं नव्हतं. ''आपण वारंवार आग्रह धरला तेव्हा अखेर नेहरू माझा राजीनामा स्वीकारायला तयार झाले,'' असं खुद्द शास्त्रींनीच मला सांगितलं होतं.

काँग्रेस पक्षाच्या कार्यासाठी शास्त्रींचे देशभर दौरे सुरू झाले. एकदा ते मुंबईमार्गे दक्षिणेत चालले होते. मी त्यांना नेहमीप्रमाणं विमानतळावर भेटायला गेलो. त्यांचं विमान उशिरानं सुटणार होतं, तेव्हा मी त्यांना घरी चलण्याची विनंती केली. ते तत्काळ तयार झाले. त्या वेळी निर्मला मुंबईबाहेर गेली होती. नाही तर तिनं त्यांच्यासाठी भोजन तयार ठेवलं असतं. मी त्यांना चहा आणि फळं एवढंच देऊ शकलो. त्यांचं वागणं पाहून मूर्तिमंत विनम्रता आपल्या घरी येऊन गेल्याचा प्रत्यय आला. मी त्यांना भावी घडामोडींबद्दल विचारलं तेव्हा ते म्हणाले, ''सध्या मला पक्षासाठी काम करण्याची पुन्हा संधी मिळाली आहे. खूप काम करायची गरज आहे. पुढं काय होणार हे मला ठाऊक नाही.'' त्यांनी थोडा वेळ आराम केला व आम्ही परत विमानतळावर गेलो.

पक्षाच्या पुनर्रचनेच्या त्या काळात पक्षाध्यक्ष डी. संजीवय्या यांच्यानंतर त्या पदावर कोणाची निवड करावी याला महत्त्व आलं होतं. राज्यातील नेते आपापसात व पं. नेहरूंशी त्याबाबत चर्चा करीत होते. के. कामराज यांची निवड करावी असं सर्वानुमते ठरलं. कामराज एकनिष्ठ, देशभक्त, हुशार, समंजस व निर्णय घेणारे होते. ९ ऑक्टोबर रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. पश्चिम बंगालचे नेते अतुल्य घोष यांनी काँग्रेस श्रेष्ठींनीच कामराज यांचं नाव सुचवावं असा प्रस्ताव मांडला व तो मान्य करण्याचं अनौपचारिक रीत्या ठरलं. निवडणूक प्रक्रिया जाहीर झाली. कामराज एकमेव उमेदवार असल्यानं त्यांची २७ नोव्हेंबर १९६३ रोजी बिनविरोध निवड झाली. भुवनेश्वर इथे जानेवारी ६४ मध्ये काँग्रेसचं ६८ वं वार्षिक अधिवेशन भरलं. तिथे संजीवय्या यांच्याकडून कामराज यांनी सूत्रं हाती घेतली.

काँग्रेसचं खुलं अधिवेशन ९ व १० जानेवारी रोजी भरणार असलं तरी विषयनियामक समितीच्या व अन्य समित्यांच्या बैठकींसाठी आधीपासूनच प्रतिनिधी भुवनेश्वरला येऊन दाखल होत होते. पं. नेहरू ६ जानेवारीलाच आले होते. परंतु ७ जानेवारीला त्यांना हृदयविकाराचा झटका आला. साऱ्या अधिवेशनावरच चिंतेचं सावट पसरलं. नेहरूंच्या आजारपणाचं वृत्त विषयनियामक समितीला देण्याची जबाबदारी पक्षाध्यक्षांनी शास्त्रींवर टाकली. नेहरूंची प्रकृती बरी नसल्यानं ते बैठकीत येऊ शकले नाहीत असं त्यांनी सांगितलं. डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीबाबत काढलेलं पत्रक त्यांनी वाचून दाखवलं. त्यात "पंतप्रधान प्रसन्न व चांगल्या मूडमध्ये आहेत" असं म्हटलं होतं. "पंतप्रधान इथे येण्यास उत्सुक होते, परंतु आम्हीच त्यांना रोखलं," असंही शास्त्रींनी सांगितलं.

यापूर्वी ज्याची कल्पनाच कुणी केली नव्हती असा "नेहरूंनंतर कोण," हा प्रश्न आता अचानक अनेकांच्या मनात रेंगाळू लागला.

विषय नियामक समितीच्या बैठकीत लोकशाही व समाजवाद हा महत्त्वपूर्ण ठराव मांडण्याची जबाबदारी गुलझारीलाल नंदा यांच्यावर पडली नाही. नेहरूंनंतर सर्वांत महत्त्वाचं स्थान असलेल्या मोरारजी देसाई यांच्यावरही पडली नाही. ती सोपवण्यात आली लालबहादुर शास्त्रींवर.

हा ठराव त्यांनी राजकीय कौशल्यानं मांडला. सामान्य माणसाच्या कल्याणाला वाहिलेलं धोरण म्हणजे लोकशाही व समाजवाद असं ते म्हणाले. हा ठराव पं. नेहरूंच्या देखरेखीखालीच त्यांनी तयार केला होता. ठरावावर सत्तर वक्त्यांची भाषणं झाली. १० जानेवारी १९६४ रोजी तो मंजूर झाला. प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य मिळण्याला अग्रक्रम दिला जाईल असं या ठरावात म्हटलं होतं.

पक्षाध्यक्ष के. कामराज यांनी ११ जानेवारी रोजी कार्यकारिणीच्या सदस्यांची नावं जाहीर केली. त्यांत शास्त्री, मोरारजी देसाई, जगजीवन राम, स. का. पाटील, डी. संजीवय्या, एन. संजीव रेड्डी, अतुल्य घोष, फक्रुद्दिन अली अहमद, एस. निजलिंगप्पा व गुलझारीलाल नंदा यांचा समावेश होता. पं. नेहरू हजर असलेलं ते अखेरचं अधिवेशन ठरलं. पं. नेहरूंनंतर शास्त्री पंतप्रधान बनतील अशी चिन्हं या अधिवेशनाच्या अखेरीस दिसू लागली होती.

भुवनेश्वर इथेच पं. नेहरूंनी शास्त्रींना त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील करून घेण्याचा आपला मनोदय सांगितला. शास्त्रींनी होकार दिला. त्या वेळी उभयतांत झालेला पुढील छोटा पण अर्थपूर्ण संवाद मला खुद्द शास्त्रींनीच सांगितला होता.

शास्त्री : *मुझे क्या काम करना होगा?*

नेहरू : *तुम्हें मेरा सब काम करना होगा!*

प्रथम बिनखात्याचे मंत्री म्हणून शास्त्री यांची नियुक्ती करण्यात आली. ही घोषणा राष्ट्रपती भवनानं एक पत्रक काढून २२ जानेवारी रोजी केली. या पत्रकानुसार पंतप्रधानांनी पुढील आदेश जारी केला : "परराष्ट्र मंत्रालय, अणुशक्ती विभाग व मंत्रिमंडळ

सचिवालय यांच्याकडून पंतप्रधानांकडे येणारी कागदपत्रं बिनखात्याचे मंत्री पाहतील. आवश्यक तिथे ते पंतप्रधानांकडून विशिष्ट प्रकरणांत आदेश घेतील.''

पंतप्रधानांच्या साउथ ब्लॉकमधील दालनाजवळच शास्त्रींना कार्यालय देण्यात आलं. मात्र काही फायली शास्त्रींकडे तर काही त्यांना डावलून थेट पंतप्रधानांकडे पाठविल्या जाऊ लागल्या. बिनखात्याच्या मंत्र्यांचे अधिकार मर्यादित असतात, त्यांना स्वतः कोणत्याही बाबतीत पुढाकार घेण्यास वाव नसतो, असं मत राजकीय वर्तुळात व्यक्त केलं जाऊ लागलं. नव्या कामगिरीचं आव्हान तर सोडाच, शास्त्रींना पुरेसं कामही नव्हतं. पंतप्रधानांनी भुवनेश्वर इथे जे सांगितलं होतं त्यानुसारही घडत नव्हतं. पंतप्रधान अजून आजारी होते. त्यामुळं त्या संबंधात शास्त्री यांनी त्यांच्यापाशी चकार शब्दही काढला नाही. अर्थात आव्हानात्मक काम मिळण्यासाठी त्यांना फार काळ वाट पाहावी लागली नाही.

श्रीनगरमधील हजरतबल मशिदीत तीनशे वर्षं जतन करून ठेवलेला प्रेषित मोहम्मद यांचा पवित्र केस २६ डिसेंबर १९६३ रोजी चोरीस गेला. प्रेषिताच्या काळापासून वडिलांकडून मुलाकडे हा केस दिला जातो. तो मदिनाचे प्रशासक (मुतालिक) सय्यद अब्दुल्ला यांच्याकडे पोचला. १६३४ साली सय्यद अब्दुल्ला तो पवित्र केस घेऊन विजापूरला आले. सतराव्या शतकाच्या अखेरीस औरंगजेबानं तो अब्दुल्लांच्या वारसाकडून ताब्यात घेतला. औरंगजेबाला एक स्वप्न पडलं व तो केस काश्मीरला पाठवावा ही त्याच्या वारसाची अपुरी इच्छा त्यानं पुरी केली. अशा प्रकारे हा केस हजरतबल इथे नेण्यात आला व त्याला ऐतिहासिक, धार्मिक स्थळाचं महत्त्व प्राप्त झालं. तो केस पळवण्यात आल्यानं जनता प्रक्षुब्ध झाली. हिंदू व मुस्लीम दोघांनीही निदर्शनं केली. भारतात जातीय दंगल व्हावी म्हणून टपून बसलेल्या पाकिस्ताननं आपल्या कारवायांना केलेली ही सुरुवात होती. सी. बी. आय. कडे हे प्रकरण सोपवून त्या केसाचा त्वरित छडा लावायला सांगण्यात आलं.

या प्रकरणामुळं पं. नेहरू यांची झोप उडाली. सुदैवानं आठ दिवसांनी म्हणजे ४ जानेवारी १९६४ रोजी हा केस त्या मशिदीत पुन्हा आणून ठेवलेला सापडला. गृहसचिव व्ही. विश्वनाथन यांनी श्रीनगरला भेट दिली. गुन्हेगारांनी सी. बी. आय. च्या ससेमिऱ्याला घाबरून केस पुन्हा जागच्या जागी आणून ठेवला, असं त्यांनी सांगितलं. नेहरूंच्या मनावरचा ताण जाऊन त्यांना हायसं वाटलं.

परंतु परिस्थिती काही लगेच निवळली नाही. त्या केसाच्या खरेपणाबद्दल अनेकांनी निर्वाळा दिल्याचं विश्वनाथन यांनी जाहीर केलं होतं. तरीही स्थानिक कृती समितीचं समाधान झालं नाही. आमच्या सदस्यांना व तज्ज्ञांना त्याचं खास 'दीदार' (दर्शन) घडवावं असा आग्रह समितीनं धरला. परंतु सरकारविरुद्ध जनतेला चिथावणी देण्याची ही एक चाल आहे असा आरोप करून राज्य सरकारनं ही मागणी फेटाळून लावली. विश्वनाथन यांचंही तसंच मत होतं. आंदोलन वाढू लागलं. लंडनच्या 'द टाइम्स'च्या २७ जानेवारी १९६४ च्या अंकात म्हटलं होतं :

*"या आठवड्याअखेर श्रीनगरमध्ये पुन्हा दंगलीचा उद्रेक झाला. काल प्रक्षुब्ध जमावावर पोलिसांना वारंवार गोळीबार करावा लागला. त्यात चार जण ठार झाल्याचे अधिकृत रीत्या सांगण्यात आले. गेल्या महिन्यात हजरतबल येथून चोरीला गेलेला केस परत मिळाला नसून त्याच्या जागी ठेवलेला केस बनावट आहे अशी शंका निदर्शक व्यक्त करीत आहेत. श्रीनगरमध्ये हरताळ पुकारण्यात आला असून राज्याचे पूर्वीचे मुख्य मंत्री बक्षी गुलाम मोहम्मद हे आंदोलकांच्या टीकेचे लक्ष्य होते. परंतु आता त्यांचे वारसदार शम्सुद्दिन व सबंध नॅशनल कॉन्फरन्स पार्टी यांच्यावरच त्यांचा राग आहे. केंद्र सरकारने बक्षी व त्यांचा पक्ष यांना पाठिंबा दिला असल्याने भारत सरकारच आंदोलकांच्या टीकेचे लक्ष्य बनण्याचा धोका आहे."*

पं. नेहरूंनी शास्त्रींना काश्मीरची परिस्थिती हाताळण्यास सांगितलं. त्यांना त्याबाबत पूर्ण स्वातंत्र्य दिलं. श्रीनगरमध्ये कडाक्याची थंडी होती. तेव्हा पं. नेहरूंनी शास्त्रींना आपला ओव्हरकोट दिला. शास्त्री लष्कराच्या विमानानं ३० जानेवारी १९६४ रोजी श्रीनगरला गेले. लंडनच्या 'टाइम्स'नं १ फेब्रुवारी ६४ च्या अंकात लिहिलं : "काश्मीरमधील अनिश्चित परिस्थितीची किती गांभीर्यानं केंद्र सरकार दखल घेत आहे हेच या आकस्मिक निर्णयानं दिसून येतं. परिस्थिती निवळण्यासाठी दिल्लीहूनच तोडगा काढावा लागेल. शास्त्री यांच्या नाट्यपूर्ण आगमनानं हेच सिद्ध होतं..."

राजकारणाशी काहीही संबंध नसलेल्या भक्तांच्या पॅनेलनं पवित्र केसाच्या खरेपणाची खात्री द्यावी, अन्यथा दंगली होणारच असं आंदोलकांच्या नेत्यांनी शास्त्रींना सांगितलं. गृहसचिव विश्वनाथन हे कार्यक्षम व खंबीर प्रशासक होते. त्यांनी निदर्शकांची ही मागणी स्वीकारू नये असा सल्ला दिला. राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांचंही तसंच म्हणणं होतं. शास्त्रींनी त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं, पण कृती समितीच्या सदस्यांशी चर्चा करूनच निर्णय घ्यायचं ठरवलं. त्यांनी थेट कृती समितीशीच वाटाघाटी केल्या. समितीचे सदस्य मौलाना मोहम्मद सईद मसूदी हे जबाबदार सदस्य आहेत असं त्यांना वाटलं, म्हणून त्यांच्याशी त्यांनी विशेष चर्चा केली. कृती समितीला पवित्र अवशेषाची खरंच शहानिशा करायची आहे की राजकीय कारणासाठी तो बनावट ठरवून धोकादायक परिस्थिती निर्माण करायची आहे हा प्रश्न होता. यात राजकीय हेतू आहे असा विश्वनाथन व अन्य अधिकाऱ्यांना संशय होता व त्यामुळं केसाचं खास 'दीदार' करू नये असं त्यांचं म्हणणं होतं.

अवशेष खरा असण्याची शक्यता अधिक आहे या निष्कर्षाप्रत शास्त्री आले. कोणीही मुस्लीम भक्त राजकीय कारणासाठी हा अवशेष बनावट ठरवण्याचा धोका पत्करणार नाही. त्यामुळं खोडसाळ मत दिलं जाण्याची शक्यता नाही, असं त्यांना वाटत होतं. अर्थात तरीही भावना भडकवल्या जाण्याचा धोका होता. परंतु मौलाना मसूदी व इतर काहींनी राजकारण खेळलं जाणार नाही असं आश्वासन दिलं होतं. तेव्हा विश्वनाथन प्रभृतींचा सल्ला डावलून ३ फेब्रुवारी रोजी त्या अवशेषाचं खास दर्शन

करण्याचं शास्त्रींनी ठरवलं. तसंच अवशेष तपासणाऱ्या मौलवींच्या पथकात कृती समितीच्या सदस्यांचा अंतर्भाव करण्याचंही त्यांनी मान्य केलं.

३ फेब्रुवारी १९६४ रोजी 'दीदार' चा कार्यक्रम झाला. त्याचा लंडनच्या 'डेली टेलिग्राफ'चा प्रतिनिधी रॉले नॉक्स यानं पाठवलेला वृत्तांत असा होता :

*"हजरतबल येथील हरवलेला व पुन्हा सापडलेला प्रेषित महंमदाचा पवित्र अवशेष खरा आहे असा निर्वाळा मौलवींनी दिला आहे.*

*तलावाच्या काठावर असलेल्या या मशिदीभोवती मौलवी, भक्त, सर्वसामान्य लोक व सैनिक यांची गर्दी उसळली होती. मागच्या बाजूला भारताचे बिनखात्याचे मंत्री लालबहादुर शास्त्री उभे होते. अधिकाऱ्यांचा सल्ला झुगारून ते अवेशषाची तपासणी करण्याचा जुगार खेळले होते.*

*रुपेरी झाकणाच्या कुपीत ठेवलेला तीन इंच लांबीचा केस गेल्या २६ डिसेंबरला गायब झाला होता. त्यानंतर उद्भवलेल्या दंगलीत दोन जण ठार झाले. आठ दिवसांनंतर मशिदीतच हा केस सापडला.*

*पोलिसांच्या व सैनिकांच्या तुकड्या प्रत्येक रस्त्यावर आज गस्त घालत होत्या व सर्वत्र तणावाचं वातावरण होतं.*

*मशिदीत कुपी ठेवलेली डबी उघडण्याचा क्षण आला तेव्हा प्रमुख मौलवींचे हात इतके थरथरू लागले की त्यांना सहकाऱ्यांची मदत घ्यावी लागली. प्रार्थनेचे आवाज सतत घुमत होते व त्यांचं हुंदक्यांत रूपांतर होत होतं.*

*त्यानंतर डबीतील हिरवी थैली काढून त्यातील कुपी बाहेर काढण्यात आली. प्रत्येक मौलवींनं अवशेषाचं उजेडात निरीक्षण करून होकारार्थी मान डोलावली. मशिदीतील व बाहेरील जमावानं सुटकेचा निःश्वास टाकला, आनंदाची लाट उसळली. गुरुवारी हा अवशेष सार्वजनिक दर्शनासाठी ठेवला जाणार आहे."*

त्या दिवशी शास्त्री हे हीरो होते. लोकांनी त्यांना गराडाच घातला. अनेक जणांनी आपलं समाधान व कृतज्ञता व्यक्त केली. शास्त्रींनी व्यक्तिशः एकशे एक रुपये देणगी दिली, त्याचं कौतुक झालं.

त्याच दिवशी सायंकाळी शास्त्री दिल्लीला परतले व त्यांनी तत्काळ पंतप्रधानांकडे जाऊन अहवाल दिला. नंतर जम्मू-काश्मीरचे सदरे रियासत डॉ. करणसिंग यांची भेट घेऊन काश्मीरमधील स्थितीची त्यांनी तपशीलवार चर्चा केली.

शास्त्रींच्या यशाचं संसदेनं, वृत्तपत्रांनी कौतुक केलं. त्या वेळचे प्रख्यात राजकीय भाष्यकार के. रंगास्वामी यांनी लिहिलं होतं :

*"लालबहादुर शास्त्री हे काँग्रेस पक्षाचे पेचप्रसंग सोडवणारे यशस्वी नेते आहेत. काही वर्षांपूर्वी त्यांच्यावर पंजाब व आसाम येथील भाषिक प्रश्न सोडवण्याची जबाबदारी सोपविली होती. प्रेषिताचा पवित्र अवशेष गायब झाल्यावर काश्मीरमध्ये*

*उद्‌भवलेला पेचप्रसंग सोडवण्यासाठी त्यांना पंतप्रधानांनी पाठवलं. तो निखालसपणे सोडवून त्यांनी आपल्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला आहे. विरोधकांशी सुद्धा न्यायबुद्धीनं, सहिष्णुतेनं व समंजसपणं वागणं हा त्यांचा गुण आहे. त्यामुळंच काश्मीरमधील सर्व गटांचा विश्वास त्यांनी संपादन केला आणि गृहमंत्री व त्यांचे सल्लागार यांचं अनुकूल मत नसतानाही अवशेषाची छाननी करू देण्याचा धोका पत्करला. तो लाभदायक ठरला. मुस्लीम भक्तांनी अवशेष खरा असल्याची ग्वाही दिली. या वादातील धार्मिक पैलू निकालात निघाला. हा पैलू राजकारणापासून अलग करण्यात शास्त्रींना यश आलं. केंद्रीय गृहमंत्रालयाला हेच साध्य करायचं होतं.''*

धार्मिक वाद मिटला असला तरी राजकीय प्रश्न सोडवायचा होता. बक्षी गुलाम मोहम्मद यांचा वारस शम्सुद्दिन याच्यावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही, तेव्हा नेतृत्वात बदल करणं अत्यावश्यक आहे असं शास्त्रींचं मत होतं. परंतु केंद्रानं आदेश देऊन बदल घडवून आणण्यापेक्षा स्थानिक पुढाऱ्यांचं मन वळवून त्यांना हे साध्य करायचं होतं. त्यासाठी २० फेब्रुवारीला शास्त्री जम्मूला गेले. करणसिंग, शम्सुद्दिन, जी. एम. सादिक व मीर कासीम यांच्याशी त्यांनी चर्चा केली. त्यांच्या प्रयत्नांना यश आलं. शम्सुद्दिन यांनी जम्मू-काश्मीरच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला व जी. एम. सादिक यांची त्या जागी निवड झाली. बक्षी गुलाम मोहम्मद यांचा पगडा कमी करण्याचं धैर्य पं. नेहरूंनाही होत नव्हतं; ते लालबहादुर शास्त्री यांनी करून दाखवलं, असे उद्गार डी. आर. मंकीकर यांनी काढले. भारतीय वृत्तपत्रांनीही शास्त्रींच्या या कामगिरीची प्रशंसा केली.

शेख मोहम्मद अब्दुल्ला यांना बराच काळ स्थानबद्धतेत ठेवलेलं होतं. त्यांची सुटका करावी अशी काश्मिरी जनतेची मागणी होती. शास्त्रींनी त्याबाबत पं. नेहरूंचं मन वळवलं. काश्मीरचे नवे पंतप्रधान जी. एम. सादिक यांनी ही सूचना स्वीकारली व ८ एप्रिल १९६४ रोजी शेख अब्दुल्ला यांची सुटका करण्यात आली. काश्मीरचे शेर समजले जाणारे शेख अब्दुल्ला यांना सोडल्यावर त्याचे काय परिणाम होतील याचा अंदाज करणं कठीण होतं. शेख अब्दुल्ला यांनी सुटकेनंतर काश्मिरी जनतेच्या स्वतःचं भवितव्य स्वतः ठरवण्याच्या हक्कासंबंधी काही प्रक्षोभक भाषणं केलीही. परंतु नंतर त्यांचा नूर पालटला. काश्मीरच्या प्रश्नावर भारत व पाकिस्तान यांच्यात मतैक्य घडवण्याचा प्रयत्न करण्याची भाषा ते करू लागले.

राजकीय वर्तुळात आता शास्त्री हे पंडितजींचे वारस आहेत असं बोललं जाऊ लागलं. काश्मीरमध्ये शास्त्री राजकीय पेचप्रसंग सोडवण्यात मग्न असताना दिल्लीत काही जणांनी इंदिरा गांधींचा मंत्रिमंडळात तत्काळ समावेश व्हावा ही सूचना उचलून धरली होती. दैनिक 'हिंदू'चे विशेष प्रतिनिधी के. रंगास्वामी यांनी ९ फेब्रुवारी १९६४ रोजी प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटलं होतं :

*"इंदिरा गांधी यांना मंत्रिमंडळात समाविष्ट करावे म्हणून अचानक संघटित दबाव आणला जात आहे. लालबहादुर शास्त्रींचा किंवा अन्य कोणाचाही प्रभाव ते पंतप्रधानांच्या किती निकट आहेत यावर अवलंबून आहे. परंतु इंदिरा गांधींनाच अधिकृतरीत्या पुढे आणण्यात आले तर इतर कोणाहीपेक्षा त्या पंतप्रधानांच्या जवळच्या ठरणार हे साहजिकच आहे. परराष्ट्र मंत्रिपदासाठी इंदिरा गांधी सर्वांत लायक आहेत असा उघड प्रचार केला जात आहे. लालबहादुर शास्त्री काश्मीरमध्ये असताना बिनखात्याच्या मंत्र्याचे निश्चित काम काय याबाबत अधिकृत परिपत्रक जारी करण्यात आले होते. त्यामुळे शास्त्रींना पुढाकार घेण्यास वाव नाही असा त्याचा अर्थ होतो. परिपत्रकातील ही भाषा असमाधानकारक आहे असे अनेक नेत्यांचे मत झाले."*

या सर्व हालचालींमागील सूत्रधार कोण हे लेखात नमूद केलेलं नव्हतं. या गोष्टींची नेहरूंना काही कल्पना नसावी. ते आजारी होते. गृहमंत्री गुलझारीलाल नंदा, अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी व बिनखात्याचे मंत्री लालबहादुर शास्त्री या त्रिमूर्तींच्या हातात देशाची सूत्रं होती.

भुवनेश्वरला आलेल्या हृदयविकाराच्या झटक्यातून हळूहळू पं. नेहरू बरे झाले व अधूनमधून ते संसदेच्या बैठकीला हजर राहू लागले. २२ एप्रिल १९६४ रोजी लोकसभेत एक छोटं निवेदन करताना ते म्हणाले, "अध्यक्षमहोदय, येत्या जुलैत लंडन येथे राष्ट्रकुलातील पंतप्रधानांची एक बैठक आयोजित करण्यात आली आहे. ८ ते १५ जुलै अशा तारखा सूचित करण्यात आल्या असल्या तरी अजून त्या निश्चित करण्यात आलेल्या नाहीत. मी या बैठकीचं निमंत्रण स्वीकारलं असून तिला मी हजर राहू शकेन अशी आशा वाटते."

तेव्हा परदेशच्या मोठ्या दौऱ्यावर असताना तुमच्या अनुपस्थितीत महत्त्वाची कामं कोण पाहणार, अशी विचारणा बॅ. नाथ पै यांनी केली. या प्रश्नात तुमचा वारस कोण हा गर्भित उपप्रश्न होता. परंतु त्याबाबत स्पष्ट बोलणं टाळून नेहरू म्हणाले, "यापूर्वी अशा प्रसंगी काही मुद्दाम व्यवस्था केल्याचं मला स्मरत नाही."

या अनिश्चित राजकीय परिस्थितीत आपली नेमकी स्थिती काय हे शास्त्रींनाही उमगत नव्हतं. त्या सुमाराला मी त्यांना दिल्लीत भेटलो होतो. तेव्हा मी सरळच म्हटलं, "तुम्ही पंतप्रधान होणार अशी सर्वसाधारण भावना आहे."

शास्त्री शांतपणे अवकाशात पाहत म्हणाले, "काही जण तसं म्हणतात खरं. परंतु भविष्याबाबत काहीच स्पष्ट सांगता येत नाही." त्यांच्या या उद्‌गारांत नेहमीचा आत्मविश्वास दिसत नव्हता.

□□



॥ सहा ॥

# पंतप्रधान !

नेहरूंनंतर कोण?

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात पं. नेहरूंची इच्छा हीच भारतीय बहुसंख्य जनतेची इच्छा बनली होती. डिसेंबर १९५० मध्ये सरदार पटेल यांचं निधन झालं व नेहरू युगाचा प्रभाव वाढला. भारतावर नेहरूंचं प्रेम होतं व ते भारताचे लाडके नेते होते. यात कधी फरक पडेल अशी कल्पनाही करणं मुश्किल होतं. परंतु ४ एप्रिल १९५८ रोजी एका पत्रकार परिषदेत पं. नेहरूंनी आपल्याला अनुत्साही, दमल्यासारखं वाटत असून ताजंतवानं व्हायची गरज आहे असं सांगितलं. ते म्हणाले,

*"मला दमल्यासारखं वाटतंय. माझं शरीर निरोगी आहे. तसं ते सर्वसाधारणपणं असतंच. परंतु मला काहीसं अनुत्साही, थकल्याभागल्यासारखं वाटतंय. महत्त्वाच्या प्रश्नांची हाताळणी कराव्या लागणाऱ्या माझ्यासारख्या व्यक्तीला असं वाटता कामा नये. मला पुरेसं ताजंतवानं वाटत नाही. मनाची काही तरी सृजनशक्ती असली पाहिजे. एक दिवसाचीही उसंत न घेता गेली साडेअकरा वर्ष मी या पदावर अखंड काम करीत आहे. शारीरिक दृष्ट्या मी फिट असल्यानं आणखी काही वर्षं काम करू शकेन. स्वतःचं मन मी जोखू शकत नसलो तरी मला ते ढासळतंय असं वाटत नाही. मात्र ते थकलं आहे आणि त्याला टवटवी हवी आहे असं मला वाटतं."*

त्यांच्या या उद्‌गारांनी देशभर खळबळ माजली. नेहरूंना जर थकल्यासारखं वाटत असेल तर अपेक्षेपेक्षा आधीच ते देशाच्या नेतृत्वपदी राहणार नाहीत. तेव्हा भारताचं काय होईल? अशी चिंता व्यक्त केली जाऊ लागली.

या विषयाला सर्वप्रथम जाहीर वाचा फोडली होती जयप्रकाश नारायण यांनी. २७ एप्रिल १९५८ रोजी त्यांनी एक निवेदन काढलं. पं. नेहरूंनी आपलं पद सोडावं व आपल्या पसंतीची व्यक्ती त्या पदावर (पंतप्रधानपद) बसवावी आणि त्याला बाहेरून मदत करावी, अशी सूचना त्यांनी या निवेदनात केली होती. नेहरूंनी असं पाऊल उचललं तर ते पंतप्रधानांच्याच नव्हे तर देशाच्याही हिताचं ठरेल, असंही जयप्रकाश यांचं म्हणणं होतं. सर्व परिस्थितीवर त्यांचं पूर्ण नियंत्रण असतानाच म्हणजे आत्ताच त्यांनी हे करावं असंही त्यांनी सुचवलं होतं. पंतप्रधानांना थकल्यासारखं वाटतंय म्हणून आपण ही सूचना करीत आहोत असं नसून नेहरूंच्या नंतर काय अशी भीती अनेक वर्तुळांत व्यक्त केली जात आहे. आपल्या देशातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे, म्हणून आपण सूचना करीत आहोत असंही जयप्रकाश यांनी निवेदनात म्हटलं होतं.

२९ एप्रिलला पंडितजींनी जणू बॉम्बगोळाच टाकला. काँग्रेस संसदीय पक्षापुढं बोलताना त्यांनी राजीनामा देण्याची इच्छा प्रदर्शित केली. ते म्हणाले, ''मला रोजच्या कामाच्या ओझ्यातून मुक्त व्हावंसं वाटतं. भारताचा पंतप्रधान म्हणून नव्हे, तर एक नागरिक म्हणून स्वतःचा विचार करावासा वाटतो.''

पक्षात जणू झंझावातच उठला. अल्पकाळासाठी देखील त्यांचा राजीनामा स्वीकारण्याच्या कल्पनेला कोणी थारा दिला नाही. निवृत्तीचा विचार सोडून द्यावा असा त्यांना आग्रह करण्यात आला. शेवटी काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत ते म्हणाले, ''माझ्याबद्दल तुम्ही ज्या आत्मीयतेनं आपल्या भावना प्रकट केल्या त्या ध्यानी घेऊन गेल्या खेपेस सुचवलेलं पाऊल मी उचलणार नाही.'' काँग्रेसमध्येच नव्हे, तर देशाच्याच सार्वजनिक जीवनात एक प्रकारचा ओंगळपणा, बीभत्सपणा पसरत असल्यानं आपण असं टोकाचं पाऊल उचलायचा विचार करीत होतो, असंही ते म्हणाले. नंतर पुन्हा नेहमीच्याच धडाडीनं ते कामाला लागले.

परंतु पेचप्रसंग तात्पुरता निभावला तरी प्रश्न कायम होता. पंतप्रधानपदाला एक व्यापक परिमाण त्यांनी प्राप्त करून दिलं होतं. केवळ सरकारचेच प्रमुख म्हणून नव्हे, तर देशाचे नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जात होतं. त्यांच्या हाती प्रचंड अधिकार होते. त्यांच्याहून कमी पात्रतेची व्यक्ती अशा अधिकारामुळं भ्रष्टाकारी बनू शकली असती. भारतात संसदीय लोकशाही चांगली रुजली असली तरी तिचा नाजुक राजकीय समतोल जपणं, टिकवून ठेवणं आवश्यक होतं. कोणाच्या हाती ही जबाबदारी सोपवली जावी या प्रश्नाचा सार्वजनिक रीत्या उहापोह होऊ लागला होता.

प्रख्यात पत्रकार फ्रँक मोराइस यांनी १९६० साली प्रकाशित केलेल्या 'इंडिया टुडे' या ग्रंथात या प्रश्नाची तपशीलवार चर्चा केली होती. आरंभी त्यांनी राष्ट्रपती

राजेंद्रप्रसाद, गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत व अर्थमंत्री मोरारजी देसाई या तिघांचा नेहरूंचे संभाव्य वारसदार म्हणून उहापोह केला होता. प्रकृतीच्या वा व्यक्तिमत्वाच्या कारणास्तव ते पंतप्रधान म्हणून मान्य होण्यात अडचणी येतील असा त्यांचा अंदाज होता. मोराइस यांनी जणू भाकीतच वर्तवलं होतं, ते असं :

*"त्यामुळे अगदीच अपरिचित अशा व्यक्तीचे नाव नेहरूंचा वारसदार म्हणून पुढे येण्याचा संभव आहे. ती व्यक्ती म्हणजे सध्याचे वाणिज्य व उद्योगमंत्री, ५५ वर्षांचे लालबहादुर शास्त्री. तेही उत्तर प्रदेशचेच आहेत. राजकीय दृष्ट्या व व्यक्तिशःही ते पं. नेहरूंच्या निकट आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ठामपणाचा अभाव आहे खरा, परंतु तेच तडजोडीचे उमेदवार ठरण्याची शक्यता आहे.*

*पं. नेहरू राजकीय क्षितिजावरून दूर झाले व काँग्रेसमधील उजव्या विचारसरणीचे पक्षावर नियंत्रण आले तर प्रसाद, पंत, मोरारजी देसाई, स. का. पाटील व डॉ. सत्यनारायण सिन्हा यांचा गट प्रभावी बनेल. लालबहादुर यांचा सध्या डावीकडे कल असला तरी या गटाशी ते जुळवून घेण्याची शक्यता आहे. मग केंद्राच्या उजवीकडे झुकणारं सरकार अस्तित्वात येईल."*

आपलं हे निदान अगदी अचूक ठरेल याची मोराइसना कल्पना नसावी.

वेलेस हँगेन यानं 'आफ्टर नेहरू हू?' (१९६३) या आपल्या ग्रंथात या प्रश्नाचं अत्यंत सुंदर विश्लेषण केलं आहे. त्यानं भावी वारसदार म्हणून पुढील आठ नावं दिली : मोरारजी देसाई, व्ही. के. कृष्ण मेनन, लालबहादुर शास्त्री, यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, जयप्रकाश नारायण, स. का. पाटील व ब्रिजमोहन कौल. या सर्व नावांची साधकबाधक चर्चा केल्यावर शास्त्री हे नेहरूंचे वारसदार ठरण्याची सर्वांत अधिक शक्यता आहे, असा निष्कर्ष हँगेननं काढला होता. मात्र शास्त्रींची कारकीर्द त्यांच्या प्रकृतीमुळं लवकर संपुष्टात येण्याचा इशाराही त्यानं दिला होता.

*"या ग्रंथात वर्णिलेल्या व्यक्तींमध्ये सर्वांत जास्त भारतीय व्यक्तिमत्त्व लालबहादुर शास्त्री यांचे आहे. भारताची काळी माती, भारताचे मन यांच्याशी त्यांचे सर्वांत निकटचे नाते आहे. भारतातील खेडुताची शक्ती व उणिवा यांचे ते प्रतीक आहेत. पं. नेहरूंसह पक्षश्रेष्ठींच्या संमतीनेच स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान ते बनू शकतील आणि त्यांना इतिहासात स्थान मिळवता येईल. त्यांना इतिहासातील केवळ तळटीप म्हणून राहायचे नसेल तर या श्रेष्ठीनिवडीला सबंध भारतीय जनतेचा पाठिंबा त्यांना मिळवावा लागेल. श्रेष्ठींचा आदेश व जनादेश त्यांच्यापाशी असेल तर जागतिक व्यासपीठावर ते नेहरूंची जागा घेऊ शकतील."*

आपल्या ग्रंथाच्या अखेरच्या प्रकरणात हँगेन म्हणतात, "मी कधी पंतप्रधान होणार नाही असे शास्त्री म्हणत असले तरी बहुधा त्यांनाच सर्वप्रथम हे पद स्वीकारण्याबद्दल विचारले जाईल." मात्र हँगेन यांनी हे भाकित करताना इशारा दिला की, "खंबीरतेचा

अभाव याचबरोबर त्यांची प्रकृती ही पण मोठी अडचण आहे. पहिल्या हृदयविकाराच्या झटक्यानं जरी फारशी हानी झाली नसली तरी दुसरा वा तिसरा झटका त्यांना पंगू बनवू शकेल असं त्यांच्या एका सहकारी मंत्र्याचं म्हणणं आहे.''

१९६४ च्या आरंभी भुवनेश्वर इथे हृदयविकाराचा झटका पंडितजींना आला व त्यांच्यानंतर वारस कोण या प्रश्नाची तातडीनं चर्चा होऊ लागली. २४ जानेवारी १९६४ रोजी शास्त्रींचा केंद्रीय मंत्रिमंडळात बिनखात्याचे मंत्री म्हणून अंतर्भाव करण्यात आला. पंतप्रधानपदाच्या दिशेनंच हे पाऊल आहे असा सर्वसाधारण अर्थ काढला गेला. त्यांच्या नेमणुकीचं स्वागत करताना 'द गार्डियन'नं म्हटलं होतं :

*''भारताचे नवे पंतप्रधान म्हणून लालबहादुर शास्त्रींना 'तयार' केलं जात आहे असं दिसतं. कामराज योजनेमुळं राजीनामा दिलेल्या शास्त्रींना पुन्हा मंत्रिमंडळात घेतल्याची घोषणा दोन कारणांसाठी स्वागतार्ह आहे. एक तर वारसाचा प्रश्न अखेर हाताळण्यात आला व दुसरे कारण म्हणजे आता लक्ष ठेवायचे ते शास्त्रींवरच.'*

पाश्चिमात्य वृत्तपत्रांत शास्त्रींचं नाव फारसं झळकत नव्हतं, परंतु भारतात मात्र भावी पंतप्रधान म्हणून चर्चिल्या जाणाऱ्या नावांत त्यांचं नाव प्रमुख असे. ते तडजोडीचे उमेदवार ठरतील. काँग्रेसमधील डाव्यांना मोरारजी देसाईपेक्षा आणि उजव्यांना कृष्ण मेननपेक्षा शास्त्रींचं नाव जास्त स्वीकारार्ह आहे, असं म्हटलं जाई.

३० मार्च १९६४ रोजी ह. वि. कामथ यांनी लोकसभेत नेहरूंना विचारलं, ''बिनखात्याचा मंत्री नेमणं हे उपपंतप्रधान नेमण्याच्या दृष्टीनं टाकलेलं पाऊल आहे काय?'' परंतु मुख्य मुद्दा डावलून नेहरूंनी उत्तर दिलं, ''असा काही प्रश्न उद्‌भवला ट॥हे असं वाटत नाही. तेव्हा उत्तर देण्यासारखं मजपाशी काही नाही.'' मात्र अनेक कामं शास्त्री कार्यक्षमतेनं पार पाडीत आहेत अशी प्रशंसा त्यांनी केली.

अर्नोल्ड मायकेलिस यांनी पं. नेहरूंची दूरचित्रवाणीसाठी एक मुलाखत घेतली होती. ती १८ मे १९६४ रोजी न्यूयॉर्क इथे दाखवण्यात आली. मायकेलिस यांनी त्यांच्या वारसदाराविषयी प्रश्न विचारले होते. तेव्हा ''इंदिरा गांधींना तुम्ही वारसदार म्हणून पुढं आणीत आहात काय?'' या प्रश्नाला आपल्या पदावर इंदिरा गांधी येण्याची शक्यता फारच कमी आहे, आणि विशिष्ट हेतू मनात बाळगून तर मी तिला निश्चितच पुढं आणत नाही, असं उत्तर नेहरूंनी दिलं होतं. इंदिरा गांधींना हे उद्‌गार मायकेलिसनं नंतर त्यांची मुलाखत घ्यायला तो गेला असताना ऐकवले. तेव्हा इंदिरा गांधी उत्तरल्या, ''ते म्हणाले ते बरोबरच आहे. या पदाचं प्रचंड ओझं वाहून नेण्याची क्षमता कोणापाशी आहे याचा विचार होईलच ना?''

''मला वाटतं तुमच्याजवळ तशी क्षमता आहे,'' असं मुलाखतकारानं सांगताच इंदिरा गांधी उत्तरल्या, ''केवळ माझ्याजवळ तशी क्षमता असली तरी तशी बढाई मारणाऱ्यांपैकी मी नाही. तसंच वारस कोण होणार हे इतर अन्य बाबींवरही अवलंबून राहील. या सर्व भानगडींत मी पडणार नाही.''

पं. नेहरूंनी वारसदाराबाबत काही सर्वसाधारण स्वरूपाची मतंही मुलाखतीत व्यक्त केली होती. "माझ्यानंतर कोणी सूत्रं हाती घ्यावी हे लोकांच्याच हाती सोपवलेलं बरं. कोणी तरी पंतप्रधानपदी येईलच. लोकांची अशी इच्छा दिसते की, त्या पदासाठी मी कोणाला तरी नियुक्त करावं. तसं मी केलं तर तो हमखास पंतप्रधान होणार नाही. लोक त्याचा द्वेष करू लागतील. त्यांना तो आवडणार नाही. विन्स्टन चर्चिल यांनी अँथनी ईडनना नियुक्त केलं होतं, पण ते काही फार काळ टिकू शकले नाहीत..." वगैरे वगैरे.

२२ मे १९६४ रोजी नेहरू यांनी पत्रकार परिषद घेतली. तेव्हा "आपला वारसदार म्हणून कोणाला तयार करण्याचा विचार तुमच्या मनात आयुष्यभरात आला होता काय," असं विचारता ते म्हणाले, "माझा आयुष्यकाळ काही लवकर संपायला आलेला नाही." प्रत्यक्षात त्यानंतर पाच दिवसांनी त्यांच्या आयुष्याची अखेर झाली!

लोकांनी म्हणजेच जवळजवळ काँग्रेसनंच आपला वारसदार निवडावा हे पं. नेहरू यांचं मत उचितच होतं. याबाबत त्यांच्या मनात कोणाचं नाव होतं काय असा प्रश्न सतत विचारला जाई. त्या बाबतीत त्यांना काय नको होतं हे सांगणं अधिक सोपं आहे. त्या पदासाठी इंदिरा गांधींचं नाव पुढं करण्याचा प्रयत्न करून घराणेशाहीला आपण प्रोत्साहन देत आहोत, अशी टीका त्यांना ओढवून घ्यायची नव्हती. आपल्या घराण्याला उत्तेजन द्यायचं असतं तर ते इंदिरा गांधींचा मंत्रिमंडळात समावेश करू शकले असते. नंतर त्यांनी आपल्या वडिलांची जागा घेतली असती. काहींच्या मते त्यांना इंदिरा गांधींनी आपला वारस बनावं असं वाटत होतं व पिता म्हणून ते साहजिकही होतं. परंतु आपण तिला पुढं करीत आहोत असं दाखवण्याची त्यांची इच्छा नव्हती. कारण जाहीरपणं घराणेशाहीला प्रोत्साहन देण्याची आपली इच्छा नाही अशी भाषा वापरणारे नेहरू प्रत्यक्षात मात्र त्याच्या उलट वागत आहेत अशी टीका झाली असती. याबाबत धर्मवीर यांचं मत लक्षणीय आहे. तीन पंतप्रधानांसमवेत धर्मवीर यांनी काम केलं होतं. पं. नेहरूंचे ते खासगी सचिव होते, तर शास्त्री व इंदिरा गांधी यांच्या काळात ते मंत्रिमंडळ-सचिव होते. धर्मवीर यांनी माझ्याशी बोलताना असं सांगितलं की, "पं. नेहरू इंदिरा गांधींना पंतप्रधानपदासाठी तयार करीत होते, परंतु १९६३-६४ या काळात ती जबाबदारी पेलण्याइतक्या त्या तयार झालेल्या नाहीत, असं त्यांना वाटत होतं. शास्त्रींवर नेहरूंचा गाढ विश्वास होता. शास्त्रींना त्यांनी उत्तेजन दिलं याचं कारण ते 'स्टॉप गॅप' पंतप्रधान राहतील व वेळ येईल तेव्हा इंदिरा गांधींना ते न्याय देतील असं त्यांना वाटत होतं."

पंतप्रधानपदासाठी मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम व गुलझारीलाल नंदा हेही उमेदवार होते. परंतु इंदिरा गांधींनी आपण उमेदवार नाही असं जाहीर केल्यावर मोरारजी देसाई व लालबहादुर शास्त्री या दोघांपैकीच कोणी तरी पंतप्रधान होईल असं मानलं जाऊ लागलं.

## युगान्त

पंडित नेहरू २३ मे १९६४ रोजी डेहराडूनला तीन दिवसांच्या सुटीवर गेले. त्यांच्याबरोबर त्यांची कन्या होती. २६ मेला ते दिल्लीला परतले, तेव्हा ते ताजेतवाने, प्रसन्न वाटत होते. विमानतळावर शास्त्रींनी त्यांचं स्वागत केलं व त्यांच्याचबरोबर मोटारनं ते पंतप्रधानांच्या निवासस्थानी गेले.

२७ मे १९६४ रोजी पहाटे साडेसहा वाजता पंडितजींना हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्या आयुष्याचा अंत जवळ येऊन ठेपला होता. हळूहळू त्यांची प्राणज्योत मालवू लागली व दुपारी दोनच्या सुमाराला त्यांचं निधन झालं. त्यांच्या मृत्युशय्येपाशी त्या वेळी इंदिरा गांधींखेरीज गुलझारीलाल नंदा, टी. टी. कृष्णम्माचारी आणि लालबहादुर शास्त्री हे उपस्थित होते. नेहरूंच्या निधनाच्या वार्तेनं सारा देश शोकाकुल झाला. महात्मा गांधींच्या हत्येनंतरचा देशाला बसलेला हा सर्वांत मोठा हादरा होता. २८ मे १९६४ रोजी नेहरूंच्या पार्थिवावर राजघाटानजीक अंत्यसंस्कार करण्यात आले. नेहरू युगाचा अंत झाला.

भारताच्या राजकारणात स्वातंत्र्यापूर्वीच्या तीन दशकांवर प्रभाव टाकणारे महात्मा गांधींच्या नंतर नेहरूच होते. स्वातंत्र्यानंतर ते आधुनिक भारताचे नेते व शिल्पकार ठरले. त्यांची देशभक्ती, देशबांधवांबद्दलचं त्यांचं गाढ प्रेम, त्यांची धडाडी, समृद्ध, संपन्न, सचेतन अशा भारताचं त्यांचं स्वप्न, मानवी स्वातंत्र्याबद्दल त्यांना वाटणारी कळकळ, लोकशाहीवरील विश्वास, स्वतंत्र व सुव्यवस्थित समाजातील महान संस्थांबद्दलचा आदर, त्यांची निधार्मिकता व अल्पसंख्याकांच्या कल्याणाबद्दल वाटणारी आस्था, त्यांचं आधुनिक व विज्ञाननिष्ठ मन, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ओलावा– हे सारं अतुलनीय होतं. भारतीय जनतेचं त्यांच्यावर अलोट प्रेम होतं, अफाट विश्वास होता. नेहरू म्हणते तर ते सम्राट वा हुकूमशहा बनू शकले असते. परंतु ते निष्ठावंत, कट्टर लोकशाहीवादी होते.

आता देशाचा नेता कोण होणार, आता पुढं काय होणार असे प्रश्न प्रत्येक भारतीयाच्या मनात उभे राहिले. पहिल्या प्रश्नाचं उत्तर काँग्रेस नेत्यांनी काही दिवसांतच शोधलं. दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर मिळायला मात्र बराच अवधी लागला.

## शास्त्रींची निवड

काँग्रेस पक्षापुढं अभूतपूर्व स्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधानांच्या निवडीची काही निश्चित प्रक्रिया ठरलेली नव्हती. भारतात पंतप्रधान हे केवळ केंद्र सरकारचे प्रमुख नव्हते. पं. नेहरूंनी या पदाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त करून दिलं होतं. देशातील शासनाचे सर्वाधिकार खऱ्या अर्थानं या पदात एकवटलेले होते. सबंध देशाला एकसंध ठेवून त्याच्या विकासाची दिशा ठरवण्याचं पंतप्रधानांचं काम होतं.

त्यामुळं पंतप्रधानाची निवड ही काही केवळ त्यांच्या पक्षाची, मुख्य मंत्र्याची बाब नव्हती. तो साऱ्या भारतीय जनतेचाच प्रश्न होता.

त्या वेळेस निष्णात व मुरब्बी नेते के. कामराज हे काँग्रेसचे अध्यक्ष होते, हे देशाचं भाग्यच. सुस्पष्टता व ठाम निर्णय घेण्याची क्षमता यांबद्दल त्यांची ख्याती होती आणि काँग्रेस पक्षावर त्यांचं पूर्ण नियंत्रण होतं. पक्षाध्यक्ष या नात्यानं त्यांनी नव्या पंतप्रधानाच्या निवडीच्या कामाला सुरुवात केली.

लोक अत्यंत शोकमग्न असून नेता निवडण्याच्या महत्त्वपूर्ण बाबीकडे लक्ष देण्यासारखी त्यांची मनःस्थिती नाही, तेव्हा ही निवड पुढं ढकलावी असं डाव्या विचारसरणीच्या काहींचं म्हणणं होतं. पण ते कामराज यांना पटलं नाही. २८ मे रोजी विविध राजकीय गटांत अनौपचारिक चर्चा झाली. निवडणूक टाळावी या हेतूनं २९ मे रोजी जोरदार प्रयत्न झाला. कामराज यांनी शास्त्री, गुलझारीलाल नंदा, टी. टी. कृष्णम्माचारी, मोरारजी देसाई, जगजीवनराम, यशवंतराव चव्हाण व काही राज्यांचे मुख्य मंत्री यांच्याशी विचारविनिमय केला.

काही उमेदवारांचा बऱ्याच प्रमाणात प्रचार केला गेला. परंतु प्रामुख्यानं तो मोरारजी देसाई व लालबहादुर शास्त्री या दोन नेत्यांशी केंद्रित झालेला होता, अशा बातम्या वृत्तपत्रांत झळकल्या. माजी काँग्रेस खासदार के. संथानम यांनी एक निवेदन काढून काँग्रेस कार्यकारिणीनं काँग्रेस संसदीय पक्षाला आपला नेता निवडण्याचं पूर्ण स्वातंत्र्य द्यावं अशी सूचना केली.

दुसऱ्याच दिवशी म्हणजे ३० मे रोजी कार्यकारिणीची बैठक भरून नेहरूंच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मंजूर करण्यात आला. काँग्रेस संसदीय पक्षानं आपल्या नेत्याची निवड करण्याची तारीख ठरविण्यासाठी कार्यकारिणीनं पुन्हा दुसऱ्या दिवशी बैठक घ्यायचा निर्णय घेतला. ३० मे रोजी काँग्रेस संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीचीही बैठक झाली व पक्षाध्यक्षांच्या सल्ल्यानं नेतानिवडीची तारीख निश्चित करण्याचं ठरलं. त्याच दिवशी अनुसूचित जाती-जमातींच्या १८ खासदारांनी जगजीवन राम यांनी निवडणूक लढवावी असा निर्णय घेतला. ३० मेला सायंकाळी मोरारजी देसाई यांनी कामराज यांच्याशी दीर्घ काळ चर्चा केली. नंतर पत्रकारांशी बोलताना देसाई म्हणाले, "पंतप्रधानपदासाठी मला जर लोक पात्र समजत असतील तर मी निवडणूक लढवण्यास कचरणार नाही." अर्थात "एकमतानं निवड करण्याचे प्रयत्न चालू आहेत," अशीही पुस्ती त्यांनी जोडली. या प्रयत्नांबाबत पत्रकारांनी कामराज यांना छेडलं तेव्हा, "उद्या कार्यकारिणीची बैठक होईस्तोवर थांबा," असं उत्तर त्यांनी दिलं.

३० मे रोजी लालबहादुर शास्त्रींनी इंदिरा गांधींची भेट घेतली व त्यांनी देशाचं नेतृत्व करावं असं सुचवलं. "अब आप मुल्कको संभाल लीजिये" असं त्यांचं वाक्य होतं. (हे त्यांनीच मला नंतर सांगितलं.) इंदिराजींनी नकार दिला. आपण इतक्या दुःखात आहोत की निवडणूक लढवण्याचा विचारच करू शकत नाही असं त्या म्हणाल्या. त्यांची भूमिका स्पष्टपणं शास्त्रींना जाणून घ्यायची होती.

३१ मे रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक बराच वेळ चालली. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेतेपदासाठी कोणाच्याही नावाची चर्चा झाली नाही. एकमतानं निवड व्हावी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न केले जावेत याबद्दल व्यापक सहमती होती. समितीचे सदस्य, वरिष्ठ नेते, मुख्य मंत्री, ज्येष्ठ खासदार यांच्याशी चर्चा करून नावाची शिफारस करण्याचे अधिकार एकमतानं कामराज यांना देण्यात आले. काँग्रेस संसदीय पक्षाची बैठक नेतानिवडीसाठी गुरुवार दि. २ जून १९६४ रोजी भरवण्यात यावी असाही निर्णय घेण्यात आला. कार्यकारिणीच्या बैठकीस सर्व इच्छुक उमेदवार हजर होते व कामराज यांनी एकमत घडवून आणण्यास त्यांचा पाठिंबा होता. कामराज यांची शिफारस मान्य होईल व निवडणूक टाळली जाईल याबद्दल सर्वांचं एकमत होतं.

अर्थात पडद्यामागं जोरदार हालचाली सुरूच होत्या. पक्षातील डावे, उजवे व मध्यममार्गी हे पाठिंबा मिळवायचा प्रयत्न करीत होते. हंगामी पंतप्रधान म्हणून काम पाहत असलेल्या गुलझारीलाल नंदा यांनाच काही महिने त्या पदावर ठेवावं; दरम्यान नेहरूंच्या निधनानं बसलेल्या धक्क्यातून सावरल्यावर काँग्रेस संसदीय पक्षानं नेत्याची निवड करावी, असा एक प्रस्ताव डाव्या विचारसरणीच्या मंडळींनी पुढं केला. ही सूचना करण्यामागं चतुराई होती. काँग्रेस संसदीय पक्ष व विशेषतः इंदिरा गांधी तोवर सावरतील असा होरा होता. या प्रस्तावाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आता मैदानात फक्त मोरारजी देसाई व शास्त्री ही दोनच नावं उरली आहेत असं लक्षात आलं, तेव्हा डाव्या विचारसरणीच्या गटाचे नेते कृष्ण मेनन यांनी उजव्या विचारसरणीचे मानल्या जाणाऱ्या मोरारजी देसाईंना पाठिंबा देण्याचा प्रयत्न केला. परंतु कृष्ण मेनन यांच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळाला नाही. एके काळी स्वतःच इच्छुक असलेले जगजीवन राम यांनी आपलं धोरण बदलून मोरारजीभाईंना पाठिंबा दिला. शास्त्रींना उत्तर व दक्षिणेकडील राज्यांचा भरघोस पाठिंबा होता; अन्यत्र मतं विभागलेली होती. लालबहादुर शास्त्री यांना खासदार, मुख्य मंत्री व काँग्रेस कार्यकारिणी यांचा व्यापक पाठिंबा आहे असं ३१ मेला सायंकाळी स्पष्ट झालं.

१ जून १९६४ हा ऐतिहासिक निर्णयाचा दिवस होता. आता के. कामराज यांच्यावर सारं काही अवलंबून होतं. ते अत्यंत प्रामाणिक व निःस्वार्थी होते. दिवसभरात ते १५० खासदारांना व्यक्तिशः भेटले. राज्यांचे मुख्य मंत्री व अन्य वरिष्ठ नेते यांच्याशी त्यांनी चर्चा केली. सायंकाळपर्यंत त्यांचं हे मुलाखतींचं सत्र संपलं. पक्षात शास्त्रींना सर्वाधिक पाठिंबा आहे या निष्कर्षाप्रत ते पोचले होते व दुसऱ्या दिवशी सकाळी भरणाऱ्या काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत औपचारिक रीत्या ते हे सांगणार होते. २ जूनला काँग्रेस संसदीय पक्षाचे नेते म्हणून शास्त्री यांची निवड होणार व ते नवे पंतप्रधान बनणार हे आता जवळजवळ निश्चितच झालं होतं.

दिवसभराच्या चर्चेनंतर कामराज यांनी लालबहादुर शास्त्री व मोरारजी देसाई यांची भेट घेऊन एकूण सहमतीची माहिती दिली. नंतर शास्त्री यांनी मोरारजी देसाई यांची भेट घेऊन तासभर चर्चा केली.

२ जून १९६४ रोजी भारताच्या राजकीय परिपक्वतेचंच दर्शन जगाला घडलं. काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत गुलझारीलाल नंदा यांनी शास्त्रींचं नाव सुचवलं. मोरारजी देसाईंनी अनुमोदन दिलं. दुसरं कोणाचंच नाव नेतेपदासाठी सुचवलेलं नसल्यानं शास्त्रींची बिनविरोध निवड झाली. त्या प्रसंगी भाषणं केलेल्या सर्व नेत्यांनी शास्त्रींना पूर्ण सहकार्य देण्याचं आश्वासन दिलं. कसलाही मतभेद, कलह न होता सुरळीतपणं व झटपट ही निवड झाली.

शास्त्री हेलावून गेले. त्यांनी शालीनतेनं या सन्मानाचा स्वीकार केला. त्या वेळी केलेल्या छोट्याशा भाषणात ते म्हणाले,

*"माझ्यावर अत्यंत मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे. स्वातंत्र्य चळवळीचे झुंजार नेते पं. जवाहरलाल नेहरू यांनी या देशाचं व संसदेचं नेतृत्व केलं याची आठवण येते तेव्हा आपल्यावरची जबाबदारी किती कठीण आहे या विचारानं मी धास्तावून जातो. अत्यंत विनयानं ही जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करण्याचं मी आश्वासन देतो. तुम्ही मला समजून घ्याल, मदत, पाठिंबा आणि सहकार्य द्याल अशी आशा आहे. माझ्या पुढील अडचणींची जाणीव ठेवून कोणत्याही प्रश्नाची दुसरी बाजू लक्षात घेण्याचा प्रयत्न तुम्ही करावा. त्यामुळं मला अधिक बळ येईल आणि माझ्या प्रयत्नांना यश लाभेल.*

*आपण सारे एक आहोत या भावनेनं शक्य तितक्या प्रभावीपणं आपण आपले प्रश्न सोडवायला हवेत. पंडित नेहरूंच्या निधनानंतर आपल्यावर पडलेल्या महान जबाबदारीची सत्ताधाऱ्यांनी जाणीव ठेवायला हवी. आपण एकमेकांना साहाय्य करायला हवं, अथक परिश्रम करायला हवेत.*

*या प्रसंगी लोक आपल्या पाठीशी उभे राहतील अशी मला खात्री आहे. काही वेळा कठीण प्रसंग उभे राहतात, काही वेळा नेते अयशस्वी होतात, परंतु लोक कधी अयशस्वी ठरत नाहीत."*

तो वैभवाचा क्षण होता. भारताच्या जनताजनार्दनातील एका व्यक्तीची देशाच्या नेतेपदी निवड झाली होती. तो दिवस दोन 'हीरों'चा होता. एक लालबहादुर शास्त्री व दुसरे के. कामराज. पं. नेहरूंनी १९६३-६४ मध्ये आर. के. करंजिया यांना मुलाखत देताना सामूहिक नेतृत्वाच्या संदर्भात याच दोन नावांचा उल्लेख केला होता. करंजिया यांनी त्यांना विचारलं होतं, "भावी सरकारच्या संदर्भात तुम्ही सामूहिक नेतृत्वाचा उल्लेख केलात. कामराज योजनेतून असा काही गट निर्माण झाला आहे काय?" त्यावर नेहरूंनी उत्तर दिलं होतं :

*"निश्चितच. तसं सामूहिक नेतृत्व होतं आणि आहे. नाही तर सरकार आणि काँग्रेस पक्ष आम्ही कसे चालवीत आहोत? कोणत्याही देशाला अभिमान वाटावा अशा क्षमतेचे नेते आमच्यापाशी आहेत. कामराज आहेत, खऱ्याखुऱ्या अर्थानं ते*

*जनतेचे नेते आहेत. गांधींचं तत्त्वज्ञान त्यांनी आत्मसात केलं आहे आणि आमच्या ध्येयाला त्यांनी वाहून घेतलं आहे. गांधीजींनी स्वतः घालून दिलेल्या आदर्शाचं प्रतीक असलेले शास्त्री आहेत. साधे, विनयशील आणि सभ्य. त्यांच्यात एकाधिकाराचा लवलेश नसून विविध गटांत मतैक्य घडवून मध्यममार्ग अनुसरण्याच्या कामात ते मुरब्बी आहेत.''*

याच मुलाखतीत नेहरू म्हणाले, ''आपल्या लोकशाहीवादी रचनेत कोणतीही एकाधिकारवादी प्रवृत्ती टाळायला हवी.'' सरकार व काँग्रेस दोन्हींच्या नेतृत्वाच्या संदर्भात नेहरूंच्या मनात कामराज व शास्त्री यांची नावं अनुक्रमानं होती. याचाच हा पुरावा होता.

शास्त्री व कामराज यांच्यात घनिष्ट मैत्री होती एवढंच नव्हे, तर दोघांची पार्श्वभूमी जवळपास सारखीच होती. कामराज यांचा जन्म १५ जुलै १९०३ चा असल्यानं शास्त्रींपेक्षा ते एक वर्षानंच मोठे होते. शास्त्री लहान असतानाच पित्याचं छत्र हरपलं होतं, त्याचप्रमाणं कामराज यांचे वडील कुमारस्वामी नाडर यांचंही निधन कामराज लहान असतानाच झालं होतं. काँग्रेसचे स्वयंसेवक म्हणून गांधीजींच्या असहकार चळवळीत १९२० साली कामराज सामील झाले, तर याच चळवळीत १९२१च्या आरंभी शास्त्री सहभागी झाले. दोघेही नेते कमालीचे एकनिष्ठ व निःस्वार्थी होते.

निवडणूक प्रक्रिया संपताच कामराज व शास्त्री संसदेतून थेट इंदिरा गांधींना भेटायला गेले. तेथून ते म. गांधी व नेहरू यांच्या समाधींचं दर्शन घ्यायला गेले. राजघाटावर कमळाचं तर शांतिवनात गुलाबाचं फूल शास्त्रींनी वाहिलं, तेव्हा त्यांचे डोळे पाणावलेले होते. नंतर ते आपल्या घरी जाऊन आई व पत्नी यांना भेटले. ''देशाची चांगली सेवा कर आणि विशेषतः सामान्य माणसांच्या कल्याणाकडे लक्ष पुरव,'' असा आशीर्वाद आईनं दिला. त्यांच्या या शब्दांत जणू शास्त्रींच्या व सबंध देशाच्याच इच्छेचा प्रतिध्वनी उमटला होता!

□□



।। सात ।।

# नव्या जबाबदाऱ्या, नवी आव्हाने

एक तर असामान्य व्यक्तीची जागा भरून काढणं कठीण असतं. त्यातून सबंध देशाला भारून टाकणाऱ्या व दंतकथाच बनून गेलेल्या राष्ट्रीय हीरोची जागा घेणं तर अशक्यच असतं. "पं. नेहरू यांची जागा घेईल असं या देशात कोणीही नाही. तेव्हा मी स्वतःला त्यांचा वारसदार मानीत नाही." असं जाहीर करण्याचं शहाणपण शास्त्रींनी दाखवलं होतं.

तरीही एक प्रभावी पंतप्रधान म्हणून काम करून त्यांना आपलं नेतृत्व सिद्ध करायचं होतं. पं. नेहरू यांच्या हाताखाली काम करताना शास्त्री सत्तेचा वापर देशहितासाठी व सामान्य माणसांसाठी करतात हे सिद्ध झालं होतं. लोकांची मतं लक्षपूर्वक ऐकून व सर्व बाजूंचा सारासार विचार करून निर्णय घेण्याचं त्यांचं कौशल्यही दिसून आलं होतं. आता साऱ्या देशाची जबाबदारी त्यांच्या शिरावर होती. केवळ विश्वासार्हतेच्याच नव्हे, तर देशाला भक्कम नेतृत्व देण्याच्या दृष्टीनं सारा देश त्यांच्याकडे पाहत होता. नव्या पदाची आव्हानं पेलण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे का अशी शंका अनेकांना वाटत होती.

पेचप्रसंगाच्या वेळी शास्त्री खंबीरपणं निर्णायक भूमिका घेऊ शकतात, हे श्रीनगरमधील घडामोडींनी दाखवून दिलं होतं. परंतु आपल्याला लोकांचा बळकट, व्यापक विश्वास संपादन करायचा आहे हे शास्त्री जाणून होते. तरीही आपली निर्णयक्षमता दाखवून देण्याची त्यांना घाई नव्हती. सर्वसाधारणतः विशिष्ट परिस्थितीला सामोरं जाण्याची

पाळी येईल त्या वेळी आपल्या ठामपणाची कसोटी लागेलच असं त्यांना वाटत होतं. परिस्थितीचा योग्य अंदाज घेऊन सावधपणं वाटचाल करायची की धाडसी पावलं उचलायची की परिस्थितीनुरूप वागायचं हे ठरविण्याची क्षमता आपल्याजवळ आहे हे त्यांना ठाऊक होतं. परंतु अनेकांच्या मनात त्याबद्दल शंका होती. त्याचं निराकरण करायचं तर थेट जनतेशीच संपर्क साधणं गरजेचं होतं. प्रभावीपणं काम करायचं तर लोकांचा पाठिंबा हवा, तो नसेल तर गटबाजीला आपण बळी पडू शकतो हे त्यांना ठाऊक होतं.

जातीय संघर्षाचा धोका तर कायमच होता. बहुसंख्य-अल्पसंख्य अशा फुटीर धार्मिक कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता. धर्म ही वैयक्तिक बाब असून ती राजकीय कामाचा पाया बनू शकत नाही, असं त्यांचं मत होतं. सर्व धर्मांच्या मूलभूत मूल्यांवर आधारित नैतिक तत्त्वं हा राजकारणाचा आधार असायला हवा. भावनिक व वैचारिक दृष्ट्या प्रत्येक नागरिकाला आपण सर्वप्रथम भारतीय आहोत असं वाटलं पाहिजे व त्याचा अभिमानही वाटायला हवा, असं त्यांचं मत होतं. त्यामुळं राष्ट्रवाद, देशभक्ती व धर्मातीतता यांना प्रोत्साहन देऊन देशात ऐक्याची भावना वाढीला लावणं हे आपलं प्राथमिक महत्त्वाचं उद्दिष्ट आहे, असं ते मानीत.

ऑक्टोबर १९६२ मध्ये चीननं भारतावर आक्रमण केलं तेव्हा देशाचं संरक्षण करण्याच्या दृष्टीनं लष्कराची तयारी कशी अपुरी होती हे शास्त्रींनी पाहिलं होतं. पाकिस्तानचा धोका तर कायम होता. तेव्हा संरक्षणक्षमता व लष्कराचं नीतिधैर्य वाढवणं यांना सर्वाधिक महत्त्व द्यायला हवं होतं.

सरकारी नियोजनात कृषिक्षेत्राकडे पुरेसं लक्ष न पुरवल्यानं अन्नधान्य-उत्पादन घसरलं होतं. मोठ्या प्रमाणावर धान्याची आयात केली जात होती. ग्रामीण भारताच्या प्रश्नांची शास्त्रींना माहिती होती. बी-बियाणं, खतं यांचा पुरवठा, पाण्याचं कार्यक्षम वाटप, शेती-उत्पादनाच्या रास्त किमती आदी उपाययोजनांनी भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनू शकेल याची त्यांना खात्री होती. परराष्ट्रांवर अवलंबून राहावं लागू नये म्हणून राजकीय दृष्ट्याही ते आवश्यक होतं.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीला अपेक्षित वेग येत नव्हता, विकासाची गंगा खेड्यापाड्यांत पोचली नव्हती, याची विवंचना शास्त्रींना वाटत होती. भावी पिढ्यांना उपयोगी पडणारे दीर्घकालीन प्रकल्प हाती घेऊन सध्याच्या पिढीला मात्र हालअपेष्टांतच खितपत पडू द्यावं हे त्यांना पसंत नव्हतं. अन्न, वस्त्र, पिण्याचं पाणी आदी अत्यावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी, आर्थिक वाढीची गती वाढविण्यासाठी वास्तवदर्शी पावलं उचलावीत असं त्यांचं मत होतं. पंतप्रधान या नात्यानं ते नियोजन मंडळाचे व राष्ट्रीय विकास मंडळाचे अध्यक्ष होते. त्यामुळं त्यांना या दिशेनं पावलं टाकण्यास वाव होता.

गृहमंत्री असताना प्रशासन सुधारण्याकडे त्यांनी लक्ष पुरवलं होतं. नियम, प्रक्रिया व दृष्टिकोन यांत मोठे फेरबदल करण्याची गरज होती. थेट जिल्हा पातळीपर्यंतचं

प्रशासन विकासाभिमुख व्हायला हवं असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी अमेरिकेतील हूवर कमिशनच्या धर्तीवर भारतात एक उच्चस्तरीय आयोग स्थापन करण्याचं त्यांनी ठरवलं होतं.

सरकारी प्रशासनात अधिकाधिक प्रामाणिकपणा आणणं हे फार मोठं आव्हान शास्त्रींपुढं होतं. भ्रष्टाचार फोफावत चाललेला होता व ही लाट थोपवण्याचा त्यांचा निर्धार होता. त्यासाठी थेट वरच्या पातळीवरून सुरुवात करण्याचा त्यांचा मनोदय होता. मंत्री प्रामाणिक असतील तर आपल्या मंत्रालयात ते इमानदारीला प्रोत्साहन देऊ शकतील असं त्यांना वाटत होतं. आजच्या काळात हा अव्यवहार्य ध्येयवाद वाटेल. परंतु त्या काळात तोवर भ्रष्टाचाराचा भस्मासुर झालेला नव्हता. भ्रष्टाचाराविरुद्ध निकराची झुंज दिली नाही तर सबंध प्रशासनात तो पसरेल अशी भीती शास्त्रींना वाटत होती. सध्याची परिस्थिती पाहिली तर ती भीती सर्वार्थानं खरी ठरल्याचं दिसतं.

गृहमंत्री असताना नेपाळला भेट देऊन उभय राष्ट्रांतील संबंध सलोख्याचे करण्याची कामगिरी त्यांनी पार पाडली होती. आता पंतप्रधान म्हणून पाकिस्तान, ब्रह्मदेश, श्रीलंका यांच्याशी संबंध सुधारण्याची त्यांची मनीषा होती. सोविएट रशियाशी असलेले संबंध दृढ करावेत; तसेच अमेरिका, जपान, ब्रिटन व युरोप यांच्याशीही जवळिकीचे संबंध राखावेत असं त्यांना वाटत होतं.

समोर अशी अनेक आव्हानं होती व खंबीर, लवचिक व सुस्पष्ट धोरणांनी त्यांना तत्काळ सामोरं जाणं अत्यावश्यक होतं. पं. नेहरूंच्या नंतर भारताची वाटचाल सुरू झाली, तेव्हा पंतप्रधानपदाच्या जबाबदाऱ्यांची खरी जाणीव शास्त्रींना होऊ लागली होती.

□□



।। आठ ।।

# दोन पंतप्रधानांची कार्यशैली

**ला**लबहादुर शास्त्री हे पं. नेहरूंचे वारसदार व यशस्वी पंतप्रधान कसे झाले याचा उहापोह करण्यापूर्वी त्यांच्या तत्त्वज्ञानाची व नैतिक धारणेची चर्चा करणं उपयुक्त ठरेल.

भारताचा कारभार चालवताना सत्तेचं संस्थात्मक नियंत्रण असलं पाहिजे अशी त्यांची ठाम धारणा होती. लोकशाहीची पाळंमुळं घट्ट रुजावी म्हणून प्रत्येक संस्थेनं आपली भूमिका चोख बजावली पाहिजे. कोणत्याही एका केंद्रात सत्ता एकवटून तिचा गैरवापर होता कामा नये. राष्ट्रपती, संसद, मंत्रिमंडळ, न्यायपालिका, सनदी सेवा व वृत्तपत्रं या प्रजासत्ताकातील संस्थांविषयी त्यांनी कायमच कमालीचा आदर दाखवला. राष्ट्रपतींना ते पूर्ण सन्मान देत व सरकारी घडामोडींविषयी नियमित माहिती देत. १९५० मध्ये घटना अस्तित्वात आल्यापासून राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्यातील नाजुक संबंधांतून प्रश्न उद्भवू शकतात असं दिसून आलं होतं. राष्ट्रपती राधाकृष्णन व पं. नेहरू यांच्यात मात्र कधी असे प्रश्न निर्माण झाले नाहीत. दोघांचे संबंध उत्तम होते. शास्त्री देखील राधाकृष्णन यांचं ऐकून घेत, आदर बाळगीत. मात्र आपल्या कार्यक्षेत्रातील प्रश्नांबाबत स्वतः निर्णय करीत.

सर्वांत महत्त्वाची संस्था म्हणजे संसद. देशातील अंतर्गत बाबी वा परराष्ट्र संबंध यांबाबत शास्त्री वेळोवेळी संसदेला माहिती देत. संसदेच्या माध्यमाचा वापर करून देशाचं ऐक्य, राष्ट्राभिमान व निष्ठा यांना उत्तेजन मिळावं म्हणून त्यांनी निवेदनं केली.

राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून भाषणं करून त्यांनी आपल्या या प्रयत्नांना जोड दिली. स्वपक्षीयांशीच नव्हे, तर विरोधी पक्षांच्या खासदारांशीही त्यांनी चांगले संबंध राखले.

विरोधी पक्षनेत्यांना ते नियमितपणं भेटत. अशा बैठकींत ते सारी माहिती स्पष्टपणं मांडीत. वस्तुस्थितीच्या आधारे ते आपली धोरणं, निर्णय समजावून देत. त्यांच्या या कार्यपद्धतीवर खासदार खूष होते. राष्ट्रीय पातळीवरील निर्णयप्रक्रियेत आपल्यालाही सहभागी केलं जात आहे याचा त्यांना आनंद होई. अनेकदा कडक टीका झाली, अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आले तरी शास्त्री हे सत्तेचा गैरवापर कधीच करणार नाहीत अशी खासदारांना खात्री होती. वैयक्तिक हितासाठी शास्त्री कसलीही तडजोड करणार नाहीत व उच्च ध्येय व मूल्यं जतन करण्यासाठी केव्हाही राजीनामा द्यायला ते तयार असतील असा विश्वास काँग्रेसला तसाच विरोधी पक्षालाही वाटत होता.

संसदेचं कामकाज हे संसदीय लोकशाहीच्या उच्च मूल्यांप्रमाणं, नियमांनुसार चालावं असा त्यांचा आग्रह असे. कोणा खासदाराच्या भाषणात अडथळे आणणं त्यांना मान्य नव्हतं. ते संसदेत प्रत्येक वक्त्याचं भाषण लक्षपूर्वक ऐकत, कधीही त्यात व्यत्यय आणीत नसत. ते टिपणं काढीत व नंतर बोलत तेही मुद्द्यापुरतं. विरोधकांनी त्यांच्या भाषणात जोरदार अडथळे आणल्याचं मी पाहिलं आहे. अशा वेळी ते स्वतः खाली बसून त्या त्या सदस्याला नीट बोलू देत. पुन्हा ते स्वतः बोलायला उठत तेव्हा आपलं म्हणणं शांतपणं ऐकून घ्या असं आवाहन करीत. संसदेत गदारोळ निर्माण करण्याची प्रवृत्ती वाढली तर लोकशाही धोक्यात येईल असं मत त्यांनी एक-दोन वेळा व्यक्त केलं होतं. संसदेतील आपली निवेदनं तयार करण्यात ते बराच वेळ घालवीत. पुरतं समाधान झाल्याखेरीज मसुदा मंजूर करीत नसत. साधी, स्पष्ट व सरळ भाषा वापरावी असा त्यांचा आग्रह असे.

पहिल्या वर्षी संसदीय वादविवादांतील त्यांच्या कामगिरीत चढउतार होते. परंतु भारत-पाक युद्ध सुरू झाल्यानंतर ते सबंध सभागृहाचे लाडके नेते बनले. कठीण प्रसंगी ते यशस्वी संसदपटू आहेत याचीही खात्री पटली.

मंत्रिमंडळाच्या बाबतीत त्यांनी रूढ पद्धती चालू ठेवली. मंत्रिमंडळाच्या आणीबाणी समिती, संरक्षण समिती अशा बऱ्याच उपसमित्या होत्या. सामूहिक निर्णयाचं द्योतक असलेल्या या समित्यांचं काम त्यांनी पूर्ववत चालू ठेवलं.

नेहरूंच्या काळात मंत्रिमंडळ बैठक म्हणजे सर्वसाधारणतः कार्यक्रम पत्रिकेवर जो विषय असेल त्या खात्याचा मंत्री तपशील सांगत असे व पंतप्रधान आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत असत. बाकीचे मंत्री माना डोलावून आपली संमती देत असत. काही खास परिस्थितीत वाद झाला तरी चर्चेचा सारांश व निष्कर्ष नेहरू सांगत आणि तोच मंत्रिमंडळाचा निर्णय असे!

शास्त्री पंतप्रधान बनले आणि मंत्रिमंडळातील हे दृश्य पालटलं. शास्त्रींचं व्यक्तित्व नेहरूंसारखं उत्तुंग नव्हतं. शास्त्री विनयशील होते, सर्वांचं म्हणणं ऐकून घेणारे होते.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्री आपली मतं मांडीत, चर्चेत भाग घेत, त्यांच्या सूचना लक्षात घेऊन निर्णयाची दिशा ते सूचित करीत, त्यांचा निर्णय बहुतेक वेळा सर्व मंत्रिमंडळाला स्वीकारार्ह वाटत असे.

प्रत्येक महत्त्वाची बाब मंत्रिमंडळापुढं किंवा आणीबाणी समितीपुढं किंवा अन्य मंत्रिमंडळ समितीपुढं चर्चेस येत असे. शास्त्रींच्या काळात सरकारची मंत्रिमंडळ पद्धती व सामूहिक जबाबदारीचं तत्त्वही पुरेपूर अमलात आलेली होती. मंत्रिमंडळात झटपट व कार्यक्षमतेनं निर्णय होत असं त्या वेळचे मंत्रिमंडळ सचिव धर्मवीर म्हणतात. घटनेतील तरतुदींनुसार शास्त्री सरकार चालवीत. त्यांनी कधी घटनाबाह्य सत्ताकेंद्राला उत्तेजन दिलं नाही की आपलं अंतर्गत 'मंत्रिमंडळाचं कोंडाळं' (किचन कॅबिनेट) तयार केलं नाही.

न्याययंत्रणेच्या स्वातंत्र्याला ते अत्यंत महत्त्व देत. त्यांच्या कारभारात शासनानं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष ढवळाढवळ करण्यास त्यांचा विरोध होता. त्यांना त्या संस्थेची बांधिलकी हवी होती, पण स्वतःच्या वा सरकारच्या मताशी नव्हे, तर घटनेशी, कायद्यांशी! सरन्यायाधीश प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्याशी त्यांचे मित्रत्वाचे पण न्यायालयीन संदर्भात तटस्थ असे संबंध होते.

पंडित नेहरूंच्या नंतर सनदी अधिकारी पूर्वीपेक्षा जादा सामर्थ्यशाली बनले होते. शास्त्री काही सचिवांबद्दल आदर दाखवीत असं एका विदेशी लेखकानं म्हटलं आहे. त्या संदर्भात त्या वेळचे गृहसचिव एल. पी. सिंग यांना विचारता, "प्रत्येक व्यक्तीबद्दल शास्त्रींच्या मनात आदरभाव असे," असं सांगून ते पुढं म्हणाले :

*सनदी अधिकाऱ्यांना शास्त्री आपले सहकारी मानीत. त्यांच्याशी ते खूप सौजन्यानं वागत. आम्ही एखादा प्रस्ताव मांडला व त्यांनी जर तो ठामपणं स्वीकारला नाही तर त्यांना तो अमान्य आहे असं आम्ही समजत असू. ते आमचं म्हणणं लक्षपूर्वक ऐकत; परंतु निर्णय सर्वस्वी त्यांचेच असत. त्यांचा शब्द नेहमीच अखेरचा असे. कोणा अधिकाऱ्याचा त्यांच्यावर गैर अथवा जादा प्रभाव पडणं शक्य नव्हतं.*

एकदा शास्त्रींनी एल. पी. सिंग यांना विचारलं, "कर्मचारी आपली मतं अधिक स्पष्टपणं का मांडीत नाहीत? ते बोलताना इतकी सावधगिरी का बाळगतात?" सनदी कर्मचाऱ्यांनी अधिकाधिक स्पष्टपणं मतं मांडावीत म्हणून त्यांना उत्तेजन देण्याची त्यांची इच्छा होती असंच यावरून दिसतं.

नेहरू व शास्त्री या दोघांच्याही समवेत काम केलेल्या धर्मवीर यांना मी या संबंधात विचारलं. नेहरूंपेक्षा शास्त्रींच्या काळात नोकरशाही अधिक सामर्थ्यशाली व प्रभावी बनली काय, असं विचारता धर्मवीर उत्तरले,

*"नेहरू आणि शास्त्री दोघांच्याही मनात सनदी कर्मचाऱ्यांबद्दल सारखाच*

*आदर होता. परंतु तो व्यक्त करण्याची प्रत्येकाची शैली वेगळी होती. नेहरू नेहमी मोजकंच बोलत. एखाद्या औषधाच्या छोट्या गोळीएवढं. एकदा मी नेहरूंना एका प्रस्तावाबाबत टिपण पाठवलं व व्यक्तिशः भेटून तपशीलवार स्पष्टीकरण देण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी मला बोलावून घेतलं. आमची चर्चा झाल्यावर नेहरू म्हणाले, "तुम्हाला वाटतं की आपण फार कुशल आहोत, परंतु तुम्ही समजता तेवढे काही कुशल नाही." त्यावर मी उत्तरलो, "जर मी लायक नसेन तर सरकार उगाच माझ्यावर दरमहा चार हजार रुपये का वाया घालवत आहे? या पदावर असताना माझी मतं मांडणं हा माझा अधिकार आहे. ती ऐकून हवा तो निर्णय तुम्ही घेऊ शकता. तो मी पूर्णतः अमलात आणीन." त्यावर ते म्हणाले, "ठीक आहे, तुम्हाला काय सांगायचंय ते सांगा."*

धर्मवीर यांचं म्हणणं ऐकून घेतल्यावर 'बरं, तुम्हाला जे पाहिजे ते करा' असं नेहरू म्हणाले. उभयतांचा हा संवाद दोन मित्रांमध्ये व्हावा तसा खेळीमेळीचा झाला. शास्त्रींची पद्धत वेगळी होती, असं सांगून धर्मवीर म्हणाले :

*"काही तातडीच्या बाबीसंबंधीचं एक टिपण मी एकदा शास्त्रींकडे पाठविलं होतं. त्यांनी मला पाचारण केलं व त्याविषयी आम्ही चर्चा केली. "हा विषय अत्यंत महत्त्वाचा व तातडीचा आहे, तेव्हा तुम्ही आताच निर्णय द्या" अशी विनंती मी केली. त्यावर ते म्हणाले, "अत्यंत महत्त्वाची व तातडीची बाब आहे हे खरं, पण विचार करून निर्णय घेण्यासाठी उद्या सकाळपर्यंत थांबलं तर त्यामुळं काही हानी होईल का?" त्यावर मी तसं काही नाही असं उत्तर दिलं. तेव्हा मग "मग कृपा करून एक दिवस थांबा ना–" असं ते म्हणाले.*

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी आपला निर्णय दिला.

नंतर दोघा पंतप्रधानांच्या कार्यशैलीची तुलना करताना धर्मवीर म्हणाले,

*"निःपक्षपातीपणं व स्वतंत्रपणं काम करता यावं म्हणून दोघाही पंतप्रधानांनी सनदी अधिकाऱ्यांना पूर्ण स्वातंत्र्य व उत्तेजन दिलं होतं. कधी कधी नेहरूंचा तोल जाई, पण लागलीच ते स्वतःला सावरीत. संतापाची भरपाई करण्यासाठी ते सिगरेट ऑफर करीत. शास्त्रींचं वागणं वेगळं असे. ते भरपूर वेळ देत, भेटायला येणाऱ्या अधिकाऱ्याला मनमोकळं वाटेल असं वागत, त्याचं म्हणणं ऐकून घेत, निःपक्षपातीपणं मतप्रदर्शन करायला प्रोत्साहन देत. मात्र खोलवर विचार करून अंतिम निर्णय स्वतः घेत. दोघांच्याही कारकीर्दीत सनदी नोकर सारखेच प्रभावी होते. सनदी सेवेच्या जबाबदाऱ्या, कर्तव्यं, प्रशासनाला स्थैर्य देण्यात त्यांना बजवावी लागणारी महत्त्वाची भूमिका यांविषयी दोघाही पंतप्रधानांना चांगली जाण होती."*

शास्त्रींचा मी केवळ संयुक्त सचिव होतो. दिवसातील बरेच तास मी त्यांच्यासमवेत असे. पण तरीही ते मला गृहीत धरून चालत नसत. ऑफिसात ट्रेमधून चहा येई, तेव्हा ते मला स्वतः चहा ओतून, साखर घालून देत. त्यांच्या कार्यालयात ते यजमान! तेव्हा चहा आपणच तयार करून द्यायला हवा असं त्यांना वाटे. त्यांच्या कार्यालयात चर्चेच्या वेळी ते आपल्या जागेवरून उठून येरझाऱ्या मारीत असत. त्या वेळी काही वाचन वा लिहिणं चालू नसल्यानं सर्व दिव्यांची गरज नसे. तेव्हा शास्त्री स्वतः सार्वजनिक पैशाचा अपव्यय टाळावा म्हणून काही दिवे बंद करीत. मला मात्र दिवे बंद करायला सांगावं असा विचार त्यांच्या मनात सुद्धा येत नसे.

शास्त्री प्रसिद्धीसाठी आसुसलेले नव्हते. मात्र पंतप्रधान झाल्यावर आपलं म्हणणं जनतेपर्यंत पोचावं असं त्यांना वाटे. या दृष्टीनं काही संपादक व राजकीय विश्लेषक वा स्तंभलेखक यांच्याशी जवळचे व खुले संबंध त्यांनी ठेवले. अतिडाव्या विचारसरणीची मंडळी सोडून सर्वसाधारणपणं शास्त्रींच्या धोरणांचं कौतुक होई. 'द इंडियन एक्स्प्रेस'चे संपादक फ्रँक मोराइस, 'हिंदुस्थान टाइम्स'चे संपादक एस. मुळगावकर, 'द स्टेट्समन'चे संपादक प्राण चोप्रा यांच्याशी शास्त्रींचा नियमित संपर्क असे.

राज्यांच्या स्वायत्ततेचं मोल ते मानीत असत. पंतप्रधान हा सर्वसत्ताधीश असून त्याच्या इच्छेनुसार सारा कारभार चालायला हवा, असं त्यांचं मुळीच मत नव्हतं. केंद्राच्या सत्तेचा अतिरेक अनिष्ट ठरेल व त्यामुळं मुख्य मंत्री कमजोर होतील, स्थानिक पातळीवरील प्रयत्न गुदमरतील, कल्पकता कोमेजेल व गटबाजीला प्रोत्साहन मिळेल असं त्यांना वाटे. ''केंद्र सरकार समंजस असलं पाहिजे, मतभेद कमी करून त्यानं सुसंवाद साधला पाहिजे, सलोखा निर्माण करण्याची भूमिका वठवायला पाहिजे.'' असं त्यांनी एकदा एल. पी. सिंग यांच्यापाशी बोलून दाखवलं होतं.

ज्या पक्षानं आपली पंतप्रधानपदी निवड केली त्या काँग्रेसचा त्यांना विसर पडला नाही. ते राष्ट्रीय नेते असले तरी अद्यापी जनतेचे नेते बनले नव्हते. १९५१ मध्ये काँग्रेसचे सरचिटणीस झाल्यापासून अनेक पक्षनेत्यांशी त्यांचे वैयक्तिक पातळीवर संबंध होते. अ. भा. काँग्रेस महासमितीचे सदस्य, काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य यांच्याशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. कामराज यांच्याशी तर त्यांची खास दोस्ती होती. त्यांना ते वारंवार भेटत असत. त्यामुळं सरकार हा दोनचाकी रथ बनला आहे असा काहींचा समज झाला होता. परंतु शास्त्रींनी हा गैरसमज दूर केला. पंतप्रधानपदाच्या जबाबदाऱ्या पार पाडताना आपले निर्णय आपणच घेत असतो असं त्यांनी स्पष्ट केलं. थोडक्यात म्हणजे महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाच्या मार्गदर्शनाखाली, रामायण व गीता यांतील नैतिक मूल्यांचे आचरण करीत, देशाचा कारभार आपल्या कल्पकतेनुसार चालवीत आणि सर्वांबद्दल आदर बाळगणारे सरकार अशी कल्पना रुजवीत भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून शास्त्री यांनी आपल्या कामाला आरंभ केला.

□□



।। नऊ ।।

# चौफेर वाटचाल

मंत्रिमंडळ बनवताना अगदी मूलभूत महत्त्वाचे मोठे फेरबदल करण्याचा शास्त्रींचा विचार नव्हता. अर्थात तरी काही नवे चेहरे मंत्रिमंडळात आणणं अत्यावश्यक होतं. तसंच काही अत्यंत महत्त्वाचे निर्णय घ्यायचे होते. सर्वात महत्त्वाचा व नाजुक निर्णय होता श्रीमती इंदिरा गांधी यांच्याबद्दलचा. त्यांना मंत्रिमंडळात घ्यावं असं शास्त्रींना वाटत होतं. एक तर त्या पं. नेहरूंच्या कन्या होत्या व दुसरं म्हणजे त्यांचा समावेश हे मागील सरकार पुढं चालू आहे याचं द्योतक ठरलं असतं. इंदिरा गांधी तयार झाल्या, परंतु माहिती व नभोवाणी खात्यासारखं कमी महत्त्वाचं खातं मिळावं अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. शास्त्रींनी ती मान्य केली.

दुसरा तितकाच महत्त्वाचा प्रश्न होता मोरारजीभाई देसाई यांच्याबद्दलचा. पंतप्रधानपदाच्या निवडणुकीच्या वेळी त्यांचं वर्तन शालीनतेचं व शिस्तीचं होतं. शास्त्रींना त्यांच्याबद्दल आदर होता. त्यांचा मंत्रिमंडळात अंतर्भाव करण्याची त्यांची इच्छा होती, परंतु त्यांचं मंत्रिमंडळातील स्थान कोणतं राहणार हा प्रश्न मोठा अवघड होता. पंतप्रधानपदानंतरचं दुसऱ्या क्रमांकाचं स्थान मोरारजीभाईंना हवं होतं. पण या क्रमांकावर गुलझारीलाल नंदा हे पण आपला दावा सांगत होते. नेहरूंच्या मंत्रिमंडळात ते दुसऱ्या क्रमांकावर होते आणि अल्पकाळ का होईना, त्यांनी पंतप्रधानपदही भूषविलं होतं. नंदांच्या मागणीला इंदिरा गांधींचा जोरदार पाठिंबा होता. पक्षातील डाव्या मंडळींचाही त्यांना पाठिंबा होता. कामराजांचाही कल तसाच होता. शास्त्रींची परिस्थिती

जणू वेढ्यात सापडल्यासारखी झाली. त्यांनी देसाईंना तिसऱ्या क्रमांकाचं स्थान द्यायचं ठरविलं. सुमारे तासभर त्यांनी देसाईंशी चर्चा केली, पण तिसरं स्थान पत्करण्यापेक्षा मंत्रिमंडळाच्या बाहेरच राहणं त्यांनी पसंत केलं. अर्थात मोरारजीभाईंनी आपली नाराजी कधीच जाहीरपणं प्रकट केली नाही. किंबहुना शक्य होईल तेव्हा अप्रत्यक्ष रीत्या शास्त्रींना पाठिंबाच दिला. देसाईंचं मन किती उदात्त व मोठं होतं हे शास्त्रींबद्दल त्यांनी एकदा काढलेल्या उद्‌गारांवरून दिसून येतं. ते म्हणाले होते, "मैं एक पुरुष हूँ। लालबहादुर महापुरुष हैं!"

शास्त्रींपुढचा तिसरा महत्त्वाचा प्रश्न होता तो अन्न व कृषी खात्यासाठी हुशार मंत्री शोधण्याचा. अन्नधान्याची आयात कमी करून देशाचं धान्योत्पादन वाढवण्याचा शास्त्रींचा निर्धार होता, तेव्हा यासंबंधीचं निश्चित धोरण आखून ते ठामपणं राबवणारी धडाडीची व्यक्ती त्यांना हवी होती. अखेर सी. सुब्रमण्यम यांच्याकडे हे खातं सोपवायचं त्यांनी ठरवलं. पोलाद, अवजड उद्योगधंदे व खाणउद्योग ही खाती यापूर्वी त्यांनी कुशलतेनं सांभाळली होती. म्हणूनच रूढ संकेत डावलून शास्त्री स्वतः सुब्रमण्यम यांच्या निवासस्थानी गेले. त्या वेळी काय घडलं हे सांगताना सुब्रमण्यम म्हणतात :

*"नेहरूंच्या नंतर शास्त्री पंतप्रधान झाले. त्यानंतर लागलीच ते दिल्लीतील माझ्या निवासस्थानी आले. पंतप्रधानांनी स्वतः होऊन येणं ही दुर्मिळ गोष्ट. मी त्यांच्या मंत्रिमंडळात सामील व्हावं असं त्यांनी सांगितलं. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर अशी 'विनंती' त्यांनी केली.*

*मला खातं कोठलं देणार याबद्दल आम्ही चर्चा केली. सध्याचंच खातं ठेवा, कारण काही पोलाद कारखान्यांच्या व अवजड उद्योगांच्या पुनर्रचनेच्या कामात मी गढलो असून या प्रयत्नांना यश आलं आहे, असं मी सांगितलं. त्यावर माझ्या विनंतीचा विचार करतो, असं ते म्हणाले."*

शास्त्रींना सुब्रमण्यम यांच्या विनंतीचा प्रामाणिकपणं विचार करायचा असल्यानं त्यांनी आपल्या मनातील कृषी खात्याचा प्रस्ताव बोलून दाखवला नाही. अन्न व कृषी खात्यासाठी अन्य नावांचा त्यांनी दिवसभर उहापोह केला. परंतु सुब्रमण्यम यांचीच निवड उत्तम ठरेल असं त्यांचं मत झालं. त्यांनी सायंकाळी सुब्रमण्यम यांना फोन केला आणि अन्न व कृषी खातं स्वीकारावं असं सांगितलं. दोघांत घडलेलं संभाषण सांगताना सुब्रमण्यम म्हणाले :

*"हा बदल कशासाठी?" असं मी विचारलं. तेव्हा ते म्हणाले, "दुसरा कोणीही ज्येष्ठ नेता हे खातं घ्यायला तयार नाही. कारण आधीच्या अनेक मंत्र्यांच्या दृष्टीनं हे खातं म्हणजे पानिपत ठरलं आहे." हे आव्हानात्मक काम असून ते मी स्वीकारावं असं त्यांचं म्हणणं होतं. त्यांनी अशा प्रकारे प्रस्ताव मांडला की तो नाकारणं मला शक्य नव्हतं."*

त्यापुढचा प्रश्न होता परराष्ट्र खात्याचा. नेहरूंच्या काळात हे खातं स्वतः नेहरू सांभाळीत. स्वतंत्र भारताचं परराष्ट्र धोरण आखण्यासाठी त्यांच्याइतकी उत्तम व लायक अशी दुसरी कोणी व्यक्ती नव्हती. अलिप्ततावाद व शांततामय संबंध हे त्यांचं धोरणच पुढं चालवायचं होतं. त्यासाठी खूप परदेश-प्रवासही करावा लागणार होता. त्याची शास्त्रींना हौस नव्हती. परराष्ट्र धोरण ही पंतप्रधानांची खास जबाबदारी असली तरी कॅबिनेट दर्जाचा मंत्री नेमावा, आणि त्यानं आपल्याशी सल्लामसलत करून काम करावं अशी त्यांची इच्छा होती. परंतु या खात्यासाठी लायक अशी व्यक्ती मिळेना. तेव्हा तात्पुरतं हे खातं आपल्याकडेच ठेवावं व योग्य व्यक्ती मिळताच ते त्याच्या सुपूर्द करावं असं त्यांनी ठरवलं.

९ जून १९६४ रोजी मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. ते मंत्रिमंडळ असं होतं :

| | |
|---|---|
| लालबहादुर शास्त्री | : पंतप्रधान, परराष्ट्र धोरण व अणुशक्ती |
| गुलझारीलाल नंदा | : गृह |
| टी. टी. कृष्णम्माचारी | : अर्थ |
| इंदिरा गांधी | : माहिती व नभोवाणी |
| सरदार स्वर्णसिंग | : उद्योग (अवजड इंजिनिअरिंग व तांत्रिक विकास) |
| स. का. पाटील | : रेल्वे |
| अशोककुमार सेन | : कायदा व समाजसुरक्षा |
| यशवंतराव चव्हाण | : संरक्षण |
| एन. संजीव रेड्डी | : पोलाद व खाण |
| सी. सुब्रमण्यम | : अन्न व कृषी |
| हुमायून कबीर | : पेट्रोलियम व रसायन |
| सत्यनारायण सिन्हा | : संसदीय कामकाज व दळणवळण |
| एच. सी. दासप्पा | : पाटबंधारे व वीज |
| एम. सी. छगला | : शिक्षण |
| डी. संजीवय्या | : मजूर व रोजगार |
| महावीर त्यागी | : पुनर्वसन |

यांखेरीज पंधरा राज्यमंत्री व वीस उपमंत्री यांचीही नेमणूक करण्यात आली.

## पंतप्रधानांचे निवासस्थान

ब्रिटिशांच्या राजवटीत लष्करप्रमुखांचं जे निवासस्थान होतं ते नेहरूंनी पंतप्रधानांचं निवासस्थान म्हणून निश्चित केलं. या निवासस्थानाचं नाव 'तीन मूर्ती भवन' असं ठेवण्यात आलं. पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत नेहरूंचं वास्तव्य तिथेच होतं. व्हाइसरॉयच्या निवासस्थानानंतर (नंतरचे राष्ट्रपतिभवन) राजधानीतील सर्वांत महत्त्वाचं हेच निवासस्थान होतं.

सर्वसाधारणतः नव्या पंतप्रधानांनी पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानी जावं

असा संकेत असतो. किंबहुना आपल्या वारसदारानं या निवासस्थानी राहावं असा कौल खुद्द नेहरूंनीही दिला असता याबद्दल मला शंका वाटत नाही. या अधिकृत निवासस्थानी साऱ्या सुखसोयी उपलब्ध होत्या, पंतप्रधानांच्या प्रतिष्ठेला ते साजेसं होतं व सुरक्षेच्या दृष्टीनंही योग्य होतं. तेव्हा या निवासस्थानी आपला मुक्काम हलवावा अशी विनंती गृहनिर्माण खात्याच्या मंत्र्यांनी शास्त्रींना केली. त्याऐवजी दुसरं निवासस्थान निवडलं, तर त्यावर बराच पैसा खर्च पडेल असंही मंत्र्यांचं म्हणणं होतं.

परंतु 'तीन मूर्ती भवन' हे नेहरूंच्या स्मृतीला अर्पण करावं व तिथे संग्रहालय व ग्रंथालय उभारावं अशी इच्छा पंडितजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या काही नातेवाइकांनी व्यक्त केली होती. नेहरूंच्या भगिनी कृष्णा हाथीसिंग यांनी शास्त्रींना पत्र पाठवून हा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाला श्रीमती इंदिरा गांधींचा पाठिंबा आहे असं शास्त्रींना कळवण्यात आलं. तो प्रस्ताव नाकारणं शक्य नव्हतं. तेव्हा काही दिवसांच्या आत तो अधिकृतपणं मान्य करण्यात आला. पंतप्रधानांचं अधिकृत निवासस्थान हे नेहरूंच्या स्मारकासाठी देण्यात आलं. हा बंगला न देता नेहरूंचं स्मारक इतरत्र उभारू द्यायचं अशी टीका काहींनी केली, परंतु शास्त्रींचा स्वभाव ज्यांना चांगला ठाऊक होता त्यांना ते असं का वागले असावेत हे बरोबर उमगलं.

त्या वेळी शास्त्री १, मोतीलाल नेहरू मार्ग या बंगल्यात राहत होते. परंतु तिथे स्वागत समारंभ आयोजिणं, अधिकृत पाहुण्यांचं आतिथ्य करणं यासाठी पुरेशा सोयी उपलब्ध नव्हत्या. तेव्हा दुसऱ्या बंगल्याचा शोध सुरू झाला. शास्त्रींना फार मोठ्या बंगल्यात जाण्याची इच्छा नव्हती. परंतु गृहमंत्र्यांच्या आग्रहाखातर हैदराबाद हाउस व जयपूर हाउस या दोन आलिशान निवासस्थानांची पाहणी करण्यासाठी ते कुटुंबियांसह गेले. परतल्यावर शास्त्रींच्या एका मुलानं "दोन्हींपैकी तुम्हांला कोठलं निवासस्थान पसंत आहे?" असं विचारलं तेव्हा "दोन्ही नाही," असं उत्तर त्यांनी दिलं. अशा प्रासादतुल्य वास्तूत राहायची आपली इच्छा नाही असं त्यांनी स्पष्ट सांगून टाकलं. आपली राहणी साधी, त्यामुळं सध्याचं आहे तेच निवासस्थान ठीक आहे, असा निर्वाळा त्यांनी दिला. तेव्हा स्वागतकक्ष, पाहुणे, पंतप्रधानांचं कार्यालय यांच्या दृष्टीनं शेजारचाच १०, जनपथ हा बंगला निवडण्यात आला आणि तो १, मोतीलाल नेहरू प्लेसला जोडण्यात आला. ते पंतप्रधानांचं अधिकृत निवासस्थान बनलं.

## पंतप्रधानांचं सचिवालय

पंतप्रधानांच्या सचिवालयाचा प्रमुख म्हणून केंद्र सरकारच्या सचिवाच्या दर्ज्याचा एक प्रमुख खासगी सचिव पंडित नेहरूंनी नियुक्त केला होता. त्याच्या पदाचं नाव बदलून 'पंतप्रधानांचा सचिव' असं शास्त्रींनी केलं. हा बदल नावापुरता असला तरी भारत सरकारच्या सर्व सचिवांच्यासारखं हे एक पद आहे असं चित्र निर्माण झालं. त्यामुळं अन्य मंत्रालयांसमवेत सल्लामसलत करणं, सुसूत्रीकरण करणं या कामांना गती आली. 'पंतप्रधानांचे संयुक्त सचिव' असं एक पद आरंभी निर्मिण्यात आलं.

अर्थखात्यात सचिव असलेले प्रख्यात सनदी अधिकारी लक्ष्मीकांत झा यांची त्या पदावर १२ जुलै १९६४ रोजी नियुक्ती करण्यात आली. त्यांना पंतप्रधानांच्या सचिवालयाचा प्रमुख करण्यात आलं व त्यांचा हुद्दा 'पंतप्रधानांचे सचिव' (सेक्रेटरी टु द प्राइम मिनिस्टर) असा करण्यात आला. झा हे आर्थिक बाबींचे तज्ज्ञ होते, म्हणून शास्त्रींनी त्यांची निवड केली होती. खुद्द शास्त्रींना आर्थिक बाबी हाताळण्याचा फारसा पूर्वानुभव नव्हता. संयुक्त सचिवपदी आय. ए. एस. श्रेणीतील दुसरे एक हुशार अधिकारी राजेश्वर प्रसाद यांची त्यांनी नियुक्ती केली. शास्त्री हे कॅबिनेट मंत्री असताना प्रसाद यांनी त्यांच्याबरोबर काम केलं असल्यानं ते प्रसाद यांना चांगले ओळखतही होते. त्यानंतर काही काळानं माझी संयुक्त सचिवपदी नेमणूक झाली. खासगी सचिवासारखं माझं काम होतं व मला थेट पंतप्रधानांसमवेतच काम करावं लागे.

पंतप्रधानांच्या सचिवालयाला बळकटी आणल्यानं मंत्रिमंडळ सचिवालयाच्या कामाची पुनरुक्ती होईल की काय अशी शंका व्यक्त केली जाऊ लागली. परंतु कधी गंभीर पेचप्रसंग उद्‌भवला नाही. कारण एल. के. झा व मंत्रिमंडळ सचिव धर्मवीर हे व्यक्तिगत मित्र होते.

पंतप्रधानांचं सचिवालय आणि विशेषतः एल. के. झा यांची भूमिका किती महत्त्वाची होती? मायकेल ब्रेशर यांनी 'नेहरूज मँटल– द पॉलिटिक्स ऑफ सक्सेशन इन इंडिया' या पुस्तकात शास्त्री हे झा यांच्या प्रभावाखाली काम करीत होते असं नमूद केलं आहे. पंतप्रधानांचे सचिव म्हणून झा यांची नेमणूक झाल्यावर अवघ्या दोन महिन्यांनी झा यांच्या घेतलेल्या मुलाखतीच्या आधारे त्यांनी हे विधान २६ सप्टें. १९६४ रोजी केलं. परंतु समजा, एक वर्षानंतर म्हणजे २६ सप्टें. १९६५ रोजी ब्रेशर झा यांना भेटले असते तर कदाचित त्यांनी वेगळंच विधान केलं असतं. ब्रेशर यांनी केलेली निरीक्षणं गमतीची व रंजक आहेत. महत्त्वाची भाषणं, निवेदनं व पत्रं यांचे मसुदे तयार करणं हे सचिवालयाचं काम आहे असं झा म्हणतात, असा ब्रेशर यांनी दावा केला आहे. पंडित नेहरू हे स्वतः उत्कृष्ट मसुदे बनवीत व काम करण्याची त्यांच्यात प्रचंड क्षमता होती, तेव्हा सचिवालयाकडे असली कामं त्यांनी सोपवलीच नसती.

जेव्हा पंतप्रधान सचिवांच्या सल्ल्यावर जास्त अवलंबून राहू लागतात तेव्हा स्वतःचे विचार आणि दुसऱ्यांच्या कल्पना यांतील सीमारेषा धूसर बनत जाते. झा यांनी आपण अनेक महत्त्वाची पत्रं व भाषणं यांचे मसुदे तयार केल्याचं आपल्याला सांगितलं असं नमूद करून ब्रेशर म्हणतात :

*''पंतप्रधान महत्त्वाच्या धोरणात्मक बाबींबद्दल आपल्याशी सल्लामसलत करतात असं झा यांनी सांगितलं तेव्हा ते काही केवळ एका मंत्रालयाचे सचिव आहेत असं म्हणता येत नाही. किंबहुना झा यांच्यासारख्या प्रभावशाली अधिकाऱ्याच्या नेतृत्वामुळं पंतप्रधानांचं सचिवालय हे देशाच्या राजकारणाचं एक मोठं शक्तिशाली सत्ताकेंद्र*

*बनलं आहे. विशेषतः आर्थिक व परराष्ट्र धोरण यांबाबत त्यानं अनेकदा दबाव आणला आहे.''*

शास्त्री सल्ला ऐकून घेत असले तरी निर्णय ते स्वतःच घेत असत, हे ब्रेशरना ठाऊक नसावं. पंतप्रधानांच्या विचारार्थ एल. के. झा यांनी मसुदे बनवले असतील तर तो त्यांच्या कामाचाच एक भाग होता. आणि सर्व मसुदे काही झा तयार करीत नव्हते. विषयानुसार निरनिराळे अधिकारी मसुदे तयार करीत हे मला ठाऊक आहे. शास्त्रींना एखादा मसुदा पसंत नसेल तर ते तो नाकारीत, त्यात आपल्याला हव्या त्या दुरुस्त्या करीत, तो सुधारीत.

झा यांच्यामुळं शास्त्री शेतीला प्राधान्य देत, असं ब्रेशर सूचित करतात. परंतु खुद्द शास्त्रींना या विषयात रस होता. त्यांनी ९ जून १९६४ रोजी सी. सुब्रमण्यम यांची अन्न व कृषिमंत्री म्हणून नियुक्ती केली. कारण या विषयांना त्यांना सर्वाधिक प्राधान्य द्यायचं होतं. या निर्णयाशी झा यांचा काहीही संबंध नव्हता. कारण त्यांची तेव्हा पंतप्रधान सचिवालयात नेमणूकही झाली नव्हती. आर्थिक नियोजन, सामान्य माणसांचं कल्याण यांबाबतचे शास्त्रींचे विचार स्वतःचे होते आणि या संदर्भात नियोजन मंडळापुढं त्यांनी भाषणही केलं होतं. झा यांनी सचिव म्हणून काम करायला सुरुवात करण्यापूर्वीच त्यांनी हे विचार व्यक्त केले होते.

### हृदयविकाराचा सौम्य झटका

मंत्रिमंडळाची रचना केल्यावर काही दिवसांनी शास्त्री यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. हा दुसऱ्यांदा आलेला झटका होता. त्यांना विश्रांतीचा सल्ला देण्यात आला. या वेळचा त्यांचा झटका गंभीर नव्हता. त्यामुळं तो धोक्याचा इशारा आहे असं कोणी मानलं नाही. काही दिवसांनी त्यांना लोकांना भेटण्याची परवानगी देण्यात आली. सर्वप्रथम त्यांची विचारपूस करायला आलेल्यांमध्ये मोरारजी देसाई व कामराज हे होते.

लंडन इथे राष्ट्रकुलातील देशांच्या पंतप्रधानांची बैठक जुलैत भरणार होती. परंतु डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार या बैठकीला हजर राहण्याचा आपला बेत शास्त्रींनी रद्द केला. आपल्याऐवजी त्यांनी या बैठकीत टी. टी. कृष्णम्माचारी व इंदिरा गांधी या दोघा मंत्र्यांना पाठवलं. शास्त्री हजर राहू न शकल्यानं लंडनमधील संयोजकांची निराशा झाली.

५ जुलै १९६४ रोजी डॉक्टरांनी पत्रक काढून शास्त्रींची तब्येत चांगली असून यापुढं त्यांच्या प्रकृतीविषयी पत्रक काढण्याची आवश्यकता नाही, असं जाहीर केलं. शास्त्री लवकरच खडखडीत बरे झाले व पुन्हा नेहमीची कामं पाहू लागले.

शास्त्री यांनी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळाचं सर्वसाधारणपणं स्वागत झालं. नेहरूंनंतर शास्त्रींकडे सत्तांतर ज्या कार्यक्षमतेनं व झटपट झालं त्यामुळं जग प्रभावित झालं होतं.

भारताची राजकीय परिपक्वताच त्या वेळी दिसून आली.

आता महत्त्वाच्या तातडीच्या धोरणात्मक बाबींकडे शास्त्री लक्ष देऊ लागले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण झाल्या होत्या. चौथी पंचवार्षिक योजना आखण्यात येत होती. भाववाढ– खास करून धान्याच्या किमतींतील वाढ– हा नव्या सरकारपुढील सर्वात गंभीर प्रश्न होता.

सरकारच्या हाती आर्थिक सत्ता केंद्रित झालेली असून प्रभावी, कार्यक्षम अंमलबजावणी होत नाही, हे आर्थिक समस्यांचं कारण आहे हे शास्त्रींना उमगलं होतं. त्यातून नियमांचं एवढं जंजाळ होतं की, खासगी क्षेत्राच्या उत्साहावर पाणी पडायचं. या दोन्ही घटकांमुळं कालापव्यय, नासाडी, खर्चातील भरमसाठ वाढ आणि वाढता भ्रष्टाचार होत होता. अर्थव्यवस्थेचं उदारीकरण करण्यास शास्त्री अनुकूल होते. अग्रक्रमात मूलभूत बदल करावेत व अजूनही अन्न, वस्त्र व निवारा यांपासून वंचित राहिलेल्या गरीब वर्गाकडे खास लक्ष पुरवण्यात यावं असं त्यांचं मत होतं.

त्रिवेंद्रम येथे गांधी स्मारक निधीच्या पायाभरणी समारंभाच्या वेळी २१ फेब्रु. १९६५ रोजी भाषण करताना ते म्हणाले,

*"मोठे प्रकल्प, मोठे उद्योगधंदे, मूलभूत उद्योगधंदे हवेत याबद्दल शंका नाही. पण समाजातील दुबळ्या वर्गाच्या, सामान्य माणसाच्या कल्याणाला सर्वाधिक महत्त्व देणं आवश्यक आहे. त्याच्या अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सोयी, बालकांसाठी खेळ व अन्य सुविधा यांचा विचार करायला हवा. प्रत्येकाच्या या मूलभूत अत्यावश्यक गरजा आहेत. विशेषतः ग्रामीण भागात त्यांची अधिक निकड आहे. आपण नियोजन करताना– मग ते कितीही मोठं असलं तरी– या बाबींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सामान्य माणसाचा, दुबळ्या वर्गाचा विचार न करता आपल्याला योजना आखताच येणार नाहीत."*

आपल्या योजनांची निश्चित मुदतीत काटेकोरपणं आणि कार्यक्षमतेनं अंमलबजावणी केली पाहिजे, यावर ते वारंवार आपल्या भाषणातून भर देत.

शक्य तितक्या लवकर अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत देश स्वावलंबी बनेल, अशा रीतीनं नियोजन मंडळानं शेती विकासाची एकात्मिक गतिमान योजना आखावी, असा त्यांचा आग्रह होता. औद्योगिक क्षेत्रात अवजड उद्योगधंद्यांचे प्रकल्प हे दीर्घकालीन स्वरूपाचे असतात व त्यामुळे चलनवाढीचा दबाव येतो. तेव्हा लवकर फलनिष्पत्ती होणारे प्रकल्प हाती घ्यावेत असं जुलै १९६४ मध्ये शास्त्री यांनी एका भाषणात सूचित केलं. त्यामुळं नियोजन मंडळात नव्या विचारांचे वारे वाहू लागले. ज्या बड्या दीर्घकालीन प्रकल्पांच्या उभारणीला अद्याप आरंभ झालेला नव्हता ते चौथ्या योजनेपर्यंत पुढं ढकलण्याचा विचार सुरू झाला आहे, असं 'द हिंदुस्थान टाइम्स'च्या १३ जुलै १९६४ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तात म्हटलं होतं.

आर्थिक विकासाचे फायदे सामान्य माणसापर्यंत पोचावेत, रोजगाराच्या संधी

उपलब्ध व्हाव्यात म्हणून ग्रामीण विकासाच्या, विशेषतः ग्रामीण भागात औद्योगीकरणाच्या योजना हाती घ्याव्यात असंही शास्त्रींनी सांगितलं. ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनावर भर द्यावा असं त्यांनी नियोजन मंडळापुढं भाषण करताना सुचवलं. वृत्तपत्रांनी त्यांच्या या मतांचं स्वागत केलं.

## डाव्यांचे हल्ले

आर्थिक नियोजन व विकास यांबद्दलच्या शास्त्रींच्या व्यावहारिक विचारानं डाव्या विचारांची व कट्टरपंथी मंडळी संतापली. महालनोबिस आराखड्यानुसार नियोजनबद्ध विकासाच्या पं. नेहरूंच्या धोरणापासून आपण ढळत आहोत असा ओरडा त्यांनी सुरू केला. ७ सप्टेंबर १९६४ ला नव्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन सुरू झालं. नव्या पंतप्रधानांचं हे पहिलंच अधिवेशन होतं. त्याला मोठ्या नाट्यपूर्ण रीतीनं आरंभ झाला. स्वतंत्र पार्टी सोडून बाकी विरोधी पक्षीयांनी सरकारवर अविश्वासाचा ठराव मांडला. त्याला नियमानुसार ५० हून अधिक सदस्यांनी पाठिंबा दिल्यानं तो दाखलही करून घेण्यात आला. शास्त्रींच्या सरकारला अधिकारावर येऊन जेमतेम तीनच महिने झाले होते. तेव्हा त्यांना धोरणं ठरवायला अधिक अवधी द्यायला हवा असं स्वतंत्र पार्टीचं मत असल्यानं त्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला नाही. लोकसभाध्यक्षांनी या प्रस्तावावरील चर्चेसाठी ११ सप्टें. १९६४ ही तारीख निश्चित केली.

दरम्यान देशातील बिघडत चाललेल्या अन्नधान्य परिस्थितीबाबत लोकसभेत चर्चा झाली. अपुरं उत्पादन व महागाई यांबद्दल सरकारवर कडक टीका केली गेली. साठेबाजांना, काळाबाजारवाल्यांना सरकार संरक्षण देत आहे, असा आरोप केला गेला. जनसंघ नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी मोठ्या प्रमाणावरील तुटीचं नियोजन व बिगरनियोजन खर्चात सतत होणारी वाढ ही भडकत्या महागाईमागील कारणं आहेत असं सांगितलं. या सर्व टीकेत तथ्य असलं तरी या दीर्घकालीन बाबींचं खापर केवळ तीन महिन्यांपूर्वीच सत्तेवर आलेल्या शास्त्री सरकारवर फोडलं जात होतं. अन्न व कृषी खात्याच्या मंत्र्यांनी या टीकेला जोरदार उत्तर दिलं व अन्नधान्याच्या बाबतीत राजकारण खेळू नका असं विरोधकांना आवाहन केलं. साठेबाजीला आळा बसावा म्हणून सरकार करीत असलेल्या उपाययोजनांची त्यांनी माहिती दिली. सध्या तरी धान्य निर्यात करण्याला पर्याय नाही, असं सांगून त्याबाबत मदत करीत असलेल्या अमेरिकेचे त्यांनी आभार मानले. धान्योत्पादनवाढीचं दीर्घकालीन धोरण सरकार आखीत आहे असं सांगून त्याची मुख्य वैशिष्ट्यं त्यांनी विशद केली. त्यांचं भाषण ऐकून सरकार योग्य दिशेनं पावलं टाकीत आहे, अशी बहुतेक सदस्यांची खात्री पटली.

त्यानंतर ११ सप्टेंबर रोजी एन. सी. चतर्जी (अपक्ष) यांनी सरकारवर अविश्वास दर्शवणारा ठराव मांडला. प्रत्येक आघाडीवर सरकार अयशस्वी झालं आहे, असा आरोप त्यांनी केला. अनेक सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला व आपापल्या पक्षांच्या धोरणानुसार काहींनी प्रस्तावास पाठिंबा तर काहींनी विरोध केला.

१४ सप्टेंबर रोजी कम्युनिस्ट पक्षाचे खासदार हिरेन मुकर्जी यांचं घणाघाती भाषण झालं. त्यामुळं चर्चेत चांगलाच रंग भरला. त्यांनी पंतप्रधानांवर जोरदार हल्ला चढवला. अवजड उद्योगांच्या विकासाच्या पं. नेहरूंच्या धोरणाला शेतीविकासाच्या नावाखाली डावललं जात आहे. देशांतर्गत धोरणं, परराष्ट्रीय धोरण यांबाबत नेहरूंनी घालून दिलेला मार्ग हे सरकार सोडून चाललं आहे. शास्त्रींचं व्यक्तिमत्त्व दुटप्पी आहे. एका बाजूला ते नेहरूंच्या धोरणांचा उद्घोष करतात, पण त्यांचं वागणं मात्र त्याच्याशी सुसंगत नाही, अशा स्वरूपाची टीका त्यांनी केली.

अविश्वासाच्या ठरावावरील ही चर्चा पाच दिवस चालली. १८ सप्टें. १९६४ रोजी शास्त्रींनी या चर्चेला दोन तास उत्तर दिलं. वक्त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना त्यांनी तपशीलवार उत्तरं दिली. विषयावरील त्यांची पकड आणि विलक्षण स्मरणशक्ती यांचंच प्रत्यंतर त्या वेळी आलं. नंतर हिरेन मुकर्जींनी केलेल्या आरोपांचा त्यांनी समाचार घेतला. आपलं व्यक्तिमत्त्व दुटप्पी आहे हा त्यांचा आरोप अत्यंत आक्षेपार्ह आहे. चीननं भारतावर आक्रमण केलं आहे की नाही याबद्दल अजून शंका प्रकट करणाऱ्या कम्युनिस्ट सदस्यांच्या मुखात ही भाषा शोभत नाही, असं ते म्हणाले. तेव्हा काँग्रेस सदस्यांनी जोरदार टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला.

नेहरूंच्या धोरणापासून आपण ढळत आहोत या आरोपाला चोख उत्तर देताना ते म्हणाले :

*''नेहरूंच्या धोरणापासून मी ढळत आहे, असं हिरेन मुकर्जी यांनी सूचित केलं आहे. खरं म्हणजे त्यांच्यासारख्या प्राध्यापकाला वस्तुस्थिती समजणं कठीण जाऊ नये. परंतु ते पडले कम्युनिस्ट. त्यामुळं कम्युनिस्ट विचारसरणीच्या चौकटीबाहेर त्यांना विचार करणं कठीण आहे. लोकशाहीमध्ये 'ढळणं' वा 'ढळणारा' असं काही नसतं. किंबहुना लोकशाहीच्या शब्दकोशात हा शब्दच नाही. लोकशाहीत नव्या योजना, नवी धोरणं आखण्याचं स्वातंत्र्य, पुनर्विचार यांना पूर्ण वाव असतो.*

*मी निवडून आलो त्याच दिवशी आणि नंतरही आंतरराष्ट्रीय बाबींबाबत सरकार नेहरूंच्या धोरणांचा पाठपुरावा करील आणि लोकशाही समाजवाद हे आपल्या देशांतर्गत धोरणाचं उद्दिष्ट राहील हे मी स्पष्ट केलं होतं. आपल्या स्वातंत्र्य-आंदोलन-काळात काय घडलं याचं मी स्मरण करून देऊ काय? महात्मा गांधींनी नेतृत्व हाती घेतल्यावर काय घडलं होतं? तेव्हा पूर्ण फेरबदल झाले होते. तत्त्वज्ञान, धोरण, कार्यक्रम, पद्धती यांत आमूलाग्र बदल केले गेले होते. म. गांधी हे लोकमान्य टिळक, अरविंद घोष, लाला लजपत राय यांच्या मार्गापासून 'ढळले' होते. तेव्हा तुम्ही त्यासाठी गांधीजींचा निषेध करणार काय? मला नाही तरी निदान गांधीजींना प्रा. मुकर्जी माफ करतील अशी अपेक्षा आहे!*

*आणि जवाहरलाल नेहरू यांच्याबाबत तरी काय घडलं? एक प्रकारे गांधीजी त्यांचे गुरू होते. परंतु गांधीजींशी ते पूर्णतः सहमत होते का? नव्हते. तरीही*

नेहरूंइतका गांधीनिष्ठ दुसरा कोणी सापडेल काय? त्यांचं गांधीजींवर अतिशय प्रेम होतं व त्यांनी आपली सारी निष्ठा त्यांच्या चरणी वाहिली होती. तरीही त्यांची स्वतःची विचार करण्याची स्वतंत्र पद्धती होती. नेहरू जेव्हा सरकारमध्ये सामील झाले तेव्हा त्यांना गांधीजींची प्रत्येक कल्पना काही अमलात आणता आली नाही.

आणि केवळ भारतापुरताच का विचार करायचा? सोविएत रशियात जेव्हा पहिलं कम्युनिस्ट सरकार अस्तित्वात आलं, तेव्हा लेनिननं कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटल'मधील सर्व धोरणं अमलात आणायचा प्रयत्न केला. परंतु त्यांतील काही अमलात आणणं अशक्य आहे असं त्यांच्या ध्यानात आलं तेव्हा त्यांनी नवं आर्थिक धोरण जाहीर करून ते अमलात आणलं. मार्क्सनं आपल्या ग्रंथात जे म्हटलं होतं त्यापासून हे 'ढळणं'च होतं.

लेनिन गेले व स्टॅलिन आले. त्यांनी काय केलं? स्टॅलिननी काय केलं हे सर्वांनाच ठाऊक आहे. ते लेनिनपेक्षा फार वेगळे होते. लेनिनना मी जगातील एक महान क्रांतिकारक मानतो, पण स्टॅलिनना मी क्रांतिकारक मानीतच नाही. सोविएत भूमीवर आपला ताबा असावा म्हणून त्यांनी सरकारी यंत्रणा राबवली.

आता पंतप्रधान क्रुश्चेव्ह कोणती धोरणं अमलात आणताहेत? त्यांनी स्टॅलिन व त्याची धोरणं यांचा कडक भाषेत निषेध केला. मूलभूत तत्त्वज्ञान त्यांना मान्य असलं तरी चाकोरीबद्ध वाटेनं जाण्यास त्यांनी नकार दिला आणि नवा कार्यक्रम आखला. यामुळं क्रुश्चेव्हना मी जगातील एक थोर नेते मानतो. राजकीय क्षेत्रात परिस्थिती बदलते, माणसं बदलतात आणि खऱ्या नेत्यानं या बदलत्या गोष्टींना प्रतिसाद द्यायला हवा.

आमच्या उणिवा वा दोष यांवर पांघरूण घालण्यासाठी आम्हाला नेहरूंचं नाव घेण्याची गरज नाही. ज्या नेत्याबरोबर आम्ही अर्धशतक घालवलं ते महान नेते, आमचे 'हीरो', आमचे पंतप्रधान नेहरू यांना आम्ही कधीच विसरू शकत नाही.

आंतरराष्ट्रीय गोष्टींत आम्ही निश्चित ठरवून दिलेल्या मार्गानं जात आहोत. अलिप्ततावादाच्या आणि शांततेच्या मार्गानं आंतरराष्ट्रीय वाद मिटवावे यावर आमचा विश्वास आहे. वसाहती असता कामा नयेत व वंशवादाला विरोध केला पाहिजे, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. सहअस्तित्वाचं धोरण बलशाली असून पं. नेहरूंनी त्याचा पाठपुरावा केला. आमचा त्याला पूर्ण पाठिंबा आहे. या धोरणामुळं काही बाबतीत बडी राष्ट्रंही एकमेकांच्या जवळ येत आहेत. युद्धाचा धोका हा जगाला– विशेषतः गरिबी व बेरोजगारी यांसारख्या प्रश्नांशी संघर्ष देणाऱ्या भारतासारख्या देशांना– विनाशकारी ठरेल.

दुसऱ्यांशी न बोलता, चर्चा न करता एकाकी राहण्याची कल्पना मला पसंत नाही. भिन्न मतांचा आपण नेहमीच आदर करीत आलेलो आहोत व त्यामुळं कधी असहिष्णुता दिसते तेव्हा मला दुःख होतं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी उद्‌घाटनाच्या भाषणात म्हटलं होतं : "भीतीपोटी कधी वाटाघाटी करू नयेत,

*आणि वाटाघाटींची कधी भीती वाटता कामा नये." माझ्या मते हे उत्कृष्ट तत्त्व असून आपण आपल्या देशात ते अंगिकारलं पाहिजे."*

*आपल्या सामाजिक व आर्थिक चिंतनाचे विषय सांगून शास्त्रींनी विरोध मोडून काढला. शेवटी ते म्हणाले :*

*"लोकशाही व समाजवाद यांना आम्ही ठामपणं कटिबद्ध आहोत याचा पुनरुच्चार करून मी भाषणाचा शेवट करू इच्छितो. शेतीत गुंतलेले कोट्यवधी लोक, कारखान्यांतील कामगार व भडकत्या महागाईची झळ पोचलेला मध्यमवर्ग यांच्या भल्यासाठी प्रयत्न करणं म्हणजे समाजवाद असं मी मानतो. आमच्या देशाची ही सर्वसामान्य जनता आहे. लोकांच्या कल्याणाची हमी देणारी सामाजिक व आर्थिक रचना निर्माण करणं यासाठी सरकारचा प्रमुख म्हणून मी अहर्निश झटत राहीन."*

नवे प्रयत्न सुरू करण्याच्या भूमिकेचं पंतप्रधानांचं हे जोरदार समर्थन ऐकून काँग्रेस खासदारांना मोठाच आनंद झाला. बिगरकम्युनिस्ट विरोधी पक्ष त्यांच्या स्पष्ट व प्रामाणिक उत्तरानं निरुत्तर झाले आणि कम्युनिस्टांना त्यांची जागा दाखवून दिली गेली. शास्त्री आपल्या भूमिकेशी खंबीर राहिले. ते अधिकारवाणीनं बोलले. अविश्वासाचा ठराव प्रचंड बहुमतानं फेटाळण्यात आला. काँग्रेस संसदीय पक्षाच्या कार्यकारिणीच्या नंतर झालेल्या बैठकीत शास्त्रींचं अभिनंदन करण्यात आलं. संसदेच्या इतिहासातील एक मैलाचा टप्पाच अशा शब्दांत सभासदांनी या भाषणाचा गौरव केला. पंतप्रधान या नात्यानं त्यांनी केलेल्या या पहिल्याच भाषणानं सभागृहाचे नेते म्हणून त्यांची चांगली ख्याती झाली.

## देशाचं संरक्षण

ऑक्टोबर १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर भारतानं संरक्षण दलाच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीनं पावलं उचलायला सुरुवात केली होती. पंतप्रधान शास्त्रींनी संरक्षणाबरोबरच शेतीला अग्रक्रम दिला. 'जय जवान, जय किसान' या त्यांनी नंतर दिलेल्या घोषणेवरून हे सिद्ध होतं.

मे १९६४ मध्ये संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी अमेरिकेचा दौरा केला होता. अमेरिकेचे संरक्षणमंत्री रॉबर्ट मॅक्नामारा, परराष्ट्रमंत्री डीन रस्क व गव्हर्नर ॲव्हरेल हॅरिमन यांच्याबरोबरची त्यांची चर्चा उपयुक्त झाली. अमेरिकन सरकारनं खालील प्रकारची मदत करायला मान्यता दिली :

(१) लष्करी दारूगोळा कारखान्यातील यंत्रसामग्री अद्ययावत करण्यासाठी व आधुनिकीकरणासाठी संरक्षण साहित्य व उपकरणं अमेरिकेकडून खरेदी करण्यासाठी १ कोटी डॉलर्सचं साहाय्य.

(२) १९६४ च्याच पातळीवर १९६५ सालीही लष्करी अनुदान दिलं जाईल. इंडियन माउंटन डिव्हिजन, हवाई दल दळणवळण यंत्रणा, मालवाहू विमानं व सीमा रस्ते संघटनेला रस्ते उभारण्यासाठी लागणारी उपकरणं या कामांसाठी हे अनुदान

वापरलं जाईल.

(३) अंबाझरी येथे तोफगोळ्यांचा कारखाना उभारण्यासाठी व अन्य काही बाबींसाठी आणखी ५ कोटी डॉलर्सचं साहाय्य १९६५ मध्ये उपलब्ध करून दिलं जाईल.

यशवंतराव चव्हाण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांना २५ मे रोजी भेटणार होते, परंतु २७ मे रोजी पं. नेहरूचं निधन झाल्यानं त्यांना आपला दौरा अर्धवट टाकून भारतात परतावं लागलं होतं.

संरक्षण उत्पादनाची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीनं तांत्रिक साहाय्य इत्यादी मिळविण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी सोविएट युनियनचाही दौरा केला. ते मॉस्कोला २८ ऑगस्ट १९६४ रोजी पोचले. संरक्षणमंत्री मॅलिनोव्हस्की व परराष्ट्र आर्थिक संबंध समितीचे सदस्य यांच्याशी त्यांनी चर्चा केली. निकिता क्रुश्चेव्ह यांच्याशीही त्यांच्या वाटाघाटी झाल्या. या सर्व चर्चेचं फलित असं :

(१) मिग विमान कारखान्यांच्या उभारणीसाठी सोविएट सरकार आवश्यक ती यंत्रसामग्री देईल. तपशीलवार प्रकल्प व उत्पादनाचा कार्यक्रम आखण्यासाठी सोविएट तंत्रज्ञांचं पथक मदत करील, त्याचप्रमाणं मिग-२१ विमानाच्या आरंभीच्या उत्पादनासाठी सारे भाग पुरवील आणि ते जुळवून देईल. या सर्व बाबी निश्चित करण्यात आल्या.

(२) काही मिग-२१ विमानं व तत्संबंधीची यंत्रसामग्री खरेदी करण्याचा करार झाला.

(३) काही हलके रणगाडे व तत्संबंधीची उपकरणं पुरवण्यास सोविएट रशियानं मान्यता दिली.

या सर्व गोष्टी भारतीय चलनात विकत देण्याचं रशियानं मान्य केलं. त्या रकमेतून ते भारतीय माल खरेदी करणार होते.

२१ सप्टेंबर १९६४ रोजी यशवंतराव चव्हाण यांनी लोकसभेत संरक्षणविषयक पंचवार्षिक योजना जाहीर केली. त्यानुसार मार्च ६९ पर्यंत सैन्यदलाचं संख्याबळ ८,२५,००० इतकं करणं व अत्याधुनिक लढाऊ विमानांची हवाई दलात ४५ स्क्वॉड्रन्स तयार करणं याबद्दलचा संकल्प सोडण्यात आला. अमेरिका व सोविएट युनियन यांच्याशी झालेल्या एकूण संरक्षणविषयक करारांचीही माहिती त्यांनी दिली. भारताच्या अलिप्ततावादी धोरणाची या उभय देशांनी खूप प्रशंसा केल्याचंही त्यांनी नमूद केलं.

हे सारं आश्वासक होतं. देश संरक्षणसिद्धतेच्या दृष्टीनं योग्य पावलं टाकीत होता.

## प्रशासन

प्रशासन स्वच्छ असलं पाहिजे आणि मंत्र्यांनी प्रामाणिक असलं पाहिजे यावर शास्त्रींचा कटाक्ष होता. केंद्रीय मंत्रिमंडळानं १५ सप्टेंबर १९६४ रोजी मंत्र्यांसाठी एक तपशीलवार आचारसंहिता मंजूर केली. केंद्रीय मंत्र्यांवरील आरोपांची चौकशी करण्याचे अधिकार पंतप्रधानांकडे व राज्यातील मंत्र्यांविरुद्धच्या आरोपांची चौकशी करण्याचे अधिकार त्या त्या राज्याच्या मुख्य मंत्र्यांकडे देण्यात आले. प्रशासकीय यंत्रणेतील

भ्रष्टाचारविषयक आरोपांची दखल घेण्यासाठी एक केंद्रीय दक्षता आयोग स्थापन करण्यात आला. शास्त्री गृहमंत्री असताना त्यांनी यासाठी संथानम समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशींनुसार वरील निर्णय घेण्यात आले.

सरकारी यंत्रणेतील लाल फितीचा कारभार कमी व्हावा व निर्णय प्रक्रियेचा वेग वाढावा म्हणून शास्त्रींनी प्रशासन सुधारणा आयोगाची नेमणूक केली.

ज्येष्ठ अधिकारी सदा न् कदा कोठल्या ना कोठल्या बैठकीत गुंतलेले असतात. त्यामुळं तातडीच्या निर्णयांनाही विलंब होत असे. कोणत्याही ज्येष्ठ अधिकाऱ्याकडे फोन केला तर 'साहेब मीटिंगमध्ये आहेत' असं उत्तर मिळे! तेव्हा आठवड्यातील एक दिवस बिनबैठकीचा दिवस असावा, त्या दिवशी पडून राहिलेल्या फाइल्स त्यांनी निकालात काढाव्यात, निर्णय घ्यावेत असं शास्त्रींनी ठरवलं. दर बुधवार असा 'बैठकरहित' वार राहील असं ठरवण्यात आलं.

ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा छळ करण्यासाठी कधी कधी नाराज कर्मचारी वा उपद्रवी मंडळी निनावी तक्रारी पाठवतात. अशा निनावी पत्रांची दखल घेऊ नये असाही निर्णय पंतप्रधानांनी घेतला. त्यानुसार मंत्रिमंडळ सचिव धर्मवीर यांनी एक परिपत्रक काढलं.

## अन्नधान्य समस्या

भारताच्या नियोजकांनी कृषिक्षेत्राला अग्रक्रम दिला नव्हता हे आता सांगितलं तर आश्चर्य वाटेल, पण ती वस्तुस्थिती होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेत सोविएट रशियाच्या धर्तीवर आपण अवजड उद्योगधंद्यांना प्राधान्य दिलं. हळूहळू अन्नधान्याची टंचाई वाढू लागली. लोकसंख्या वाढत होती. त्यामुळं मूलतः कृषिप्रधान देश असूनही धान्याची आयात करणं आवश्यक होऊन बसलं. 'पीएल ४८०' (पब्लिक लॉ ४८०), व 'एड प्रोग्रॅम' याखाली मुख्यतः अमेरिकेकडून ही आयात केली जाऊ लागली. १९५६ साली जवळजवळ अडीच लाख टन धान्य आयात झालं. पण नंतर त्याचं प्रमाण वाढत गेलं. हे पुढील आकड्यांवरून लक्षात येईल :

| वर्ष | अमेरिकेकडून करण्यात आलेली एकूण आयात (मेट्रिक टनांत) |
|---|---|
| १९५६ | २,३६,३५८ |
| १९५७ | २२,००,५३४ |
| १९५८ | २२,२७,३८६ |
| १९५९ | ३६,७६,८५९ |
| १९६० | ३५,२९,७९२ |
| १९६१ | ३९,५०,१०८ |
| १९६२ | २६,८२,९३८ |
| १९६३ | ४०,५८,५१० |

जून १९६४ मध्ये शास्त्री पंतप्रधान झाले तेव्हा देशात अन्नधान्याची तीव्र टंचाई होती, साठेबाजीला ऊत आला होता व भाव भडकले होते. नवे अन्न व कृषिमंत्री सी. सुब्रमण्यम आपल्या परीनं परिस्थितीला तोंड देण्याचा शक्यतो प्रयत्न करीत होते. दुर्दैवाने त्या वर्षी पावसानं दगा दिल्यानं परिस्थिती आणखी बिकट बनत चालली होती. साठेबाजांविरुद्ध केंद्र व राज्य सरकारं कारवाई करण्यास डगमगत होती. त्यामुळं परिस्थिती जास्तच घसरली व शास्त्रींचं सरकार डळमळू लागलं आहे असं वाटू लागलं. राज्य सरकारांच्या मुख्य मंत्र्यांशी शास्त्री संपर्क साधून होते. अन्नधान्याचे देशात विविध विभाग निर्माण करावेत, प्रमुख शहरांत शिधावाटप योजना लागू करावी अशा बाबींचा विचार करण्यासाठी त्यांनी मुख्य मंत्र्यांची दिल्लीत बैठक बोलावली.

साठेबाज, काळाबाजारवाले यांच्या विरुद्ध कडक कारवाई करा असा सल्ला पंतप्रधान व मुख्य मंत्री यांना सतत दिला जात होता. थोडीफार कारवाई त्यांनी केलीही, पण मोठ्या प्रमाणात अटकसत्र आरंभलं तर परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल अशी भीती वाटत होती. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात धान्य आयात करण्याशिवाय तरणोपाय नाही, असं शास्त्रींनी निश्चित केलं. त्याच वेळी भारत धान्योत्पादन वाढवण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, अशी आपली व्यक्तिशः खात्री पटली पाहिजे, असा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांचा आग्रह असल्याचे संकेत मिळाले. किंबहुना अमेरिकेचे कृषिमंत्री ऑरव्हिल एल. फ्रीमन यांनी भारतानं कृषिक्षेत्रात जास्तीत जास्त गुंतवणूक करणं हाच त्यांच्या धान्यविषयक गरजा भागवण्याचा मार्ग आहे, असं भारताला एप्रिल १९६४ मध्ये दिलेल्या भेटीच्या वेळी स्पष्ट केलं होतं.

शास्त्रींना याची जाणीव होती व म्हणूनच तर चौथ्या पंचवार्षिक योजनेत त्यांनी शेतीला अग्रक्रम दिला होता. परंतु राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांची खात्री पटावी म्हणून काही नव्या योजना हाती घेणं अत्यावश्यक होतं. भारताची अन्नधान्याची नाजुक स्थिती लक्षात घेऊन त्याचा राजकीय दडपण आणण्यासाठी जॉन्सन वापर करीत होते असं मला वाटत नाही. भारतानं अन्नधान्याच्या उत्पादनवाढीसाठी पावलं उचलावीत असा आग्रह धरून जॉन्सन एक प्रकारे भारतावर उपकारच करीत होते. अर्थात त्यांची ही पद्धत काहीशी रांगडी होती इतकंच.

अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आदी देशांतून जादा धान्याच्या आयातीसाठी प्रयत्न चालू असतानाच देशांतर्गत उत्पादनवाढीसाठी नवं धोरण आखावं असं शास्त्रींनी सी. सुब्रमण्यम यांना सांगितलं. या संदर्भात मी सुब्रमण्यम यांची ११ डिसेंबर १९९१ रोजी मुंबई इथे भेट घेतली. सुब्रमण्यम तेव्हा महाराष्ट्राचे राज्यपाल होते. त्यांनी आधीच्या नियोजकांनी शेतीक्षेत्राकडे कसं दुर्लक्ष केलं, त्याची परिणती अन्नधान्याचा पेचप्रसंग उद्‌भवण्यात कशी झाली वगैरे माहिती सांगितली. त्यांनी शेतीबाबत केवळ नोकरशाहीशीच नव्हे तर ज्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे अशा अनुभवी मंडळीशी चर्चा केली. अन्नधान्याची आधार किंमत फार कमी आहे असं लक्षात आल्यावर ती वाढवून देण्याबाबतचा एक प्रस्ताव त्यांनी मंत्रिमंडळापुढं ठेवला. परंतु त्यामुळं चलनवाढीत

भर पडेल असं सांगून अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांनी त्याला विरोध केला. परंतु शास्त्रींनी त्यांचं हे मत डावलून आधारमूल्यवाढीला अनुमती दर्शवली. त्यासाठी एका समितीची नियुक्ती करण्यात आली. धान्योत्पादकांना प्रोत्साहन म्हणून या आधार किमती १६ टक्क्यांनी वाढवाव्या अशी शिफारस या समितीने केली. त्याला पंतप्रधानांनी मंजुरी दिली. उत्पादकांना या किमतीचा लाभ व्हावा म्हणून धान्य खरेदी करण्यासाठी अन्न महामंडळ स्थापन करण्यात आलं. तसंच भावी काळात आधार किमती ठरवण्यासाठी कृषिमूल्य आयोगाचीही स्थापना करण्यात आली, असं सुब्रमण्यम यांनी सांगितलं.

उत्पादनवाढीच्या नव्या पद्धती शोधण्यासाठी कृषी वैज्ञानिकांचं साहाय्य घेण्याचंही सुब्रमण्यम यांनी त्या वेळी ठरविलं. या शास्त्रज्ञांना तेव्हा फारच कमी वेतन होतं व त्यामुळं सरकारी नोकरीत यायला ते फारसे राजी नसत. तेव्हा 'इंडियन कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्च'ची फेररचना व कृषी वैज्ञानिकांसाठी चांगली वेतनश्रेणी अशा सूचना सुब्रमण्यम यांनी केल्या. शास्त्री त्याशी सहमत झाले व त्यांनी हे प्रस्ताव मंत्रिमंडळात मंजूर करून घेतले.

कृषी मंत्रालयात या क्षेत्रातील राज्यपातळीवर प्रत्यक्ष अनुभव असलेल्या अधिकाऱ्याची सचिवपदी नेमणूक करण्याचंही सुब्रमण्यम यांनी ठरवलं. या कामासाठी त्यांनी त्या वेळी ओरिसात असलेले बी. शिवरामन यांची निवड केली. परंतु त्यांच्या बदलीस मुख्य मंत्री बिजू पटनाईक यांनी विरोध केला. तेव्हा खुद्द शास्त्री यांनी पटनाईक यांचं मन वळवलं, तेव्हा शिवरामन यांची नियुक्ती झाली. त्यांनी अन्न व कृषी मंत्रालयाच्या कामाचं स्वरूप बदलून त्याला अधिक व्यवहार्य स्वरूप दिलं.

दर एकरी धान्योत्पादनाचं उत्पादन-प्रमाण वाढविण्यासाठी चांगल्या प्रतीची बी-बियाणी व खतं आयात करण्याची गरज होती. त्यासाठी अर्थमंत्र्यांनी परकीय चलन उपलब्ध करून देणं आवश्यक होतं. या विषयावरही मंत्रिमंडळात वादविवाद झाला. अर्थमंत्र्यांनी प्रस्तावाला विरोध केला. अमेरिकेहून पीएल-४८० योजनेखाली आयात करायच्या धान्य-योजनेला अर्थमंत्रालय अधिक अनुकूल होतं. कारण त्याचे पैसे भारतीय चलनात द्यायचे होते. याही खेपेस शास्त्रींनी अन्न व कृषी खात्याच्या मंत्र्यांना पाठिंबा दिला व उच्च प्रतीची बी-बियाणी व खतं आयात करण्यासाठी पुरेसं परकीय चलन उपलब्ध करून देण्यात आलं.

उत्पादनवाढीच्या नवनव्या पद्धती शेतकऱ्यांनी अमलात आणाव्यात म्हणून खास प्रयत्न करण्याचीही गरज होती. तेव्हा गहू-उत्पादन क्षेत्रात प्रत्येकी पाच एकराचे १००० प्लॉट पाडण्यात येऊन तिथे या नव्या पद्धतीचं प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवलं जाऊ लागलं. नंतर ही योजना भात-उत्पादन क्षेत्रातही लागू करण्यात आली.

अशा प्रकारे विविध योजना हाती घेऊन शास्त्री व सुब्रमण्यम यांनी हरित क्रांतीला आरंभ केला. त्यामुळं वाढती लोकसंख्या असूनही देश अन्न-धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनण्याच्या मार्गाला लागला. या नव्या धोरणामुळं भारत शेतीला सर्वोच्च

प्राधान्य देत आहे अशी अमेरिकेची– विशेषतः अध्यक्ष जॉन्सन यांची– खात्री पटली.

अर्थात असे नानाविध उपाय योजले तरी अल्पावधीत धान्योत्पादन वाढणं शक्यच नव्हतं. या योजनांना फळं येण्यास काही वर्षांचा अवधी लागतो. दरम्यान त्या वेळी अन्नधान्य परिस्थिती दिवसेंदिवस बिघडू लागली होती. अमेरिकेचे भारतातील राजदूत चेस्टर बोल्स भारताला अधिक धान्य पाठवा अशी सतत विनंती आपल्या देशाकडे करीत होते. १९६५ मध्ये धान्य-आघाडीवर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली व दरमहा दहा लाख टन धान्य आयात करण्याची आवश्यकता भासू लागली. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील धान्य आपली बंदरं उतरून घेऊ शकतील काय, तशी व्यवस्था आहे काय, असा प्रश्न पडला. तेव्हा बंदर व गोदी कामगारांनी त्यांचे पुढारी एस. आर. कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली सरकारला पूर्ण सहकार्य दिलं व एवढ्या मोठ्या प्रमाणावरील धान्याची आयात सुरळीतपणं करता आली.

धान्य-आयातीत वाढ करावी म्हणून शास्त्री यांनी अमेरिकन सरकारशी वाटाघाटी करण्यासाठी सी. सुब्रमण्यम यांना डिसेंबर १९६५ मध्ये अमेरिकेस पाठवलं. राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी सुब्रमण्यम यांच्याशी व्यक्तिशः चर्चा करावी, अशी शास्त्रींनी विनंती केली होती. ती मान्य झाली. सुब्रमण्यम यांनी अमेरिकन सिनेटर्स व काँग्रेस सदस्य यांच्यासमोर भाषण केलं. त्यामुळं ते प्रभावित झाले. जॉन्सनही सुब्रमण्यम यांच्याशी झालेल्या चर्चेवर खूष होते. १७ डिसेंबर १९६५ रोजी जॉन्सन यांनी 'नॅशनल सिक्युरिटी ॲक्शन मेमोरँडम क्र. ३३९' हा तातडीचा आदेश जारी केला. भारतातील जवळजवळ दुष्काळी परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करून जॉन्सन यांनी मदतीचा ठाम निर्धार त्यात व्यक्त केला होता. संरक्षण, व्यापार, कृषी या खात्यांच्या प्रतिनिधींनी एक खास समिती स्थापून भारताला कशा तऱ्हेनं मदत करता येईल याची शिफारस करावी असं त्यांनी आपल्या कृषिमंत्र्यांना पाठवलेल्या या निवेदनात म्हटलं होतं.

त्यानुसार अमेरिकेचे कृषी मंत्री ऑरव्हिल फ्रीमन यांनी भारताला मोठ्या प्रमाणावर नियमित धान्यपुरवठा करण्याच्या दृष्टीनं बहुविध प्रयत्न केले. भारतातील स्थितीची आपल्याला व्यक्तिशः माहिती उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी होरॅस डेव्हिस या प्रतिनिधीला भारताच्या कृषिखात्याकडे पाठवलं. त्या वेळी भारतीय प्रशासनातील एक अधिकारी म्हणून मीच हे सारं पाहत होतो. अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया या तीन देशांनी त्या वेळी केलेल्या मदतीबद्दल मनात कृतज्ञतेची भावना होती. या राष्ट्रांच्या उदार व मानवतापूर्ण मदतीमुळं हजारो भारतीयांचे प्राण त्या वेळी बचावले.

## भाषिक पेचप्रसंग

गंभीर अन्नधान्य परिस्थितीची चिंता वाटत असतानाच दक्षिण भारतात अचानक भाषेचा वाद एखाद्या ज्वालामुखीसारखा उफाळून आला.

भारतीय घटनेत देवनागरी लिपीतील हिंदी ही अधिकृत भाषा राहील असं म्हटलं

असलं तरी घटना अमलात आल्यापासून पंधरा वर्षांपर्यंत सरकारी कामकाजात इंग्रजीचा वापर चालू राहील, अशी पुस्ती जोडलेली होती.

२६ जाने. १९५० रोजी भारताची घटना अस्तित्वात आली. इंग्रजीची पंधरा वर्षांची मुदत २५ जाने. १९६५ रोजी संपुष्टात येणार होती. परंतु या मुदतीनंतरही हिंदीचा वापर करण्यास सारा देश कदाचित तयार नसेल याचा विचार करून घटनाकारांनी वरील मुदतीनंतरही इंग्रजीच्या वापरासाठी कायदा करून तरतूद करता येईल असं घटनेत नमूद करून ठेवलं होतं.

२६ जाने. १९६५ पासून हिंदीचा वापर करण्यास दाक्षिणात्य राज्यांची तयारी नव्हती. तेव्हा अनिश्चित काळापर्यंत इंग्रजीच्या वापराला मुदतवाढ देणारा कायदा संसदेनं करावा असा त्यांचा आग्रह होता. तेव्हा १९६३ मध्ये एक कायदा मंजूर करून केंद्र सरकारमध्ये व संसदेमध्ये हिंदीबरोबरच इंग्रजीचा वापर चालू ठेवण्यात येईल अशी तरतूद केली गेली. हे विधेयक नेहरू मंत्रिमंडळात गृहमंत्री असलेल्या शास्त्रींनीच मांडलं होतं. देशातील कोणत्याही भागात हिंदी लादली जाणार नाही व बिगरहिंदी राज्यांना त्यांना वाटेल तेवढा काळ इंग्रजीचा वापर चालू ठेवता येईल असं आश्वासनही नेहरूंनी दिलं होतं. तेव्हा १९६३ चा कायदा व नेहरूंचं निःसंदिग्ध आश्वासन यांमुळं हा गुंतागुंतीचा प्रश्न सुटल्यात जमा होता.

काळ पुढं सरकत होता. १९६५ चा जानेवारी उजाडला. २६ जानेवारी रोजी एका महत्त्वाच्या मानसिक टप्प्यातून देश जाणार होता. सरकारी कारभारातील इंग्रजीचं स्थान जाऊन हिंदीला घटनात्मक स्थान प्राप्त होणार होतं. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र फारसा फरक पडणार नव्हता. कारण १९६३ च्या कायद्यानुसार पूर्वीसारखाच इंग्रजीचा वापर चालू राहणार होता. खरं तर एका परकीय भाषेची जागा राष्ट्रभाषा घेणार होती, म्हणून आनंदोत्सव व्हायला हवा होता. परंतु दक्षिणेतील जनतेला– विशेषतः विद्यार्थ्यांना– त्यामुळं आपला तोटा होईल असं वाटत होतं.

हिंदीविरोधी भावना पुन्हा डोकं वर काढील अशी माहिती शास्त्रींना गुप्तचर संघटना, तमिळनाडूचे मुख्य मंत्री अथवा काँग्रेसाध्यक्ष कामराज यांच्याकडून मिळालेली नव्हती. तसं सारं सुरळीत चाललं होतं आणि दिल्लीतील काही अधिकाऱ्यांनी अतिउत्साह दाखवला नसता तर २६ जानेवारीचा दिवस निर्विघ्नपणं पारही पडला असता.

२६ जानेवारीपासून सरकारी कारभारात हिंदीचा व्यापक वापर केला जाईल याची माहिती देण्यासाठी गृहमंत्रालयानं २४ जानेवारीला पत्रकार परिषद बोलावली होती. हा बदल तडकाफडकी होणार नसून तो हळूहळू होईल असंही त्या वेळी सूचित करण्यात आलं. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया या वृत्तसंस्थेनं या पत्रकार परिषदेचं पाठवलेलं वृत्त २५ जानेवारीच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालं. गृह मंत्रालयानं हिंदीच्या नव्या भूमिकेबद्दल एक परिपत्रक काढल्याची अफवा पसरली व त्यामुळं मद्रासमध्ये अचानक लोकांच्या भावनांचा प्रक्षोभ झाला. अखिल भारतीय सेवेत भरती करण्यासाठी युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेत हिंदी भाषेचा पर्यायी वापर करण्यास मुभा देण्याचा निर्णय जुलै

६४ मध्ये झाला होता. अर्थात अन्याय होऊ नये म्हणून उत्तरपत्रिका तपासण्याची पद्धत विकसित केल्यावर हे करण्याची तरतूद त्यात होती. हा निर्णय अमलात आला नव्हता, तरी त्याबद्दल गैरसमज पसरला होता. २५ जानेवारी रोजी हिंदीच्या बाबतीत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमुळे म्हणा अथवा तमिळनाडूतील द्रविड मुन्नेत्र कळहम या विरोधी पक्षानं केलेल्या गुप्त तयारीमुळं म्हणा, सबंध तमिळनाडू राज्यात विद्यार्थ्यांनी जागोजागी हिंदीविरोधी निदर्शनं केली. इंग्रजीच्या जागी हिंदी येणार असा द्र. मु. क. नं खोटाच प्रचार केला असंही काहींचं म्हणणं आहे. २५ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी केलेली निदर्शनं ही धोक्याची घंटाच होती.

२६ जानेवारी रोजी माहिती व नभोवाणी मंत्रालयानं आपल्या खात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांची संमती न घेताच काही परिपत्रकं हिंदीतच काढली जावीत असे आदेश दिले. त्यामुळं आगीत तेल ओतलं गेलं.

२७ जानेवारीलाही तमिळनाडूत निदर्शनं झाली. मद्रासपासून १४० कि. मी. अंतरावरील चिदंबरम इथे पोलीस गोळीबारात एक विद्यार्थी ठार व एक जण जखमी झाला. मद्रासमध्ये द्र. मु. क. च्या दोघा समर्थकांनी आत्मदहन केलं. त्या वेळी त्या राज्यात सत्तेवर असलेल्या काँग्रेस सरकारच्या आदेशावरून सुमारे १००० द्र. मु. क. कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली.

२८ जानेवारीला मद्रास शांत होतं. पंतप्रधान शास्त्री आत्मदहनाच्या प्रकारांनी अत्यंत व्यथित झाले होते. हिंसक आंदोलन थांबवावं असं आवाहन करताना ते म्हणाले, ''ज्या बाबतीत सहज मार्ग काढणं शक्य आहे त्या बाबतीत लोक एकमेकांचा जीव का घेत आहेत हेच मला उमजत नाही. देशातील कोणत्याही भागावर कोणतीही भाषा लादण्याचा आमचा इरादा नाही.''

त्रिवेंद्रम इथे ३१ जानेवारी रोजी एका कार्यक्रमात शास्त्री यांनी आपल्या आश्वासनाचा पुनरुच्चार केला. ''हिंदीला अधिकृत राष्ट्रभाषेचा दर्जा दिला तरी त्याचा बिगरहिंदी राज्यांवर काहीही प्रतिकूल परिणाम होणार नाही. कारण इंग्रजीचा वापर चालूच राहील.'' असं त्यांनी स्पष्ट केलं. दिल्लीला परतताना वाटेत बंगलोर इथे त्यांनी मद्रासमधील परिस्थितीविषयी के. कामराज यांच्याशी चर्चा केली. तेव्हा द्र. मु. क. चं आंदोलन ओसरेल असं त्यांचं मत बनलं. तमिळनाडूच्या मुख्य मंत्र्यांनीही असाच अंदाज वर्तवला. परंतु परिस्थितीचं हे मूल्यमापन चुकीचं होतं, असं नंतरच्या घटनांनी दिसून आलं. द्र. मु. क. वाले जरी विद्यार्थ्यांच्या संतापाला खतपाणी घालत असले तरी तमिळनाडूच्या जनतेच्याच मनात हिंदीबद्दल संशयाची भावना आहे हे आतापावेतो स्थानिक नेत्यांना कळायला हवं होतं. त्यांच्या मनातील या शंकांचं निराकरण व्हावं म्हणून नवी पावलं उचलण्याची गरज होती.

७ फेब्रुवारी रोजी सुब्रमण्यम यांनी मद्रास इथे एका पत्रकार परिषदेत असं सांगितलं की, नेहरूंनी दिलेल्या आश्वासनाचा आशय लक्षात घेऊन एक तोडगा काढणं अत्यावश्यक आहे. १० फेब्रुवारी रोजी तमिळनाडूतील आंदोलनानं जागोजागी

अचानक हिंसक वळण घेतलं. पोलिसांनी ठिकठिकाणी प्रक्षुब्ध जमावावर केलेल्या गोळीबारात १९ जण मृत्युमुखी पडले. काही ठिकाणी सैन्याला पाचारण करावं लागलं. पंतप्रधानांनी गृहमंत्री गुलझारीलाल नंदा, अर्थमंत्री कृष्णम्माचारी व अन्नमंत्री सुब्रमण्यम यांच्याशी चर्चा केली. परिस्थिती एवढी गंभीर होती की शास्त्रींनी दुसऱ्या दिवशी राष्ट्राला उद्देशून भाषण करायचं ठरवलं. ११ फेब्रुवारीचा दिवस तणावपूर्ण आणि नाट्यानं भरलेला होता. तमिळनाडूत उसळलेल्या हिंसाचारात खंड पडला नव्हता व पोलिसांच्या गोळीबारात आणखी ६ जण ठार झाले होते. केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक भरली. नेहरूंनी दिलेली आश्वासनं अमलात आणण्यासाठी तसा कायदा करावा असं मत सुब्रमण्यम यांनी ठामपणं मांडलं. या आश्वासनाचं तंतोतंत पालन करायला हवं होतं हेही खरं, परंतु हिंदी भाषिक राज्यांशी सल्लामसलत न करता कायदा केला तर त्यातून वेगळीच परिस्थिती निर्माण होऊन अंतिम तोडगा काढणं मुश्किल होईल असं बहुतेक मंत्र्यांचं मत पडलं. तेव्हा नेहरूंची आश्वासनं बिनशर्त पाळली जातील असं आकाशवाणीवरून पंतप्रधानांनी जाहीर करावं असं ठरलं.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर घरी परतताच शास्त्री आपल्या भाषणाचा मसुदा तयार करण्यात गढून गेले. अधिकाऱ्यांनी दिलेला मसुदा त्यांनी बराच सुधारला. भाषणाचं ध्वनिमुद्रण करण्यासाठी ते आकाशवाणी भवनात जायला निघाले. मोटारीत ते बसणार तोच एक खास दूत 'तातडीचं' असं लिहिलेला एक लिफाफा घेऊन आला. लिफाफा फोडून त्यांनी पत्र वाचलं. क्षणभर विचार केला व माझ्याकडे पत्र देऊन ते म्हणाले, ''परतल्यावर मला ते पुन्हा वाचायचंय.''

त्यांचा चेहरा गंभीर दिसत होता. ते पत्र म्हणजे सुब्रमण्यम यांनी पाठवलेला राजीनामा होता! मी पंतप्रधानांसमवेत आकाशवाणी भवनात गेलो. वाटेत ते एक शब्दही बोलले नाहीत. सुब्रमण्यम राजीनामा देतील अशी त्यांना अपेक्षा नव्हती. त्यामुळं त्यांना साहजिकच धक्का बसला होता. परंतु त्याबद्दलची चिंता काही काळ दूर सारून त्यांनी आकाशवाणीवरून नेहमीच्याच आत्मविश्वासानं भाषण केलं. मद्रासमधील घटनांबद्दल तीव्र दुःख प्रकट करीत, जीवितहानी झाल्याबद्दल शोक व्यक्त करीत त्यांनी भाषेच्या प्रश्नावरून उद्भवलेल्या गैरसमजाचं मुद्देसूद निराकरण केलं. पं. नेहरू यांनी दिलेल्या आश्वासनांचा नेमका तपशीलही उद्धृत केला. धोरणात्मक निर्णय जाहीर करताना ते म्हणाले :

*''(१) प्रत्येक राज्याला त्याचा कारभार त्याच्या प्रादेशिक भाषेत वा इंग्रजीत चालविण्याचं पूर्ण स्वातंत्र्य राहील.*

*(२) राज्याराज्यांतील पत्रव्यवहार हा इंग्रजीत चालेल वा प्रादेशिक भाषा वापरली तर त्याचा अधिकृत इंग्रजी अनुवाद पुरवला जाईल. मुख्य मंत्र्यांच्या परिषदेत यासंबंधी एकमतानं निर्णय घेण्यात आला होता. राज्य सरकारनं अथवा लोकांनी केंद्र सरकारला हिंदीत पत्र पाठवलं तर त्याचा इंग्रजी अनुवाद उपलब्ध*

*करून दिला जाईल.*

*(३) बिगरहिंदी राज्यांना केंद्राशी इंग्रजीत पत्रव्यवहार करण्याची मुभा राहील व या राज्यांच्या संमतीविना या व्यवस्थेत काही बदल केला जाणार नाही.*

*(४) केंद्रीय पातळीवरचे व्यवहार हे इंग्रजीत चालू राहतील.*

*यावरून बिगरहिंदी राज्यांवर हिंदी लादण्याचा प्रश्नच नाही हे स्पष्ट होईल.''*

युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षा इंग्रजी माध्यमातूनच घेतल्या जातील व बिगरहिंदी राज्यं जोवर मागणी करत नाहीत तोवर त्यात बदल केला जाणार नाही, असंही आश्वासन त्यांनी दिलं.

अखेर आंदोलन मागं घेण्याचं आवाहन करताना ते म्हणाले, ''सध्याच्या परिस्थितीविषयी शांतपणे विचार करा. आपली भाषा, आपला प्रदेश काही असो, एक राष्ट्र या भावनेनं सर्वांच्या हिताचं काय आहे याचा विचार करा. या प्रश्नाचा उच्च पातळीवरून व शास्त्रशुद्ध दृष्टीनं विचार करा.''

त्यांच्या या भाषणाचा लगेच परिणाम व्हायला हवा होता. परंतु तमिळनाडूचेच असलेले सुब्रमण्यम यांच्या राजीनाम्यानं परिस्थितीतील गुंतागुंत वाढली. त्याच दिवशी सायंकाळी राज्यमंत्री ओ. व्ही. अलगेसन (तेही मूळचे तमिळनाडूचे) यांनी राजीनामा दिला. त्यामुळं या तणावग्रस्त परिस्थितीत आणखीच भर पडली. शास्त्रींनी सुब्रमण्यम यांची भेट घेऊन मंत्रिमंडळात राहण्याची त्यांना विनंती केली. पत्रकारांशी बोलताना शास्त्री म्हणाले, ''सुब्रमण्यम यांचं मन वळवायचा मी प्रयत्न करीत आहे. परंतु सर्वस्वी त्यांच्यावरच काय ते अवलंबून आहे.''

१२ फेब्रुवारीची वर्तमानपत्रं शास्त्री सरकारमधील दोन मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या बातम्यांनी भरलेली होती. या बातम्यांमुळं पंतप्रधानांच्या आकाशवाणीवरील भाषणाचं वृत्त झाकोळून गेलं. तमिळनाडूत हिंसेचा उद्रेक आणखी उफाळला. दोघांनी आत्मदहन केलं. पोलिस गोळीबारात आणखी चोवीस जण ठार झाले.

शास्त्रींनी दोन्ही मंत्र्यांचे राजीनामे तसेच ठेवून दिले. या मंत्र्यांनी आपापले राजीनामे परतही घेतले नाहीत. दक्षिणेतील परिस्थिती निवळावी म्हणून प्रयत्न करण्यासाठी इंदिरा गांधी व डी. संजीवय्या या दोघा मंत्र्यांना शास्त्रींनी मद्रासला पाठवून दिलं. तसंच भाषेच्या प्रश्नाबाबत नेहरूंनी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी कशी करावी याबाबत विचारविनिमय करण्यासाठी त्यांनी २३ व २४ फेब्रुवारीला मुख्य मंत्र्यांची परिषद बोलावली.

शास्त्रींच्या आकाशवाणीवरील भाषणानं तमिळनाडूच्या जनतेचं समाधान झालं नाही, तरी पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री पी. सी. सेन यांना ते पूर्ण समाधानकारक वाटलं. सेन हे एका बिगरहिंदी राज्याचे मुख्य मंत्री असल्यानं त्यांच्या या मताचं महत्त्व विशेष होतं.

१३ फेब्रुवारीपर्यंत तमिळनाडूतील परिस्थिती जवळजवळ सुरळीत झाली. आकाशवाणीवर पंतप्रधानांनी व्यक्त केलेल्या मतांना काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत दुजोरा देण्यात आला. नेहरूंची आश्वासनं अमलात आणण्यासाठी घटनेत दुरुस्ती करायची गरज नसली तरी मुख्य मंत्र्यांच्या भावी परिषदेत ज्या शिफारसी केल्या जातील त्यांना पक्षानं मान्यता द्यायला तयार राहिलं पाहिजे असं शास्त्रींनी या बैठकीत सांगितलं. अशा प्रकारे १९६३ च्या अधिकृत भाषा कायद्यात संभाव्य दुरुस्ती करण्याच्या दृष्टीनं ते पक्षाला तयार करीत होते.

सी. सुब्रमण्यम व ओ. व्ही. अलगेसन हे १३ फेब्रुवारी रोजी मद्रासला गेले व त्यांनी कामराजांची भेट घेतली. सुब्रमण्यम यांना त्यांच्या राजीनाम्याबद्दल विचारता ते म्हणाले की, माझा राजीनामा पंतप्रधानांकडे अजून पडून असून मी त्याबाबत काही बोलू इच्छीत नाही. त्याच दिवशी आंध्रचे नेते व केंद्रीय खाणमंत्री एन. संजीव रेड्डी यांनी एक पत्रक काढून नव्या कायद्याच्या मागणीला आपला पाठिंबा व्यक्त केला.

१४ फेब्रुवारीला केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक भरून त्यात दोन पर्यायांवर विचारविनिमय झाला. एक म्हणजे नेहरूंच्या आश्वासनांचा समावेश असलेला एक ठराव संसदेनं मंजूर करणं व दुसरं म्हणजे १९६३ च्या अधिकृत भाषा कायद्यात दुरुस्ती करणं. घटनेत दुरुस्ती करण्याची सूचना फेटाळून लावण्यात आली.

१६ फेब्रुवारीपर्यंत राजकीय पेचप्रसंग निवळण्याची चिन्हं दिसू लागली. आतापर्यंत कामराज यांनी सार्वजनिक रीत्या काही मतप्रदर्शन केलं नव्हतं. त्यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन दीर्घकाळ चर्चा केली. त्यानंतर त्यांनी नव्या कायद्याच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला. सी. सुब्रमण्यम यांनीही पंतप्रधानांची भेट घेतली. आपल्या अडचणी व भाषिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनं आपल्या कल्पना त्यांनी सांगितल्या. या चर्चेनं त्यांचं समाधान झालं व त्यांनी आपला राजीनामा परत घेतला. अलगेसन यांनी त्यांचं अनुकरण केलं. दोन्ही राजीनामे परत घेतले गेल्यानं शास्त्री सरकारपुढचा गंभीर पेचप्रसंग टळला आणि साऱ्या देशानं सुटकेचा निःश्वास टाकला.

संसदेच्या उभय सदनांच्या संयुक्त बैठकीपुढं राष्ट्रपती राधाकृष्णन यांनी भाषण करताना शास्त्री सरकारच्या भाषाविषयक धोरणाची माहिती दिली. बिगरहिंदी भाषकांना हवं असेल तोवर इंग्लिश सहभाषेच्या रूपात चालू ठेवली जाईल. दरम्यान भाषिक धोरणाच्या कायदेशीर, प्रशासकीय पैलूंचा संसद विचार करील असं त्यांनी सांगितलं. केंद्रीय कायदा मंत्रालयानं १९६३ च्या कायद्यात दुरुस्त्या सुचवणारा मसुदा तयार केला.

काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत भाषिक प्रश्नाबाबतची आपली मतं शास्त्रींनी मांडली. या प्रश्नावर तपशीलवार चर्चा करण्याचं पक्षानं ठरविलं. संसदेतील सर्व पक्षांच्या प्रमुखांची आपण बैठक बोलावणार आहोत, असंही शास्त्रींनी जाहीर केलं. त्या तणावमय वातावरणात सर्वांची सहमती घडवून आणण्याचे प्रयत्न पंतप्रधानांनी सुरू केले. परंतु हा मार्ग काही सोपा नव्हता. खुद्द काँग्रेस पक्षात या विषयावर मतभेद

होते. २१ फेब्रुवारी रोजी भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत तोडग्याच्या स्वरूपाबाबत तीव्र मतभेद व्यक्त करण्यात आले. तेव्हा सरकारनं घाईघाईनं कृती करू नये असं प्रत्येकाचं मत पडलं.

ओरिसाचे माजी मुख्य मंत्री हरेकृष्ण मेहताब यांनी इंग्रजीचा वापर चालू ठेवण्याच्या नावाखाली हिंदीला शाश्वत काळापर्यंत पुढं ढकलण्याचा हेतू असेल तर एका महत्त्वाच्या विषयासंबंधी ढोंगीपणाचं वातावरण निर्माण केलं जात आहे असं म्हणावं लागेल, असं निवेदन दिल्लीत २२ फेब्रुवारी रोजी केलं. त्याच दिवशी अहमदाबाद इथे बोलताना मोरारजी देसाई म्हणाले, "केंद्रीय प्रशासनात हिंदीचा व राज्यात प्रादेशिक भाषांचा वापर करण्यास आपण तत्काळ सुरुवात केली पाहिजे." पक्षात भाषिक प्रश्नाबाबत भावना किती तीव्र होत्या याचीच ही उदाहरणं म्हणता येतील.

अशा वातावरणात दिल्लीत मुख्य मंत्र्यांची परिषद भरली. स्थानिक राजकीय बाबींचा विचार न करता देशाच्या ऐक्याच्या दृष्टीनं निर्भयपणं आपली मतं मांडावीत असं आवाहन पंतप्रधानांनी आपल्या अर्ध्या तासाच्या भाषणात केलं. त्यांनी राष्ट्रीय ऐक्याचं स्मरण करून दिल्यानं चर्चेचा एकूण सूर ठरला. परिषदेत शाब्दिक चकमकी झडल्या नाहीत. तसंच अधिकृत भाषा कायद्यात दुरुस्ती करावी या बिगरहिंदी राज्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या सूचनेला अन्य मुख्य मंत्र्यांनी गंभीर आक्षेप घेतला नाही.

काँग्रेस कार्यकारिणीतही या विषयावर जोरदार चर्चा चालू होती. मोरारजीभाई देसाई, जगजीवन राम व राम सुभगसिंग यांचा कायद्यात दुरुस्ती करण्यास अजूनही ठाम विरोध होता. तेव्हा निदान व्यापक सहमती घडून यावी म्हणून कार्यकारिणीची आणखी एक बैठक घेण्यात आली. अखेर सध्याच्या कायद्यात दुरुस्ती करावी हे कार्यकारिणीनं तसंच मुख्य मंत्र्यांच्या परिषदेनं मान्य केलं. अखिल भारतीय सेवेसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा इंग्रजीत आणि हिंदीतच नव्हे, तर अन्य प्रमुख भाषांतही घेतल्या जाव्यात. अखिल भारतीय सेवेत समान वाटप व्हावं म्हणून लोकसंख्येच्या आधारावर कोटा ठरवून दिला जावा असाही प्रस्ताव स्वीकारण्यात आला. (मात्र हा धोकादायक वाटणारा प्रस्ताव अखेर वगळण्यात आला.) तमिळनाडूचे मुख्य मंत्री एम. भक्तवत्सलम यांनी एकमतानं झालेल्या निर्णयामुळं आपलं समाधान झाल्याचं जाहीर केलं. "दोन्ही बाजूंच्या अतिरेक्यांना त्यामुळं आनंद होणार नाही, पण अतिरेक्यांचं समाधान करणं कठीणच असतं म्हणा!" अशीही पुस्ती त्यांनी जोडली.

शास्त्री यांनी २४ फेब्रुवारी रोजी मुख्य मंत्र्यांच्या परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयांची संसदेला माहिती दिली. नेहरूंची आश्वासनं अमलात आणण्याकरिता अधिकृत भाषा कायद्याच्या दुरुस्तीसह व्यवहार्य पावलं सरकार उचलील असं त्यांनी सांगितलं. हिंदी ही केंद्राची अधिकृत भाषा राहील व इंग्रजीचा सहभाषा म्हणून वापर चालू राहील, असं त्यांनी स्पष्ट केलं.

त्यानंतर फारसा वाद न होता भराभर घटना घडत गेल्या. अधिकृत भाषा कायद्यात दुरुस्ती करणारं विधेयक १९६६ मध्ये मंजूर झालं. इंग्रजी-हिंदी भाषेचा वाद अशा

प्रकारे मिटला.

भाषिक पेचप्रसंगाच्या त्या वादळी दिवसांत इंग्रजी वृत्तपत्रं शास्त्रींवर तुटून पडलेली होती. भडकत्या प्रश्नाविषयी शास्त्री मौन पाळून आहेत, असं त्यांचं म्हणणं होतं. राजभाषा कायद्यात तत्काळ दुरुस्ती करण्याची घोषणा त्यांनी करायला हवी होती असं राजकीय भाष्यकार सुचवत होते. परंतु सर्वांशी सल्लामसलत न करता व व्यापक पाठिंबा न मिळवता शास्त्रींनी जर असं पाऊल उचललं असतं तर त्यामुळं हिंदी भाषिक पट्ट्यात तीव्र प्रतिक्रिया उमटली असती, हे या पत्र-पंडितांच्या लक्षात आलं नाही. शास्त्रींनी समतोल दृष्टिकोन पत्करला, योग्य वेळी हस्तक्षेप केला व त्यामुळंच परिस्थिती निवळली. एक बुद्धिमान व खंबीर नेता म्हणून त्यांची प्रतिमा इथे अधिकच उजळली.

## विजयालक्ष्मी पंडित आणि शास्त्री

भाषेच्या प्रश्नावरून उठलेल्या वादळातून शास्त्री प्रतिष्ठेला धक्का न पोचता सहीसलामत बाहेर पडले खरे, परंतु विरोधी पक्षांतील त्यांच्या टीकाकारांना पंतप्रधानांवर हल्ला चढविण्यास हीच योग्य वेळ वाटत होती. महागाईवर नियंत्रण ठेवता आलं नव्हतं, भाषिक वादाबद्दल सुरुवातीलाच तातडीनं उपाययोजना झाली नव्हती, असे आरोप हे टीकाकार करीत होते. देशातील सर्वसाधारण परिस्थितीबद्दल ते नाराजी प्रकट करीत होते व सरकार-विरोधी मोहीम आखीत होते.

परंतु सरकारवर टीकेचा मोठा प्रहार विरोधकांकडून नव्हे, तर काँग्रेसच्याच एका महत्त्वाच्या सदस्यानं केला तेव्हा सारे आश्चर्यचकितच झाले! नेहरूंच्या भगिनी श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी ही टीका केली. त्या अलाहाबाद मतदार संघातून निवडून आल्या होत्या. २४ मार्च १९६५ रोजी लोकसभेतील आपलं पहिलंच भाषण त्यांना प्रभावी करायचं होतं. अर्थसंकल्पीय चर्चेत भाग घेताना त्या म्हणाल्या, ''अर्थमंत्र्यांनी प्रयत्न केला तरीही गैर लोकांच्या हाती संपत्तीचं केंद्रीकरण होत आहे. लोकांचं अधःपतन होत आहे व समाज सडत चालला आहे.'' आपल्यापुढील निम्म्या प्रश्नांचं मूळ कारण हेच आहे असाही त्यांनी दावा केला. या रोगावर त्यांच्यापाशी औषधही होतं! त्या म्हणाल्या, ''माणसाच्या वैयक्तिक उन्नतीसाठी, मूल्ये पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करून आपल्यामध्ये फोफावणाऱ्या या रोगाला आळा घातला पाहिजे.'' त्यावर बऱ्याच जणांनी माना डोलावल्या. त्यामुळं विजयालक्ष्मींना उत्तेजन मिळालं व आणखी उपदेश करताना त्या म्हणाल्या, ''आज गरज आहे स्फुल्लिंग फुलवण्याची. ही ठिणगी सरकार कधी चेतवील याची आम्ही प्रतीक्षा करीत आहोत.'' सध्याच्या परिस्थितीचं विश्लेषण करताना त्या म्हणाल्या, ''सर्व देशभर अनिश्चिततेचं वातावरण पसरलं आहे. कोणी कोठेच खंबीर निर्णय घेताना दिसत नाही.'' एवढं बोलून त्या क्षणभर थांबल्या. त्यांनी पंतप्रधानांकडे दृष्टिक्षेप टाकला आणि त्या म्हणाल्या, ''आपल्यापुढं काय दिसतं आहे? सर्वत्र नुसते खडकच खडक आहेत. आपला मार्ग खडकाळ आहे. केरळ ते काश्मीर, शेख अब्दुल्ला ते व्हिएतनाम कशाच्याच बाबती

निर्णय घेतले जात नाहीत. आपण अनिश्चिततेचे कैदी बनलो आहोत!''

विजयालक्ष्मी पंडित नुसत्या टीकाच करीत नव्हत्या, तर त्यांनी तोडगाही सुचविला. ''सध्याच्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे समाजवाद.'' परंतु त्यांच्या या विधानाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. कारण त्या कितपत समाजवादी आहेत याबद्दलच शंका होती. पण श्रीमती पंडित यांनी भाषण जोरात चालूच ठेवलं. त्या म्हणाल्या, ''सरकार कशाला घाबरतंय? उद्दिष्टपूर्तीसाठी सरकारनं खंबीरपणं पावलं उचलली तर आम्ही त्याच्या पाठीशी निष्ठेनं व श्रद्धेनं चालत राहू. परंतु– होय, हा परंतु आहेच– तत्त्वाशी कसलीही तडजोड करता कामा नये. याच मार्गानं आपल्याला नव्या दिवसाची पहाट दिसेल.''

विजयालक्ष्मींचं लक्ष्य खुद्द शास्त्री हे होतं हे उघड होतं. मी अधिकाऱ्यांच्या गॅलरीतून विजयालक्ष्मी पंडित व पंतप्रधान यांच्याकडे आळीपाळीनं पाहत होतो. विजयालक्ष्मी मोठ्या खुषीत होत्या व पंतप्रधानांवर त्यांच्याच पक्षाच्या एक सदस्या टीका करीत आहेत हे पाहून विरोधकही आनंदले होते. शास्त्रींच्या नऊ महिन्यांच्या कारकीर्दीवर विजयालक्ष्मी नाराज आहेत हे स्पष्ट दिसत होतं.

त्यांचं भाषण लालबहादुर शास्त्री यांनी लक्षपूर्वक ऐकलं. त्यांच्या चेहऱ्यावर कसलाही नाराजीचा वा संतापाचा भाव उमटला नाही. विजयालक्ष्मींचं भाषण संपल्यावर शास्त्री आपल्या कार्यालयात गेले. त्यांच्यापाठोपाठ त्यांना भेटायला विजयालक्ष्मीही त्यांच्या कार्यालयात गेल्या. काही मिनिटांनी त्या बाहेर आल्या व निघून गेल्या. त्यानंतर मी पंतप्रधानांच्या कार्यालयात शिरलो. ते काही फायली वाचण्यात गढलेले होते. मी प्रश्न विचारून त्यांच्या कामात व्यत्यय आणला नाही. परंतु माझ्या मनात काय विचार चालू असावेत याचा अचूक अंदाज घेत तेच म्हणाले, ''आपण बोलू नये असं काही बोललो की काय हे विचारायला श्रीमती पंडित आल्या होत्या. तुम्हीच काय तो विचार करा. आपने जो ठीक समझा वो कहा, असं मी म्हणालो.'' शास्त्रींच्या स्वभावातील हा पैलू पुन्हा माझ्या लक्षात आला. स्वपक्षीय सदस्यानं टीका करूनही शास्त्रींनी शांतपणे समतोल दाखवला होता.

पुढं भारत-पाक युद्धानंतर जेव्हा शास्त्री जनतेचे 'लाल' बनले तेव्हा विजयालक्ष्मी यांनी आपलं मत बदलून त्यांची प्रशंसा केली.

## परराष्ट्र संबंध

नेपाळची एक भेट वगळता परराष्ट्र धोरणाबद्दल शास्त्रींना फारसा अनुभव नव्हता. पंडित नेहरूंची परराष्ट्र धोरणविषयक उत्कृष्ट भाषणं त्यांनी मनःपूर्वक ऐकली होती व परराष्ट्र धोरणासंबंधीच्या ताज्या घडामोडींची माहिती ते घेत असत. नेहरूंना मदत करण्यासाठी त्यांना बिनखात्याचे मंत्री नेमण्यात आलं तेव्हा विदेश मंत्रालयाचा कारभार ते हाताळीत होते. त्यामुळं पंतप्रधानपदाची सूत्रं त्यांनी हाती घेतली तेव्हा ते काही परराष्ट्र खात्याला अगदीच नवखे नव्हते. आरंभी त्यांनी हे खातं स्वतःकडेच ठेवलं

होतं. नंतर त्यांनी सरदार स्वर्णसिंग यांच्याकडं ते सोपवलं.

अलिप्ततावाद व शांततापूर्ण सहअस्तित्व हे पं. नेहरूंनी घालून दिलेलं धोरण शास्त्रींच्या स्वभावाला व वृत्तीला अनुरूपच होतं. मात्र त्यांनी या धोरणातील अग्रक्रमात बदल केला. नेहरूंच्या काळात आपल्या परराष्ट्र धोरणात पुढील चार घटक होते : (१) आंतरराष्ट्रीय बाबींविषयी पूर्ण स्वातंत्र्य असावं, म्हणून जगातील कोणत्याही लष्करी गटात वा युतीत सामील न होणं, (२) नव्यानं उदय पावणाऱ्या विकसनशील देशांना व तेथील जनतेला पाठिंबा, (३) सोविएत युनियनशी दृढ मैत्री आणि (४) पाश्चिमात्य देशांबाबत दुहेरी दृष्टिकोन. म्हणजे लोकशाही मूल्यांशी बांधिलकीच्या आधारावर मैत्रीपूर्ण जिव्हाळ्याचे संबंध, तर गरीब राष्ट्रांच्या आशाआकांक्षांच्या विरुद्ध असणाऱ्या त्यांच्या धोरणांवर टीका, अशा स्वरूपाचा.

त्यामुळं भारत दुसऱ्या बाजूला अलिप्त आहे असं पाश्चिमात्यांचं मत बनलं होतं. सोविएट रशियाशी असलेली आपली मैत्री टिकवून ठेवून पाश्चिमात्य राष्ट्रांशी जवळिकीचे संबंध निर्माण करावेत असं शास्त्रींचं मत होतं. त्यांच्या या दृष्टिकोनाची पाश्चिमात्यांना जाणीव झाली होती व अमेरिकेच्या बाबतीत त्याचा परिणामही दिसू लागला होता. शास्त्री ताश्कंदला निघाले होते तेव्हा व्हिएतनाम प्रश्नावर शास्त्रींनी कोसिजिन यांच्याशी बोलणी करावीत असा निरोप हॅरिमन यांच्यामार्फत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी त्यांना पाठविला होता. भारताचे पंतप्रधान व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्यातील संबंध कसे होते हे उभयतांच्या पुढील पत्रांवरून लक्षात येईल :

*द व्हाइट हाउस, वॉशिंग्टन*
*जानेवारी ४, १९६६*

*प्रिय श्री. पंतप्रधान,*

*फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात तुम्ही व सौ. शास्त्री अमेरिकेला भेट देणार आहात याचा मला अत्यानंद होतो. तुम्हा उभयतांना भेटायला मी उत्सुक आहे. उभय राष्ट्रांच्या इतिहासातील अत्यंत योग्य समयी तुमची ही भेट होत असून ती एकमेकांना व उभय राष्ट्रांपुढील समस्यांना समजून घेण्याच्या दृष्टीनं मौलिक संधी उपलब्ध करून देणारी ठरेल. आपल्या दोन्ही देशांत अनेक समान बाबी असून चर्चा करण्यासारखं बरंच काही आहे.*

*तुमचे अन्नमंत्री सी. सुब्रमण्यम यांच्याशी भारताच्या अल्प व दीर्घकालीन कृषिविषयक समस्यांबद्दल झालेल्या चर्चेबाबत मी व फ्रीमन समाधानी आहोत. ठाम आश्वासनं मागितली गेली नाहीत व दिली गेली नाहीत. तरीही भारताच्या गंभीर कृषी समस्याच नव्हेत, तर व्यापक विकासाच्या गरजा हाताळण्याच्या तुमच्या निर्धारासंबंधीचा आमचा विश्वास दुणावला. तुम्ही त्यांना इकडे पाठवलं हे बरं झालं.*

*मध्यंतरी माझी प्रकृती बरी नसताना तुम्ही पाठवलेल्या शुभेच्छा संदेशाबद्दल*

आभार. तुमच्या जिव्हाळ्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

मी व माझी पत्नी दोघांतर्फे तुम्हा उभयतांना नववर्षाच्या शुभेच्छा.

तुमचा

सही (लिंडन बी. जॉन्सन)

हिज एक्सलन्सी

लालबहादुर शास्त्री

प्राइम मिनिस्टर ऑफ इंडिया

नवी दिल्ली, इंडिया

शास्त्रींचं पत्र पुढीलप्रमाणं :

ताश्कंद

जानेवारी ६, १९६६

प्रिय श्री. राष्ट्राध्यक्ष,

(१) नाताळनंतर लागलीच नवी दिल्लीतील तुमच्या दूतावासामार्फत आलेला तुमचा संदेश मिळाला. सुब्रमण्यम यांनी तुम्ही त्यांचं केलेलं स्वागत व अपुऱ्या पर्जन्यमानामुळं भारताला सहन कराव्या लागणाऱ्या अन्नधान्य-टंचाईच्या परिस्थितीत उदारपणं मदत करण्याची तुम्ही दाखवलेली तयारी यांची माहिती मला दिली. सर्वच बोजा तुमच्यावर पडू नये म्हणून अन्य देशांकडूनही मदत मिळवण्याचे शक्यतो सारे प्रयत्न आम्ही करीत आहोत.

(२) ताश्कंदला रवाना होण्यापूर्वी राजदूत हॅरिमन मला दिल्लीत भेटले होते. व्हिएतनाममध्ये शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून तुम्ही करीत असलेल्या प्रयत्नांमुळं मी प्रभावित झालो. उत्तर व्हिएतनाम सरकारशी थेट संपर्क साधण्यासारखे आमचे हनोईशी संबंध नाहीत याची जाणीव हॅरिमनना आहे. मी कोसिजिन यांच्याशी बोलावं असं त्यांनी सुचवलं व त्यानुसार मी काल रात्री त्यांच्याशी चर्चा केली.

(३) कोसिजिन यांचा दृष्टिकोन नकारात्मक नव्हता. हनोईलाही मान्य होईल अशी वाटाघाटींची तत्त्वं असावीत असं कोसिजिन यांचं म्हणणं आहे. पोलंड सरकारकडे राजदूत हॅरिमन यांनी जो संपर्क साधला त्याचं त्यांनी स्वागत केलं. हनोईला शोलेपिन यांची भेट ही शांततेच्या हेतूला मदत करणारीच आहे असंही त्यांनी सूचित केलं.

(४) राष्ट्राध्यक्ष अयूब यांच्याबरोबरची माझी बोलणी नुकतीच सुरू झाली. आमच्यापुढं अनेक अडचणी आहेत. त्या सोडविण्यासाठी बळाचा वापर करण्याची गरज नाही असं आम्हा उभयतांचं मत होईल अशी मला आशा वाटते. एकदा हे झालं की मग आमच्यातील मतभेद दूर होण्याजोगं वातावरण तयार होईल.

(५) मी व माझी पत्नी आमच्या अमेरिकाभेटीबाबत उत्सुक आहोत. त्याआधीच आशियातील तणाव कमी होण्याबाबत प्रगती होईल अशी मला आशा वाटते.

*(६) आमच्या अन्नधान्य-पेचप्रसंगाच्या वेळी तुम्ही दिलेल्या उदार मदतीबद्दल पुनश्च मनःपूर्वक आभार.*

*तुमचा*
*लालबहादुर*

*द प्रेसिडेंट*
*द व्हाइट हाउस*
*वॉशिंग्टन डी. सी.*

भारताचे पंतप्रधान या नात्यानं लालबहादुर शास्त्री यांनी लिहिलेलं हे अखेरचं पत्र होतं. ताश्कंदमध्ये वाटाघाटींत मग्न असतानाही वेळ काढून कोसिजिन यांच्याशी व्हिएतनाम प्रश्नाबद्दल शास्त्रींनी चर्चा केली, यामुळं लिंडन जॉन्सन प्रभावित झाले. व्हाइट हाउसमधील आपल्या टेबलावर त्यांनी काही काळ हे पत्र ठेवून दिलं होतं आणि आपल्याला भेटायला येणाऱ्यांना जॉन्सन ते मुद्दाम दाखवीत असत.

कैरो इथे अलिप्ततावादी राष्ट्रांच्या प्रमुखांची परिषद २ ऑक्टोबर १९६४ ला भरली होती. या परिषदेत शास्त्रींनी महात्मा गांधी, पं. नेहरू यांचा गौरवोल्लेख करून शांततावाढीसाठी पाचकलमी प्रस्ताव मांडला. त्यात आण्विक निःशस्त्रीकरण, सीमावादाबाबत शांततामय तोडगे, आंतरराष्ट्रीय सहकार्यातून विकास आदींचा अंतर्भाव होता. याच परिषदेत जगातील अनेक मोठ्या नेत्यांशी शास्त्रींची ओळख झाली. त्यात ईजिप्तचे नासर, युगोस्लाव्हियाचे टिटो, इंडोनेशियाचे सुकार्नो, सिलोनच्या सिरिमाओ बंदरनायके प्रभृतींचा समावेश होता. या नेत्यांनी शास्त्रींच्या विनयशील स्वभावाचं कौतुक केलं.

कैरोहून परतताना वाटेत पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान यांना भेटण्याची शास्त्रींनी इच्छा व्यक्त केली. अयूब यांनी त्यांना कराचीला बोलावलं. १२ ऑक्टोबर १९६४ रोजी दुपारचं भोजन घेता घेता उभयतांनी चर्चा केली. दोघे प्रथमच भेटत होते व एकमेकांना जोखत होते. या बैठकीनंतर शांततेचा मार्ग अनुसरण्याचं शास्त्रींनी ठरवलं, तर अयूबखान- विशेषतः त्यांचे परराष्ट्र मंत्री झेड. ए. भुत्तो यांनी- भारतावर आक्रमण करायचं ठरवलं! त्याबद्दलची चर्चा पुढं येणारच आहे.

तत्पूर्वी शेजारी राष्ट्रांशी संबंध सुधारण्याच्या दृष्टीनं परराष्ट्रमंत्री सरदार स्वर्णसिंग यांना नेपाळ, ब्रह्मदेश, अफगाणिस्तान व सिलोन या देशांच्या दौऱ्यावर शास्त्रींनी पाठविलं. सिलोनमधील मूळच्या ९ लाख ७५ हजार भारतीयांचा प्रश्न अनेक वर्षं लोंबकळत पडला होता. कैरो इथे श्रीमती बंदरनायके यांच्याशी या प्रश्नाबद्दल शास्त्रींनी चर्चा केली होती. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी स्वर्णसिंग यांना सिलोनला पाठवलं होतं. त्यांनी दिलेला अहवाल अनुकूल होता.तेव्हा शास्त्रींनी सिलोनच्या पंतप्रधानांना भारतभेटीचं आमंत्रण दिलं. त्याप्रमाणं श्रीमती बंदरनायके यांचं २२ ऑक्टोबर १९६४ रोजी दिल्लीत आगमन झालं. आठवड्याभराच्या वाटाघाटींनंतर

२९ ऑक्टो. ६४ ला करार करण्यात येऊन अनेक वर्षं भिजत पडलेला एक प्रश्न सुटला. सिलोनमधील ९ लाख ७५ हजार तामिळींपैकी ३ लाख जणांना सिलोनचे नागरिक म्हणून सिलोननं मान्यता द्यावी व ५ लाख २५ हजारांना भारतीय नागरिक म्हणून भारतानं स्वीकारावं असं ठरलं. उरलेल्या १ लाख ५० हजार जणांचा दर्जा नंतर ठरविण्याचं ठरलं. भारताकडे ५,२५,००० जणांना पाठवून देणं व सिलोननं ३ लाख जणांचा स्वीकार करणं ही प्रक्रिया पंधरा वर्षांत पुरी करावी असंही ठरविण्यात आलं.

शास्त्रींचा पाश्चात्य जगतातला पहिला दौरा होता ब्रिटनचा. पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांच्या आमंत्रणावरून ३ डिसेंबर १९६४ रोजी ते लंडनला दाखल झाले. प्रचंड कडाक्याच्या थंडीतही खादीचं धोतर, कुडता, कोट व टोपी असा शास्त्रींचा नेहमीचाच पोशाख होता. ब्रिटिश सरकार, तेथील जनता व वृत्तपत्रं भारतीय पंतप्रधानांना पाहायला व त्यांचे विचार ऐकण्याला आतुर होती. ४ डिसेंबर रोजी 'ब्रिटिश फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज'ने आयोजिलेल्या स्वागत सोहळ्यात व्यापार व उद्योग क्षेत्रांतील नेत्यांची शास्त्रींशी भेट झाली. शास्त्रींनी भारताचे आर्थिक प्रश्न व ते हाताळण्याचं आपलं धोरण विशद केलं; उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरं दिली. त्यांनी शंकांचं निराकरण केलं व ब्रिटनमधील गुंतवणूक, बँकिंग, उद्योग या क्षेत्रांत अनेक मित्र मिळवले, असं ब्रिटिश फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष सर पीटर रनगे यांनी सांगितलं. तर अभूतपूर्व वक्तृत्वानं वा बुद्धिकौशल्यानं नव्हे, तर स्पष्ट, निर्भीड व पुरोगामी विचारांनी त्यांनी ब्रिटिश उद्योगपतींची मनं काबीज केली, असे उद्‌गार 'हिंदुस्तान टाइम्स'चे प्रतिनिधी व्ही. आर. भट यांनी आपल्या वृत्तांतात काढले.

शास्त्री यांना केवळ एकच व्यक्तिगत प्रश्न विचारण्यात आला : "तुम्ही शाळेला जाण्यासाठी रोज गंगा नदी पोहून जात होता हे खरं आहे काय?" हा प्रश्न ऐकून शास्त्रींनाही मौज वाटली. होडीच्या तिकिटाचे पैसे नव्हते, म्हणून केवळ एकदाच आपण गंगा नदी पोहून गेलो होतो, असा खुलासा त्यांनी केला. पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांच्याबरोबरच्या त्यांच्या वाटाघाटीही समाधानकारक झाल्या.

ब्रिटिश पंतप्रधानांनी शास्त्री यांची भेट यशस्वी झाल्याचा निर्वाळा दिला. शुभ्र धोतर व कुडता पेहेनलेलं शास्त्रींचं एक मोठं छायाचित्र 'ऑब्झर्वर'नं छापलं. आणि 'हिमबिंदूइतके नीटनेटके' असं त्यांचं वर्णन केलं. शास्त्री यांनी लंडनमध्ये एक गोष्ट मात्र केली नाही. त्यांनी कोठल्याही दुकानाला भेट दिली नाही व काहीही खरेदी केलं नाही!

त्यानंतर पंतप्रधानांनी दौरा केला सोविएत युनियनचा. राजकीयदृष्ट्या ही अत्यंत महत्त्वाची भेट होती. शास्त्रींनी 'मध्यममार्गी' धोरण अनुसरल्यानं भारत-सोविएत मैत्री मंदावेल की काय अशी शंका भारतातील डाव्या विचारांची मंडळी व्यक्त करीत होती. दुसऱ्या बाजूला पाकिस्तान व सोविएत रशिया यांच्यात सख्य निर्माण होत होतं व त्याबद्दल राजकीय वर्तुळात काळजी व्यक्त केली जात होती. विशेषतः कच्छच्या

रणात पाकिस्ताननं केलेल्या आक्रमणाच्या संदर्भात भारत-पाकिस्तान-सोविएत रशिया या संबंधांना महत्त्व प्राप्त झालं होतं. नेहरू युगातील भारत-सोविएत मैत्रीचं धोरण न ओसरता तसंच चालू राहणार की शास्त्री या दोन महाबलाढ्य राष्ट्रांत समतोल साधणारी अलिप्ततेची भूमिका घेणार यावर पाश्चात्य जग नजर ठेवून होतं.

१२ मे १९६५ रोजी शास्त्री मॉस्कोला पोचले, तेव्हा विमानतळावर पंतप्रधान कोसिजिन यांनी त्यांचं स्वागत केलं. हे स्वागत काही उतू जाणारं नव्हतं. रात्री भोजनाच्या वेळी उभय पंतप्रधानांनी जागतिक प्रश्नांवर चर्चा केली. उभयतांनी भारत-सोविएत यांच्यामधील मैत्रीचा उल्लेख केला. कोसिजिन यांनी अलिप्ततावादी धोरणाची विशेष स्तुती केली.

शास्त्री व कोसिजिन यांच्यातील औपचारिक चर्चेला १३ मे रोजी सकाळी क्रेमलिन इथे प्रारंभ झाला. बोलणी सलोख्याच्या वातावरणात झाली. बहुतेक विषयांवर एकमत होतं. मतभेदाच्या ठिणग्या उडाव्या असं काहीच नव्हतं. भारतीय दूतावासानं दिलेल्या भोजनाच्या वेळीही चर्चा चालू राहिली. कोसिजिन यांच्यासमवेत त्यांच्या मंत्रिमंडळाचे डेप्युटी चेअरमन अलेक्झांडर शेलेपिन, वरिष्ठ पक्षनेते पोलायन्स्की व उपपंतप्रधान के. टी. माझुरॉव्ह हे होते. रात्रीच्या भोजनप्रसंगी जशी भाषणं झाली त्याच धर्तीवर काही वेळा भाषणं झाली. चीन व पाकिस्तान यांच्याविषयी उभय राष्ट्रांनी वापरलेली राजकीय मुत्सद्देगिरीची भाषा मात्र वेगळी होती. या दोन्ही देशांवर सोविएत रशियानं उघडपणं टीका केली नाही.

सोविएत नेत्यांची बाजू राजकीय मुत्सद्देगिरीच्या दृष्टीनं बरोबर असली व भारताबद्दल काही प्रमाणात मित्रत्वाची असली तरी भारत आणि सोविएत रशिया यांच्या या शिखर परिषदेत जो गाढ सलोखा, जिव्हाळा दिसायला हवा तसा तो या वाटाघाटींच्या पहिल्या फेरीत जाणवत नव्हता. भारताच्या नव्या पंतप्रधानांबद्दल रशियन नेत्यांच्या मनात काही प्रश्न असावेत व त्यांचं उत्तर त्यांना अद्याप सापडलेलं नसावं.

अशाच वातावरणात १३ मेची सायंकाळ झाली आणि जणू जादूची कांडी फिरावी असा बदल घडला. त्या सायंकाळी अचानक स्नेहाळ, सलोख्याचं असं वातावरण निर्माण झालं. बोल्शोई नाट्यगृहात सोविएत बॅलेच्या खेळाला शास्त्री व त्यांचं शिष्टमंडळ यांना बोलावलेलं होतं. कोसिजिन यांच्यासह शास्त्री जेव्हा बड्या पाहुण्यांसाठी राखून ठेवलेल्या खास आसनावर स्थानापन्न झाले तेव्हा उभं राहून श्रोत्यांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्रप्रमुखाचं स्वागत करायची ही नित्याची पद्धत होती.

बॅले पाहत असताना शास्त्रींच्या मनात रशियन नेत्यांशी चालू असलेल्या चर्चेचेच विचार घोळत होते. खऱ्या अर्थानं ही बोलणी सुरूच झाली नव्हती. तेव्हा आपणच याबाबत पुढाकार घ्यायला हवा आणि त्यासाठी हीच संधी उत्तम आहे, असा विचार शास्त्रींनी केला आणि काय असेल ते दोघांनी समोरासमोर बसून बोलण्याचं आपलं हुकुमी अस्त्र बाहेर काढलं. मध्यंतराच्या काळात त्यांनी कोसिजिन यांना ही वेळ बोलण्यासाठी सत्कारणी लावू या असं अनुवादकाच्या मदतीनं सुचवलं. त्याप्रमाणं

दोघा पंतप्रधानांत संभाषण सुरू झालं व मध्यंतरानंतरही ते चालू राहिलं. या संवादामुळं कोसिजिन यांच्या दृष्टिकोनात आमूलाग्र फरक पडला. या खासगी चर्चेनंतर कोसिजिन प्रसन्न दिसत होते.

मी शास्त्रींबरोबर 'बॅले'च्या त्या कार्यक्रमाला गेलो होतो. दोघे प्रामाणिकपणं एकमेकांना काही सांगू पाहत आहेत असं दुरून वाटत होतं. कार्यक्रमानंतर मॉस्कोतील आपल्या 'डाचा'त शास्त्री परतले, तेव्हा मी उभयतांच्या भेटीबद्दल त्यांना विचारलं. जनतेच्या अन्न, वस्त्र व निवारा या आवश्यक गरजा पुऱ्या करण्यासाठी व्यावहारिक पावलं उचलणं हे आमच्या आर्थिक धोरणाचं मूलभूत उद्दिष्ट आहे, असं आपण कोसिजिनना सांगितल्याचं ते म्हणाले. अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी भारताला मोठ्या प्रमाणात परदेशी राष्ट्रांवर अवलंबून राहावं लागत आहे याबद्दल आपण व्यथित आहोत. तेव्हा अन्नधान्योत्पादनाच्या बाबतीत शक्य तितक्या लवकर देशाला स्वयंपूर्ण बनवायचं आहे; त्यामुळं अवजड उद्योगधंद्यांपेक्षाही जास्त महत्त्व शेतीला द्यावं लागत आहे, ही वस्तुस्थिती त्यांनी त्यांना दाखवून दिली. सध्याच्या पिढीचं राहणीमान उंचवावं म्हणून लवकर पुऱ्या होणाऱ्या प्रकल्पांना अग्रक्रम देण्याचा आपला मनोदयही त्यांनी प्रकट केला. भारताच्या समाजवादाचंच हे सार असून आपण काही डाव्या वा उजव्या विचारसरणीचे नाही, आपला दृष्टिकोन व्यवहार्य, उपयुक्ततावादी आहे असंही त्यांनी स्पष्ट केलं. त्यांच्या या मनमोकळ्या व स्पष्ट विचारांनी कोसिजिन प्रभावित झाले.

अलिप्ततावादाला आपला निर्विवाद पाठिंबा आहे, असं सांगून सोविएत रशिया भारताला करीत असलेल्या मदतीबद्दल शास्त्रींनी कृतज्ञता प्रकट केली. रशियाची मदत भारतीय लष्कराच्या सामर्थ्यवाढीच्या व आर्थिक विकासाच्या दृष्टीनं अत्यंत उपयुक्त आहे, असंही ते म्हणाले. पाकिस्तानसह सर्व राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध राखण्याचा आपला इरादा त्यांनी प्रकट केला. अमेरिकेशी मैत्रीचे संबंध विकसित करण्याचा आपला प्रयत्न असला तरी तो परराष्ट्र धोरणाबाबतचं आपलं धोरण गहाण ठेवून नव्हे, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या व्यक्तिगत चर्चेमुळं भारताबद्दल वाटणाऱ्या शंकांचं धुकं तत्काळ निवळलं. त्यानंतर कोसिजिन व शास्त्री यांच्यात गाढ मैत्री निर्माण झाली व ती शास्त्रींच्या मृत्यूपर्यंत टिकून राहिली.

दुसऱ्या दिवशी सोविएत कम्युनिस्ट पक्षाचे प्रथम सचिव लिओनिद ब्रेझनेव्ह यांच्याशी शास्त्रींनी केलेली बोलणीही उत्तम वातावरणात पार पडली. शास्त्रींनी लेनिन स्मारकाला, क्रेमलिनमधील लेनिनच्या निवासस्थानाला भेट दिली. महान क्रांतिकारक लेनिन यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्यासाठी शास्त्रींनी टोपी काढून हातात घेतली होती. या दौऱ्यात लेनिनग्राड, कीव्ह व ताश्कंद या तीन शहरांना त्यांनी भेट दिली. कोसिजिन सर्वत्र त्यांच्याबरोबर होते. शास्त्रींच्या बरोबर भोजन घेताना कोसिजिन यांनी सुद्धा शाकाहारी पदार्थच घेतले हे विशेष. एकूणच शंकेच्या वातावरणात सुरू झालेल्या शास्त्रींच्या या रशियन दौऱ्याची सांगता विजयाच्या वातावरणात झाली. शास्त्रींनी १६

ऑगस्ट १९६५ रोजी संसदेत आपल्या सोविएत भेटीविषयी निवेदन केलं. कच्छच्या बाबतीत भारताच्या भूमिकेविषयी सोविएत नेत्यांनी समंजसपणा दाखवला. मात्र त्यांनी यात शांततापूर्ण तोडगा काढावा असं सुचवलं. काश्मीरबाबतच्या आपल्या पारंपरिक भूमिकेचा रशियन नेत्यांनी पुनरुच्चार केला, अशी माहिती शास्त्रींनी दिली. "माझ्या सोविएत रशियाच्या भेटीमुळं उभय देशांतील मैत्रीचे व सहकार्याचे संबंध अधिकच घनिष्ट झाले हे निश्चित," असंही ते म्हणाले.

ब्रिटन व सोविएत युनियन यांच्या यशस्वी दौऱ्यांमुळं शास्त्रींच्या उंचावत चाललेल्या प्रतिमेला आंतरराष्ट्रीय पैलू लाभला. पाश्चिमात्य व पौर्वात्य राष्ट्रांना स्वीकारार्ह असलेला नेता अशी त्यांची आंतरराष्ट्रीय प्रतिमा बनू लागली. दोन्ही सत्तागटांशी व्यवहार करू शकणारा नेता म्हणूनही ते ओळखले जाऊ लागले.

२३ ते २५ एप्रिल १९६५ या काळात त्यांनी नेपाळला भेट दिली. त्याआधीच्या पहिल्या भेटीत शास्त्रींनी नेपाळचे राजे व पंतप्रधान यांच्याशी सलोख्याचे संबंध निर्माण केलेले होतेच. आता पंतप्रधान या नात्यानं त्यांनी काढलेला नेपाळचा दौरा यशस्वी ठरला. १० ते १४ जून १९६५ या काळात त्यांनी कॅनडाचा दौरा केला. पंतप्रधान लीस्टर पियर्सन यांच्याशी केलेल्या चर्चेमुळे उभय देशांच्या मैत्रीला पुन्हा उजाळा मिळून ती अधिक दृढ झाली. जुलै १९६५ मध्ये युगोस्लाव्हियाला त्यांनी दिलेली भेट आनंदाची व संस्मरणीय ठरली. अध्यक्ष जोसिप ब्रॉझ टिटो यांनी त्यांचं अत्यंत प्रेमानं स्वागत केलं. बेलग्रेड इथली बोलणी स्नेहपूर्ण वातावरणात झाली. ब्रिओनी बेटावरील टिटोंच्या आरामगृहालाही शास्त्रींनी भेट दिली. एक निर्भय व बुद्धिमान जागतिक नेता म्हणून टिटो ओळखले जात होते. जगातील दोन्ही महासत्तांशी सारखेच मैत्रीचे संबंध ठेवण्याच्या भारताच्या धोरणाला त्यांनी पाठिंबा दिला. दोघांची जीवनपद्धती भिन्न भिन्न असली तरी शास्त्री व टिटो यांची चांगलीच मैत्री जमली.

भारतभेटीवर येणारे अनेक विदेशी राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान यांच्याशीही शास्त्रींच्या चर्चा होत. त्यात मॉरिशसचे रामगुलाम, अफगाणिस्तानचे मोहम्मद युसुफ, ब्रह्मदेशचे जनरल ने विन, फिनलंडचे युन्हो कालेवा केक्कोनेन, फ्रान्सचे एच. पाँपिदू, झेकोस्लोव्हाकियाचे जोजेफ लेनार्ट, युगांडाचे ए. मिल्टन ओबोटे आणि नेपाळचे राजे यांचा समावेश होता.

पाकिस्तानच्या नेत्यांचीच काय ती उणीव होती.

□□



।। दहा ।।

# युद्धाच्या सावल्या

शेजारी राष्ट्राशी शांततेनं नांदावं म्हणून पाकिस्तानबरोबरचे संबंध सुधारणं हे शास्त्रींच्या परराष्ट्र धोरणाचं सर्वांत महत्त्वाचं व तातडीचं उद्दिष्ट होतं. पूर्वेतिहास पाहता हे संबंध सुधारण्यात बऱ्याच अडचणी होत्या. तरी प्रयत्न करण्याचा शास्त्रींचा निर्धार होता. त्यांच्या मनात कसलाही जातीय पूर्वग्रह नव्हता. हिंदू असूनही इस्लामबद्दल त्यांना अत्यंत आदर होता. नैनी तुरुंगात कारावास भोगताना रोज सायंकाळी मौलाना हुसेन अहमद मदानी या कैद्यासमवेत ते पवित्र कुराणाच्या शिकवणीचे धडे घेत असत, असं खासदार बी. एन. पांडे यांची आठवण सांगते.

शास्त्रींची पंतप्रधानपदी निवड झाल्यावर पाकिस्तानचे अध्यक्ष मोहम्मद अयूबखान यांनी रेडिओवरून केलेल्या भाषणात भारताशी जुळवून घेण्याचा सूर होता खरा, परंतु तो प्रचाराचा एक भाग होता इतकंच. पाकिस्तानची काश्मीरबद्दलची भूमिका लक्षात घेता उभय देशांत सामंजस्याचे खरेखुरे प्रयत्न करण्यास फारच कमी वाव होता.

शास्त्रींनी ११ जून १९६४ रोजी राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात भारत व पाकिस्तान यांच्यात मैत्री, सदिच्छा व परस्परसहकार्य निर्माण झाल्यास उभय देशांचा लाभ होईल, तसेच आशियातील शांततेत व भरभराटीत भर पडेल असे सांगितले. ते पुढं म्हणाले :

*"गेला काही काळ भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंधात दुरावा आला*

*आहे. दुर्दैवानं उभय देशांतील जमातींच्या संबंधावर त्याचा दुःखद परिणाम होतो. ही लाट आपण उलटविली पाहिजे. त्यासाठी उभय देशांत व जनतेत सदिच्छेची व खंबीर निर्णयाची भावना हवी. अध्यक्ष अयूबखान यांनी अलीकडे नभोवाणीवरून केलेल्या भाषणात सामंजस्य व शहाणपण हे दिसून आले.''*

कैरो इथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेला शास्त्री हजर राहिले. पाकिस्तान अलिप्त राष्ट्र संघटनेचा सदस्य नसल्यानं अयूबखान यांची कैरो इथे शास्त्रींशी भेट होण्याची शक्यता नव्हती. तेव्हा शास्त्रींनीच कैरोहून परतताना अयूबखान यांची भेट घ्यायला आपल्याला आवडेल असं सूचित केलं. तेव्हा अयूबखान यांनी परतताना वाटेत कराचीला थांबण्याची त्यांना विनंती केली. त्यानुसार १२ ऑक्टोबर १९६४ रोजी शास्त्रींचं कराचीला आगमन झालं. विमानतळावरून अयूबखान यांच्याबरोबर त्यांच्या निवासस्थानी जात असताना दुतर्फा जमलेल्या चाहत्यांनी त्यांचं स्वागत केलं. भोजनानंतर उभय नेत्यांची नव्वद मिनिटं चर्चा झाली. एकूण पाच तास दोघांनी एकत्र घालविले. जागतिक प्रश्नांवर तसंच भारत-पाक संबंधांविषयी त्यांची चर्चा झाली. हे संबंध सुधारण्याची गरज असून त्यासाठी प्रयत्न करण्याची उभयतांनी इच्छाही प्रकट केली.

खरं तर प्रामुख्यानं एकमेकांना चाचपण्याचा हा प्रयत्न होता. अयूबखान यांचा दृष्टिकोन व्यवहार्य असून त्यामुळं भारत व पाकिस्तान यांच्यातील प्रश्न शांततेच्या मार्गानं सोडवण्यास मदत होईल असं शास्त्रींचं मत बनलं. मात्र भुत्तो त्यात बाधा निर्माण करतील असं त्यांना वाटत होतं. ते काही असलं तरी काश्मीरमधील युद्धबंदीचा भंग होत असल्याच्या प्रश्नावर गृहमंत्रालयाच्या पातळीवर बैठक घेण्याचं ठरलं. त्यानंतर परराष्ट्र मंत्र्यांमध्ये वाटाघाटी आणि शेवटी शिखर परिषद घेणं शक्य होतं.

त्याच दिवशी सायंकाळी शास्त्री मायदेशी परतले. विमानतळावर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, ''दोन्ही बाजू जुळवून घेण्याच्या मनःस्थितीत आहेत. मात्र फार अपेक्षा बाळगू नये.''

अयूबखान– विशेषतः भुत्तो– हे शास्त्रींचा अंदाज घेत होते, त्यांना जोखून पाहत होते. परराष्ट्र सचिव अझिझ अहमद यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानमध्ये मंत्रालयात एक 'काश्मीर विभाग' होता. शास्त्रींच्या नेतृत्वाखालील भारताचं मूल्यमापन करून काश्मीरच्या प्रश्नाविषयी हा विभाग नवे धोरण ठरवणार होता.

शास्त्रींनी मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांना व ज्येष्ठ अधिकाऱ्यांना अयूबखान यांच्याशी झालेल्या चर्चेचा गोषवारा सांगितला. शांततेचा मार्ग अनुसरायचा शास्त्रींचा निर्धार होता आणि राष्ट्राध्यक्ष अयूबखान यांना पुढील गोष्टी ते समजावून देणार होते :

*(१) पाकिस्तानी प्रदेशाचा इंचभर भाग देखील काबीज करण्याची भारताची इच्छा नाही.*

*(२) पाकिस्तानची भरभराट होवो अशी भारताची मनापासून इच्छा आहे.*

*(३) काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून त्यात पाकिस्तानचा हस्तक्षेप*

*भारत खपवून घेणार नाही.*

*(४) भारत व पाकिस्तान यांना शांततेच्या व सुसंवादी वातावरणात राहावं लागेल. यासाठी उभय राष्ट्रं एकमेकांत अस्थैर्य निर्मिण्याचा प्रयत्न करणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे.*

## पाकिस्तान युद्धाला सज्ज

दरम्यान शास्त्रींशी झालेल्या वाटाघाटींनंतर अयूबखान रावळपिंडीला निघून गेले व भारताबद्दलचं पाकचं धोरण ठरविण्याची जबाबदारी त्यांनी भुत्तोंवर टाकली. पाकिस्तान व विशेषतः भुत्तो यांच्या दृष्टीनं मुख्य प्रश्न होता काश्मीरचाच. १९६५ मध्ये पाकिस्तानी लष्कराचे कमांडर इन चीफ असलेल्या जनरल मोहम्मद मुसा यांनी 'माय व्हर्शन' या आपल्या ग्रंथात भुत्तो यांनी आपलं धोरण कसं पद्धतशीरपणे आखलं होतं याची माहिती दिली आहे.

जनरल मुसा यांनी दिलेल्या माहितीनुसार अझिझ महमद यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र असा काश्मीर विभाग (काश्मीर सेल) १९६४ च्या आरंभी स्थापन करण्यात आला होता.

*"पाकव्याप्त काश्मीरमधील घडामोडींचा आढावा घेण्यासाठी 'काश्मीर विभागा'च्या अधून मधून बैठका होत. या घडामोडींचा वापर कसा करता येईल अशा दृष्टीनं धोरणाचा उहापोह केला जाई. लष्कराच्या मुख्यालयाचा त्याच्याशी संबंध होता व त्याचं प्रतिनिधित्व जनरल स्टाफ ब्रँच करीत असे. सर्वसाधारणतः संरक्षण सचिव, आयबीचे संचालक, लष्करप्रमुख किंवा 'मिलिटरी ऑपरेशन्स'चे संचालक या बैठकींना हजर असत. कधी कधी राष्ट्राध्यक्षांच्या सचिवांना व अन्य ज्येष्ठ अधिकाऱ्यांनाही आमंत्रित केलं जाई. या बैठकींना काही कार्यक्रमपत्रिका नसे, काही अटी वा शर्ती नसत, निर्णय घेण्याचा अधिकार नसे. हा विभाग म्हणजे एक सर्वसाधारण चर्चा करणारी यंत्रणा होती. तसंच अत्यंत संवेदनशील बाबींचा उहापोह होत असल्यानं चर्चेचा वृत्तांत नोंदण्यात येत नसे. या विभागाचे प्रमुख राष्ट्राध्यक्षांना चर्चेचा गोषवारा तोंडीच सांगतात असं आम्हाला सांगण्यात आलं होतं."*

शास्त्री व अयूबखान यांच्या भेटीनंतर भारताचे नवे पंतप्रधान देखील काश्मीरविषयीचं धोरण लवचिक करण्यास तयार नाहीत असा निष्कर्ष पाकिस्तानच्या या काश्मीर विभागानं काढला. तेव्हा आता पाकनं काही 'कारवाई' करण्याची वेळ येऊन ठेपली आहे, असं मत व्यक्त केलं जाऊ लागलं. जनरल मुसा म्हणतात :

*"डिसेंबर १९६४ मध्ये झालेल्या एका बैठकीला मी चीफ ऑफ द जनरल स्टाफ यांच्या विनंतीवरून हजर होतो असं मला आठवतं. काश्मीरमध्ये सकारात्मक भूमिका लष्करी मुख्यालयानं वठवावी आणि त्यांनी सुचवलेले हल्ले चढवावे,*

*असा परराष्ट्र मंत्रालयाचा दृष्टिकोन असून आज सकाळी मी राष्ट्राध्यक्षांशी त्याबाबत चर्चा केली, असं सांगून अझिझ अहमद पुढं म्हणाले. 'फील्ड मार्शल अयूबखान यांनी त्याला संमती दिली आहे.' राष्ट्राध्यक्षांनी दिलेला आदेश प्रत्यक्षात अमलात आणायचा आहे की आपल्या विभागानं त्यावर केवळ चर्चा करायची आहे, अशी विचारणा मी केली, आमच्या दृष्टीनं 'अंमलबजावणी' व 'चर्चा' यात महदंतर होतं. इतक्या उशिरानं देखील याबाबत चर्चा करण्यास राष्ट्रपतींचा आक्षेप नाही, असं परराष्ट्र सचिवांनी सांगितलं व त्यामुळं गोंधळ आणखीच वाढला. राष्ट्रप्रमुखानं संमती दिली असेल तर मग चर्चा करून काय साध्य होणार हे आम्हाला उमजेना. आमची मतं नोंदवून घ्यावीत व ती राष्ट्राध्यक्षांच्या विचारार्थ पाठवून द्यावीत असा आग्रह मी धरला. कारण गनिमी कारवायांचा वेग राखता येईल आणि बाह्य आक्रमणापासून आपण प्रभावी बचाव करू शकू अशी लष्करी तयारी झाल्याविना आपण भलत्याच भरीला पडू नये असं आम्हाला ठामपणं वाटत होतं.''*

जनरल मुसा यांची काश्मीरमध्ये बेकायदा कारवाया करण्यास अनुकूलता नव्हती. घाईनं काही करता कामा नये असा सावधगिरीचा इशारा त्यांनी दिला. अयूबखानना हे समजावं म्हणून चर्चेबाबतचं एक टिपण राष्ट्राध्यक्षांना पाठवून देण्यात आलं. जनरल मुसा पुढं म्हणतात :

*''काश्मीरमध्ये हल्ले चढवण्याची कल्पना व त्यांची वेळ यासंबंधीच्या परराष्ट्र खात्याच्या प्रस्तावातील धोक्यांबाबत मी स्वतः राष्ट्राध्यक्षांशी चर्चा केली. तेव्हा अशी उपाययोजना आपण रोखून ठेवू असं आश्वासन त्यांनी मला दिलं. तरीदेखील आणि सुप्रीम कमांडर आमच्याशी सहमत असूनही लष्करी मुख्यालयानं मे १९६५ मध्ये हल्ले करण्याचं ठरवावं हे आश्चर्यजनकच होतं. युद्धपिपासू मंडळींना अखेर राष्ट्राध्यक्षांचं मन वळवण्यात यश आलं होतं. या हल्ल्यांनी उभय देशांत सशस्त्र संघर्ष सुरू झाला. मला वाटतं, तो टाळण्याची राष्ट्राध्यक्षांची इच्छा होती.''*

जनरल मुसा यांना काश्मीरबद्दल दोन योजना आखण्यास सांगण्यात आलं होतं. एक थेट हल्ला करण्याची व दुसरी सौम्य पातळीवरची. यांपैकी दुसरी योजना सोडून देण्यात आली. याचं कारण कच्छच्या रणातील मोहिमेला मिळालेला अनुकूल प्रतिसाद आणि लष्करी मुख्यालयाला त्यापुढचं पाऊल उचलण्यास दिलेली संमती, असं मुसा यांचं मत दिसतं.

काश्मीरवर बळजबरीनं कब्जा करण्यासाठी १९६५ मध्ये पाकिस्ताननं जे युद्ध पुकारलं त्याची पार्श्वभूमी ही अशी होती. या हल्ल्याच्या निर्णयामागं खरे सूत्रधार होते परराष्ट्रमंत्री झुल्फिकार अली भुत्तो. परराष्ट्र सचिव अझिझ अहमद यांच्यामार्फत ते हे सारं घडवून आणीत होते. अयूबखान यांची याला तयारी नसताना तत्त्वशून्य भुत्तो यांनी हट्टानं त्यांना भरीला घातलं. जनरल मुसा यांच्या दृष्टिकोनाऐवजी आपल्या

म्हणण्याला पाठिंबा मिळावा म्हणून भुत्तो यांनी काही कमांडर्सचा बुद्धिभेदही करण्याचा प्रयत्न केला. अशा तऱ्हेनं भुत्तो यांच्या नेतृत्वाखाली पाकमधील युद्धपिपासू मंडळींनी डिसें. १९६४ मध्ये भारतावर चढाई करण्याचं धोरण आखलं. ही योजना चार टप्प्यांत होती :

*(१) पाकिस्ताननं आपल्या इच्छेनुसार एक जागा निवडून तेथे 'चाचपणी' संघर्ष करणं.*

*(२) गनिमी युद्धासाठी एक सर्वंकष पण छुपा हल्ला काश्मीरवर चढवणं व स्थानिक जनतेनं हे बंड पुकारलं आहे असा देखावा पाकिस्तानी प्रचार यंत्रणेनं करणं.*

*(३) अखनूर पुलावर ताबा मिळवण्यासाठी काश्मीरच्या छांब भागात पाकिस्तानी लष्करानं हल्ला करणं. त्यामुळं भारतातून येणाऱ्या रसदेचा मार्ग बंद होईल.*

*(४) भारतीय प्रदेशात सोळा मैल आत असलेलं धार्मिक व व्यापारी केंद्र अमृतसर यावर मोठा हल्ला चढवून ते ताब्यात घेणं. पराभूत भारत जेव्हा शांततेसाठी याचना करील तेव्हा काश्मीरच्या बदल्यात अमृतसर परत करणं.*

भारताच्या प्रतिहल्ल्याचा मोठा धोका असलेली ही धाडसी योजना राष्ट्राध्यक्षांशी सल्लामसलत केल्याविना ठरली असेल यावर माझा विश्वास नाही. तसंच यशाची खात्री असल्याविना राष्ट्राध्यक्षांनी त्याला मान्यता दिली असेल असं वाटत नाही. तेव्हा काश्मीर भारताकडून ताब्यात घेण्यासाठी हल्ला करण्यास हीच वेळ योग्य आहे हे अयूबखान यांना पटवून देण्यात भुत्तो व अझिझ अहमद हे यशस्वी झाले असं म्हणावं लागेल. त्या वेळी पुढील घटक त्यांच्या मनात असावेत :

*(१) भारतात नवे पंतप्रधान अधिकारावर आले होते व त्यांचा अजून जम बसायचा होता;*

*(२) भारतापुढं अन्नटंचाईसह मोठ्या आर्थिक अडचणी होत्या.*

*(३) १९६२ मध्ये चीनकडून पराभूत झाल्यानं भारतातील जनता व लष्कर यांचं नीतिधैर्य खचलं होतं.*

*(४) भूमीवरील व हवाई या दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानकडे अधिक चांगली शस्त्रास्त्रं आहेत. पॅटन रणगाडे व सेबरजेट विमानं अशी अत्याधुनिक सामग्री भारतापाशी नाही.*

*(५) संख्येनं भारताचं सैन्यदल खूप मोठं असलं तरी त्याचा फार मोठा हिस्सा चीनलगत असलेल्या सीमा प्रदेशाच्या रक्षणात गुंतलेला आहे. उरलेल्या भारतीय लष्कराचा पाकिस्तानी सैन्य सहज पराभव करू शकेल.*

*(६) चीन हा पाकिस्तानचा प्रभावी मित्र व भारताचा शत्रू आहे. चिनी आक्रमणाचा सतत धोका असल्यानं तेथील सीमेवरील सैन्य पाकिस्तानी सीमेकडे भारताला*

*वळवता येणार नाही. आणि शेवटी*

*(७) भारत आपली संरक्षणक्षमता वाढवीत आहे. काही वर्षांनी लष्करी बळाचा समतोल त्यांच्या बाजूनं बलाढ्यतेकडे झुकू शकेल. सध्या पाकिस्तानची स्थिती भारतापेक्षा प्रभावी आहे. तेव्हा ही संधी दवडता कामा नये.*

पाकिस्तानच्या दृष्टीनं भारतावर हल्ला करण्यास ही कारणं पुरेशी होती. त्याशिवाय राष्ट्राध्यक्षांच्या दृष्टीनंही काही कारणं होती. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्राध्यक्षांनी स्वतःची उच्च प्रतिमा तयार केली होती. सोविएत रशियाशी त्यांनी पाकिस्तानचे संबंध सुधारले होते. तेव्हा युद्धाच्या वेळी रशिया आपोआप भारताची बाजू घेण्याची शक्यता कमी होती. पाश्चिमात्य लष्करी वर्तुळात अयूबखान लोकप्रिय बनले होते. राजदूत चेस्टर बोल्स यांनी अयूबखान यांचं केलेलं मूल्यमापन असं होतं .

*पाकिस्तानी चागले आहेत, कार्यक्षम आहेत. आशियातील अन्य कोणाहीपेक्षा त्यांचे नेते हे अधिक पाश्चात्य धर्तीचे आहेत. अयूब यांच्या सवयी ब्रिटिश सैन्याधिकाऱ्यासारख्या असून ते उत्तम इंग्रजी बोलतात. मार्टिनीमध्ये ऑलिव्हचं फळ टाकावं की कांदा याची चर्चा ते पाश्चात्यांशी करू शकतात. त्यामुळं आमचे लोक म्हणतात. ''मला हा आशियाई नेता समजतो, कारण तो आमच्या भाषेत बोलतो!''*

पेंटॅगॉन व ब्रिटन यांच्यातील प्रख्यात नेत्यांशी अयूबखान यांचे असे मित्रत्वाचे वैयक्तिक संबंध होते. त्यामुळं उच्चपदस्थांच्या वर्तुळात आपली भूमिका समजून घेतली जाण्याची त्यांना खात्री वाटत असे. 'मुस्लिम पाकिस्तान'ला सतत 'हिंदू भारता'च्या धोक्याखाली राहावं लागतं अशी भावना अनेक विदेशी नेत्यांच्या मनात तयार करण्यात ते यशस्वी झाले होते.

भारत पाकिस्तानवर आक्रमण करण्याची छुपी योजना आखीत आहे, याबद्दलचा पुरावा कधी कोणीही मागितला नाही. पाकला नष्ट करण्यासाठी त्यावर हल्ला करण्याची योजना भारतानं आखली होती, हे सिद्ध करणारा कसलाही पुरावा कधी कोणी दाखवला नाही. असं आक्रमण करून भारताला काय लाभ होणार असा प्रश्न कोणी विचारला नाही. भारतीय नेते कायमच पाकिस्तानबद्दल व त्याच्या भरभराटीबद्दल सदिच्छा व्यक्त करीत, परंतु त्याची प्रसिद्धी दडपली जाई. भारतानं आपल्या लष्कराकडे इतकं दुर्लक्ष केलं की १९६२ मध्ये चीनकडून पराभव पत्करावा लागला व त्यानंतर भारताला संरक्षणाकडे लक्ष पुरवायची जाग आली हे कोणी सांगितलं नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांच्यावर या पाकिस्तानी प्रचाराचा फारसा परिणाम झाला नव्हता. त्यांची खात्री पटली नव्हती. १२ ऑगस्ट १९६३ रोजी व्हाइट हाउसमध्ये झालेल्या एका बैठकीत केनेडींनी आपल्या मनातील शंका बोलून दाखविल्या. या बैठकीला परराष्ट्रमंत्री डीन रस्क, अंडरसेक्रेटरी बॉल, गव्हर्नर ए. हॅरिमन, असि.

सेक्रेटरी टॉलबोट, प्रशासक बेल, सी. आय. ए.चे संचालक जॉन मेकॉन प्रभृती हजर होते. बॉल हे पाकिस्तानमध्ये एका महत्त्वाच्या कामगिरीवर जाणार होते व त्यांना सूचना देण्यासाठी ही बैठक होती. अयूबखान खरोखरच भारताच्या संभाव्य आक्रमणाच्या धास्त्यानं काळजीत आहेत, असं मत या बैठकीत अनेकांनी मांडलं. परंतु केनेडी यांना हे पटलं नाही. बराच उहापोह झाल्यावर देखील अयूबना खरंच भारताची भीती वाटत आहे यावर केनेडींचा विश्वास बसला नाही. पाकवर हल्ला करून भारत काय साध्य करणार? एक अब्ज डॉलर्सच्या पाश्चिमात्य मदतीला ते मुकतील. भारतावर यशस्वी हल्ला करण्याची आपली क्षमता कमी होत आहे याची अयूबना खरी चिंता लागली असावी, असं केनेडींचं मत होतं.

केनेडी यांच्यानंतरचे अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी एकदा चेस्टर बोल्सना विचारलं, "सार्वमत घेऊन ते या प्रश्नाचा एकदाचा सोक्षमोक्ष का लावून टाकत नाहीत?" त्यावर बोल्स म्हणाले, "मीच तुम्हाला एक प्रश्न विचारतो. समजा, १८३५ मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षांना मेक्सिकोच्या अध्यक्षांनी एक पत्र पाठवून असं सांगितलं असतं की, टेक्सासला आमच्यात सामील व्हायचंय की अमेरिकेतच राहायचंय याबाबत सार्वमत घ्यावं. तुम्ही जर त्या वेळी अमेरिकेचे अध्यक्ष असता तर काय केलं असतं?" त्यावर "मेक्सिकन अध्यक्षांचं डोकं ठिकाणावर आहे की नाही अशी शंका मला आली असती," असं उत्तर जॉन्सन यांनी दिलं!

काही महिन्यांनंतर जॉन्सन यांच्याही लक्षात अयूबखान यांचा डाव आला. त्यामुळं भारताविरुद्ध पाकला मदत करण्यात पैसा वाया घालवायची आपली इच्छा नाही असं त्यांनी स्पष्ट केलं. हळूहळू भारतविरोधी योजनांसाठी अमेरिकेची मदत मिळणार नाही, हे अयूबखान यांच्या ध्यानात येऊ लागलं होतं. काळ काही आपल्या बाजूचा नाही असं त्यांना वाटत होतं. भारताविरुद्ध कारवाई करायची असेल तर ती आताच करायला हवी, असं त्यांच्या मनानं घेतलं. तेव्हा भारतावर चढाई करण्याच्या मोहिमेचा पहिला टप्पा अमलात आणावा अशा सूचना त्यांनी १९६५ च्या आरंभी दिल्या. भारत व पाकिस्तान यांच्यामधील युद्धाची ती सुरुवात होती.

□□



।। अकरा ।।

# ऑपरेशन डेझर्ट हॉक

हल्ल्याच्या पहिल्या टप्प्याचा मुहूर्त पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष अयूबखान ठरवणार होते! जानेवारी १९६५ च्या सुरुवातीला फील्ड मार्शल मोहंमद अयूबखान यांची पाच वर्षांसाठी राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली. ७ ऑक्टोबर १९५८ रोजी उठाव करून सत्तेवर आलेल्या अयूबखान यांनी अशा प्रकारे आपल्या स्थानाला कायदेशीर मान्यता मिळवली. आता ते सर्वेसर्वा होते. भारताविरुद्ध युद्धाची 'चाचपणी मोहीम' म्हणून त्यांनी कच्छच्या रणाची निवड केली. ३५०० चौरस मैलांचा हा टापू भारताच्या ताब्यात बेकायदेशीररीत्या आहे असा भुत्तो यांचा दावा होता. या भागावर आमचा हक्क आहे असं अयूब सांगू लागले. आधी पोलिस कारवाई व नंतर लष्करी चढाई करून आपला हा दावा अमलात आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

कच्छच्या रणाबद्दलची नेमकी स्थिती काय आहे याचा तपशील शास्त्री यांनी ३ मे १९६५ रोजी संसदेत केलेल्या निवेदनात दिला होता. त्यातील काही भाग पुढीलप्रमाणं :

*"कच्छ-सिंध सीमारेषा ही व्यवस्थित आखलेली, व्यवस्थित प्रस्थापित झालेली व सर्वज्ञात असलेली आहे. 'सर्व्हे ऑफ इंडिया'च्या १८७१ पासून प्रसिद्ध झालेल्या नकाशाच्या विविध आवृत्त्यांत ती दाखवलेली आहे. या सीमारेषेचा बराचसा भाग प्रत्यक्ष जमिनीवर आखलेला नाही. याचे कारण सिंध प्रदेश व कच्छ दरबार यांच्यात वादग्रस्त सीमाभाग कधीच नव्हता. तसेच ब्रिटिश इंडियातील प्रदेश व*

*राज्ये यांच्यातील सीमारेषा खांब उभारून दाखवण्याची पद्धती नव्हती. कारण त्या काही आंतरराष्ट्रीय सीमारेषा नव्हत्या.*

*१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या प्रदेशातील पाकिस्तान हा भाग स्वतंत्र राष्ट्र म्हणून बाजूला काढण्यात आला. स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार पाकिस्तानच्या भू-प्रदेशाची मोजणी करण्यात आली, तेव्हा सिंधचा त्यात अंतर्भाव करण्यात आला. अशा प्रकारे सिंध आणि कच्छ यांच्यातील सीमारेषा ही आंतरराष्ट्रीय बनली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी सिंध प्रदेशात समाविष्ट करण्यात आलेल्या प्रदेशापेक्षा जादा भू-भागावर पाकिस्तान हक्क सांगू शकत नाही. नकाशात कांजरकोटच्या उत्तरेला दाखवलेला कच्छ-सिंध सीमेच्या दक्षिणेचा भाग हा भारताचा आहे हे स्पष्ट आहे. तो पाकचा भाग आहे अशी कल्पनाही करणे शक्य नाही. किंबहुना हा भाग कच्छच्या राजाच्या अमलाखाली होता. तसेच 'सर्व्हे ऑफ इंडिया'च्या १८७१, १८८६, १९४३ व (स्वातंत्र्यापूर्वीचा अखेरचा नकाशा) १९४६ या चारही सालांच्या नकाशात दाखवलेल्या सिंध-कच्छ सीमेपर्यंत तो होता.''*

कच्छ व सिंध यांच्यामधील सीमारेषेचा तपशील देणाऱ्या ब्रिटिश काळातील अन्य अधिकृत कागदपत्रांचाही शास्त्रींनी उल्लेख केला. या सर्व कागदपत्रांतून कच्छचं रण हे सिंध प्रदेशाबाहेर असल्याचं स्पष्टपणं म्हटलं आहे. या कागदपत्रांत कराचीत १९०७ साली प्रसिद्ध झालेलं सिंध गॅझेटियर, १९०९ मध्ये प्रसिद्ध झालेलं बॉम्बे प्रेसिडेन्सीचं गॅझेटियर ऑफ इंडिया, १९०८ मधील इंपीरियल गॅझेटियर ऑफ इंडिया यांचा अंतर्भाव होता. ब्रिटिश सरकारच्या १९३७, १९३९ व १९४२ या सालांतील राजकीय कागदपत्रांत कच्छचं रण हे 'वेस्टर्न इंडिया स्टेट्स एजन्सी'मध्ये दाखवलं असून त्याचा कधीच सिंध प्रदेशात समावेश केलेला नव्हता. फाळणीनंतर 'वेस्टर्न इंडिया स्टेट्स एजन्सी' खालील सारा भू-प्रदेश भारताच्या हद्दीत आला होता. तेव्हा कच्छच्या रणाचा संपूर्ण भाग भारतीय आहे, असंही शास्त्रींनी दाखवून दिलं.

परंतु प्रत्यक्ष जमिनीवर या सीमारेषेची आखणी केलेली नव्हती. ब्रिटिश काळातील कागदपत्रांतून या सरहद्दीचा स्पष्ट तपशील असल्यानं आंतरराष्ट्रीय सीमारेषा आखण्यात तशी काही अडचण नव्हती. परंतु पाकसारखा शत्रू शेजारी असल्यानं या बाबतीत केव्हाही वाद निर्माण होणं शक्य होतं. भारत-चीनमधील सीमारेषेबाबत भारतानं हेळसांड केली होती व त्याचे परिणाम त्याला भोगावे लागले होते. तसाच प्रश्न पाकिस्तानच्या बाबतीत निर्माण होऊ पाहत होता.

गुजरात-पाक सीमारेषेपासून तीन मैल भारतीय प्रदेशात असलेल्या कांजरकोटबद्दल पाकिस्ताननं १९६२ मध्ये आपले काही 'आक्षेप' भारताला कळविले होते. १९६३ मध्ये राजस्थान व पाकिस्तान यांच्यातील सीमारेषा भूप्रदेशावर निश्चित करण्यात आली. परंतु गुजरात-पाक सीमा भूप्रदेशावर आखण्यात आली नाही. मे १९६४ मध्ये कांजरकोट इथे तीन पाकिस्तानी भटकताना भारतीय पोलिसांना आढळले. रस्ता चुकल्यानं आम्ही

आत आलो हे त्यांचं म्हणणं ग्राह्य मानून पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना त्यांच्या प्रदेशात जाऊ दिलं. हे तिघे बहुधा पाकिस्तानच्या 'इंडस रेंजर्स'चे होते. असं नंतर आढळून आलं. 'इंडस रेंजर्स'नं तेव्हा भारतीय प्रदेशात गस्त घालायला सुरुवात केली होती. या तिघा घुसखोरांची जबानी घेण्यासाठी त्यांना रोखून न ठेवल्यानं ही घटना दुर्लक्षिली गेली. त्या भागात भारतीय लष्कर ठेवावं म्हणूनही काही करण्यात आलं नाही. कांजरकोट इथे ठाणंही प्रस्थापित करण्यात आलं नाही.

आपल्या हद्दीतील १८ मैलांच्या पट्ट्यात पाकिस्तानी गस्त घालीत असल्याचं २० जाने. १९६५ रोजी भारतीय पोलिसांना आढळून आलं. हा भाग सीमेच्या पलीकडे असलेल्या डिंग व सुरई यांना जोडणारा होता. हा प्रदेश आमच्या हद्दीत आहे म्हणून आमचे सीमारक्षक गस्त घालीत आहेत, असा पाकचा दावा होता. भारतीय पोलिसांनी या रक्षकांना हुसकून लावलं आणि या भागात आपली ठाणी उभारली. पण पाकिस्तानी पुन्हा आले व काही चकमकी उडाल्या. १८ फेब्रुवारी १९६५ रोजी भारतीय सीमारेषेचा भंग करण्याची घटना घडली. त्याबद्दल भारतानं जेव्हा निषेध व्यक्त केला तेव्हा असा भंग झालाच नाही असा खुलासा पाकच्या परराष्ट्र खात्यानं केला. एवढंच नव्हे तर कांजरकोटनजीकचा भाग १९४७ पासून सतत आपल्याच ताब्यात आहे, असा दावाही केला. कांजरकोट इथे पाकनं एक 'टेहळणी ठाणं'ही स्थापन केलं. मात्र कांजरकोट किल्ल्याचा ताबा त्यांनी घेतला नाही.

याच सुमारास भारताविरुद्ध चढाईची चाचपणी मोहीम सुरू करावी, असे आदेश अयूबखान यांनी दिले असावेत असं दिसत. या भागाच्या नजीक असलेल्या मारो, देडिन व रहिन की बझार इथे पाकिस्ताननं सैन्याच्या जमवाजमवीला आरंभ केला.

पाकिस्तानशी संबंध सुधारावे म्हणून प्रयत्न करणारे शास्त्री या घडामोडींमुळं अस्वस्थ झाले. तरीही पाकनं शांततेचा मार्ग सोडू नये म्हणून प्रयत्न करण्याची त्यांची इच्छा होती. २१ मार्च १९६५ रोजी हैदराबाद इथे एका जाहीर सभेत बोलताना शास्त्री यांनी सांगितलं की, "भारत-पाकिस्तानमधील सीमेची आखणी करण्याबाबतचा क्षुल्लक वाद हा उभय देशांच्या अधिकाऱ्यांतील वाटाघाटीनं सुटू शकेल, तेव्हा तिथे आपल्या शक्तीचा वापर पाकिस्ताननं करू नये." अर्थात पाकनं आपल्या विनंतीकडे दुर्लक्ष केलं तर परिस्थितीनुसार आम्हाला 'कृती' करावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

दिल्लीला परतताच शास्त्रींनी लष्करप्रमुख जनरल जे. एन. चौधरी यांच्याशी चर्चा केली. संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक बोलावून त्यांनी कच्छच्या रणातील स्थितीची तिला माहिती दिली. तसंच ७ एप्रिल १९६५ रोजी विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक बोलावून त्यांना घडामोडींची कल्पना दिली. या बैठकीला गृहमंत्री गुलझारीलाल नंदा, संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण, परराष्ट्रमंत्री सरदार स्वर्णसिंग, संसदीय कामकाज मंत्री सत्यनारायण सिन्हा, गृहराज्यमंत्री जयसुखलाल हाथी व जनरल जे. एन. चौधरी हे उपस्थित होते. विरोधी पक्षांच्या वतीनं एन. जी. रंगा (स्वतंत्र), सुरेंद्र द्विवेदी (प्र. सो. पा.), हिरेन मुकर्जी व भूपेश गुप्ता (कम्युनिस्ट),

अटलबिहारी वाजपेयी व यू. एम. त्रिवेदी (जनसंघ), मणिराम बागडी (संसोप), के. मनोहरन (द्र. मु. क.), डी. पी. मौर्य (रिप.) आणि प्रकाशवीर शास्त्री, इंदुलाल याज्ञिक, एन. सी. चतर्जी व फ्रँक अँथनी (सर्व अपक्ष) हे हजर होते. पाकिस्तानी आव्हानाला प्रत्युत्तर देण्यासाठी आपल्या धोरणाला राष्ट्रीय सहमती मिळवावी म्हणून शास्त्री संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची तसंच विरोधी पक्षाच्या नेत्यांची तेव्हापासून वारंवार बैठक घेऊ लागले. ज्या बाबींबद्दल गुप्तता बाळगणं अत्यावश्यक असतं, त्या वगळून इतर माहिती पंतप्रधान या बैठकींतून देत असत.

विगोकोटनजीकच्या सरदार ठाण्यावर ९ एप्रिल १९६५ रोजी पाकिस्तानच्या एका ब्रिगेडनं हल्ला चढवला. त्या वेळी तिथे केवळ भारतीय पोलिस होते. त्यांनी धैर्यानं झुंज दिली, शत्रूची मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही केली. भारतीय पोलिसांनी त्यांना मागं रेटण्यात यश मिळविलं. सुमारे ३५०० पाक सैनिकांच्या पथकानं नंतर दुसरा हल्ला चढवला. २५ पौंडी तोफगोळ्यांचा मारा करणाऱ्या तोफा, उखळी तोफा व अन्य शस्त्रास्त्रं घेऊन त्यांनी हा हल्ला केला. तेव्हा भारतीय पोलिसांना विगोकोटपर्यंत मागं हटावं लागलं. त्या दिवशी दुपारी भारतीय सैन्यानं आपल्या हाती सूत्रं घेतली व सरदार ठाण्यावर परत कब्जा मिळवला.

या चकमकीत पकडलेल्या पाकिस्तानी कैद्यांनी कांजरकोटच्या दिशेनं कराचीहून 'बऱ्याच दिवसांपूर्वीच' पाक सैन्याची एकावन्नावी पायदळ ब्रिगेड निघाली होती, अशी माहिती दिली. हल्ला करण्याचा आदेश ७ एप्रिलला देण्यात आला होता. ८ एप्रिलला ठरलेल्या जागी सैनिक सज्ज झाले व ९ एप्रिलला हल्ला करण्यात आला. तो पूर्वनियोजित होता. सरदार ठाणं भारतीय सैन्यानं परत ताब्यात घेतलं तेव्हा बोलणी करण्याचा प्रस्ताव पाकनं मांडला. परंतु जोवर कांजरकोट परिसर पाक सैन्य खाली करीत नाही तोवर बोलणी करणं शक्य नाही असं भारतानं कळवलं. त्याला पाकिस्तानची तयारी नव्हती. त्यामुळं वाटाघाटी झाल्या नाहीत.

क्वेट्टा (बलुचिस्तान) इथे असलेली पाकिस्तानची पायदळ डिव्हिजन एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात कच्छ-सिंध सीमेलगत हलवण्यात आली. पुन्हा मोठा हल्ला चढविण्याचा त्यामागं हेतू होता. २४ एप्रिल रोजी सरदार ठाणं, बिन्यार बेत, विगोकोट व 'पॉइंट ८४' या चारही भारतीय ठिकाणांवर पाकनं एकाच वेळी हल्ला केला. प्रथमच पॅटन रणगाडे आणि १०० पौंडी तोफगोळ्यांचा मारा करणाऱ्या तोफा यांचा वापर त्यांनी केला. ३० एप्रिलपर्यंत जोरदार संघर्ष उडाला. भारतीय सैन्याच्या तोफखान्यानं पाक लष्करी दारूगोळा साठ्याची मोठी हानी केली. त्यामुळं पाकच्या हल्ल्याचा जोर ओसरला. आठवड्याभराच्या तुफान लढतीनंतर भारतीय लष्कराच्या ताब्यात सरदार ठाणं, विगोकोट, बिअर बेतचं दक्षिण टोक एवढा टापू होता. 'पॉइंट ८४' वरील कब्जा मात्र त्यांनी गमावला.

परिस्थिती अजूनही गंभीर होती व पाकच्या पुढील हालचालींची कल्पना नव्हती. दरम्यान ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांनी युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला. त्याचा

तपशील जाणून घेण्यास भारतीय संसद उत्सुक होती. २८ एप्रिल १९६५ रोजी लालबहादुर शास्त्री यांनी लोकसभेत एक निवेदन केलं. पूर्ववत 'जैसे थे' परिस्थिती राखली तर कच्छच्या बाबतीत शांततापूर्ण तोडग्याला भारत तयार आहे असं त्यांनी स्पष्ट केलं. परंतु पाकिस्ताननं जर आक्रमक कारवाई चालूच ठेवली तर भारतीय सेना देशाचं रक्षण करील व योग्य वाटेल ती कारवाई करील, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

ब्रिटिश पंतप्रधानांनी मांडलेल्या प्रस्तावाचा तपशील द्यावा अशी मागणी ३० एप्रिल रोजी लोकसभेत सदस्यांनी केली. या मुद्द्यावरून बराच गदारोळही झाला. शास्त्री यांनी शांतपणं आपल्यावरील टीका ऐकून घेतली. ब्रिटिश पंतप्रधानांनी आपला प्रस्ताव माझ्याकडे व अयूबखान यांच्याकडे एकाच वेळी पाठवला आहे, एका बाजूला ब्रिटन व दुसऱ्या बाजूला भारत व पाकिस्तान यांच्यात चर्चा चालू आहे, तेव्हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीनं ब्रिटनच्या प्रस्तावाची माहिती देता येणार नाही, असं सांगून शास्त्री ठामपणं म्हणाले, "मी सदनात जे सांगितलं व जे उदारपणं तुम्ही मान्य केलं त्याच्याशी सुसंगत नसेल असं काहीही आम्ही स्वीकारणार नाही." पूर्वीसारखी परिस्थिती राखल्याविना युद्धबंदी मान्य होणार नाही याचा पुनरुच्चार करून काहीसा आवाज चढवून ते म्हणाले,

*"राष्ट्रीय सन्मान म्हणजे काय व त्याचं रक्षण कसं करावं याची आम्हालाही माहिती आहे, याचं विरोधी सदस्यांना मी स्मरण करून देऊ इच्छितो. ही आपलीच मक्तेदारी आहे असा दावा मूठभर सदस्य करू शकत नाहीत. डॉ. लोहिया यांनी बराच संताप प्रकट केला. त्यांनी अत्यंत कडक भाषा वापरली. अर्थात यासाठी कोणते शब्द वापरावे हा त्यांचा प्रश्न आहे.*

*सरकार चालवणं ही आमची जबाबदारी असून ती आम्ही पार पाडणारच हे मी निःसंदिग्धपणं स्पष्ट करू इच्छितो. धोरणाच्या बाबतीत या सन्माननीय सदनाचा आम्ही व्यापक सल्ला घेत असतो. परंतु रोजच्या रोज काय करावं याचे आदेश आम्ही घेऊ शकत नाही. तसं करायचं ठरवलं तर काम करणं अशक्य होईल. तेव्हा मी त्याचा स्वीकार करू शकत नाही."*

त्यांच्या या ठाम, अधिकारवाणीच्या वक्तव्यानं सदनातील गदारोळ थांबला. प्रश्न विचारण्याचा, स्थगन प्रस्ताव पुढं आणण्याचा सदस्यांचा हक्कच आहे. परंतु संयम, प्रतिष्ठा हीही पाळायला हवीत, असं सांगून शास्त्री ठामपणं म्हणाले, "रोज आपण इतका आरडाओरडा, गदारोळ करू लागलो तर या सदनाबद्दलचा आदरभाव कमी होईल आणि संसदीय लोकशाहीचं भवितव्यच धोक्यात येईल."

पाकिस्तानमधील ब्रिटनचे उच्चायुक्त सर मॉरिस जेम्स व भारतातील ब्रिटनचे उच्चायुक्त जॉन फ्रीमन हे हॅरॉल्ड विल्सन यांच्या सूचनेनुसार शांततापूर्ण तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत होते, असं वृत्त 'द हिंदुस्तान टाइम्स'नं ३ मे १९६५ च्या अंकात दिलं. दिल्लीत जॉन फ्रीमन यांच्याशी चर्चा करून सर मॉरिस २ मे रोजी

पाकिस्तानला परतले व त्यांनी रावळपिंडी इथे अयूबखान यांची भेट घेऊन ब्रिटिश प्रस्तावावरचं भारताचं मत मांडलं. या काळात युद्ध-आघाडीवर सामसूम होती. अधूनमधून तोफांचा आवाज येई इतकंच.

३ मे १९६५ रोजी राज्य सभेतील पाच तासांच्या चर्चेला उत्तर देताना शास्त्री यांनी "कच्छच्या रणासंबंधी काही प्रादेशिक वाद आहे, असं भारत सरकार मानीत नाही. अयूब यांच्या भारताशी सर्वकष युद्ध पुकारण्याच्या इशाऱ्याचा आमच्यावर काहीही परिणाम होणार नाही, आमची उचित कर्तव्यं पार पाडण्यापासून ते आम्हाला रोखू शकणार नाहीत." असं सांगितलं. अधूनमधून टाळ्यांचा कडकडाट करीत पंतप्रधानांच्या भाषणाचं राज्यसभेत स्वागत करण्यात आलं.

२५ मे व १५ जून १९६५ रोजी पाकिस्ताननं आणखी चढाई करण्याचा प्रयत्न केला. पण त्याला यश आलं नाही ब्रिटिश प्रस्तावाला शास्त्री व अयूब यांची मान्यता मिळवण्यासाठी उभय देशांतील ब्रिटिश उच्चायुक्तांचे प्रयत्न चालूच होते. बऱ्याच प्रयत्नांनंतर विल्सन याना यश आलं व युद्धबंदी १ जुलै १९६५ पासून अमलात आली. शास्त्री यांनी मागणी केल्यानुसार १ जानेवारी १९६५ रोजी जिथे सैन्य पूर्वी होत तिथे ते परत नेण्यात आलं. मात्र १ जाने. ६५ पूर्वी डिंग ते सुराई या १८ मैलांच्या पट्ट्यात पाकिस्तान पूर्वी गस्त घालीत असे असं दाखवून देऊन या भागात गस्त घालणं त्यानं चालू ठेवलं.

या भागातील सीमारेषेची आखणी एका त्रिसदस्य लवादानं करावी असंही ठरलं. या लवादावर भारत व पाकिस्तान यांनी प्रत्येकी एकेक प्रतिनिधी नियुक्त करावा. तिसरा सदस्य जो या लवादाचा अध्यक्ष राहील तो भारत व पाक यांनी मिळून संयुक्तपणं निवडावा, त्याविषयी जर उभय राष्ट्रांत एकमत झालं नाही तर युनोच्या सरचिटणीसांनी ही नियुक्ती करावी, असंही ठरलं. अखेरीस भारतानं एक युगोस्लाव्हियन, पाकनं एक इराणी व युनोच्या सरचिटणीसांनी अध्यक्ष म्हणून एक स्वीडिश नागरिक अशा तिघांची नियुक्ती केली. संबंधित कागदपत्रं तपासून या लवादानं सिंध व कच्छ यांमधील केवळ सीमारेषा आखायची असून त्यात भू-प्रदेशाच्या कोणत्याही वादाचा विचार करण्याचा प्रश्न नाही. असं स्पष्ट करण्यात आलं.

या सगळ्या घडामोडींच्या वेळी शास्त्री लष्करप्रमुख जनरल चौधरी यांच्याशी सतत संपर्क ठेवून होते. कच्छच्या रणाचा जो प्रदेश भारतात आहे तो मोठ्या लढाईच्या दृष्टीनं उपयोगाचा नाही. तेव्हा पाकचा हल्ला वाढू न देता त्यांना रोखून ठेवणं इष्ट होईल. पाकला युद्धाची फारच खुमखुमी असेल तर अन्यत्र भारताला तुल्यबळ संघर्ष देता येईल, असा सल्ला जनरल चौधरी यांनी दिला होता व तो शास्त्रींनी मानला. तेव्हा भारताचा मुख्य हेतू शत्रूला पुन्हा मागं रेटणं एवढाच होता.

पॅटन रणगाड्यांसहित एवढ्या मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रं व फौजा वापरून पाकनं हल्ला का चढवला? कारण त्या मानानं त्यांच्या पदरात लाभ फारच कमी पडणार होता. रसेल ब्राइन्स यांनी 'द इंडो-पाकिस्तान कॉन्फ्लिक्ट' नावाच्या ग्रंथात याची

कारणं दिली आहेत. पाकिस्तानच्या या हल्ल्याचं सांकेतिक नाव 'ऑपरेशन डेझर्ट हॉक' असं होतं व भारताच्या विरुद्ध नियोजनबद्ध आखलेल्या युद्धाच्या चार टप्प्यांच्या मोहिमेमधील तो पहिला टप्पा होता.

राजकीय परिस्थितीवर शास्त्रींचं नियंत्रण होतं व ती त्यांनी कधी हाताबाहेर जाऊ दिली नाही. आत्मविश्वास, खंबीरपणा, संयम, शहाणपण व लवचिकता यांचा प्रत्यय त्यांनी दिला होता. ते शांततेचे पुरस्कर्ते असले तरी वाटेल ती किंमत मोजून ती मिळवण्याला त्यांचा विरोध होता. त्यांनी स्पष्ट शब्दांत अटी घातल्या. युद्धबंदी करारात त्या समाविष्ट करण्यात आल्या होत्या.

संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची १२ जुलै १९६५ रोजी बैठक भरून कराराची तपशीलवार चर्चा झाली आणि सरकारनं घेतलेल्या निर्णयास पाठिंबा व्यक्त करण्यात आला. भारत व पाकिस्तान यांच्यातील इतर वादांचं निराकरण अशा करारानं करण्याचा पायंडा पाडला जाणार नाही. कारण प्रत्येक वादाची पार्श्वभूमी वेगळी असते, तेव्हा तिचा वेगळा विचार होईल, असंही पंतप्रधानांनी या बैठकीत स्पष्ट केलं.

जनसंघ व प्रजा-समाजवादी पक्ष यांचं या करारानं समाधान झालं नाही, याची जाणीव शास्त्रींना होती. सीमारेषाविषयक लवादाच्या बाबतीत काँग्रेस पक्षाच्या एका गटातही साशंक वातावरण होतं. जिथे देशाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न गुंतला असेल तिथे एखाद्या लवादामार्फत तडजोडी करण्याचा प्रश्नच कसा उद्‌भवतो, असं त्यांचं म्हणणं होतं. परंतु या लवादाच्या कामाचं स्वरूप निश्चित व मर्यादित असून भू-प्रदेशावरील दाव्याचा विचार त्यांच्या कार्यकक्षेत मुळीच येत नाही, असं पंतप्रधानांनी स्पष्ट केलेलं होतं. १५ ऑगस्ट १९४७ रोजी कच्छ व सिंध यांच्यामध्ये जी सीमारेषा अस्तित्वात होती तिची आखणी करणं एवढंच काम लवादाकडे सोपविलेलं होतं. पंडित नेहरू पंतप्रधान असताना १९५९ साली भारत व पाकिस्तान यांच्यात झालेल्या करारानुसारच ही भूमिका स्वीकारलेली होती. त्या करारान्वये पश्चिम वा पूर्व पाकिस्तान व भारत यांच्यामधील सीमेचा वाद जर तडजोडीनं मिटला नाही तर निःपक्षपाती लवादाकडे तो सोपवावा, असं ठरलं होतं. लवादानं केलेल्या शिफारशीनुसार भू-प्रदेशावरील सीमा निश्चित करणं व जिथे प्रदेशाची देवाण-घेवाण करण्याची गरज असेल तिथे ती करणं असं त्यात नमूद करण्यात आलं होतं.

ऐतिहासिक पुराव्याच्याच आधारावर सीमा ठरवताना जर प्रादेशिक देवाण-घेवाण करावी लागली तर ती स्वीकारायला हवी, एरवी सीमारेषा आखण्यात काहीच अर्थ नव्हता.

कच्छच्या रणात पाकनं केलेल्या हल्ल्यामुळे भारतीय जनतेच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या होत्या. १९६२ मध्ये चीनकडून भारताला पत्कराव्या लागलेल्या पराभवाच्या आठवणी अजून पुसल्या गेल्या नव्हत्या. त्यामुळं कच्छच्या बाबतीत त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती. शास्त्रींची निष्ठा, शहाणपण यांवर त्यांचा विश्वास असला तरी त्यांच्या नेतृत्वामधील ठामपणाबद्दल त्यांची खात्री पटत नव्हती. कच्छच्या

बाबतीत शास्त्रींनी परिस्थिती नीट हाताळली नाही, असा दिशाभूल करणारा प्रचार विरोधी पक्ष व काँग्रेसमधील असंतुष्ट गट करण्याचा संभव होता. तेव्हा थेट जनतेलाच विश्वासात घेऊन त्यांना तपशील सांगण्याची, त्यांच्यापुढं आपली भूमिका मांडण्याची गरज होती. त्यामुळं ज्या दिवशी युद्धबंदी करार अस्तित्वात आला त्या दिवशी म्हणजे १ जुलै १९६५ रोजी शास्त्रींनी राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून भाषण केलं आणि त्यात परिस्थिती स्पष्टपणं मांडली, "भारत व पाकिस्तान यांना अत्यंत गंभीर ठरू शकेल अशी परिस्थिती येऊ देण्यात आली नाही," असं त्यांनी नम्रपणं सांगितलं.

कच्छच्या रणात हवाई दलाचा वापर का करण्यात आला नाही? एअर चीफ मार्शल अर्जुनसिंग यांनी मला त्यामागचं कारण एकदा सांगितलं होतं. कच्छच्या रणात चकमकी सुरू होताच पाकिस्तानचे हवाई दलप्रमुख एअर मार्शल असगर खान यांनी अर्जुनसिंग यांना फोन केला. उभय बाजूंनी या संघर्षात हवाई दलाचा वापर करू नये असं अनौपचारिक रीत्या ठरवावं अशी सूचना त्यांनी केली. संरक्षणमंत्री व पंतप्रधान यांनी या सूचनेस अनुकूलता दर्शवल्यावर अर्जुनसिंग यांनी ती मान्य केली. मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यास कच्छचं रण हा भाग अनुकूल नाही, असं अर्जुनसिंग यांचंही म्हणणं होतं.

पाकशी शक्यतो शांततेचंच संबंध राखण्यासाठी प्रयत्न करण्याचा शास्त्रींचा निर्धार होता. ३ मे १९६५ रोजी राज्यसभेत भाषण करताना ते म्हणाले :

*"भारतीय उपखंडात युद्ध झालं तर भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांत लोकांचं राहणीमान सुधारण्यासाठी चालू असलेल्या प्रचंड प्रयत्नांवर पाणी पडेल. या प्रयत्नांच्या दिशेनं नुकतीच कुठे वाटचाल सुरू झाली होती आणि अजून रस्ता तर फार दूरचा होता. परंतु अध्यक्ष अयूबखान यांनी भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये सर्वकष युद्धाची भाषा वापरली होती. त्यांचं आव्हान स्वीकारण्यास आम्ही तयार असलो तरी आक्रमकता व भांडखोरपणा यांऐवजी सामंजस्य राखावं म्हणून आम्ही खूप संयम पाळला. आपल्या देशाला भारतावर कधीही व केव्हाही हल्ला करण्याचा अधिकार आहे, भारतानं मात्र प्रतिकारात्मक उपाययोजना करता कामा नये, असा अयूबखान यांचा समज दिसतो. त्यांचं हे मत आम्हाला मुळीच मान्य नाही. पाकिस्तानचा खाक्या असा असतो की, प्रथम शेजारच्या भूमीवर दावा सांगायचा, मग त्याला चकित करून टाकील असा अवचित हल्ला चढवायचा. मग आपली कारवाई केवळ बचावासाठी होती, अशी कल्पक (!) प्रचार मोहीम उघडायची. तुमच्या या तंत्राचा जरा नीट विचार कराल तर बरं अशी माझी अयूबखानना विनंती आहे. कच्छच्या सीमेबाबत बोलायचं तर आमच्या प्रदेशाच्या रक्षणार्थ आम्ही स्थानिक बचावाची कारवाई केली. भारताच्या बाजूने प्रतिहल्ल्याचा इरादाच नव्हता. तेव्हा आक्रमण हे पूर्णतः एकतर्फी होतं. आम्ही संयम बाळगला. परंतु जर पाकिस्तान सरकार असाच आक्रमक पवित्रा घेत राहिलं तर आपल्या मातृभूमीचं उत्तम संरक्षण*

*कसं करता येईल याचा विचार करण्याखेरीज भारत सरकारला पर्याय राहणार नाही."*

त्यानंतर त्यांनी देशाला आवाहन केलं :

*"... आपण आक्रमणाविरुद्ध लढत असतो तेव्हा देशातही आपण ऐक्यभावनेनं शांत राहणं अत्यंत महत्त्वाचं असतं. कोणत्याही जमातीबद्दल द्वेषानं वा कटुतेनं बोलणं आत्मघातकी ठरू शकतं. जनतेनं या काळात उदंड प्रतिसाद दिला हे मला ठाऊक आहे. देशाचं स्वातंत्र्य व सुरक्षा यांसाठी आम्ही बलिदान करायला तयार आहोत अशी इच्छा व्यक्त करणारी अनेक पत्रं व तारा अल्पसंख्य जमातीतील व्यक्तींकडूनही मला येत आहेत. तेव्हा या समयी आपल्या देशातील विविध जमातींत संपूर्ण ऐक्य व सुसंवाद असला पाहिजे. सध्याच्या कठीण परिस्थितीतून यशस्वीपणं बाहेर पडता यावं म्हणून आपण सारे एक आहोत या भावनेनं लढलं पाहिजे, असं मी आवाहन करतो."*

त्यांचं हे आवाहन भविष्याच्या दृष्टीनं अत्यंत उपयुक्त ठरलं. काही महिन्यांनंतर सप्टें. १९६५ मध्ये भारत-पाक युद्ध झालं तेव्हा राष्ट्रीय ऐक्याचं, एकजुटीचं प्रभावी दर्शन घडलं.

कच्छच्या रणातील संघर्ष अयूबखान यांनाही तीव्र करायचा नव्हता. आधी काश्मीर व नंतर पूर्व पंजाब या ठिकाणी भारतावर आक्रमण करायची रंगीत तालीम म्हणून कच्छमध्ये त्यांनी हल्ला चढवला होता. युद्ध लढण्यासाठी भारतीय लष्कर कितपत तयार आहे याचाही अंदाज त्यांना घ्यायचा होता. आपलं हे 'प्रात्यक्षिक' त्यांनी मे ६५ मध्ये पुरं केलं. अयूब व पाकमधील ज्येष्ठ लष्करी अधिकारी कच्छमधील आपल्या कामगिरीवर भलतेच खूष होते, असं रसेल ब्राइन्स यांच्या पुस्तकावरून दिसतं. ते म्हणतात :

*कच्छच्या रणातील डावपेचाला मिळालेल्या प्रतिसादामुळे व आंतरराष्ट्रीय राजकीय वातावरणामुळे पाकिस्तानी अधिकाऱ्यांना प्रोत्साहनच मिळालं. 'डॉन' या वृत्तपत्रानं १९ मेच्या अंकात असं लिहिलं की, भारताबरोबरच्या या लढायांत सहज विजय मिळाला असं पाकिस्तानी अधिकाऱ्यांचं सर्वसाधारण मत आहे. 'पाकिस्तान्यांच्या फारसं जवळ राहणं' भारतीयांना आवडत नाही, ही त्यांच्यातील उणीव आहे. पाकिस्तानी पाहताच ते गोंधळून पळ काढीत. मागं वळून देखील न पाहता ते नाहीसे होत.*

*'मी आमच्या सैनिकांना संयम ठेवायला सांगितलं म्हणून बरं, नाही तर कच्छमध्ये एका पूर्ण 'भारतीय डिव्हिजन'चा धुव्वा उडाला असता,' असं अयूब यांनी लंडनमध्ये सांगितलं.*

*चीनच्या हल्ल्यात भारतीयांची जशी त्रेधातिरपीट उडाली तशी ती इथेही*

*उडाली होती. पण मलाच संघर्ष तीव्र करायचा नव्हता. आम्हाला भारताबरोबर शांततापूर्ण संबंध हवे आहेत, पण सन्मानानं, त्यांचा एक उपग्रह बनून नव्हे! भारताचा संकुचित दृष्टिकोन लक्षात घेता आम्हाला त्याच्यावर 'नजर' ठेवायला हवी. आमच्यावर युद्ध लादलंच तर आम्हीही सर्व शक्तीनिशी प्रत्युत्तर देऊ. आम्ही भारताच्या तुलनेनं लहान असलो तरी त्यांची भरून येणार नाही अशी हानी आम्ही करू. आंतरराष्ट्रीय राजकीय वातावरणानं देखील पाकला प्रोत्साहन मिळालं. संरक्षणविषयक करार मोडून आपल्या शस्त्रास्त्रांचा वापर केला म्हणून अमेरिकेनं निषेध प्रकट केला असला तरी ते संघर्ष थांबवू शकले नाहीत. अन्य देशांना या घटनांची फारशी फिकीर नव्हती."*

अयूबखान यांना उल्हसित वाटणं साहजिक होतं. पाक लष्कराचे प्रमुख व नंतर प्रमुख मार्शल लॉ प्रशासक व राष्ट्राध्यक्ष या नात्यांनी त्यांनी पाकिस्तानी लष्कराची भक्कम उभारणी केली होती. कम्युनिस्टांविरुद्ध वापरायला हवी असं सांगून त्यांनी अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत मिळविली होती. आपण आता भारताची भरून येणार नाही अशी हानी करू शकतो असा विश्वास त्यांना वाटत होता. जोरदार हल्ला चढवून आपण काश्मीर काबीज करू शकू असंही त्यांना वाटू लागलं होतं.

२६ मे १९६५ पर्यंत तीस हजार सैनिक (त्यांना 'जिब्राल्टर फोर्सेस' असं नाव दिलं होतं!) पाकिस्तानातील मरी इथं जमले होते. काश्मीरवर नियोजनबद्ध गुप्त कारवाई करण्यासाठी ते एकत्र आले होते. या 'जिब्राल्टर फोर्सेस'चे सुप्रीम कमांडर म्हणून पाकच्या बाराव्या डिव्हिजनचे कमांडर मेजर जनरल अख्तार हुसेन मलिक यांची अयूब यांनी नियुक्ती केली होती. 'ऑपरेशन जिब्राल्टर' मोहीम सुरू करण्यास पाक सज्ज होतं. केवळ खोटी होती अयूबखान यांच्या अंतिम आदेशाची!

□□



। बारा ।।

# ऑपरेशन जिब्राल्टर

**का**श्मीरमधील ४७० मैल लांबीच्या युद्धबंदी रेषेवर १९४८ पासून भारत व पाक यांच्यातील युनोच्या लष्करी निरीक्षक गटाकडून देखरेख ठेवण्यात येत होती. या रेषेवर बऱ्याच ठिकाणी भारत व पाक सैनिक समोरासमोर पाहारा देत व घुसखोरीला प्रतिबंध करीत. युद्धबंदी रेषेचा भंग करायचा नाही अशा सूचना भारतानं आपल्या सैनिकांना दिलेल्या होत्या.

पाकिस्तान सरकारनं १९४८ साली या रेषेचा स्वीकार केला खरा, परंतु ही रेषा स्थिरावू नये आणि काश्मीर खदखदत ठेवावं या हेतूनं या रेषेचा सतत भंग करण्याचे प्रयत्न केले गेले. युनोच्या निरीक्षक गटानंही १९४८ पासून अशा अनेक घटना घडल्याचा अहवाल दिला. श्रीनगर-लेह रस्त्यावरील भारतीय वाहनं व लष्कर यांच्या वाहतुकीला आपल्या भागातील मोक्याच्या ठिकाणांवरून सतावण्याचा प्रयत्न पाक करीत असे. पाककडून होणारी घुसखोरी थांबवावी म्हणून काही ठिकाणी भारतीय सैनिक ठाण मांडून राहत. पण पाकिस्तान युनोच्या निरीक्षकांमार्फत हस्तक्षेप करून त्या जागा खाली करायला लावीत असे. युद्धबंदी रेषेवरचं 'तापमान' पाक आपल्या लहरीनुसार कमी-जास्त ठेवी. अधूनमधून वेष पालटून आपले दूत काश्मीरमध्ये पाठवून उपद्रव निर्माण करण्याचं कामही पाक करीत असे.

आपल्या युद्धाचा दुसरा टप्पा मे १९६५ मध्ये सुरू करावा असं अयूबखान यांनी ठरविलं. त्यानुसारच ३० हजार सैनिकांची मरी येथे जमवाजमव करण्यात आली

होती. रसेल ब्राइन्स त्याविषयी लिहितात :

*"त्यात आठ ते दहा मोठ्या तुकड्या होत्या. त्या प्रत्येकीत पाच कंपन्यांची सहा युनिट्स होती (प्रत्येक कंपनीत ११० सैनिक). प्रत्येक कंपनीत पाकिस्तानी लष्कराचा भाग असलेल्या आझाद काश्मीर सैन्यातील जवान तसेच मुजाहिद व रझाकार होते. या जवानांकडे स्वयंचलित हत्यारं, लाइट मशिनगन्स, हँडग्रेनेड्स व अन्य स्फोटकं होती. त्यांना गनिमी काव्याचं, घातपाताचं सहा आठवड्यांचं प्रशिक्षण पाकमधील चार शिबिरांत देण्यात आलं होतं."*

भुत्तो व अझिझ अहमद यांनी आखलेल्या या योजनेशी लष्करप्रमुख जनरल मुसा सहमत नव्हते. या छुप्या लढाईची वेळ व धोरण यांबाबतही भुत्तो व मुसा यांच्यात मतभेद होते. या मोहिमेबद्दल, ती सुरू करण्याच्या वेळेबद्दल जनरल मुसा यांनी राष्ट्राध्यक्ष अयूब यांच्याशी चर्चा केली व त्यातील धोक्यांकडे लक्ष वेधलं. काश्मीर खोऱ्यात स्थानिक पाठिंबा नसल्यानं या मोहिमेला जनरल मुसा अनुकूल नव्हते. स्थानिक लोकांच्या सहकार्यावरच अशी कारवाई अवलंबून असते, असं इतिहासानंच सिद्ध केलेलं आहे. या ऐतिहासिक धड्यापासून पाकिस्ताननं बोध घेतला नाही. युद्धबंदी रेषेपलीकडील नेत्यांशी आपल्या हेतूंबद्दल सल्लामसलत केली नाही. आझाद काश्मीरच्या नेत्यांना विश्वासात न घेताच गनिमी कारवाई घाईघाईनं करण्यात आली, असं जनरल मुसा यांनी आपल्या पुस्तकात म्हटलं आहे.

'ऑपरेशन जिब्राल्टर'मधील अधिकाऱ्यांच्या परिषदेपुढं भाषण करण्यासाठी अयूबखान यांनी जुलै १९६५ च्या दुसऱ्या आठवड्यात मर्रीला भेट दिली. त्याच वेळी त्यांनी मोहीम सुरू करण्याचे अंतिम आदेश दिले. प्रत्यक्षात ५ ऑगस्ट १९६५ रोजी या मोहिमेची सुरुवात झाली.

पाकिस्तानच्या मोठ्या प्रमाणावरील या तयारीची भारताला अगदीच ढोबळ व त्रोटक माहिती होती. किंबहुना पाक आपल्या गनिमी कारवाया तीव्र करण्याची शक्यता आहे एवढीच कल्पना होती. ५ ऑगस्टला छुपं आक्रमण सुरू झालं, तरीही पंतप्रधान शास्त्रींना पाकच्या योजनेबद्दल स्पष्ट असा गुप्तचर अहवाल मिळाला नव्हता. एक महिन्यानंतर 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम' नावाची मोहीम पाक हाती घेणार असून त्या वेळी खुलं आक्रमण पाक फौजा करणार आहेत याचीही गुप्तचरांतर्फे काही माहिती मिळाली नव्हती. रसेल ब्राइन्स याविषयी म्हणतात :

*"भारताची गनिमी कारवायांना तोंड देण्याच्या दृष्टीनं पुरेशी तयारी नव्हती. तरी पण त्या धोक्याची भारतीय अधिकाऱ्यांना कल्पना होती. मात्र त्यांच्याकडून परंपरागत स्वरूपाचा मोठा हल्ला होईल हे त्यांच्या डोक्यात आलेले नव्हते. ५ जुलैला केंद्रीय गृहखात्याच्या अधिकाऱ्यांनी श्रीनगर येथील राज्याच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. गनिमी घातपाताची शक्यता आहे, परंतु भारताशी मोठं युद्ध करण्याच्या*

*दृष्टीनं पाकिस्तानची तयारी नाही, असं मत या बैठकीतही व्यक्त करण्यात आलं.*

*काश्मीरमध्ये संघर्षाचा पुढला टप्पा हा संघटित हल्ल्याचा नव्हे, तर दहशतवाद व खून यांचा असेल असं भाकीत २ ऑगस्ट रोजी एका ज्येष्ठ भारतीय कमांडरनं श्रीनगरमधील अधिकाऱ्यांशी बोलताना व्यक्त केलं होतं. दुसऱ्या बाजूला पाकिस्तान आपल्या लष्करी शक्तींची जमवाजमव करीत आहे, अशी निश्चित माहिती अनेक गुप्तचर यंत्रणांना या सुमारास मिळालेली होती. युनोच्या एका खास यंत्रणेचा युरोपिअन अधिकारी नुकताच पंजाबच्या दौऱ्यावरून परतला होता. पंजाबमध्ये पाकिस्तान मोठ्या प्रमाणात रणगाडे जमवीत आहे; भारत मात्र पूर्ण गाफील असून हल्ला झालाच तर तो कसला आहे हेही त्यांना उमगायचं नाही अशी माहिती त्यानं दिली. इतिहासाचा रोख बदलण्यासाठी पाकिस्ताननं हल्ला करण्याचा निकराचा प्रयत्न करण्याचं ठरवलं आहे, असा निष्कर्ष गुप्त माहिती उपलब्ध असलेल्या काही विदेशी तज्ज्ञांनीही काढला होता.*

अयूबखान यांनी सुरुवातीला केवळ 'ऑपरेशन जिब्राल्टर' मोहीम हाती घेण्याचं ठरवलं होतं. त्यानंतर १ सप्टेंबर १९६५ रोजी छांब भागात करण्यात आलेला खुला हल्ला (ऑपरेशन ग्रँड स्लॅम) पूर्वनियोजित नव्हता, तर भारतानं केलेल्या उपाययोजनेला प्रत्युत्तर म्हणून होता, असं जनरल मुसा यांनी आपल्या पुस्तकात सूचित केलं आहे! परंतु त्यांनीच केलेल्या आधीच्या विधानांशी हे विसंगत आहे.

भारत जोरदार प्रत्युत्तर देईल हे जनरल मुसा यांचं भाकीत बरोबरच होतं. त्यामुळं 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम' योजना (अखनूरवर चढाई) विचारपूर्वक आधीच ठरविलेली होती असं दिसतं. त्या वेळी पाकिस्तानचे माहिती सचिव असलेले अल्ताफ गौहर यांनी 'अयूबखान' या आपल्या ग्रंथातही या तर्काला पुष्टी दिली आहे. 'ऑपरेशन जिब्राल्टर' हाती घेण्याआधी काही आठवडे– १३ मे १९६५ रोजीच– अयूबखान यांनी लष्करी कारवाईबाबत निर्णय घेतला होता असं त्यांनी म्हटलं आहे :

कच्छच्या रणात युद्धबंदी अमलात येण्याच्या सहा आठवडे आधी अयूब मरी इथे गेले होते. जनरल अख्तर मलिक यांनी काश्मीरमध्ये गनिमी कारवायांबद्दल आखलेल्या योजनेचा आढावा त्यांना घ्यायचा होता. उंच्यापुऱ्या, देखण्या व आपल्या सहकाऱ्यांत लोकप्रिय असलेल्या मलिकनं वाळूच्या टेबलावर 'ऑपरेशन जिब्राल्टर'चा तपशील उलगडून सांगितला. सुमारे तासभर चाललेल्या या बैठकीला जनरल मुसा व अन्य ज्येष्ठ अधिकारी हजर होते. चर्चेच्या शेवटी अयूबखान यांनी लष्करी डावपेचांच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या अखनूर शहरावर बोट ठेवून विचारलं, "तुम्ही याच्याभोवती फास का नाही आवळत?" त्यासाठी खूप पैसे व माणसं लागतील असं उत्तर जनरल मलिक यांनी दिलं. थोडा वेळ चर्चा करून अयूबखान यांनी जादा पैसे मंजूर केले व लष्करप्रमुखांना जादा कुमक उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. अशा प्रकारे जनरल मलिक यांच्या आराखड्यावर एका लाल झेंड्यानं दाखवलेलं अखनूर या कारवाईत

समाविष्ट करण्यात आलं. अखनूरवरील हल्ल्याला नंतर 'ग्रँड स्लॅम' हे सांकेतिक नाव देण्यात आलं. या मोहिमेचा दिनांक, वेळ यांची चर्चा झाली नाही. मात्र एकूणच मोहिमेला अयूब यांनी नवं परिमाण दिलं, असं सर्वांचं मत झालं.

अमृतसर काबीज करण्याचीही पाकिस्तानची योजना होती, असंही जनरल मुसा यांनी पुस्तकात सूचित केलं आहे.

पाकिस्ताननं आपल्या हल्ल्याची योजना पुढील सात टप्प्यांत आखली होती :

(१) प्रत्येकी ११० सशस्त्र जवान असलेल्या एकूण १६० कंपन्या युद्धबंदी रेषेतून आत घुसवण्यास ५ ऑगस्ट १९६५ रोजी सुरुवात करणं, काश्मीरमधील निरनिराळ्या ६० ठिकाणी जाऊन खून, लुटालूट, जाळपोळ करणं; पूल आदी दळणवळणाची साधनं व सरकारी मालमत्ता यांची हातबॉम्ब, स्फोटकं, स्टेनगन्स वापरून नासधूस करणं.

(२) काश्मीरमध्ये ८ ऑगस्ट १९६५ पर्यंत प्रचंड नासधूस होईल, असं मानून त्या दिवशी 'सदाई काश्मीर' हे नवीन रेडिओ केंद्र सुरू झाल्याचं घोषित करणं. प्रत्यक्षात हे केंद्र पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलं तरी ते काश्मीरमध्ये कोठे तरी आहे असं भासवणं. काश्मीरनेते शेख मोहंमद अब्दुल्ला यांना तुरुंगात टाकल्याच्या वर्धापन दिनानिमित्त घुसखोरांच्या दहशतवादी कारवाया हा लोकांनी सरकारविरुद्ध केलेला सशस्त्र उठाव आहे असं या रेडिओवरून जाहीर करावं. तसंच 'क्रांतिकारी मंडळ' स्थापन करण्यात आलं असून भारताबरोबरचे सर्व करार रद्द करण्याचं या मंडळानं ठरविल्याचंही जाहीर करावं.

(३) काश्मीरमधील सर्व अधिकार 'क्रांतिकारी मंडळा'नं हाती घेतले असून काश्मीरमध्ये 'राष्ट्रीय सरकार' स्थापन केल्याचं 'सदाई' रेडिओवरून घोषित करावं. तसंच 'देशभक्तांना' प्रचंड विजय मिळत आहे, असंही जाहीर करावं.

(४) पाकिस्ताननं काश्मीरात घुसखोर पाठवले आहेत, या आरोपाचा भुत्तो यांनी वारंवार इन्कार करावा. काश्मीरमध्ये जे घडत आहे तो स्थानिक जनतेचा उठाव असून पाकिस्तानशी त्याचा काहीही संबंध नाही, असंही त्यांनी सांगावं.

(५) 'घुसखोरां'विरुद्ध भारत सरकार जी अपेक्षित कारवाई करील तिचं वर्णन 'बंड चिरडून टाकण्याचा निष्फळ प्रयत्न' असं करावं. पुढील घुसखोरी रोखण्यासाठी युद्धबंदी रेषेवर भारत जी कृती करील तिचं वर्णन पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारत 'आक्रमण' करीत आहे असं करावं.

(६) अखनूर काबीज करण्यासाठी युद्धबंदी रेषेच्या पलीकडे आणि छांब क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडे पाकिस्ताननं जोरदार हल्ला चढवावा. हे 'आक्रमण' म्हणजे भारतीय आक्रमणाविरुद्ध पाकची बचावकृती आहे, अशी प्रचार मोहीम उघडावी.

(७) छांब भागात या 'बचावात्मक' कारवाईला एकदा यश आलं की अमृतसर काबीज करण्याच्या दृष्टीनं पूर्व पंजाबात पॅटन रणगाड्यांसह मोठा हल्ला चढवावा.

ठरल्याप्रमाणं या योजनेची अंमलबजावणी ५ ऑगस्ट १९६५ ला सुरू झाली. तारिक, कासिम, खालिद, सलाहुद्दिन व गझनवी या विख्यात मुस्लीम योद्ध्यांची नावं दिलेल्या पाच तुकड्यांकडे 'ऑपरेशन जिब्राल्टर'ची कामगिरी सोपवण्यात आली होती, असं अल्ताफ गौहर म्हणतात. वेषांतर करून पाक सैन्याच्या ६० कंपन्या युद्धबंदी रेषा ओलांडून काश्मीरमध्ये विविध ठिकाणी (नकाशा क्र. १) घुसल्या. महत्त्वाचे पूल, कोठारं, महत्त्वाची ठिकाणं ज्वालाग्राही बॉंब फेकून उडवणं व बड्या व्यक्तींची हत्या करणं ही कामं त्यांना सांगितलेली होती.

परंतु ही अत्यंत गुप्त योजना फार काळ गुप्त राहू शकली नाही. आपल्याकडून माहिती मिळवण्यासाठी काही 'अनोळखी' व्यक्तींनी आपल्याला लाच देण्याचा प्रयत्न केला अशी माहिती मोहंमद दीन या गुराख्यानं टंगमर्ग पोलिसांकडे केली, असं गौहर यांनी म्हटलं आहे. भारतीय अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई केली. पाकिस्तानी घुसखोरांची माहिती ७ ऑगस्टला भारत सरकारला समजली. ८ ऑगस्टच्या 'द हिंदुस्तान टाइम्स'मध्ये पुढील वृत्त प्रसिद्ध झालं :

*"जम्मू इथे युद्धबंदी रेषेनजीक भारतीय पोलिसांशी ५ ऑगस्ट रोजी झालेल्या चकमकीत सहा पाकिस्तानी हल्लेखोर ठार झाल्याचं वृत्त येथील संरक्षण मुख्यालयात आलं आहे.*

*युद्धबंदी रेषेच्या मेंढार विभागातील धाक्रोत या गावाजवळ ही चकमक झडली. त्यात भारतीय पोलिसांतील तिघे जण मरण पावले.*


*उरी भागातील बुना दनवास खेड्यानजीक त्याच दिवशी सायंकाळी पाक हल्लेखोर व भारतीय पोलिस यांच्या गस्त पथकांमध्ये दुसरी चकमक उडाली...*

*या चकमकी म्हणजे गंभीर स्वरूपाचा फटका आहे, असं संरक्षण मुख्यालयाचं म्हणणं आहे."*

पाक लष्कराच्या घुसखोरीचा तपशीलवार वृत्तांत पंतप्रधानांना ८ ऑगस्ट रोजी मिळाला. त्यांनी तातडीनं 'आणीबाणी समिती'ची बैठक बोलावली. भारतीय लष्कराचे प्रमुख या बैठकीस हजर होते. त्यांनी एकूण परिस्थितीचा आढावा घेतला. पाकिस्तानची योजना व्यापक, सुसंघटित व सुनियोजित आहे याची कल्पना पकडलेल्या पाकिस्तानी हल्लेखोरांच्या जबान्यांतून आली होती.

आपले सैनिक अशी कबुली देतील अशी पाकिस्तान सरकारला अपेक्षा नव्हती. अल्ताफ गौहर म्हणतात :

*"८ ऑगस्ट रोजी भारतीय आकाशवाणीनं रात्री नऊच्या बातम्यांत भारतीय सैन्यानं चार पाकिस्तानी जवानांना पकडल्याचं वृत्त दिलं होतं. अर्ध्या तासानंतर या जवानांच्या मुलाखतीही ऐकवण्यात आल्या. त्यांनी 'ऑपरेशन जिब्राल्टर'चा सारा तपशील सांगितला. पाक माहिती खात्याचे सचिव आझाद काश्मीरची राजधानी*




नकाशा १ : जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानची घुसखोरी.

*मुजफ्फराबाद इथे तातडीनं गेले व पकडलेल्या पाक जवानांच्या मुलाखती ऐकल्या की नाहीत, अशी विचारणा त्यांनी ब्रिगेडियर ईर्शाद यांच्याकडे केली. त्यांनी त्या ऐकल्या नव्हत्या. तेव्हा त्यांना त्या मुलाखतीचा गोषवारा सांगण्यात आला. तो ऐकून ईर्शाद आपल्या खुर्चीत जवळजवळ कोलमडलेच. ते म्हणाले, "बाप रे! त्यांनी सारं सांगून सत्यानाशच केला आहे." 'ऑपरेशन जिब्राल्टर'मध्ये ज्या अधिकाऱ्यांचा थेट सहभाग होता त्यांना देखील सर्व तपशील ठाऊक नव्हता. परंतु भारताला मात्र चोवीस तासांच्या आत सारी माहिती मिळाली होती..."*

परिस्थिती लष्कराच्या पूर्ण नियंत्रणाखाली असून हल्लेखोरांना अटक केली जात आहे, असं लष्करप्रमुखांनी शास्त्रींना सांगितलं. अर्थात अजूनही हल्लेखोर घातपाती कारवाई करण्याची शक्यता त्यांनी वर्तवली, घुसखोरी रोखण्यासाठी आवश्यक ती पावलं उचलण्याचे आदेश शास्त्रींनी जनरल चौधरींना लगेच दिले. भारताच्या परदेशातील दूतावासांना ताज्या घडामोडींची माहिती द्यावी, अशा सूचनाही परराष्ट्र मंत्रालयाला दिल्या.

पाकिस्तानी वृत्तपत्रं या घडामोडींबद्दल ८ ऑगस्टपर्यंत गप्प होती. परंतु ९ ऑगस्टच्या वृत्तपत्रांत मात्र ठळक मथळे झळकले. शेख अब्दुल्लांच्या अटकेचा तो वर्धापनदिन होता. काश्मीरमधून तेथील स्वातंत्र्यसैनिक रेडिओस्टेशन चालवीत असून त्यावरून मिळालेल्या माहितीच्या आधारे बातम्या दिल्याचा दावा पाकिस्तानी वृत्तपत्रं करीत होती. प्रत्यक्षात 'सदाई काश्मीर' नावाचं रेडिओ केंद्र अस्तित्वातच नव्हतं. मुझफ्फराबाद येथील पाकच्या नियंत्रणाखालील आझाद काश्मीर रेडिओवरूनच हा तथाकथित 'काश्मीरचा आवाज' प्रक्षेपित केला जात होता. "काही तासांतच या बनवेगिरीचा भारतीयांना सुगावा लागला असावा" हे गौहर यांनी व्यक्त केलेलं भाकित खरंच होतं.

'डॉन' हे कराचीतील वृत्तपत्र म्हणजे भुत्तो आणि कंपनीचं मुखपत्रच. ९ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट १९६५ च्या या वृत्तपत्रातील मथळे व वृत्त पुढे देत आहे.

९ ऑगस्ट १९६५ च्या डॉन अंकात म्हटलं होतं. :

## काश्मीरमध्ये क्रांतिकारी मंडळ

### मुक्तियुद्ध होणार

## गुप्त आकाशवाणी केंद्राची घोषणा

*भारतीय साम्राज्यवादाविरुद्ध सर्वंकष युद्ध पुकारण्यासाठी व्याप्त काश्मीरमधील जनतेनं क्रांतिकारी मंडळाची स्थापना केली आहे.*

*स्वतःला 'सदाई-काश्मीर' म्हणवणाऱ्या रेडिओ केंद्रानं अशी घोषणा केली, असं आझाद काश्मीर रेडिओच्या अनुश्रवण विभागानं सांगितलं.*

*भारताबरोबरचे सारे तथाकथित करार संपुष्टात आले असून काश्मिरींनी आपला सन्मान राखण्यासाठी लढाईस तयार राहावं, असंही क्रांतिकारी मंडळानं आवाहन केलं.''*

---

१० ऑगस्ट १९६५ च्या 'डॉन'च्या अंकात म्हटलं होतं :

**''काश्मीरमधील सर्व अधिकार क्रांतिकारी मंडळानं आपल्याकडे घेतले.''**

एकूण पाकला आपला हा कल्पनाशक्तीचा खेळ व्यापक स्वरूपात खेळायचा होता. कायद्यानं प्रस्थापित झालेल्या काश्मीरमधील सरकारला ते 'कळसूत्री बाहुलं' आहे असं पाक वृत्तपत्रं म्हणू लागली. काल्पनिक क्रांतिकारी मंडळाचं मुखपत्र बनलेल्या या वृत्तपत्रानं खालील 'घोषणा' केली :

**कळसूत्री राज्याला कर द्यायचे नाहीत,**

**कारस्थान्यांना गोळ्या घालणार... हरताळ पाळला.**

---

पुढील तीन दिवस हा प्रचार चालूच होता : ११ ऑगस्ट १९६५ चं वृत्त होतं :

*देशभक्तांनी श्रीनगर-जम्मू रस्ता उखडून मुक्तीची योजना जाहीर. . . दि. १० ऑगस्ट : स्वातंत्र्य सैनिकांनी व्याप्त काश्मीरात स्थापन केलेल्या क्रांतिकारी मंडळानं आज जम्मू व काश्मीर येथील जनतेचं राष्ट्रीय सरकार स्थापन केल्याचं घोषित केलं.*

---

१२ ऑगस्ट १९६५ चे मथळे होते :

**बारामुल्ला ब्रिगेडच्या मुख्यालयावर हल्ला**

**बटालियनचा जवळजवळ पाडाव!**

**छांबमध्ये घनघोर संघर्ष चालू**

**श्रीनगरमध्ये १२ रस्त्यांची नाकेबंदी**

**दळणवळण तुटले.**

१३ ऑगस्ट १९६५

*काश्मीरमधील शहरात संचारबंदी*
*बारामुल्लाशी श्रीनगरचा संपर्क तुटला.*
*लेहला चाललेल्या लष्करी ताफ्यावर हल्ला*
*पूल, लष्करी छावणी उद्ध्वस्त*
*'देशभक्तांनी' घडवून आणलेली जबर हानी...*

---

–असे मथळे झळकले तरी नेमकं सत्य काय आहे हे साऱ्या जगाला लवकरच उमगलं. काश्मीरमध्ये कसलाही उठाव झालेला नसून 'क्रांतिकारी मंडळ' अस्तित्वातच नाही असं पाश्चात्य पत्रकारांना आढळून आलं.

११ ऑगस्टनंतर 'डॉन'मधील या 'तथाकथित उठावा'च्या बातम्या व मथळे यांचं स्वरूप व आकार लहान लहान होत गेले व नंतर त्याबाबत काहीच बातम्या येईनाशा झाल्या! भुत्तो यांचं 'ऑपरेशन जिब्राल्टर' साफ फसलं हे कटू सत्य पाकिस्तानला स्वीकारावं लागलं. जनरल मुसा लिहितात : ''त्यांची कामगिरी अगदीच निराशाजनक नसली तरी ठरवून दिलेली उद्दिष्टं गाठता आली नाहीत. युद्धबंदी लागू झाल्यावर 'देशभक्त' आझाद काश्मीरमध्ये परतले.''

गौहर यांनीही असंच वर्णन केलं आहे. ते म्हणतात : ''भारतीयांनी घुसखोरांना नामोहरम केलं असून उरी क्षेत्रातील दोन ठाणी ताब्यात घेऊन प्रतिकारात्मक कारवाई सुरू केली आहे.''

पाक वृत्तपत्रांतून होणाऱ्या अत्यंत खोट्या व बनावट प्रचाराबद्दल त्यांनी पाकिस्तानी सैन्याच्या मुख्यालयाला दोषी धरलं आहे. त्यांनी लिहिलं आहे :

> *''काही जण अत्यंत अतिशयोक्त व संशयास्पद अहवाल पाठवीत होते, असं गुल हसन म्हणतात. सदसद्विवेक बुद्धीची जागा स्व-स्तुतीनं घेतली होती. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पाठवलेला अहवाल आशावादी स्वरूपात कर्नल मंडळी मांडीत. त्यात अपयशाची सूचक चाहूल दिसली तर ती ब्रिगेडियर्स काढून टाकीत. त्यामुळं जेव्हा संरक्षण मुख्यालयाकडे हे अहवाल पोचत तेव्हा ती जणू विजयी मिरवणुकांची वर्णनं वाटत!''*

तथाकथित शत्रूविरुद्ध काल्पनिक विजयाच्या अतिशयोक्त बातम्या मुख्यालय पाठवीत आहे याची जाणीव फारच थोड्या लोकांना होती. या बातम्यांची शहानिशा करण्याची सरकारकडे काही यंत्रणा नव्हती. एकमेकांचे नीतिधैर्य वाढवण्याचा मुद्दाम रचलेला हा प्रकार होता की काय हे ठाऊक नाही. परंतु खुशीनं सारी बनावट कथा रचण्यात येत होती,'' असंही गौहर म्हणतात. याचा अर्थ या खोट्या प्रचाराला आपण जबाबदार नव्हतो, त्याचा दोष सेनाप्रमुखांकडे जातो असं खुद्द पाक प्रचारयंत्रणेचे

प्रमुख सांगू पाहत होते!

या काळात काश्मीरमधील घडामोडींची शास्त्री सतत माहिती घेत होते. लष्करप्रमुख व काश्मीरचे मुख्य मंत्री जी. एम. सादिक यांच्याकडून फोनवर त्यांना माहिती मिळत होती. ९ ऑगस्ट रोजी सादिक यांनी आकाशवाणीवरून भाषण करून घुसखोरांच्या कारवाया व भारतीय सैन्यानं दिलेलं प्रत्युत्तर यांचा तपशील जनतेला दिला. "पाकला अंतिम आणि जबरदस्त तडाखा देण्यासाठी शांतपणं तयारी करू या" असं आवाहनही त्यांनी केलं.

भारतीय सुरक्षा फौजा व पाकिस्तानी लष्कर यांच्यातील चकमकी बरेच दिवस चालू होत्या. प्रत्येकी ११० जवान असलेल्या ६० कंपन्या नागरी वेषात काश्मीरमध्ये धूमाकूळ घालण्यासाठी भटकत होत्या. त्यामुळे परिस्थिती तशी गंभीर होती. काही घुसखोर श्रीनगर शहराच्या बाहेरच्या भागानजीक पोचले होते, तर इतर छांब व जौरिया भागात उचापती करीत होते. त्यांना वेढून त्यांचा पाडाव केला जात होता.

पाकिस्तानी प्रचाराचा प्रभाव पाश्चात्य जगतावर झाला नाही. "पाकिस्तानी घुसखोरांनी काश्मीरमधील युद्धबंदी रेषेचं उल्लंघन केल्याच्या बातम्यांची नोंद आम्ही घेतली आहे" असं विधान अमेरिकेच्या एका प्रवक्त्यानं केलं. ही खास राजकीय मुत्सद्देगिरीची भाषा असली तरी त्यात स्पष्टता होती. ब्रिटनमधील वृत्तपत्रांत घुसखोरी कारवायांचं वृत्त मल्लीनाथी न करता प्रसिद्ध होत होतं. 'द टेलिग्राफ'नं आपल्या संपादकीयात असं म्हटलं होतं : "घडामोडींची जी दोन प्रकारची वृत्तं येत आहेत त्यांच्यामध्ये कोठे तरी सत्य दडलेलं आहे. परंतु सार्वमत न घेतल्यानं या स्थितीला भारत जबाबदार आहे."

परिस्थितीवर भारतीय सुरक्षा फौजांचं पूर्ण नियंत्रण आहे अशी खात्री ११ ऑगस्ट १९६५ पर्यंत शास्त्रींना वाटू लागली होती. परंतु सध्याच्या संघर्षाचा हा शेवट नव्हे, असं त्यांना मनोमनी वाटत होतं. किंबहुना पाकिस्तान काही गंभीर उपद्रव निर्माण करण्याच्या पवित्र्यात असावा असा त्यांना संशय वाटत होता. त्यामुळं सावधगिरीचा उपाय म्हणून काही धोरणात्मक निर्णय त्यांनी घेतले.

पहिलं म्हणजे युनोच्या सुरक्षा मंडळाकडे हे प्रकरण न्यायचं नाही. जम्मू-काश्मीर राज्य हा भारताचा एक भाग असून पाकच्या आक्रमणाविरुद्ध त्याचं संरक्षण भारत स्वबळावर करील.

दुसरं म्हणजे भारत हा शांततेचा पुरस्कर्ता असला तरी त्याची सार्वभौमता व प्रादेशिक एकता यांत केलेला हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही.

तिसरी गोष्ट म्हणजे या परिस्थितीचा व शास्त्रींच्या उपाययोजनांचा मंत्रिमंडळ बैठकीत विचार केला जावा. पाकिस्तानचा धोका तातडीचा आहे, त्याशिवाय चीनचाही धोका उद्भवण्याचा संभव आहे.

चौथी बाब म्हणजे सद्यःस्थिती व भावी घडामोडी हाताळण्यासाठी शास्त्रींनी आखलेल्या योजनेची माहिती देशाला देणं.

त्यानुसार शास्त्रींनी १२ ऑगस्ट १९६५ रोजी मंत्रिमंडळाची बैठक बोलावली.

काश्मीरमधील स्थितीची माहिती देण्यासाठी सर्वोच्च सनदी, लष्करी व पोलिस अधिकाऱ्यांनाही या बैठकीस पाचारण करण्यात आलं होतं. बैठकीत मंत्रिमंडळानं पंतप्रधानांच्या मताशी सहमती दर्शवली.

या बैठकीनंतर शास्त्री १०, जनपथ या निवासस्थानी परतले व आकाशवाणीवरून करायच्या भाषणाच्या तयारीला लागले. त्यांचं ते भाषण देशाच्या दृष्टीनं ऐतिहासिक महत्त्वाचं ठरलं. अत्यंत अंतःकरणापासून, तळमळीनं ते बोलले. नेमकं काय घडलं याचा तपशील त्यांनी दिला. नागरी वेषात पाकिस्ताननं घुसखोर घुसवले असून त्या बुरख्याआड केलेला हा संघटित लष्करी हल्ला कसा आहे हे त्यांनी सांगितलं. १२६ घुसखोरांना ठार करण्यात आलं. अधिकारी व सैनिक मिळून ८३ जणांना पकडण्यात आलं आहे. लोकांनी बंड केलं वगैरे प्रकारचा पाकिस्तानचा प्रचार बिनबुडाचा व निखालस खोटा असून हा उठाव नाही की काश्मिरात क्रांतिकारी मंडळ स्थापन झालेलं नाही. जम्मू-काश्मीरच्या जनतेनंच हा प्रचार खोटा पाडला असून त्यांनी चांगली तटबंदी केली आहे, असं ते म्हणाले. गेल्या एप्रिलमध्ये कच्छ सीमेवर पाकनं उघड आक्रमण केलं, तेव्हा कडक लष्करी प्रतिकार करावा लागेल हे ठणकावून सांगितल्यावर त्यांच्या फौजा भारतीय प्रदेशावरून मागं हटल्या होत्या. त्यानंतर उभय राष्ट्रांचे संबंध सुधारतील असं वाटलं होतं, असं सांगून ते म्हणाले की, पुन्हा त्यांनी असं धाडस करावं याचं आश्चर्य वाटतं. या खेपेस त्यांनी वेगळंच तंत्र वापरलं आहे. हे त्यांचं नवं कारस्थान आहे. मुद्दाम तणावाचं वातावरण ठेवण्याचा पाकचा निर्धार आहे, असा निष्कर्ष काढल्यावाचून गत्यंतर नाही. त्यांना एकूण शांतता आवडत नाही असं दिसतं. तेव्हा याचा वास्तवदर्शी विचार आपणाला करायला हवा. भारताचा काही हिस्सा आपण बळकावून घेऊ, असं पाकिस्तानला वाटत असेल तर त्याचा फेरविचार त्यांनी करणं इष्ट ठरेल. टोल्याला टोला, जशास तसं प्रत्युत्तर त्यांना दिलं जाईल हे मी निःसंदिग्ध शब्दांत स्पष्ट करू इच्छितो. आमच्यावरील कोणतंही आक्रमण यशस्वी होऊ दिलं जाणार नाही. सबंध देश तुमच्या पाठीशी उभा असून स्वातंत्र्याचं रक्षण करण्यासाठी वाटेल तो त्याग करायला तयार आहे, असं मी जम्मू-काश्मीरमधील जनतेला सांगू इच्छितो. भारताची मान उंच राहावी व त्याला स्वाभिमानानं जगता यावं म्हणून देशातील तरुण प्राणांची बाजी लावायला तयार आहेत याची मला खात्री आहे. शेवटी या कठीण प्रसंगी आपआपसातील मतभेद गाडून सर्वांनी एकजुटीनं देशाचं रक्षण करावं असं आवाहनही त्यांनी केलं.

टोल्याला टोल्यानं उत्तर दिलं जाईल असं शास्त्रींनी स्पष्ट केलं. ही केवळ शाब्दिक फुशारकी नव्हती, तर आक्रमण केलं तर काय होईल याचा पाकला दिलेला इशाराच होता. आकाशवाणीवरील भाषणामुळं भारताला हवं असलेलं खंबीर नेतृत्व ते देत आहेत असं दिसून आलं. दोनच दिवसांनी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात त्यांनी वरील बहुतेक मुद्द्यांचा पुनरुच्चार केला. "काश्मीरमधील एक इंच भूमीही आम्ही पाकिस्तानला घेऊ देणार नाही," असं त्यांनी

स्पष्ट पण नम्र शब्दांत बजावलं.

दरम्यान देशात व देशाबाहेरही बऱ्याच राजकीय घडामोडी घडत होत्या. १४ ऑगस्ट १९६५ रोजी संसदीय कार्यकारी पक्षाच्या व कार्यकारिणीच्या बैठकीपुढं त्यांनी ताज्या घडामोडींसहित सारा तपशील मांडला. काश्मीरच्या खोऱ्यात अशी परिस्थिती निर्माण करायची की घुसखोरांमागून सरळ लष्करच तिथे घुसवायचं असा पाकिस्तानचा डाव असावा असा संशय त्यांनी व्यक्त केला होता. त्यांचं हे भाकीत खरं ठरलं. १७ दिवसांनंतर पाकिस्ताननं काश्मीरवर मोठ्या प्रमाणावर चाल केली.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय वकिलाती परदेशांना ताज्या घडामोडींची माहिती करून देत होत्या. अमेरिकेतील राजदूत बी. के. नेहरू यांनी परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांची भेट घेऊन भारत कमालीचा संयम राखीत असला तरी देशाचं सार्वभौमत्व, सुरक्षितता राखण्याची जबाबदारी पार पाडावी लागेल, असं त्यांना सांगितलं. त्याच सुमारास युनोतील पाकिस्तानचे कायमचे प्रतिनिधी अमजद अली यांनी सरचिटणीस ऊ थांट यांची भेट घेऊन घुसखोरी पाक सैनिक करीत नसून त्याला आम्ही जबाबदार नाही, असं सांगितलं. पाकचे परराष्ट्रमंत्री भुत्तो यांच्याच निवेदनांची अली इमानेइतबारे री ओढीत होते!

काश्मीरमध्ये घुसखोरांची टोळकी घातपाती कृत्यं करीतच होती. १५ ऑगस्ट १९६५ नंतर युद्धबंदी रेषेचा भंग करण्याचे प्रकार वाढू लागले. श्रीनगर-लेह रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी पाकनं हल्ले चढवले. या रस्त्याचा १५ किलोमीटरचा पट्टा कारगिल भागात अगदी युद्धबंदी रेषेच्या जवळून जातो. या क्षेत्रातील तीन पाक ठाणी ताब्यात घेऊन भारतानं प्रत्युत्तर दिलं.

मरी इथे मे ६५ मध्ये जमलेल्या ३० हजार सैनिकांपैकी सुमारे ७ हजार जणांना ऑगस्टच्या प्रारंभी पलीकडे पाठवून देण्यात आलं होतं. घुसखोरांची आणखी लाट येण्याचा संभव होता. त्यांना रोखण्यासाठी भारतीय लष्कराला युद्धबंदी रेषेनजीक नेऊन त्यांच्यावर नजर ठेवणं जरुरीचं होतं. त्याकरिता आवश्यक ते सारं करा असे आदेश पंतप्रधानांनी लष्करप्रमुखांना दिले होतेच.

अशा वातावरणात 'न्यूयॉर्क टाइम्स' च्या दिल्लीतील वार्ताहरानं पंतप्रधानांची मुलाखत मागितली. त्याला मुलाखत देताना शास्त्री म्हणाले, "पाकिस्ताननं आक्रमण चालूच ठेवलं तर भारत केवळ बचावात्मक पवित्रा घेणार नाही, तर प्रत्युत्तर देईल. आमच्या भूमीवरून त्यांना दर वेळी मागं रेटायचं असं किती काळ भारत करीत राहणार? त्यांच्या प्रदेशात जाऊन आम्हाला लढावं लागेल. आता काय घडेल हे पाकिस्तान काय करतं यावरच अवलंबून राहील."

पाकचे हल्ले चालूच राहिले तेव्हा २२ ऑगस्ट १९६५ रोजी जनरल चौधरी यांनी श्रीनगरला जाऊन युनोचे मुख्य निरीक्षक जनरल निम्मो यांची भेट घेतली. युद्धबंदी रेषेच्या उल्लंघनाच्या घटनांकडे त्यांनी निम्मोंचं लक्ष वेधलं. भारतीय हद्दीत पाक घुसखोरांना रोखल्यानं पाक फौजा युद्धबंदी रेषेवर गोळीबार करीत आहेत, हेही

त्यांनी त्यांच्या लक्षात आणून दिलं.

आपल्या 'जिब्राल्टर फोर्स'ला अपेक्षित यश न मिळाल्यानं पाकिस्तानी चिडले व अधिक उघडपणं हल्ले करू लागले. शस्त्रास्त्रं व दारूगोळा घेऊन एकूण ३०० हून अधिक सैनिक असलेल्या तीन पाकिस्तानी तुकड्या पूंचजवळील भारतीय प्रदेशात मेंढार भागातील ठाण्यांवरील भारतीय सैनिकांना हुसकून काढण्याच्या इराद्यानं शिरल्या. दोन्ही बाजूंच्या सैनिकांत अनेक तास जोरदार संघर्ष झाला. त्यात बरेच पाकिस्तानी सैनिक मृत्युमुखी पडले.

ऑस्ट्रेलियन नागरिक असलेले जनरल रॉबर्ट एच. निम्मो यांनी छुप्या वेशातील अनेक हल्लेखोर पाकिस्तानातून काश्मीरमध्ये घुसले असल्याचा अहवाल युनोचे सरचिटणीस ऊ थांट यांना पाठविला. त्यांच्या या अहवालामुळं शास्त्रींच्या म्हणण्याला पुष्टी मिळाली. काश्मीरमधील उपद्रवाचा ठपका पाकिस्तानवर ठेवणारं एक निवेदन सरचिटणीसांनी तयार केलं. त्याच्या आगाऊ प्रती त्यांनी भारत व पाकिस्तान यांना पाठवून दिल्या. सुरक्षा समितीनं हे संकल्पित निवेदन मान्य करण्यापूर्वीच पाकिस्ताननं त्याला गंभीर आक्षेप घेतले. एवढंच नव्हे, तर जर हे निवेदन प्रसृत केलं तर युनोच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची धमकी दिली, असं वृत्त 'हिंदुस्तान टाइम्स'नं २५ ऑगस्टला दिलं. बहुधा आपल्याला मध्यस्थाची भूमिका बजवावी लागेल, हे लक्षात घेऊन ऊ थांट यांनी ते निवेदन करण्याचं ठरवलं होतं. त्यांनी ते निवेदन केलं असतं तर कदाचित १ सप्टें. १९६५ रोजी भारतावर मोठ्या प्रमाणावर चढाई करण्याचा आपला बेत अयूबखान यांनी सोडून दिला असता असं काहींचं म्हणणं आहे. परंतु ऊ थांट यांनी हे निवेदन न करता जनरल निम्मो यांना चर्चा करण्यासाठी न्यूयॉर्कला बोलावून घेतलं.

काहीही असलं तरी तोवर सत्य उघड झालंच होतं. बव्हंशी अमेरिकनांच्या भावना 'डेन्व्हर पोस्ट' या दैनिकानं आपल्या संपादकीयात व्यक्त केल्या होत्या. 'हिंदुस्तान टाइम्स'नं २८ ऑगस्ट १९६५ च्या अंकात हे संपादकीय पुनर्मुद्रित केलं. त्यात म्हटलं होतं :

*"काश्मीरच्या सीमेवरील संघर्षाची जबाबदारी आक्रमकावर आहे आणि इथे पाकिस्तान हा आक्रमक दिसतो आहे. या हल्ल्यामुळे अमेरिकेच्या संदर्भात काही प्रश्न उद्भवतात. आपण पाकिस्तानला बरीच आर्थिक व लष्करी मदत केली आहे. आता ते आपल्यावरच उलटले आहेत. पाकिस्तानचे अध्यक्ष पाश्चात्य जगतापेक्षा पेकिंगशी मैत्री ठेवू इच्छितात. त्यांनी चीनबरोबर करार केले आहेत, त्यांच्याशी विमानसेवा प्रस्थापित केली आहे, भारत-चीन सीमावादात चीनची बाजू घेतली आहे. त्याच वेळी दक्षिण व्हिएतनाममधील अमेरिकन कारवाईवर मात्र ते टीका करतात.*

*या गोष्टींमुळं अमेरिकेला पाकिस्तानला दिली जाणारी मदत थांबवावी लागली आहे व अध्यक्ष अयूब यांची संकल्पित अमेरिका-भेट रद्द करावी लागली आहे.*

*आता पुढं काय? काश्मीरमध्ये पुढील काही दिवसांत घडणाऱ्या घटनांवर आम्ही प्रभाव पाडू शकत नाही. परंतु आपल्याला डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवायला हवं. पाश्चात्य जगताला लाभ होईल अशी मध्यस्थाची भूमिका वठवायची संधी मिळत असेल तर तशी चाचपणी करायला हवी.*


*आता दुसऱ्या बाजूला जर सबंध आशियावरच लाल चीननं कब्जा करावा अशी अयूबखान यांची इच्छा असेल तर गोष्ट वेगळी. अशा परिस्थितीत भारताला सरहद्दीचं रक्षण करण्यासाठी अमेरिकेनं सर्वतोपरी मदत केली पाहिजे.''*

काश्मीरमधील घटनांकडे सोविएत युनियनचं बारीक लक्ष होतं. काश्मीर हा भारताचा भाग आहे, या आपल्या भूमिकेला ते चिकटून होते व पाकिस्तानच्या घुसखोरांनी काश्मीरमध्ये उपद्रव निर्माण केला हे त्यांनी मान्य केलं होतं. शांततेच्या मार्गानं उभय देशांनी प्रश्न सोडवावेत, असं सोविएत युनियनचं मत होतं.

भारतीय संसदेला परकी आक्रमणाची चिंता वाटत होती. सरकारवर विरोधी पक्षीयांनी अविश्वासाचा ठराव मांडला व लोकसभेत त्यावर बरीच चर्चा झाली. कच्छच्या रणाच्या संदर्भात झालेला करार रद्द करावा अशी विरोधकांची एक मागणी होती. तसंच पाकिस्तानच्या बाबतीत अत्यंत कडक धोरण अवलंबावं अशी दुसरी मागणी होती. या दोन्ही प्रश्नांवर शास्त्रींच्या भूमिकेला काँग्रेस पक्षाचं मोठं पाठबळ होतं. कच्छच्या सीमेच्या आखणीच्या बाबतीत १९६० मध्ये भारत सरकारनं व खरं तर संसदेनं निश्चित प्रक्रिया मान्य केली होती. त्यानुसारच १९६५ मध्ये कच्छच्या रणाबद्दल करार झालेला होता. तेव्हा तो एकतर्फी रद्द करण्याची विरोधकांची मागणी शास्त्रींनी मान्य केली नाही. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या कराराबद्दल दिलेला शब्द भारत पाळीत नाही असं चित्र उभं राहता कामा नये, यावर शास्त्रींचा कटाक्ष होता. देशाच्या पातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर नैतिकता पाळायलाच हवी असा त्यांचा आग्रह होता. अखेर संसदेनं कराराला मान्यता दिली. पाकिस्तानी आक्रमणाला जशास तसं प्रत्युत्तर दिलं जाईल, या आश्वासनाचा त्यांनी पुनरुच्चार केला. १३ ऑगस्ट १९६५ रोजी अविश्वासाचा ठराव नामंजूर झाला व शास्त्रींचं स्थान अधिकच बळकट झालं.

उरी भागात पाकिस्तानी घुसखोर मोठ्या प्रमाणावर जमल्यानं भारतीय सैन्याच्या तुकड्या २५ ऑगस्ट ६५ रोजी युद्धबंदी रेषा ओलांडून पुढं घुसल्या. युद्धबंदी रेषेवर उरी-पूंच या गळफासाच्या आकाराच्या क्षेत्रातील नऊ पाकिस्तानी तळांवरून घुसखोरांना भारतीय लष्करानं ३० ऑगस्टपर्यंत हुसकावून लावलं. (नकाशा क्र. २) या संघर्षात ८६०० फूट उंचीवरील हाजीपीर खिंडीवर कब्जा करण्यात आला. याच मोहिमेत सँकरीज, बुर्जी, पाथरा, लेडवाली गली, कुथनर की गली, सावन-पाथरी व जब्बार येथील पाकिस्तानी ठाणी भारतीय सैन्यांनी ताब्यात घेतली.

यूनोचे सरचिटणीस ऊ थांट यांची जनरल निम्मोंशी सल्लामसलत चालू होती. जनरल निम्मोंच्या अहवालाच्या प्रती सुरक्षा समितीच्या सदस्यांना दिल्या जाव्यांत ही




नकाशा २ : हाजीपीर खिंडीचा ताबा

भारताची मागणी शेवटी मान्य होणार अशी चिन्हं दिसू लागली. जनरल निम्मो खुद्द न्यूयॉर्कमध्ये उपस्थित असल्यानं त्यांच्याशी बोलून माहिती घेण्याची संधी सुरक्षा समितीच्या सदस्यांना मिळाली. त्यामुळं पाकिस्तानी जनरल निम्मो यांच्यावर भडकले. निम्मोंचा अहवाल दडपून टाकण्यास पाकिस्तान अत्यंत उत्सुक होतं. ऊ थांट यांच्याशी चर्चा करून जनरल निम्मो ३० ऑगस्टला काश्मीरला रवाना झाले. भारत व पाकिस्तान यांच्यामधील तणाव दूर व्हावा म्हणून सरचिटणीसांचे काही प्रस्ताव आहेत, असं सांगण्यात आलं खरं, परंतु त्याचा तपशील मात्र देण्यात आला नाही.

उरी-पूंच भागात आणखी कुमक आणून भारतीय सैन्यानं आपली स्थिती मजबूत केली. काश्मीरमधील स्थितीवर भारतीय सुरक्षा फौजांचं आता पूर्ण नियंत्रण होतं. ५ ऑगस्टला आक्रमण सुरू झाल्यापासून पाकिस्तानचे ११०० सैनिक ठार झाले होते.

असं काही घडेल अशी अयूबखान व भुत्तो यांची अपेक्षा नव्हती. 'ऑपरेशन जिब्राल्टर' मोहीम सुरू होतीच. स्वात या सीमावर्ती राज्यात जाऊन तिथेच काही दिवस अयूबखान मुक्काम ठेवून होते. आपल्या घुसखोरांच्या कारवाईची आपल्याला काही कल्पना नाही, हे 'दाखवून देण्या'साठीच त्यांनी ही युक्ती योजिली होती. ऑगस्टच्या अखेरीला जनरल मुसा व जनरल मलिक यांची बेचैनी वाढू लागली. आता 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम' ही मोहीम तत्काळ हाती घ्यावी, असा आग्रह ते धरू लागले. अल्ताफ गौहर म्हणतात :

*"सियालकोट व जम्मू यांच्यामधील आंतरराष्ट्रीय सीमेच्या छोट्या भागात पाकिस्तानी तुकड्यांना 'ग्रँड स्लॅम' मोहिमेमुळं जावं लागणार होतं व तोच खरा प्रश्न होता. 'ग्रँड स्लॅम' मोहीम सुरू करण्यासाठी अयूबखान यांची संमती मिळवावी अशी विनंती जनरल मुसा हे भुत्तो यांना करीत असताना माहिती खात्याचे सचिव उपस्थित होते. 'जिब्राल्टर मोहीम' साफ कोसळली असून आपल्या योजनेचा फज्जा उडाला आहे याची जाणीव झाल्यानं भुत्तो व अझिझ अहमद यांची स्थिती मोठी बिकट बनली होती. तेव्हा जुगाऱ्यानं शेवटची संधी घ्यावी तसा अखनूरवर चढाई हाच काय तो मार्ग त्यांना दिसत होता. आंतरराष्ट्रीय सीमारेषेचा थोडा भंग केला तर ते भारतीयांच्या लक्षात येणार नाही, असं त्यांना वाटलं असावं. तेव्हा हा जुगाराचा धोका पत्करावा असं भुत्तोंनी ठरवलं."*

*त्यासाठी भुत्तो स्वातला गेले व अयूब यांचा लेखी हुकूम घेऊन २९ ऑगस्ट १९६५ ला परतले. तो हुकूम आणि त्याचा एकूण मतलब गौहर यांच्याच शब्दांत असा :*

*"काश्मीरमधील संघर्षाचं राजकीय उद्दिष्ट' या नावाचा हा आदेश परराष्ट्रमंत्री व कमांडर इन चीफ यांच्या नावे होता. शीतपेटीत ठेवलेला काश्मीर प्रश्न उकरून काढणं, भारताचा निर्धार कमकुवत करून त्याला वाटाघाटीच्या टेबलाशी येण्यास*

*भाग पाडणं हा उद्देश त्यात नमूद केलेला होता. सर्वसाधारण युद्धाला तोंड लागणार नाही अशा पद्धतीनं हे घडवून आणावं असंही त्यात सुचवलं होतं. अर्थात अशा संघर्षात तो व्यापक स्वरूप धारण करील अशी शक्यता असते. तेव्हा काश्मीरपुरतीच आपली कृती सीमित ठेवताना भारत टोकाला जाऊन आपल्याला सर्वसाधारण युद्धात ओढू शकतो किंवा आपण जिथे दुबळे आहोत तिथे तो पाकिस्तानी हद्दीत घुसू शकेल हे लक्षात ठेवलं पाहिजे. अशा स्थितीला तोंड द्यायला आपण सिद्ध राहिलं पाहिजे. भारताचं लष्कर आपल्यापेक्षा खूप मोठं असल्यानं तातडीनं आपल्याला यश मिळेल अशी आशा बाळगणं अवास्तव आहे. तेव्हा प्रदीर्घ काळ टिकून राहील अशी आपली कृती असावी. योग्य वेळी व योग्य ठिकाणी जर प्रखर तडाखे दिले तर हिंदूंचं नीतिधैर्य फारसं टिकाव धरणार नाही. अशा संधींचा शोध घेऊन त्यांचा वापर करावा.'' असं सांगून गौहर म्हणतात, ''युद्धासंबंधीचा हा अत्यंत महत्त्वाचा आदेश आहे. याचा अर्थ २९ ऑगस्टला म्हणजे प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात करण्याच्या नऊ दिवस आधी 'ऑपरेशन जिब्राल्टर' मोहीम अयशस्वी झाली याची काही माहिती अयूबखान यांना नव्हती, हे स्पष्ट होतं. या मोहिमेचं कोणतंही महत्त्वाचं उद्दिष्ट पुरं झालेलं नाही, तसंच शत्रूचं सैन्य मजूबत स्थितीत ठाण मांडून असून आझाद काश्मीरची राजधानी मुजफ्फरपूर त्यांच्या टप्प्यात आहे, याचीही त्यांना कल्पना नव्हती.*

*अयूब अजूनही आपल्याच स्वप्नसृष्टीत वावरत होते. भारताला वाटाघाटींच्या टेबलावर आणणं भाग पाडता येईल, काश्मीरचा प्रश्न शीतपेटीतून काढून पुन्हा ज्वलंत बनवता येईल अशा भ्रमात ते होते. पटकन यश येणार नाही, तेव्हा प्रदीर्घ काळ टिकेल अशी कृती करण्यास ते सुचवीत होते. परंतु आपल्या पाठीमागं परराष्ट्र खातं व संरक्षण मुख्यालय यांनी ती कारवाई आधीच केली आहे हे त्यांना ठाऊक नव्हतं. हिंदूंचं नीतिधैर्य काही तडाख्यांतच खचेल अशी त्यांची समजूत होती. त्यामुळे अखनूरवर हल्ला चढवा असा सरळ आदेश न देता हल्ला कधी, केव्हा व कुठे करावा याबाबतचा निर्णय त्यांनी परराष्ट्रमंत्री व कमांडर-इन-चीफ यांच्यावर सोपविला. निर्णय घेणारे अयूबखान वागत होते सल्लागारासारखे!*

*भुत्तो यांना हा आदेश अगदीच अनुकूल होता. त्यामुळं त्यांचं महत्त्व वाढलं. अन्य कोणी मंत्री त्यांच्या अधिकाराला आव्हान देऊ शकत नव्हता, तसंच अयूब यांच्या आदेशाचा अन्वयार्थ लावण्यासाठी कमांडर-इन-चीफना भुत्तोंवर अवलंबून राहावं लागणार होतं. 'ग्रँड स्लॅम' मोहिमेमुळं आंतरराष्ट्रीय सीमारेषेचा भंग होणार याची पूर्ण जाणीव अयूबना असून त्यांनी 'ग्रँड स्लॅम'ला संमती दिली आहे, असं भुत्तोंनी जनरल मुसा यांना सांगितलं असावं.''*

'अशा प्रकारे' भारतावर हल्ला करण्यास अयूबखान यांनी संमती दिली. एकूण कारस्थानाची तयारी झाली होती.

अयूबखान ३१ ऑगस्ट रोजी तातडीच्या मंत्रिमंडळ बैठकीला हजर राहण्यासाठी रावळपिंडीला आले. त्याच दिवशी पाकिस्तानचे माहितीमंत्री ख्वाजा शहाबुद्दिन यांनी पुढील निवेदन केलं : ''भारतीय साम्राज्यवादाच्या कचाट्यातून आपल्या काश्मिरी बांधवांना मुक्त करण्यासाठी पाकिस्तान्यांनी त्याग करायची वेळ आता येऊन ठेपली आहे.'' 'स्वातंत्र्य सैनिकां'ना कोणत्याही क्षणी मदत देण्यासाठी पाकिस्तान्यांनी तयार राहावं असंही आवाहन त्यांनी केलं. त्यांच्या या घोषणेनंतर काही तासांतच आपल्या आक्रमणाच्या योजनेचा पुढला टप्पा पुरा करण्यासाठी पाकिस्तानी फौजा निघाल्या. 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम'ची ही सुरुवात होती!

□□



।। तेरा ।।

# ऑपरेशन ग्रँड स्लॅम

**पा**किस्तानी सैन्यानं १ सप्टेंबर १९६५ ला पहाटे आपल्या चढाईला आरंभ केला. युद्धबंदी रेषेच्या पलीकडील भिंबर-छांब क्षेत्रात तसंच पाकिस्तान आणि जम्मू-काश्मीर यांच्या दरम्यानच्या आंतरराष्ट्रीय सरहद्दीच्या पलीकडील भागात पोचणं हे त्यांचं उद्दिष्ट होतं. पहाटे ३.४५ वाजता मोठ्या प्रमाणावर गोळीबार आणि तोफगोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. सत्तर रणगाड्यांचा ताफा व ३ ते ४ हजार जवान असलेल्या दोन ब्रिगेड्स घेऊन पाकनं भारतीय हद्दीत प्रवेश केला. अखनूरवर त्यांना ताबा मिळवायचा होता. अखनूर पूल उद्ध्वस्त करून पूर्व पंजाबमधून काश्मीरला होणारा पुरवठ्याचा मार्गच तोडायचा होता. भारत-पाक युद्धाला तोंड लागलं होतं. या मोहिमेचं सांकेतिक नाव होतं– 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम.'

त्या वेळी लष्करप्रमुख जनरल जे. एन. चौधरी हे श्रीनगरमध्ये होते. त्यांनी त्या दिवशी दुपारी पाकच्या आक्रमणाची माहिती शास्त्रींना फोनवरून कळवली. पंतप्रधानांनी तत्काळ मंत्रिमंडळाच्या आणीबाणी समितीची बैठक बोलावली. ही बैठक चालू असतानाच जनरल चौधरी दिल्लीला पोचले व त्यांनी पंतप्रधानांना एक महत्त्वाचा प्रस्ताव सादर केला. भारतीय फौजा प्रतिकार करीत असल्या तरी पॅटन रणगाडे घेऊन पाक सैन्य आगेकूच करीत आहे. भारतीय तुकड्यांकडे तुल्यबळ साधनं नसल्यानं हे आक्रमण थोपवता येणार नाही. आपल्या तुकड्या अखनूर पुलाचं रक्षण करतील, परंतु परिस्थिती धोकादायक आहे. तेव्हा हवाई दलाची त्वरित मदत लागेल, अशी विनंती जनरल

चौधरी यांनी केली.

१९६२ साली चीननं आक्रमण केलं तेव्हा ते रोखण्यासाठी हवाई दलाचा वापर करण्याची अशीच विनंती केली गेली होती. परंतु त्या वेळी केंद्र सरकारनं परवानगी दिली नव्हती. या वेळी मात्र हवाई दलानं तत्काळ कारवाई करावी असा शास्त्रींनी निर्णय घेतला. पाकिस्तानी हवाई दल मुख्य शहरं व महत्त्वाची ठिकाणं यांवर बाँबवर्षाव करण्याचा धोका आहे, याची जाणीव त्यांना होती. परंतु हा धोका पत्करायला हवा होता. मंत्रिमंडळ समितीनं शास्त्रींच्या निर्णयाला पाठिंबा दिला. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी हवाई दलाचे प्रमुख एअरचीफ मार्शल अर्जुनसिंग यांना हा निर्णय कळवला. हवाई दल सज्जच आहे असं अर्जुनसिंग यांनी सांगितलं. हे बोलणं झालं तेव्हा चार वाजले होते. सायंकाळी ५ वाजून १९ मिनिटांनी हवाई दलानं प्रत्यक्ष कारवाई सुरू केली देखील!

मंत्रिमंडळाची बैठक झाल्यावर पत्रकारांनी शास्त्रींना गाठलं तेव्हा ते म्हणाले, "हा आमच्यावर उघड हल्ला असून आम्ही त्याला प्रत्युत्तर देऊ." संसद भवनातून सायंकाळी घरी आल्यावर त्यांनी जनरल चौधरी व एअरमार्शल अर्जुनसिंग यांच्याकडून ताज्या घडामोडींची फोनवर माहिती घेतली.

त्यांनी पंधरवड्यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणं 'जशास तसं' प्रत्युत्तर दिलं जात होतं. परंतु ही तर खुल्या युद्धाची केवळ सुरुवात होती. छांब भाग हा पाकिस्तानला लष्करी डावपेचाच्या दृष्टीनं मोक्याचा, सोयीचा होता. तेथून पश्चिम आघाडीवरून लष्करी सामग्री आणणं त्यांना अत्यंत सोयीचं होतं. त्याउलट भारताला फार दुरून कुमक व पुरवठा आणावा लागला असता. त्यातून अवजड रणगाडे छांब भागात पोचू शकले नसते. हवाई दलाच्या हल्ल्यांमुळं पाक सैन्याची आगेकूच रोखली गेली. परंतु पाकिस्तान आपल्या हवाई दलाच्या संरक्षण छत्राखाली भूदलाच्या आणखी तुकड्या आणू शकत होतं. तेव्हा अन्यत्र लष्करी कारवाई करून पाकवर दडपण आणणं अत्यावश्यक होतं. नाही तर अखनूर पूल उद्ध्वस्त होण्याचा धोका होता.

अन्यत्र हल्ला करणं याचा अर्थ युद्धबंदी रेषेच्या पलीकडे पाकव्याप्त काश्मीरमध्ये तो करणं नव्हे. कारण त्यामुळं अपेक्षित परिणाम साधता आला नसता. भारतीय सेनेला डावपेचाच्या दृष्टीनं उपयोगी पडेल अशा ठिकाणी हल्ला करणं अत्यावश्यक होतं. पाकिस्तानवर हल्ला करणं याचा अर्थ दोन्ही देशांतील सर्वसाधारण युद्ध छेडणं. त्यामुळं संघर्षाला व्यापक, आंतरराष्ट्रीय स्वरूप आलं असतं. चीन पाकबरोबर एकत्रित लष्करी कारवाई करण्याचा संभव होता. चीननं पाकिस्तानला पूर्ण पाठिंबा देणारी निवेदनं त्यानंतरच्या आठवड्यात काढली होती. काश्मीरमधील पाकिस्तानी घुसखोरी ही चीनच्या धर्तीवरच आधारलेली होती. चीनचे गनिमी तज्ज्ञ पाकिस्तानी जवानांना प्रशिक्षण देत आहेत असंही सांगितलं जात होतं. अयूब व चौ एन लाय यांच्या अनेकदा गाठीभेटी झाल्या होत्या व पाकिस्तानच्या भांडखोरपणाला चीन उत्तेजन देत होता, यात काहीच शंका नव्हती. दुसऱ्या आघाडीवर हल्ला करून भारताला गुंतवून

ठेवण्याचा चीनचा गुप्त हेतू होता काय हे मात्र स्पष्ट नव्हतं. आपण हस्तक्षेप केला तर मग भारताच्या बाजूनं अमेरिकाही हस्तक्षेप करील, सोविएत युनियनही त्यात पडेल आणि हा जागतिक प्रश्न बनेल याची जाणीव चीनला होती.

अयूबखान यांनी परवानगी देताच भारताच्या दिशेनं आगेकूच करण्यासाठी पश्चिम पाकिस्तान-पूर्व पंजाब सीमेवर पाकनं मोठ्या प्रमाणावर फौजा व रणगाडे आणून ठेवले होते. पाकिस्तानच्या सैन्याचा धुव्वा उडवण्यासाठी भारताला हल्ला करावा लागला असता. मग पाकिस्ताननं प्रभावी प्रचार तंत्र वापरून मदतीचा धावा केला असता. अशा स्थितीत पाश्चात्य राष्ट्रांनी प्रत्यक्षतः व सुरक्षा समितीच्या द्वारा अप्रत्यक्षपणे भारतावर दबाव आणून युद्धबंदी करायला सांगितलं असतं. पाकिस्तानच्या आक्रमणाला प्रभावी प्रत्युत्तर देण्याआधीच भारतापुढं या दबावाचं संकट उभं राहिलं असतं.

देशांतर्गत जातीय दंग्यांचा धोका टाळणंही महत्त्वाचं होतं. त्याच दिवशी सकाळी म्हणजे १ सप्टेंबर १९६५ रोजी पुण्यात गंभीर जातीय दंगल उसळली होती. लष्कराला पाचारण करण्यात आलं होतं. परिस्थिती त्वरेनं काबूत आणण्यात आली होती. त्या गोष्टीची पुनरावृत्ती टाळणं आवश्यक होतं. कारण पाकिस्तानशी युद्ध चालू असताना जातीयवादाची विषवल्ली भराभर फैलावू शकली असती. अशा प्रकारे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय परिस्थिती धोक्यांनी धगधगू लागली होती. शास्त्रींना महत्त्वपूर्ण राजकीय निर्णय घ्यायचे होते.

## प्रतिहल्ला

आयुष्यातील बहुधा सर्वांत महत्त्वाचा ऐतिहासिक निर्णय शास्त्रींना घ्यावा लागणार होता. १०, जनपथ या निवासस्थानी मी त्या क्षणी त्यांच्या समवेत होतो. एरवी शास्त्री हे शांततेचे पुरस्कर्ते व समन्वयवादी, परंतु त्या वेळी मात्र कुरुक्षेत्रावरील अर्जुनाची भूमिका त्यांना बजावायची होती. एखाद्या महत्त्वपूर्ण प्रश्नाचा साधकबाधक विचार करताना फेऱ्या मारण्याची त्यांची सवय होती. याही वेळी ते खुर्चीतून उठले व दालनात फेऱ्या मारीत विचार करू लागले. "अब तो कुछ करनाही होगा–" असं ते पुटपुटत होते. त्यांच्या मनात काय चाललंय हे मी त्यांना विचारलं नाही व त्यांनीही काही सांगितलं नाही.

मध्यरात्रीनंतरच ते कार्यालयातून शेजारच्या आपल्या निवासस्थानी थोडीशी झोप घेण्यासाठी गेले. त्यांनी मनोमन निर्णय घेतला आहे असं त्यांच्या चेहऱ्याकडे पाहताच माझ्या लक्षात आलं. लाहोरच्या दिशेनं भारतीय फौजांनी आगेकूच करावी असा निर्णय त्यांनी घेतला होता, हे नंतर समजलं. त्या वेळी मात्र त्यांनी आपला हा निर्णय गुप्तच ठेवला होता.

२ सप्टेंबर १९६५ च्या वृत्तपत्रांत पाकच्या आक्रमणाच्या बातम्या झळकल्या. "पाकला प्रत्युत्तर दिलं जाईल, चिंतेचं कारण नाही–" असा शास्त्रींचा संदेशही प्रसिद्ध झाला होता. या बातम्यांनी जनतेत खळबळ माजली.

तत्काळ युद्धबंदी करावी असा युनोच्या सरचिटणीसांचा तातडीचा संदेश शास्त्रींना मिळाला. पाक सेना अखनूर पुलानजीक असताना या आवाहनाचा भारतानं स्वीकार करण्याचा प्रश्नच नव्हता. अधिकृत रीत्या मात्र ''या आवाहनाचा विचार केला जाईल'' अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

परिस्थिती प्रतिकूल असूनही काश्मीरमधील पाक आक्रमण थोपवण्याच्या भू-दल व हवाई दल यांच्या खंबीर प्रयत्नांना यश येत होतं. छांब क्षेत्राच्यावर पाकिस्तानच्या एफ-८६ सेबर जेट विमानांशी भारताची लढाऊ विमानं चांगलीच झुंज देत होती.

शास्त्रींचा तो दिवस अनंत घडामोडींनी भरलेला होता. लष्कराच्या व हवाई दलाच्या प्रमुखांशी चर्चा केल्यानंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांबरोबरच्या बैठकीस ते हजर राहिले. बराच वेळ चाललेल्या या बैठकीत त्यांनी काश्मीरमधील लढाईची ताजी माहिती दिली. अर्थात आपल्या मनातील योजना ते उघड करू शकत नव्हते. युद्धाच्या काळात शास्त्रींनी अनेकदा आपल्या पक्षाच्या व विरोधी पक्षांच्या अशा बैठकी घेऊन त्यांना योग्य ती माहिती दिली.

संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी पंतप्रधानांच्या संमतीनं लोकसभेसाठी निवेदन तयार केलं. या निवेदनात त्यांनी भावी उपाययोजना सूचित केली, पण निश्चित तपशील मात्र दिला नाही. ''पाकिस्ताननं मोठ्या प्रमाणात लष्करी हस्तक्षेप केल्यानं संघर्ष वेगानं वाढत आहे. आम्हाला संरक्षणाच्या दृष्टीनं सर्वंकष विचार करावा लागेल.'' असं सांगून ते म्हणाले, ''कोणत्याही स्थितीचा मुकाबला करू शकू असा भारतीय सैन्याला विश्वास आहे.''

शास्त्री यांनी पत्रकारांशी बोलताना परिस्थितीला तोंड देण्याचा निर्धार प्रकट केला. ताज्या घडामोडींचा आढावा घेऊन भावी धोरण आखण्यासाठी त्यांनी त्याच दिवशी सायंकाळी मंत्रिमंडळाच्या आणीबाणी समितीची बैठक बोलावली. नेमकं कोणतं पाऊल उचलायचं हे त्यांनी ठरवलं असलं तरी आपल्या सहकाऱ्यांचा पाठिंबा त्यांना घ्यायचा होता. पश्चिम पाकिस्तानात कोठे तरी अन्यत्र हल्ला करून पाकला काश्मीरमधील चढाई सोडण्यास भाग पाडलं पाहिजे असं जनरल चौधरी यांचं मत असल्याचं शास्त्रींनी बैठकीत सांगितलं. हा हल्ला विनाविलंब करणं जरुरीचं आहे असंही ते म्हणाले. उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी त्यांच्या म्हणण्याला पाठिंबा दिला. मात्र एका सदस्यानं याची पाश्चात्य जगतात विशेषतः सुरक्षा समितीत प्रतिकूल प्रतिक्रिया उमटण्याचा संभव आहे, अशी शंका व्यक्त केली. या विषयावर बराच उहापोह झाला. परंतु पाकिस्ताननं आता उघड उघड काश्मीरमध्ये आक्रमण केलं असल्यानं आपलं रक्षण कसं करावं हा सर्वस्वी भारताचा प्रश्न आहे, असं सर्वांचं मत पडलं, असं मंत्रिमंडळ सचिव धर्मवीर व गृहसचिव एल. पी. सिंग यांनी मला सांगितलं. त्या बैठकीत चर्चा अपुरी राहिली. तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा बैठक भरली आणि पंतप्रधानांच्या प्रस्तावाला एकमतानं मान्यता देण्यात आली.

अशा प्रकारे ३ सप्टेंबर १९६५ रोजी प्रतिहल्ला करण्यास शास्त्रींनी आपल्या

लष्कराला अनुमती दिली. आक्रमकाच्या भूमीत जाऊन लढा करण्याचा भारताच्या इतिहासातील तो पहिलाच प्रसंग होता.

राजकीय नेत्याच्या दृष्टीतून युद्धाची उद्दिष्टं निश्चित करण्याच्या कामाला शास्त्री लागले. लष्करी डावपेच व धोरण यांचे तपशील लष्कर व हवाई दलाचे प्रमुख ठरवणार होते. परंतु आंतरराष्ट्रीयदृष्ट्या पंतप्रधानांनी उद्दिष्टं ठरवणं आवश्यक होतं. लाहोर, सियालकोट व बारमेर (राजस्थान) या तीन क्षेत्रांत भारतानं जोरदार प्रतिहल्ला चढवल्यावर "आम्हाला भारत चिरडून टाकत आहे" असा ओरडा पाकनं केला असता आणि परकीय हस्तक्षेपाची विनंती केली असती. चीन उत्तर सीमेवर काही कारवाई करण्याचा संभव होता. युनोला हस्तक्षेप करावा लागेल इतकं न ताणता भारताची पंचाईत करावी, अशी योजना चीन आखू शकत होता. त्यामुळं पाकिस्तानला नष्ट करून टाकण्याचा भारताचा विचार नाही, हे जगाला पटवून द्यायला हवं होतं. भारताच्या उद्दिष्टांना विश्वासार्हता मिळावी म्हणून लष्करी कारवाई या उद्दिष्टांच्या सीमेतच व्हायला हवी होती.

संरक्षण मंत्री व हवाईदल प्रमुख यांची बैठक शास्त्रींनी बोलावली आणि युद्धाची उद्दिष्टं निश्चित केली, ती अशी :

(१) काश्मीरचा बळजबरीनं ताबा घेण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न हाणून पाडणं व काश्मीर भारतापासून त्याला कधीही हिरावून घेता येणार नाही हे स्पष्ट करणं.

(२) पाकिस्तानी सैन्याच्या 'आक्रमक शक्ती'ला पराभूत करणं.

(३) हे हेतू साध्य करण्यासाठी कमीत कमी पाकिस्तानी भू-प्रदेशाचा ताबा घेणं. युद्धाची समाधानकारक सांगता झाल्यावर हा भू-भाग खाली करणं.

पाकिस्तानमधील नागरी वस्त्यांवर बॉम्बहल्ले होणार नाहीत याची दक्षता घ्या असे आदेश शास्त्रींनी एअर मार्शल अर्जुनसिंग यांना दिले. परदेशातील सर्व भारतीय वकिलांनी त्या त्या देशातील सरकारांना या घडामोडींची माहिती द्यावी, अशा सूचना देण्यास शास्त्रींनी परराष्ट्रमंत्री सरदार स्वर्णसिंग व परराष्ट्र सचिव सी. एस. झा यांना सांगितलं.

"संयम बाळगा" असा सल्ला देणारे बरेच संदेश परराष्ट्रांकडून शास्त्रींना आले होते. भारतानं प्रतिहल्ला करू नये म्हणून प्रचंड आंतरराष्ट्रीय दबाव येऊ लागला होता. युनोच्या सरचिटणीसांचा संदेश तर आलाच होता. ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांनी पाठवलेला तातडीचा संदेश देण्यासाठी ब्रिटनचे भारतातील उपायुक्त जॉन फ्रीमन यांनी पंतप्रधानांची मुलाखत मागितली होती. शास्त्रींनी फ्रीमन यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. विल्सन यांना माझे आभार कळवा व पाकिस्तानी आक्रमणाचं गांभीर्य त्यांना समजावून द्या, अशी विनंती शास्त्रींनी फ्रीमन यांना केली. त्याच दिवशी म्हणजे ३ सप्टेंबर १९६५ रोजी शास्त्रींनी राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून भाषण केलं :

*"गुजरात-पश्चिम पाकिस्तान सीमारेषेबाबत भारत-पाकमध्ये झालेल्या करारामुळे*

*उभय देशांचे संबंध सुधारतील व तणाव कमी होईल अशी आशा मी गेल्या ३० जूनला व्यक्त केली होती. परंतु या करारावर स्वाक्षऱ्या होत असतानाच पाकिस्तान काश्मीरमध्ये सशस्त्र घुसखोर घुसवण्याची योजना आखीत होता. हे ऐकून साऱ्या जगाच्या सदसद्विवेक बुद्धीला धक्काच बसेल. कराराची शाई वाळण्यापूर्वीच मरी येथे भारतावरील संकल्पित हल्ल्याचं प्रशिक्षण द्यायलाही पाकनं सुरुवात केली होती, ही घटना पुरेशी बोलकी आहे.*

*आमचं भांडण पाकिस्तानी जनतेशी नाही हे मी स्पष्ट करू इच्छितो. त्यांची भरभराट व्हावी व त्यांच्याशी शांततेचे व मित्रत्वाचे संबंध राहावेत अशीच आमची इच्छा आहे.*

*सध्याच्या संघर्षात मुख्य प्रश्न तत्त्वाचा आहे. लोकशाही मार्गानं निवडून आलेल्या एखाद्या सरकारला उलथून टाकण्यासाठी सशस्त्र सैनिक त्या देशात पाठवायचा कोणा देशाला अधिकार आहे काय? युद्धबंदी रेषेचं पालन करावं असं उभय देशांना आवाहन करणारं युनोच्या सरचिटणीसांचं पत्र मला आलं आहे. भारत व पाकिस्तान दोघांनीही शांतता पाळावी असं आवाहन त्यांनी केलं आहे. शांततेवर आमचा विश्वास असून त्यासाठी आम्ही झटत आलो आहोत व यापुढंही झटत राहू.*

*ज्यांना शांतता हवी आहे त्यांना आम्ही कायमच पाठिंबा व सहकार्य देऊ, मात्र त्यांनी परिस्थितीचं वास्तव स्वरूप ध्यानी घेतलं पाहिजे. युद्धबंदी म्हणजे शांतता नव्हे. एका युद्धबंदीकडून दुसऱ्या युद्धबंदीकडे जायचं व पाक पुन्हा कधी शत्रुत्व सुरू करील याची वाट पाहायची हे आम्हाला जमणार नाही.*

*या गंभीर पेचप्रसंगाच्या वेळी आमच्या नागरिकांची कर्तव्यं व जबाबदारी कोणती? शांतता भंग होणार नाही व जातीय सलोखा टिकून राहील यासाठी तुम्ही कसोशीचे प्रयत्न केले पाहिजेत. कोणी हिंदू नाही, कोणी मुस्लिम नाही, कोणी ख्रिश्चन नाही, कोणी शीख नाही, तर आपण सारे भारतीय आहोत. यापूर्वी जनतेनं देशभक्ती व सारासार विवेकबुद्धी यांचा प्रत्यय दिला असून या प्रसंगीही देशाच्या रक्षणासाठी सारे एक होऊन उभे राहतील असा मला विश्वास वाटतो.''*

दरम्यान काश्मीरमध्ये भूमीवरील लढाई काहीशी थंडावली होती. मात्र हवाई युद्ध जोरात सुरू होतं. स्क्वाड्रन लीडर ट्रेव्हर कीलर यानं आपल्या नॅट विमानानं पाकिस्तानच्या एका एफ-८६ सेबर जेट विमानाचा धुव्वा उडवला होता. अखनूर पुलाच्या दिशेनं पाकिस्तानची आगेकूच रोखणं हा भारतीय भूदल व हवाई दल यांचा उद्देश होता व त्यात त्यांना यश येत होतं.

पाश्चात्य वृत्तपत्रं भारताला सर्वस्वी अनुकूल नसली तरी त्यांचा दृष्टिकोन वास्तव बनू लागला होता. लंडन येथील 'इकॉनॉमिस्ट' या प्रख्यात साप्ताहिकानं ३ सप्टेंबर १९६५ च्या अंकात पाकिस्तानला विजय मिळणार नाही, असा इशारा अयूबना दिला

होता. ४ सप्टेंबर १९६५ रोजी शास्त्रींनी युनोचे सरचिटणीस ऊ थांट यांना एक तपशीलवार उत्तर पाठविलं. त्यात स्पष्टपणं असं म्हटलं होतं :

*"युद्धबंदी रेषा ओलांडून आमच्या प्रदेशात घुसखोरांना पाठवण्याच्या पाकिस्तानच्या कृत्याला आक्रमणाखेरीज दुसरा शब्द नाही. त्यामुळं आमच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करणं हे आमचं कर्तव्यच आहे.*

*पाकिस्तानी कारवाईमुळं उद्‌भवलेल्या गुंतागुंतीच्या व धोकादायक स्थितीच्या सर्व बाजू तुम्हाला समजावून देण्याची संधी मी घेत आहे. तुमच्यासारख्या अत्युच्चपदी असलेल्या व्यक्तीच्या मनात कसलीही शंका राहू नये म्हणून सर्व माहिती देणं हे आमचं कर्तव्यच आहे.*

*तुम्ही शांततेचं आवाहन केलं असून तुमच्या प्रामाणिक प्रयत्नांची, तुम्हाला वाटणाऱ्या काळजीची आम्हाला कल्पना आहे. भारतानं नेहमीच शांततेचा पुरस्कार केला असून त्याचा पुनरुच्चार करण्याची गरज नाही. आता गरज आहे ती युद्धबंदी रेषेपलीकडच्या भारतीय हद्दीत घुसलेल्यांना पाकिस्ताननं पुन्हा मागं नेण्याची. जम्मू-काश्मीर आणि पश्चिम पाकिस्तान यांच्यातील आंतरराष्ट्रीय सीमारेषेचा भंग करून आमच्या प्रदेशात आलेल्या या घुसखोरांना काढून घेण्याची!*

*तसंच या गोष्टीची पुनरावृत्ती केली जाणार नाही याविषयी आमचं समाधान व्हायला हवं... पाकिस्तान केवळ आपल्या सैन्यालाच नव्हे, तर घुसखोरांनाही मागं हटवील आणि यापुढं परत घुसखोरी करणार नाही याची तुम्ही पाकिस्तानकडून सर्वप्रथम हमी घ्याल, असा मला विश्वास वाटतो. खरं तर आम्ही हे तुमच्या आवाहनामागचं पायाभूत गृहीत तत्त्व मानतो."*

भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्षाचा विचार करण्यासाठी सुरक्षा समिती स्वतः होऊन बैठक घेईल, त्याचप्रमाणं भारताच्या प्रतिहल्ल्याचं वृत्त समजताच पुन्हा बैठक बोलावील याची कल्पना शास्त्रींना होती. तेव्हा न्यूयॉर्कला युनोकडे भारतीय शिष्टमंडळ पाठवावं असं मंत्रिमंडळाच्या आणीबाणी समितीशी चर्चा करून शास्त्रींनी ठरवलं. शिक्षणमंत्री एम. सी. छगला यांनी या शिष्टमंडळाचं नेतृत्व करावं व परराष्ट्र सचिव सी. एस. झा यांनी त्यांना साहाय्य करावं असं ठरलं. छगला तत्काळ न्यूयॉर्कला जाऊ शकत नव्हते. सुरक्षा समितीची बैठक ६ सप्टेंबरला भरण्याची शक्यता होती. तेव्हा भारतानं प्रतिहल्ला का केला याची माहिती देण्यासाठी सी. एस. झा यांनी लगेच रवाना व्हावं असं शास्त्रींनी सांगितलं. झा शास्त्री यांच्या विश्वासातील होते, पण तरीही पश्चिम आघाडीवरील भारतीय लष्कराच्या संकल्पित योजनेची माहिती त्यांनी झा यांना दिली नाही. ताबडतोब न्यूयॉर्कला रवाना होण्याचा आदेश शास्त्रींनी व्यक्तिशः झा यांना दिला, तेव्हा ते बुचकळ्यातच पडले. 'फ्रॉम बांडुंग टु ताश्कंद' या आपल्या ग्रंथात झा लिहितात :

*"४ सप्टेंबर १९६५ रोजी पहाटेच शास्त्रींनी १, मोतीलाल नेहरू रोड या निवासस्थानी मला बोलावून घेतलं. सुरक्षा समितीत भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी शिक्षणमंत्री एम. सी. छगला यांना पाठवायचं आपण ठरवलं आहे, पण पुढील आठवड्यापर्यंत ते जाऊ शकणार नाहीत, असं त्यांनी मला सांगितलं. दरम्यान मी तत्काळ न्यूयॉर्कला रवाना व्हावं अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. आणखी काही दिवस तरी सुरक्षा समितीची दुसरी बैठक होण्याचा संभव नाही, तेव्हा मी छगलांबरोबरच जातो असं मी सूचित केलं. त्यावरही आजच्या आज तुम्ही न्यूयॉर्कला रवाना व्हायला पाहिजे असंच ते म्हणाले. ते एवढा आग्रह का धरीत आहेत हे मला उमगेना. पण त्यांच्या आदेशानुसार ५ सप्टेंबर १९६५ रोजी पहाटे मी न्यूयॉर्कला रवाना झालो.*

*इतक्या तातडीनं मला न्यूयॉर्कला का पाठवलं ते मला नंतर उमजलं."*

शास्त्री यांच्या अपेक्षेनुसार सी. एस. झा यांनी न्यूयॉर्कला जाऊन सुरक्षा समितीच्या बैठकीत भारताची बाजू प्रभावीपणं मांडली व ती विचारात घेऊन समितीनं ६ सप्टेंबर रोजी ठराव मंजूर केला.

भारत पुढचं पाऊल काय उचलणार याबद्दल नवी दिल्लीत ४ सप्टेंबर रोजी राजकीय वर्तुळात, परराष्ट्रांच्या दूतांमध्ये नाना तर्ककुतर्क व्यक्त केले जात होते. पंतप्रधानांनी घेतलेला निर्णय हे एक गुपित बनलं होतं.

अमेरिकेचे राजदूत चेस्टर बोल्स यांनी पंतप्रधानांची त्या दिवशी दुपारी तातडीनं भेट घेतली. भारतानं संयम राखावा व युनोच्या सरचिटणीसांच्या शांततेच्या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद द्यावा अशी विनंती त्यांनी केली. बोल्स हे भारताचे पाठीराखे व चांगले मित्र होते. तेव्हा त्यांचं बोलणं शास्त्रींनी लक्षपूर्वक ऐकून घेतलं. युनोच्या सरचिटणीसांना जे उत्तर शास्त्रींनी दिलं होतं, जवळपास तसंच उत्तर त्यांनी बोल्सना दिलं. चेस्टर बोल्स यांनी या भेटीचा तपशीलवार अहवाल वॉशिंग्टनला पाठविला. त्या अहवालाचा संपादित गोषवारा असा :

*"शनिवारी १२.१५ वाजता मी पंतप्रधानांना भेटलो. आमच्यात ३५ मिनिटे झालेल्या चर्चेच्या वेळी ते शांत होते व त्यांचा दृष्टिकोन अगदी सुस्पष्ट होता. काल त्यांना भेटलेले ब्रिटिश उच्चायुक्त फ्रीमन यांचंही असंच मत आहे.*

*भावनेच्या भरात वाटेल तो वेडेपणा करणारे ते नाहीत. अर्थात याचा अर्थ शास्त्री सारे निर्णय शहाणपणाचेच घेतील असा नव्हे. पण आंधळ्या संतापापोटी ते काही करण्याची शक्यता नाही, असा याचा अर्थ आहे.*

*मी केवळ अमेरिकेचा राजदूत नव्हे, तर भारताचा मित्र म्हणून बोलतो आहे हे मी सुरुवातीला स्पष्ट केलं. भारताचा होत असलेला विकास मी अनेक वर्ष पाहत असून भारत लवकरच आर्थिक झेप घेण्याच्या परिस्थितीत आहे असंही मी त्यांना दाखवून दिलं.*

*भारताच्या पंतप्रधानांवर अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. गेल्या अनेक शतकांत जगातील अनेक नेत्यांवर अशी वेळ आलेली आहे. काहींनी धाडस आणि कल्पकता दाखवून आव्हानाला तोंड दिलं. काहींना दबावाखाली चुकीचे निर्णय घ्यावे लागले. परिणामी त्याची किंमत त्यात अडकलेल्या सर्वांनाच मोजावी लागली. उदाहरणार्थ : १९१४ साली युरोपातील महत्त्वाच्या राष्ट्रांतील नेत्यांना पूर्वी केलेली वक्तव्ये आणि घोषणा आणि त्यांच्या हिशेबी असलेल्या लोकांच्या मागण्या यातून बाहेर पडता येईना. यातून शक्तिमान राष्ट्रं युद्धाच्या खाईत लोटली जाणार आहेत हे प्रत्येकाला अंतर्यामी कळत असताना सुद्धा...*

*सध्याच्या परिस्थितीत एक गोष्ट स्पष्ट आहे. भारत सरकारनं काहीही केलं तरी सर्वंकष युद्ध करायची पाळी आणायचीच असं पाकिस्ताननं ठरवलेलं दिसतं. मात्र भारत संयम पाळून पाकिस्तानच्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण करण्याच्या बेतात अडथळे निर्माण करू शकतो. अशा परिस्थितीतही पाकनं युद्ध वाढवायचं ठरवलं तर व्यक्तिशः शास्त्रींच्या व भारत सरकारच्या भूमिकेला जगातील विचारी लोक पाठिंबाच देतील.*

*... त्यांच्या मते तीन मुद्दे अत्यंत महत्त्वाचे आहेत :*

*(अ) जनरल निम्मो यांचा अहवाल जाहीर करावा. युनोच्या सीमानिरीक्षकांना प्रत्यक्ष लढाई थांबवण्याचे अधिकार नाहीत, तेव्हा उभय देशांच्या परस्परविरोधी प्रचारांवर अवलंबून राहायला लागू नये म्हणून काश्मीरमध्ये नेमकं काय घडत आहे याची माहिती युनोच्या सरचिटणीसांना व जगाला देणं हे त्यांचं काम आहे.*

*तेव्हा निरीक्षकांच्या अहवालाच्या आधारावर सरचिटणीसांनी दोष कोणाला द्यायचा हे ठरवून तसं जाहीर करणं हा उत्तम मार्ग आहे.*

*शांततेच्या आपल्या प्रयत्नांना बळ यावं म्हणून सरचिटणीसांनी अलिप्त भूमिका घेतली असली तरी अहवाल जाहीर करायला हवा. तो काही बाबतीत भारतावर टीका करणारा असला तरी उघड केला पाहिजे. युनोचे निरीक्षक हे काम पुरं करू शकत नसतील तर मग त्यांना काश्मीरात पाठवण्याला काय अर्थ उरतो?*

*(ब) एकदा अहवाल प्रसिद्ध झाला की ५ ऑगस्टपासून ज्यांनी सीमारेषा ओलांडली त्या घुसखोरांना परत बोलावून घेण्यास पाकिस्ताननं मान्यता दिली पाहिजे. जोपर्यंत घुसखोर काढून घेतले जात नाहीत तोवर शांततापूर्ण तोडगा निघण्याची शक्यता नाही.*

*(क) या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून युनोच्या पथकाचं संख्याबळ वाढवावं.''*

बोल्स यांनी आपल्या अहवालात आणखीही काही गोष्टींची नोंद केली होती. काश्मीरच्या प्रश्नावर दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी हीच वेळ चांगली आहे, असं अमेरिका व अन्य राष्ट्रं मानणार नाहीत अशी आशा शास्त्रींनी प्रकट केली. 'पाकिस्तानच्या

आक्रमणामुळे आम्ही युद्धाच्या अगदी निकट आहोत,' असंही ते म्हणाले. कधीकाळी अयूब यांचं मन पालटलं व भुत्तोंना त्यांनी दूर केलं तरच खरीखुरी शांतता प्रस्थापित होण्याची आशा आहे, असंही शास्त्रींनी सांगितल्याचं बोल्स यांनी नमूद केलं. भारताविरुद्ध पाकिस्तान अमेरिकेचे रणगाडे, विमानं व शस्त्रास्त्रं यांचा वापर करीत आहे, हाही मुद्दा शास्त्रींनी काढला. त्यावर बोल्स यांनी आधी सगळी लढाई थांबली पाहिजे अशी आशा व्यक्त करून मग असं सांगितलं की त्यानंतर अमेरिकन शस्त्रास्त्रं व उपकरणं यांच्या आक्रमक वापराला कसा प्रतिबंध करता येईल याचा विचार करावा लागेल.

बोल्स यांच्या अहवालातील अखेरचे परिच्छेद वाचनीय आहेत :

*"आमच्या चर्चेच्या अखेरच्या दहा मिनिटांत काही मुद्द्यांचा आम्ही उहापोह केला. युनोच्या सरचिटणीसांच्या आवाहनाला माफक पण होकारार्थी प्रतिसाद द्यावा अशी मी जोरदार विनंती केली. आपण नेहरू-गांधी परंपरेतील शांतताप्रिय नेते आहोत हे सिद्ध करण्याची संधी तुम्ही दवडणार नाही अशी आशा मी व्यक्त केली. आधुनिक युद्धात होरपळण्याचा अनुभव घेतलेल्या जगातील कोट्यवधी जनतेच्या मनात तुम्हाला त्यामुळं आदराचं स्थान मिळेल असंही मी त्यांना सांगितलं.*

*आपली चर्चा खूपच उपयुक्त झाली असं सांगून शास्त्री मला दरवाज्यापर्यंत पोचवायला आले. त्यांचं वागणं मित्रत्वाचं, जिव्हाळ्याचं व आत्मविश्वासानं भरलेलं होतं.*

*शेरा : अखेर भारतीय लोक काय प्रतिसाद देतील याचा अंदाज व्यक्त करण्याचं धाडस मी करणार नाही. शास्त्री जरी शांत वाटत असले तरी दिल्लीतील वातावरण वैफल्यग्रस्त लढाऊपणाचं आहे. एकदा युद्धबंदी केली तरी पाकिस्तान लष्करी सतवणुकीचा दुसरा काही तरी मार्ग काढील व हे असंच अव्याहत चालू राहील असं अनेकांना वाटतं.*

*शास्त्री यांनी अशा स्थितीत कडक भूमिका स्वीकारली असून ती अतार्किक नाही. भारतात मोठ्या प्रमाणावर गनिमी टोळ्या पाठवण्यास व त्यांना प्रशिक्षण देण्यास पाकिस्तान जबाबदार आहे, हे जाहीर करावं. या अहवालाच्या आधारावर काश्मीरचं खोरं आणि जम्मू यांतून घुसखोर मागं घेण्यास पाकनं तयार व्हावं. भारत व पाक यांच्या सेना आपल्या मूळ गस्त घालण्याच्या ठिकाणांवर परत जाव्यात. . सध्याच्या निष्प्रभ पद्धतीऐवजी एक मैल लांबीचा अलिप्त पट्टा निर्माण करावा.*

*घुसखोर पाठवल्याचाच पाकिस्तान इन्कार करीत होतं. तसंच अस्तित्वात नसलेल्या क्रांतिकारी मंडळीच्या नेतृत्वाखाली सर्व काश्मीर खोऱ्यात भारतीयांविरुद्ध बंड पेटून उठलं आहे असा अजूनही पाक दावा करीत आहे. त्यामुळं त्यांना वरील प्रस्ताव मान्य होण्यासारखा नाही. भारतानं जर सुरक्षा समितीत आपली बाजू चांगल्या प्रकारे मांडली (ते तशी मांडतील अशी मला आशा आहे.) तर अमेरिका, ब्रिटन व युनो यांनी काही निर्बंध घालून पाकचं मन युद्धबंदी स्वीकारण्यासाठी*

*तयार करावं असं मी पुन्हा एकदा सुचवू इच्छितो.''*

फ्रीमन व बोल्स यांच्याशी झालेल्या या बैठकीनंतर विल्सन आणि जॉन्सन यांच्या मनात खरा आक्रमक कोण, या आक्रमणाचे भारतावर होणारे गंभीर परिणाम कोणते आणि प्रतिहल्ला करण्याशिवाय भारताकडे दुसरा पर्याय का नाही याबद्दल कसलीही शंका राहण्याचं कारण नव्हतं. पाकिस्तान या राष्ट्रांची लष्करी मदत घेत असल्यानं तो त्यांचं साहाय्य मागण्याची शक्यता होती. त्यामुळं त्याला या राष्ट्रांचं शंकानिरसन करणं आवश्यक होतं.

शास्त्री यांनी ४ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती राधाकृष्णन व काँग्रेसाध्यक्ष के. कामराज यांची भेट घेऊन सद्यःस्थितीची चर्चा केली.

युद्धाच्या आघाडीवरून येणाऱ्या बातम्या संमिश्र होत्या. छांब-जौरियन भागात मुनावर तावी नदीच्या पलीकडे पाकिस्तानी रणगाड्यांच्या ताफ्यानं नवी मुसंडी मारली होती. याचा अर्थ पूर्वेकडे कूच करण्याचा पाकचा प्रयत्न चालूच होता. भारतीय हवाई दल दिवसभर कारवाईत गुंतलं होतं व त्याच्या छोट्या नॅट विमानानं आणखी दोन सेबर जेट विमानांना मूठमाती दिली होती. नॅट विमान चालविणारे फ्लाइट लेफ्टनंट व्ही. एस. पठाणिया यांनी एका पाक लढाऊ विमानाचा पाठलाग करता करता अकस्मात वेग वाढवून पुढं झेप घेतली व पाकिस्तानी विमान पाडलं. पाच मिनिटं ही नाट्यमय रोमहर्षक झुंज चालली होती. इतर तीन नॅट विमानांनी आणखी एका पाक जेटचा निकाल लावला. भारतीय भूदल व हवाई दल यांनी मिळून आतापर्यंत ३३ पॅटन रणगाड्यांचा खातमा केला होता.

पाकिस्तानमध्ये मात्र त्या वेळी अगदी हर्षभरित वातावरण होतं. कारण पाकिस्तानी सैन्यानं तावी नदी ओलांडून पाच मैल पूर्वेच्या बाजूला कूच केल्याचा दावा पाकिस्तानच्या 'द डॉन' या वृत्तपत्रानं ५ सप्टेंबरच्या अंकात केला होता.

चीनचे उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री मार्शल चेन यी यांनी ४ सप्टेंबर रोजी दुसऱ्यांदा पाकिस्तानला भेट दिली. भुत्तोंनी त्यांचं स्वागत केलं. त्यांची बोलणी चार तास चालली होती. चिनी दूतावासात मध्यरात्रीपूर्वी पत्रकारांशी बोलताना मार्शल चेन यी यांनी पाकिस्तानला व काश्मीरमधील 'स्वातंत्र्य सैनिकां'च्या लढ्याला आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला, असं वृत्त 'द डॉन'नं दिलं. काश्मीरमधील तणावाला भारतच जबाबदार आहे, असं वृत्त चीनच्या 'पीपल्स डेली' या सरकारी वृत्तपत्रानं ४ सप्टेंबरच्याच अंकात दिलं होतं. चीन-पाक यांच्यामधील साटंलोटंच त्यावरून स्पष्ट होत होतं.

युनोच्या सरचिटणीसांनी अखेर सुरक्षा समितीला काश्मीरविषयी अहवाल सादर केल्याचं वृत्त ५ सप्टेंबरला दिल्लीला येऊन थडकलं. ३ सप्टेंबरची तारीख असलेल्या या अहवालावर ४ सप्टेंबर रोजी सुरक्षा समितीत विचार झाला. काश्मीरविषयी सरचिटणीसांनी आधी तयार केलेला एक अहवाल सुरक्षा समितीचे सदस्य तसंच भारत आणि पाकिस्तान यांना अनौपचारिकरीत्या उपलब्ध करून देण्यात आला होता

हे पूर्वी नमूद केलं आहेच. हा अहवाल प्रसिद्ध करण्यास पाकनं तीव्र आक्षेप घेतल्यामुळं तो प्रसिद्ध करण्याचा आपला बेत सरचिटणीसांनी रहित केला होता. परंतु युनोतील अमेरिकेचे कायमचे प्रतिनिधी राजदूत ऑर्थर गोल्डबर्ग हे १ सप्टेंबरपासून सुरक्षा समितीचे महिनाभरासाठी अध्यक्ष झाले होते, त्यांनी तत्काळ ऊ थांट यांची भेट घेतली व 'तुमचा काश्मीरवरचा अनधिकृत अहवाल जाहीर करा' अशी त्यांना विनंती केली. सरचिटणीसांच्या शिफारशीला धरून सहमती करण्यासाठी वा ठराव मंजूर करण्यासाठी सुरक्षा समितीचं अधिवेशन बोलवावं असं त्यांनी सुचविलं. अमेरिका उभय राष्ट्रांपैकी कोणावरही थेट दडपण आणणार नाही व सध्या तरी युनोवर अवलंबून राहील असं जॉन्सन यांनी २ सप्टेंबर रोजी जाहीर केलं होतं, ते सूचक होतं.

छांब भागात पाकिस्तानी चढाईत अमेरिकन रणगाडे व विमानं यांचा वापर केला जात होता व त्यामुळं भारतात तीव्र नाखुषी पसरली होती. अमेरिकेतील भारतीय राजदूत बी. के. नेहरू यांनी ३ सप्टेंबर रोजी परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांची भेट घेतली व या प्रश्नावर अमेरिकेची नेमकी भूमिका काय आहे अशी विचारणा केली. भारताच्या विरुद्ध अमेरिकन शस्त्रास्त्रांचा वापर करू दिला जाणार नाही, असं ठाम आश्वासन आयसेनहॉवर व जॉन फॉस्टर डलेस यांनी १९५० मध्ये दिलं होतं, याचं स्मरण राजदूतांनी करून दिलं. याबाबत याआधीच आपण जॉन्सन यांच्याशी चर्चा केली आहे असं डीन रस्क यांनी सांगितलं. परंतु सर्वांत महत्त्वाचा प्रश्न शांतता प्रस्थापित करण्याचा असून युनोनं युद्धबंदीचं जे आवाहन केलं त्याला आपला पाठिंबा आहे असं ते म्हणाले. या पार्श्वभूमीवर सुरक्षा समितीचे अध्यक्ष गोल्डबर्ग यांनी आग्रह केल्यावर ऊ थांट यांनी आपला अहवाल दिला. त्याचा हेतू विशद करताना सरचिटणीस म्हणाले :

*"मी अहवाल देण्याची गरज सुरक्षा समितीच्या सदस्यांनी, मी त्यांच्याशी चर्चा केली तेव्हा, प्रकट केली होती. या अहवालावरून काश्मीरमध्ये निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची व त्याबद्दल मला वाटणाऱ्या चिंतेची तसंच परिस्थिती आणखी चिघळू नये म्हणून गेल्या काही आठवड्यांत मी करीत असलेल्या उपाययोजनेची कल्पना येईल. याच हेतूनं ३१ ऑगस्ट रोजी मी एक अनौपचारिक व गुप्त खलिता सुरक्षा समितीच्या सदस्यांना पाठवला होता. भारत व पाकिस्तान यांनाही तो देण्यात आला होता."*

ताज्या घडामोडींची माहिती व त्यावर मल्लीनाथी करताना सरचिटणीसांनी म्हटलं होतं :

*"काश्मीर प्रश्न पुन्हा तीव्र बनला असून तो धोकादायक अवस्थेत आहे याबद्दल शंका नाही. त्यामुळं केवळ भारत व पाकिस्तान यांच्यातील शांततेलाच नव्हे, तर जगाच्या व्यापक शांततेला धोका आहे असं मला वाटतं.*

*५ ऑगस्टपासून होत असलेले युद्धबंदी रेषा भंग करण्याचे प्रकार बऱ्याच प्रमाणात वाढले आहेत. बव्हंशी गणवेशात नसलेले सैनिक पाकच्या बाजूनं युद्धबंदी रेषा ओलांडीत असून भारतीय हद्दीत लष्करी कारवाई करणं हा त्यांचा हेतू आहे, असं जनरल निम्मो यांनी मला सूचित केलं आहे. युद्धबंदी रेषेच्या जम्मू भिंबर क्षेत्रातील छांब भागातील एका बटालियनच्या मुख्यालयावर व एका पिकेटवर १ सप्टेंबर रोजी पाकिस्ताननं तोफांचा भडिमार केला, अशी तक्रार भारतानं युनोच्या लष्करी निरीक्षकांकडे केली. त्यात असं म्हटलं होतं की, त्या दिवशी पहाटे अडीच वाजता पाकिस्तानी रणगाड्यांची दीड तुकडी युद्धबंदी रेषा ओलांडून या भागात शिरली. त्यांच्यासमवेत तोफखाना होता. पूंच भागातील एका भारतीय बटालियनच्या व जांगर भागातील बटालियनच्या मुख्यालयावर त्या दिवशी पहाटे साडेचारपासून पाक फौजांनी गोळीबार केला. या तक्रारीला युनो निरीक्षकांनी नंतर पुष्टी दिली. भारतीय सैनिकांनी मोठ्या प्रमाणावर कारगिल, टिथवाल व उरी-पूंच भागात युद्धबंदी रेषा ओलांडली अशी तक्रार पाकिस्ताननं केली. मात्र भारतीय कारवाई रोखण्यासाठी बचावात्मक उपाय म्हणून पाकिस्तानी फौजांनी १ सप्टेंबर रोजी भिंबर भागात युद्धबंदी रेषा ओलांडल्याचं पाकिस्ताननं मान्य केलं. या भागात भारतीय हवाई दलानं पाक सैनिकांवर कारवाई केल्याचंही पाकनं तक्रारीत नमूद केलं.''*

ते पुढं म्हणतात :

*''यापुढं युद्धबंदी आणि युद्धबंदी रेषा यांचा आम्ही आदर करू अथवा त्या रेषेवरची परिस्थिती पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न करू असं आश्वासन पाकिस्तान सरकारकडून मी मिळवलेलं नाही. कोणतीही प्रतिकारात्मक कृती करताना आम्ही संयम पाळू असं आश्वासन भारत सरकारनं त्यांच्या युनोतील प्रतिनिधीमार्फत तोंडी दिलं आहे. जर पाकिस्ताननं युद्धबंदी करार आणि युद्धबंदी रेषा पाळण्याचं आश्वासन दिलं तर भारतही तसंच करील, असंही त्यांनी सांगितलं आहे.''*

सरचिटणीसांच्या या अहवालावरून काश्मीरमधील लढाईला पाकिस्तान जबाबदार आहे हेच स्पष्ट होतं.

गोल्डबर्ग यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा समितीची बैठक ४ सप्टेंबरला पुढील कारवाईचा विचार करण्यासाठी भरली. शास्त्रींनी ४ सप्टेंबर रोजीच सरचिटणीसांना पाठवलेलं पत्र त्यांना अजून मिळालेलं नव्हतं. परंतु त्या वेळी भरलेल्या सुरक्षा समितीच्या १२३७ व्या बैठकीत भारताचे युनोतील कायम प्रतिनिधी जी. पार्थसारथी यांनी ते वाचून दाखवलं. चर्चेत भाग घेताना पार्थसारथी यांनी युद्धबंदी इष्ट असली तरी जोपर्यंत पाकिस्तानला आक्रमक देश म्हणून घोषित केलं जात नाही व जोपर्यंत तो देश फौजा मागं घेत नाही, तोपर्यंत युद्धबंदी होऊ शकत नाही. तसंच या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही असं पटवणारी हमी पाकनं द्यायला हवी. बोलिव्हिया, आयव्हरी कोस्ट,

जॉर्डन, मलेशिया, नेदरलँड्स आणि उरुग्वे यांनी संयुक्तपणं मांडलेल्या ठरावाच्या मसुद्याला सुरक्षा समितीच्या सदस्यांनी पाठिंबा दिला. त्यांनी भारत व पाकिस्तान यांनी त्वरित युद्धबंदी करावी अशी मागणी केली. पाकिस्ताननं युद्धबंदी रेषा ओलांडली या सरचिटणीसांच्या अहवालातील बाबीकडे ब्रिटिश प्रतिनिधी लॉर्ड कॅरॅडॉन यांनी लक्ष वेधलं. पाकिस्ताननं आक्रमण केलं आहे, युद्धबंदीच्या शर्तींचा त्यानं भंग केला आहे. घुसखोरांबद्दल इन्कार करून पाकिस्तान खोटं बोलत आहे व १ सप्टेंबर १९६५-पासून पाकिस्तानी सैन्यानं उघड आक्रमण केलं आहे हे सुरक्षा समितीच्या सदस्यांनी चर्चेच्या ओघात मान्य केलं, हे भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं. ६ सप्टेंबरला सुरक्षा समितीची बैठक भरली, तेव्हा या पार्श्वभूमीचा भारताला उपयोग झाला आणि ६ सप्टेंबरला सकाळी भारतानं पश्चिम पाकिस्तानवर केलेली कारवाई केवळ स्वरक्षणासाठी होती या भारताच्या म्हणण्याला विश्वासार्हता प्राप्त झाली.

४ सप्टेंबरच्या सुरक्षा समितीच्या बैठकीत मंजूर झालेल्या ठरावात अशा तऱ्हेचं आवाहन करण्यात आलं :

*(१) युद्धबंदी करण्याच्या दृष्टीनं भारत व पाकिस्तान यांनी तत्काळ पावलं उचलावीत.*

*(२) उभय राष्ट्रांनी युद्धबंदी रेषेचा आदर करावा व आपापल्या फौजा या रेषेच्या आपापल्या बाजूंना हटवाव्यात.*

*(३) युद्धबंदी रेषेचं पालन होत आहे की नाही यावर देखरेख ठेवणाऱ्या युनोच्या लष्करी निरीक्षक पथकाला उभय सरकारांनी पूर्ण सहकार्य द्यावं.*

*(४) या ठरावाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल सरचिटणीसांनी सुरक्षा समितीला तीन दिवसांच्या आत द्यावा.*

या ठरावानं भारताच्या भूमिकेत काही बदल झाला नाही. पाकनं घुसखोरांची जबाबदारी पत्करून त्यांना परत बोलावणं हे शांततेच्या दृष्टीनं पहिलं पाऊल राहील असं शास्त्री यांनी आधीच स्पष्ट केलं होतं. तेव्हा सुरक्षा समितीच्या ठरावाला भारताचा प्रतिसाद म्हणून याच भूमिकेचा पुनरुच्चार करावा असं शास्त्रींनी परराष्ट्रमंत्र्यांना सांगितलं.

५ सप्टेंबर १९६५ रोजी पाकिस्तानमध्ये आनंदाचं वातावरण होतं. कारण अखनूरजवळच्या जौरियनवर तथाकथित 'आझाद' व पाक फौजांनी ताबा मिळवल्याचं वृत्त पाक सरकारनं दिलं होतं. आता लवकरच पाकिस्तान अखनूर पूल काबीज करून त्याचा भारताशी संपर्क तोडील, अशी अपेक्षा होती. पाकिस्तानी नागरिक सैन्याचं अभिनंदन करणाऱ्या तारा पाठवत होते. अयूबखान यांनी अधिकारी व जवान दोघांचंही त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केलं. जौरियनवर मिळवलेला विजय हा भारतीय सैन्याला मोठाच धक्का आहे, असं वर्णन जनरल मुसा यांनी केलं. त्यांनी युद्धभूमीवर असलेल्या आपल्या फौजांना पाठवलेल्या संदेशात म्हटलं होतं, "तुम्ही त्यांच्या देहात दात घुसवले आहेत. आता ते खोलवर रोवून त्यांचा नाश होईपर्यंत लचका तोडा."

अमृतसरजवळील भारताच्या हवाई तळांवर हल्ला करण्यासाठी पाकिस्तानी विमानं घिरट्या घालू लागली. एक एफ-८६ सेबर जेट भारतीय हवाई दलाच्या तळाजवळ आलं व रॉकेट्सचा मारा करू लागलं. परंतु विमानवेधी तोफांनी त्याला पिटाळून लावलं. तिथे लष्करी दृष्ट्या फारशी हानी झाली नाही. जौरियाजवळ पाकिस्तानी फौजांशी भारतीय तुकड्यांचा जोरदार संघर्ष चालूच होता. अखनूरच्या दिशेनं चाललेल्या पाक तुकड्यांवर भारतीय हवाई दलाची विमानं मारा करीत होती. कीलर व पठाणिया यांना त्यांच्या अचाट शौर्याबद्दल राष्ट्रपतींनी वीरचक्रं बहाल केली. जौरियातील एका मशिदीवर पाक विमानानं बॉम्बफेक केल्यानं तिथे प्रार्थनेसाठी जमलेले ५० जण ठार झाले या बातमीनं देशातील लोक संतापले. देशात जागोजाग मुस्लीम संघटनांच्या सभा भरल्या व त्यांनी शास्त्रींना पाठिंबा दिला.

५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीपुढं बोलताना लालबहादुर शास्त्री ठामपणं म्हणाले : "पाकनं सतत आमच्यावर संघर्ष लादत जावं, आमच्या प्रदेशात घुसावं व आम्हाला युद्धबंदी मान्य करायला लावावं हे आता सहन करण्याच्या पलीकडे गेलं आहे. आम्ही आता हे मान्य करू शकत नाही. या प्रकाराला कायमचं रोखायला हवं."

५ सप्टेंबर रोजी मध्यरात्रीपर्यंत शास्त्री कामात गढले होते. मीही त्यांच्या कार्यालयात होतो. अनेक गोष्टींची आम्ही चर्चा केली. पण थोड्याच वेळात सुरू होणार असलेल्या लष्करी कारवाईबद्दल ते एक शब्दही बोलले नाहीत. विश्रांती घेण्यासाठी ते निवासस्थानी गेले. काही तासांनंतर जनरल चौधरी यांनी पंतप्रधानांना कळवलं की, भारतीय लष्करानं पाकिस्तानमध्ये प्रवेश केला असून या क्षणी लाहोरच्या बाहेरील भागाकडे फौजा आगेकूच करीत आहेत. आपलं हवाई दल भूदलाला संरक्षण देत असून पाकिस्तानच्या लष्करी तळावर हल्ले करीत आहे. पाकिस्तानबरोबर व्यापक युद्धाला आरंभ झाला होता.

६ सप्टेंबर रोजी दुपारी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोकसभेत निवेदन करताना असं सांगितलं :

*"आधी छुप्या रीतीनं व नंतर उघडपणं पाकिस्ताननं केलेल्या आक्रमणाची माहिती मी वेळोवेळी सदस्यांना देत आलो आहेच. सशस्त्र घुसखोरांच्या रूपानं आक्रमणाची पहिली लाट आली. तरीही पाकनं निष्पापपणाचा आव आणला. १ सप्टेंबर रोजी हा पवित्रा सोडून देऊन त्यानं जम्मू-काश्मीरमधील छांब क्षेत्रात उघड सैन्याच्या तुकड्याच पाठवल्या. मोठ्या प्रमाणावर रणगाडे सोडून व हवाई स्वाऱ्या करून हल्ला करण्यात आला. या हल्ल्यांना साहजिकच आम्हाला प्रत्युत्तर द्यावं लागलं. अडचणींवर मात करीत आमची सेना चांगली कामगिरी बजावीत आहे.*

*५ सप्टेंबर रोजी दुपारी वाघा येथील आंतरराष्ट्रीय सरहद्दीचा भंग करून पाकचं एक विमान अमृतसरनजीक आलं व त्यानं तेथील हवाई तळावर रॉकेट्सचा मारा*

*केला. विमानवेधी कारवायांनी हे विमान हुसकून लावण्यात आलं. पाकिस्तान असे हवाई हल्ले करीत आहे यावरून पंजाबवर हल्ला करण्याचा त्यांचा बेत स्पष्ट दिसत होता. तेव्हा पाकिस्तानला ही दुसरी आघाडी उघडण्यापासून रोखण्यासाठी व भारतीय सीमेचं रक्षण करण्यासाठी पंजाबमधील आमच्या फौजा सीमा ओलांडून लाहोरच्या दिशेनं कूच करीत आहेत. हवाई दलाची विमानं पाक तळावर मारा करीत आहेत. लष्करी साहित्य घेऊन जाणाऱ्या मालगाडीवर हल्ला करून तिची मुबलक हानी करण्यात आली आहे. आमची सारी विमानं सुखरूपपणं तळावर परतली आहेत.*

*या प्रसंगी सारा देश सरकारच्या पाठीशी उभा आहे हे ठाऊक असल्यानंच पाक आक्रमणाला प्रभावी प्रत्युत्तर देण्याचा निर्णय आम्ही घेतला. या बाबतीत अनेक क्षेत्रांतून पंतप्रधानांना पाठिंबा मिळाला आहे.''*

त्या दिवशी पंतप्रधानांनी ज्या ज्या बैठकीत भाषण केलं त्या त्या ठिकाणी त्यांनी केलेल्या युद्धकारवाईला संपूर्ण पाठिंबा व्यक्त करण्यात आला. त्यात स्वपक्षीय तसेच विरोधकही होते. ''शत्रूशी लढताना लोक वाटेल तो त्याग करायला तयार होतील'' असं मुस्लीम लीगचे अध्यक्ष मोहंमद इस्माइल यांनी सांगितलं, तर सर्व प्रकारच्या वादविवादांवर या काळात बंदी असावी असं द्र. मु. क. चे नेते अण्णादुराई यांनी सुचवलं. प्रत्येक विरोधी पक्षनेता राष्ट्रीयतेच्या व देशभक्तीच्या भावनेनं बोलताना पाहून शास्त्री हेलावून गेले.

लाहोर शहराच्या बाहेरच्या भागापर्यंत भारतीय सेना पोचली असून पाकिस्तानातील लष्करी तळावर भारतीय हवाई दलाची विमानं मारा करीत आहेत या बातम्यांनी साऱ्या देशात जोषाचं वातावरण पसरलं. वृत्तपत्रांच्या खास आवृत्त्या प्रकाशित झाल्या. क्षणार्धात देशात एक विलक्षण चैतन्य संचारलं.

## युद्ध आणि जगाची प्रतिक्रिया

६ सप्टेंबरला भारतीय फौजांनी लाहोरच्या दिशेनं आगेकूच केल्याचा नाट्यपूर्ण परिणाम झाला. ''अखनूर पुलाच्या दिशेनं निघालेल्या पाकिस्तानी तुकड्यांवर भारतीय फौजांनी अचूक वेळी मात केली'' असं लेफ्ट. जनरल हरबक्ष सिंग यांनी म्हटलं आहे.

भारतीय फौजांनी पश्चिम पाकिस्तानवर प्रतिहल्ला केल्यामुळं पाकिस्तानी सैन्यानं अखनूर पूल काबीज करण्याचा नाद सोडून दिला, असं जनरल मोहम्मद मुसा यांनी 'माय व्हर्शन' या आपल्या पुस्तकात म्हटलं आहे. ते लिहितात :

*''दरम्यान भारतानं ६ सप्टेंबर रोजी पाकिस्तानवर आक्रमण केलं. तेव्हापासून काश्मीरमधील कारवायांपेक्षा देशाच्या सुरक्षेला अधिक महत्त्व आलं. आझाद काश्मीरचा धोका कमी झाल्यानं व आमच्याकडची साधनं मर्यादित असल्यानं मी छांब क्षेत्रातील एक इन्फन्ट्री ब्रिगेड व आर्टिलरी सियालकोट आघाडीवर पाठवण्यासाठी काढून*

*घेतली. त्यामुळं छांब खोऱ्यातील आमची ताकद कमी झाली. स्थानिक कमांडरशी सल्लामसलत केल्यानंतर सैन्यबळ कमी करून अखनूरवरचा हल्ला पुढं ढकलण्याचं आम्ही ठरवलं. सध्याच्या परिस्थितीत स्थानिक कमांडरही हल्ला करण्यास उत्सुक नव्हताच.''*

भारत व पश्चिम पाकिस्तान यांच्या सीमेवर मोठ्या लढायांना आता तोंड लागलं होतं व व्यापक युद्धाचं वातावरण निर्माण झालं होतं. दुसऱ्या महायुद्धानंतरचा या उपखंडातील हा सर्वांत गंभीर पेचप्रसंग होता.

या युद्धाच्या बातम्यांनी जगाला हादरा बसला. भारताविरुद्धच्या युद्धात चीन सामील होणार काय? दक्षिण आशियात चीनचं महत्त्व वाढू नये म्हणून भारताच्या मदतीला जाणं भाग आहे असं अमेरिकेला वाटेल काय? आणि सोविएत रशियाचं काय? त्याच्या सीमेच्या फारच जवळ हे रणक्षेत्र होतं व त्यामुळं त्याच्याही हिताचा प्रश्न होता. तो देश तर चीनच्या साम्राज्यवादाविरुद्ध होता. राष्ट्रकुलातील दोन देशांत घनघोर संग्राम चालू असताना ब्रिटनची भूमिका काय राहणार? असे नाना प्रश्न विचारले जाऊ लागले. जगातील शक्तिमान राष्ट्रांनी याला आळा घालण्याचे प्रयत्न केले नाहीत तर जागतिक शांतता धोक्यात येईल, असाही सूर उमटू लागला होता.

चीन वगळता दुसऱ्या कोणत्याही देशाला भारत-पाक युद्ध चालू राहावं असं वाटत नव्हतं. सुरक्षा समितीच्या सदस्यांची आपापसात अनौपचारिक चर्चा झाली, तेव्हा समितीची बैठक तत्काळ बोलवावी व यातून जागतिक संघर्ष उद्‌भवता कामा नये असे स्पष्ट संकेत युद्धात गुंतलेल्या दोन्ही राष्ट्रांना द्यावे यावर सर्वांचं एकमत होतं.

युद्धबंदी करा असे तातडीचे संदेश हॅरॉल्ड विल्सन यांनी शास्त्री व अयूब यांना पाठवले. कच्छच्या रणाच्या प्रकरणात त्यांनी मध्यस्थी केली होती, तेव्हा त्यांनी या वेळीही पुढाकार घ्यावा हे साहजिकच होतं. त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं होतं :

*''पंजाबमधील भारत-पाकिस्तानातील समान आंतरराष्ट्रीय सरहद्दीपलीकडे जाऊन भारतीय फौजांनी पाकिस्तानच्या भूमीवर हल्ला चढवला. उभय देशांतील या वाढत्या संघर्षामुळं मला धक्काच बसला. ४ सप्टेंबर रोजी सुरक्षा समितीनं युद्धबंदीचा ठराव मंजूर केला होता. त्याला या हल्ल्याचा मिळालेला प्रतिसाद खेदजनक आहे.*

*अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण करण्यात आली असून त्याचे गंभीर परिणाम केवळ भारत व पाकिस्तान यांच्यावरच नव्हेत, तर साऱ्या जगाच्या शांततेवर होण्याचा संभव आहे. युद्ध हे अत्यंत भयानक व अपरिमित हानी करणारं असतं. भारत व पाकिस्तान यांच्यातील लक्षावधी अल्पसंख्याक जमातींच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. मोठ्या प्रमाणातील लढाई उभय देशांच्या आर्थिक विकासाला सर्वतोपरीनं घातक ठरेल. माझ्या देशानं उभय देशांच्या या आर्थिक विकासात खूप रस घेतला आहे, हे तुम्ही जाणताच. हा संघर्ष पसरण्याचा व त्यात अन्य देश ओढले जाण्याचाही धोका आहे.*

*सध्याच्या स्थितीला भारत जबाबदार की पाकिस्तान हे ठरवण्याचं काम माझं नाही. युद्धबंदी रेषा ओलांडून पाकिस्ताननं पाठवलेल्या सशस्त्र घुसखोरांबद्दल आमचं मत आम्ही सुरक्षा समितीत मांडलं आहे. परंतु नंतर टप्प्याटप्प्यानं वाढत गेलेल्या संघर्षाची जबाबदारी दोन्ही देशांवर येऊन पडते. लाहोर भागात आज करण्यात आलेल्या हल्ल्यामुळं पूर्णतः नवीच स्थिती निर्माण झाली आहे.''*

संदेशाच्या शेवटी त्यांनी म्हटलं होतं :

*''इतक्या उशिरा देखील अनौपचारिक तोडग्याला तुम्ही तयार व्हावं असं आवाहन मी करीत आहे. पाकिस्तान राजी झाला तर भारताच्या व पाकच्या फौजांनी तत्काळ लढाई थांबवावी. त्यामुळं वाटाघाटींना वेळ मिळून औपचारिक युद्धबंदी करता येईल. उभय देशांच्या फौजा आपापल्या प्रदेशात जातील, तसंच युनोच्या सरचिटणीसांच्या सहकार्यानं युद्धबंदी रेषा निश्चित करता येईल. असंच आवाहन मी राष्ट्राध्यक्ष अयूब यांना करीत आहे.''*

विल्सन यांच्या या संदेशामुळं शास्त्री बुचकळ्यात पडले. भारताच्या राजकीय वर्तुळात संतापाचे सूर उमटले. या नव्या स्थितीला विल्सन यांनी भारताला का जबाबदार धरावं हे उमजेना. पाकिस्ताननं आधी आक्रमण केलं या बाबीकडे त्यांनी दुर्लक्ष का करावं? पाकनं रणगाडे घेऊन काश्मीरवर आक्रमण केलं आणि अखनूर पुलाच्या जवळ जाऊन ते पोचले होते, हे त्यांच्या लक्षात का आलं नाही? प्रतिहल्ला करण्याखेरीज भारताकडे दुसरा लष्करी पर्याय नव्हता हे त्यांना समजत नाही काय? भारताबद्दल विल्सन यांच्या मनात काही पूर्वग्रह होता असंही मला वाटत नाही. विल्सन यांनी नंतर जी निवेदनं केली ती पाहता त्यांनी असा संदेश का पाठविला याचा उलगडा हळूहळू झाला. त्या वेळी या हल्ल्याबद्दल जी माहिती उपलब्ध झाली त्याआधारे आपण हा संदेश धाडला असं विल्सन यांनी स्पष्ट केलं. ६ सप्टेंबर रोजी सकाळी पाकिस्ताननं जे निवेदन काढलं त्याचा आधार त्यांनी घेतला असावा. पाकिस्तानचं ते निवेदन असं होतं :

*सीजीएस पाकिस्तान कमांड : ०६०५००*

*सप्टेंबर १९६५– भारतीय तुकड्यांनी पश्चिम पाकिस्तान सरहद्दीच्या पलीकडे हल्ला केला. अंदाजे संख्याबळ चार डिव्हिजन्स वगळता सर्व भारतीय सैन्य.*

खरं पाहिलं तर भारतीय सैन्याचा मोठा भाग भारत-चीन सीमेच्या रक्षणासाठी तिकडे ठेवलेला होता, आणि पश्चिम सीमेवर त्याचा छोटाच भाग गुंतलेला होता. पण त्या वेळी तत्काळ लढाई थांबवणं आवश्यक असल्यानं घाईघाईनं व तपशिलाची फारशी शहनिशा न करताच विल्सन यांनी हा कडक संदेश पाठवला होता. अयूबनाही त्यांनी तसाच संदेश धाडला.

विल्सन यांनी आपल्या संदेशात भारतानं पश्चिम पाकिस्तानमध्ये केलेल्या हल्ल्याचा

केवळ उल्लेख होता. म्हणून १ सप्टेंबर १९६५ रोजी छांब क्षेत्रात पाकिस्ताननं हल्ला करून जी धोकादायक स्थिती निर्माण केली, त्याबाबत तुम्ही तुमच्याच लष्करी सल्लागारांशी सल्लामसलत करा, असं शास्त्री यांनी विल्सनना पाठवलेल्या उत्तरात सुचवलं होतं.

राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी उभय राष्ट्रांना संदेश न पाठवता युद्धबंदीसाठी सुरक्षा समितीमार्फत प्रयत्न करण्याचं ठरवलं. युनोमधील आपले प्रतिनिधी गोल्डबर्ग यांच्याशी ते सतत संपर्क साधून होते. व्हिएतनाममधील परिस्थिती हाताळण्यात जॉन्सन गुंतलेले होते व भारत-पाक युद्धात चीन हस्तक्षेप करण्याचा धोका त्यांना वाटत होता. परंतु त्यांनी विल्सन यांच्यासारखी संदेश पाठविण्याची घाई केली नाही. तत्काळ युद्धबंदी व्हावी, अमेरिकन शस्त्रास्त्रांच्या वापराला व चीनच्या हस्तक्षेपाला प्रतिबंध करावा या तीन गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत होत्या. नवी दिल्लीहून राजदूत चेस्टर बोल्स पाठवीत असलेली तपशीलवार माहिती व युनोकडून ताज्या घडामोडींबद्दल दिली जाणारी माहिती यामुळे जॉन्सन यांना स्थितीची योग्य कल्पना येत होती.

४ सप्टेंबर रोजी सुरक्षा समितीत काश्मीरवरचा पहिला ठराव संमत होत होता, त्याच वेळी सोविएत युनियनचे प्रमुख कोसिजिन यांनी शास्त्री व अयूब यांना एक तपशीलवार पत्र पाठवलं. तत्काळ युद्धबंदी करावी व १९४९ मधील युद्धबंदी रेषेच्या पलीकडे जी स्थिती होती त्यानुसार उभय देशांनी आपली सैन्यं मागं घ्यावीत, असं आवाहन त्यांनी केलं होतं. भारत व पाकिस्तान यांना आपली मदत उपयुक्त वाटत असेल तर भावी वाटाघाटींत पुढाकार घेण्याचीही इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. अमेरिकेचं वा चीनचं दक्षिण आशियातील स्थान बळकट होऊ नये असं सोविएत युनियनला वाटत होतं हे उघड आहे. १९६२ मध्ये चिनी आक्रमणाच्या वेळी भारताशी दृढ मैत्री असूनही सोविएत युनियननं भारताला काहीही मदत केली नव्हती. कारण त्या वेळी चीनशी सोविएत युनियनचे संबंध पूर्णतः तुटलेले नव्हते. आता मात्र परिस्थितीत फरक पडला होता. भारत हे मित्रराष्ट्र, तर चीन शत्रुराष्ट्र बनलं होतं. तरीही कम्युनिस्ट चीनच्या विरुद्ध बिगरकम्युनिस्ट भारताला मदत करणं सोविएत युनियनला अडचणींचं होतं. तशी पाळी आपल्यावर यावी अशी सोविएत युनियनची इच्छा नव्हती.

६ सप्टेंबर १९६५ रोजी सुरक्षा समितीची बैठक भरली, तेव्हा जागतिक राजकारणाच्या सारिपाटावरील स्थिती ही अशी होती. क्षितिजावर जागतिक संघर्षाची चिन्हं दिसत होती.

सी. एस. झा ५ सप्टेंबरला दुपारी न्यूयॉर्कला पोचले. आपल्याला एवढ्या घाईघाईनं का पाठवण्यात आलं हे त्यांना अद्याप उमजलं नव्हतं. लाहोरच्या दिशेनं भारतीय सैन्यांनी आगेकूच केल्याचं वृत्त आलं. न्यूयॉर्कच्या वेळेनुसार दुपारी तीन वाजता सुरक्षा समितीची बैठक भरविण्याचं ठरलं. झा यांनी समितीच्या सदस्यांशी सकाळी अनौपचारिक चर्चा केली आणि हा हल्ला करण्याची पाळी भारतावर का आली हे विशद केलं. अमेरिकेचे ॲडले स्टीव्हन्सन, ब्रिटनचे सर पॅट्रिक डीन, सोविएत युनियनचे फेडरेंको, मलेशियाचे रमाणी, जॉर्डनचे अब्दुल मोनीम रिफाई व

आयव्हरी कोस्टचे असेंने उशर यांच्या भेटीगाठी त्यांनी घेतल्या. झा पूर्वी युनोत असल्यानं त्यांचा बहुतेकांशी परिचय होता. छांब भागात पाकनं लष्करी कारवाई केल्यामळं बचावात्मक पाऊल म्हणून भारताला कृती करावी लागली, हा घटनाक्रम लक्षात घ्यावा यावर झा यांनी आपल्या चर्चेत भर दिला. याच आशयाचा निरोप त्यांनी सरचिटणीस ऊ थांट व उपसरचिटणीस राल्फ जे. बूंच यांना दिला.

मुळात सुरक्षा समितीची बैठक दुपारी तीन वाजता भरणार होती. पण अनौपचारिक सल्लामसलत चालू असल्यानं काही तास ती पुढं ढकलण्यात आली. दरम्यान सुरक्षा समितीच्या सदस्यांचा पाठिंबा असलेल्या ठरावाचा मसुदा सोविएत युनियनचे युनोतील कायमचे प्रतिनिधी राजदूत पी. मोरोझोव्ह यांनी सी. एस. झा व जी. पार्थसारथी यांना दाखवला. भारताच्या दृष्टीनं ठरावाचा हा मसुदा अत्यंत असमाधानकारक होता. दोन महत्त्वाच्या बाबींबाबत त्यात दुरुस्ती करणं आवश्यक होतं. झा यांनी आपलं मुत्सद्देगिरीचं कौशल्य वापरून वेळेच्या आत त्यात सुधारणा करून घेतली. त्याबद्दलचा तपशील देताना 'फ्रॉम बांडुंग टु ताश्कंद' या आपल्या ग्रंथात झा म्हणतात :

*"४ सप्टेंबर रोजी मंजूर करण्यात आलेल्या ठरावाला नेमकेपणा देण्याचा प्रयत्न ६ सप्टेंबरच्या संकल्पित ठरावाच्या मसुद्यात होता. परंतु ४ सप्टेंबरच्या ठरावात युद्धबंदी करावी व उभय राष्ट्रांनी फौजा मागं घ्याव्या एवढीच मागणी केलेली होती. नव्या ठरावाच्या मसुद्यात मात्र 'आंतरराष्ट्रीय सरहद्द ओलांडल्याबद्दल खेद व्यक्त करीत आहोत' असं एक वरवर निरुपद्रवी वाटणारं वाक्य होतं. परंतु सरहद्दीचा भंग कोणी, कोठे, केव्हा केला हे मात्र नमूद केलेलं नव्हतं. तसंच १ सप्टेंबरपूर्वी फौजा जिथे होत्या तिथे त्या नेण्यात याव्यात असंही मसुद्यात म्हटलं होतं. ठरावातील या खोडसाळ मजकुराकडे मी मोरोझोव्ह यांचं लक्ष वेधलं. ४ सप्टेंबरच्या ठरावात सरहद्द भंग केल्याबद्दल खेद व्यक्त केला नव्हता, याचा अर्थ ५ ऑगस्टला युद्धबंदी रेषेचा व १ सप्टेंबरला जम्मू-काश्मीर व पाक यांमधील आंतरराष्ट्रीय सरहद्दीचा भंग करण्याची पाकिस्तानी कृती खेदजनक नसून त्याला माफी दिली तरी चालते. मात्र ६ सप्टेंबरच्या ठरावात 'खेदजनक बाब' असं नमूद करण्यात येतं; याचा अर्थ भारतीय फौजांनी लाहोरच्या दिशेनं आगेकूच करणं हे आक्रमण असल्याचं सूचित करण्यासारखंच आहे. भारत सरकार हे कधीच मान्य करणार नाही, असं मी मोरोझोव्हना स्पष्टपणं सांगितलं. तसंच १ सप्टेंबर रोजी ज्या जागेवर सेना होत्या तिथे त्या हटवाव्यात असं म्हणणं याचा अर्थ १ सप्टेंबरपूर्वी काही घडलंच नाही हे पाकचं म्हणणं मान्य करण्यासारखं आहे व ५ ऑगस्ट १९६५ पासून पाक सैन्य मोठ्या प्रमाणावर युद्धबंदी रेषेचा भंग करून घुसखोर पाठवीत आहे या भारताच्या आरोपाचा इन्कार करण्यासारखं आहे, याकडेही मी त्यांचं लक्ष वेधलं. मोरोझोव्ह यांनी सुरक्षा समितीच्या सदस्यांशी बोलताना ठरावाच्या मसुद्याला आपला आक्षेप नाही, असं सूचित केलं होतं असं दिसतं. ५ ऑगस्टपूर्वी फौजा ज्या जागी होत्या तेथे त्या हटवल्या पाहिजेत यावर मोरोझोव्ह यांच्याशी*

*बोलताना मी भर दिला. मसुद्यातील विषम दृष्टिकोनामुळे मी इतका बेचैन झालो की हा ठराव आहे तसाच जर चर्चेला आला तर मला बैठकीतून निघून जाणं भाग पडेल असंही मी सांगितलं. माझ्या या इशाऱ्यानं मोरोझोव्ह हादरले. खरंच तुम्ही या टोकाला जाल काय, असं त्यांनी विचारलं, तेव्हा मी स्पष्ट शब्दांत होकारार्थी उत्तर दिलं व माझ्या या कृतीला माझ्या सरकारचा पाठिंबा राहील असंही सांगितलं. भारताचे आक्षेप साधार असून त्या दृष्टीनं या मसुद्याकडे मी पाहिलं नव्हतं, हे मोरोझोव्ह यांनी मान्य केलं. सध्याच्या स्थितीतील ठरावाला आपला विरोध राहील असं ठरावाच्या प्रायोजकांना आपण सांगू असंही ते म्हणाले.*

*पार्थसारथी आणि मी सुटकेचा निःश्वास टाकला. सुरक्षा समितीच्या सदस्यांना मोरोझोव्ह भेटले व हा ठराव आहे तसाच मांडला तर आपण त्याला विरोध करू हे त्यांनी स्पष्ट केलं. अखेर भारतानं सरहद्द भंग केल्याबद्दलचा 'खेदजनक उल्लेख' वगळण्यात आला व ५ ऑगस्टपूर्वी फौजा जिथे होत्या तिथे परत न्याव्यात अशी सुधारणा करून ठराव मांडण्यात आला. याचा अर्थ जम्मू व काश्मीर यांच्यामध्ये ५ ऑगस्ट व त्यानंतर घुसखोर पाठवून पाकनं युद्धबंदी रेषेचा भंग केला, हे अप्रत्यक्षपणे मान्य करण्यात आलं.*

सुरक्षा मंडळाचे सदस्य असलेल्या मलेशियाचे राजदूत रमाणी यांनी या प्रकरणी भारताला खूप मदत केली.

चर्चेच्या वेळी पाकिस्तानचे राजदूत अमजद अली यांनी टीकेचा भडिमार केला. तो साहजिकच होता. झा यांनी संयमानं व शालीनतेनं भारताचं समर्थन केलं. अखेर पुढील ठराव सुरक्षा मंडळानं एकमतानं मंजूर केला :

*वाढत्या संघर्षाबाबत तीव्र चिंता व्यक्त करून सुरक्षा मंडळ असं आवाहन करीत आहे की,*

*(१) संघर्ष क्षेत्रातील लढाईची सर्व कारवाई दोन्ही पक्षांनी तत्काळ थांबवावी व ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी ज्या जागी आपली सेना होती तिथे ती ताबडतोब परत न्यावी.*

*(२) ४ सप्टेंबरचा व आजचा ठराव अमलात आणण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न सरचिटणीसांनी करावेत. युनोचं लष्करी निरीक्षण पथक बळकट करण्यासाठी पावलं उचलावीत, तसंच संबंधित क्षेत्रातील स्थितीची व ठरावाच्या अंमलबजावणीची सुरक्षा समितीला माहिती द्यावी.*

*(३) सदर क्षेत्रात शांतता व सुरक्षितता नांदावी यासाठी पुढं कोणती पावलं उचलण्याची गरज आहे हे ठरवण्याच्या दृष्टीनं सुरक्षा मंडळ या प्रश्नाचा तातडीनं आणि सातत्यानं आढावा घेत राहील.*

हा ठराव म्हणजे भारताच्या दृष्टीनं राजकीय मुत्सद्देगिरीचा विजय होता. तो मंजूर

करून एक प्रकारे पाकिस्तान हा आक्रमक आहे असंच सुरक्षा समितीनं म्हटलं होतं. पाकिस्तान आपल्या विपर्यस्त प्रचारानं आता जगाची दिशाभूल करू शकत नव्हतं. तसंच 'भारतीय आक्रमणा'पासून बचाव करण्यासाठी पाकिस्तान आपल्या दोस्तांकडून लष्करी मदत मागू शकत नव्हता. ठराव व सुरक्षा समितीतील कामकाज यांतून भारतावर पाकिस्ताननं हल्ला केला, हे स्पष्ट होत होतं. महत्त्वाची गोष्ट म्हणजे यामुळे सुरक्षा मंडळात पाकच्या विश्वासार्हतेला तडा गेला होता.

सुरक्षा मंडळाच्या इच्छेनुसार आपण ७ सप्टेंबरला रावळपिंडी व नवी दिल्ली येथे जात आहोत असं ऊ थांट यांनी जाहीर केलं.

७ सप्टेंबरच्या पाश्चात्य वृत्तपत्रांत भारतानं पाकवर हल्ला केल्याचं वृत्त पहिल्या पृष्ठावर झळकलं होतं! काही वृत्तपत्रांच्या दिल्लीतील प्रतिनिधींनी पाठवलेल्या बातम्यांत पाकिस्तानी सैन्याच्या कारवायांमळं अखनूर भागात भारताची परिस्थिती कशी धोकादायक बनली होती याचा तपशील दिला होता. इतरांनी या बाबीकडे दुर्लक्ष करून भारतानंच पाकवर आक्रमण केलं असा आरोप केला होता.

६ सप्टेंबरपासून लाहोर व सियालकोट भागात घनघोर संग्राम सुरू होता. बहुतेक राष्ट्रप्रमुखांचा दबाव येत असूनही शास्त्री आपल्या भूमिकेवर खंबीर राहिले. ७ सप्टेंबर रोजी त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांना व इतर बऱ्याच देशांच्या प्रमुखांना पत्रं पाठवून भारताची भूमिका तपशीलवार विशद केली. ५ ऑगस्ट १९६५ पासून पाकनं काश्मीरमध्ये कसे घुसखोर घुसवायला आरंभ केला, त्यांनी युद्धबंदी रेषेचं- आंतरराष्ट्रीय सरहद्दीचं कसं उल्लंघन केलं, त्यांनी आधी खोड कशी काढली, आक्रमण कसं केलं व भारताला स्वतःच्या सीमारेषेचं रक्षण करण्यासाठी बचावाची कृती म्हणून कशी कारवाई करावी लागली हा सारा घटनाक्रम त्यांनी या पत्रात दिला होता. भारतानंच उघड उघड आक्रमण केलं आहे या पाकिस्तानच्या दिशाभूल करणाऱ्या प्रचाराला या पत्रानं नामोहरम केलं.

याच सुमाराला अयूबखान यांनी अमेरिकेकडे मदतीची याचना केली. त्याबाबतचं अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याचं टिपण असं होतं :

*''राजदूत मॅक्कॉनघी यांना राष्ट्राध्यक्ष अयूब यांनी भारतीय हल्ल्याची अधिकृत माहिती दिली. १९५९ साली अमेरिका व पाकिस्तान यांच्यात झालेल्या करारानुसार भारतानं त्यांचा भूप्रदेश खाली करावा म्हणून अमेरिकेनं तत्काळ कारवाई करावी, अशी अयूब यांची मागणी होती. काश्मीरमधील घुसखोरीतील आपला हात व 'मॅप' उपकरणाचा वापर त्यांनी मान्य केला, असं असूनही अमेरिकेचा पाठिंबा मिळणार की नाही अशी विचारणा त्यांनी केली. अमेरिकेला या घडामोडीबद्दल अत्यंत चिंता वाटत आहे आणि चीन यात उतरण्याचा धोका आहे, असं सरकारमधील सर्वोच्च पातळीवर कळवावं अशा सूचना परराष्ट्रमंत्र्यांनी दिल्ली व कराची येथील आपल्या दूतावासांना दिल्या. अयूब यांनी केलेल्या आवाहनाच्या उत्तरादाखल*

*परराष्ट्रमंत्र्यांनी असं सांगितलं की, युनोच्या कृतीला बिनशर्त पाठिंबा देणं हे आमचं प्रथम उद्दिष्ट आहे. हा पेचप्रसंग पाकनं ओढवून आणला आहे, याची नोंदही परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनी घेतली.''*

इराणचे शहा व तुर्कस्तानचे अध्यक्ष यांच्याकडेही खास मदतीची याचना पाकिस्ताननं केली. दोन्ही देशांना अनुकूल प्रतिसाद देण्याची इच्छा होती, परंतु त्यांच्याकडे अमेरिकेची 'मॅप' उपकरणं होती व त्यामुळं अमेरिकेची संमती न घेता ती पाकिस्तानला देणं शक्य नव्हतं. तुर्कस्तानच्या वॉशिंग्टन येथील राजदूतांनी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातील राजदूत टाल्बोट यांची १० सप्टेंबरला भेट घेऊन भारत-पाक संघर्षाबाबत चर्चा केली. त्या भेटीचा अहवाल पाहिला तर अमेरिकेची शस्त्रास्त्रं तुर्कस्ताननं पाकिस्तानला पाठविण्यास अमेरिकेनं ठामपणं नकार दिला, असं दिसतं.

या आघाडीवर अयूब यांच्या प्रयत्नांना खीळ बसली. लिंडन जॉन्सन यांनी अयूबना ४ सप्टेंबर रोजी पाठवलेल्या पत्रात म्हटलं होतं :

*"युद्धबंदी रेषेवरील स्थिती मूळपदावर आणून हा वाद संपुष्टात येणार नाही याची मला जाणीव आहे. काश्मीरबद्दल तुमच्या जनतेच्या तीव्र भावना मी जाणतो. परंतु बळाचा वापर करून वा कोणीही एकतर्फी कारवाई करून या कठीण प्रश्नावर खरा तोडगा निघणार नाही याबद्दल माझी खात्री झाली आहे. वादातील तथ्यातथ्य काहीही असो, शांततामय मार्गाखेरीज हा प्रश्न सुटणार नाही. तुम्ही व भारतानं सारासार विचार करून हा व इतर विवाद्य प्रश्न सन्मानानं व परस्परांना उपयुक्त ठरतील अशा प्रकारे सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. दोन्ही देशांतील सदिच्छानिष्ठ लोकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला पाहिजे. त्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना प्रोत्साहन व पाठिंबा देणं हे माझ्या देशाचं धोरण राहील.''*

पाकनं इराणला केलेल्या आवाहनाचा विचार करण्यासाठी ११ सप्टेंबर रोजी तेहरानमध्ये एक उच्चस्तरीय बैठक झाली. खुद्द शहांनी बोलावलेल्या या बैठकीस अमेरिकेचे राजदूत व ब्रिटनचे चार्ज द अफेअर्स हजर होते. इराणच्या शहांना साहाय्य करण्यासाठी इराणचे पंतप्रधान होवेदा व हंगामी परराष्ट्रमंत्री मिफेंडेस्की हे हजर होते. पाकिस्तानबरोबर आपली खरी मैत्री आहे हे दाखवण्यासाठी कराचीला एक शिष्टमंडळ धाडण्याचा आपला विचार आहे, असं शहा म्हणाले. ऊ थांट यांचे प्रयत्न असफल झाले तर पाकिस्तानला लष्करी मदत करण्याच्या दृष्टीनं शहा यांनी विचारणा केली. त्या वेळचा वृत्तांत देताना अमेरिकेचे राजदूत म्हणतात :

*'' 'मॅप' उपकरणं पाकला देण्यास आपला विरोध असल्याचा मी पुनरुच्चार केला. त्यामुळे शहा नाराज झाले. ब्रिटननं भारत व पाकिस्तान यांना शस्त्रास्त्रपुरवठा करण्याचं थांबवलं आहे, तेव्हा पाकिस्तानला जर अशा तऱ्हेनं मागील दारानं शस्त्रं मिळू लागली तर अशा उपाययोजनांना काही अर्थच राहणार नाही, असं मी*

*सांगितलं. त्यावर पाकिस्तानशी बोलणी करण्यास होवेदा यांना पाठविण्यात काही अर्थच नाही, असं कडवटपणं शहा म्हणाले. काही रायफली सोडल्या तर इराणकडची सारी शस्त्रसामग्री 'मॅप' नं पुरवलेली आहे. तेव्हा होवेदा यांच्यापाशी मदतीसाठी बोलण्यासारखं काहीच नसणार. त्यावर मी त्यांना सांगितलं की, इराण पाकिस्तानसाठी खूप काही करीत आहे व पाकिस्तानशी असलेले मित्रत्वाचे संबंध टिकवण्यासाठी आणखी काही करणंही शक्य आहे. परंतु सध्या त्याचं स्वरूप बिनलष्करी असावं. तूर्त युनोच्या सरचिटणीसांना पाठिंबा द्यावा अशी विनंती करून मी म्हणालो, डॉक्टरलाच जायबंदी करू नका...''*

पाकिस्तानला 'सीटो' (साउथ ईस्ट एशिया ट्रीटी ऑर्गनायझेशन) व 'सेंटो' (सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन) यांच्याकडून मदतीची अपेक्षा होती. कारण पाकिस्तान या दोन्ही संघटनांचा सदस्य होता. परंतु काश्मीर त्या कराराच्या कक्षेत नसल्यानं काश्मीरमधील लढाईत 'सीटो' हस्तक्षेप करणार नाही, असं या संघटनेचे सरचिटणीस जेसस व्हर्गर्स यांनी ६ सप्टेंबर रोजी बँकॉकमध्ये जाहीर केलं. तसंच 'सेंटो' कराराखाली ब्रिटन पाकिस्तानला भारताविरुद्ध मदत करणार नाही, असं राष्ट्रकुल सचिव ऑर्थर बॉटमली यांनी ७ सप्टेंबर रोजी लंडन इथे स्पष्ट केलं. राष्ट्रकुलाच्या कोणाही सदस्याविरुद्ध 'सेंटो'चा कधीच वापर करता येणार नाही, असं ते म्हणाले. पाकिस्ताननं 'सेंटो'कडे मदतीसाठी केवळ औपचारिक विनंती केली होती, असं दिसतं. परंतु भारताविरुद्ध 'सेंटो' मदत करू शकणार नाही असं सांगण्यात आलं तेव्हा त्यानं आपली विनंती मागं घेतली. भारत व पाकिस्तान यांना देण्यात येणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवण्यात आल्याचं अमेरिकेनं ८ सप्टेंबर रोजी जाहीर केलं. भारताला ब्रिटीनं पाठविली जाणारी लष्करी मदत थांबवल्याचं ब्रिटननं आधीच जाहीर केलं होतं. संघर्षानं व्यापक स्वरूप धारण करू नये म्हणून अमेरिका व ब्रिटन यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे मुख्यत्वे परराष्ट्रांकडून लष्करी मदत मिळवण्याच्या पाकच्या प्रयत्नांना यश आलं नाही. अर्थात युद्धबंदी करायला भारत व पाकिस्तान यांनी तयार व्हावं म्हणून युनोचे सरचिटणीस करीत असलेल्या प्रयत्नांना कितपत यश येतं यावर पुढील घडामोडी अवलंबून होत्या आणि अजून चीन काय करणार हा प्रश्न होताच.

चीननं वारंवार आपला पाठिंबा पाकिस्तानला जाहीर केला होता. चेन यी यांनी ४ सप्टेंबरला कराचीत तसं जाहीर केलं होतं व ९ सप्टेंबरला पेकिंगहून चौ एन लाय यांनी केलेल्या निवेदनात भारताला आक्रमक ठरवून याच्या परिणामांना भारतच जबाबदार राहील असा इशारा दिला होता. चीन आपला पाठिंबा कोणत्या स्वरूपात देणार हे काहीच स्पष्ट झालं नव्हतं. त्याबाबत पुढील शक्यता होत्या :

*(१) पाकिस्तानला पाठिंबा देणारी व भारताला दोषी ठरवणारी निवेदनं चीन सरकारनं काढीत राहणं हे अर्थात चालूच होतं.*

*(२) भारतीय फौजांनी सीमारेषेचा भंग केला अशासारखे काही बनावट आरोप*

*करून भारताला धमकावीत राहणं.*

*(३) काल्पनिक तक्रारी मांडून त्याचं निराकरण केलं नाही तर चिनी फौजा कारवाई करतील असा इशारा भारताला देत राहणं.*

*(४) भारताविरुद्ध वापरण्यासाठी पाकला शस्त्रास्त्रं पुरवणं.*

*(५) काही विशिष्ट परिस्थितीत पूर्व पाकिस्तानात युद्ध पसरावं म्हणून भारतावर चिनी फौजांनी आक्रमण करणं.*

*(६) भारताकडून काश्मीर बळजबरीनं हिसकावून घेणं पाकला शक्य व्हावं म्हणून चिनी फौजांनी भारतावर आक्रमण करून लष्करी दबाव आणणं.*

परंतु भारत-पाक युद्धात दुसऱ्या कोणाही राष्ट्रानं हस्तक्षेप करण्यास दोन्ही महासत्तांचा कडक विरोध आहे हे चीनला ठाऊक होतं. पाकच्या मैत्रीपोटी महासत्तांच्या हस्तक्षेपाचा धोका पत्करणं इष्ट नव्हतं. तरीही चिनी कोडं काही उलगडत नव्हतं. लिंडन जॉन्सन यांनाही चीनच्या हेतूंचा अंदाज घेता येत नव्हता.

युद्धाच्या संदर्भात चीनच्या संभाव्य भूमिकेबाबत लालबहादुर शास्त्री यांना जाणीव असल्यानं त्यांनी विचारपूर्वक पुढील धोरण ठरवलं होतं :

(१) आक्रमण परतवून लावण्यासाठी अत्यावश्यक असल्याशिवाय पूर्व पाकिस्तानमध्ये भारतीय फौजा व हवाई दल यांनी काहीही कारवाई करायची नाही. भारताला चिथावणी मिळावी म्हणून पाकिस्तान प्रयत्न करील, परंतु भारतानं संयम राखावा व अपरिहार्य असेल तरच प्रत्युत्तर द्यावं. संघर्षात हस्तक्षेप करण्यासाठी चीनला कोणतीही सबब मिळणार नाही याची दक्षता घ्यावी.

(२) चीनला तणाव निर्माण करायची संधी मिळेल, असं भारत-चीन सीमेवर काही घडू नये म्हणून अत्यंत काळजी घेणं.

(३) पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या चीनच्या नेहमीच्या वृत्तपत्रीय निवेदनांना अधिकृत रीत्या काहीही प्रतिसाद न देणं.

(४) काही तरी खुसपट काढून या ना त्या सबबीखाली चीननं 'निषेध नोंदवणारं' पत्र पाठवलं तर त्याला उत्तर देताना अत्यंत दक्षता व सावधानता बाळगणं. भारताचं उत्तर स्पष्ट व ठाम असावं, परंतु ते 'प्रक्षोभक' आहे असं म्हणण्याची चीनला संधी मिळता नये.

(५) एवढी सर्व काळजी घेऊनही चीननं लष्करी हल्ला करून आक्रमक हस्तक्षेप केलाच तर भारताला प्रत्युत्तर द्यावंच लागेल. परंतु तोपर्यंत भारताच्या स्थितीची जगाला जाणीव झालेली असेल.

पश्चिम बंगालमधील कलाईकुंडा इथे ७ सप्टेंबर रोजी पाकिस्ताननं हवाई हल्ला केला, तसंच आसाममधील गोहत्ती व शिलाँग यांच्या दरम्यान छत्रीधारी सैनिक उतरवले. त्यामुळं काहीशी अडचणीची स्थिती उद्‌भवली होती. एअर चीफ मार्शल अर्जुनसिंग साहजिकच अस्वस्थ झाले. प्रत्युत्तरादाखल हल्ले करण्याची परवानगी

मागण्यासाठी त्यांनी शास्त्रींची भेट घेतली. त्यांचं म्हणणं पंतप्रधानांनी शांतपणं ऐकून घेतलं. आणि सांगितलं, "तुमच्या भावना मी समजू शकतो, परंतु जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन भारताच्या हिताच्या दृष्टीनं संयम पाळायला हवा. त्यामुळं युद्ध हे पश्चिम क्षेत्रापुरतंच मर्यादित ठेवायला पाहिजे. चीनपासून दूर राहायला हवं. त्यातून पश्चिम बंगाल व पूर्व पाकिस्तान हे भरपूर लोकसंख्येचे भाग असल्यानं उभयपक्षी मोठी जीवितहानी होण्याचा संभव आहे..." हवाई हल्ला करण्यासाठी परवानगी मागायला आलेले अर्जुनसिंग चहा घेऊन बाहेर पडले, तेव्हा शास्त्रींचं म्हणणं त्यांना पूर्णतः पटलं होतं. पूर्व पाकिस्तानात युद्ध पसरण्याचा धोका उद्भवल्यामुळं अमेरिकाही चिंतित झाली होती. परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनी भारतातील राजदूत चेस्टर बोल्स यांना ८ सप्टेंबर रोजी पुढील संदेश पाठवला :

**परराष्ट्रमंत्र्यांचा राजदूतांना वैयक्तिक संदेश**

*"भारत-पाक युद्ध हे बंगाल-पूर्व पाकिस्तान इकडे पसरू नये म्हणून आपण तातडीनं उपाययोजना करणं आवश्यक आहे. मोठ्या लोकवस्तीच्या भागात युद्ध पसरलं तर बरीच प्राणहानी होईल, म्हणून ते टाळायला हवं हे एक कारण आहेच. दुसरं म्हणजे पश्चिम सीमेवरील संघर्षात युद्धबंदी घडवून आणून फौजा हटविण्याचा मार्ग निघण्याची अद्याप शक्यता आहे. तेव्हा पूर्व उपखंडातही जर लढाईला तोंड लागलं तर ते तापदायक होईल व चीनच्या हस्तक्षेपाची शक्यता वाढेल. पूर्व पाकिस्तानात गुंतून पडण्यापेक्षा चीनच्या हल्ल्याचा संभाव्य धोका लक्षात घेऊन पूर्व आघाडीवर लढण्यासाठी आपली ताकद जपून ठेवावी हे भारतीयांना समजू शकेल..."*

भारतानं ह्याला अनुकूल प्रतिसाद दिला तर या संबंधात पाकिस्तानचीही समजूत घालून पूर्वेकडे शांतता राखण्याचा प्रयत्न अमेरिकन सरकार करील अशा आशयाचं हे पत्र होतं. या पत्रानुसार चेस्टर बोल्स यांनी शास्त्रींची भेट घेतली, तेव्हा पूर्व भागात युद्ध पसरू न देण्याचा पंतप्रधानांनी आधीच निर्णय घेतला आहे हे ऐकून त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्याचबरोबर कलाकुंडा व बराकपोर येथे बॉम्बहल्ले करण्यासारखे चिथावणीखोर प्रयत्न पाकिस्तान थांबवील अशी आशाही शास्त्रींनी व्यक्त केली होती.

८ सप्टेंबर व त्यानंतरचे काही दिवस शास्त्रींनी बऱ्याच राजदूतांच्या भेटी घेऊन भारताची भूमिका त्यांना समजावून दिली. युनोचे सरचिटणीस ऊ थांट हे १२ सप्टेंबरला दिल्लीला यायचे होते. शास्त्री त्यांचीच वाट पाहत होते.

□□



।। चौदा ।।

# आले ऊ थांट

सुरक्षा समितीनं ६ सप्टेंबर रोजी मंजूर केलेल्या ठरावाचा पाठपुरावा करण्यासाठी ऊ थांट यांनी भारताला व पाकिस्तानला तातडीने भेट देण्याचं ठरविलं. ७ नोव्हेंबरला ते न्यूयॉर्कहून रावळपिंडीला निघाले. विमानतळावर भुत्तो यांनी त्यांचं स्वागत केलं. या भेटीत प्रथम भुत्तो यांच्याशी त्यांनी सुमारे ७० मिनिटं चर्चा केली. नंतर रात्री अयूबखान यांच्याशी आणखी ९० मिनिटं चर्चा झाली. काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याचं भारतानं मान्य करावं, तरच युद्धबंदी करार होईल, असं अयूब यांनी या वेळी ऊ थांट यांना सांगितल्याचं 'द डॉन' या वृत्तपत्रानं ११ सप्टेंबरच्या अंकात म्हटलं होतं.

भुत्तो यांनी भारताविरुद्धचा नेहमीचाच पाढा वाचला. "भारताच्या सत्तेखाली दबलेल्या काश्मिरी जनतेनं उठाव केला आहे, तथाकथित घुसखोर हे तेथील 'भूमिपुत्र' असून भारताच्या साम्राज्यवादाविरुद्ध अखेरचा तडाखा देण्याचा व त्यासाठी वाटेल तो त्याग करायचा त्यांचा निर्धार आहे..." असं भुत्तो म्हणाले, असंही एका अधिकृत प्रवक्त्यानं सांगितलं. एका बाजूला ६ सप्टेंबर रोजी अयूब यांनी पाकनं घुसखोरांना युद्धविराम रेषेच्या पलीकडे पाठवलं, असं जॉन्सनना अमेरिकन राजदूतामार्फत कळवलं होतं. परंतु भुत्तो मात्र ९/१० सप्टेंबर रोजी हे घुसखोर म्हणजे 'स्थानिक स्वातंत्र्यसैनिक' असून पाकला त्यांच्याशी काही देणंघेणं नाही, असं सरचिटणीसांना सांगत होते!

युनोच्या सुरक्षा समितीनं ६ सप्टेंबर रोजी केलेल्या ठरावातील शर्तीनुसार युद्धबंदी करायला आपण तयार नाही, असं पाकनं स्पष्ट केलं. त्यानंतर सरचिटणीस ऊ थांट

यांनी ११ सप्टेंबरला रावळपिंडी सोडलं व कराची, मुंबई मार्गे ते दिल्लीला पोचले.

ऊ थांट यांनी रावळपिंडीत दोन दिवस घालवले, त्या वेळी युद्ध आघाडीवर महत्त्वपूर्ण घटना घडत होत्या. लाहोर विभागातील खेमकरण इथे पाक फौजांनी मोठा प्रतिहल्ला केला. त्यांनी बलशाली रणगाडादल लढाईत आणलं. एक पायदळ तुकडी मदतीला होतीच. त्या वेळी आपण आता भारतीय फळी फोडून काढू व अमृतसर तर आमच्या दृष्टिपथातच आहे, असं अयूब व भुत्तो यांना त्या दिवशी (९ सप्टेंबर) वाटत होतं.

प्रत्यक्षात १२ सप्टेंबर रोजी ऊ थांट दिल्लीला पोचले, तोवर दोन ठिकाणी भारतीय सैन्यानं पाकला धूळ चारली होती. खेमकरणनजीक 'असल उत्तर' इथे पाकिस्तानच्या रणगाडा तुकडीची मोठी हानी केली होती, तर सियालकोट भागातील फिलोरा इथे भारतीय सेनेकडे तुलनेनं कमी प्रतीची शस्त्रास्त्रं असूनही त्यांनी चांगलेच तडाखे देऊन बऱ्याच रणगाड्यांचा विध्वंस केला होता. पाकिस्तानच्या तुकड्यांना अशा प्रकारे पंगू बनवून त्यांना निकामी करण्यात आलं, असं जनरल चौधरी व एअरमार्शल अर्जुनसिंग यांनी सांगितलं. पाकिस्तानी सैन्याचं चढाई करण्याचं सामर्थ्यच पांगळं करण्याचं शास्त्रींचं उद्दिष्ट एक प्रकारे साध्य झालं. सियालकोट विभागात अजूनही संघर्ष चालू असला तरी आता त्याच्या फलश्रुतीबद्दल शंका राहिली नव्हती.

ऊ थांट यांचं परराष्ट्र मंत्री स्वर्णसिंग यांनी विमानतळावर स्वागत केलं. ब्रह्मदेशचे राजदूत, तसेच जनरल रॉबर्ट निप्पो हेही विमानतळावर हजर होते. ऊ थांट यांची राष्ट्रपती भवनात उतरण्याची सोय केली होती. दुपारी पंतप्रधानांच्या निवासस्थानी त्यांनी शास्त्रींबरोबर चर्चा केली, त्या वेळी अन्य कोणीही उपस्थित नव्हतं.

शास्त्री व ऊ थांट यांची ही चर्चा खेळीमेळीची झाली. सुरक्षा समितीनं मंजूर केलेल्या ठरावाचं प्राथमिक श्रेय सरचिटणीसांच्या अहवालाला जातं, हे शास्त्रींनी कृतज्ञतापूर्वक नमूद केलं. ऊ थांट यांनी अयूब व भुत्तो यांच्याशी झालेल्या चर्चेचा गोषवारा त्यांना सांगितला. भारत व पाकिस्तान यांनी फौजा काढून घेतल्यावर तिथं शांततेसाठी आफ्रो-आशियन फौजा ठेवण्यात येतील व काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यात येईल, असा भारतानं करार केला तरच युद्धबंदी शक्य आहे असं पाकिस्तानचं म्हणणं होतं. हा संघर्ष जागतिक स्वरूप धारण करण्याचा धोका आहे यावर ऊ थांट यांनी भर दिला. सुरक्षा समितीचे ठराव स्वीकारून बिनशर्त युद्धबंदीला मान्यता द्यावी, अशी विनंती त्यांनी शास्त्रींना केली.

शास्त्रींनी संघर्ष कसा सुरू झाला याचा तपशील दिला. विशेषतः काश्मीरमध्ये कसं नियोजनबद्ध आक्रमण पाकनं केलं याकडे त्यांनी ऊ थांट यांचं लक्ष वेधलं. पाकिस्तानची भूमी बळकावण्याची भारताची लालसा नसून स्वतःच्या प्रदेशाचं रक्षण करण्याची इच्छा आहे; तेव्हा युद्ध लांबवण्यात भारताला काहीही स्वारस्य नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. परंतु जोवर पाकिस्तान हा आक्रमक आहे हे स्पष्टपणे नमूद केलं जात नाही तोवर युद्धबंदीला काहीच अर्थ नाही. सरचिटणीसांच्या अहवालाच्या आधारे

हे करता येईल. भारताविरुद्ध पाकिस्तान पुन्हा उघड वा छुपं आक्रमण करणार नाही, अशी खात्रीलायक हमी पाकिस्ताननं दिली पाहिजे. सार्वमताचा तर प्रश्नच नाही, आणि भारतातील अंतर्गत परिस्थितीत ढवळाढवळही चालणार नाही, असं शास्त्रींनी ठामपणं सांगितलं.

राष्ट्रपती भवनात परतताच ऊ थांट यांनी त्याच दिवशी सायंकाळी अयूब व शास्त्री यांना सारखाच संदेश पाठवला. शास्त्रींना रात्री ८.३० वाजता मिळालेल्या या संदेशाच्या अखेरीस म्हटलं होतं :

*"गेल्या काही दिवसांत माझी रावळपिंडीत व दिल्लीत मनमोकळी व उपयुक्त चर्चा झाली. येत्या १४ सप्टेंबर १९६५ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून. (रावळपिंडी वेळ ८; नवी दिल्ली वेळ सायं. ६.३० वा.) बिनशर्त युद्धबंदी जाहीर करावी, असं आवाहन मी करतो. तेव्हा ही वेळ लक्षात घेऊन त्याआधीच संबंधित दलाधिकाऱ्यांना तुम्ही तशा सूचना द्याल असं मी गृहीत धरतो.*

*युद्धबंदीत असलेल्या उभयतांच्या अडचणी मी ऐकून घेतल्या आहेत. परंतु तरीही मी तुम्हांला विनंती करीत आहे की, युद्धबंदी ही तुमच्या देशांच्या, तुमच्या देशांमधील जनतेच्या व एकूणच जगाच्या दृष्टीनं उचित व न्याय्य आहे. तुमच्या होकारार्थी प्रतिसादाबद्दल जग कृतज्ञच राहील.*

*एकदा तुम्ही हे मान्य केलं की, युद्धबंदी अमलात आणणं व सुरक्षा समितीच्या ६ सप्टेंबरच्या ठरावात नमूद केल्याप्रमाणं ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी ज्या जागी उभय देशांच्या फौजा होत्या त्या जागी त्या हटवणं या कामी योग्य ती मदत सुरक्षा समिती उपलब्ध करून देईल.*

*भारत व पाकिस्तान यांच्यात दीर्घकालीन शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून सुरक्षा समितीला मार्ग काढता येईल, अशी मला खात्री आहे. सुरक्षा समितीचे ४ व ६ सप्टेंबरचे ठराव अमलात आणण्यासाठी तुमच्या देशांच्या व जगाच्याही भल्याच्या दृष्टीनं तुम्ही या आवाहनाला विधायक प्रतिसाद द्याल अशी मला आशा वाटते. तुमचं उत्तर उशिरात उशिरा १४ सप्टेंबर रोजी सकाळी नवी दिल्ली वेळ ७.३० (रावळपिंडी वेळ ७) वाजेपर्यंत मला कळवावं. तुमचं उत्तर येईपर्यंत हा संदेश गुप्त राखला जाईल.*

*दीर्घ काळ पडून राहिलेल्या प्रश्नांसाठी तुम्हांला मदत करीत राहीन, असं मी आश्वासन देत आहे. माझ्या शुभेच्छा."*

पाकिस्ताननं जर युनोच्या सुरक्षा समितीची विनंती मान्य केली तर भारतानंही तिला मान्यता द्यावी, असं मत जनरल चौधरी व एअरमार्शल अर्जुनसिंग यांनी व्यक्त केलं होतं. यशवंतराव चव्हाण यांचंही मत तसंच होतं. उभय राष्ट्रांनी बिनशर्त युद्धबंदी करावी असं सुरक्षा समितीचं म्हणणं होतं. तेव्हा भारतानं काही अटी घातल्या असत्या तर एक प्रकारे युनोचं आवाहन फेटाळल्यासारखं झालं असतं. अनेक देशांनी युनोच्या

सरचिटणीसांचं आवाहन मान्य करावं असं शास्त्रींना सुचवलं होतं. जॉन्सन, ब्रेझनेव्ह, कोसिजिन, नासर, विल्सन व टिटो या सर्वांनी जणू तसा धोशाच लावला होता. युनोचं आवाहन भारतानं फेटाळून लावलं तर भारताला एकही देश पाठिंबा द्यायला तयार झाला नसता, असा याचा गर्भितार्थ होता.

परंतु शास्त्री कोणाच्या दडपणाखाली किंवा हेकटपणं वागणारे गृहस्थ नव्हते. पाकिस्तानी लष्कराला भारतानं चांगलाच दणका देऊन हतबल केलं होतं. भारताच्या दृष्टीनं लष्करी स्थिती अनुकूल होती. तेव्हा मूलभूत प्रश्नांबाबत आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करून बिनशर्त युद्धबंदी मान्य करायला हरकत नाही, असं शास्त्रींचं मत होतं. त्यामुळे जगाच्या दृष्टिकोनातून भारताची प्रतिमा उंचावली असती, एवढंच नव्हे, तर पाकशी वाटाघाटी करताना भारताला पाठिंबाही मिळाला असता. शास्त्रींनी दुसऱ्याच दिवशी मंत्रिमंडळाच्या आणीबाणी समितीची बैठक बोलावून युनोच्या सरचिटणीसांच्या आवाहनाबद्दल विचारविनिमय केला. संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीपुढं भाषण करून शास्त्रींनी युद्धबंदीबाबत आपलं मत मांडलं. त्यांच्या मताला दुजोरा मिळाला. काही बाबतींत शास्त्रींना युनोच्या सरचिटणीसांकडून स्पष्टीकरण हवं होतं. तेव्हा उभयतांची आणखी एकवार बैठक झाली.

१४ सप्टेंबरला सायंकाळी ७.३० च्या आत युनोच्या सरचिटणीसांना उत्तर पाठवणं कठीण आहे, असं १३ सप्टेंबरला सकाळी ध्यानात आलं, तेव्हा ही मुदत वाढवून देण्याची विनंती त्यांना करण्यात आली. ती मान्यही झाली.

सरचिटणीसांना पाठवायच्या उत्तराचा मसुदा दुपारी तयार करण्यात आला. सायंकाळी आणीबाणी समितीच्या बैठकीत काही दुरुस्त्यांसह त्याला मंजुरी देण्यात आली. त्यानुसार अंतिम मसुदा तयार करून तो रात्री ११.३० वाजता पंतप्रधानांच्या निवासस्थानी पोचवून देण्यात आला.

आपल्याला मसुदा नीट वाचायचा आहे असं शास्त्रींनी मला आधीच सांगून ठेवलं होतं. तो अगदी काळजीपूर्वक वाचल्यावर त्यांचं पूर्ण समाधान झाल्यासारखं दिसलं नाही. शब्दांच्या बाबतीत ते अत्यंत काटेकोर असत. हे पत्र तर अत्यंत महत्त्वाचं होतं व भारताची भूमिका त्यात अगदी काळजीपूर्वक व तपशीलवार विशद करण्याची गरज होती. त्यांनी मसुदा सुधारण्याचं ठरवलं. त्यानुसार त्यांनी सूचना दिल्या व सकाळी ८ वाजेपर्यंत सुधारित मसुदा सादर करण्यास सांगितलं. त्याप्रमाणं सकाळी सुधारित मसुदा तयार झाला. शास्त्रींनी आणीबाणी समितीची बैठक पुन्हा आपल्याच निवासस्थानी बोलावली. हा सुधारित मसुदा समितीनं संमत केला. अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांनी त्यात एका वाक्याची भर घातली इतकंच. १४ सप्टेंबरला दुपारी ते पत्र राष्ट्रपती भवनात युनोच्या सरचिटणीसांना देण्यात आलं. काश्मीरच्या संबंधातील भूमिका त्यात तपशीलवारपणं मांडली होती. पत्राच्या अखेरीस म्हटलं होतं :

*"पाकिस्ताननं हल्ला केल्यावर बचावासाठी कारवाई करण्याखेरीज आम्हांला*

गत्यंतरच नव्हतं. पाकिस्तानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी भारतानं जी जी कारवाई केली ती ती स्व-संरक्षणार्थ होती, हे समजून घेतलं जाईल अशी आशा मला वाटते.

या निमित्तानं का होईना, तुम्ही भारताला भेट दिली. आम्ही तुमचं मनःपूर्वक स्वागत करतो. केवळ भारतीय उपखंडातच नव्हे, तर जागतिक शांततेच्या दृष्टीनं तुमच्या या भेटीचं महत्त्व आम्ही जाणून आहोत. भारताचा शांततेवर सदैव विश्वास असून त्यासाठी अहर्निश झटण्याचा आमचा निर्धार अढळ आहे.

सुरक्षा समितीच्या इच्छेनुसार व अनेक देशांनी केलेल्या आवाहनांनुसार तत्काळ युद्धबंदी करण्याचा प्रस्ताव आम्ही स्वीकारीत आहोत. पाकिस्तान युद्धबंदीला तयार आहे, असं जर उद्या सकाळी ९ वाजेपर्यंत तुम्ही आम्हांला कळवलं तर १६ सप्टेंबरला भारतीय वेळेनुसार सकाळी ६.३० वाजल्यापासून युद्धबंदी करायची आमची तयारी आहे.

ठरलेल्या दिवशी व ठरलेल्या वेळी युद्धबंदी अमलात यावी म्हणून पाकिस्ताननं व भारतानं आपापल्या लष्करी अधिकाऱ्यांना आगाऊ आदेश द्यावेत, असं तुम्ही तुमच्या पत्रात सुचवलं आहे. सध्याच्या संघर्षात गुंतलेल्या गणवेशधारी सैनिकांच्या बाबतीतच हे करणं शक्य होईल याकडे मी आपलं लक्ष वेधू इच्छितो. पाकिस्तानच्या बाजूनं हजारो सशस्त्र घुसखोर आमच्या जम्मू व काश्मीर प्रदेशात घुसले असून त्यांना आम्हांला तोंड द्यावं लागणार आहे. या घुसखोरांकडे मशिनगन्स, हँडग्रेनेड्स अशी धोकादायक शस्त्रास्त्रं असून ते अजूनही– अगदी हे पत्र लिहीत असताना देखील– जम्मू-काश्मीरमधील महत्त्वाच्या जागांची हानी करण्याचा व स्थानिक जनतेला सतावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पाकिस्ताननं नागरी वेशांतील घुसखोरांकरवी नियोजनबद्ध आक्रमण केलं आहे हे आता सर्वज्ञातच आहे. तुमच्याच अहवालात त्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तरीही पाकिस्तान मात्र आपली जबाबदारी झटकून टाकीत आहे, असं तुमच्याकडूनच समजलं. अर्थात पाकिस्तानच्या या नकाराचं आम्हांला आश्चर्य वाटत नाही. कारण यापूर्वीही त्यानं याच पद्धतीनं आक्रमण केलं असता, त्यात आपला काहीच हात नाही असं आधी सांगितलं होतं; पण नंतर त्यांना त्यातील आपला सहभाग मान्य करावा लागला होता. या सशस्त्र घुसखोरांना पाकिस्ताननं तत्काळ मागं हटवावं, अशी आमची विनंती आहे. पाकिस्तान जोवर हे करीत नाही तोवर आमच्या लष्कराला या घुसखोरांचा प्रभावी समाचार घ्यावा लागेल.

यानंतर छुपा अथवा उघड हल्ला पाकिस्ताननं करता कामा नये, असा आमचा आग्रह आहे. युद्धबंदीनंतर अन्य तपशील ठरवताना आणखी घुसखोरीला वाव मिळेल किंवा आमच्या प्रदेशात आधीपासून असलेल्या घुसखोरांवर कारवाई करण्यास आम्हांला प्रतिबंध केला जाईल, अशा तऱ्हेचं आम्ही काहीही मान्य करणार नाही, हे आम्ही स्पष्ट करू इच्छितो. जम्मू व काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून

*देशाचं सार्वभौमत्व व प्रादेशिक ऐक्य टिकवून ठेवण्याच्या आमच्या निर्धारापासून कोठलाही दबाव वा हल्ला आम्हांला परावृत्त करू शकणार नाही, असंही आम्ही स्पष्ट शब्दांत नमूद करीत आहोत.*

*आशियात आक्रमणवादी शक्ती दुर्दैवानं धुमाकूळ घालीत असून जागतिक शांतता धोक्यात आणीत आहेत याकडे, सरचिटणीस महाशय, मी आपलं लक्ष वेधू इच्छितो. जोवर सुरक्षा समिती आक्रमक कोण हे ठरवीत नाही व आक्रमणाचा बळी असलेल्याला समान वागणूक देत राहील तोवर शांततेची शक्यता अनिश्चितच राहील. आशियात राजकीय स्थैर्य व शांतता टिकावी या दृष्टीनं सुरक्षा समितीला अत्यंत गंभीर व महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे. यात लक्षावधी जनतेच्या कल्याणाचा प्रश्न गुंतलेला आहे. आक्रमणखोर शक्तींना वेळीच पायबंद घातला नाही, तर समस्त मानव जातीलाच धोका निर्माण करणाऱ्या संघर्षात जग ओढलं जाईल. शांततेच्या शक्तींचा अखेर विजय होऊन प्रगतीच्या पथावरून मानवतेची वाटचाल होईल, अशी आम्हांला आशा वाटते. याच भावनेतून आम्ही युद्धबंदीच्या तुमच्या प्रस्तावाला मान्यता देत आहोत.''*

अयूबखान यांनी काश्मीरबाबत काही अटी कबूल केल्या तरच आम्हांला युद्धबंदी मान्य आहे असं सरचिटणीसांना कळवलं. सरचिटणीस दिल्लीत असतानाच १४ सप्टेंबरला त्यांना अयूबखान यांचं पत्र मिळालं. त्यांनी आपल्या पत्रात भारताला 'आक्रमक' म्हटलं होतं. युद्धबंदीविषयी अयूब यांनी पत्रात लिहिलं होतं :

*''तसं म्हटलं तर पाकिस्तान काही युद्धबंदीच्या विरुद्ध नाही. किंबहुना या उपखंडाला संभाव्य भयानक आपत्तीपासून वाचविण्यासाठी आम्ही युद्धबंदीचं स्वागतच करू. परंतु ही युद्धबंदी अर्थपूर्ण हवी. म्हणजे त्यामुळं आपत्ती पुढं ढकलली न जाता ती टाळली जावी. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर भारत-पाकमधील संघर्षाचं मूळ कारण असलेल्या काश्मीर प्रश्नाच्या अंतिम तोडग्यासाठी अमलात आणण्याच्या स्वायत्त यंत्रणेची त्यात तरतूद हवी.*

*सुरक्षा समितीच्या ४ व ६ सप्टेंबरच्या ठरावांनुसार पाक फौजा या युद्धबंदी रेषेपुढील पाकच्या बाजूला हटवायच्या आहेत. युनोचं लष्करी निरीक्षक पथक अधिक बळकट करून युद्धबंदी रेषा मजबूत केली जाणार आहे. त्यामुळे भारताची काश्मीरवरील लष्करी पकड पुन्हा मजबूत होईल. याचा अर्थ सध्याचा संघर्ष ज्यापायी उद्भवला तीच स्फोटक परिस्थिती निर्माण करण्यासारखं आहे.*

*तसंच भारतानं पाकिस्तानवर बेदरकारपणं आक्रमण केलं आहे. त्यामुळं युद्धबंदीचा प्रस्ताव अमलात आणणं म्हणजे आक्रमक राष्ट्रालाच पारितोषिक देणं होय.*

*त्यामुळं सध्याच्या संघर्षाची मोठ्या युद्धात परिणती होऊ नये म्हणून संघर्षाच्या खऱ्या कारणाचं निराकरण करील अशी कृती युद्धबंदीबरोबर केली गेली पाहिजे, अशी आम्ही विनंती करीत आहोत. तेव्हा युद्धबंदीनंतर लागलीच जम्मू-काश्मीरमधून*

*पाकिस्तान व भारत यांच्या सर्व फौजा काढून घेतल्या जाव्यात, राज्यात सुव्यवस्था राखण्यासाठी युनोपुरस्कृत आफ्रो-आशियाई दल तैनात केलं जावं आणि तीन महिन्यांत जम्मू-काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यात यावं."*

बिनशर्त युद्धबंदी मान्य करावी असा युनोच्या सरचिटणीसांचा आग्रह होता. तेव्हा त्यांनी १४ सप्टेंबरला अयूब व शास्त्री यांना पुढील संदेश पाठवला :

*"…. युद्धबंदीला अनुकूल असा कल तुम्ही तुमच्या उत्तरात व्यक्त केला. राष्ट्राध्यक्ष अयूबखान यांनीही असाच दृष्टिकोन प्रकट केला आहे.*

*माझ्या बिनशर्त युद्धबंदीच्या आवाहनाला प्रतिसाद देताना दोन्ही सरकारांनी काही अटी घातल्या आहेत. परंतु सुरक्षा समितीच्या ठरावान्वये मला त्या संदर्भात ठाम आश्वासनं देण्याचा अधिकार नाही. तुमच्या उत्तरामधील हा भाग सुरक्षा समितीकडे तातडीच्या विचारार्थ सोपवायला हवा, तेव्हा मी तो त्यांच्याकडे तत्काळ पाठवीन.*

*तुमच्या अटींचा सुरक्षा समितीनं विचार करीपर्यंत उभय देशांच्या हिताच्या दृष्टीनं व जागतिक शांततेच्या दृष्टीनं तुम्ही तत्काळ युद्धबंदी व संघर्ष क्षेत्रातील शत्रुत्वाच्या सर्व कारवाया थांबवण्याचा आदेश द्यावा अशी कळकळीची विनंती मी करीत आहे.*

*विलंब झाला असल्यानं आता गुरुवार दि. १६ सप्टेंबर १९६५ रोजी नवी दिल्लीच्या वेळेनुसार ६.३० वाजता व रावळपिंडीच्या वेळेनुसार ६ वाजता ही युद्धबंदी लागू करण्यात यावी.*

*माझ्या या पत्रास तत्काळ प्रतिसाद द्यावा अशी उभयतांना विनंती."*

शास्त्रींनी १५ सप्टेंबरला सकाळी या संदेशाला आपलं उत्तर पाठविलं. त्या दिवशी दुपारी दिल्लीहून रवाना होण्यापूर्वी ऊ थांट यांना ते देण्यात आलं. त्यात त्यांनी म्हटलं होतं :

*"१४ सप्टेंबरचा तुमचा संदेश मला रात्री उशिरा मिळाला.*

*आपण ठाम आश्वासन देऊ शकत नाही, असं तुम्ही म्हटलं असून ते मी समजू शकतो. किंबहुना मी तुमच्याकडून काहीही आश्वासन मागितलं नव्हतं. परंतु आमच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बाबींबद्दल आपली भूमिका स्पष्टपणं मांडणं अत्यावश्यक ठरतं.*

*तुमच्या प्रस्तावानुसार पाकिस्ताननं युद्धबंदी अमलात आणण्याचं व कारवाया थांबवण्याचं मान्य केलं आहे हे तुम्ही मला कळवताच माझीही युद्धबंदीला तयारी आहे, याचा मी पुनरुच्चार करीत आहे. पाकिस्ताननं युद्धबंदीला मान्यता दिल्याचं तुम्ही मला जेव्हा कळवाल त्यावर प्रत्यक्ष युद्धबंदीची वेळ अवलंबून राहील."*

भारताचं हे उत्तर सुस्पष्ट होतं. परंतु तोवर अयूबखान यांच्याकडून ऊ थांट यांना काही कळवण्यात आलं नव्हतं. दिल्लीहून दुपारी २.३० वाजता रवाना होण्यापूर्वी ऊ थांट यांनी आणखी एक संदेश उभय नेत्यांना पाठवला. त्यांचा हा तिसरा संदेश होता. त्यात बिनशर्त युद्धबंदी स्वीकारावी असं म्हटलं होतं. त्याचबरोबर वाटाघाटींसाठी उभय नेत्यांची बैठक घडवून आणता येईल, असं सूचित केलं होतं. अयूबखान यांनी १६ सप्टेंबर रोजी न्यूयॉर्कला ऊ थांट यांना पत्र पाठवून 'काश्मीर प्रश्नावरील अंतिम तोडगा काढावा' या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. आपण युद्ध हरलो आहोत, हे अयूब उमजून चुकले होते. तेव्हा सुरक्षा समितीच्या मार्फत वा जॉन्सन यांना मध्यस्थी करण्याची विनंती करून ते त्यातल्या त्यात आपली पत सावरू पाहत होते. परंतु सुरक्षा समितीच्या मार्फतच कारवाई करण्याचा जॉन्सन यांचा निर्धार होता. भारत व पाकिस्तान येथील भेटींनंतरच्या ऊ थांट यांच्या अहवालाची ते प्रतीक्षा करीत होते.

दरम्यान चीनला आपलं अस्तित्व दाखवून देण्याची उबळ आली. त्यानं ऊ थांट यांच्यावर वैयक्तिक हल्ला चढविला. पेकिंगच्या (आता बीजिंग) 'पीपल्स डेली'ने १४ सप्टेंबरच्या अंकात लिहिलं : "ऊ थांट यांच्या भारत-पाक भेटीमागं अमेरिकेचा हात असून युनोचे सरचिटणीस हे वॉशिंग्टनचे दलाल म्हणून काम करीत आहेत!" त्यांच्या संपादकीयाचं शीर्षक होतं : "अमेरिका हे भारतीय आक्रमकाचं अभयारण्य आहे!" सरचिटणीसांनी ४ सप्टेंबरच्या अहवालात भारताची बाजू घेतली असून सुरक्षा समितीचे दोन्ही ठराव भारताला अनुकूल आहेत, असंही संपादकीयात म्हटलं होतं. "अशा परिस्थितीत ऊ थांट न्याय कसा देणार?" असा सवालही विचारण्यात आला होता! साम्राज्यवादी अमेरिकेच्या दडपणाखाली वागणाऱ्या युनोनं नेहमीच चुकीच्या गोष्टींची बरोबर म्हणून भलामण केली असून त्यानं आक्रमकाचंच हितरक्षण केलं आहे. भारतानं पाकवर आक्रमण केलं असून या प्रकरणी युनोचं खरं स्वरूप उघड झालेलं दिसेल, अशी मल्लीनाथीही संपादकीयात केली होती.

युनोचे सरचिटणीस १५ सप्टेंबर रोजी दिल्लीहून रवाना झाले. त्यानंतर लागलीच पंतप्रधान शास्त्री यांनी पुढील धोरण आखण्याच्या दृष्टीनं परिस्थितीचा आढावा घेतला. युद्धबंदीसाठी अयूबखान यांनी घातलेल्या प्रत्येक अटीला आपला विरोध असल्याचं शास्त्रींनी निःसंदिग्ध शब्दांत स्पष्ट केलं. राष्ट्राध्यक्ष जॉन्सनना व अन्य राष्ट्रप्रमुखांना त्यांनी पत्र पाठवून भारताची भूमिका विशद केली. शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून भारत उत्सुक आहे. मात्र आपल्या सार्वभौमत्वाचं रक्षण करण्याचा त्याचा खंबीर निर्धार आहे, असं त्यांनी त्यात स्पष्ट केलं होतं. जॉन्सन यांना १६ सप्टेंबर १९६५ रोजी पाठवलेल्या या पत्रात एकूण काश्मीरची ऐतिहासिक पार्श्वभूमी देऊन १९४७ मध्ये भारतात सामील होण्याचा निर्णय जम्मू-काश्मीरमधील जनतेनं घेतला; त्यामुळं आता पुन्हा सार्वमत घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असं स्पष्ट शब्दांत शास्त्रींनी नमूद केलं होतं. जम्मू-काश्मीरमध्ये आक्रमण करून त्या राज्याचा काही भाग सोडायला आपण भारताला भाग पाडू, असं अयूबखान यांना वाटत असेल तर तो निव्वळ भ्रम आहे.

आम्हांला शांतता हवी असली तरी ती आमच्या प्रदेशाची किंमत मोजून नव्हे. दोन्ही देशांचं सैन्य संघर्षात गुंतलं असताना भारत व पाक यांच्या राष्ट्रप्रमुखांच्या भेटीनं काय साध्य होणार? पाकला सध्याचा संघर्ष संपवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी मध्यस्थीचे प्रयत्न नको असून त्यांना जम्मू-काश्मीरवरील आपल्या दाव्याच्या बाबतीत मध्यस्थानं वाटाघाटी कराव्या असं वाटतं. पण हे आम्हांला मान्य होणारं नाही, असंही शास्त्रींनी या पत्रात म्हटलं होतं.

### संसद

हे पत्र पाठविलं त्याच दिवशी शास्त्री यांनी ऊ थांट यांच्या भेटीबाबत संसदेत निवेदन केलं. ऊ थांट यांच्याबरोबर मनमोकळी व स्पष्ट चर्चा झाली. त्यांनी ४ व ६ सप्टेंबरच्या सुरक्षा समितीच्या ठरावाकडे लक्ष वेधून तत्काळ युद्धबंदी करण्याचं उभय देशांना आवाहन केलं, असा तपशील देऊन शास्त्री यांनी या संघर्षाला पाकिस्ताननं कसा आरंभ केला, ५ ऑगस्ट १९६५ पासून घुसखोर काश्मीरमध्ये कसे पाठवले, नंतर १ सप्टेंबरला त्यांच्या सैन्यानं कसं मोठं आक्रमण केलं, केवळ युद्धबंदी रेषेचाच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय सीमारेषेचाही त्यांनी कसा भंग केला व आपल्या बचावासाठी भारताला प्रत्युत्तरादाखल उपाययोजना करणं कसं भाग पडलं याची माहिती त्यांनी दिली.

युनोच्या सरचिटणीसांना आपण हे सारं विशद केलं व सध्याचा संघर्ष पाकच्या आक्रमणामुळं कसा लादला गेला आहे हे सांगितलं. पाकनं वारंवार सशस्त्र आक्रमण करीत राहणं आम्ही सहन करणार नाही. जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून देशाचं सार्वभौमत्व व प्रादेशिक ऐक्य यांचं पूर्णतः संरक्षण करण्याचा आमचा ठाम निर्धार आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

युनोच्या सरचिटणीसांशी झालेली चर्चा व त्यांच्याशी झालेला पत्रव्यवहार यांची इत्यंभूत माहिती त्यांनी दिली. आपल्या भाषणाची सांगता करताना ते म्हणाले :

*"आजच्या परिस्थितीत पूर्णतः दक्ष, जागरूक राहण्यासाठी आणि आपलं स्वातंत्र्य आणि ऐक्य टिकवण्यासाठी वाटेल तो त्याग करायला आपण सज्ज राहिलं पाहिजे. आक्रमकाच्या विरुद्ध संसद, राजकीय पक्ष व देशातील जनता यांनी जी भूमिका एकजुटीनं स्वीकारली आहे त्याबद्दल मी उपकृत आहे. आपल्या लष्करानं केवळ सीमेचं रक्षणच केलं असं नाही, तर आक्रमकाला जोरदार तडाखे दिले याबद्दल मी कृतज्ञ आहे. त्यांच्या शौर्यामुळं भारताच्या इतिहासात एका गौरवपर्वाचीच भर पडली आहे. संसदेला आणि साऱ्या देशाला त्यांचा अभिमान वाटतो. याच निर्धारानं व हिमतीनं आपण आव्हानाला तोंड देत राहू अशी मला खात्री वाटते."*

संसदेनं त्यांचं भाषण अत्यंत लक्षपूर्वक ऐकलं व त्याला दाद दिली. भाषण

संपताच सर्वच पक्षांच्या खासदारांनी त्यांना आपला पाठिंबा दिला व त्यांच्या धोरणाची प्रशंसा केली. उत्स्फूर्त एकमताचंच दर्शन त्या वेळी घडलं. प्रत्येक खासदार संयमानं व शालीनतेनं बोलत होता. एकाच्याही भाषणात कटुत्व, वैर, आडदांडपणा यांचा लवलेश नव्हता. शास्त्रींच्या दृष्टीनं त्यांच्या नेतृत्वाच्या यशाची ती गौरवघटिका होती. काही सदस्यांच्या पुढील भाषणांतून त्याचा प्रत्यय येईल :

*प्रा. एन. जी. रंगा* (चित्तूर) : सर, हा ऐतिहासिक क्षण आहे. या प्रसंगी पंतप्रधानांनी केलेलं निवेदन मौलिक व स्फूर्तिदायी आहे. त्यांच्या निर्धाराला आमच्या पक्षाचा पाठिंबा आहे. पंतप्रधानांनी केलेल्या निवेदनानुसार युनो व तिचे सरचिटणीस यांच्यासमोर भारतानं आपली बाजू चांगली मांडली असून त्यांचे प्रस्ताव स्वीकारण्याची तयारी दर्शवून खरा आक्रमक कोण आहे हे साऱ्या जगाला दाखवून दिलं आहे.

*एम. एन. मुखर्जी* (मध्य कलकत्ता) : सर, साऱ्या देशाच्या वतीनं पंतप्रधान बोलले आहेत...

सन्मानानं व प्रतिष्ठा पाळून शांतता राखण्यासाठी शक्य ते सारे प्रयत्न पंतप्रधानांनी केले आहेत आणि पाकिस्तान त्याच्या स्वभावानुसार आपल्या प्रत्येक प्रयत्नाला प्रतिकूल प्रतिसाद देत आहे. तेव्हा जगातील विशेषतः महासत्तांच्या राजधान्यांत आपण करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती देणं हे आपलं कर्तव्य आहे.

*सुरेन्द्रनाथ द्विवेदी :* पंतप्रधानांचं निवेदन हे केवळ सरकारचा वा संसदेचा दृष्टिकोन मांडणारंच नव्हे, तर सबंध देशातील जनतेचा तो एकमुखी आवाज आहे. मी त्याचं स्वागत करतो. शत्रूशी अशीच अखेरपर्यंत निकराची झुंज आपण देऊ आणि देशाच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करू, तसंच सीमेवर लढणाऱ्या जवानांना मदत होईल, अशी पावलं उचलू अशी मला आशा आहे.

*कर्णीसिंगजी* (बिकानेर) : पंतप्रधानांच्या भाषणाचं मनःपूर्वक स्वागत. आपल्या विविध संसदीय गटांचा त्यांना संपूर्ण पाठिंबा आहे. काश्मीरच्या प्रश्नावर ते ठाम भूमिका घेतील अशी आमची खात्री होतीच. अपेक्षेनुसार कडक भूमिका स्वीकारल्याबद्दल पंतप्रधान, संरक्षणमंत्री व संपूर्ण मंत्रिमंडळ यांचं अभिनंदन. साऱ्या देशाला आपल्या जवानांचा अभिमान वाटतो. संधी मिळाली तर जवान आपलं शौर्य दाखवतील ही अपेक्षा त्यांनी पुरी करून दाखवली आहे. मी पुनश्च पंतप्रधानांचं अभिनंदन करतो. या बिकट समयी सारा देश त्यांच्या पाठीशी उभा आहे.

*डॉ. मा. श्री. अणे :* अशा प्रसंगी अपेक्षेनुसार पंतप्रधानांनी कणखर भूमिका स्वीकारली याचा आम्हांला आनंद होतो. आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. सारा देश

त्यांच्या पाठीशी उभा आहे. पाकिस्ताननं आपला उद्दामपणा चालू ठेवला तर भारत कसा एक होऊन खंबीरपणं उभा राहतो हे यामुळं साऱ्या जगाला उमजेल.

*के. मनोहरन्* (दक्षिण मद्रास) : पंतप्रधानांनी केलेल्या ऐतिहासिक निवेदनाबद्दल द्र. मु. क. तर्फे मी त्यांचं अभिनंदन करतो आणि त्याचं मनःपूर्वक स्वागत करतो. या देशातून आक्रमकाला हुसकून लावण्याच्या कामी आम्ही पंतप्रधानांचे हात बळकट करू.

*मोहम्मद इस्माइल* (मंजेरी) : पंतप्रधानांच्या प्रत्येक शब्दाला माझा पाठिंबा आहे. पाकिस्तानच्या आक्रमणाचा लवलेशही राहता कामा नये म्हणून लढत राहण्याच्या निर्धाराला माझा पाठिंबा आहे. आक्रमकाचा निःपात करण्यासाठी पंतप्रधान जी पावलं उचलतील त्याच्या पाठीशी आम्ही ठामपणं उभे राहू.

अन्य मित्रांनी व्यक्त केलेल्या निर्धारालाही माझा पाठिंबा आहे. स्वसंरक्षणार्थ आपण करीत असलेल्या या युद्धात गौरवशाली यश मिळावं अशी शुभेच्छा.

*जे. बी. कृपलानी* (अमरोहा) : दुर्दैवानं भारतातील कोणत्याही विशिष्ट लोकांचं मी प्रतिनिधित्व करीत नाही. पण देशाचा एक वयोवृद्ध सेवक या नात्यानं मी साऱ्या भारताचं प्रतिनिधित्व करीत आहे.

आपल्या पंतप्रधानांनी केलेल्या निवेदनाशी मी पूर्णतः सहमत असून त्यांनी या वेळी घेतलेल्या खंबीर भूमिकेबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो.

विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी इथे व्यक्त केलेल्या मतांशीही मी सहमत आहे.

सर्व पक्षांच्या प्रतिनिधींनी आपणाला एकमुखी पाठिंबा व्यक्त केला म्हणून शास्त्रींना ानंद झाला. परंतु त्यांचं हे समाधान अल्पजीवी ठरलं. कारण तिकडे चीननं याच ळी भारताला अंतिम इशारा देण्याचं ठरवलं होतं.

□□



।। पंधरा ।।

# चीनचा खलिता

मार्शल चेन यी यांनी ४ सप्टेंबरला पाकिस्तानला भेट दिली, त्या वेळी त्यांनी पाकला पूर्ण पाठिंबा दिला होता. ''युद्धबंदी रेषेचा भंग करून काश्मीरमधील संघर्षाला चिथावणी देणाऱ्या भारतीय वसाहतवादाचा आम्ही निषेध करीत आहोत,'' असं पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितलं होतं आणि भारताच्या लष्करी चिथावणीला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तान करीत असलेल्या वाजवी कृतीला आपला पाठिंबा आहे, असंही जाहीर केलं होतं. त्याच दिवशी 'द पीपल्स डेली' या पेकिंगहून प्रकाशित होणाऱ्या सरकारी वृत्तपत्रात भारतानं काश्मीरमध्ये आक्रमण केलं व तेथील तणावाला भारत जबाबदार आहे असं म्हटलं होतं. युद्धबंदी रेषा ओलांडून भारतीय फौजा पाकिस्ताननियंत्रित क्षेत्रात घुसल्यामुळं पाक सैन्याला स्व-संरक्षणार्थ प्रत्युत्तर द्यावं लागलं असंही या वृत्तात नमूद केलं होतं. ५ सप्टेंबरला 'द पीपल्स डेली'नं आणखी एक लेख प्रसिद्ध केला. काश्मीरात 'घुसखोर' नाहीत या पाकच्या भूमिकेला पाठिंबा देणारा व भारतावर टीका करणारा तो लेख होता. 'भारतीय विस्तारवादा'ला पाठिंबा देणारे अमेरिकी व क्रुश्चेव्हवादी यांनाही या लेखात धारेवर धरलं होतं. ७ सप्टेंबर रोजी चीन सरकारनं एक निवेदन काढलं. त्याचं वृत्त 'न्यू चायना न्यूज एजन्सी'नं दिलं. त्यातला महत्त्वाचा भाग असा :

*''चीन-सिक्कीम सीमारेषेपलीकडील चीनच्या प्रदेशावर भारतानं मोर्चेबंदी केली असून तो भाग सोडलेला नाही. चीन-भारत सीमेच्या पश्चिम क्षेत्रात भारत सतत चीनच्या प्रदेशावर त्वेषानं अतिक्रमण व सतवणूक करीत आहे... चीनच्या प्रदेशातील*

*सीमारेषा भंग करण्याचे प्रकार थांबतच नाहीत... चीननं याबाबत वारंवार इशारे दिले आहेत. भारताची आक्रमक कृत्यं व त्यांच्या सीमेलगत ते करीत असलेली लष्कराची जमवाजमव यावर चीन बारकाईनं लक्ष ठेवून आहे.*

*आक्रमण हे आक्रमणच आहे. भारतानं त्याच्या कोणत्याही शेजाऱ्यावर केलेलं आक्रमण हा सर्व शेजाऱ्यांच्याच चिंतेचा विषय आहे.*

भारतानं पाकिस्तानविरुद्ध आक्रमणाचं पहिलं पाऊल उचललं असून त्यामुळं उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी त्यांना टाळता येणारी नाही.''

पाकिस्तानच्या मदतीसाठी काही कृती करण्याचा चीनचा मनसुबा आहे हे यावरून सूचित होतं, असा भारत सरकारचा अंदाज होता. अशा कृतीसाठी काही तरी जादा समर्थन हवं म्हणून 'अतिक्रमणं, चिथावणी' या नेहमीच्याच आरोपांचा आधार चीननं घेतला होता.

चीनच्या या उद्गारांकडे शास्त्रीजींचं लक्ष होतं. त्याचं त्यांना फारसं आश्चर्यही वाटलं नव्हतं. कारण चीनचा हा नेहमीचाच खाक्या होता. या खेपेला त्यात काही गर्भित इशारा नव्हता. किंबहुना ते एक सर्वसाधारण विधान होतं, तसंच ते काही खास भारताला उद्देशून असं नव्हतं. अर्थात भारतीय लष्कर 'सज्ज' होतं, परंतु स्थानिक चकमकींच्या चिनी सापळ्यात अडकू नका अशा सूचना त्यांना दिलेल्या होत्या.

दुसऱ्याच दिवशी ८ सप्टेंबर रोजी चीननं भारताला एक खलिता धाडला व जागतिक तणावात भर पडली. ''भारतीय फौजा चिनी प्रदेश व सार्वभौमत्व यांचा सतत गंभीर स्वरूपात भंग करीत असल्या''बद्दल या खलित्यात निषेध व्यक्त केलेला होता. चीन-सिक्कीम हद्दीवर व त्यापलीकडे भारतानं बांधलेली लष्करी बांधकामं पाडून टाकावीत, आपल्या आक्रमक फौजा मागं घ्याव्यात आणि भारत-चीन सीमारेषेपलीकडल्या चीनच्या मध्य, पश्चिम व पूर्व क्षेत्रांतील सारी आक्रमणं आणि चिथावणी देण्याचे प्रकार थांबवावेत, असंही खलित्यात म्हटलेलं होतं. तसं केलं नाही तर परिणामांची जबाबदारी भारतावर राहील असाही इशारा त्यात होता.

१९६२ च्या युद्धानंतर एकदम ऑगस्ट/सप्टेंबर १९६५ मध्ये भारतानं भारत-चीन सीमेवर घुसखोर व चिथावणीखोर बनायचं का ठरवलं, विशेषतः पश्चिम क्षेत्रात पाकशी संघर्ष चालू असताना त्याच वेळी भारतानं चीनला डिवचण्याची शक्यता नसताना तो असं का करीत आहे हे जगाला सांगण्याची चीनला गरज वाटली. त्यामुळं भारताच्या तथाकथित आक्रमणासाठी विश्वासार्ह कारणं पुरवण्याकरिता चीननं खलित्यात म्हटलं होतं :

*''भारत-चीन सीमेवरील पश्चिम भागात भारतानं ऑगस्टमध्ये सुरू केलेल्या प्रक्षोभक प्रकारांचा एकाकी विचार करता येणार नाही. या घटना काही अपघातानं घडलेल्या नाहीत. काश्मीरमधील लोकांवर भारत सशस्त्र दबाव टाकत असून पाकवर जोरदार आक्रमण करीत आहे. भारताला आपल्या शेजाऱ्यांबद्दल यत्किंचितही*

*आदर नाही हेच या घटनांवरून पुन्हा सिद्ध झालं आहे. जेव्हा केव्हा संधी मिळेल तेव्हा भारत शेजाऱ्यावर हल्ले, सतवणूक आणि अतिक्रमणं करतो.''*

युद्धात आपण पाकच्या बाजूनं किती ठामपणं उभे आहोत हेच दाखवण्याचा या खलित्यामागील हेतू स्पष्ट होता.

८ सप्टेंबरच्या या खलित्यानंतर आणखी एक स्फोट उडाला व तो खुद्द चौ एन लाय यांनी केला होता. ९ सप्टेंबर रोजी कोरियन दूतावासानं आयोजिलेल्या स्वागतसमारंभाच्या वेळी बोलताना ''भारत आक्रमक आहे'' असं सांगून त्याचा जोरदार निषेध चिनी पंतप्रधानांनी केला : ''शांततेचं रक्षण करायचं असेल तर आक्रमणाला विरोध केलाच पाहिजे. भारताच्या आक्रमणानं आशियाच्या या भागातील शांततेला धोका उत्पन्न झाला असून या स्थितीवर चीनला बारकाईनं नजर ठेवावी लागेल.''

चीननं दिलेली कारणं ही कपोलकल्पित होती, हे साऱ्या जगाला ठाऊक होतं. त्यामुळं चीनला काही उघड कारवाई करणं शक्य नाही, असा शास्त्रींचा अंदाज होता. भारतावर आक्रमण करायचं तर काही तरी भरभक्कम असं कारण द्यावं लागलं असतं. अजून त्यांना तसा आधार सापडलेला नव्हता. तरी चीनच्या खलित्यामुळं एकूण स्थितीचा आढावा घेण्याचं शास्त्रींनी ठरवलं. पाकिस्तानी प्रदेश ताब्यात घेणार नाही हे आश्वासन जर आपण पाळलं तर बहुतेक राष्ट्रं भारताला समजून घेतील व चीनला धारेवर धरता येईल हे त्यांच्या लक्षात आलं. परंतु जर का सध्याच्या युद्धात भारतानं आपला शब्द पाळला नाही, तर मात्र जागतिक मत भारताविरुद्ध जाऊ शकेल आणि मग चीनला डावपेच खेळण्यास वाव मिळेल, हेही ते जाणून होते. म्हणूनच चीनच्या आरोपांचा इन्कार करण्याचं धोरण चालू ठेवायचं त्यांनी ठरवलं. १२ सप्टेंबरला भारतानं पाठवलेल्या उत्तरात म्हटलं होतं :

*''चीनचा हेतू भारताला बदनाम करण्याचा व आंतरराष्ट्रीय जगतात गोंधळ उडवून देण्याचा आहे. भारताविरुद्ध बेकायदा कृत्यं करण्यासाठी काही आधार शोधण्याचाही त्यामागं डाव असावा.*

*सुस्पष्टपणं आखलेली सिक्कीम-तिबेट सीमारेषा भारतीय फौजांनी केव्हाही ओलांडलेली नाही, हे भारत सरकारनं चीन सरकारला वारंवार कळवलं आहे. सीमारेषेवर वा तिबेटियन जमिनीवर भारतीय फौजांनी कधीही कसलंही बांधकाम केलेलं नाही. तसं करण्याची भारताला आवश्यकताही नाही. तेव्हा ही बांधकामं पाडून टाकण्याची व फौजा माघारी घेण्याची चीनची मागणी निरर्थक आहे.''*

तरीही स्वतंत्र व तटस्थ निरीक्षकाकडून या भागाची पाहणी करू देण्यास भारताची तयारी आहे, असंही या उत्तरात म्हटलं होतं.

तातडीनं काही उद्दिष्ट साध्य करण्याचा चीनचा हेतू नसल्यानं १९६२ प्रमाणे तो मोठा हल्ला चढवण्याचा संभव नाही असं शास्त्रींचं मत होतं. आपल्या मैत्रीखातर चीन

अमेरिकेचा रोष ओढवून घेईल असं पाकिस्तानलाही वाटत नव्हतं. "हिमालयात हस्तक्षेप करायची अमेरिकेची इच्छा नसेल तर अन्य आघाडीवर ते हस्तक्षेप करू शकतात," असे उद्गार अमेरिकेच्या परराष्ट्रसंबंध व लष्करविषयक ज्येष्ठ समितीचे सदस्य डेमॉक्रॅटिक पक्षाचे सिनेटर स्ट्युअर्ट सायमिंग्टन यांनी काढले होते. चीनच्या आण्विक प्रयोगशाळांमध्ये पेंटॅगॉनला स्वारस्य होतं आणि त्याचा निर्देश सिनेटर सायमिंग्टन यांना करायचा असावा. चीन असा धोका पत्करण्याची शक्यता नव्हती.

सोविएट युनियननं १३ सप्टेंबर रोजी कडक वक्तव्यं करून व धोरणं आखून भारत व पाकिस्तान यांच्यामधील संघर्षात तेल ओतणाऱ्या राष्ट्रांना इशारा दिला. अशा राष्ट्रांना परिणाम भोगावे लागतील असंही त्यात बजावलं होतं.

भारत-पाक युद्धात हस्तक्षेप करण्याविरुद्ध दोन्ही महासत्ता अशा प्रकारे चीनला निःसंदिग्ध शब्दांत इशारे देत होत्या. भारताच्या सीमेवर कुठे तरी मर्यादित हल्ला चढवून भारताच्या नीतिधैर्याला धक्का पोचवायचा, पण त्यामुळं अमेरिकेची कारवाई मात्र ओढवून घ्यायची नाही, असं काही तरी चीन करण्याचा संभव होता. या धोक्याला भारतालाच सामोरं जावं लागणार होतं. अशा स्थितीचा सामना करण्यासाठी शास्त्री यांनी दुहेरी धोरण आखलं. चीनवर बेछूट व बेलगाम भाषेत आरोप न करता संयमित पण ठाम शब्दांत त्याचे आरोप फेटाळून लावणं व भारत व पाक यांच्यामधील सद्यःस्थितीचा चीन फायदा उठवणार नाही अशी आशा प्रकट करणं हा त्यातला एक भाग होता. दुसरं म्हणजे चीननं जर हल्ला केला तर त्याला लढाईनं प्रत्युत्तर द्यावं असं मंत्रिमंडळातील सहकारी व लष्कराच्या तिन्ही विभागांचे प्रमुख यांच्या सल्ल्यानं त्यांनी ठरविलं होतं.

१६ सप्टेंबरला मध्यरात्री चीन सरकारनं भारताचे पेकिंगमधील चार्ज द अफेअर्स जगत मेहता यांना एक खलिता दिला. तिबेट-सिक्कीम सीमेवर अथवा तिबेटच्या प्रदेशावर भारतानं लष्करी बांधकाम केलं असून ते तीन दिवसांत पाडून टाकावं; तसं न केल्यास गंभीर परिणामांना तोंड देण्यास तयार राहावं असं या खलित्यात म्हटलं होतं. यासंबंधी तटस्थ निरीक्षक नेमण्याची सूचना चीनला मान्य नाही काय, असा सवाल जगत मेहता यांनी विचारला. सुरुवातीला या प्रश्नाला उत्तर देण्याचं चीननं टाळलं. नंतर जगात तटस्थ निरीक्षक असे कोणी नसतातच असं मत चीननं व्यक्त केलं. तुमचा खलिता म्हणजे युद्धाचा निर्वाणीचा इशारा आहे काय, अशी पृच्छाही मेहता यांनी केली. तेव्हा क्षणभर थांबून चिनी अधिकारी उत्तरला, "होय. भारतानं आमची मागणी फेटाळून लावली तर परिणाम भोगायला तयार राहावं."

शास्त्री यांनी १७ सप्टेंबरला सकाळी तो खलिता व सोबत मेहता यांनी त्यासंबंधी पाठवलेलं टिपण वाचलं. चीननं दिलेल्या निर्वाणीच्या इशाऱ्याचं वृत्त जगभर पसरलं होतं व "यातून जागतिक युद्ध पेटणार काय?" असा सवाल दिल्ली, लंडन, वॉशिंग्टन व जगातील अन्य राजधान्या यांतून विचारला जात होता.

परिस्थिती गुंतागुंतीची होती. भारताची प्रतिष्ठा पणाला लागलेली होती. त्यामुळं

चिनी खलित्याला भारतानं शरण जाण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु परिस्थिती चिघळू नये, तर ती निवळावी असं बहुतेक नेत्यांचं मत होतं. शास्त्रींनी मंत्रिमंडळाची तातडीनं बैठक बोलावली. चीनला पाठवायच्या उत्तरासंबंधीचा आपला दृष्टिकोन त्यांनी या बैठकीत मांडला. मंत्रिमंडळानं संमती दिल्यावर त्यानुसार उत्तर तयार करण्याचे आदेश त्यांनी दिले.

त्या दिवशी (१७ सप्टें.) संसदेची बैठक भरली, तेव्हा वातावरणात उत्सुकता होती, तणाव होता. चीनच्या निर्वाणीच्या इशाऱ्यासंबंधी आपण दुपारी निवेदन करू, असं शास्त्रींनी लोकसभेच्या अध्यक्षांना कळवलं होतं. त्यांनी दुपारपर्यंत निवेदन तयार केलं. दुपारी ३.३० वाजता ते लोकसभा दालनात शिरले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर काळजीची छटा नव्हती. ते म्हणाले,

*"आज सकाळी चीन सरकारकडून आम्हांला एक खलिता आला आहे. तिबेट-सिक्कीम सीमेवर तिबेटमधील त्यांच्या भागात आम्ही काही लष्करी बांधकामं केल्याचा त्यांचा आरोप असून तीन दिवसांत ती पाडून टाकावीत अशी मागणी त्यांनी केली आहे."*

त्यानंतर चीनच्या पत्रातील उतारे त्यांनी वाचून दाखवले. भारतानं त्यांना पाठवलेल्या उत्तराची माहिती देताना ते म्हणाले :

*"भारत-चीन सीमेचा वाद चीन सरकारनं उकरून काढला तेव्हापासून तो शांततेनं व सन्मानानं मिटवावा म्हणून भारतानं परिश्रम घेतले. ऑक्टोबर/नोव्हेंबर १९६२ मध्ये चीननं अकारण हल्ला केला, तरीही भारतानं उभयतांना मान्य होईल अशा तऱ्हेचा शांततापूर्ण तोडगा निघावा म्हणून प्रयत्न केला होता.*

*पूर्व व मध्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सीमा रेषा आणि पश्चिम क्षेत्रातील तथाकथित प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडू नये असे कडक आदेश भारतानं आपल्या लष्कराला दिल्याचं सरकारनं चीनला वेळोवेळी पाठवलेल्या पत्रात स्पष्ट केलेलं आहे. भारताच्या लष्करानं वा हवाई दलानं केव्हाही आंतरराष्ट्रीय सरहद्दीचं वा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचं उल्लंघन केलेलं नाही, असं प्रत्यक्ष चौकशीत आढळून आलं आहे. आपले आदेश लष्करानं पूर्णतः पाळले याबद्दल सरकारला समाधान आहे. तेव्हा चीनच्या खलित्यात नमूद केलेले आरोप हे सर्वस्वी निराधार आहेत, याबद्दल भारत सरकारची खात्री झाली आहे..."*

त्यानंतर पंतप्रधान पुढे म्हणाले :

*"सप्टेंबर १९६२ मध्ये चीन-भारत सरहद्दीच्या सिक्कीममधील भूप्रदेशावर काही लष्करी बांधकाम करण्यात आलं होतं. नोव्हेंबर १९६२ मध्ये संघर्ष संपुष्टात आल्यापासून या वास्तू रिकाम्या आहेत. यांपैकी काही बांधकामं आपल्या भूप्रदेशावर*

*आहेत, असा चीन सरकारनं आरोप केला, तेव्हा एक स्वतंत्र निरीक्षक या सीमा प्रदेशात पाठवून त्यानं तेथील परिस्थिती पाहावी, असं भारतानं १२ सप्टेंबर १९६५ रोजी चीनला पत्र पाठवून सुचवलं. परंतु दुर्दैवानं ही रास्त सूचना चीननं स्वीकारली नाही. संयुक्त रीत्या तपासणी करण्याचा आपला प्रस्ताव चीनसमोर ठेवलेला आहेच. तुमचं म्हणणं सर्वथैव चूक आहे असं आम्ही चीनला आज पाठवणार असलेल्या उत्तरात नमूद करणार आहोत. तरी देखील शांतता टिकावी या इच्छेनं आणि चीनला काही आक्रमक कृती करण्यास निमित्त मिळू नये म्हणून तिबेट-सिक्कीम सीमारेषेवरील तिबेटच्या भूप्रदेशावर भारतीय लष्करानं केलेल्या बांधकामाची शहानिशा करण्यासाठी संयुक्त तपासणी करण्यास आपली हरकत नाही, असंही आम्ही कळविणार आहोत. योग्य त्या अधिकारी पातळीवर उभयतांना सोयीच्या अशा दिवशी शक्य तितक्या लौकर अशा तपासणीची व्यवस्था करण्यास भारत सरकार तयार आहे, हेही त्यात स्पष्ट करणार आहोत.*

*चिनी खलित्याला आम्ही उत्तर पाठवीत असून त्यातील प्रस्तावाला चीन सरकार मान्यता देईल अशी अपेक्षा आहे. चीनचा खलिता व आपलं उत्तर यांच्या प्रती संसदेसमोर ठेवण्यात आल्या आहेत.*

*चीन सरकारच्या हेतूंविषयी सदनाला काळजी वाटणं साहजिक आहे. सध्याच्या स्थितीचा लाभ उठवून चीन भारतावर हल्ला करणार नाही, अशी आम्हांला आशा वाटते. आम्ही जागरूक असून हल्ला झालाच तर त्याला ठामपणं निर्धारपूर्वक उत्तर दिलं जाईल याची सदनानं खात्री बाळगावी. चीनचं बलाढ्य सामर्थ्य आम्हांला आमच्या प्रादेशिक एकात्मतेचं रक्षण करण्यापासून परावृत्त करू शकणार नाही.''*

शास्त्रींच्या या निवेदनाचं चांगलं स्वागत झालं. चीनच्या सामर्थ्यापुढं भारत झुकणार नाही, हे त्यांचं विधान वृत्तपत्रांनी उचलून धरलं. तसंच संयुक्त तपासणी करण्याची चीनची मागणी मान्य करून भारतानं त्यांच्या शिडातील हवाच काढून घेतली, असं जगातील नेत्यांना जाणवून दिलं गेलं. याचा अर्थ युद्धाचा धोका टळला होता असं नव्हे. परंतु मानहानी न होता आपला इशारा परत घेण्यास चीनला वाव देण्यात आला होता.

ब्रिटनचे हॅरॉल्ड विल्सन यांना चीनच्या निर्वाणीच्या खलित्याची चिंता होती. या संदर्भात त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांच्याशी संपर्क साधला होता. चीनला दिलेल्या उत्तराबद्दल हॅरॉल्ड विल्सन यांनी शास्त्रींचं अभिनंदन केलं. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यानं यावर म्हटलं होतं :

*''कम्युनिस्ट चीनच्या १६ सप्टेंबरच्या खलित्यात केलेले आरोप पंतप्रधान शास्त्री यांनी आज संसदेत फेटाळून लावले. भारत स्वतःचं रक्षण करायला तयार आहे, असंही त्यांनी ठामपणं सांगितलं. तसंच चीनच्या निर्वाणीच्या इशाऱ्यातील*

*हवा काढून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. सिक्कीम भागात भारत सीमेचा भंग करीत आहे की नाही याची शहानिशा करण्यासाठी तटस्थ निरीक्षक पाठवावेत असं भारतानं आरंभी सुचवलं होतं आणि चीननं संयुक्त पाहणी करावी असा आग्रह धरला होता. शांतता टिकवण्याच्या हेतूनं व चीनला आक्रमक कृती करण्यासाठी काही निमित्त मिळू नये म्हणून संयुक्त पाहणीला भारत तयार आहे असंही आता शास्त्रींनी सांगितलं आहे. योग्य त्या पातळीवर व उभयतांना सोयीच्या दिवशी या पाहणीची व्यवस्था केली जाईल.*

*शास्त्रींच्या या कृतीमुळं चीनला त्याची इच्छा असेल तर आपला निर्वाणीचा खलिता मागं घेता येईल. तसंच निर्वाणीच्या इशाऱ्याची मुदत संपल्यावर चीननं लष्करी कारवाई करायची असं ठरवलं तर ते असमर्थनीय ठरेल.''*

निर्वाणीच्या इशाऱ्याची मुदत रविवार दि. १९ सप्टेंबरला मध्यरात्री संपत होती. तरीही शनिवार दि. १८ सप्टेंबर रोजीच चिनी फौजांची जमवाजमव सिक्कीम रेषेच्या पूर्वेस व देमचोक भागात सुरू झाली होती. दरम्यान निर्वाणीच्या इशाऱ्याची मुदत संपण्याआधीच ती आणखी तीन दिवसांनी वाढवण्यात आल्याचा दुसरा खलिता चीननं धाडला. मात्र संयुक्त पाहणीची आपली सूचना त्यांनी मागं घेतली. तिबेट-सिक्कीम रेषेपुढील चीनच्या भागात अशी बेकायदा लष्करी बांधकामं असून त्यांची पाहणी करण्याची काही आवश्यकता नाही, असं त्यांनी या नव्या खलित्यात म्हटलं होतं. आता वाढवून दिलेल्या मुदतीच्या आत ती बांधकामं पाडून टाकण्याची चीननं मागणी केली होती. युनोच्या सुरक्षा समितीची २० सप्टेंबर रोजी बैठक भरणार होती. भारत व पाकिस्तान यांनी युद्धबंदी घोषित करावी अशी मागणी करणाऱ्या ठरावावर त्या बैठकीत चर्चा होणार होती. या बैठकीतून काय निष्पन्न होतं याची प्रतीक्षा चीनला करायची होती. युद्धबंदीला मान्यता देण्यापूर्वी काही शर्तींची पूर्तता व्हावी अशी अयूबखान यांची इच्छा होती. त्यांच्या या भूमिकेस बळ मिळावं अशीही चीनची इच्छा होती.

चीनच्या १९ सप्टेंबरच्या खलित्यासंबंधी पुढील ठाम शब्दांत शास्त्रींनी २० सप्टेंबरला निवेदन केलं :

*''चीनच्या पूर्वीच्या खलित्याला उत्तर देताना शांतता पाळण्याचा आमचा दृष्टिकोन होता हे सदनाच्या स्मरणात असेलच. परंतु त्याबाबत चीननं व्यक्त केलेली प्रतिक्रिया पाहता खऱ्या-खोट्या गाऱ्हाण्यांची शहानिशा करणं हा त्यांचा हेतू नसून आक्रमक कारवाईसाठी काही ना काही निमित्त शोधण्याचा त्यांचा हेतू आहे, असं दिसतं. या खेपेस त्यांचे मित्र असलेल्या पाकच्या मदतीनं ते हे करू पाहत आहेत. सुरक्षा समितीच्या बैठकीतून काय निष्पन्न होतं हे समजावं म्हणून निर्वाणीची मुदत वाढवून देण्यात आली आहे.*

*चीननं खलित्यात जे एकामागून एक आरोप केले आहेत, ते पाहता– आणि*

*समजा, हे आरोप खरे असले तरी– कोणत्याही सुसंस्कृत सरकारनं बळाचा वापर करावा या पात्रतेचे ते नाहीत. चीनच्या हद्दीत जर काही बांधकामं असतील तर ती पाडण्यापासून त्यांना कोणी रोखलं आहे? पण तसं न करता आम्ही ती पाडून टाकावी असं ते म्हणतात. आम्हांला त्यांच्या हद्दीत प्रवेश करूनच ते करावं लागेल. तसंच आमची गुरं पळवली किंवा या देशात आश्रय मागितलेल्या हजारो तिबेटवासीयांपैकी दोन-चार जणांना त्यांच्या इच्छेविरुद्ध डांबून ठेवण्यात आलं म्हणून एखादं सरकार दुसऱ्या सरकारला धमकी देईल, अशी कल्पना करणं अशक्य आहे.*

*आशियाई देशांना भारत धाकदपटशा दाखवतो, असं चीनला वाटतं व त्यामुळं आपणच या देशांचे पालक आहोत असा आभास आपल्या आक्रमक दृष्टिकोनाचं समर्थन करण्यासाठी तो निर्माण करीत आहे. आशियात आपली वरचढ भूमिका पार पाडण्याचा चीनचा हेतू असून तो कोणाही स्वाभिमानी आशियाई देशाला मान्य होणारा नाही. लहान असो वा छोटा, दुबळा असो वा बलवान, प्रत्येक देशाला समतेच्या आधारावर आपलं स्वातंत्र्य व सार्वभौमत्व जपण्याचा अधिकार आहे. चीनचं प्रभुत्व त्यांपैकी कोणताही देश स्वीकारू शकत नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून त्याबाबत आम्ही काय करावं किंवा करू नये हे सांगण्याचा चीनचा अधिकार आम्हांला मान्य नाही. किरकोळ मतभेद शांततेनं मिटवावेत ही आमची 'ऑफर' अजूनही खुली आहे.*

*चीननं ७२ तासांनी मुदत वाढवून दिली असली तरी प्रत्यक्षात सिक्कीम व लडाख येथील आमच्या ठाण्यांवर त्यांनी गोळीबार सुरू केला आहे. यावरून त्यांचा आक्रमणाचा हेतू स्पष्ट दिसतो. आपली आक्रमक चाल चीन चालू ठेवणार असेल तर आम्हीही आमचे सर्वशक्तीनिशी संरक्षण करू.*

*चीनला औपचारिक पत्र आज रवाना होईल.''*

त्यांच्या या निवेदनानंतर लोकसभेच्या एका ज्येष्ठ सदस्यानं विचारलं, ''आपण केवळ उत्तर पाठवण्यात समाधान मानणार आहोत की त्यांनी गोळीबार केला तर तुम्हीही गोळीबारानंच प्रत्युत्तर द्या, असे आदेश लष्कराला देणार आहोत?'' त्यावर शास्त्री म्हणाले, ''आम्ही त्यांना रोखू, आम्ही त्यांच्याशी लढू एवढंच मला सांगायचं आहे.'' या उद्‌गारांमुळं सदनाच्या मनात काही शंका उरली नाही.

२२ सप्टेंबर रोजी चीनविषयी अधिक माहिती देताना शास्त्री लोकसभेत म्हणाले :

*''चीनचा निर्वाणीचा इशारा अजूनही आपल्यापुढं आहे. भारताला ७२ तासांची मुदत चीननं वाढवून दिली, परंतु त्याच वेळी सीमेवर अनेक ठिकाणी त्यांच्या फौजांनी चिथावणीकारक कृत्यं सुरू केली होती. ज्या सिक्कीम सीमारेषेविषयी चीन बिनबुडाचे धमकीवजा आरोप करीत आहे त्या रेषेवरील डोंगचुइला व नाथुला इथे अनुक्रमे २० व २१ सप्टेंबर रोजी रेषेचा भंग करून चिनी फौजा आत घुसल्या,*

*आमच्या निरीक्षण ठाण्यांवर त्यांनी गोळीबार केला. आमच्या अन्य प्रदेशांतही घुसण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आक्रमकाला योग्य जबाब द्या अशा सूचना आम्ही सैन्याला दिलेल्या आहेत.*

*भारतीय सैन्य दम छाले इथे घुसल्याचा आरोप चीननं २० सप्टेंबरच्या खलित्यात केला असून तो कपोलकल्पित आहे. साकर इथे घुसून गोळीबार केल्याच्या आपल्या कृत्यावर पांघरूण घालण्यासाठी तो तसा आरोप करीत आहे.*

*सीमेच्या तिबेटकडील भूप्रदेशात जर लष्करी बांधकामं संयुक्त पाहणीत आढळली तर ती पाडून टाकण्यास आमची काही हरकत नाही, असं आम्ही चीनला कळवलं आहे. आमच्या फौजांनी माघार घेताना त्यांपैकी काही बांधकामं उद्ध्वस्त केली, असं चीननं जाहीर केल्याचं मला सांगण्यात आलं. हा सारा चीनचा निव्वळ कल्पनाविलास आहे.*

*सीमेलगतच्या चीनच्या हालचाली व आमच्या प्रदेशात केले जात असलेले सशस्त्र अतिक्रमण यांची आम्ही गांभीर्यानं दखल घेतली आहे. त्यांच्या १९ सप्टेंबरच्या खलित्याला २१ सप्टेंबरला पाठवलेल्या उत्तरात चीननं दडपशाहीचा मार्ग सोडून शांततेचा मार्ग अनुसरावा, अशी विनंती आम्ही केली आहे. एवढ्या उशिरा देखील आमच्या या आवाहनाला प्रतिसाद देऊन एक मोठा पेचप्रसंग ते टाळतील अशी मला आशा वाटते.*

*यापुढं चीन काय करील हे आम्हांला ठाऊक नाही. अर्थात आपल्याला साऱ्या सीमारेषेबाबत जागरूक राहायला हवं.''*

भारत-पाक युद्ध लांबावं अशी चीनची इच्छा होती व लढाई चालूच ठेवावी असा सल्ला त्यानं अयूबखानना दिला होता. त्यामुळं २० सप्टेंबर रोजी युनोच्या सुरक्षा समितीनं तत्काळ युद्धबंदी करण्याचा केलेला ठराव पाकनं मान्य केला म्हणून चीन निराश झाला. यापुढं भारताशी शाब्दिक युद्ध चालू ठेवण्यात अर्थ नाही, असं त्यानं ठरवलं. माघार घेताना 'भारतीय फौजांनी आक्षेपार्ह बांधकामं' पाडून टाकली असं चीननं जाहीर केलं ते अनपेक्षित नव्हतं.

या सबंध घडामोडींत शास्त्रींच्या मुत्सद्देगिरीला विनोदाची बारीक किनार होती. सीमेपलीकडील चीनच्या भागातील बांधकामं पाडून टाका, अशी मागणी करताना ''प्रत्यक्षात भारतीय सैन्याला आपल्या प्रदेशात येण्याचं आमंत्रणच आपण देत आहोत हे त्यांना उमजलं की नाही कोण जाणे!'' या शास्त्रींच्या मल्लीनाथीला जगभर प्रसिद्धी मिळाली व ती वाचून वाचकांची चांगलीच करमणूक झाली. ही घटना त्या मानानं किरकोळ असली तरी एक संभाव्य आंतरराष्ट्रीय पेचप्रसंग टाळण्यात तिचाही हातभार लागला असेल काय?

चीनशी गंभीर मतभेद निर्माण झाले असले तरी अखेर भारत व चीन यांना शांततेच्या वातावरणात व एक चांगले शेजारी म्हणून नांदायचं आहे याची जाणीव

ठेवून शास्त्रींनी या पेचप्रसंगाच्या क्षणी चीनबद्दल सलोख्याची भाषा वापरली. अर्थात उभयपक्षी सध्याच्या भावनांची तीव्रता कमी झाल्यावरच म्हणजे काही काळ गेल्यावरच दोन्ही देशांतील संबंध सुरळीत व मैत्रीचे व्हावेत म्हणून प्रयत्न करता येतील, असं त्यांचं मत होतं.

इथे मी माझा चीनविषयक अनुभव नोंदवू इच्छितो. युनोच्या 'इंटरनॅशनल मॅरिटाइम ऑर्गनायझेशन'चा सरचिटणीस म्हणून लंडन इथे काम पाहताना १९७४ ते १९८९ या काळात चीनला सपत्नीक भेट देण्याचा अनेकदा योग आला. त्या वेळी आमचं नेहमीच अत्यंत प्रेमानं स्वागत झालं व आतिथ्यही अत्यंत शानदार असे. सरकारमधील उच्चपदस्थ अत्यंत सौजन्यानं स्वागत करीत. भारताविरुद्ध पूर्वग्रह असल्याची पुसटशी छटाही आम्हांला कधी जाणवली नाही. यजमान चिनी मंडळी भारताबद्दल आदरानं बोलत व पार्टीत चीन-भारत मैत्री चिरायू होवो अशा शुभेच्छा देत. मी पण चीन सरकार व जनता यांच्याबद्दल आदरभाव प्रकट करून प्रतिसाद देई.

चिनी लोक अत्यंत सुसंस्कृत, स्वाभिमानी, शालीन व देशभक्त आहेत. आपण प्रामाणिकतेनं व स्पष्टपणं वागलो तर ते चांगला प्रतिसाद देतात.

□□

।। सोळा ।।



# युनोतील घडामोडी

युनोच्या न्यूयॉर्क येथील मुख्यालयात १६ सप्टेंबरला परतताच ऊ थांट यांनी सुरक्षा समितीला प्राथमिक अहवाल सादर केला. त्याच दिवशी दुपारी त्यांनी आणखी एक अहवाल दिला. त्यात सद्यःस्थितीबाबतचं त्यांचं मूल्यमापन होतं आणि सुरक्षा समितीच्या विचारार्थ काही सूचना होत्या. हा दुसरा अहवाल म्हणजे उत्तम मुत्सद्देगिरीचा जणू दस्ताऐवजच होता. त्यातला काही भाग असा :

*"प्रत्येक देशाला दुसऱ्यानं गैरफायदा घेतला असं वाटतं, प्रत्येकाला दुसऱ्यानं आक्रमण केलं असं वाटतं.*

*अशा परिस्थितीत पेटलेल्या भावना, गैरसमज, संशय, भीती, उद्विग्नता, धगधगत्या राष्ट्रभावना आदींचा समावेश असतो. त्यामुळं इतिहासात अनावश्यक व निरर्थक युद्धं झाली आहेत. याच कारणांमुळं बिनशर्त युद्धबंदी करण्याच्या सुरक्षा समितीच्या आवाहनांना प्रतिसाद देणं हे उभय देशांच्या नेत्यांना कठीण होऊन बसतं.*

*सध्याच्या संघर्षाच्या क्षेत्रात शत्रुत्वाच्या हालचाली थांबवण्याची व युद्धबंदी करण्याची इच्छा दोन्ही बाजूंनी व्यक्त केलेली आहे. सुरक्षा समितीच्या ठरावाला दोन्ही बाजू मान्यता देतील असा वास्तव उपाय मात्र मला अद्याप सापडलेला नाही."*

जागतिक शांततेला असलेल्या धोक्याच्या मुद्द्यावर भर देऊन सरचिटणीसांनी पुढील प्रस्ताव सुचवला होता :

*"यापूर्वीच्या संघर्षात सुरक्षा समितीनं जी यशस्वी उपाययोजना केली होती तशीच आताही करावी लागेल. युनोच्या सनदेच्या ४० व्या कलमानुसार यापुढं लष्करी कारवाई थांबवावी व आपल्या फौजांना युद्धबंदी करण्याचे आदेश द्यावेत, असं दोन्ही सरकारांना सुरक्षा समिती सांगू शकेल. जर हे मान्य केलं नाही तर सनदेच्या ३९ व्या कलमानुसार शांततेचा भंग केला असं मानलं जाईल, असंही सुरक्षा समितीला जाहीर करता येईल."*

युनोच्या बंधनकारक असलेल्या सनदेनुसार कारवाई करावी अशी शिफारस सरचिटणीसांनी केली होती. या संदर्भात ४१ व ४२ ही कलमं महत्त्वाची आहेत. ती अशी :

*कलम ४१ : आपले निर्णय अमलात आणण्यासाठी लष्करी उपायाव्यतिरिक्त अन्य कोणते उपाय योजावेत हे सुरक्षा समिती ठरवू शकते. तसेच युनोच्या सदस्य राष्ट्रांनी हे उपाय मान्य केले पाहिजेत असं सांगू शकते. या उपाययोजनेमध्ये आर्थिक संबंधात पूर्णतः वा अंशतः व्यत्यय, तसंच रेल्वे, हवाई वा सागरी वाहतूक, टपाल, तार, रेडिओ व अशा तऱ्हेच्या अन्य दळणवळण संबंधांत व्यत्यय आणि राजनैतिक संबंध तोडणं यांचा अंतर्भाव आहे.*

*कलम ४२ : कलम ४१ मधील उपाययोजना अपुरी आहे अथवा ती अपुरी ठरली असं जर सुरक्षा समितीला वाटलं तर आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा पूर्ववत राखण्यासाठी आवश्यक असेल तर हवाई, सागरी वा भूदल फौजांमार्फत योग्य ती कारवाई करता येईल. त्यात निदर्शनं, नाकेबंदी अथवा युनोच्या सदस्य राष्ट्राच्या भूदल फौजांमार्फत अन्य कारवाई यांचा समावेश राहील.*

अलीकडील इराक-कुवेत संघर्षाच्या वेळी याच कलमांतील तरतुदीनुसार युनोनं कारवाई केलेली होती.

१७ सप्टेंबर १९६५ रोजी युनोच्या सुरक्षा समितीची बैठक भरली. झा, छगला व पार्थसारथी यांनी भारताचं प्रतिनिधित्व केलं. न्यूयॉर्कला रवाना होण्यापूर्वी शास्त्रींनी या प्रश्नाबाबत छगलांशी प्रदीर्घ चर्चा केली होती.

युनोच्या या बैठकीत छगला यांनी भारताची बाजू अत्यंत प्रभावीपणं मांडली. त्यात फुकाचा आविर्भाव नव्हता, तसंच ते नुसतंच एक लंबंचवडं भाषण नव्हतं. त्यातील काही भाग असा :

*"आमच्या देशाचं हे खास दुर्दैवच आहे... आमचे महान नेते महात्मा गांधी*

*यांनी सर्व जगाला अहिंसेचा व शांततेचा संदेश दिला आणि आमच्या देशालाच या युद्धात गुंतून पडावं लागावं ही दुःखद बाब आहे. परंतु आक्रमणाविरुद्ध देशानं स्व-रक्षण केलंच पाहिजे, अशीही शिकवण आम्हांला गांधीजींनी दिली होती. राष्ट्राला स्वाभिमान व प्रतिष्ठा असलीच पाहिजेत. जो देश प्रतिष्ठा व स्वाभिमान गमावतो त्या देशाचं अस्तित्वच संपुष्टात येतं, असं गांधीजींनीच सांगून ठेवलं आहे. सध्याचा संघर्ष हा काही आमच्यामुळं सुरू झालेला नाही. पाकच्या आक्रमणाला आम्हांला सशस्त्र प्रत्युत्तर द्यावं लागत आहे ते केवळ स्व-रक्षणासाठी. पाकनं सर्वप्रथम तोफखाना वापरला, हवाई छत्र घेऊन रणगाडे वापरले, शहरांवरील बॉम्बफेकीला पाकनंच आरंभ केला. छत्रीधारी सैनिक पाकनंच पाठवले. आमच्या एका बंदरावर हल्ला करण्यासाठी पाकनं त्याच्या नौदलाचा वापर केला. आम्ही तर आमच्या नौदलाचा मुळीच वापर केलेला नाही.*

*आक्रमक कोण आहे हा या बैठकीपुढं मूलभूत प्रश्न असून त्याचं उत्तर सुरक्षा समितीनं द्यायला हवं. सुरक्षा समितीनं या प्रश्नाचं उत्तर देण्यास संकोचू नये. सरचिटणीसांनी सादर केलेल्या अहवालाचा आदर करावा अशी विनंती मी करीत आहे. ५ ऑगस्ट रोजी पाकिस्ताननं आक्रमण केलं हे तुम्हांला पटलं तर या आक्रमणाचा निषेध करणं तुमचं कर्तव्य आहे. तसं केलं नाही तर आंतरराष्ट्रीय कायद्याला काहीच अर्थ उरणार नाही व आंतरराष्ट्रीय सोसायटी टिकू शकणार नाही..''*

छगला हे स्वतः भारतीय मुस्लीम होते व त्यांचा निधर्मी दृष्टिकोन वादातीत होता. काश्मीरमधील युद्ध ही पवित्र लढाई आहे या पाकिस्तानच्या दाव्याच्या त्यांनी चिंधड्या उडवल्या. ते म्हणाले :

*''हे युद्ध धार्मिक आहे असं दाखवणं हा पाकचा दुसरा हेतू आहे. आपण सारे अत्याधुनिक युगात राहत आहोत. धर्म ही वैयक्तिक, अत्यंत निकटची अशी बाब आहे हे समजून घ्यायला आपण शिकलो आहोत.... काश्मीरमध्ये वीस लक्ष मुस्लीम आहेत, पण भारतात पाच कोटी मुस्लीम आहेत. भारत हा जगातील सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेला तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे, याचा अनेकदा अनेकांना विसर पडतो. बहुसंख्याकांना असलेले सारे हक्क घटनेनुसार आमच्या या मुस्लीम बांधवांना मिळत असून ते समाधानी आहेत. परंतु पाकला हे आवडत नाही, कारण त्यांचे राष्ट्र धार्मिक आहे. धर्म हा नागरिकत्वाचा पाया आहे असं पाक मानतो. आमच्या दृष्टीनं धर्म हा नागरिकत्वाचा पाया नाही. मध्य पूर्वेत व जगातील अन्य देशांत जेथे विविध धर्मांचे लोक राष्ट्रीय नागरिक म्हणून सुखानं नांदतात त्यांना माझं हे म्हणणं पटेल.*

*भुत्तोंचं एक बरं आहे. ते या धर्मयुद्धाबद्दल उद्धरणं पुरवीत असतात. ३ सप्टेंबर १९६५ रोजी नभोवाणीवरून बोलताना भुत्तो म्हणाले होते, ''काश्मीरमध्ये*

*युद्ध करताना भारतानं गाफील राहू नये. इतिहासानं दिलेला धडा त्यांनी विसरू नये. आतापर्यंत सॉलोमनसारखा संयम पाकनं दाखवला असला तरी इस्लामच्या शूर हीरोंचे आम्ही वंशज आहोत, हे भारतानं विसरू नये. या हीरोंनी न्यायासाठी व सन्मानासाठी आपले प्राण देताना मागंपुढं पाहिलं नव्हतं.''*

*'इस्लामचे शूर वीर बरं का? ते इस्लामचे युद्ध खेळत आहेत म्हणे! याचा अर्थ इस्लाम असहिष्णू आहे आणि लढाई, संघर्ष यांवर त्याचा विश्वास आहे! असं म्हणणं हा इस्लामचा अवमान आहे. १४ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन स्वागत-सोहळ्याच्या वेळी लाहोर येथे भुत्तो म्हणाले, ''भारत हा केवळ धमक्यांवर विश्वास ठेवणारा देश आहे... ... अखेर न्यायाचाच विजय होईल हे मी शास्त्रींना व भारताला सांगू इच्छितो. आम्ही यात एकटे नाही. आमचा धर्म साऱ्या जगभर पसरत आहे.''*

*त्यांचे हे आवाहनही धार्मिक आहे. या धोक्याची सुरक्षा समितीला जाणीव व्हावी. भारतात पाच कोटी मुस्लीम शांततेनं व सलोख्यानं, अन्य जमातींशी मैत्रीभावानं नांदत आहेत. या एकात्मतेत बाधा आणावी, जातीय तेढ निर्माण करावी व मग सुरक्षा समितीला अथवा जगाला ओरडून सांगावं की, 'बघा, भारत अल्पसंख्याकांना वाईट वागणूक देत आहे.' असा हा पाकचा डाव आहे.*

शास्त्रींनी १४ व १५ सप्टेंबर रोजी सरचिटणीसांना पाठवलेल्या पत्रात बिनशर्त युद्धबंदीचा स्वीकार केला आहे. भारताची आजही तीच भूमिका आहे. मात्र पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान यांनी घातलेल्या अटी भारत मान्य करणार नाही, असंही छगला यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस स्पष्ट केलं. तरीही बैठकीत झालेल्या चर्चेच्या वेळी पाकिस्तानच्या वतीनं त्यांच्या कायदा मंत्र्यांनी पाकिस्तानच्या व अयूबखानांच्या अटींचा पुनरुच्चार केला.

अखेरीस अन्य सदस्यांशी सल्लामसलत करून नेदरलँडच्या शिष्टमंडळानं मांडलेल्या ठरावाच्या मसुद्याला बैठकीत जोरदार पाठिंबा देण्यात आला. तत्काळ युद्धबंदी करावी व ५ ऑगस्टपूर्वीच्या जागी फौजा हटवाव्यात अशी मागणी या ठरावात केलेली होती. संघर्षाच्या पार्श्वभूमीशी असलेल्या राजकीय प्रश्नाचा नंतर विचार करण्यात येणार होता. मलेशियाच्या प्रतिनिधीनं भारताच्या भूमिकेला ठाम पाठिंबा दिला व युद्धबंदीसाठी पाकनं घातलेल्या अटींना प्रखर विरोध केला. बिनशर्त युद्धबंदी स्वीकारण्याच्या भारताच्या प्रतिसादाला सोविएट युनियननं पाठिंबा दर्शविला. केवळ जॉर्डनच्या शिष्टमंडळानं पाकच्या भूमिकेचं समर्थन केलं.

१७ ते २० सप्टेंबर १९६५ पर्यंत समितीच्या बैठकीत चर्चा झाली. त्यानंतर पुढील ठराव १० मतांनी मंजूर झाला. ठरावाच्या विरोधी एकही मत पडलं नाही. मात्र जॉर्डन त्या वेळी अनुपस्थित राहिला.

*सुरक्षा समितीनं सरचिटणीसांनी भारत व पाकिस्तान सरकारांशी चर्चा करून*

*सादर केलेल्या अहवालांवरही विचार केला.*

*४ व ६ सप्टेंबरच्या सुरक्षा समितीच्या ठरावांचा पाठपुरावा करण्यासाठी सरचिटणीसांनी केलेल्या प्रयत्नांची समितीनं प्रशंसा केली. भारत व पाकिस्तान यांच्या प्रतिनिधींचं म्हणणंही समितीनं ऐकून घेतलं.*

*सरचिटणीसांच्या अहवालात (एस/६६८३) करण्यात आलेल्या आवाहनाला संबंधितांनी दिलेल्या भिन्न प्रतिसादांची नोंद घेण्यात आली. परंतु अजून युद्धबंदी अमलात आलेली नाही, याबद्दल काळजी व्यक्त करण्यात आली.*

काश्मीर व अन्य संबंधित गोष्टींबद्दलच्या दीर्घकाळ पडून असलेल्या वादातून शांततापूर्ण मार्ग काढण्यासाठी हा संघर्ष लौकर थांबवण्यासाठी पहिलं पाऊल उचलायला हवं याबाबत समितीची खात्री पटली असल्याचं समितीनं स्पष्ट केलं. समितीनं केलेले ठराव असे :

*(१) २२ सप्टेंबर १९६५ रोजी सकाळी ७ वाजता (ग्रीनविच वेळ) युद्धबंदी अमलात यावी, उभय राष्ट्रांनी आपापल्या लष्कराला तशा सूचना द्याव्यात आणि ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी जेथे फौजा होत्या तेथे त्या नेण्यात याव्यात अशी सुरक्षा समिती मागणी करीत आहे.*

*(२) युद्धबंदीवर देखरेख ठेवण्यासाठी व सर्व सशस्त्र फौजा मागं घेण्यासाठी आवश्यक ते साहाय्य उपलब्ध करून द्यावं अशी सरचिटणीसांना विनंती करीत आहे.*

*(३) या क्षेत्रातील स्थिती चिघळेल असं काहीही कृत्य करू नये असं आवाहन सर्व देशांना करीत आहे.*

*(४) ६ सप्टेंबरच्या सुरक्षा समितीच्या २१० क्रमांकाच्या ठरावातील पहिल्या परिच्छेदानुसार अंमलबजावणी होताच सध्याच्या संघर्षामागील राजकीय समस्येवर तोडगा काढण्यासाठी साहाय्य करण्याकरिता काय उपाय योजावेत याचा विचार करण्याचं ठरविण्यात आलं. दरम्यान युनोच्या सनदेतील ३३ व्या कलमानुसार उभय सरकारांनी सर्व शांततामय मार्ग वापरावेत असं आवाहन उभय देशांना करीत आहेत.*

*(५) या ठरावाची अंमलबजावणी व्हावी म्हणून सरचिटणीसांनी शक्य ते सर्व प्रयत्न करावेत, शांततामय तोडगा निघण्यासाठी हातभार लावावा आणि त्याबाबत सुरक्षा समितीकडे अहवाल सादर करावा अशी सरचिटणीसांना विनंती करीत आहेत.*

हा ठराव भारताच्या दृष्टीनं– विशेषतः शास्त्रींच्या दृष्टीनं– अत्यंत महत्त्वाचा व अनेक कारणांनी राजकीय दृष्ट्या यशस्वी ठरणाराच होता. पाकिस्तानची एकही अट मान्य केली गेली नाही. काश्मीरबद्दल युनोने पूर्वी केलेल्या ठरावाचा उल्लेखही त्यात नव्हता. (त्यामुळं याबाबत युनोनं नेहमीची प्रथाही पाळलेली नव्हती.) ५ ऑगस्टचा

उल्लेख पाकिस्तान हे आक्रमक राष्ट्र आहे हे भारताचं म्हणणं अप्रत्यक्षपणं पण स्पष्टपणं मान्य करणार होता. येनकेन प्रकारेण भारताला आक्रमक ठरवण्याच्या पाकिस्तानच्या प्रयत्नांना अपयश आलं होतं. दोन्ही महासत्तांनी घेतलेली भूमिका भारताला अनुकूल होती. सोविएट युनियननं सुरक्षा समितीच्या बैठकीत पडद्याआड व उघडपणंही भारताच्या भूमिकेला पाठिंबा दिला. शास्त्रींनी बिनशर्त युद्धबंदीला मान्यता दिल्यामुळं सोविएट रशियाला आनंद झाला होता. शास्त्रींनी जॉन्सन यांच्याशी संपर्क ठेवल्यानं अमेरिका आणि भारत यांच्यातील अंतरही खूप कमी झालं होतं.

□□



।। सतरा ।।

# क्रिकेट व 'नॅट'

भारतीय भूदलाचं संख्याबळ ८ लाख २५ हजार होतं. त्याखेरीज प्रादेशिक सेनेत ४७ हजार जण होते. दोन्ही मिळून एकूण संख्याबळ ८ लाख ७२ हजार होतं. या भूदलात पायदळाच्या २० डिव्हिजन्स, एक रणगाडा डिव्हिजन व एक रणगाडा ब्रिगेड यांचा समावेश होता. त्यांपैकी पश्चिम पाक सीमेवर केवळ १७ पायदळ डिव्हिजन्स असून एक रणगाडा ब्रिगेड व एक डिव्हिजन तैनात केलेली होती.

पाकिस्तानच्या भूदलाचं संख्याबळ २ लाख ५० हजार इतकं होतं. त्यांपैकी नियमित लष्करात १ लाख ८० हजार व निमलष्करी दलात ७० हजार जण होते. त्यांच्याकडे ६ पायदळ डिव्हिजन्स होत्या. त्यांपैकी एक पूर्व पाकिस्तानात व उरलेल्या पाच पश्चिम पाकिस्तानात होत्या. त्याखेरीज पाककडे आणखी २ रणगाडा डिव्हिजन्स होत्या.

पायदळाच्या बाबतीत संख्येच्या दृष्टीनं विचार केला तर भारताचं बळ अधिक होतं हे खरं, परंतु दोन्ही देशांच्या सैन्याकडे उपलब्ध असलेली शस्त्रास्त्रं व उपकरणं यांचा विचार केला तर मात्र चित्र फारच वेगळं होतं.

भारताच्या तोफखाना (आर्टिलरी) रेजिमेंट्सकडे दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील तोफा होत्या, तर पाकच्या रेजिमेंट्सकडे अमेरिकेनं पुरवलेल्या उच्च दर्जाच्या आधुनिक 'मॅप' तोफा होत्या. तसंच पाककडे रणगाडाविरोधी तोफा होत्या. १०६ मि. मी. मागं झटका न देणाऱ्या रणगाड्यांचा संहार करू शकतील असल्या तोफा होत्या. पाकिस्तानच्या

पायदळाकडे अत्याधुनिक अमेरिकन उपकरणं होती. स्वयंचलित रायफली, मशिनगन्स, गायडेड मिसाइल्स, लांब पल्ल्याच्या व झटकन गोळीबार करू शकणाऱ्या रायफली, जमिनीवर त्याचप्रमाणं पाण्यावरही चालू शकणारी वाहनं होती. पल्ला व आकार या दृष्टीनं पाकिस्तानकडील उपकरणांचं सामर्थ्य मोठं होतं. तसंच भारताच्या पायदळ डिव्हिजन्सच्या तुलनेनं त्यांची गतिशीलताही अधिक होती.

मध्यम प्रतीचे रणगाडे पुढीलप्रमाणं होते :

| भारत | पाकिस्तान |
|---|---|
| सेंचुरियन २७०<br>शेर्मन ४७२ | पॅटन ५९४<br>शेर्मन ३३० |
| एकूण ७४२ | ९२४ |

भारत व पाकिस्तान यांच्याकडे अनुक्रमे ४२४ व १४४ हलके रणगाडेही होते. परंतु युद्धात ते क्वचितच वापरले जात.

मध्यम प्रकारच्या रणगाड्यांच्या बाबतीत पाकिस्तानची स्थिती संख्यात्मक दृष्ट्या वरचढ होती. त्याच बळावर त्यानं भारतात चढाई केली होती. किंबहुना १९६५ च्या भारत-पाक युद्धात याच रणगाड्यांचा वापर त्यांनी जास्त केला. भारताकडे सेंचुरियन वगळता बाकीचे रणगाडे दुसऱ्या महायुद्धातील होते. त्या महायुद्धानंतरच्या काळात ब्रिटननं सेंचुरियन रणगाड्यांचं उत्पादन केलं असलं तरी १९६५ पर्यंत तेही कालबाह्य झालं होतं. पाकिस्तानचे पॅटन रणगाडे हे त्या प्रकारच्या रणगाड्यांत सर्वांत आधुनिक होते. अमेरिकेनं निर्मिलेले पॅटन रणगाडे (एम ४७ व एम ४८) हे युरोपातील नाटो फौजा वापरत होत्या. या रणगाड्यांवर २००० यार्डपर्यंतचा पल्ला असलेल्या ९० एमएम तोफा बसवलेल्या होत्या. तसंच रात्रीच्या वेळी पुढं अचूक दिसण्याची सोय असलेली इन्फ्रारेड उपकरणंही त्यावर बसवलेली होती. तसंच पाकिस्तानकडे अत्यंत शक्तिशाली व संहारक समजले जाणारे 'पॅटन ३६ बी-२' रणगाडेही होते. त्यांचा पल्ला लांब असून तोफ सामर्थ्यवानही होती.

जेव्हा उघड युद्ध सुरू झालं तेव्हा लेफ्ट. जनरल हरबक्षसिंग यांनी उभय देशांच्या लष्करी सामर्थ्याचं पुढीलप्रमाणं मूल्यमापन केलं होतं :

*रणगाड्यांच्या बाबतीत संख्या व दर्जा या दृष्टीनं पाकिस्तान भारतापेक्षा वरचढ आहे हे वरील माहितीवरून स्पष्ट होतं. त्यांचा तोफखाना बलशाली असून त्याबाबत त्यांचं प्रभुत्व निश्चित होतं. त्यांच्या मध्यम पल्ल्याच्या तोफांचा दर्जा आपल्यापेक्षा खूपच वरच्या दर्जाचा होता. आक्रमक वा बचावात्मक पवित्र्याच्या वेळी रणगाडा व तोफखाना यांचा संयुक्त वापर कसा केला जातो हा अत्यंत महत्त्वाचा व निर्णायक घटक असतो. त्याबाबत पाकिस्तानची स्थिती खूपच मजबूत होती. केवळ पायदळाबाबत संख्येच्या दृष्टीनं आपली ताकद मोठी होती, पण घाईघाईनं*

*प्रशिक्षण दिलेल्या सैनिकांमुळं त्याचा प्रभावी वापर करणं जमत नव्हतं. पाकच्या पायदळ बटालियनजवळ असलेली स्वयंचलित व रणगाडाविरोधी उपकरणं आपल्या तुलनेनं दुप्पट होती.*

भारताच्या तुलनेनं आपली ताकद जास्त आहे हा पाकचा गणिती अंदाज बरोबर असला तरी मानवी घटकांचं मूल्यमापन करण्यात मात्र त्यांची गफलत झाली, असा शेरा ज़नरलनी नोंदवला होता.

स्वातंत्र्यानंतर १९६५ मध्ये प्रथमच हवाई दलाचा लढाईत अंतर्भाव केला गेला. 'द आर्म्स ट्रेड अँड इंटरनॅशनल ट्रेड' या पुस्तकात लेविस ए. फ्रँक यांनी दिलेल्या माहितीनुसार १९६५ च्या युद्धाच्या आधी पाकिस्तानकडे १२० एफ-८६ सेबर, ३० बी ५७ बॉंबर्स व २० एफ १०४ स्टार फायटर्स विमानं होती. जॉन फ्रिकर यांनी 'बॅट्ल फॉर पाकिस्तान' या पुस्तकात दिलेल्या माहितीनुसार त्या वेळी पाकिस्तानकडे १२ आर टी ३३ जातीची विमानंही होती. एकूण त्यांच्याकडे १८२ विमानं होती. त्यांपैकी १२ पूर्व पाकिस्तानात, तर उरलेली १७० पश्चिम पाकिस्तानात होती.

त्या वेळी भारताकडे सर्व प्रकारची मिळून एकूण केवळ ४५० लढाऊ विमानं होती. पश्चिम भागातील १६ स्क्वाड्रन्समध्ये त्यांतील ३०० विमानं होती. त्याखेरीज हवाई दलाची नऊ स्क्वाड्रन पथकं चीननं काही हालचाल केली तर किंवा पाकचा संभाव्य धोका लक्षात घेऊन पूर्व भागात तैनात केलेली होती. एकूण पाक हवाई दलाच्या तुलनेनं भारतीय हवाई दलाची ताकद १ ला १.८ इतकी होती. परंतु केवळ आकडे काही सारी कहाणी सांगत नाहीत.

भारतीय हवाई दलाकडील विमानांत प्रामुख्यानं 'व्हँपायर्स', 'मिस्टियर्स', 'तुफानी' या विमानांचा भरणा होता. 'व्हँपायर' कालबाह्य झालेली होती. एका स्क्वाड्रनमध्ये असतात त्यापेक्षा थोडी जास्त या जातीची विमानं होती व ती पश्चिम क्षेत्रात ठेवलेली होती. लढाईच्या आरंभीच्या चकमकीनंतर सारी 'व्हँपायर' विमानं काढून घेण्यात आली. 'मिस्टियर्स' विमानं 'व्हँपायर'पेक्षा बरी असली तरी नॅट व हंटर विमानांचं संरक्षक हवाई छत्र असेल तरच त्यांचा वापर करणं शक्य होतं. पश्चिम क्षेत्रात अशा 'मिस्टियर्स' विमानांची चार स्क्वाड्रन्स होती. पाकिस्तान हवाई दलाच्या वेगवान व संहारक सेबर व स्टार फायटर्सच्या माऱ्यापुढं आपली ही विमानं बचावहीन ठरत. तेव्हा कालबाह्य 'व्हँपायर्स' व बचावहीन 'मिस्टियर्स' विमानं वगळता भारत व पाकिस्तान यांच्या हवाई दलांचं पश्चिम क्षेत्रातील हवाई सामर्थ्य हे तुल्यबल होतं, असं जाणकारांचं मत आहे.

अत्याधुनिकता व कामगिरी या दृष्टीनं पाकच्या सेबर व स्टार फायटर्स यांच्या तोडीची विमानं भारताजवळ नव्हती. भारताकडे डझनभर मिग-२१ विमानं होती, परंतु ती खूप उशिरा– म्हणजे युद्ध सुरू होण्यापूर्वी मिळालेली होती. 'कॉंबॅट एअर पेट्रोल्स' (सी. ए. पी.) मध्येच त्यांचा वापर करणं शक्य होतं. युद्धानंतर सेबरचा कर्दनकाळ

म्हणून ओळखल्या गेलेल्या 'नॅट' विमानांच्या कुवतीला मर्यादा होत्या. सेबरवर १५०० याड्‌र्स पल्ल्याच्या सहा तोफा बसवलेल्या होत्या, तर नॅटवर फक्त दोनच तोफा होत्या आणि त्यांचा पल्ला ८०० यार्ड इतकाच होता.

हवाई लढाईत प्राणघातक ठरू शकतील अशी अस्त्रं पंख्याखाली लावलेली उष्णताशोधक क्षेपणास्त्रं सेबरवर बसवलेली होती. नॅटवर अशा प्रकारची अस्त्रं नव्हती. जगातील आघाडीवरील विमानांत गणना केल्या जाणाऱ्या एफ १०४ लढाऊ विमानाला तुल्यबल ठरू शकतील अशी विमानं भारतीय हवाई दलाकडे नव्हती.

दुसऱ्या एका बाबतीत भारतीय हवाई दलाची स्थिती अडचणीची होती. १९६२-च्या पराभवानंतर सरकारनं हवाई दलात ४५ स्क्वाड्रन्स स्थापन करून ते बलशाली करायचं ठरवलं होतं. परंतु १९६५ ला युद्ध सुरू झालं तेव्हा हे उद्दिष्ट दूरच राहिलं होतं. तेव्हा केवळ तिसावं स्क्वाड्रन तयार केलं जात होतं. त्याआधीच्या तीन वर्षांत हवाई दलाच्या सामर्थ्यात वेगानं वाढ झाली खरी, पण त्यासाठी सखोल प्रशिक्षण दिलं गेलं नाही व जुन्या स्क्वाड्रन्समधील प्रशिक्षित पायलट व तंत्रज्ञ कमी करावे लागले होते.

ऑक्टोबर १९५६ मध्ये एअर कमोडोरचा दर्जा असलेले मंत्रिमंडळ उपसचिव एअर चीफ मार्शल पी. सी. लाल हे भारतीय हवाई दलासाठी योग्य अशा लढाऊ विमानांची खरेदी करण्याच्या दृष्टीनं युरोपियन बाजारपेठेची पाहणी करण्यासाठी गेले होते. १५ ऑक्टोबर रोजी ब्रिटिश खाडीवरून 'सुपरमरीन स्विफ्ट' विमानातून प्रवास करीत असताना एक छोटं लढाऊ विमान आकाशात नागमोडी वळणं घेताना त्यांनी पाहिलं होतं. सुपरमरीन विमानांचा सौदा काही झाला नाही. तेव्हा त्यांना त्या छोट्या विमानाची आकाशातली कवाईत आठवली. भारताला ती 'नॅट' विमानं खरेदी करता येतील काय? या उद्देशानं त्या विमानाचा डिझायनर डब्ल्यू. ई. डब्ल्यू. पेटर याला लाल भेटले. परंतु आपला हा शोध भारताला विकण्यास पेटर यानं साफ नकार दिला. पेटर व त्याचं संचालक मंडळ यांच्यासमवेत भोजन घेत असताना लाल पेटर यांनी दिलेल्या स्पष्ट नकारामुळे खिन्न झाले. संभाषणाच्या ओघात क्रिकेटचा विषय निघाला व लाल यांचा चेहरा फुलला. त्यांना क्रिकेटची भारी आवड. भारतातील क्रिकेटसंबंधी ते धडाधडा बोलू लागले. जणू त्यांची कॉमेंट्रीच सुरू झाली. नुकत्याच झालेल्या राष्ट्रपती संघ विरुद्ध पंतप्रधान संघ यांच्यातील सामन्याचं वर्णन त्यांनी ऐकवलं. पेटर व त्याचे संचालक ते वर्णन ऐकण्यात रममाण झाले आणि भोजन आनंदात पार पडलं. तरीही भारतीय हवाई दलाशी तो सौदा न झाल्यानं लाल यांना मात्र वाईट वाटत होतं.

त्यानंतर काही दिवसांनी अचानक पेटरचा लाल यांना फोन आला व भारताला 'नॅट' विमानं विकण्याची तयारी त्यानं दर्शवली. एवढंच नव्हे, तर भारताला या विमानाचं उत्पादन करायचं असेल तर तोही परवाना देण्यास आपण तयार आहोत, असं तो म्हणाला. लाल आश्चर्यचकित झाले. लौकरच करार झाला आणि अनपेक्षितरीत्या भारतानं नॅट विमानं मिळवली. भारत-पाक युद्धात या विमानांनी बजावलेली कामगिरी संस्मरणीय ठरली.

या कहाणीचा पुढील भाग आणखी गमतीशीर आहे. पेटर व लाल चांगलेच दोस्त बनले. काही वर्षांनी लाल यांच्याशी गप्पा मारताना पेटर म्हणाला, ''प्रताप, मला एक कबुली द्यायची आहे. तुम्ही जेव्हा नॅट विमानं खरेदी करण्याचा प्रस्ताव प्रथम मांडला तेव्हा तुम्ही लोक कम्युनिस्ट आहात असं मला वाटलं होतं. त्यामुळं मी तुम्हांला माझं संशोधन विकण्यास नकार दिला होता. पण नंतर जेव्हा तुम्ही क्रिकेट खेळता असं सांगितलं (त्याची मी शहानिशा करून घेतली!) तेव्हा तुम्ही कम्युनिस्ट असणं शक्यच नाही असं मला वाटलं आणि तुम्हांला विमानं विकण्याचा निर्णय मी घेतला.''

पाकनं १ सप्टेंबर १९६५ ला केलेल्या हल्ल्यानं भारताला धक्काच बसला होता. 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम'चं स्वरूप काय असेल याची माहिती देणारा गुप्तचर संस्थेचा अहवाल वगैरे काही नव्हतं. छांब येथे पाकनं १ सप्टेंबर रोजी सकाळी हल्ला चढवला तेव्हा जनरल चौधरी श्रीनगर इथे होते, असं त्या वेळी लष्कराचे उपप्रमुख असलेले जनरल पी. पी. कुमारमंगलम यांनी मला सांगितलं. जनरल चौधरी दुपारी दिल्लीला पोचले व त्यानंतरच त्या अनपेक्षित हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी हवाई दलाचा वापर करण्याकरिता पंतप्रधानांची संमती त्यांना घेता आली. गुप्तचर खात्याचा अहवाल नव्हता व युद्धाला सामोरं जाण्याची तयारीही केलेली नव्हती. यावरून असं काही घडेल अशी सरकारला कल्पनाच आली नव्हती, हे उघड होतं.

□□



।। अठरा ।।

# धगधगले रणांगण

**भा**रताच्या लष्करानं ६ ते ८ सप्टेंबरच्या दरम्यान पश्चिम पाकिस्तानविरुद्ध प्रतिकारवाईला तीन क्षेत्रांत प्रारंभ केला. ६ सप्टेंबर रोजी लाहोर क्षेत्रात व ८ सप्टेंबरला सियालकोट व बारमेर या दोन क्षेत्रांत (राजस्थान-सिंध सीमेवर). दिल्लीत एका सभेत शास्त्रींनी भारताला याखेरीज पर्यायच नव्हता हे सांगताना काढलेले उद्गार असे होते :

*"छांब इथे पाकिस्ताननं जरी आपला पहिला हल्ला केला असला तरी त्यांची नजर पंजाबच्या आमच्या भूमीवरही होती. त्यांनी अमृतसरवर अग्निबाणानं हल्ला केला व वाघाजवळील आपला विमानतळ उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, हे तुम्हांला ठाऊक आहेच.*

*पाकनं रणगाडे व अन्य लष्करी सामग्री मिळवली असून दिल्लीवर चालून जाण्याचं आम्ही ठरवलं तर ते अगदी सोपं आहे, अशी फुशारकी अध्यक्ष अयूबखान वारंवार मारीत असतात. पाकनं अशी लष्करी परिस्थिती निर्माण केली आहे की, लाहोर क्षेत्रात आगेकूच करण्याखेरीज भारतीय लष्करापुढं पर्यायच नव्हता. पाकचा हल्ला इतका दणदणीत व वेगवान होता की आम्ही बचाव करीत राहू असं नुसतं बोलत बसणंही परवडणारं नव्हतं! यत्किंचितही वेळ न दवडता आम्हांला निर्णायक, प्रभावी कृती करणं आवश्यक होतं. आम्हांला देशाचं स्वातंत्र्य धोक्यात आणायचं नव्हतं. आमच्या स्वातंत्र्याला जसा धोका निर्माण झाला तसा धोका जगातील*

*कोणतंही राष्ट्र सहन करणार नाही. शांततेच्या तत्त्वाशी आम्हीही वचनबद्ध आहोत हे खरं, पण परिस्थितीच अशी निर्माण केली गेली की, अशा वेळी कारवाई न करणं भ्याडपणाचं व आळशीपणाचं ठरलं असतं.''*


७ सप्टेंबर हा महत्त्वाचा दिवस ('डी' डे) म्हणून मुक्रर करण्यात आला होता. परंतु छांब विभागात अनपेक्षित घटना घडल्यानं अकराव्या कोअरकरिता महत्त्वाचा असलेला हा दिवस २४ तास अलीकडे घेण्यात आला. अखनूरच्या बाह्य भागात शत्रूचा दबाव कमी व्हावा म्हणून असं करणं जरुरीचं होतं. दुपारी दोन वाजताची वेळ नक्की करण्यात आली होती, असं लेफ्ट. जनरल हरबक्ष सिंग म्हणतात.

६ सप्टेंबरला पहाटे लाहोर भागात हल्ल्याला प्रारंभ झाला. पाकिस्तानी प्रदेशातील इच्छोगिल कालव्याची पूर्व बाजू कब्जात घ्यावी या उद्देशानं तीस मैल लांबीच्या मार्गावर तीन ठिकाणी हल्ला करण्यात आला. भारत-पाकिस्तान सीमेलगत संरक्षक खंदकासारखा उपयोग व्हावा म्हणून पाकनं हा इच्छोगिल कालवा बांधलेला होता. भारतीय हद्दीपासून हा कालवा तीन ते नऊ किलोमीटरच्या दरम्यान होता. ४७ मैल लांबीचा हा कालवा १४० फूट रुंद होता व त्याची खोली १५ फूट होती. अनेक वर्षांपूर्वी बांधलेला हा कालवा रणगाड्यांचा सापळा ठरतो, तसंच मातीच्या झोपड्यांसारख्या दिसणाऱ्या जागांतून शस्त्रं ठेवलेली व मोर्चेबंदी केलेली आहे, असं वर्णन रसेल ब्राइन्स यांनी केलं आहे.

अमृतसर व त्याच्या पूर्वेला २७ मैलांपर्यंतचा बियास नदीपर्यंतचा टापू कब्जात घेण्याच्या दृष्टीनं पाकचा संभाव्य हल्ला रोखणं हे इच्छोगिल कालव्याचा पूर्व किनारा ताब्यात घेण्यामागील भारताचं उद्दिष्ट होतं. पाकचा संभाव्य हल्ला हा 'ऑपरेशन ग्रँड स्लॅम'चा अखेरचा टप्पा होता.

इच्छोगिल कालव्याच्या दिशेनं ६ सप्टेंबरला सकाळी निघालेल्या तीन मोठ्या संमिश्र तुकड्यांपैकी (कॉलम) मधली तुकडी ही बर्की खेड्याच्या दिशेनं पुढे निघाली. कालव्याच्या किनाऱ्यालगत असलेल्या या खेड्यात जोरदार मोर्चेबंदी केलेली होती. भारतीय पथकानं १० सप्टेंबरला रात्री ८ वाजता हल्ला चढवला. बर्की येथे तुंबळ लढाई झाली. त्यात रणगाड्यांचा व तोफखान्याचा वापर झाला. दीड तास रणकंदन झालं. रात्री ९-३० च्या सुमाराला चौथ्या शीख बटालियननं बर्की काबीज केलं. नंतर पाकला मागं हटून कालव्याच्या पश्चिम किनाऱ्यावर जाणं भाग पडलं. मात्र जाताना त्यांनी कालव्यावरील पूल पाडून टाकला. आपल्या पराभवाचं उट्टं काढण्यासाठी पाकनं पश्चिम किनाऱ्यावरून तोफांचा जोरदार भडिमार केला. परंतु पंजाबी व शीख जवानांचं धैर्य त्यामुळं खचलं नाही. धाडसानं व निर्धारानं जवानांनी झुंज दिली, असं वर्णन लेफ्ट. जनरल हरबक्षसिंग यांनी केलं आहे.

भारत-पाक सीमारेषा आणि इच्छोगिल कालवा यांमधील जागा हे रोजचं रणक्षेत्रच बनून गेलं. ७ ते ११ सप्टेंबरपर्यंत घनघोर लढाई झाली. त्यात पाकनं पॅटन, शेर्मन,




नकाशा ३ : पाकिस्तानी चढाई आणि भारतीय प्रतिचढाई (पश्चिम विभाग)

चॅफीज यांचा वापर केला, तसंच मोठा तोफखानाही वापरला. भारतानंही सामर्थ्यानिशी प्रत्युत्तर दिलं व पाकचे प्रयत्न हाणून पाडले. ही कारवाई अतिशय महत्त्वाची होती, कारण तिथे जर पाकला आगेकूच करता आली असती तर त्यांना अमृतसरच्या रोखानं मुसंडी मारता आली असती. या ठिकाणी एकमेकांवर कुरघोडी करण्याचा सतत प्रयत्न झाला व डोगराई खेड्याचा तीन वेळा ताबा बदलला. ११ सप्टेंबरपर्यंत पाकच्या आक्रमक पवित्र्याला खीळ बसली. परंतु डोगराई खेडं पाकच्या ताब्यात होतं. इच्छोगिल कालव्याच्या पूर्वेचा किनारा ताब्यात घेण्यासाठी डोगराईवर कब्जा मिळवणं जरुरीचं होतं. त्यासाठी त्याची नीट टेहेळणी करण्यात आली. त्या खेड्याच्या बांधकामात मिसळून जातील असे सिमेंटचे भरभक्कम खंदक उभारण्यात आलेले होते. खेड्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पहारा ठेवलेला होता. चर खणून खंदक जोडलेले होते व तिथे सैनिकांना सहज हालचाल करणं शक्य होतं. एकूण बचावात्मक तयारी मजबूत केली होती.

ही मजबूत मोर्चेबंदी डावलून शत्रूच्या छावणीपलीकडे घुसण्याची योजना भारतीय पायदळ ब्रिगेडनं एका तोफखान्याच्या मदतीनं आखली. रात्रीच्या काळोखात पुढं भराभर कूच केल्यावर पाठीमागच्या बाजूनं भारतीय ब्रिगेडनं डोगराई खेड्यावर हल्ला चढवला. पाठीकडून झालेल्या या अनपेक्षित हल्ल्यानं पाकिस्तानी चकितच झाले. पण त्यांनी आपल्या परीनं चांगली झुंज दिली. भारताचे जाट जवान हे काही कमी कुवतीचे नव्हते. आमने-सामने लढाई झाली. त्यांनी निकरानं व कौशल्य वापरून लढा दिला आणि पहाटे तीन वाजता भारतीय फौजांनी डोगराईवर कब्जा केला.

सबंध लाहोर आघाडीवर सर्वात तुफानी संघर्ष याच भागात झाला, असं डी. आर. मंकीकर यांनी लिहून ठेवलं आहे. भारतीय डिव्हिजननं शत्रूच्या सर्वात जास्त जवानांना यमसदनी धाडलं. या आघाडीवर पकडण्यात आलेल्या कैद्यांपैकी ३३ टक्के (५ अधिकाऱ्यांसह १०८) कैदी या डिव्हिजननं पकडले होते. त्यांनी २१ रणगाडेही ताब्यात घेतले. त्यांपैकी एक स्वतःच्या बाजूनं उपयोगातही आणला.

लाहोरच्या दक्षिण भागात भारतीय फौजांनी एक अत्यंत निर्णायक लढाई जिंकली. मेजर जनरल गुरुबक्ष सिंग यांच्या नेतृत्वाखालील ४ माउंटन डिव्हिजनला फिरोजपूर-खेमकरण या त्यांच्या छावणीतून निघून इच्छोगिल कालव्याकडे जाण्यास सांगण्यात आलं होतं. वाटेत (१) सीमेच्या पलीकडे जवळच असलेलं संयुक्त टेहळणी ठाणं, (२) रुहिवाल, (३) बंड जंक्शन, (४) शेह पन्नूनाम आणि (५) बल्लानवाला या पाच ठिकाणांवर कब्जा मिळवण्यास त्यांना सांगण्यात आलं होतं. बेडियन व बल्लानवाला तसंच बल्लानवाला ते गंडसिंगवाला यांच्या दरम्यानचा कालव्याच्या किनाऱ्याचा पूर्व भाग ताब्यात घेण्याची कामगिरी त्यांना दिलेली होती. ६ सप्टेंबरला पहाटे पाच वाजता या डिव्हिजननं पुढं सरकायला सुरुवात केली व सकाळी ११-३० पर्यंत वर दिलेल्या यादीतील पाचपैकी चार जागांवर ताबा मिळवला. परंतु दुपारी पाक फौजांनी आक्रमक हल्ला चढवल्यानं भारतीय सैन्याला काही करता येईना. ७ सप्टेंबरला सकाळी भारतीय


डिव्हिजन जेथून निघाली त्या खेमकरणला परत आली.

त्या भागात पाकनं सर्वोत्कृष्ट रणगाडा डिव्हिजन व पायदळ डिव्हिजन युद्धात उतरवली होती. याचा अर्थ मोठ्या प्रमाणावर चढाई करण्याचा त्यांचा बेत होता, हे भारतीय डिव्हिजनच्या कमांडरच्या लक्षात आलं. पाकची ही चढाई रोखायलाच हवी होती, कारण त्यात जर त्यांना यश आलं असतं तर त्यांनी खेमकरण येथील भारतीय ठाणी ताब्यात घेऊन अमृतसरपर्यंत मजल मारली असती. भारतीय कमांडरनं या परिस्थितीचा शांतपणं आढावा घेतला. त्याच्याजवळ एक रणगाडा ब्रिगेड होती. तेव्हा डावपेचाचा एक भाग म्हणून माघार घेण्याचं व खेमकरणच्या पाठीशी असल उत्तर इथे मोर्चेबंदी करण्याचं त्यानं ठरवलं. त्याचा दुहेरी फायदा झाला. भारतीय फौज पळ काढीत आहे असा पाकचा त्यामुळं समज झाला.


असल उत्तर ही जागा अत्यंत मोक्याची होती. तिथून खेमकरण-अमृतसर व खेमकरण-पट्टी या दोन्ही मार्गांवर लक्ष ठेवणं शक्य होतं. खेमकरणपेक्षा असल उत्तर येथील भूप्रदेशाची रचना बचावाला अधिक सोयीची होती. भारतीय कमांडरनं काळजीपूर्वक व वेगानं मोर्चेबंदी केली. सुदैवानं पाकनं अपेक्षेपेक्षा एक दिवस उशिरानं हल्ला चढविला. त्यामुळं आपल्या सर्व तुकड्या निश्चित जागेवर तैनात करण्यास आवश्यक असलेला मौलिक वेळ भारताच्या कमांडरला मिळाला. ब्रिगेडियर त्यागराज यांच्या नेतृत्वाखाली 'घोड्याच्या नाले'सारखा आकार असलेल्या भागाच्या कडेला रणगाडा ब्रिगेड सज्ज करण्यात आली. या भागाचं तोंड मोकळं ठेवलं होतं. त्यामुळं मृत्यूच्या या सापळ्यात शिरण्याचा पाकला मोह पडण्याचा संभव होता.

'ऑपरेशन ग्रँड स्लॅम'चा अंतिम टप्पा म्हणून अमृतसर काबीज करण्याची तपशीलवार व धाडसी योजना पाकनं आखली होती. पायदळ डिव्हिजनला सोबत घेऊन रणगाडा डिव्हिजन खेमकरणवर चढाई करणार होती व तिथे एकदा तळ ठोकला की मग अमृतसरच्या पूर्वेला हरिके, जांडियाला गुरू येथील पूल ताब्यात घेणं व शेवटी अमृतसरपासून २७ मैल अंतरावरील बिआस नदीवरील पुलाचा कब्जा मिळवणं अशी पाकची योजना होती. त्यामुळं पाकच्या जाळ्यात अमृतसर व त्याभोवतालचा मोठा प्रदेश सापडणार होता. या धाडसी कारवाईनं पंजाब व जम्मू-काश्मीर येथील भारतीय फौजा एकाकी पाडता येतील आणि मग थेट दिल्लीपर्यंतही आपण मुसंडी मारू शकू असं पाकिस्तानला वाटत होतं.

भिखिविंडच्या बाजूनं पाकच्या रणगाडा ब्रिगेडनं असल उत्तर येथील भारतीय फौजांवर ८ सप्टेंबरला सकाळी हल्ला चढवला. त्यांना झोडपून भारतीय फौजांनी मागं रेटलं. त्याच दिवशी रात्री दुसऱ्या एका ब्रिगेडनं खेमकरण-पट्टीच्या बाजूनं हल्ला केला. या ब्रिगेडमधील अनेक रणगाड्यांचीही नासधूस झाली. भारतीय फौजांनी उभारलेली फळी मोडून काढण्यात पाकला यश आलं नाही. रोही नाला व भिखिविंड रोड यांच्या दरम्यान पश्चिमेकडून पाक पुऱ्या ताकदीनिशी जोरदार हालचाल करणार अशी चिन्हं त्या वेळी दिसत होती. तेव्हा या संभाव्य चढाईला प्रत्युत्तर देण्याच्या दृष्टीनं




रणक्षेत्राच्या जागा- असल उत्तरच्या रणक्षेत्राचे चौफेर स्वरूप



ब्रिगेडियर त्यागराज यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रणगाडा ब्रिगेडनं लाखना-महमदपुरा-चिमा भागात अनेक रणगाडे सज्ज ठेवले. येथे डावपेचांची सर्वोत्तम खेळी खेळण्यात आली. घोड्याच्या नालेसारखा जो भाग होता त्याच्या मध्यभागी भारतीय तोफखाना व रणगाडे पाक फौजांची प्रतीक्षा करीत होते. उसाच्या शेतात हे रणगाडे छपवलेले होते. तिथे पाक रणगाड्यांना येणं भाग पडावं यासाठी माधुपूर कालव्याच्या बांधांना भेगा पाडून सुरुवातीचा मार्ग जलमय केला होता.

अपेक्षेनुसार १० सप्टेंबरला पाकनं याच भागात मोठा हल्ला केला. अल्ताफ गौहर यांनी या कारवाईचं वर्णन पाकिस्तानची 'वज्रमूठ' असं केलं आहे. अशी चढाई करण्यास खुद्द अयूब यांनी अनुमती दिली होती व तेथील लष्करी घडामोडींची क्षणाक्षणाला ते माहिती घेत होते. या कारवाईबद्दल ते अत्यंत आशावादी होते. हा जोरदार हल्ला दोन टप्प्यांत झाला. आरंभी पाकच्या पाचव्या रणगाडा ब्रिगेडची लाट आली व त्यापाठोपाठ चौथ्या रणगाडा ब्रिगेडची दुसरी लाट आली. भारतीय फौजांच्या ताब्यातील जागा मिळवण्यासाठी आपलं सारं सामर्थ्य पाकनं पणाला लावलं होतं. परंतु भारतानं काळजीपूर्वक रचलेल्या मोठ्या सापळ्यात ते अडकले. पाक फौजा ज्या दिशेला जायचा प्रयत्न करीत तिथे त्यांना भारतीय तोफांचा व रणगाड्यांचा मारा सहन करावा लागे. पाकचा तिथे पार धुव्वा उडाला. त्यांचे ९७ रणगाडे नष्ट झाले. "११ सप्टेंबरला खेमकरण येथील लढाईत पाकच्या साऱ्या लष्करी डावपेचांची धुळधाण झाली. पाकच्या दृष्टीनं युद्ध संपुष्टात आलं." असं वर्णन अल्ताफ गौहर यांनी केलं आहे.

या लढाईच्या वेळी भारतीय हवाई दलानं मोलाची कामगिरी पार पाडली. रणगाडे, वाहनं, दारूगोळा घेऊन निघालेल्या पाकिस्तानच्या दोन आगगाड्या ८ व ९ सप्टेंबर रोजी भारतीय हवाई दलानं उद्ध्वस्त केल्या. त्यामुळं पाकनं लढाईत वापरलेल्या रणगाड्यांकरिता लागणारं इंधन व दारूगोळा ही मर्यादित प्रमाणातच शिल्लक होती. असल उत्तर येथील लढाईत क्र. १ मिस्टिअर स्क्वाड्रननं खेमकरण भागात संरक्षक छत्र पुरवलं.

असल उत्तर येथील लढाईत पाकला पराभव पत्करावा लागला, याचं कारण उच्च पातळीवरील सैन्याधिकाऱ्यांच्या नेतृत्वाचं अपयश हे स्पष्ट होतं. त्याबद्दल पाकिस्तानचे जनरल मुसा म्हणतात :

"उच्च पातळीवरील निष्प्रभ ठरलेल्या नेतृत्वामुळं निर्माण झालेल्या गोंधळात युद्धातील या चकमकींनी भरच पडली." ब्रिगेडच्या कमांडरनं, का कोणास ठाऊक, पण आणखी गोंधळ निर्माण करणारा आदेश दिला. असल उत्तरच्या लढाईनंतर पाक फौजांत काय स्थिती होती याचं वर्णन करताना ते म्हणतात, "त्या वेळी माजलेल्या गोंधळामुळं डिव्हिजनल कमांड जवळजवळ पूर्णपणं पंगू झालेली होती." काश्मीरमधील 'ऑपरेशन जिब्राल्टर' सुरू होण्याआधी दोन आठवडे (२३ जुलै १९६५ रोजी) पदमुक्त झालेले पाकच्या हवाई दलाचे प्रमुख मार्शल असगर खान यांनी आपल्या

'द फर्स्ट राउंड इंडो-पाकिस्तान वॉर १९६५' या ग्रंथात जनरल मुसा यांच्या भ्याड नेतृत्वामुळं पाकला पराभव पत्करावा लागला असं म्हटलं आहे.

सियालकोट विभागातील युद्धाचं वर्णन करताना रसेल ब्राइन्स म्हणतात :

*"सियालकोट इथे चढाई करण्यासाठी जनरल चौधरी यांनी धाडसीपणानं आपली शस्त्रसामग्री हलवली. एक तुकडी त्यांनी लाहोर भागात ठेवली व मुख्यत्वे नवी शस्त्रं, उपकरणं असलेली तुकडी सियालकोटला पाठवली. त्याकरिता शत्रूच्या प्रदेशातून तीन हजार वाहनं न्यावी लागणार होती आणि हवाई हल्ल्याचाही धोका होता. त्यात दोन प्रकारचा जुगार होता. एक तर दिल्लीकडे जाणाऱ्या रस्त्याचं संरक्षण फारसं कमकुवत होऊ न देणं व शत्रूच्या हल्ल्यात फारशी हानीही होऊ न देता सियालकोट भागात चढाई करणं. दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानला जोरदार धडक देऊन हा जुगार यशस्वी झाला."*

सियालकोट भागातील लढाया ७ सप्टेंबरपासून जवळजवळ दोन आठवडे (म्हणजे २३ सप्टेंबरला सकाळी युद्धबंदी होईस्तोवर) चालूच होत्या. भारताची एकमेव रणगाडा डिव्हिजन या भागातच गुंतलेली होती. तसंच पाकनं नव्यानं स्थापन केलेली दुसरी रणगाडा डिव्हिजनही तेथे अडकून पडली होती. उभय देशांचे मिळून ४०० रणगाडे परस्परांशी आमने-सामने झुंजत होते. रणगाडे व अवजड तोफा यांच्या वाहतुकीनं गुदमरून टाकणारा प्रचंड धुरळा उडालेला होता. त्याचं वर्णन ब्राइन्स यांनी पुढीलप्रमाणं केलं आहे :

*"सियालकोट इथे सुरुवातीला दोन आघाड्यांवर भारतानं जिथे हल्ला चढवला होता त्या शहराच्या उत्तर भागात रणगाडे व पायदळ यांच्या जोरदार लढाया लढवण्यात आल्या. शहराची जोरदार मोर्चेबंदी केलेली होती व भारताला हळूहळू यश मिळत होतं. युद्धबंदीच्या वेळी तिथून ४००० यार्ड अंतरावर दूर खंदकांत भारतीय फौजा होत्या. रेल्वेचा उत्तरेकडील मार्ग त्यांनी तोडून टाकला होता. याचा अर्थ सियालकोटला अंशतःच वेढा घातलेला होता व पश्चिमेकडे जाणाऱ्या रेल्वेच्या व रस्त्याच्या मुख्य भागावर काही परिणाम झालेला नव्हता. लढाई थांबली तेव्हा पाकिस्तानचा १८० चौरस मैलांचा टापू आपल्या कब्जात आहे असा दावा भारतानं केला. सीमारेषा ते फिलोरा यादरम्यानचा हा भाग होता. खोलवर केलेल्या सरशीबद्दल भारताचा दावा सर्वसाधारणतः पाकिस्ताननं मान्य केला."*

छांब भागात सियालकोट येथून पाकनं १ सप्टेंबरला चढाई केली. सियालकोट हे जणू अनेक किल्ल्यांसारखं होतं. त्याच्याभोवती आधुनिक तोफखान्याचा वेढा होता. त्यात मध्यम व लांब पल्ल्याच्या अवजड तोफा होत्या. त्याखेरीज सिमेंटचे मजबूत खंदक, बंकर्स व तोफांसाठी बांधलेल्या विशिष्ट जागा होत्या. सियालकोटवर दक्षिणेकडून व उत्तरेकडून हल्ला चढवण्यासाठी भारताची व्यूहरचना चिमट्यासारखी होती. फिलोरा

शहरावर कब्जा मिळवण्यासाठी जोरदार लढाई झाली. फिलोराच्या दिशेनं भारतीय फौजा निघाल्या तेव्हा १० सप्टेंबरच्या रात्री मोठ्या लढाईला तोंड फुटलं. १२ सप्टेंबर रोजी भारतीय फौजांना पाकिस्तानची फळी भेदून जाण्यात व फिलोरावर कब्जा मिळवण्यात यश आलं.

फिलोरा येथील लढाईनंतर तीन दिवस सामसूम होती. त्यानंतर पुन्हा लढाई सुरू झाली व डावपेचाच्या दृष्टीनं भारताला लाभ झाला. २३ सप्टेंबरला दुपारी ३.३० वाजता युद्धबंदी अमलात आली त्या वेळी भारताच्या ताब्यात सियालकोट परिसरातील १८० चौरस मैल पाकिस्तानी टापू होता. सियालकोट शहरापासून जेमतेम दोन मैलांवर भारतीय सैन्य होतं.

युद्धाचं संपूर्ण चित्र समजावं या दृष्टीनं आणखी काही माहितीची नोंद करणं आवश्यक आहे. भारतानं पाकविरुद्ध राजस्थान-सिंध भागात तिसरी आघाडी ८ सप्टेंबर रोजी उघडली होती. बारमेर इथे सरहद्दीच्या पलीकडे प्रवेश करून पाकच्या प्रदेशातील सहा मैलांवरील गद्रा शहराचा ताबा भारतीय फौजांनी घेतला होता. तिथे जराशी चकमक उडाली, परंतु एकूण उद्देश लक्ष दुसरीकडे वळवण्याचा होता.

ऑगस्ट १९६५ च्या दुसऱ्या पंधरवड्यात युद्धबंदी रेषेच्या लगत काश्मीरमध्ये लढाईचा जोर वाढू लागला, तेव्हा हवाई दलाचे प्रमुख एअर मार्शल अर्जुनसिंग यांनी गरज पडली तर हवाई दल सज्ज असावं या दृष्टीनं पावलं उचलली होती. त्यामुळं पंतप्रधान शास्त्री यांनी १ सप्टेंबर रोजी हवाई दलाला युद्धात सहभागी होण्याचा आदेश दिला, तेव्हा दोन तासांच्या आत हवाई दल युद्धात उतरलं! तेव्हापासून तो २३ सप्टेंबर रोजी युद्धबंदी जाहीर होईपर्यंत भारताची युद्धविषयक उद्दिष्टं पुरी करण्याच्या दृष्टीनं हवाई दलानं प्रभावी कामगिरी पार पाडली. अखनूरच्या दिशेनं कूच करीत असलेल्या पाक फौजांना रोखण्याचं उद्दिष्ट १ सप्टेंबरलाच हवाई दलानं पुरं केलं.

त्यानंतरचा तीन आठवड्यांचा काळ हा शर्थीनं झुंजणाऱ्या हवाई दलाच्या शौर्यानं भरलेला होता. पाकिस्तानकडे सेबर जेट व स्टार फायटर्स ही अत्याधुनिक विमानं असूनही भारतीय लढाऊ विमानांनी त्यांना पाणी चारलं.

छांब-जौरियन भागात सैन्याला संरक्षक छत्र पुरवण्यासाठी व्हँपायर आणि मिस्टियर्स विमानं तैनात करण्यात आली होती. परंतु त्यांच्यासाठी काही लढाऊ संरक्षक छत्र नव्हतं व पाकच्या रडारवर त्यांचा माग सहज लागत असल्यानं सेबर्स व स्टार फायटर्स ही व्हँपायर्स व 'मिस्टियर्स' यांच्याकडे आकर्षित होत आहेत, असं पहिल्या दोन दिवसांतच आढळून आलं. २ सप्टेंबर रोजी अंबाला येथून स्क्वाड्रन २३ मधील ८ नॅट विमानं पठाणकोट येथे येऊन दाखल झाली. तसंच २८ व्या स्क्वाड्रनमधील काही मिग २१ विमानंही आली. विंग कमांडर एम. एस. डी. वुलन व स्क्वाड्रन लीडर जे. ग्रीन या दोघांनी ( हे दोघे पुढं एअर मार्शल झाले.) अत्यंत हुशारीनं ३ सप्टेंबर रोजी व्यूहरचना केली. विंग कमांडर डब्ल्यू. एम. गुडमन यांच्या नेतृत्वाखाली 'मिस्टियर्स' विमानांच्या एका पथकानं पाक रडारवर निश्चित दिसेल अशा पद्धतीनं छांब जौरियनच्या

दिशेनं जायचं. एकदा लक्ष्यानजीक पोचलं की त्याच्या दिशेनं खाली मुसंडी मारून हूल द्यायची व निघून जायचं.

दरम्यान पाकच्या रडारवर दिसणार नाही अशी खबरदारी घेऊन कमी उंचीवरून आठ नॅट विमानांच्या पथकानं दोन भागांत पाठोपाठ जावं. त्यांनी तत्काळ उंची गाठून सेबर जेटवर हल्ला चढवावा. दोन 'मिग २१' विमानं पठाणकोट विमानतळावर घिरट्या घालतील व स्टार फायटर्स दिसली तर मिग २१ विमानांनी पण हवाई युद्धात सहभागी व्हावं अशी ही योजना आखण्यात आली होती. ती अगदी उत्तम रीत्या पार पडली. अपेक्षेप्रमाणं 'मिस्टियर्स' विमानांच्या दिशेनं सेबर जेट विमानं झेपावली. तेव्हा भारतीय हवाई दलाची नॅट विमानं त्यांच्यावर तुटून पडली. एवढंसं नॅट विमान चालवणाऱ्या स्क्वाड्रन लीडर ट्रेव्हर कीलरनं पहिलं सेबर जेट पाडलं.

त्याला तत्काळ वीरचक्र देण्यात आलं. १९६५ च्या युद्धात शौर्यपदक मिळवणारा तो पहिला अधिकारी ठरला. खरं तर 'सर्वप्रथम' असण्याची हॅटट्रिकच त्यानं केली. सेबर जेटचा नाश करणारा तो पहिला अधिकारी ठरला. वीरचक्र सन्मान मिळवणारा हवाई दलाचा तो पहिलाच अधिकारी होता आणि १९६५ च्या युद्धात सबंध भारतीय लष्करात शौर्यपदक मिळवणारा तो पहिला अधिकारी होता.

२२ डिसेंबर १९९२ रोजी मी स्क्वाड्रन लीडर आर. के. पाल यांच्या समवेत दिल्ली येथे ट्रेव्हर कीलरना त्यांच्या निवासस्थानी भेटलो. सेबर जेट विमान पाडलं तेव्हा तुमची प्रतिक्रिया काय होती, असं विचारता ते म्हणाले, "मी अत्यंत सुदैवी होतो. मी योग्य वेळी, नेमक्या ठिकाणी हजर होतो. माझे अन्य सहकारी तितकेच चांगले प्रशिक्षित व निष्ठावान होते. त्यांपैकी कोणीही पहिलं सेबर जेट पाडू शकला असता. माझं इतकं कौतुक केल्याबद्दल मी देशाचा कृतज्ञ आहे."

आपल्या नॅट विमानाच्या गुणवत्तेबद्दल त्यांची प्रतिक्रिया बोलकी होती. ते म्हणाले, "वजनानं हलक्या असलेल्या या क्रांतिकारी विमानाची तीन वैशिष्ट्यं होती. एक म्हणजे ते अत्यंत वेगानं उंचीवर जाऊ शकत होतं, भारतात त्याचं उत्पादन करता येत होतं आणि ते आर्थिक दृष्ट्या काटकसरीचं होतं.

"नॅट एवढं छोटं व वेगवान होतं की अवघ्या चार मिनिटांत ते ४० हजार फूट उंची गाठू शकत असे. त्यामुळं शत्रूंच्या रडारवर त्याचा माग घेणं शक्य होत नसे, तसंच शत्रूच्या वैमानिकांना देखील त्याचा पाठलाग करणं कठीण जाई. ते त्वरित हालचालीच्या दृष्टीनं उत्तम होतं व त्यावर बसवलेल्या दोन तोफा तिच्या टप्प्यातील लक्ष्यावर हल्ला करू शकत."

लाहोर व सियालकोट क्षेत्रात भारतानं मोठ्या प्रमाणावर प्रतिकारवाई सुरू केली तेव्हा हवाई दलाची जबाबदारीही खूप वाढली. त्यानंतर पाक आक्रमणाचा प्रतिकार करताना जनरल जे. एन. चौधरी व एअर मार्शल अर्जुनसिंग एकमेकांशी सल्लामसलत करून धोरणं आखीत. लाहोर व सियालकोट क्षेत्रात भारतीय फौजांना भारतीय हवाई दलानं उत्कृष्ट संरक्षक छत्र पुरवलं.

पाकिस्तानातील सर्वांत मोठ्या व महत्त्वाच्या सरगोधा या हवाई तळावर ७ सप्टेंबर रोजी भारतीय हवाई दलानं मोठा हल्ला केला. मिस्टियर्स व हंटर्स यांच्या सहा पथकांनी ३३ वेळा हल्ले केले. पाकच्या मुख्य तळावर हा अत्यंत धाडसी हल्ला होता. सरगोधा हे पाकिस्तानच्या अंतर्गत भागात होतं व हंटर विमानाच्या टप्प्याच्या अगदी टोकाशी होतं. या हल्ल्यात भारतीय हवाई दलानं ३ एफ-८६ सेबर जेट व १ एफ-१०४ स्टार फायटर अशी चार विमानं पाडली. या हवाई युद्धात भारतानं तीन हंटर्स व दोन मिस्टियर्स विमानं गमावली.

त्यानंतर काही दिवसांनी पेशावर, रावळपिंडी व कोहाट या पाकिस्तानच्या बऱ्याच दूरवरच्या हवाई तळांवर भारतीय हवाई दलाच्या विमानांनी बॉम्बफेक केली. शत्रूच्या प्रदेशात ६०० किलोमीटरपर्यंत आतवर भारतीय विमानांना उड्डाण करावं लागलं. पेशावर हे पाकच्या हवाई शक्तीचं मुख्यालय होतं. त्यावर १३-१४ सप्टेंबरच्या रात्री भारताची कॅनबेरा विमानं झेपावली. हा अत्यंत धाडसी प्रयत्न होता. कसलंही लढाऊ संरक्षक छत्र नसताना व तांत्रिक गफलतीला वाव नसताना आपल्या टप्प्याच्या टोकापर्यंत या विमानांना जावं लागलं.

१९ सप्टेंबर रोजी सियालकोट क्षेत्रात हंटर स्क्वाड्रनने बॉम्बवर्षाव करून अभूतपूर्व विजय मिळवला. त्या दिवशी सकाळी पाक रणगाड्यांचं एक पथक एका रांगेत चाललेलं होतं. भारतीय विमानांनी आरंभीचे व शेवटचे रणगाडे बॉम्बफेक करून नष्ट केले. त्यामुळं मधल्या सर्व रणगाड्यांचा प्रवास थांबला, वेगवेगळ्या सात खिंडींत हे रणगाडे नष्ट करण्यात आले.

युद्धाच्या त्या रंगमंचावर भारतीय हवाई दलानं महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. लढाईच्या विविध ठिकाणी अनुकूल असं संरक्षक हवाई वातावरण त्यांनी तयार केलं. महत्त्वाच्या सर्व चकमकींत पायदळाला संरक्षक छत्र पुरवलं व महत्त्वाचे लष्करी डेपो, दळणवळण यंत्रणा व लष्करी दृष्ट्या मोक्याची ठिकाणं यांवर बॉम्बहल्ले चढवून पाकच्या लष्करी यंत्रणेला जागोजागी निकामी केलं.

१९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धाचा हा थोडक्यात गोषवारा. युद्धाचा संपूर्ण तपशील व त्याचं विश्लेषण करणं हा या पुस्तकाचा उद्देश नाही. या विषयावर अनेकांनी ग्रंथ लिहिलेले आहेत.

□□

।। एकोणीस ।।



# पाकिस्तानवर सरशी

दुसऱ्या जागतिक महायुद्धात नाझी व फॅसिस्ट यांचा पूर्ण पराभव करणं हे दोस्त राष्ट्रांचं उद्दिष्ट होतं. दोस्तांनी युद्ध जिंकलं व त्यांनी शांततेसाठी अटी घातल्या. १९६५ च्या भारत-पाक युद्धात दुसऱ्याचा पराभव करून शांततेच्या अटी घालण्याचा कोणाचाही उद्देश नव्हता. प्रत्येकाची उद्दिष्टं मर्यादित होती, तेव्हा त्याच संदर्भात या युद्धाचं मूल्यमापन करायला हवं.

पाकिस्तानची उद्दिष्टं व प्रत्यक्ष निष्पत्ती यांचं स्पष्ट विवेचन पाकिस्तानचे अल्ताफ गौहर यांनी केलं आहे :

> *"युद्धाचं नीट नियोजन केलेलं नव्हतं. चुकीच्या आणि कपोलकल्पित गृहीतांवर आधारलेलं ते एक साहस होतं, याबाबत आता दुमत उरलेलं नाही. संख्यात्मक दृष्ट्या भारत वरचढ आहे आणि महासत्तांचा आपल्याविरुद्धचा प्रतिकूल दृष्टिकोन ही अपयशाची दोन कारणं आहेत असं सरकार आता सांगत आहे. परंतु लढाई सुरू होण्यापूर्वी ही दोन्ही कारणं चांगली ठाऊक होती!"*

त्या तुलनेनं शास्त्रींनी निश्चित केलेली या युद्धाची उद्दिष्टं सफल झाली. बळाच्या जोरावर काश्मीरचा कब्जा करण्याचा पाकचा डाव हाणून पाडणं हे भारताचं पहिलं उद्दिष्ट होतं. पाकच्या आक्रमक शस्त्रागाराची हानी करून त्याची युद्धयंत्रणा बोथट करणं हे भारताचं दुसरं उद्दिष्ट होतं. संबंधित सरकारांनी अजूनही अधिकृत माहिती

प्रसिद्ध केली नसल्यानं या युद्धात किती हानी झाली याचं अचूक मूल्यमापन करणं शक्य नाही. अनेक निरीक्षकांनी जे वर्णन केलं आहे ते पाहता पाकिस्तानी युद्धयंत्रणेला जबर तडाखा बसला.

"लष्करी दृष्ट्या बोलायचं झालं तर खेमकरण क्षेत्रात झालेली 'असल उत्तरची लढाई' व सियालकोट क्षेत्रात पंधरा दिवस चाललेली रणगाड्यांची लढाई या दोन अत्यंत निर्णायक लढायांत पाकिस्तानचा पराभव झाला असं म्हणावं लागेल. अमेरिकेकडून मिळालेल्या रणगाड्यांपैकी निम्मे रणगाडे या दोन लढायांत नष्ट झाले! त्यांचं अभिमानास्पद मानलं जाणारं व आघाडीवर असणारं चिलखती दल आज पंगू होऊन पडलेलं आहे. पाक सैन्यावर व लष्करी नेतृत्वावर त्याचा झालेला मानसशास्त्रीय परिणाम कमी लेखून चालणार नाही." असं डी. आर. मंकीकर यांनी 'ट्वेंटिटू फेटफुल डेज' (पृष्ठ १५४) या ग्रंथात म्हटलं आहे.

लंडन येथील 'द टाइम्स'च्या संरक्षणविषयक प्रतिनिधीनं तज्ज्ञांच्या पहिल्या अहवालाचा दाखला देऊन लिहिलं : "पाकनं ५०० भारतीय रणगाडे नष्ट केल्याचा दावा मुळात केला असला तरी वास्तविक हा आकडा २०० असावा आणि त्यांपैकी निम्मे रणगाडे पाकच्या ताब्यात असावेत... त्याच तुलनेनं पाहता पाकनं २०० रणगाडे गमावले असावेत. या रणगाड्यांना मार बसला असावा, पण ते परत मिळवण्यात आले आहेत. त्यांची दुरुस्ती करता येईल. यापुढील लढाईत पाकिस्तानच्या वाट्याला निराशाच दिसते. कारण त्यांना अमेरिकन रणगाड्यांच्या पुरवठ्यावर अवलंबून राहावं लागेल. हा पुरवठा होण्याची सध्या तरी शक्यता दिसत नाही."

पाकिस्तानी हवाई दलाच्या हानीबद्दल 'वॉशिंग्टन पोस्ट'चे दिल्लीतील वार्ताहर सेलिग हॅरिसन यांनी लिहिलं :

> *"पाकिस्तानकडे मुख्यत्वे एफ-८६ बनावटीची १०३ सेबर जेट विमानं होती. त्यांपैकी ३० विमानं पाडण्यात आली वा विमानतळावर झालेल्या बॉम्बफेकीत नष्ट झाली, असा राजनैतिक वर्तुळातील अंदाज आहे. (भारतानं ४७ विमानं नष्ट केल्याचा दावा केला आहे.)"*

पहिली दोन उद्दिष्टं पुरी करताना पाकची कमीत कमी भूमी ताब्यात घेण्याचं तिसरं उद्दिष्ट भारतापुढं होतं. युद्धानंतर ही भूमी खाली करावी लागेल असा त्यामागील विचार होता. लाहोर ताब्यात घेण्याचा भारताचा उद्देश नव्हता. लाहोरवर कब्जा केला असता तर त्याचे भारतात रोमहर्षक पडसाद उमटले असते हे खरं, परंतु त्यामुळं जागतिक मत भारताच्या विरुद्ध बनलं असतं आणि पाकच्या बाजूनं अन्य देशांकडून हस्तक्षेप केला जाण्याची शक्यता वाढली असती. पाकच्या लाहोर व सियालकोट क्षेत्रांत भारतीय फौजा शिरल्यानं भारताच्या राजकीय व लष्करी गरजा पुऱ्या झाल्या, असं शास्त्रींचं मत होतं. सियालकोटवर कब्जा करावा की नाही याबाबत शास्त्रींनी काहीही सांगितलं नव्हतं. सियालकोट हा लष्करी दृष्ट्या गडच होता व त्याबद्दलचं धोरण

ठरवण्याची पूर्ण मुभा भारतीय लष्कराला दिलेली होती. युद्ध चालू राहिलं असतं तर सियालकोट भारतीय लष्करानं ताब्यात घेतलंही असतं. परंतु युद्धबंदी होणार अशी चिन्हं १६ सप्टेंबरपासूनच दिसू लागल्यानं सियालकोट ताब्यात घेण्याचा गांभीर्यानं प्रयत्न केला गेला नाही. कारण त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी होण्याचा संभव होता, याबाबतचा निर्णय शास्त्रींनी जनरल चौधरींवर सोपवला होता. मात्र सियालकोट घेतलं नाही तरी सियालकोट क्षेत्रातील मोठा भूभाग भारताच्या ताब्यात आलेला होता.

लेफ्ट. जनरल हरबक्ष सिंग (निवृत्त) यांनी युद्धाचा अचूक आढावा घेताना ('वॉर डिस्पॅचेस', पृष्ठे २०४-५) लिहिलं आहे :

*"संघर्षाचा केवळ भौतिक वा संख्यात्मक ताळेबंद आखणं हे बरोबर ठरणार नाही. कारण अन्य क्षेत्रांत ठोस नसली तरी दूरगामी परिणाम करणारी कामगिरी पार पाडली गेली याची नोंद घ्यावी लागेल. काश्मीरी बांधव मुक्त होण्याची उत्सुकतेनं प्रतीक्षा करीत आहेत, हा पाकचा दावा देशात व परदेशांत खोटा ठरला. अमेरिकन शस्त्रांच्या साहाय्यानं भारतात पाकिस्तान सहज मुसंडी मारू शकेल हा निवळ भ्रम ठरला, आणि भारतीय सैन्याबद्दल आदर निर्माण झाला. पाकचा एक जवान हा भारताच्या तीन जवानांना भारी ठरेल, अशी बढाई अयूबखान मारीत होते. त्यांच्या या फुशारकीस जबर धक्का बसला. सरळ सामन्यात भारतीय जवानांनी शत्रूला गुडघे टेकायला लावले. आपल्या साध्या, मंदगती व जुन्या अवजड शस्त्रागाराची 'प्राचीन बुजगावणं' अशी संभावना शत्रू करीत असे. परंतु याच शस्त्रागारानं अत्याधुनिक पॅटन रणगाड्यांना आव्हान देऊन त्यांचा निःपात केला. तेव्हा लढाईत शस्त्रापेक्षा ते हाताळणारा सैनिक महत्त्वाचा असतो हे सिद्ध झालं. थोडक्यात, पाक लष्कराला त्याची जागा दाखवून देण्यात आली!*

*यांतील प्रत्येक कामगिरी प्रशंसनीय होती. एका उद्धट, गर्विष्ठ व बढाईखोर शत्रूच्या बाबतीत आपण नैतिक दृष्ट्या वरचढ ठरलो ते या कामगिऱ्यांच्या एकत्रित प्रभावामुळं.*

*या सर्वांवर मात करणारी आणखी एक कामगिरी आहे. १९६२ मध्ये नेफामधील पराभवामुळं भारतीय फौजांची देशात व परदेशांत नाचक्की झाली होती. त्याचा तीव्र सल आपल्या मनात होता व त्यामुळं शरमेनं आपली मान खाली झुकत असे. जखमेचा तो व्रण नष्ट झाला. राष्ट्राला आपल्या लष्कराचा कधी नव्हे इतका अभिमान वाटू लागला. जगात भारताचा पूर्वीचा लौकिक पुन्हा प्रस्थापित झाला. शत्रूच्या लष्करी सामर्थ्याची किती हानी केली व त्यांचा किती प्रदेश ताब्यात घेतला यापेक्षा युद्धात झालेले हे लाभ खूप महत्त्वाचे आहेत."*

१९६२ मध्ये चीननं भारतावर आक्रमण केलं त्या वेळी भारत व अमेरिका यांच्यात एक 'गुप्त समझोता' झाला होता, त्याची अयूबखानना कल्पना नव्हती; त्यामुळं त्यांची दिशाभूल झाली, असा शोध अल्ताफ गौहर यांनी अलीकडेच लावला आहे. १९ नोव्हेंबर

१९६२ रोजी पं. नेहरूंनी अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांना दोन पत्रं पाठवली होती. चीनला रोखण्यासाठी अमेरिकेनं हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यात केलेली होती. या पत्राला केनेडींनी धाडलेलं उत्तर म्हणजेच चीनविरुद्ध भारत व अमेरिका यांच्यातील करार असं त्यांचं म्हणणं! हा पत्रव्यवहार अजून गुप्त राखण्यात आला असून तो त्यांनी पाहिलेला नाही. परंतु त्या वेळचे राष्ट्राध्यक्षांचे एक मदतनीस कार्ल केसन यांच्याशी झालेल्या संभाषणाच्या आधारे गौहर यांनी ('अयूबखान,' पृष्ठ ४९८) हे लिहिलं आहे :

*"पं. नेहरूंची पत्रं अजूनही गुप्त ठेवलेली आहेत. का? याचं कारण नेहरूंची दोन पत्रं व राष्ट्राध्यक्ष केनेडी यांचं उत्तर हा चीनविरुद्ध संयुक्त लष्करी कारवाई करण्याबाबतचा भारत सरकार व अमेरिकन सरकार यांच्यातील समझोता आहे. चीननं धमकी दिली असं भारताला वाटलं तर हा करार अमलात येणार होता. १९६५ मध्ये पाकिस्तानला या करारातील अटींची कल्पना नव्हती. त्यामुळं १९६५ मधील भारत-पाक युद्धाच्या वेळी अमेरिकेला भारताला पाठिंबा देणं का भाग पडलं हे अयूबखानना समजलं नाही. पाकला चीनचा पाठिंबा असल्यानं अमेरिकेनं भारताची बाजू घेतली. अयूबना जर या कराराची माहिती असती तर त्यांनी 'ऑपरेशन जिब्राल्टर'ला संमतीच दिली नसती."*

परंतु अटी कसल्या? चीननं भारताला धमकी दिली तर संयुक्त कारवाई करणं एवढी एकमेव अट गौहर नमूद करतात. अर्थात १९६५ मध्ये चीननं हल्ला केला असता तर भारताच्या मदतीला अमेरिका धावून आली असती. कम्युनिस्ट आक्रमणाविरुद्ध खुल्या जगाला मदत करण्याचं अमेरिकेचं धोरण असून त्यानुसार त्यानं ही मदत भारताला केलीच असती.

अयूबना हे ठाऊक नव्हतं व म्हणून त्यांनी युद्धाची योजना अमलात आणली, असं म्हणणं म्हणजे अयूबना राजकीय दृष्ट्या नवशिके समजण्यासारखंच आहे. चीनच्या बाबतीत अमेरिकेच्या भूमिकेची अयूबना चांगलीच कल्पना होती. कारण खुद्द जॉन्सन यांनी भुत्तोंमार्फत व पत्र पाठवूनही तसा इशारा दिला होता. तेव्हा चीननं भारताला धमकी दिली वा त्याच्यावर हल्ला केला तर अमेरिका भारताच्या पाठीशी उभी राहील हे अयूबना चांगलंच ठाऊक होतं. तरीही त्यांनी युद्धाचा बेत पार पाडायचं ठरवलं. कारण आपल्या लष्करी सामर्थ्याबद्दल त्यांची अव्वाच्या सव्वा कल्पना होती व भारताला आपण एक-दोन जबर तडाखे देऊ अशा भ्रमात ते होते. तसंच भारताच्या लष्करी सामर्थ्याला त्यांनी कमी लेखलं. भारत व अमेरिका यांच्यात समझोता होता हे गौहर यांचं म्हणणं पुराव्यावर आधारलेलं नाही. १९६५ मध्ये चीननं भारताला निर्वाणीचा इशारा दिला तेव्हा शास्त्री आणि जॉन्सन यांनी आपल्या पत्रव्यवहारात १९६२ च्या 'गुप्त समझोत्या'चा कधी उल्लेख केलेला नाही. मी हा पत्रव्यवहार पाहिलेला आहे. दोघा नेत्यांनी अशा समझोत्याचा उल्लेख केला नाही, याचं कारण असा समझोता झालेलाच नव्हता, हे उघड आहे.

□□



।। वीस ।।

# युद्धबंदी

सुरक्षा समितीच्या २० सप्टेंबर रोजी भरलेल्या बैठकीत तत्काळ युद्धबंदीची मागणी करणारा ठराव मंजूर झाला. "भारतानं बिनशर्त युद्धबंदी आधीच मान्य केली असून पाकनं मान्यता देताच भारत तिची अंमलबजावणी करायला तयार आहे," असं छगला यांनी या बैठकीत स्पष्ट केलं होतं. या संदर्भात शास्त्री यांनी १४ व १५ सप्टेंबर रोजी युनोच्या सरचिटणीसांना पाठवलेल्या पत्रांचा उल्लेख छगला यांनी केला. आपल्याला बिनशर्त युद्धबंदी मान्य आहे असं पाकनं अद्याप कळवलेलं नव्हतं. त्यानंतर शास्त्री व अयूब यांच्याशी सरचिटणीस सतत संपर्क साधून होते.

लढाई विशेषतः सियालकोट क्षेत्रात जोरात चालू होती, तरी शांतता प्रस्थापित होईल असं वातावरण भारतात २१ सप्टेंबर रोजी तयार झालं होतं. पाकच्या भूमिकेविषयी युनोच्या सरचिटणीसांकडून काहीच निरोप आला नव्हता.

नियोजित वेळेला एकतर्फी युद्धबंदी जाहीर करावी व हल्ला झाला तरच भारतीय फौजांनी प्रत्युत्तर द्यावं अशा सूचना लष्कराला द्याव्या असा तातडीचा संदेश ऊ थांट यांनी २२ सप्टेंबरला शास्त्रींना पाठवला. ही सूचना मुळीच मान्य होणारी नव्हती. शास्त्रींनी ती लागलीच फेटाळून लावली. पाकनं पण युद्धबंदीला मान्यता दिली आहे हा संदेश २२ सप्टेंबरला दुपारी युनोच्या सरचिटणीसांकडून आला. फील्ड कमांडर्सना सूचना देण्यास पुरेसा अवधी मिळावा म्हणून आता युद्धबंदीची वेळ २२ सप्टेंबरला रात्री १० वाजता (ग्रीनविच वेळेनुसार पश्चिम पाकिस्तानमध्ये २३ सप्टेंबरला दुपारी ३

वाजता व भारतात २३ सप्टेंबरला दुपारी ३.३० वाजता.) ठरवण्यात आल्याचंही या संदेशात म्हटलं होतं. हा संदेश मिळताच शास्त्रींनी तत्काळ यशवंतराव चव्हाण व सरदार स्वर्णसिंग यांच्याशी सल्लामसलत केली. त्यानंतर जनरल चौधरी व एअरचीफ मार्शल अर्जुनसिंग पंतप्रधानांच्या कार्यालयात आले. तो क्षण संस्मरणीय होता. शास्त्रींनी त्यांचं स्वागत केलं. त्यांनी संयम राखला तरी त्यांच्या मनातील भावना चेहऱ्यावर उमटल्या होत्या. दोघांशी प्रेमभरानं हस्तांदोलन करून शास्त्रींनी युद्धबंदीचे औपचारिक आदेश दिले. दोघांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले व त्यांच्या उत्तम लष्करी कामगिरीचं कौतुक केलं. त्या दोघांनीही शास्त्रींचं नेतृत्व व मार्गदर्शन याबद्दल प्रशंसोद्गार काढले.

दुपारी दोननंतर लगेच कमांडर्सना युद्धबंदीच्या सूचना देण्यात आल्या. चौधरी व अर्जुनसिंग यांच्या भेटीनंतर शास्त्री तडक संसदेत गेले व त्यांनी युद्धबंदीचा तपशील जाहीर केला. आपल्या भाषणाची सांगता करताना ते म्हणाले :

*"आता संघर्ष थांबेल. शांतता केव्हाही चांगलीच आहे. परंतु आज सुरक्षा समितीच्या बैठकीत पाकच्या परराष्ट्र मंत्र्यांनी इशारा दिलेला आहे. तेव्हा आपल्याला अत्यंत जागरूक व सावध राहायला हवं.*

*अलीकडच्या काळात देशाला मोठ्या दिव्यातून जावं लागलं. काळ कठीण होता तरी त्यामुळं एक उद्दिष्ट साध्य झालं. हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, पारशी व अन्य जमाती यांचा समावेश असलेली भारतीय जनता ही एक राष्ट्र म्हणून निर्धारानं व एकजुटीनं उभी राहते याचं दर्शन साऱ्या जगाला घडलं. युद्धाच्या आघाडीवर सर्वच जमातींच्या सदस्यांनी सर्वोच्च त्याग केला. आपण अथपासून इतीपर्यंत भारतीयच आहोत हे त्यांनी दाखवून दिलं.*

*संसदेच्या व सबंध भारतीय जनतेच्या वतीनं आपल्या लष्कराचं मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांनी दाखवलेलं अतुलनीय धैर्य व शौर्य यामुळे भारतीय जनतेला नवा आत्मविश्वास मिळाला. ज्यांचे नातेवाईक युद्धात धारातीर्थी पडले त्यांनी देशाचं स्वातंत्र्य जतन करण्यासाठी मोठी कामगिरी पार पाडली. राष्ट्राला त्याचं कधीच विस्मरण होणार नाही. त्यांच्या आनंदात व दुःखात सारा देश सहभागी आहे.*

*या सदनाचे सारे सदस्य, देशातील सर्व राजकीय पक्ष, जनताजनार्दन, व्यापारी व उद्योगातील संघटना, कामगार संघटना आणि इतर अनेक स्वयंसेवी संस्था यांचा मी ऋणी आहे. कसोटीच्या क्षणी या देशातील ४७ कोटी जनतेपैकी प्रत्येक जण स्वातंत्र्याच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी खांद्याला खांदा लावून उभा राहिला.*

*१८ सप्टेंबर १९६५ रोजी सोविएट मंत्रिमंडळाचे अध्यक्ष कोसिजिन यांचा एक संदेश मला मिळाला. भारत व पाकिस्तान यांच्यामधील संबंध सुधारावेत म्हणून मध्यस्थी करण्याची तयारी त्यांनी दर्शवली. कोसिजिन यांचा हेतू उदात्त*

*आहे. अखेर भारत व पाकिस्तान यांना शेजारी म्हणून गुण्यागोविंदानं नांदायचं आहे, हे कोणीही अमान्य करणार नाही. त्यामुळं अशी परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून केल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रामाणिक मैत्रीपूर्ण प्रयत्नाला आपण नकार देऊ शकत नाही. त्यामुळं मी कोसिजिन यांना तुमच्या प्रयत्नांचं स्वागतच होईल असं कळविलं आहे.*

*आता या सदनाला मी एका अपघाताची अधिक माहिती देऊ इच्छितो. बलवंतराय मेहता ज्या विमानानं प्रवास करीत होते ते पाकिस्तानी विमानानं पाडलं, असं तपासात आढळून आलं आहे. विमानावरील खुणा पाहता तोफांचा वापर झाल्याचं दिसतं. विमान कमी उंचीवर असताना पाडण्यात आलं, असं हवाई दलाच्याही प्राथमिक चौकशीत आढळून आलं. अपघातस्थळी जो दारूगोळा सापडला तो पाहता हल्लेखोर विमान पाकचं होतं, असं दिसतं. एक नागरी विमान अशा प्रकारे पाडण्याचं कृत्य अत्यंत अमानुष असून आपण सर्वांनी त्याचा निषेध केला पाहिजे. बलवंतरायजी, त्यांची पत्नी व त्यांच्यासमवेत प्रवास करणारे अन्य नागरिक यांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या वेदीवर आपली आहुती दिली. त्यांचं आम्हांला कधीच विस्मरण होणार नाही.''*

पंतप्रधानांच्या या निवेदनावर संसदेत चर्चा झाली, त्यात अनेक सदस्यांनी भाग घेतला. युद्धबंदीच्या कराराला पाठिंबा देण्यात आला, पण सुरक्षा समितीनं पाकला स्पष्टपणं आक्रमक म्हणून घोषित केलं नाही याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. हाजीपीर खिंडीसारखी युद्धबंदी रेषेच्या पलीकडील ठाणी भारतानं ताब्यात ठेवावी असं मत अनेक सदस्यांनी व्यक्त केलं. याचा अर्थ नवी युद्धबंदी रेषा आखावी असं त्यांचं मत होतं. सध्याची युद्धबंदी रेषा जुलै १९४९ मध्ये निश्चित करण्यात आली होती. तिचा उल्लेख '५ ऑगस्टची रेषा' असा करून आचार्य जे. बी. कृपलानी म्हणाले :

*''ज्यांना भूगोल ठाऊक नाही अशा माणसांनी ही ५ ऑगस्टची रेषा आखली आहे. त्यांना भूगोलाचं ज्ञान असतं तर हाजीपीर खिंड पाकच्या ताब्यात त्यांनी ठेवू दिली नसती. ही रेषा लष्कराच्या दृष्टीतून व शास्त्रशुद्धरीत्या आखण्यात आलेली नाही. जागतिक मताची समजूत घालण्यासाठी घाईघाईनं ती आखण्यात आली. जागतिक मताला काही महत्त्व नाही व युनो संघटना तिच्याआधीच्या 'लीग ऑफ नेशन्स'पेक्षा काहीशी बरी आहे इतकंच. त्यात सत्तेच्या राजकारणाचा प्रभाव आहे. सत्तेचा समतोल राखण्याचा हेतू त्यात प्रामुख्यानं आहे. सत्तेच्या समतोलाचा जोवर विचार केला जाईल व सत्तेचं राजकारण खेळलं जाईल तोवर सत्याची पर्वा केली जाणार नाही. त्याच्या नशिबी तडजोड करण्याशिवाय पर्याय राहत नाही. अशी तडजोड आपण करीत राहिलो तर पुन्हा पुन्हा आपण अडचणीत येत राहू.''*

क्षणभर थांबून कृपलानी पुढं म्हणाले, ''आपण जर नवी रेषा निश्चित केली तर

आपण पुन्हा अडचणीत सापडू.''

विजयालक्ष्मी पंडित म्हणाल्या :

*''स्वातंत्र्यानंतर सर्वांत गंभीर अशा धोक्याच्या काळातून गेले काही आठवडे आपण जात होतो. पाकिस्तानच्या विश्वासघातकी व खोटारड्या वर्तनाची आणि ज्या पद्धतीनं त्यांनी आपल्या देशावर तिसऱ्यांदा आक्रमण केलं त्याची कहाणी लज्जास्पद आहे. मात्र आपण त्यांना चोख उत्तर दिलं असून त्यामुळं आज आपल्याला अभिमान वाटत आहे. आमच्या प्रदेशात घुसणाऱ्या व ज्या मूल्यांच्या पायावर देश उभा आहे ती मूल्यं उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या देशाला तुम्ही आमच्या वाटेला जाऊ नका असं आम्ही बजावलं आहे. तसंच अजूनही मध्ययुगीन कल्पना बाळगू नका असंही आपण त्यांना निक्षून सांगितलं आहे.*

*पंतप्रधानांनी या पेचप्रसंगी केलेल्या धाडसी नेतृत्वाबद्दल मी आदर प्रकट करते.''*

शास्त्री हे 'अनिश्चिततेचे कैदी' आहेत असं आता विजयालक्ष्मी पंडित यांना वाटत नव्हतं, हे उघड आहे.

एल. एम. सिंघवी यांनी भारताची जगातील प्रसिद्धी व राजनैतिक प्रयत्न अपुरे आहेत असं सांगितलं. ते म्हणाले,

*''पाकिस्तान हे आक्रमक राष्ट्र आहे, असं सिद्ध झालं असूनही त्याकडे युनोनं दुर्लक्ष केलं हे अजब आहे. श्री. छगला यांनी अलीकडेच आपली बाजू प्रभावीपणं मांडली असली तरी गेली काही वर्षं आपण आपली भूमिका जगाला पुरेशी समजावून दिलेली नाही, हे स्पष्ट होतं. आपली बाजू मांडण्यात आपण निष्प्रभ ठरलो आहोत, तसंच त्यात काही कल्पकताही आपण दाखवलेली नाही. परदेशांचे अनेक संसद-सदस्य व राजदूत यांनी आपणाला पुरेशी माहितीच देण्यात आलेली नाही असं मला सांगितलं. साहजिकच युनोच्या सर्व सदस्यांपैकी केवळ मलेशिया व सिंगापूर हेच काय ते आपला दृष्टिकोन समजावून घेणारे निघाले. त्याबद्दल एका बाजूला खंत प्रकट करताना दुसऱ्या बाजूला विदेशांतील आपली प्रसिद्धी व आपली मुत्सद्देगिरी यांबाबत आपण अंतर्मुख होऊन विचार करायला हवा.''*

पीटर अल्वारिस यांनी सोविएट युनियनबद्दल सांगितलं : ''यापूर्वी काश्मीर प्रश्नावर रशियाचा भारताला बिनशर्त पाठिंबा होता. आता मात्र हा प्रश्न युनोच्या पातळीवर खुला करण्याच्या बाबतीत महासत्तांच्या प्रयत्नांत सोविएट रशियानंही सहभागी व्हावं हे क्लेशकारी आश्चर्य आहे!''

या प्रश्नावर अगदी मनापासून बोलताना अन्सर हरवाणी म्हणाले, ''या कठीण समयी पंतप्रधानांनी जे धाडसी व चैतन्यदायी नेतृत्व देशाला दिलं त्याबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो. ही वामनमूर्ती या देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या पं. जवाहरलाल

नेहरूंची खरीखुरी वारस ठरली आहे. या स्वातंत्र्याचं शौर्यानं रक्षण करण्याची कामगिरी लालबहादुर शास्त्री यांनी केली अशीच नोंद इतिहास करील.''

सुरक्षा समितीच्या २० सप्टेंबरच्या ज्या बैठकीत युद्धबंदी ठराव मंजूर झाला त्या बैठकीत भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करणारे एम. सी. छगला यांनी त्यानंतर हा ठराव पाकधार्जिणा नाही, हे तपशीलवार समजावून दिलं. किंबहुना या ठरावावर पाक नाराज होता व आरंभी त्यानं तो फेटाळलाही होता, असं सांगून भारताला अनुकूल असलेल्या या ठरावातील वैशिष्ट्यं त्यांनी विशद केली.

सदनातील प्रत्येकानं शास्त्रींची प्रशंसा केली. काही आठवड्यांपूर्वी विरोधी पक्ष सरकारवर अविश्वासदर्शक ठराव आणण्याचा आग्रह धरीत होते. पण आता चित्र पार बदललं होतं! आता सारे जण शास्त्रींच्या नेतृत्वावर विश्वास प्रकट करीत होते.

शेवटी चर्चेला उत्तर देताना शास्त्री म्हणाले,

*''आजच्या चर्चेत भाग घेतलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचा मी आभारी आहे. वक्ते अनेक होते व त्यांनी आपल्या शब्दांत आपल्या भावना प्रकट केल्या. मला मात्र सदनाच्या सर्व बाजूंनी एकच आवाज ऐकू येत होता. तो आवाज होता देशभक्तीचा. आक्रमक कोणीही असो, देशाच्या सार्वभौमत्वाचं व प्रादेशिक ऐक्याचं रक्षण करण्याच्या राष्ट्रीय निर्धाराचा तो आवाज होता. आपल्या लोकप्रतिनिधींच्या मार्फत भारतीय जनताच जणू एकमुखानं बोलत होती, लोकांच्या सार्वभौम इच्छेचाच तो हुंकार होता. गेल्या एप्रिलमध्ये याच सदनात बोलताना आपल्या जनतेच्या अंतःकरणाचं ऐक्य व्हावं असं आवाहन मी केलं होतं, याचं या प्रसंगी मी स्मरण करून देऊ इच्छितो. हे ऐक्य पूर्णतः साध्य झाल्याचा प्रत्ययच या कठीण समयी आला. किंबहुना कसोटीच्या काळात या ऐक्यामुळंच सर्वाधिक सामर्थ्य प्राप्त झालं. जम्मू व काश्मीर राज्याबद्दलची आमची भूमिका स्पष्ट व ठाम आहे, हे या सदनाला ठाऊक आहे. ते राज्य हा भारताचा अविभाज्य भाग आहे. तेव्हा पुन्हा स्वयंनिर्णयाची संधी देण्याचा प्रश्नच आता येत नाही. प्रौढ मतदानाच्या आधारावर झालेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांत जम्मू-काश्मीरच्या जनतेनं स्वयंनिर्णयाचा हक्कच बजावलेला आहे. काश्मीरचा प्रश्न खुला करण्यास सोविएट युनियननं मान्यता दिली, असं पीटर अल्वारिस म्हणाले. परंतु असं म्हणणं बरोबर नाही. सोविएट युनियन आज शांततेचा खंदा पुरस्कर्ता आहे. त्यांना युद्धाच्या भीषण परिणामांची जाणीव आहे व भारत-पाक संबंध सुधारावेत अशी त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. त्यांचा हेतू शुद्ध आहे व त्यामुळंच त्यांच्या पुढाकाराचं आपण स्वागत केलं आहे.*

*काही सन्माननीय सदस्यांनी परदेशांतील आमच्या दूतावासांच्या कामाचा उल्लेख केला. सध्याच्या प्रसंगी आमचा प्रत्येक दूतावास जागरूक आणि दक्ष होता. आपल्या न्याय्य भूमिकेची माहिती हे दूतावास वेळोवेळी तेथील सरकारांना देत होते... स्वयंपूर्णता अत्यावश्यक आहे याची पूर्ण वास्तव अशी जाणीव ठेवून पुढील*

*कामगिरी आम्ही पार पाडू. या ऐतिहासिक प्रसंगी या सदनानं जो जोरदार पाठिंबा दिला त्याबद्दल मी आभारी आहे. लष्करानं बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल या सदनाची कृतज्ञता व कौतुक संरक्षणमंत्र्यांमार्फत त्यांना कळवावं. मातृभूमीचं रक्षण करताना धारातीर्थी पतन पावलेले जवान, हवाई दलातील सैनिक, पोलिस व सामान्य नागरिक यांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्यासाठी एक मिनिट उभं राहून मौन पाळावं अशी मी या सदनाला आता विनंती करतो.''*

त्याच दिवशी शास्त्रींनी आकाशवाणीवरून राष्ट्राला उद्देशून भाषण केलं. युद्ध कसं झालं, हे थोडक्यात सांगून जवानांचं शौर्य व अंतिमतः जनतेचा झालेला विजय यांवर त्यांनी आपल्या भाषणात विशेष भर दिला.

□□



।। एकवीस ।।

# अयूब यांची 'गुप्त' चीन भेट

युनोच्या सुरक्षा समितीनं ६ व २० सप्टेंबर १९६५ रोजी ज्या युद्धबंदी रेषेचा उल्लेख केला ती भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये जुलै १९४९ मध्ये औपचारिक करार होऊन निश्चित करण्यात आलेली होती. या रेषेचं पालन व्हावं म्हणून युनोनं एक लष्करी निरीक्षक गट काश्मीरमध्ये नियुक्त केलेला होता. ऑगस्ट १९६५ मध्ये या गटाचे प्रमुख होते जनरल निम्मो. पाकच्या बाजूनं ५ ऑगस्ट १९६५ नंतर शस्त्रधाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर या रेषेचा भंग केला असा अहवाल निम्मो यांनी दिल्याचं पूर्वी नमूद केलं आहेच. त्यानंतर या उल्लंघनाबद्दल पाकिस्तानला स्पष्टपणं दोषी धरण्यात आलं व अप्रत्यक्षरीत्या पाकला आक्रमक म्हटलं गेलं. उभय देशांच्या सशस्त्र फौजांनी ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीच्या जागी– म्हणजेच युद्धबंदी रेषेपलीकडे– जावं अशी मागणी सुरक्षा समितीनं केली होती. याचाच अर्थ १९४९ ची युद्धबंदी रेषा पाळावी असं समितीला म्हणायचं होतं.

जुन्या युद्धबंदी रेषेचं पाकनं वारंवार उल्लंघन केल्यानं ती आता ग्राह्य मानू नये, असं मत राजकीय क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनी २३ सप्टेंबरला युद्धबंदी अमलात आल्यावर शास्त्रींजवळ व्यक्त केलं. गंमत म्हणजे अयूब व भुत्तो यांनीही १९४९ ची युद्धबंदी रेषा अतिपवित्र मानण्याची गरज नाही, असं मत प्रकट केलं. अर्थात त्यामागं त्यांची कारणं वेगळी होती. किंबहुना ही रेषा हा मोठाच अडसर असून काश्मीरवरील आपल्या दाव्याच्या आड ती येते असं त्यांचं म्हणणं होतं. १३ सप्टेंबर रोजी युनोच्या सरचिटणीसांना

अयूबखान यांनी पाठवलेल्या पत्रात म्हटलं होतं :

> *"बिनशर्त युद्धबंदीचा प्रस्ताव तुम्ही मांडला आहे. याचा अर्थ युद्धबंदी होताच ६ सप्टेंबरच्या ठरावाची अंमलबजावणी सुरक्षा समिती करणार असा होतो. ४ आणि ६ सप्टेंबरच्या ठरावान्वये युद्धबंदी अमलात येताच पाकनं आपल्या फौजा युद्धबंदी रेषेच्या अलीकडे पाकिस्तानच्या क्षेत्रात आणाव्यात अशी मागणी केलेली आहे. युनोच्या निरीक्षण गटामार्फत युद्धबंदी रेषेवर देखरेख ठेवली जाणार असल्यानं भारताची काश्मीरवरील लष्करी पकड पुनर्प्रस्थापित होईल."*

भुत्तोंनी त्यांच्या स्वभावानुसार परखड मत व्यक्त केलं. कराची येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'मॉर्निंग न्यूज' दैनिकाच्या २० ऑगस्ट १९६५ च्या अंकात म्हटलं होतं : "भारत ज्याला अनुल्लंघनीय सरहद्द म्हणत आहे ती युद्धबंदी रेषा म्हणजे एक तात्पुरती व्यवस्था आहे." ती रेषा आणखी खाली व्याप्त काश्मीरमध्येही आखता आली असती, असंही भुत्तो यांनी वार्ताहरांना सांगितलं.

युद्धबंदी रेषेबाबतच्या पाकच्या दृष्टिकोनासंबंधी युनोच्या सरचिटणीसांनी ३ सप्टेंबर १९६५ ला सुरक्षा समितीला सादर केलेल्या अहवालात म्हटलं होतं :

> *"यापुढं युद्धबंदी व युद्धबंदी रेषेचं पालन केलं जाईल किंवा या रेषेवर सुरळीत स्थिती निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न केले जातील असं कोणतंही आश्वासन मला पाक सरकारकडून मिळवता आलेलं नाही. पाकनं जर युद्धबंदी करार व युद्धबंदी रेषा पाळण्याचं आश्वासन दिलं तर आम्हीही ती पाळू असं तोंडी आश्वासन भारताच्या युनोतील प्रतिनिधीनं मला दिलं असून कोणत्याही हल्ल्याला प्रत्युत्तर देताना संयम राखण्याचंही आश्वासन दिलं आहे."*

युद्धबंदी रेषा पाळण्याचा पाकचा हेतू नव्हता, कारण त्यात त्याचं हित नव्हतं. मग त्यात हित होतं तरी कोणाचं? ताश्कंद येथील वाटाघाटींत शास्त्री व कोसिजिन यांच्या चर्चेत हा महत्त्वाचा मुद्दा बनला होता. त्याचं विवेचन नंतर करू.

हा मुद्दा बाजूला ठेवून आधी आपण १९६५ मध्ये अयूब यांची काय पंचाईत झाली हे पाहू या. सुरक्षा समितीपुढं विचारार्थ असलेल्या ठरावाचा मसुदा अयूबखानना १८ सप्टेंबरला पाठवण्यात आला होता. त्यात तत्काळ युद्धबंदीची मागणी केलेली होती. या प्रस्तावाला नकार देण्याची अयूब यांची इच्छा होती. परंतु लष्कराची स्थिती पाकला अनुकूल नव्हती. संघर्ष पुढं वाढवण्याला सेना व हवाईदल यांचे प्रमुख तयार नव्हते, असं गौहर यांचं म्हणणं आहे : "दारूगोळा व सुट्या भागांची टंचाई यामुळं जनरल मुसा यांचं नीतिधैर्य खचलं होतं आणि लढाईत विमानं नष्ट होण्याचं प्रमाण वाढून त्यांची संख्या घटत असल्यानं एअर मार्शल नूर खान चिंतित झाले होते." सुरक्षा समितीचा ठराव स्वीकारावा असं दडपण पाश्चात्य राष्ट्रं व सोविएट युनियन पाकवर आणत होते. अशा परिस्थितीत अयूबखान यांनी चीनकडे सल्ला मागितला.

युद्धाच्या काळात चीनचे राजदूत भुत्तोंशी सतत संपर्क साधून होते व पाकनं लढाई चालू ठेवावी असा त्यांचा आग्रह होता. सुरक्षा समितीच्या युद्धबंदी ठरावाबद्दल अंतिम निर्णय घेण्यापूर्वी चौ एन लायना भेटण्याचं अयूबखान यांनी ठरवलं. १९-२० सप्टेंबरच्या रात्री भुत्तोंसह अयूब विमानानं बीजिंगला गेले व दुसऱ्या दिवशी रात्री ते परतले. ही भेट अत्यंत गुप्त राखलेली होती. बीजिंग येथे चौ एन लाय व मार्शल चेन यी यांच्याबरोबर दोन प्रदीर्घ बैठकी झाल्या. त्याबाबत अल्ताफ गौहर म्हणतात : "अयूबखान यांनी लष्करी स्थिती विशद केली. भारताचं संख्याबळ जास्त असल्यानं त्यांची पकड कशी घट्ट होत आहे, पाश्चात्य राष्ट्रं भारताला पूर्ण राजनैतिक पाठिंबा कसा देत आहेत व सोविएट युनियननं मध्यस्थाची भूमिका वठवावी म्हणून त्यांचं मन कसं वळवलं जात आहे हेही अयूबनी सांगितलं."

चीन भारतावरचं दडपण तसंच ठेवील, तुम्ही लढत राहा, असं चौ एन लाय यांनी पाकला सांगितल्याचं म्हटलं जातं. तुम्ही भारतावर किती काळ दडपण ठेवू शकाल, असं अयूबनी विचारलं. तेव्हा चौ एन लाय यांनी "आवश्यक असेल तेवढा काळ आम्ही हे दडपण ठेवू, पण तुम्ही डोंगराळ भागात माघार घ्यावी लागली तरी संघर्ष चालूच ठेवा" असं उत्तर दिलं असंही सांगतात. अमेरिकन दडपणाला बळी पडू नका, तसंच सोविएट युनियनच्या सापळ्यात अडकू नका असा सावधगिरीचा इशाराही चौ एन लाय यांनी अयूबना दिला. पाकिस्ताननं सुरक्षा समितीचा युद्धबंदीचा ठराव फेटाळून लावावा व दीर्घकाळ भारताशी लढाई करीत राहावं अशी चीनची इच्छा होती. ती मान्य करण्याच्या स्थितीत अयूब नव्हते हे उघड आहे. आपली मैत्री टिकाऊ आहे एवढंच आश्वासन अयूब चीनला देऊ शकले. काहीशा उदास मनःस्थितीत अयूब स्वदेशी परतले.

दरम्यान तत्काळ युद्धबंदीची मागणी करणारा ठराव सुरक्षा समितीनं २० सप्टेंबरला मंजूर केला. त्यामुळं उद्भवलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी अयूबनी आपल्या परराष्ट्र मंत्र्यांना न्यूयॉर्कला पाठवलं.

२१ सप्टेंबरला भुत्तो न्यूयॉर्कला पोचले. सुरक्षा समितीचे त्या वेळचे अध्यक्ष व अमेरिकेचे प्रतिनिधी गोल्डबर्ग यांची मुलाखत त्यांनी मागितली. त्यांना ताबडतोब भेट मिळाली. त्या दोघांत झालेल्या संभाषणाचा अधिकृत गोषवारा पुढीलप्रमाणे :

> *"संघर्ष थांबावा व युद्ध पुढं चालू ठेवू नये अशी पाकची इच्छा आहे, असं भुत्तो यांनी आरंभी सांगितलं. गेली १८ वर्षं रेंगाळत पडलेल्या काश्मीर प्रश्नाबाबत 'सन्माननीय' तडजोड हवी असं ते म्हणाले. त्याबाबत भारत एकेक दरवाजे बंद करीत असताना या काळात पाकनं कधी लष्कराचा वापर केला नाही याची नोंद घ्यावी, असंही ते म्हणाले. ठरावाचा पाकनं काळजीपूर्वक अभ्यास केला असून तो 'मुळातच कमकुवत' आहे असं दिसून येतं. ठराव पक्षपाती आहे. त्यात भारतानं केलेल्या आक्रमणाची अथवा जम्मू-काश्मीरच्या जनतेच्या स्वयंनिर्णयाची दखल*

*घेतलेली नाही. तेव्हा हा ठराव आहे त्या स्वरूपात पाकला मान्य होणार नाही, असं त्यांनी सांगितलं."*

पाकनं हा ठराव स्वीकारावा म्हणून पाकला अनुकूल असलेल्या त्यातील बाबींकडे गोल्डबर्ग यांनी भुत्तोंचं लक्ष वेधलं. ठरावाच्या प्रस्तावनेत काश्मीरचा उल्लेख होता व चौथ्या परिच्छेदात या वादाच्या भावी तोडग्याचा उल्लेख होता, हे त्यांनी लक्षात आणून दिलं. पूर्वी या ठरावाला एकमुखी पाठिंबा नव्हता, परंतु आता तो मिळाला आहे असंही त्यांनी सांगितलं. या दोघांच्या चर्चेच्या अधिकृत गोषवाऱ्यातील आणखी काही भाग असा :

*"सुरक्षा समितीच्या सदस्यांना तुम्हांला काय कळवायचं आहे असं गोल्डबर्गनी भुत्तोंना परत विचारलं. त्या वेळी आपल्याला सदस्यांना एवढ्यात भेटायचं नाही; वरिष्ठांशी चर्चा करून मुदत संपण्यापूर्वी पाकिस्तानचं उत्तर आपण कळवू असं भुत्तो म्हणाले. (हे संभाषण चालू असताना रावळपिंडीहून फोन आला म्हणून ते दालनाबाहेर गेले.) पूर्वीच्या निर्णयांचा ठरावात काही उल्लेख नाही व ५ ऑगस्ट या तारखेचा उल्लेख आहे यामुळं अडचणी निर्माण झाल्या असून पाकिस्तान ठरावाला संमती देईल की नाही याबद्दल आपण साशंक आहोत असंही ते म्हणाले.*

*सुरक्षा समितीच्या सदस्यांना प्रतीक्षा करायला सांगू काय, अशी विचारणा गोल्डबर्ग यांनी केली. समितीपुढं तत्काळ भाषण करण्याची भुत्तोंची इच्छा असेल तर त्यांच्या विनंतीला आपण पाठिंबा देऊ असंही त्यांनी भुत्तोंना सांगितलं.*

*त्याबाबत भुत्तोंनी आभार मानले. परंतु रावळपिंडी जो काही निर्णय घेईल त्यावर आपलं म्हणणं अवलंबून राहील, तेव्हा त्या क्षणी तरी सुरक्षा समितीच्या बैठकीची गरज नाही असं ते म्हणाले.*

*ठरावाबद्दल पाकचा दृष्टिकोन काय याबद्दल सुरक्षा समितीच्या सदस्यांना मी काय सांगू, असं गोल्डबर्ग यांनी विचारलं. ५ ऑगस्ट या तारखेच्या उल्लेखामुळं आपल्याला आक्रमक ठरवलं जात आहे व पूर्वीच्या ठरावांचा उल्लेख न केल्यानं पाकच्या धोरणाबद्दल पूर्वग्रह निर्माण होतो, असं पाकला वाटत असल्याचं सांगावं काय, असंही त्यांनी विचारलं. परंतु पाकनं जर ठराव स्वीकारायचं ठरवलं तर आपल्यापुढं अडचणी उभ्या राहतील, तेव्हा गोल्डबर्ग यांनी अशा नेमक्या शब्दांत बोलण्याची आवश्यकता नाही, असं सांगून भुत्तो म्हणाले की, सर्वसाधारण चर्चा झाली, भारताला आक्रमक ठरवलं नाही म्हणून भुत्तोंनी खंत प्रकट केली, पूर्वीच्या ठरावांचा उल्लेख केला असता तर बरं झालं असतं व ५ ऑगस्टबद्दल त्यांनी स्पष्टीकरण मागितलं एवढंच सांगा. ५ ऑगस्टचा उल्लेख याचा अर्थ युद्धबंदी रेषा व आंतरराष्ट्रीय सरहद्द असं उत्तर गोल्डबर्ग यांनी दिल्याचंही नमूद करावं असं ते म्हणाले."*

याच वातावरणात गोल्डबर्ग व भुत्तो यांची बैठक संपली. भुत्तोंच्या संभाषणातील

अखेरचा सूर बघता त्यांना युद्धबंदी स्वीकारण्याच्या सूचना रावळपिंडीनं फोनवरून दिल्या असाव्यात असा निष्कर्ष निघतो.

या दोघांच्या भाषणाचा गोषवारा २१-२२ सप्टेंबरच्या रात्री परराष्ट्रमंत्री डीन रस्क व राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांना देण्यात आला.

भुत्तो व गोल्डबर्ग यांच्या संभाषणावरून पाकला ५ ऑगस्ट या तारखेचं महत्त्व व आधीच्या ठरावांचा नसलेला उल्लेख याचा अन्वयार्थ ठाऊक होता, हे उघड होतं. भुत्तो यावर संतापानं खवळलेच होते. त्या क्षणी त्यांना निर्णय घ्यायला सांगितलं असतं तर त्यांनी सुरक्षा समितीचा बंधनकारक ठराव फेटाळून लावला असता. दरम्यान अयूबखान यांनी ठराव मान्य करण्याची मानसिक तयारी केली होती व भुत्तो पूर्णतः त्यांच्या नियंत्रणाखाली होते.

त्यामुळं युद्धबंदी मान्य आहे हे कळवायची जबाबदारी भुत्तोंवर येऊन पडली. त्या संधीचा त्यांनी नाट्यपूर्ण फायदा घेतला. त्यांच्या विनंतीनुसार २१ सप्टेंबरला मध्यरात्री सुरक्षा समितीची बैठक भरली व ती २२ सप्टेंबरला पहाटेपर्यंत चालली. या बैठकीत भुत्तोंनी नेहमीप्रमाणं भारतावर हल्ला चढवला. काश्मीर प्रश्नावर जर 'सन्माननीय' तोडगा लवकर काढण्यात आला नाही तर पाक युनोच्या सदस्यत्वाचा राजीनामा देईल, असा इशाराही त्यांनी दिला. परंतु युद्धबंदी मान्य आहे असं त्यांनी जाहीर केलं. या 'नाट्या'नंतर पाकचे अध्यक्ष अयूबखान यांना ठराव मान्य असल्याचं युनोतील पाकचे कायमचे प्रतिनिधी सय्यद अमजद अली यांनी युनोच्या सरचिटणीसांना कळवलं. २२ सप्टेंबरला पहाटे त्यांनी पाठवलेला अध्यक्षीय संदेश पुढीलप्रमाणं होता :

*"सुरक्षा समितीनं २० सप्टेंबरला मंजूर केलेला ठराव क्र. २११ हा असमाधानकारक आहे, असं पाकिस्तानचं मत आहे. परंतु आंतरराष्ट्रीय शांततेच्या दृष्टीनं आणि सध्याच्या संघर्षाचं मूळ कारण असलेल्या काश्मीरच्या वादातून सन्माननीय तडजोड निघण्यासाठी स्वायत्त प्रक्रिया आखणं सुरक्षा समितीला सुलभ व्हावं म्हणून मी पाकिस्तानी लष्कराला पुढील आदेश दिले आहेत :*

*(१) पश्चिम पाकिस्तानच्या वेळेनुसार आज दुपारी १२ वाजून ५ मिनिटांपासून त्यांनी लढाई थांबवावी.*

*(२) त्यांच्यावर गोळीबार झाला तरच उलट गोळीबार त्यांनी करावा, अन्यथा शत्रूवर गोळीबार करू नये. अर्थात भारतानं असेच आदेश आपल्या फौजांना दिले तरच हे अमलात आणलं जाईल."*

त्यानंतर युनोच्या सरचिटणीसांनी २२ सप्टेंबर १९६५ रोजी पुढील संदेश भारताचे पंतप्रधान व पाकचे अध्यक्ष यांना पाठविला :

*"सुरक्षा समितीनं २० सप्टेंबर रोजी मंजूर केलेल्या ठरावात युद्धबंदीची मागणी केली होती, ती उभय सरकारांनी मान्य केली आहे हे मी आपल्याला कळवू*

*इच्छितो. २२ सप्टेंबरला पहाटे सुरक्षा समितीची बैठक भरली. युद्धबंदी ही बुधवार दि. २२ सप्टेंबरला ग्रीनविच वेळेनुसार रात्री १० वाजता (पश्चिम पाकिस्तानची वेळ २३ सप्टेंबरला दुपारी ३ वाजता व भारतीय वेळ त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता.) अमलात यावी असं या बैठकीत ठरवण्यात आलं. प्रत्यक्ष रणभूमीवरील कमांडर्सना सूचना देण्यासाठी उभय सरकारांना अवधी मिळावा म्हणून ही मुदतवाढ देण्यात आली आहे.''*

पाकिस्तान सरकारनं आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना युद्धबंदीचे आदेश दिले आणि पश्चिम पाकिस्तानच्या वेळेनुसार २३ सप्टेंबरला दुपारी ३ वाजता व भारतीय वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता युद्धबंदी अमलात आली.

□□



।।बावीस।।

# तीन 'वामनमूर्ती'

युद्ध संपलं आणि शास्त्रींच्याच शब्दांत सांगायचं तर 'नव्या जागृत भारताचा उदय झाला.' पाकिस्तानचा पराजय झाला होता व चीनचा धोका टळला होता. सोविएट युनियन व अमेरिका भारताशी मित्रत्वानं वागू लागले अथवा ते 'विधायक दृष्ट्या तटस्थ' राहिले होते. संघर्ष थांबल्यावर अमेरिकेतील परराष्ट्रखात्यानं केलेलं मूल्यमापन असं होतं : "या संघर्षातून मजबूत एकजूट असलेल्या राष्ट्रीय उद्दिष्टाचं भान व उपखंडात प्रभावी स्थान असलेल्या भारताचं दर्शन घडलं."

संघर्ष संपल्यानंतरही पाकशी असलेल्या संबंधांच्या अनेकविध प्रश्नांची हाताळणी करण्याचं महत्त्वपूर्ण कार्य शास्त्रींच्या पुढं होतं. युद्धबंदीची प्रभावी अंमलबजावणी हा पहिला प्रश्न होता. युद्धबंदी स्वीकारल्यावरही अमृतसरच्या नागरी जनतेवर बॉम्बफेक करून व गुजरातचे मुख्य मंत्री प्रवास करीत असलेलं निःशस्त्र विमान पाडून पाकिस्ताननं अत्यंत अमानुष व अनुचित वर्तन केलं आहे, असं शास्त्रींनी २३ सप्टेंबरला आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात सांगितलं होतं. युद्धबंदीचा भंग करून पाक फौजांनी गोळीबार केला तर त्यांना गोळीबारानंच प्रत्युत्तर द्यावं, असे आदेश त्यांनी जनरल चौधरींना दिले होते.

यूनोची सर्वसाधारण बैठक भरणार होती. तिथे पाकिस्तान काश्मीरचा प्रश्न काढण्याचा संभव होता, म्हणून सरदार स्वर्णसिंग यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ शास्त्रींनी युनोला पाठवलं. काश्मिरी मंत्री मीर कासिम यांचा त्या शिष्टमंडळात समावेश

केला होता. शास्त्रींनी जाहीर केलेल्या धोरणानुसार काश्मीरबद्दलची बाजू कशी मांडावी हे या शिष्टमंडळाला समजावून देण्यात आलं होतं.

युद्धाच्या काळात वाढीला लागलेली राष्ट्रीय ऐक्याची व राष्ट्रीय सहमतीची भावना टिकवणं व दृढ करणं हे दुसरं महत्त्वाचं काम होतं. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनसंपर्क ठेवणं अत्यावश्यक होतं. तेव्हा दिल्ली, मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणी पंतप्रधानांनी जाहीर सभा घेतल्या. आपल्या गत धोरणांची पार्श्वभूमी सांगून भावी धोरणांची माहिती जनतेला देण्याचा उद्देश त्यामागं होता. २६ सप्टेंबर १९६५ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर त्यांनी केलेल्या भाषणात अनेक बाबींचा समाचार घेतला. ते प्रसन्नचित्त होते व त्यांचा आत्मविश्वास ओसंडत होता. लाहोरच्या दिशेनं आपल्या फौजांना आगेकूच करण्यास का सांगितलं याचं वर्णन करताना ते म्हणाले,

> *"सदर अयूबने ऐलान किया था कि, वो दिल्ली तक चहलकदमी करते हुए पहुंच जायेंगे। वो इतने बडे आदमी हैं, लहीम शहीम हैं। मैंने सोचा कि उनको दिल्लीतक पैदल सफर करने की तकलीफ क्यों दी जाय? हमही लाहोर की तरफ बढकर उनका इस्तिकबाल करें!"*

काश्मीरमधील काही भाग अजूनही पाकच्या ताब्यात आहे, असं सांगून शास्त्रींनी बी. बी. सी. नं लंडनहून केलेल्या एका प्रक्षेपणाचा उल्लेख केला. शास्त्री हे हिंदू असल्यानं त्यांनी पाकविरुद्ध युद्ध पुकारलं, असं बी. बी. सी. नं त्यात सूचित केलं होतं. त्या संदर्भात शास्त्री म्हणाले,

> *"मी हिंदू आहे यात शंकाच नाही. या सभेचे अध्यक्ष मीर मुश्ताक साहिब हे मुस्लीम आहेत. तुमच्यापुढं भाषण केलेले फ्रँक अँथनी हे ख्रिश्चन आहेत. येथे शीख व पारशीही हजर आहेत. आमच्याकडे हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी व इतर सर्व धर्मांचे लोक आहेत. हेच तर आमच्या देशाचं वैशिष्ट्य आहे. आमच्या देशात मंदिरं आहेत व मशिदीही आहेत, गुरुद्वारा आहेत व चर्चेसही आहेत. परंतु आम्ही हे राजकारणात आणीत नाही. आम्ही भारताला हिंदू अथवा मुस्लीम राष्ट्र बनवू इच्छीत नाही. भारत व पाकिस्तान यांत हाच तर फरक आहे. पाकिस्तान स्वतःला इस्लामी राष्ट्र म्हणवतं व धर्माचा राजकीय घटक म्हणून वापर करतं. भारतात मात्र प्रत्येकाला त्याचा धर्म पाळण्याची पूर्ण मुभा आहे. राजकारणात प्रत्येक जण सारखाच भारतीय आहे. तेव्हा धर्माच्या संकुचित दृष्टिकोनातून भारताचं पाकशी शत्रुत्व आहे असं म्हणणं म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणं आहे. प्रादेशिक ऐक्याच्या बाबतीत आम्ही चीनबद्दल स्वीकारलेलं धोरणच पाकच्याही बाबतीत अंगिकारलेलं आहे... देशाच्या संरक्षणाची बाब ही धर्माशी निगडित नसून ती मातृभूमीच्या स्वातंत्र्याशी व सार्वभौमत्वाशी निगडित आहे."*

भारतीय लष्कराच्या बाबतीत ते म्हणाले,

*"कालच मी लष्करी रुग्णालयातील जखमी जवानांची व अधिकाऱ्यांची भेट घेतली. ते जबर जखमी झाले असले तरी एकही दुःखी चेहरा वा एकही अश्रू मला दिसला नाही. जखम कितीही गंभीर असली तरी प्रत्येकाचा चेहरा प्रसन्न होता, त्यावर स्मित झळकत होतं. पाय तोडावा लागलेला एक अधिकारी मला भेटला. रणांगणावर पायाला जखम झाल्यावरही आपण एका पाक अधिकाऱ्याला कसं ठार केलं हे त्यानं अभिमानानं मला सांगितलं. भूपिंदर सिंग या दुसऱ्या अधिकाऱ्याचं सारं शरीर रक्तानं माखलेलं होतं. तो डोळे मिटून पलंगावर पडून होता. त्याला पाहून मी हेलावूनच गेलो. उभं राहून मला अभिवादन करता येत नाही म्हणून त्यानं दिलगिरी व्यक्त केली. त्यानं शत्रूचे सात रणगाडे नष्ट केले होते. त्याच्या तुकडीनं एकूण ३१ रणगाड्यांचा धुव्वा उडवला होता. 'मी लवकरच बरा होईन, पण नाही झालो तरी काही बिघडत नाही. कारण आता देशाची मान उंचावली आहे,' असं तो म्हणाला. 'सबंध देशाला तुझा अभिमान वाटतो,' असं मी त्याला सांगितलं. भारतीय सैनिकांनी लढाईत दाखवलेल्या शौर्याबद्दल साऱ्या देशाच्या वतीनं कृतज्ञता व्यक्त केली. देशातील प्रत्येक बालक, स्त्री-पुरुष यांना भारतीय जवान, हवाई दलाचे पायलट व अन्य लढवय्ये यांच्याबद्दल अत्यंत आदर वाटतो असंही मी त्याला सांगितलं."*

दरम्यान पाकिस्तानी अधूनमधून गोळीबार करीतच होते. युद्धबंदीचा भंग करणारे प्रकार वाढले व परिस्थिती वेगाने खालावत चालली. युनोच्या सुरक्षा समितीची २७ सप्टेंबरला तातडीची बैठक भरली. सुरक्षा समितीला दिलेली वचनं उभय राष्ट्रांनी पाळावीत असं आवाहन या बैठकीत एका ठरावानुसार करण्यात आलं.

त्याचा भुत्तोंवर काही परिणाम झाला नाही. ३० सप्टेंबरला लंडन इथे पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले, "भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धबंदी ही 'संदिग्ध' असून भारताविरुद्ध पुन्हा लढाई सुरू झाली तर जगात हाहाःकार उडेल. समूळ विनाश करणाऱ्या युद्धाला तोंड द्यावं लागेल अशी आमची मानसिक स्थिती बनली आहे. काश्मीर प्रश्नावर सन्माननीय तोडगा निघेपर्यंत युद्धबंदी संदिग्धच राहणार." जोवर काश्मीर प्रश्न समाधानकारक रीतीनं सुटत नाही तोवर परिणामकारक युद्धबंदी अमलात येणार नाही, असंच भुत्तो साऱ्या जगाला सांगू पाहत होते. न्यूयॉर्क इथे युनोच्या सर्वसाधारण सभेपुढं भाषण केल्यानंतर लंडनला भुत्तो यांनी हे उद्गार काढले होते.

भुत्तोंचं सर्वसाधारण सभेतील भाषण भारताविरुद्ध गरळ ओकणारं होतं. ते असत्यानं भरलेलं व ऐतिहासिक घटना विपर्यस्त करून मांडणारं होतं. वस्तुस्थिती व तर्कसंगती यांना तिलांजली देऊन शिव्या व निर्भर्त्सना यांनी ते भरलेलं होतं, असं वर्णन भारताचे प्रतिनिधी मीर कासिम यांनी केलं. सर्वसाधारण सभेत बोलताना ते म्हणाले, "एक

गोष्ट मला स्पष्ट केली पाहिजे. भारताच्या जम्मू व काश्मीर राज्यावर दोन वेळा आक्रमण करूनही लष्कराच्या बळावर पाकला ते हिसकावून घेता आलेलं नाही. बंदुकीची नळी रोखून भारताला काश्मीर प्रश्नाची चर्चा करण्यास भाग पाडण्यातही अपयश आलं. त्यामुळं आता भारतानं वाटाघाटी कराव्या म्हणून पाक आंतरराष्ट्रीय दबाव आणू पाहत आहे. या विषयावर भारताच्या दृष्टिकोनाबाबत कोणी कोणतेही संशय वा गैरसमज बाळगू नयेत.''

काश्मीरच्या जनतेच्या कपोलकल्पित हक्कांसाठी नव्हे, तर स्वतःच्या बडेजावासाठी भुत्तोंना काश्मीरची हाव सुटली आहे, असा आरोप करून मीर कासिम पुढं म्हणाले, ''काश्मीरच्या जनतेच्या हितामध्ये खरोखरच पाकिस्तानला रस असता तर भुत्तोंच्या सरकारनं चीनला आमच्या प्रदेशाचे मोठे तुकडे देवाण-घेवाण म्हणून देऊ केले नसते, पाकव्याप्त काश्मीरमधील आमच्या बांधवांवर दडपशाही केली नसती. आजही पाकिस्तान त्यांना वेठबिगार म्हणून वागवीत आहे.''

आपलं प्रादेशिक ऐक्य जतन करण्याचा भारताचा निर्धार आहे व जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, हे वारंवार सांगण्यासाठी शास्त्री प्रत्येक व्यासपीठाचा वापर करीत होते. जॉन्सन व कोसिजिन यांना अशा आशयाची पत्रंही त्यांनी पाठवली. भारताचा काश्मीरवर सार्वभौम हक्क असून त्याबाबत वाटाघाटी होऊ शकत नाहीत, हे भावी काळात भारत-पाक यांच्यात चर्चा ठरली तर आधीच माहीत असावं हा उद्देश या पत्रांमागं होता. शास्त्री व अयूब यांची भेट व्हावी असं या दोन्ही नेत्यांचं मत होतं. भारताच्या भूमिकेबाबत कसलीही शंका घेणारी पत्रं त्यांनी पाठविली नाहीत. त्यांनी तसं केलं असतं तर शास्त्रींनी बैठकीत सहभागी होण्यास नकार दिला असता. दडपण येऊ नये म्हणून या मुद्द्यावर स्पष्टता असणं आवश्यक होतं.

२ ऑक्टोबर १९६५ रोजी शास्त्रींचा बासष्टावा वाढदिवस होता. (महात्मा गांधींचाही हा जन्मदिन होता.) त्या दिवशी सकाळी ते राजघाटावर गांधींच्या समाधीचं दर्शन घ्यायला गेले. सी. सुब्रमण्यम यांनी मक्याची सात कणसं शास्त्रींना भेट दिली. काही मंडळींनी पॅटन रणगाड्याच्या आकाराचा भव्य केक त्यांना वाढदिवसानिमित्त भेट म्हणून दिला. सुरी वापरून शास्त्रींनी हा रणगाडा प्रतीकात्मक रीत्या नष्ट केला व तो केक जवानांकडे पाठवून देण्यास सांगितलं. एकंदरीत तो दिवस खूपच आनंदमय ठरला.

३ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील गुरुद्वारा बंगला साहिबच्या बाहेर शीखांच्या एका मोठ्या सभेपुढं पंतप्रधानांचं भाषण झालं. युद्धात शीख जमातीनं जी मोठी कामगिरी पार पाडली त्याचं स्मरण म्हणून भाषणाची सुरुवात करताना शास्त्री म्हणाले, ''जो बोले सो निहाल'' त्यावर जमावानं जोरदार प्रतिसाद दिला, 'सत् श्री अकाल!'

तलवार व स्कार्फ असलेले सरोपा पंतप्रधानांना व सरसेनापती जनरल चौधरी यांना देऊन त्यांचा सत्कार केला गेला. शास्त्रींना देण्यात आलेल्या तलवारीएवढी लांब तलवार मी तरी तोवर पाहिलेली नव्हती. ती तलवार जवळजवळ शास्त्रींच्याच उंचीची

होती. ती हातात धरून शास्त्रींनी चौफेर दृष्टिक्षेप टाकला, तेव्हा पश्चिम विभागाचे कमांडर लेफ्ट. जनरल हरबक्ष सिंग त्यांना दिसले. ते एका हातात तलवार घेऊन त्यांच्याजवळ गेले. हरबक्ष सिंग यांचा हात पकडून त्यांनी त्यांना व्यासपीठावर आणलं. ती तलवार त्यांच्या हातात देऊन शास्त्री म्हणाले, ''पश्चिम विभागाचे प्रमुख या नात्यानं तुम्ही युद्धात भारतीय फौजांचं नेतृत्व केलं व भरघोस यश मिळवलं, तेव्हा या तलवारीवर तुमचाच खरा हक्क आहे!''

संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ४ ऑक्टोबर रोजी मुंबईला भेट दिली. त्यांचे काही सार्वजनिक कार्यक्रम तिथे ठरलेले होते. युद्धाच्या काळात चव्हाण यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. पंतप्रधानांना भक्कम हातभार लावला होता. पंतप्रधानांच्या अत्यंत विश्वासू सहकाऱ्यांपैकी ते एक होते. नागरी संरक्षण समितीच्या बैठकीपुढे बोलताना ते म्हणाले, ''पाकशी झालेल्या संघर्षाच्या वेळी भारताच्या यशस्वी व विजयी धोरणाचे एकमेव शिल्पकार भारताचे पंतप्रधान आहेत.''

दरम्यान सीमेवरील स्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली होती. रोज मोठ्या चकमकी झडत होत्या. भारत-पाकिस्तान सीमेवरील स्थिती धोक्याची आहे, परदेशांतून शस्त्रं मिळवण्याचा प्रयत्न पाकिस्तान करीत असल्याची खबर आहे आणि पाकिस्तान हेतुतः युद्धबंदी अस्थिर करीत आहे, असं शास्त्रींनी ७ सप्टेंबर रोजी मंत्रिमंडळ बैठकीत सांगितलं.

जॉन्सन यांच्याशी नियमित पत्रव्यवहार ठेवण्याची काळजी शास्त्रींनी घेतली होती. ८ ऑक्टोबर रोजी जॉन्सन यांच्यावर एक शस्त्रक्रिया होणार होती. त्यातून ते झपाट्यानं पूर्ण बरे व्हावे अशी शुभेच्छा व्यक्त करणारं पत्र शास्त्रींनी ८ ऑक्टोबर रोजी पाठवलं. तुमच्याशी लवकर भेट व्हावी अशी इच्छा शास्त्रींनी त्याच पत्रात व्यक्त केली होती. त्याबाबत दूतावासांमार्फत चर्चा झाली व फेब्रुवारी ६६ च्या पहिल्या आठवड्यात शास्त्री यांची वॉशिंग्टनभेट ठरवण्यात आली. या बैठकीपूर्वी भारत व पाकिस्तान यांना आर्थिक व लष्करी मदतीबाबतच्या अमेरिकेच्या धोरणात बदल होणार नव्हता, हा एक फायदा होता. पाकिस्तानला अमेरिकेनं पुन्हा लष्करी मदत देऊ नये हा त्यामागील मुख्य हेतू होता.

काश्मीरचे औपचारिक व घटनात्मक सामिलीकरण भारतात झालं आहे या भारताच्या विधानाची केवळ अडेलतट्टूपणा वा अवाजवी अशी संभावना करून चालायचं नाही. बुद्धिवंतांना त्यावर नीट विचार करावा लागेल, असं मत ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री मायकेल स्ट्युअर्ट यांनी न्यूयॉर्क इथे एका पत्रकार परिषदेत व्यक्त केलं.

भारतापुढं त्या वेळी संरक्षणाखेरीज दुसराही एक महत्त्वाचा प्रश्न होता. तो म्हणजे अन्नधान्याचा. १० ऑक्टोबर १९६५ रोजी आकाशवाणीवरून भाषण करताना शास्त्री यांनी शेतकऱ्यांनी अधिक उत्पादन करावं, व्यापाऱ्यांनी उचित दरानं माल पुरवावा व ग्राहकांनी काटकसर करावी, असं आवाहन केलं. स्वातंत्र्यरक्षणासाठी अभेद्य संरक्षण यंत्रणेइतकीच अन्नधान्य उत्पादनातील स्वयंपूर्णता महत्त्वाची आहे असं ते म्हणाले.

अन्नधान्यासाठी आयातीवर अवलंबून राहणं याचा अर्थ या देशात आत्मविश्वास व स्वाभिमान यांचा अभाव आहे असा होतो. याच भाषणात त्यांनी 'जय जवान, जय किसान' ही नवी घोषणा देशाला दिली.

११ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १०, जनपथ या पंतप्रधानांच्या निवासस्थानी असलेल्या कार्यालयातून मी घरी जायला निघालो, तेव्हा "उद्या सकाळी लवकर म्हणजे पहाटे पाच वाजताच या. आपल्याला बाहेर जायचं असून दुपारपर्यंत आपण परत येऊ," असं शास्त्रींनी मला सांगितलं. त्यानुसार मी पहाटे वेळेवर पोचलो. आम्ही विमानतळाकडे निघालो. लाहोर क्षेत्रातील आघाडीवरील काही भागांना (थेट इच्छोगिल कालव्यापर्यंत) पंतप्रधान भेट देणार होते. आधी आम्ही विमानानं एका ठिकाणी गेलो व तिथून मोटारीनं दौरा केला. ती भेट मी कधीही विसरणं शक्य नाही. लेफ्ट. जनरल जे. एस. धिल्लाँ व अन्य वरिष्ठ लष्करी अधिकारी आमच्या समवेत होते.

बुर्की व डोगराई या शहरांना भेट दिल्यावर इच्छोगिल कालव्याच्या किनाऱ्याकडे पंतप्रधान निघाले. पाकिस्तानी फौजांनी उभारलेल्या गढ्या त्यांनी पाहिल्या, कालव्याचा किनारा ताब्यात घेण्यासाठी भारतीय लष्करानं या गढ्यांवर कब्जा मिळवला होता. खेमकरण भागालाही त्यांनी भेट दिली. हा भाग म्हणजे पाक रणगाड्यांची दफनभूमीच बनली होती. नासधूस झालेले रणगाडे शेतात अस्ताव्यस्त पडलेले होते. पंतप्रधान त्यांपैकी एका रणगाड्यावर चढून उभे राहिले.

पठाणकोट इथे स्क्वाड्रन लीडर ट्रेव्हर कीलर यांची भेट झाल्यानं पंतप्रधानांना अत्यानंद झाला. कीलर हे एका नॅट विमानाजवळ उभे होते. लढाऊ विमानांच्या तुलनेनं नॅट हे अगदीच एवढंसं वाटत होतं. ट्रेव्हर कीलर देखील काही फार उंच नव्हते. युद्धातील तीन 'वामनमूर्ती' हीरोंचंच ते जणू संमेलन वाटत होतं. "अच्छा हुआ, हम तीनोंही छोटे कद के हैं!" असं शास्त्री म्हणाले देखील.

शास्त्रींनी आपली युद्धाबद्दलची भूमिका वारंवार जाहीरपणं मांडली होती. युनोच्या सर्वसाधारण सभेत व सुरक्षा समितीच्या बैठकीत भारतीय प्रतिनिधींनीही आपली बाजू स्पष्ट केली होती. तरीही काही महत्त्वाच्या देशांना आपलं धोरण समजावून देण्यासाठी शास्त्रींनी खास दूत पाठवले. फ्रान्सचे द गॉल यांची भेट घेण्यासाठी विजयालक्ष्मी पंडित यांना फ्रान्सला, तर नासेरना भेटायला व्ही. के. कृष्ण मेनन यांना कैरोला पाठवण्यात आलं.

१५ ऑक्टोबरआधीच्या पंधरवड्यात पाकची विमानं प्रक्षोभक अतिक्रमणं करीत होती. ती त्वरित थांबवली जावीत म्हणून प्रयत्न करावेत, असा आदेश शास्त्रींनी युनोतील भारताच्या कायम प्रतिनिधींना १५ ऑक्टोबर रोजी दिला. १ ते १४ ऑक्टोबर या काळात भारतावर व भारताच्या ताब्यात असलेल्या प्रदेशावर पाक लष्करी विमानांनी ४८ वेळा अतिक्रमण केलं होतं. जम्मूचा अखनूर भाग, अमृतसर, वाघा, खालरा व पंजाबातील फाजिलका आणि राजस्थानातील जैसलमेर जिल्हा या ठिकाणी विशेषेकरून पाक विमानांनी ही अतिक्रमणं केली होती. ही माहिती युनोच्या

सरचिटणीसांना देण्यास सांगण्यात आलं होतं.

आघाडीवरील भागाला शास्त्रींनी दुसरी भेट १५ ऑक्टोबर रोजी दिली. युद्धाच्या काळात भारतानं ताब्यात घेतलेल्या सियालकोट क्षेत्राची त्यांनी पाहणी केली. हा अनुभवही भारावून टाकणारा होता. ठिकठिकाणी जवानांपुढं शास्त्रींनी भाषणं केली. त्यांनी पार पाडलेल्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल सर्व देशांच्या वतीनं त्यांना शाबासकी दिली. पाकचे हेतू स्पष्ट नसल्यानं त्यांनी जागरूक राहावं असं आवाहनही केलं.

त्याच महिन्याच्या अखेरीस शास्त्रींनी मुंबईत जी. डी. बिर्ला यांची भेट घेतली. बिर्ला नुकतेच परदेश-दौऱ्यावरून परतले होते. पाकनं केलेल्या आक्रमणाचा कठीण प्रसंग शास्त्रींनी ज्या प्रकारे हाताळला त्याबद्दल अमेरिकेत प्रशंसेची व सहानुभूतीची भावना आपल्याला आढळली, असं बिर्लांनी त्या वेळी सांगितलं. "काश्मीरबद्दल अजूनही प्रश्न उठवले जात असल्यानं त्याबाबतच्या धोरणाचं निश्चित आकलन अजूनही अमेरिकनांना होत नाही. मात्र काश्मीरमध्ये सार्वमत घ्यावं असं कोणी म्हणत नाही." हा प्रश्न सोडविण्यासाठी काही तरी करायला पाहिजे, असं काही जण संदिग्धपणं बोलतात इतकंच. तेव्हा काश्मीरविषयीचं भारताचं धोरण जगाला पटवून देण्याचं कार्य भारतीय राजदूतांनी आता केलं पाहिजे, असं बिर्लांनी सुचवलं. लढाई चालू असताना भारताला सहानुभूती व्यक्त करणारी चित्रं अमेरिकन दूरचित्रवाणीवरून दाखवण्यात आली. तुर्कस्तान व इराण यांनी पाकिस्तानला मदत केली म्हणून त्यांच्या निषेधार्थ मुंबईत मुस्लिमांनी काढलेला मोर्चाही त्यात दाखवण्यात आला होता. भारतातील सर्व मुस्लीम सरकारच्या पाठीशी आहेत हेच या मोर्च्यानं दाखवून दिलं. त्याचा अमेरिकेत खूप प्रभाव पडला, असं बिर्लांचं म्हणणं होतं.

१८ ऑक्टोबर १९६५ रोजी लालबहादुर शास्त्री औरंगाबादला गेले. औरंगाबाद डिव्हिजनच्या नागरी संरक्षण समितीच्या बैठकीत त्यांचं भाषण झालं. या बैठकीला यशवंतराव चव्हाण हजर होते. युद्धातील घटनांचा व जवानांनी बजावलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन शास्त्रींनी 'भारताचे धोतर नेसणारे पंतप्रधान' या पाकिस्तानच्या टरेबाजीचा समाचार घेतला. ते म्हणाले, "मी काही मार्शल नाही. मी धोतर नेसतो हे खरंच आहे. त्यामुळं पाकिस्तान भारताला दुबळं समजत असावं. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण पण धोतरच नेसतात. धोतर नेसणाऱ्या लोकांनीच आपल्या देशाचं संरक्षण केलं व लाहोरपर्यंत आगेकूच केली हे लक्षात ठेवा!"

पाकनं नासधूस झालेल्या आपल्या शस्त्रास्त्रांसाठी सुटे भाग, नवी शस्त्रास्त्रं व दारूगोळा मिळवण्याचा जोरदार प्रयत्न दोन-तीन आठवडे केला. इराण व तुर्कस्तान यांच्याकडून पाकला मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रं मिळाली. तुर्कस्ताननं सेबर जेट विमानांचं किमान एक स्क्वाड्रन पुरवलं अशा बातम्या प्रसिद्ध होत होत्या. शास्त्रींना त्याची कल्पना होती. ते म्हणाले, "सरकारला आपल्या पायावर उभं राहायला हवं. तेही भविष्यकाळात नव्हे, तर आज आणि आत्ता!" चाळीस वर्षांपूर्वी महात्मा गांधींनी दिलेल्या स्वदेशीच्या मंत्राचं आजही तितकंच महत्त्व होतं. पुढील तीन क्षेत्रांत स्वयंपूर्ण

होणं सर्वांत महत्त्वाचं होतं : लष्कराला पुरेशी शस्त्रास्त्रं उपलब्ध व्हायला हवीत, लष्करी कारखाने झपाट्यानं विकसित व्हायला हवेत आणि अन्नधान्यात स्वयंपूर्णता आणून आर्थिक पाया मजबूत करायला हवा. दरम्यान कुलदीप नय्यर यांनी लिहिलेला एक लेख 'द हिंदुस्थान टाइम्स'नं २१ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध केला. हाजीपीर खिंडीवर कब्जा ठेवला की घुसखोरांना काश्मीरमध्ये शिरण्यापासून प्रभावीरीत्या रोखता येईल हा समज चुकीचा आहे, असं त्यांनी त्या लेखात म्हटलं होतं. आत घुसण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध आहेत व १९६५ च्या ऑगस्टमध्ये घुसखोरांनी त्यांचा वापर केलाही होता, याचंही त्यांनी लेखात स्मरण करून दिलं होतं.

या टप्प्यावर युनो हे घडामोडींचं पुन्हा केंद्र बनलं. "जम्मू-काश्मीरमध्ये परिस्थिती वेगानं बिघडत चालली आहे," म्हणून सुरक्षा समितीची तातडीनं बैठक बोलवावी अशी मागणी पाकनं २२ ऑक्टोबरला केली. सुरक्षा समितीच्या युद्धबंदीविषयक ठरावाबद्दल भारतानं पूर्ण अनास्था दाखवली व त्यामुळं युद्धबंदी निकालात निघाली आहे, असाही आरोप पाकिस्तानच्या युनोतील कायम प्रतिनिधींनी केला.

जेव्हा चर्चेला आरंभ झाला तेव्हा भुत्तोंनी कार्यक्रमपत्रिका बाजूला ठेवून भारतावर विखारी टीका केली. काश्मीरमध्ये दडपशाही चालू आहे असंही त्यांनी दडपून दिलं. कार्यक्रम पत्रिकेवरील विषयाला धरून त्यांनी बोलावं ही अध्यक्षांची विनंती भुत्तोंनी दुर्लक्षिली. त्या वेळी भारताचे परराष्ट्र मंत्री सरदार स्वर्णसिंग व भारतीय शिष्टमंडळाचे सर्व सदस्य यांनी सभात्याग केला. त्यानंतर भुत्तोंनी अर्वाच्य व छापता येणार नाहीत अशा शब्दांचा वापर केला. सुरक्षा समितीच्या बैठकीतून भारतीय शिष्टमंडळानं सभात्याग करण्याची ती पहिलीच वेळ होती. भारताच्या काश्मीरविषयक धोरणातील ही नवी घडामोड होती. जम्मू व काश्मीर येथील प्रशासन ही भारताची अंतर्गत बाब असून त्याचा सुरक्षा समितीला विचार करता येणार नाही, हे त्यातून सूचित करण्यात आलं. पंतप्रधानांनी याबाबत गुलझारीलाल नंदा व इंदिरा गांधी यांच्याशी चर्चा केली. सुरक्षा समितीच्या व्यासपीठाचा गैरवापर केला जाणार नाही असं पाकनं आश्वासन दिलं तर सुरक्षा समितीच्या बैठकीवरचा बहिष्कार मागं घ्यावा, असं शास्त्रींनी ठरवलं. भुत्तोंच्या बेमुर्वत वर्तनाचा कडक निषेध करणारं एक पत्र भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी सुरक्षा समितीच्या अध्यक्षांना पाठविलं.

सुरक्षा समितीमध्ये चालू असलेल्या चर्चेचा शास्त्री आढावा घेत होते. युद्धबंदीचं कडक पालन व फौजा माघारी घेणं या लष्करी बाबींशी काश्मीरसंबंधीच्या राजकीय प्रश्नांची सांगड घालण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न हाणून पाडण्यावर भारतानं लक्ष केंद्रित केलं पाहिजे अशा निष्कर्षाप्रत ते आले. सुरक्षा समितीच्या २० सप्टेंबरच्या ठरावात त्याच्या अंमलबजावणीविषयी दोन परिच्छेद होते. पहिल्या क्रमांकाच्या परिच्छेदात बिनशर्त युद्धबंदी व ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीच्या जागांवर (म्हणजे १९४९ च्या युद्धबंदी रेषेच्या पलीकडे) फौजा हलवणं अशा मागण्या त्यात केलेल्या होत्या. परिच्छेद क्रमांक ४ मध्ये राजकीय प्रश्नांचा विचार नंतर करण्याचा (मात्र त्याची वेळ

ठरवलेली नव्हती.) उल्लेख होता. पाकिस्तानला या दोन्ही बाबींची एकत्र अंमलबजावणी हवी होती. असा बदल करण्यास भारताचा पूर्ण विरोध होता.

२८ ऑक्टोबर रोजी जयपूर येथील रामनिवास बागेत झालेल्या प्रचंड जाहीर सभेत बोलताना शास्त्री यांनी भारत सुरक्षा समितीत सहभागी व्हायला तयार आहे, परंतु युद्धबंदीची व फौजा हटवण्याच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी; काश्मीरसंबंधी चर्चा करण्यासाठी नव्हे, असं स्पष्ट केलं. सुमारे तीन लाख लोक उपस्थित असलेल्या त्या जनसमुदायापुढं बोलताना "पाकनं जर छांबमधून सैन्य मागं घेतलं नाही तर भारतही लाहोर व सियालकोट इथून आपल्या फौजा मागं घेणार नाही," असं त्यांनी जाहीर केलं. काश्मीरमधील प्रत्येक घुसखोराला काढून घेतलं पाहिजे अशीही मागणी त्यांनी केली.

हाजीपीर खिंड अथवा टिथवाळ क्षेत्र यांचा पंतप्रधानांनी हेतुतःच उल्लेख केला नाही. तसं केलं असतं तर ५ ऑगस्टपूर्वीच्या जागी सैन्य हलवण्याच्या सुरक्षा समितीच्या मागणीच्या ते विरुद्ध ठरलं असतं याची जाणीव त्यांना होती. तसंच त्यामुळं सुरक्षा समितीत भारतविरोधी वातावरण पसरलं असतं. सुरक्षा समितीतील भारताचे पाठीराखे असलेले सोविएत युनियन व मलेशिया या दोन देशांनीही भारत व पाक यांनी ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीच्या जागी सैन्य हलवण्याच्या मागणीला पूर्ण पाठिंबा दिला होता.

फौजा हटवण्याच्या प्रश्नाशी काश्मीरच्या राजकीय प्रश्नाची सांगड घालण्याचा पाकचा प्रयत्न भारताच्या ठाम भूमिकेमुळं अयशस्वी ठरला. ब्रिटनच्या प्रतिनिधीनं भारताच्या भूमिकेला पाठिंबा देणारं निवेदन सुरक्षा समितीत केलं हा काही किरकोळ लाभ नव्हता. ब्रिटनचे लॉर्ड कॅरॅडॉन हे २७ ऑक्टोबरच्या बैठकीत म्हणाले, "भारत व पाकिस्तान यांच्यामधील युद्धबंदी कशी प्रभावीपणं अमलात येईल व ठरावात मागणी केल्यानुसार फ़ौजा मागं घेण्याचं काम पुरं कसं होईल या दोन गोष्टींवर आपण लक्ष केंद्रित करायला पाहिजे.... किंबहुना युद्धबंदी व फौजा हटवणं हाच भरीव तडजोडीचा एकमेव मार्ग आहे." ६ सप्टेंबर रोजी ब्रिटनच्या पंतप्रधानांनी भारतावर टीका केली होती. आता ब्रिटनची भूमिका बदलली होती, असं लॉर्ड कॅरॅडॉन यांच्या वरील निवेदनावरून स्पष्ट झालं.

भारताच्या कृतीचा व सुरक्षा समितीच्या बैठकीतून भारतानं केलेल्या सभात्यागाचा अमेरिकन वृत्तपत्रं विपर्यस्त अर्थ लावीत आहेत अशी टीका अमेरिकेचे गोल्डबर्ग यांच्यामार्फत अमेरिकेनं केली. युद्धबंदी व फौजा मागं घेण्याची कारवाई प्रभावी व्हावी या दृष्टीनं युनोचे प्रयत्न चालू होते. पाकला छांबमधून व भारताला हाजीपीर खिंडीतून आपल्या फौजा हटवाव्या लागणार हे निश्चित होतं.

३१ ऑक्टोबर रोजी शास्त्रींनी कलकत्त्याला भेट दिली, तेव्हा त्यांचं जोरदार स्वागत झालं. विमानतळावर मुख्य मंत्री पी. सी. सेन यांनी त्यांचं स्वागत केलं. डमडम विमानतळ ते राजभवन या १० किलोमीटर मार्गावर ठिकठिकाणी कमानी

उभारलेल्या होत्या. त्यांतल्या काही कमानी लेफ्ट. तपन चौधरी व हवालदार अब्दुल हमीद यांच्या स्मृत्यर्थ होत्या, हे विशेष.

कलकत्याच्या शंभर एकर आकाराच्या प्रचंड मैदानावर सायंकाळी जाहीर सभा झाली. इतका मोठा जनसागर मी कधी पाहिला नव्हता. ती प्रचंड गर्दी पाहून शास्त्री भारावून गेले. बराच वेळ ते बोलले. "गरिबीबद्दल मला जेवढी माहिती आहे तेवढी दुसऱ्या कोणाला नसेल," असं सांगून ती हटवण्याचा माझा निर्धार आहे, असं त्यांनी सांगितलं. आपल्या जीवनाच्या आरंभीच्या काळातील गरिबीबद्दल खासगी वा जाहीररीत्या त्यांनी पहिल्यांदाच असा उल्लेख केला होता. त्यांच्या सभेला हजर असणाऱ्यांत गरिबांचा मोठ्या प्रमाणावर भरणा होता. शास्त्रींच्या त्या उद्‌गारांनी श्रोत्यांशी संवादच साधला गेला.

१ नोव्हेंबर रोजी पत्रकारांशी बोलताना अमेरिका-भेटीचं आमंत्रण जॉन्सन यांनी दिलं आहे, पण अजून तारखा निश्चित झालेल्या नाहीत, असं शास्त्रींनी सांगितलं. काश्मीरबाबत अमेरिकेचा दृष्टिकोन अलीकडे सौम्य झाला असून मी त्याचं स्वागत करतो असं ते म्हणाले.

१ नोव्हेंबरला दुपारी शास्त्री दिल्लीत परतले. अन्नधान्यटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन आठवड्यातून एकदा एक वेळचं जेवण लोकांनी घेऊ नये, असं आवाहन त्यांनी २८ ऑक्टोबरला जयपूर येथील सभेत बोलताना केलं होतं. त्याला आपल्यापासूनच सुरुवात करायचं शास्त्रींनी ठरवलं. १ नोव्हेंबरला सायंकाळी शास्त्री कुटुंबातील कोणीही भोजन घेतलं नाही. त्यापुढं धान्यटंचाई असेपर्यंत दर सोमवारी सायंकाळी भोजन न घेण्याचं त्यांनी ठरवलं. स्वतःचं उदाहरण घालून देऊन लोकांचं मन वळवावं अशी त्यांची इच्छा होती.

युद्धाशी संबंध नसलेला, परंतु भारत-पाक संबंधाविषयी एक नाजुक असा प्रश्न ऑक्टोबर ६५ मध्ये उद्‌भवला. पं. नेहरू पंतप्रधान असताना जागतिक बँकेच्या वतीनं सिंधू नदीच्या पाण्याबद्दल भारत व पाकिस्तान यांच्यात एक करार झाला होता. त्यानुसार भारतानं १० समान हप्त्यांत मिळून पाकिस्तानला ८० कोटी रुपये द्यायचे होते. त्यांपैकी पाच हप्ते दिले गेले होते व सहावा देण्याची वेळ येऊन ठेपली होती. सध्याच्या स्थितीत हे पैसे देण्यास विरोधी पक्षांतील व काँग्रेसमधीलही काही जणांचा विरोध होता. आपलं पाकशी युद्ध आहे असं भारत मानीत नव्हता, राजनैतिक संबंध तोडण्यात आलेले नव्हते, तेव्हा भारतानं करार पाळायला हवा व ८ कोटी रुपयांचा सहावा हप्ता पाकला द्यायला हवा असं शास्त्रींचं मत होतं. हा हप्ता पौंडांत नव्हे, तर रुपयांत दिला जाईल, तसंच ही रक्कम पाकला जाने. १९६६ मध्ये दिली जाईल, तोवर ती भारतीय रिझर्व्ह बँकेत खास खात्यात ठेवली जाईल, असं भारतानं स्पष्ट केलं. अनेक देशवासीयांचा विरोध असूनही शास्त्री तत्त्वाला चिकटून राहिले. भडक माथ्याच्या लोकांच्या आहारी ते गेले नाहीत. दिलेली वचनं भारतानं पाळायलाच हवीत, असं ५ नोव्हेंबरला त्यांनी संसदेतही जाहीर केलं.

युनोच्या सुरक्षा समितीची बैठक ५ नोव्हेंबर रोजी भरणार होती. त्याच्या काही तास आधी शास्त्रींनी संसदेत एक निवेदन केलं. पाकला स्पष्टपणं आक्रमक म्हणून घोषित करण्यास युनो देत असलेला नकार व संघर्षाचा आगडोंब उसळू नसे म्हणून वेळेवर कृती न करणं याबद्दल शास्त्रींनी युनोची खरडपट्टी काढली. आक्रमणाला उत्तेजन दिलं नाही व आक्रमक कोण हे ठरवण्यासाठी निःपक्षपाती प्रयत्न केले गेले तर जगाचा बराच त्रास वाचेल असं सांगून शास्त्री म्हणाले, "आक्रमण हे छुप्या स्वरूपात करण्याचं नवं तंत्र अमलात आणलं जात असून युद्ध जाहीर करण्याची तसदी न घेता विनाशकारी शक्तींना मोकळं सोडलं जात आहे, म्हणून याची आवश्यकता आहे." ते पुढं म्हणाले, "गेल्या काही महिन्यांतील दुर्दैवी घटना पाहून उपचारापेक्षा प्रतिबंध केवळ बराच नव्हे, तर सोपाही असतो हे युनोला व सुरक्षा समितीला पटावं. जेव्हा घुसखोरांच्या कारवाया चालू होत्या व जनरल निम्मो यांनी त्याबाबतचा अहवाल दिला होता, त्याच वेळी कारवाई केली असती तर जीवित व वित्त यांची हानी टळली असती."

त्यानंतर काही तासांनी (५ नोव्हेंबर रोजी) न्यूयॉर्क येथे सुरक्षा समितीत चर्चेनंतर एक ठराव मंजूर झाला. समितीच्या २० सप्टेंबरच्या ठरावात केलेल्या मागणीप्रमाणं युद्धबंदी व फौजांची माघार यांची पूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी भारत व पाक यांनी आपल्या लष्करांना युनोला सहकार्य देण्यास सांगावं असं आवाहन या ठरावात केलं होतं. सैन्याच्या माघारीची योजना निश्चित करण्यासाठी सरचिटणीस ऊ थांट यांच्या प्रतिनिधीशी चर्चा करण्याकरिता भारत व पाकिस्तान यांनी आपला एकेक प्रतिनिधी पाठवावा, अशी सूचनाही या ठरावात केलेली होती व ती 'तत्काळ व बिनशर्त' स्वीकारावी असंही म्हटलं होतं.

२६ ऑक्टोबर रोजी भारतीयांबद्दल बदनामीकारक उद्गार भुत्तो यांनी काढले होते. त्याबद्दल ६ नोव्हेंबरला युनोच्या न्यूयॉर्क येथील मुख्यालयात जाहीर माफी मागून त्यांनी अनपेक्षितपणं धक्का दिला. "अत्यंत प्रक्षोभक स्थितीत बोलत असल्यानं तसं घडलं याबद्दल मला जबाबदार मानू नये. परंतु माझ्या उद्गारांनी भारतीय दुखावले असतील तर मी त्याबद्दल अत्यंत दिलगीर आहे," असे ते म्हणाले. भुत्तो यांचं हे घुमजाव लक्षणीय होतं.

भारतात काँग्रेस पक्षाच्या बैठकीपुढं बोलताना शास्त्रींनी युद्धबंदीनंतर पाकिस्ताननं ताब्यात घेतलेल्या ठिकाणांहून त्यांना हुसकून लावणं हा भारताचा हक्कच आहे, असं सांगितलं. काश्मीरमधील हाजीपीर खिंड, टिथवाल तसंच अन्य भाग यांबद्दल बोलताना ते म्हणाले, "यापुढं घुसखोरांचा लोंढा येईल ही भीती दूर होईल असं वातावरण निर्माण केलं पाहिजे. अशी स्थिती निर्माण होईपर्यंत कसलीही चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही." हाजीपीर खिंडीतून व अन्य भागांतून फौजा काढून घेतल्या जाणार नाहीत, असं शास्त्रींनी सांगितलं नाही. अत्यंत सावधपणं ते बोलत होते. काँग्रेस कार्यकारिणीनं मंजूर केलेल्या ठरावातही हाजीपीर खिंड व अन्य भाग यांचा उल्लेख करण्यात आला

नव्हता. कारण याबाबत काय तो अंतिम निर्णय पंतप्रधानांनी घ्यायचा होता.

त्याच वेळी देशातील अन्नधान्य उत्पादन वाढावं म्हणून नवी धोरणं आखण्यात आली होती. सी. सुब्रह्मण्यम हे त्यासाठी अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार होते. त्या वेळी अमेरिकेहून केला जाणारा धान्यपुरवठा दरमहा ठरवला जात असे, त्याऐवजी दीर्घकालीन व्यवस्थेची गरज होती. शास्त्री व जॉन्सन यांच्या १९६६ मध्ये होणाऱ्या संकल्पित भेटीत त्याबद्दल करार व्हावा या दृष्टीनं सुब्रह्मण्यम आपल्या दौऱ्यात पूर्वतयारी करणार होते. लष्करी उत्पादन वाढवावं म्हणून तातडीनं पावलं उचलण्यात आली. संरक्षण मंत्रालयात संरक्षण उत्पादन विभाग स्थापण्यात आला. या विभागाचे खास सचिव एच. सी. सरीन यांना मोठ्या प्रमाणावर संरक्षण उपकरणं मिळवण्याची शक्यता चाचपून पाहण्यासाठी एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ घेऊन रशियाकडे पाठवण्यात आलं.

रशियाचे पंतप्रधान कोसिजिन हे भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये युद्धबंदीविषयक मध्यस्थी करणार होते. डिसेंबरच्या सुरुवातीपासून आपला बराचसा वेळ शास्त्री त्या बैठकीच्या पूर्वतयारीसाठी घालवू लागले. पंतप्रधानपदाच्या १५ महिन्यांनंतर शास्त्री हे भारताचे वादातीत नेते बनले होते. अमेरिकन राजदूत जे. के. गालब्रेथ यांनी त्यांच्याबद्दल काढलेले पुढील उद्‌गार सार्थ होते : ''त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो त्यापेक्षा त्यांच्या अंतःकरणात अधिक पोलादी कणखरपणा आहे. ते प्रत्येक मुद्दा ऐकून घेतात, ते ठामपणं निर्णय घेतात व एकदा निर्णय घेतला की त्याला चिकटून राहतात...

अगदी विश्वासार्ह असा हा नेता आहे.''

□□



।। तेवीस ।।

# ताश्कंदची तयारी

पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी २३ सप्टेंबरला संसदेत केलेल्या भाषणात म्हटलं होतं :

*"१८ सप्टेंबर १९६५ रोजी सोविएट मंत्रिमंडळाचे अध्यक्ष कोसिजिन यांचा एक संदेश मला मिळाला. भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध सुधारावेत म्हणून मध्यस्थी करण्याची तयारी त्यांनी दर्शवली. कोसिजिन यांचा हेतू उदात्त आहे. अखेर भारत व पाकिस्तान यांना शेजारी म्हणून गुण्यागोविंदानं नांदायचं आहे हे कोणीही अमान्य करणार नाही. त्यामुळं अशी परिस्थिती निर्माण व्हावी म्हणून केल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रामाणिक मैत्रीपूर्ण प्रयत्नांना आपण नकार देऊ शकत नाही. त्यामुळं मी कोसिजिन यांना तुमच्या प्रयत्नांचं स्वागतच होईल असं कळविलं आहे."*

कोसिजिन यांनी भारत-पाक संघर्षातून तडजोडीचा मार्ग निघावा म्हणून ४ सप्टेंबरपासूनच पुढाकार घेतला होता. शास्त्रींना पाठवलेल्या पत्रात त्यांनी म्हटलं होतं :

*"काश्मीरवरून झालेल्या लष्करी संघर्षामुळं – तसंच सोविएट युनियनच्या सीमेनजीकच्या प्रदेशात तो झाल्यामुळं – सोविएट युनियनला चिंता वाटत आहे हे स्पष्टपणं नमूद करायला हवं.*

*सध्याच्या गंभीर स्थितीत संघर्षाचं मूळ काय व कोण बरोबर, कोण चूक या*

*बाबींना प्राधान्य देणं उचित ठरणार नाही हे तुम्हांलाही मान्य व्हावं. लष्करी कारवाया तत्काळ थांबवणं, रणगाड्यांचा धडधडाट व तोफांचा गडगडाट बंद करणं यावर प्रामुख्यानं प्रयत्न केंद्रित करणं हेच अत्यावश्यक आहे.*

*लष्करी कारवाया तत्काळ थांबविल्यावर भारत व पाकिस्तान यांच्यात जुलै १९४९ मध्ये करार होऊन निश्चित करण्यात आलेल्या युद्धबंदी रेषेच्या पलीकडे फौजा हलवण्याचं पहिलं पाऊल उचलावं असं आपलं मत आहे...''*

सुरक्षा समितीच्या ठरावानुसार हाजीपीर खिंडीतील फौजा काढून घेण्याचे काय परिणाम होतील याचा उल्लेख आधी केला आहेच. हा मुद्दा ताश्कंद इथे महत्त्वाचा बनणार हे स्पष्टच दिसत होतं. फौजा हटवण्याच्या संदर्भात पंतप्रधानांनी काय करावं या प्रश्नावर शास्त्रींना लक्ष केंद्रित करावं लागणार होतं. कोसिजिन यांच्या पुढाकारानं जर पाकिस्तानबरोबर बैठक ठरली तर तिच्या तयारीसाठी ते आवश्यक होतं.

सोविएट युनियननं मध्यस्थीची केलेली 'ऑफर' पाकनं स्वीकारली आहे, असं भुत्तो यांनी ११ नोव्हेंबर रोजी रावळपिंडीत जाहीर केलं. सोविएट नेत्यांशी महत्त्वाची बोलणी करण्यासाठी आपण लौकरच मॉस्कोला भेट देऊ असंही ते म्हणाले. कोसिजिन यांच्या मध्यस्थीच्या प्रयत्नांना अमेरिकेचे जॉन्सन व इंग्लंडचे विल्सन यांचा पाठिंबा आहे हे तोवर कळलेलं होतं. सोविएट युनियनला श्रेय मिळालं तरी चालेल, पण भारतीय उपखंडात शांतता निर्माण व्हावी असं या नेत्यांना वाटत होतं. सोविएटच्या या प्रयत्नांचं एका देशाला मात्र वाईट वाटत होतं व तो देश म्हणजे चीन. सिक्कीम-चीन सीमेवरील डोंगचुइला भागात दोन भारतीय ठाण्यांवर चीननं १३ नोव्हेंबरला अचानक गोळीबार केला. त्याला भारतानं प्रत्युत्तर दिलं. या चकमकीत दोन चिनी व एक भारतीय जवान ठार झाले.

लोकसभेत परराष्ट्र धोरणावर चालू असलेल्या चर्चेत १६ नोव्हेंबर रोजी हस्तक्षेप करताना पंतप्रधानांनी कोसिजिन यांनी ताश्कंद इथे अयूब यांची भेट घेण्याचा औपचारिक प्रस्ताव आपल्याकडे पाठवला आहे अशी माहिती दिली. अशा बैठकीला ही वेळ उचित नसली तरी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याचं महत्त्व लक्षात घेऊन रशियाच्या सूचनेला नकार देणं इष्ट नाही असं ते म्हणाले. भारत-पाक संबंधांची एकूणच चर्चा व्हावी ही सोविएट युनियनची सूचना योग्यच आहे. परंतु काश्मीरचा त्याग केला तरच भारत-पाक यांच्यात सलोखा निर्माण होईल अशी भूमिका घेतली गेली तर ती बाब पूर्णतः अशक्य म्हणून मुळीच स्वीकारली जाणार नाही, असंही त्यांनी सांगितलं.

चीनबद्दल बोलताना शास्त्री म्हणाले की, अलीकडेच जे घडलं (सिक्कीम सीमेवरील भारतीय ठाण्यांवर झालेला हल्ला) ते काही शुभचिन्ह नव्हे. पाक आणि चीन कसली तयारी करीत आहेत याचा अंदाज बांधणं कठीण आहे. ''त्या दोघांनी भारतावर संयुक्त हल्ला करायचं ठरवलं तर आपल्याला गंभीर परिस्थितीला तोंड द्यावं लागेल.''

दरम्यान एक खळबळजनक वृत्त १८ नोव्हेंबरला हाती आलं. चीननं तिबेटमध्ये

१५ डिव्हिजन्स तैनात केल्या असून त्यांपैकी किमान ६ डिव्हिजन्स सिक्कीम, भूतान व नेपाळ यांच्या सीमेनजीक आहेत, असं लंडन येथील 'इन्स्टिटयूट ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीज'चं म्हणणं होतं. चीननं तिबेटमध्ये २५ विमानतळ वा धावपट्ट्या बांधलेल्या होत्या. त्यांपैकी निदान दोन धावपट्ट्यांवरून हलक्या वजनाची बॉंबफेकी जेट विमानं उड्डाण करू शकत होती. चीनपासून भारतीय सीमेपर्यंत जाणारे दोन रस्तेही त्यांनी बांधले होते. तसंच बाजूला नेफा ते काश्मीरपर्यंत जाणारा रस्ताही बांधला होता. भारत-चीन सीमेलगत चीननं केलेल्या मजबूत लष्करी उभारणीची त्यावरून कल्पना येते.

तणाव चालू ठेवण्याच्या हेतूनं चीननं १९ व २० नोव्हेंबरला सिक्कीम-तिबेट सीमेवर अतिक्रमणं केली. गडबड निर्माण करण्याचा त्यांनी जणू चंगच बांधला होता. दरम्यान ताश्कंद इथे अयूब यांना भेटावं अशी सूचना सोविएट युनियननं पुन्हा काही दिवसांपूर्वी केली असून ती आपण मान्य केली असल्याची माहिती शास्त्रींनी २३ नोव्हेंबरला राज्यसभेत दिली. जम्मू-काश्मीरबद्दल आपण पाकशी वाटाघाटी करणार नाही, असं त्यांनी पुन्हा एकवार स्पष्ट केलं.

अयूब यांच्याशी ताश्कंदमध्ये डिसेंबर १९६५ च्या अखेरीस अथवा जानेवारी १९६६ च्या आरंभी बैठक व्हावी अशी सूचना करणारं कोसिजिन यांचं पत्र शास्त्रींना २९ नोव्हेंबर रोजी मिळालं. केवळ काश्मीरचीच चर्चा करावी असा आग्रह न धरता भारत-पाक संबंधांच्या संदर्भात सर्व प्रश्नांची चर्चा करण्यास अयूब तयार आहेत, असं या पत्रावरून स्पष्ट झालं. पंतप्रधानांनी २ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावावर चर्चा केली. ताश्कंद इथे भेटण्याचा प्रस्ताव मान्य करण्याचं आपण ठरवलं असून ती जानेवारी १९६६ च्या पहिल्या आठवड्यात व्हावी असं सुचवलं आहे, अशी माहिती त्यांनी या बैठकीत दिली. त्याच दिवशी सोविएट राजदूत आय. ए. बेनेडिक्टॉव्ह यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. जानेवारी ६६ च्या पहिल्या आठवड्यात बैठक व्हावी असं शास्त्रींनी या भेटीत सूचित केलं. आता ताश्कंद परिषदेची सिद्धता झाल्यासारखीच होती.

ताश्कंद इथे चर्चेस येणाऱ्या संभाव्य मुद्द्यांबाबत अनेकांशी चर्चा करण्यात पंतप्रधान गढून गेले. सहकारी मंत्री व अन्य काँग्रेस नेते यांच्याशी त्यांनी चर्चा केलीच. शिवाय विरोधी पक्ष-नेत्यांशीही सल्लामसलत केली. दिल्लीतील प्रमुख वृत्तपत्रांच्या संपादकांशीही त्यांनी चर्चा केली. चौधरी व अर्जुनसिंग यांच्याशी लष्करी बाबींचा उहापोह केला. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण व परराष्ट्रमंत्री सरदार स्वर्णसिंग यांनी ताश्कंदला आपल्या समवेत यावं असं त्यांनी सांगितलं. भारतीय शिष्टमंडळात परराष्ट्र सचिव सी. एस. झा, गृहसचिव एल. पी. सिंग व सैन्याचे उपप्रमुख जनरल जी. पी. कुमारमंगलम यांचा समावेश करण्याचं पंतप्रधानांनी ठरवलं. त्याखेरीज सोविएट रशियातील भारतीय राजदूत टी. एन. कौल, पाकमधील भारतीय उच्चायुक्त केवल सिंग यांचा अंतर्भाव होताच. पंतप्रधानांच्या कार्यालयातील मी व एल. के. झा यांचा शिष्टमंडळात समावेश करण्यात आला, त्याशिवाय परराष्ट्र व संरक्षण खात्यातील के. एस. बाजपेई,

आर. जयपाल व डी. आर. कोहली यांचाही पंतप्रधानांच्या पथकात अंतर्भाव होता.

ताश्कंदला रवाना होण्यापूर्वी दोन आठवडे अनेक सार्वजनिक सभांतून शास्त्रींनी भाषणं केली. ताश्कंद इथे आपलं धोरण काय राहील याची त्यांनी जनतेला कल्पना दिली. भारताच्या आर्थिक विकासासाठी शांतता अत्यंत महत्त्वाची आहे, असं त्यांनी वारंवार सांगितलं. १८ डिसेंबर रोजी अलाहाबादमध्ये बोलताना ते म्हणाले, "जर अयूब यांच्याशी वाटाघाटी फिसकटल्या तर कोणत्याही संकटाला तोंड देण्यासाठी भारताला तयार राहावं लागेल. बोलणी यशस्वी झाली तर माझ्याइतका आनंदी जगात दुसरा कोणी नसेल." १३ डिसेंबर रोजी अयूबखान यांनी युनोपुढं केलेलं भाषण आशादायक नाही, कारण त्यात ताश्कंदमधील आगामी बैठकीचा त्यांनी उल्लेखही केलेला नाही असं सांगून शास्त्रींनी खंत व्यक्त केली. 'ना युद्ध करार' करणं हा शेजार संबंध वाढीला लावण्याचा उत्तम मार्ग ठरेल. त्यानंतर एकत्र बसून उभय राष्ट्रांना मतभेदांतून शांततेनं मार्ग काढता येईल, असं ते म्हणाले.

दिल्लीत १९ डिसेंबरला ऑल इंडिया जमाते-उलेमाची सर्वसाधारण बैठक भरून त्यात काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे असं घोषित करण्यात आलं, ही बाब अत्यंत सूचक होती. "परकीय शक्तीनं उद्या जर काश्मीरवर हल्ला केला अथवा त्याच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ केली तर देशाचं रक्षण करणं हे जमाते-उलेमा आपलं राष्ट्रीय कर्तव्य मानील असंही जाहीर करण्यात आलं. फक्रुद्दिन अहमद यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जमाते-उलेमाच्या या सर्वसाधारण सभेनं पाकिस्तानशी झालेल्या युद्धात लालबहादुर शास्त्री व त्यांचे सहकारी यांनी दाखवलेली दूरदृष्टी, निर्धार व शौर्य यांबद्दल त्यांचं अभिनंदन केलं.

२१ व २२ डिसेंबर रोजी शास्त्रींनी ब्रह्मदेशाला सदिच्छा भेट देऊन जनरल ने विन यांच्याशी चर्चा केली. ताश्कंदला आपण खुल्या मनानं जाणार आहोत असं त्यांनी सांगितलं. "युद्ध हे कायम चालू ठेवता येणार नाही आणि शांतता पुनर्प्रस्थापित व्हायला हवी," यासाठी कितीही कटू अनुभव असला तरी भारत व पाकिस्तान यांच्यातील संघर्ष संपुष्टात यावा म्हणून आम्ही शांततेचे प्रयत्न करीत आहोत असंही त्यांनी सांगितलं.

दिल्लीला परतल्यावर शास्त्री म्हणाले, "प्रश्न सुटावे म्हणून पाकिस्ताननं जर ताश्कंद इथे प्रामाणिकपणं प्रयत्न केले तर शांतताप्रिय शेजारी म्हणून उभय राष्ट्रं गुण्यागोविंदानं नांदू शकतील. परंतु जर अयूब यांनी ताठर भूमिका घेतली तर एक चांगली संधी दवडली जाईल. त्याचे परिणाम धोकादायक व विनाशकारी ठरू शकतील." सरदार स्वर्णसिंग तातडीच्या चर्चेसाठी २३ डिसेंबरला मॉस्कोला गेले होते, ते २६ डिसेंबरला परतले. भारत व पाकिस्तान यांच्यात चांगले मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित व्हावे, अशी सोविएट नेत्यांची मनापासून इच्छा आहे. उपखंडात शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीनं ताश्कंद परिषद यशस्वी झाली तर त्यांना आनंदच होईल, असं स्वर्णसिंग यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. चर्चा यशस्वी व्हांवी म्हणून लवचिकता

ठेवायला हवी, असं सूचक विधानही त्यांनी केलं. रशियाचे अध्यक्ष पॉडगॉर्नी, पंतप्रधान कोसिजिन व परराष्ट्रमंत्री ग्रोमिको यांच्याशी झालेल्या चर्चेची माहिती सरदार स्वर्णसिंग यांनी त्यानंतर पंतप्रधानांना दिली. सोविएट नेत्यांनी दिलेला संदेश सुस्पष्ट होता. काश्मीर हा भारताचा भाग आहे या रशियाच्या पूर्वीपासूनच्या भूमिकेत बदल झालेला नव्हता. मात्र सुरक्षा समितीच्या २० सप्टेंबरच्या ठरावाची अंमलबजावणी झालीच पाहिजे, असं त्यांचं म्हणणं होतं.

फौजा मागं घेण्याचा प्रश्न तातडीचा बनत चालला होता. त्यासंबंधी जनरल चौधरींचं मत महत्त्वाचं होतं. तेव्हा शास्त्रींनी विविध उपायांच्या भल्याबुऱ्या परिणामांची त्यांच्याशी चर्चा केली. हाजीपीर खिंड व उरी पुंछ या भागांतील फौजा हटवण्याबाबत चौधरींचं मत स्पष्ट होतं. भारतीय फौजांनी आपलं उद्दिष्ट पुरं केलं होतं; त्यांनी नीतिधैर्यही मिळवलं होतं, असं सांगून ते म्हणाले, "आणखी घुसखोरी होऊ नये म्हणून हाजीपीर खिंड व अन्य ठिकाणं सोडण्यास पंतप्रधानांची तयारी नाही, हे मला ठाऊक आहे. शांततेच्या प्रक्रियेला बाधा न आणता ही ठिकाणं ताब्यात ठेवता आली असती तर मलाही आनंदच झाला असता. परंतु शांततेच्या कारणासाठी ही ठिकाणं सोडणं आवश्यक असेल तर त्याला हरकत घेऊ नये." अर्जुनसिंग यांचंही असंच मत होतं. हाजीपीर खिंडीचा प्रश्न जास्तच भावनाप्रधान बनला आहे, परंतु या ठिकाणांचं स्थानिक महत्त्व काही असलं तरी त्यांचा ताबा ठेवण्यापेक्षा एकूण लष्करी दृष्ट्या शांततेचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे, असं मत अर्जुनसिंग यांनी व्यक्त केलं.

युनोच्या ५ नोव्हेंबरच्या ठरावानुसार फौजा माघारी घेण्याच्या मुद्द्यावर ३ जानेवारीला लाहोर इथे व ४ जानेवारीला अमृतसर इथे चर्चा करण्यासाठी बैठकी बोलावण्यात आल्याचं युनोच्या सरचिटणीसांचे प्रतिनिधी जनरल मारांबिओ यांनी ३१ डिसेंबरला जाहीर केलं. भारत सरकारनं हा प्रस्ताव मान्य केला व लेफ्टनंट जनरल हरबक्ष सिंग यांची या बैठकीत भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्ती केली गेली.

राजकीय सल्लामसलतीसाठी शास्त्रींच्या चर्चेच्या फेऱ्या चालूच होत्या. १ जानेवारी १९६६ रोजी ताश्कंदसंबंधी काही महत्त्वाच्या व्यक्ती व गट यांच्याशी अनेक तास त्यांनी चर्चा केली. संसदीय काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीपुढं, तसंच विरोधी पक्षनेत्यांच्या बैठकीपुढं त्यांनी भाषणं केली. आपले मतभेद सोडवण्यासाठी लष्करी बळाचा वापर करणार नाही, असं जर उभय देशांनी ठरवलं तर ताश्कंद परिषद उपयुक्त ठरेल, असं या बैठकींतून शास्त्रींनी सांगितलं.

ताश्कंदला रवाना होण्याच्या आदल्या दिवशी म्हणजे २ जानेवारी १९६६ रोजी शास्त्रींनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत अयूब यांच्याशी वाटाघाटी करताना आपलं धोरण काय राहील याची माहिती दिली. हाजीपीर खिंडीतून फौज मागं घेण्याच्या प्रश्नावर या बैठकीत उहापोह झाला. शांततेच्या दृष्टीनं आवश्यक असेल तर तिथून फौजा हटवण्यास संमती द्यावी यावर एकमत झालं. एल. पी. सिंग यांनी माझ्याशी बोलताना याला दुजोरा दिला. मीर कासिम व डी. पी. धर या दोघा काश्मिरी मंत्र्यांशी चर्चा करण्यास

सिंग यांना सांगण्यात आलं होतं. त्या दोघांनीही वरीलप्रमाणंच मत व्यक्त केलं.

२ जानेवारीचा दिवस शास्त्रींच्या दृष्टीनं फारच धामधुमीचा होता. मंत्रिमंडळाची बैठक व अन्य कार्यक्रम तर होतेच. त्याखेरीज राष्ट्रपती राधाकृष्णन यांची भेट घ्यायची होती. अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांचे खास दूत ॲव्हरेल हॅरिमन हे त्या दिवशी पंतप्रधानांना भेटायला आले. व्हिएतनाममध्ये शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून अमेरिका करीत असलेल्या प्रयत्नांची चर्चा या बैठकीत झाली. भारतीय राजदूत बी. के. नेहरू व अमेरिकेचे राजदूत चेस्टर बोल्स या बैठकीला हजर होते. ताश्कंदला रवाना होण्यापूर्वी इंडो-सोविएट कल्चरल सोसायटीनं शास्त्रींसाठी निरोप समारंभ आयोजिलेला होता. त्या वेळी बोलताना अयूब यांचं डोकं आता शांत झालं असेल व भारत आणि पाकिस्तान यांना लष्करी ताकद दाखवण्याची गरज नाही, हे त्यांना मान्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त करताना शास्त्री म्हणाले,

> *'ना युद्ध' हा वाक्प्रयोग अयूब यांना फार उंचीचा वाटत असेल तर मी त्यांना अगदी साधी सूचना करतो. आपल्या फौजांनी एकमेकांविरुद्ध शस्त्रं हाती घेता कामा नयेत. भारत-पाकिस्तान संघर्ष आताच काबूत आला नाही तर तो व्यापक बनून त्याची परिणती जागतिक संघर्षात होण्याचा धोका आहे, ही बाब ताश्कंद येथे चर्चा करताना ध्यानात ठेवली पाहिजे.*

काश्मीरचे मुख्य मंत्री जी. एम. सादिक यांची तब्येत बरी नव्हती. शास्त्रींनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी अर्धा तास चर्चा केली.

दुसऱ्या दिवशी– ३ जानेवारी १९६६ रोजी– सकाळी एअर इंडियाच्या विमानानं शास्त्री ताश्कंदला रवाना झाले. पालम विमानतळावर त्यांना निरोप द्यायला श्रीमती ललिता शास्त्री व त्यांचे बाकी कुटुंबीय, मंत्रिमंडळातील सहकारी, विदेशी राष्ट्रांचे राजदूत, लष्करी व नागरी अधिकारी व प्रमुख नागरिक हजर होते.

त्याच दिवशी चंदिगढ इथे भारतीय सायन्स कॉंग्रेसच्या ५३ व्या अधिवेशनापुढं राष्ट्रपती राधाकृष्णन् यांचं भाषण झालं. "लोकांना अलग करण्याचा नव्हे, तर एकत्र आणण्याचा दृष्टिकोन ताश्कंद इथे समोर ठेवावा असा सल्ला मी पंतप्रधानांना दिला आहे,'' असं त्यांनी सांगितलं. ते म्हणाले, "ताश्कंदमध्ये शास्त्री दुही निर्माण करणाऱ्या गोष्टींऐवजी लोकांना एकत्र आणणाऱ्या घटकांवर भर देतील. शास्त्री खुल्या मनानं या परिषदेला गेले आहेत. त्यांच्या मनात कसलाही पूर्वग्रह नाही, ताठरपणा नाही की धर्मवेड नाही.... मानवजातीच्या भल्यासाठी वास्तवाचं भान राखून सत्याचा शास्त्रशुद्ध शोध घेण्याचा त्यांचा प्रयत्न राहील.''

□□



।। चोवीस ।।

# अयूब रिक्तहस्ते परतले

**पा**किस्तानचे अध्यक्ष अयूबखानही ताश्कंद परिषदेसाठी आपली तयारी करीत होते. विशिष्ट कालमर्यादेत काश्मीरमध्ये सार्वमत घेतलं जावं ही कल्पना पुढं रेटण्याचा त्यांचा निर्धार होता. या प्रश्नावर तत्काळ तोडगा निघाला नाही तर काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी 'स्वायत्त यंत्रणा' उभारावी असं त्यांचं मत होतं. अर्थात काश्मीरवरील सार्वभौमत्वाचा दावा भारत कायम ठेवणार व त्याबाबत चर्चेला त्याची तयारी नाही, हे शास्त्रींनी वारंवार केलेल्या निवेदनांमुळे अयूबना ठाऊक होतं.

अमेरिका व पाकिस्तान यांचे संबंध खालावलेले होते. तरीही काश्मीरबाबतच्या आपल्या भूमिकेला अमेरिकेचा पाठिंबा मिळावा म्हणून प्रयत्न करण्याचा अयूब यांचा मनसुबा होता. याचसाठी अमेरिकाभेटीचं आमंत्रण त्यांनी स्वीकारलं होतं. आणि आपल्याला अनुकूल अशा भावना जॉन्सन यांच्या अंतःकरणात आपण पुन्हा प्रज्वलित करू अशी आशा त्यांना वाटत होती. राष्ट्राध्यक्षांचा व्यक्तिशः पाठिंबा मिळवण्यासाठी ताश्कंदच्या आधी अमेरिकेला भेट देण्याचा त्यांचा उद्देश होता. काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वायत्त यंत्रणा उभारावी व पाकला समाधान होईल असा तोडगा निघावा या भूमिकेला त्यांना जॉन्सन यांचा पाठिंबा हवा होता. पाकिस्तान व अमेरिका यांच्या संबंधात सुधारणा व्हावी हा या भेटीमागील वरकरणी हेतू होता.

अयूब यांचं १३ डिसेंबरला न्यूयॉर्क इथे आगमन झालं. त्यांच्यासमवेत भुत्तो, वाणिज्यमंत्री गुलाम फरुकी, परराष्ट्रीय सचिव अझिझ अहमद, माहिती सचिव अल्ताफ

गौहर यांचा अंतर्भाव होता. केनेडी विमानतळावर जॉन्सन यांच्या वतीनं शिष्टाचार विभागाच्या एका उपप्रमुखानं त्यांचं स्वागत केलं. ते प्रेमानं ओसंडलेलं होतं, असं म्हणता येणार नाही.

'द न्यूयॉर्क टाइम्स'चे प्रख्यात पत्रकार जेम्स रेस्टन यांनी कराचीहून पाठवलेल्या पुढील वृत्तांतानुसार एकूण वातावरण फारसं अनुकूल नव्हतं :

*''येथील राजकीय वातावरण अत्यंत विखारी आहे. येथील सरकारनियंत्रित वृत्तपत्रे कम्युनिस्ट चीनला अनुकूल व अमेरिकाविरोधी आहेत. अमेरिका दररोज जवळजवळ दशलक्ष डॉलर्सची मदत पाकला करीत असतानाही त्याबद्दल येथील वृत्तपत्रांतून फारच कमी माहिती प्रसिद्ध होते. कम्युनिस्ट चीनच्या कामगिरीला मात्र भरपूर प्रसिद्धी दिली जाते. व्हिएतकाँग हे दक्षिण व्हिएतनामचे लढवय्ये वीर आहेत, असं वर्णन करून त्यांच्याही कामगिरीबद्दल भरभरून लिहिले जाते.''*

जुलै १९६१ मध्ये अयूब यांनी काढलेल्या उद्गारांशी हे सारं विसंगत होतं.

१९६१ मध्ये अमेरिकन काँग्रेसपुढं बोलताना अयूब म्हणाले होते, ''संकटसमयी भरवसा ठेवावा असा पाकखेरीज दुसरा देश आशियात तुम्हांला सापडणार नाही. केवळ पाकिस्तानची जनताच तुमच्या पाठीशी उभी राहील.'' काँग्रेससदस्य व सिनेटर्स यांना अयूब यांचे ते उद्गार आठवत होते. त्यामुळं अयूब यांच्या दृष्टिकोनात झालेल्या बदलाबद्दल ते असमाधानी होते. त्या काळी पाकिस्तान हा कम्युनिस्टविरोधी मोहिमेचा गड आहे असं अयूब समजत. १९६२ साली चिनी हल्ल्यानंतर अमेरिकेनं भारताला बरीच मोठी आर्थिक मदत व काही शस्त्रास्त्रं दिली. तेव्हापासून अयूब यांनी आपला नूर व सूर बदलला. चौ एन लाय यांना अयूब यांनी माझं अंतःकरण तुमच्यापाशी आहे व अमेरिकेशी असलेली मैत्री ही डावपेचासाठी आहे, असं सांगितलं असं म्हटलं जात होतं. आता परिस्थितीपायी अयूबना अमेरिकेकडे यावं लागलं होतं. शक्य तेवढी स्थिती सावरण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

अमेरिकेनं काश्मीर प्रश्नात थेट गुंतता कामा नये, असं जॉन्सन यांनी तोवर ठरवलं होतं. काश्मीरच्या बाबतीत सार्वमत वा लवाद यांसारख्या विशिष्ट तोडग्यासाठी अमेरिका प्रयत्न करणार नाही, असंही त्यांनी ठरवलं होतं. काश्मीर हा भारत व पाक यांनी शांततामय मार्गानं सोडवण्याचा द्विपक्षीय प्रश्न आहे, असं अमेरिकेचं मत होतं. दोघांत संवाद घडावा म्हणून फार तर अमेरिका प्रोत्साहन देईल, त्यापेक्षा अधिक काही करणार नाही अशी त्यांची भूमिका होती.

न्यूयॉर्कला आल्यावर दुसऱ्याच दिवशी अयूब यांचं युनोच्या आम सभेपुढं भाषण झालं. त्यांची भारत-विरोधी भूमिका कायमच होती. काश्मीर प्रश्नावर तोडगा निघाल्यावरच भारताच्या 'ना युद्ध करारा'च्या प्रस्तावावर आपण विचार करू, असंही त्यांनी सांगितलं. त्याच दिवशी अयूब वॉशिंग्टनला गेले. तिथे अध्यक्ष जॉन्सन यांच्याशी चर्चा व भोजन असा कार्यक्रम होता.

अयूबखान ज्या बाबी उपस्थित करण्याचा संभव होता त्यांबाबत जॉन्सन यांनी काळजीपूर्वक तयारी केली होती. सोमवार दिनांक १३ डिसेंबर १९६५ रोजी दुपारी ४ वाजता अध्यक्षांचे मदतनीस आर. डब्ल्यू. कोमर यांनी जे टिपण जॉन्सनना सादर केलं ते मोठं उद्बोधक होतं :

*(१) भूतकाळाबद्दल नव्हे, तर भविष्यकाळाबद्दल बोलू या : गेल्या खेपेस आपण भेटलो, त्यानंतर बऱ्याच बाबतींत बदल घडले आहेत. उदा. भारत-चीन सीमायुद्ध, अलीकडील पाक-भारत लढाई. आम्ही केलेल्या बऱ्याच गोष्टी तुम्हांला पसंत नाहीत व तुमच्या बऱ्याच गोष्टी आम्हांला माहीत नाहीत. एकमेकांकडून आपण काय रास्त अपेक्षा बाळगू शकतो या आधारावर आपल्याला नवे, विधायक संबंध उभारता येतील काय हे पाहणं महत्त्वाचं आहे. आपण जर तर्कसंगत विचार केला तर अजूनही एकत्र काम करायला बराच समान आधार आहे.*

*(२) आशियातील आमच्या भूमिकेबद्दलचा दृष्टिकोन पाकनं समजून घ्यायलाच हवा : आशियातील स्वतंत्र राष्ट्रं जोवर स्वतःच्या पायावर उभी राहत नाहीत तोवर आशियाच्या परिघावरील सोविएट व कम्युनिस्ट चीन यांना रोखून ठेवण्याचं काम अमेरिकेलाच पार पाडावं लागत आहे. १९४५ पासून आमचं हेच उद्दिष्ट असून त्यानुसारच कोरिया, व्हिएतनाम आणि भारत-पाकिस्तान यांच्याबद्दलचं आमचं धोरण ठरत आलेलं आहे.*

*(३) पाक वेगळाच मध्यवर्ती प्रश्न मानतं तो म्हणजे भारत, याची आम्हांला जाणीव आहे : काश्मीर वा अन्य प्रश्नांवर भारताची मुस्कटदाबी करण्याच्या लाल चीनच्या प्रयत्नांत आम्ही सहभागी होणार नाही, हे पाकिस्ताननं ध्यानात ठेवावं. भारताच्या विरुद्ध आम्ही चीन व पाक यांचे मूक साथीदार बनू शकत नाही. तसंच भारताविषयीचं आमचं धोरण आम्ही पाकिस्तानला ठरवू देणार नाही. अयूब जर आमच्या जागी असते तर त्यांनीही हेच केलं असतं.*

*(४) व्हिएतनामवर कम्युनिस्ट चीनचा जसा दबाव आहे तसाच भारतावर आहे असं आम्ही मानतो : दक्षिण आशियाचं रक्षण (ते युद्ध अयूब यांचंही आहे असं आम्ही मानतो.) करण्यासाठी आम्ही रक्त सांडीत आहोत. पेकिंगशी ज्यांची दोस्ती आहे अशा देशांना मोठ्या प्रमाणावर मदत देण्यास अमेरिकन जनता पाठिंबा देणार नाही.*

*(५) मूलभूत एकात्मता व दोघांचंही कल्याण यात आम्हांला रस आहे.*

*(६) भारत आम्हांला नष्ट करू पाहतो, हे पाकचं म्हणणं आम्हांला पटत नाही. भारताला अजून १० कोटी मुस्लीम नकोयत. बाह्य पाठिंबा मिळावा म्हणून पाकिस्तानच मुद्दाम हा बागुलबुवा उभा करीत आहे, असं आमच्या तज्ज्ञांचं मत आहे. जोवर पाक शांततेचा मार्ग अनुसरीत राहील व आपल्या खऱ्या मित्रांच्या संगतीत राहील तोवर भारत त्यांना गिळंकृत करणार नाही यासाठी आम्ही शक्य ते*

*सारं करायला तयार आहोत.*

*(७) काश्मीर : युनोच्या ठरावाला आमचा पूर्ण पाठिंबा असून त्यानुसार आम्ही प्रयत्न करीत राहू. कदाचित ताश्कंद इथे सोविएट युनियन या बाबतीत मदत करू शकेल. भारताला आम्ही काश्मीरबाहेर हटवू शकत नाही, पाकलाही ते शक्य नाही याची जाणीव अयूबखान यांनी ठेवली पाहिजे. सामंजस्याच्या मार्गानंच यातून मार्ग निघण्याची शक्यता आहे.*

मंगळवार दि. १४ डिसेंबर रोजी जॉन्सन व अयूब यांची पहिली बैठक झाली. त्यानंतर दुपारी ४.३० वाजता आर. डब्ल्यू. कोमर यांनी त्यांना आणखी एक टिपण सादर केलं. रात्रीच्या भोजनाच्या आधी होणाऱ्या चर्चेसाठी उपयुक्त ठरावं म्हणून दिलेल्या या टिपणात म्हटलं होतं :

*काश्मीरच्या बाबतीत लवाद मिळवून दिला व भारताच्या लष्करी मदतीत कपात केली तर सारं कसं छान होईल असं पटवायचा अयूब यांनी प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आपलं सारं कौशल्य पणाला लावलं. तुमची भूमिका समजली तरी चीनबरोबर आम्ही शय्यासोबत करू शकत नाही, असं तुम्ही त्यांना बजावलं आहे. आता खऱ्या सौदेबाजीला सुरुवात होईल.*

*'सार्वमत' वा निदान 'लवाद' हे दोन शब्द ऐकायला अयूब अत्यंत उत्सुक आहेत. आपली बाजू ते चांगली मांडतात व आपण त्यांच्याबद्दल नेहमीच सहानुभूती प्रकट केली आहे. परंतु सार्वमत व लवाद या दोन गोष्टी पुढं आल्या तर भारत तिथेच बोलणी सोडून बाहेर पडेल. आपण लवादाला पाठिंबा देऊ असे गृहीत धरून अयूब जर ताश्कंदला गेले तर ते तडजोडीच्या प्रयत्नांना सुरुवातच करणार नाहीत.*

*..... आमच्या शस्त्रांचा जे गैरवापर करीत आहेत व व्हिएतनाममध्ये ज्या शत्रूशी आम्ही लढत आहोत त्याच्याशीच हातमिळवणी करण्यास तयार आहेत अशा लोकांना मोठ्या प्रमाणावर मदत देण्यास अमेरिकन कॉंग्रेस व जनता संमती देणार नाही असं अयूबना स्पष्टपणं सांगून टाकावं.*

*पाकिस्तान व भारत यांना जर आमची मदत हवी असेल तर त्यांनी शांततेचा मार्ग अनुसरायला हवा.*

या टिपणावरून व्हाइट हाउसमध्ये काय विचारमंथन चालू होतं याची कल्पना येते. चर्चेच्या वेळी राष्ट्राध्यक्षांना उपयोगी पडावं म्हणून हे टिपण तयार केलेलं होतं.

१४ डिसेंबर रोजी भोजनाच्या वेळी जॉन्सन काश्मीरबद्दल अयूबना म्हणाले, "आम्ही प्रयत्न करू, परंतु अमेरिका काश्मीरचा प्रश्न सोडवू शकणार नाही. तसं शक्य असतं तर तो यापूर्वीच आम्ही सोडवला असता."

भारत पाकवर हल्ला करण्याची भीती आहे, तेव्हा लष्करी मदत पुन्हा सुरू करावी

या पाकिस्तानच्या मागणीशी जॉन्सन सहमत झाले नाहीत. त्याऐवजी रक्षण करण्याची हमी त्यांनी दिली. ''भारत आपल्याला गिळंकृत करण्याचा धोका आहे, असं पाकिस्तानी जनतेला वाटत असेल तर व्हिएतनाममध्ये अमेरिका जशी मदतीला तयार आहे तशीच तिथेही तयार होईल.'' असं ते म्हणाले. त्यांच्या या उद्‌गारांनी शास्त्री अस्वस्थ झाले नाहीत, कारण पाकला गिळंकृत करण्याचा भारताचा हेतू नव्हताच.

भारत-पाक संबंधांविषयी बोलताना जॉन्सन यांनी अयूबना सांगितलं, ''आम्ही भारताला अन्नधान्याचा पुरवठा करू नये असं पाक आम्हांला सांगू शकत नाही, तसंच आम्ही पाकचं रक्षण करू शकत नाही असं भारतानंही समजू नये.''

अयूब यांना पुन्हा दिलासा देण्यासाठी जॉन्सन असं म्हणाले होते. भारतविषयक अमेरिकेच्या धोरणावर पाकिस्तानला प्रभाव टाकता येणार नाही हे त्यांनी एक प्रकारे स्पष्टच केलं. भारत-पाकमधील आगामी वाटाघाटींना पूर्ण व उघड पाठिंबा देताना जॉन्सन म्हणाले, ''ताश्कंद परिषद यशस्वी व्हावी अशी मी प्रार्थना करतो.''

''अध्यक्ष अयूबखान काहीच मागायला आले नव्हते, पण जाताना ते सारं काही– आमची मैत्री, आमचा आत्मविश्वास, आमचा विश्वास– घेऊन जात आहेत,'' हे जॉन्सन यांचे निरोपाच्या वेळचे उद्‌गार म्हणजे मुत्सद्देगिरीतील कौशल्याचा उत्तम नमुनाच होता!

खरं तर अयूब रिकाम्या हातांनी परतले. काश्मीरबाबत त्यांना हवी असलेली मदत मिळाली नाही व आणखी शस्त्रास्त्रांची मदत कधी मिळणार याचाही काही संकेत त्यांना मिळाला नाही. चीनशी असलेल्या हातमिळवणीबद्दल अमेरिकेनं त्यांच्याजवळ आपली नाराजी प्रकट केली. अमेरिकेशी मैत्री ठेवायची की त्याचा शत्रू कम्युनिस्ट चीन याच्याशी, याचा निर्णय तुम्ही घ्या, असं त्यांना बजावण्यात आलं. अमेरिकेशी मैत्री करायचं ठरवलं तरी भारताबद्दलच्या अमेरिकेच्या धोरणात ढवळाढवळ करता येणार नाही असंही त्यांना स्पष्टपणं सांगण्यात आलं. युनोच्या सुरक्षा समितीच्या २० सप्टेंबरच्या ठरावाच्या आधारे ताश्कंद परिषद यशस्वी व्हावी अशी आपली इच्छा असल्याचं जॉन्सन यांनी सांगितलं. सुरक्षा समितीच्या पूर्वीच्या ठरावांचा अथवा सार्वमत किंवा लवाद आदींचा त्यांनी उल्लेख केला नाही.

अयूब यांच्या भेटीच्या अखेरीस निवेदन करताना जॉन्सन यांनी आशियाबद्दलच्या आपल्या धोरणाचा पाठपुरावा करण्याचा निर्धार निःसंदिग्ध शब्दांत व्यक्त केला. अयूब यांच्याशी झालेल्या चर्चेचा उल्लेख करून ते म्हणाले, ''व्हिएतनाममध्ये ज्या प्रकारे आम्ही मदत करीत आहोत त्याप्रमाणं आशियातील देशांच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी मदत करण्याचं आमचं धोरण आहे, असं मी अयूबना सांगितलं... भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये सलोख्याची प्रक्रिया सुरू होईल अशी आशा मला वाटते. भारत व पाकिस्तान यांनी शांततेचा मार्ग अनुसरावा असं अयूब यांचं म्हणणं असून त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यास ते तयार आहेत, असा विश्वास मला वाटतो. आम्ही उभयतांनी एकमेकांशी संपर्क राखण्याचं मान्य केलं आहे.''

या भेटीनंतर १५ डिसेंबर १९६५ रोजी प्रसृत करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकात पुढील परिच्छेद होते :

*"भारत व पाकिस्तान यांच्यामधील दुर्दैवी संघर्षासह दक्षिण आशियातील घटनांबद्दल उभय अध्यक्षांनी प्रदीर्घ चर्चा केली. युनोच्या सुरक्षा समितीनं २० सप्टेंबर रोजी मंजूर केलेल्या ठरावाला, त्यातील सर्व कलमांना पाठिंबा देण्याचा हेतू उभय सरकारांनी व्यक्त केला. तसंच २७ सप्टेंबर व ५ नोव्हेंबर १९६५ च्या ठरावांनाही त्यांनी पाठिंबा व्यक्त केला.*

*आपली कार्यशक्ती व साधनं सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी वापरण्याऐवजी अन्यत्र खर्ची पडू नयेत म्हणून भारत व पाकिस्तान यांच्यातील मतभेद शांततेच्या मार्गानं मिटावे याबद्दल उभय राष्ट्राध्यक्षांचं एकमत झालं."*

अयूबखान १६ डिसेंबरला वॉशिंग्टनहून मायदेशी परतले. १९ डिसेंबरला कराची इथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, "भारत व पाकिस्तान यांच्यात नव्यानं संघर्ष पेटला तर त्याचे होणारे भयंकर परिणाम उभय देशांना परवडणार नाहीत. त्यांनी 'ना-युद्ध करार' करण्याची तयारी दर्शवली, पण त्याआधी काश्मीर-प्रश्न सुटला पाहिजे, ही नेहमीची पुस्ती जोडलीच.

□□



।। पंचवीस ।।

# कोसिजिन यांचा पुढाकार

**या** प्रकरणातील माहिती ही रशियाचे राजदूत लिओनिद मित्रोफानोविच झामियातिन यांनी दिलेल्या माहितीवर आधारित आहे. झामियातिन यांनी सोविएट सरकारच्या अनेक महत्त्वपूर्ण राजनैतिक पदांवर काम केलेलं असून ब्रेझनेव्ह, कोसिजिन, गोर्बाचेव्ह, रीगन, मार्गारेट थॅचर आदी नेत्यांच्या बरोबर झालेल्या विविध शिखर परिषदांत भाग घेतलेला आहे. १९८० नंतर ते रशियाचे ब्रिटनमधील राजदूत असताना मी युनोच्या इंटरनॅशनल मॅरिटाइम ऑर्गनायझेशनचा सरचिटणीस होतो व माझं मुख्यालय लंडन इथे होतं. त्या वेळी झामियातिन यांच्याशी माझा परिचय झाला.

१९६५ मध्ये झामियातिन हे कोसिजिन यांचे वरिष्ठ सल्लागार होते व त्यांचे अत्यंत निकटवर्ती म्हणून काम पाहत होते. ताश्कंद परिषद घेण्याचं ठरलं तेव्हा महत्त्वाच्या तयारीच्या कामात त्यांचा सहभाग होता. तसंच या परिषदेतील सोविएट शिष्टमंडळाचे ते वरिष्ठ सदस्य होते. शिष्टमंडळाचे अधिकृत प्रवक्ते म्हणून कोसिजिन यांनी त्यांची नियुक्ती केली होती. त्यामुळं त्यांचा कोसिजिन यांच्याशी सतत संपर्क होता. ताश्कंद येथील ऐतिहासिक परिषदेचं वृत्त देण्यासाठी साऱ्या जगातून सुमारे दोन हजार पत्रकार जमले होते. त्यांच्याशीही झामियातिन यांना सतत संपर्क ठेवावा लागत होता.

लंडनमध्ये असताना १९८९ साली मी ताश्कंद परिषदेचा विषय झामियातिन यांच्याकडे काढला. शास्त्रींचं चरित्र लिहिण्यासाठी माझं संशोधन चालू असून त्या

संदर्भात या परिषदेतील घडामोडींची अधिक माहिती मला द्याल का अशी मी विचारणा केली. त्यांनी तत्परतेनं होकार दिला. परंतु ते कामात व्यग्र होते व माझंही सरचिटणीसपदाचं अखेरचं वर्ष असल्यानं मीही कामात बुडालेलो होतो. तेव्हा आम्ही नंतर उभयतांच्या सोयीनं भेटायचं ठरवलं. १९९३ मध्ये मी त्यांच्याशी पुन्हा संपर्क साधला. तोवर ते सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाले होते व मॉस्कोत स्थायिक झाले होते. त्यांना भेटायला मी मॉस्कोला गेलो. २८ जुलै व ८ ऑगस्ट १९९३ रोजी आमची भेट झाली. सरकारमधून निवृत्त झालो असल्यानं सरकारी नियमांचं आपल्यावर आता बंधन नाही, तेव्हा त्या वेळच्या अनुभवांबद्दल आपण मोकळेपणानं सांगू शकतो, असं ते म्हणाले. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पुढील घटना इथे दिल्या आहेत.

क्रुश्चेव्ह यांच्यानंतर १९६४ मध्ये अलेक्सी निकोलविच कोसिजिन हे रशियाचे पंतप्रधान झाले. क्रुश्चेव्ह हे रंगतदार व चंचल राजकीय नेते होते, तर कोसिजिन हे गंभीर प्रकृतीचे होते. वास्तवाचं भान बाळगणारे तंत्रज्ञ म्हणून कोसिजिन यांनी आपल्याबरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांत आत्मविश्वासाची भावना निर्माण केली होती. सोविएट युनियनमधील ते असामान्य अर्थशास्त्रज्ञ होते व सार्वजनिक सेवक या नात्यानं जनतेच्या कल्याणासाठी त्यांनी स्वतःला सर्वस्वी वाहून घेतलेलं होतं, असं त्यांचं वर्णन झामियातिन यांनी केलं. ते 'हसतमुख' पंतप्रधान नसले तरी सोविएट युनियनमधील सर्वात हुशार नेत्यांपैकी ते एक होते असंही झामियातिन म्हणाले.

भारत-पाक संघर्षातून मार्ग काढण्यासाठी युनोच्या मार्फत काही पुढाकार घ्यावा काय याचा सर्वप्रथम विचार सोविएट युनियननं केला. युनोच्या सरचिटणिसांना पत्र पाठवावं, सुरक्षा समितीच्या काही बैठकी आयोजित कराव्या अशा सूचनांचा विचार झाला. सोविएट युनियन यासाठी काही तरी करीत आहे हे त्यामुळं दिसलं असतं व त्यामुळं जनतेचं समाधानही झालं असतं. परंतु त्यामुळं काही विधायक व व्यवहार्य अशी निष्पत्ती होईल काय हा मुख्य प्रश्न होता. वेगानं ढासळत चाललेल्या परिस्थितीत युद्ध टाळण्यासाठी तत्काळ परिणामकारक हस्तक्षेप करणं अत्यावश्यक आहे, युनोच्या मार्फत हे लवकर घडून येणं संभवनीय नाही, असं कोसिजिन यांचं मत होतं. तेव्हा सोविएट युनियननंच पुढाकार घ्यावा अशा निष्कर्षाप्रत ते पोचले. ही सर्वस्वी कोसिजिन यांची कल्पना होती, असं झामियातिन म्हणतात. कोसिजिन पंतप्रधान होऊन जेमतेम वर्षच झालं होतं, हे लक्षात घेता त्यांचा हा निर्णय धाडसी होता. ब्रेझनेव्ह हे सर्वोच्च सत्ताधारी होते व त्यांची संमती मिळवणं जरूर होतं. त्यांना विचारल्यावर ब्रेझनेव्ह यांनी "पण आपण काय सुचवू शकतो?" असं विचारलं, तेव्हा कोसिजिन यांच्यापाशी उत्तर तयारच होतं. ते म्हणाले, "शांततेचं घोषणापत्र तयार करण्यासाठी आपण ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा गट नेमू. त्यावर चर्चा करण्यासाठी भारत व पाकिस्तान यांना आमंत्रित करता येईल. चांगले शेजारी म्हणून सलोख्यानं नांदा असं त्यांना आवाहन करणं हे उद्दिष्ट ठेवावं." ब्रेझनेव्ह यांनी मान डोलावून होकार दिला व कोसिजिन यांना त्याचा तपशील ठरवण्याचं स्वातंत्र्य दिलं.

लवकरच कोसिजिन यांच्या नेतृत्वाखाली एक छोटा उच्चाधिकार गट या दृष्टीनं कामाला लागला. झामियातिन या गटाचे एक सदस्य होते. १९६५ च्या जून, जुलै व ऑगस्ट महिन्यांत आम्ही एक प्रबंध तयार केला. त्यात कोसिजिन यांच्या कल्पनांचा विस्तार केलेला होता, असं सांगून झामियातिन म्हणाले, "जेव्हा प्रबंधाला अंतिम स्वरूप देण्यात आलं तेव्हा कोसिजिन म्हणाले, "यातून काय निष्पन्न होणार याचं भाकीत कोणीच वर्तवू शकत नाही. तरीही सोविएट युनियनची मध्यस्थी मान्य आहे काय याबाबत भारत व पाकिस्तान यांच्याशी चर्चा तर करू या." त्यानुसार नेहमीच्या राजनैतिक माध्यमातून व खास दूत पाठवून सल्लामसलत सुरू झाली. कोसिजिन त्याच वर्षी अयूबना एप्रिलमध्ये व शास्त्रींना मेमध्ये भेटले होते व दोघा नेत्यांना वाटाघाटींच्या टेबलापाशी आपण आणू शकू असा त्यांचा अंदाज होता."

लढाई चालू असतानाच कोसिजिन यांनी १८ सप्टेंबर १९६५ रोजी शास्त्री व अयूब यांना पत्रं पाठवून मध्यस्थी करण्याची आपली तयारी दर्शवली. युद्धबंदी लागू झाल्यावर २३ सप्टेंबर रोजी शास्त्रींनी ही 'ऑफर' तत्काळ स्वीकारली. अयूब यांची प्रतिक्रिया उदासीनतेची होती. शास्त्रींबरोबरच्या बैठकीच्या उपयुक्ततेबद्दल अयूब यांच्या मनात साशंकता होती. "मी माझी बाजू मांडीन आणि शास्त्री त्यांची बाजू मांडतील. त्यातून काय साध्य होणार?" असा शेरा त्यांनी मारला, असं अल्ताफ गौहर म्हणतात. अयूब आरंभी फारसे अनुकूल नव्हते. मात्र नंतर ११ नोव्हेंबर रोजी भुत्तो यांनी सोविएट रशियाच्या मध्यस्थीची 'ऑफर' पाकला मान्य असल्याचं रावळपिंडी इथे जाहीर केलं.

त्यानंतर बैठकीच्या तयारीवर कोसिजिन यांनी लक्ष केंद्रित केलं. अत्यंत काळजीपूर्वक त्यांनी सारी आखणी केली. ताश्कंद इथे चर्चेसाठी येणाऱ्या प्रत्येक संभाव्य बाबीचा त्यांनी अभ्यास केला. या प्रश्नांवर शास्त्री व अयूब यांचे दृष्टिकोन काय आहेत याची माहिती जमा करण्यासाठी त्यांनी अतोनात परिश्रम घेतले. भारत-पाकिस्तान यांच्यामधील संबंधांच्या सर्व पैलूंचा तास न् तास अभ्यास त्यांनी केला आणि स्वतःच्या कल्पना निश्चित केल्या. कुठलीही गोष्ट नजरेतून सुटू नये याची दक्षता त्यांनी घेतली. चर्चेशी संबंधित अशा साऱ्या बाबींचा तपशील त्यांच्या मेंदूत नोंदवला गेला होता. जणू ते संगणकासारखंच काम करीत होते, असं झामियातिन म्हणाले.

प्राथमिक चर्चेसाठी आलेले सरदार स्वर्णसिंग व भुत्तो यांचं कोसिजिन यांनी स्वागत केलं. ही परिषद आरोप-प्रत्यारोपांच्या वातावरणात नव्हे, तर शांततेच्या वातावरणात पार पडावी म्हणून कोसिजिन यांनी सर्वतोपरीनं काळजी घेतली. झामियातिन यांच्या मते कोसिजिन यांच्यासमोर पुढील उद्दिष्टं होती :

*(१) संघर्षाला पुन्हा तोंड फुटण्यास प्रतिबंध करणं व 'चांगले शेजारी' या तत्त्वावर आधारित अशा भारत-पाक संबंधांना प्रोत्साहन देणं.*

*(२) भावी काळात मतभेद मिटवण्यासाठी बळाचा वापर न करता शांततापूर्ण*

*मार्गाचा उपयोग केला जाईल याबद्दल उभय नेत्यांचं मन वळविणं.*

*(३) सुरक्षा समितीनं केलेल्या मागणीनुसार ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी जिथे फौजा होत्या तिथे त्या उभय राष्ट्रांनी हटवाव्यात याची हमी दोघांकडून घेणं.*

*(४) उभय देशांत सुरळीत राजनैतिक संबंध प्रस्थापित करणं.*

या प्रत्येक मुद्द्याबाबत कोसिजिन यांनी काही मजकूरही संभाव्य घोषणापत्रात समाविष्ट करायला उपयोगी पडावा म्हणून तयार केला होता.

ताश्कंद इथे योग्य ती प्रशासकीय व शिष्टाचार यांची व्यवस्था करण्यासाठी कोसिजिन यांनी झामियातिन यांना एक पंधरवडा आधीच ताश्कंदला पाठवलं. भारतीय व पाक शिष्टमंडळांना समसमान वागणूक देण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या. शास्त्री व अयूब यांची ज्या घरांमध्ये राहण्याची सोय केली होती त्यांची रंगरंगोटी करण्याचं काम अवधी थोडा असल्यानं स्थानिक सोविएट लष्करी तुकड्यांकडे सोपवण्यात आलं, असंही झामियातिन म्हणाले.

शास्त्री व अयूब यांच्या आगमनापूर्वी तीन दिवस आधीच खुद्द कोसिजिन ताश्कंदला येऊन दाखल झाले. किंबहुना त्यांनी ३१ डिसेंबरला नववर्षाची पहाट ताश्कंद इथेच स्थानिक नेत्यांसमवेत घालवली. शास्त्री व अयूब उतरणार होते ती घरं व त्यांच्या परिषदेचं स्थळ यांची त्यांनी व्यक्तिशः पाहणी केली. सारी व्यवस्था चोख झाली आहे की नाही हे पाहिलं. त्यांनी मॉस्कोहून स्वतःच्या डॉक्टरना बरोबर आणलं होतं. तसंच गरज पडल्यास तयार राहण्याच्या सूचना स्थानिक डॉक्टरांनाही दिल्या होत्या. शास्त्री व अयूबखान यांच्या खाण्याच्या सवयींबद्दल त्या देशांतील सोविएट राजदूतांकडून कोसिजिन यांनी माहिती मिळवली होती. त्यानुसार स्वयंपाक करणारे खास आचारी नियुक्त केले होते. लालबहादुर शास्त्री शाकाहारी आहेत हे कोसिजिनना ठाऊक होतं व त्यानुसार त्यांनी खास व्यवस्था केलेली होती. त्यांच्या निवासस्थानांमध्ये ठेवण्यासाठी भरपूर फुलं आणलेली होती. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीवर कोसिजिन यांनी व्यक्तिशः देखरेख ठेवली होती. शास्त्री व अयूब यांचं स्वागत करायला ते आता सिद्ध होते. संघर्षाचे दिवस संपुष्टात आणावे म्हणून उभय नेत्यांचं मन वळविण्यासाठी उत्सुक होते.

□□

।। सव्वीस ।।



# टी. टी. के. यांचे राजीनामा नाट्य

ताश्कंद परिषद अगदी नजीक येऊन ठेपली असताना एक गंभीर पेचप्रसंग केंद्र सरकारमध्ये उद्भवला. परिषदेच्या तयारीत पूर्णपणं मग्न असलेल्या शास्त्रींना या पेचप्रसंगाकडे लक्ष पुरवावं लागलं. अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांच्यावर भ्रष्टाचाराचा व वशिलेबाजीचा आरोप करणारं एक निवेदन अकरा खासदारांनी नोव्हेंबर १९६५ मध्ये पंतप्रधानांना सादर केलं. निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्यांनी चौकशी समिती नेमण्याची मागणी केली होती व या समितीपुढं आरोपांच्या पुष्ट्यर्थ आम्ही पुरावा सादर करू, असं म्हटलं होतं.

त्या वेळी संसदेचं अधिवेशन चालू होतं व त्यामुळं हे निवेदन चर्चेचा विषय बनलं होतं. टी. टी. कृष्णम्माचारी साहजिकच त्यामुळं बेचैन होते. त्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली व आपल्यावरील आरोपांत काही तथ्य नाही, असं सांगितलं. पंतप्रधानांनी त्यांतील प्रत्येक आरोप तपासून त्याचं मूल्यमापन करावं. हे आरोप असत्य आहेत असं पंतप्रधानांना आढळलं तर शक्य तितक्या लवकर संसदेत त्यांनी तसं निवेदन करावं अशी विनंतीही कृष्णम्माचारी यांनी केली होती.

त्यामुळं मोठी नाजुक समस्या उभी राहिली. टी. टी. कृष्णम्माचारी म्हणतात त्याप्रमाणं त्यांच्याविरुद्धचे आरोप हेतुपुरस्सर केले गेले असतील व त्यांत काही तथ्य नसेल तर अर्थमंत्र्यांचं समर्थन करणं हे आपलं कर्तव्य आहे, असं शास्त्रींना एका बाजूला वाटत होतं, तर दुसऱ्या बाजूला लोकांनी निवडून दिलेल्या अकरा प्रतिनिधींनी

हे निवेदन दिलं होतं. प्राथमिक तपासणीत जर सकृद्दर्शनी पुरावा मिळाला तरच चौकशी आयोग नेमण्याचा प्रश्न येईल, आणि सकृद्दर्शनी पुरावा नसेल तर अर्थमंत्र्यांवरील आरोपांत तथ्य नाही, असं निवेदन संसदेत करावं असं शास्त्रींचं मत होतं.

पंतप्रधानांच्या मताच्या पहिल्या भागाला टी. टी. कृष्णम्माचारी यांची हरकत नव्हती. पण आपल्याविरुद्ध सकृद्दर्शनी पुरावा आहे की नाही हे दुसऱ्या कोणाशी सल्लामसलत न करता खुद्द पंतप्रधानांनीच ठरवावं असा त्यांचा आग्रह होता. याबाबत अखेर निर्णय आपणच घेऊ, पण त्यापूर्वी अत्यंत लायक व ज्यांची सचोटी वादातीत आहे अशा व्यक्तींचं अनौपचारिक मत अजमावावं असं शास्त्रींना वाटत होतं. त्यांच्या मते अशी व्यक्ती म्हणजे भारताचे सरन्यायाधीश. त्यांच्या अनौपचारिक मताचा भक्कम आधार पंतप्रधानांच्या अंतिम निर्णयाला लाभेल आणि पंतप्रधान उचित व पूर्वग्रहरहित मनानं वागले असं मानलं जाईल. स्वतंत्रपणं छाननी करून न घेता जर पंतप्रधानांनी निर्णय दिला तर त्यांच्या सच्चेपणाबद्दल शंका व्यक्त केली गेली असती, असं शास्त्रींचं मत होतं.

परंतु अशा प्रक्रियेला टी. टी. कृष्णम्माचारी यांचा प्रखर विरोध होता. पंतप्रधानांचा आपल्या अर्थमंत्र्यांवर विश्वास आहे की नाही हा मूलभूत प्रश्न यात आहे, असं त्यांना वाटत होतं. निवेदन तपासून निष्कर्ष काढणं पंतप्रधानांना फारसं कठीण नाही, असं त्यांचं म्हणणं होतं तर हा प्रश्न केवळ विश्वास असण्याचा नाही, असं शास्त्रींचं मत होतं. त्यांच्यावर पूर्ण विश्वास असल्यामुळंच तर महत्त्वाचं खातं देऊन त्यांना मंत्रिपदावर ठेवलं होतं. भ्रष्टाचाराच्या आरोपांची न्याय्य व ठाम हाताळणी पंतप्रधान करतील यावर जनतेचा विश्वास आहे की नाही हा शास्त्रींच्या मते महत्त्वाचा प्रश्न होता. अर्थमंत्र्यांना पुढील पत्र पाठवून त्यांनी आपली भूमिका विशद केली :

*पंतप्रधानांचं निवासस्थान*
*नवी दिल्ली*
*२९-१२-१९६५*

*प्रिय कृष्णम्माचारीजी,*

*आज व काल आपण जी चर्चा केली त्यावर मी विचार केला. काही खासदारांच्या स्वाक्षरीनं पाठवण्यात आलेल्या निवेदनाची हाताळणी कशा प्रकारे करावी हा मुख्य प्रश्न आहे. स्वाक्षरी करणाऱ्या खासदारांनी चौकशी आयोगाची मागणी केली असून आरोपांबाबत पुरावा देण्याची जबाबदारी पत्करली आहे.*

*चौकशी आयोग नेमावा असं मला वाटत नाही, कारण जर सकृद्दर्शनी पुरावा असेल तरच त्याबाबत विचार करता येईल. अर्थात चौकशीची गरज नाही हा निष्कर्ष लोकांना व संसदेला पटेल अशा रीतीनं घ्यायला हवा.*

*तेव्हा स्वतंत्र व निःपक्षपाती अशा व्यक्तींचं प्राथमिक मत घेऊन हे करता येईल. चौकशी नेमावी की नाही याबाबत अंतिम निर्णय घेताना मला त्यांच्या*

*मताचा उपयोग होईल.*

*भारताच्या सरन्यायाधीशांना संबंधित कागदपत्रांची छाननी करून मला गुप्तपणं आपलं मत द्यावं, अशी विनंती करण्याचा माझा विचार आहे. तुम्ही माझे सर्वांत ज्येष्ठ व निकटचे सहकारी आहात. तेव्हा मला याबाबत किती काळजी वाटत असेल याची तुम्हांला कल्पना येईल. परंतु बराच विचार केल्यावरही याखेरीज अन्य पर्याय नाही असं मला आढळलं.*

*तुमचा*
*लालबहादुर*

या पत्राला उत्तर म्हणून टी. टी. कृष्णम्माचारी यांनी आपला राजीनामाच उतावीळपणं पाठवून दिला. त्यांनी राजीनामापत्रात म्हटलं होतं :

*नवी दिल्ली,*
*३० डिसें. १९६५*

*प्रिय लालबहादुरजी*

*२९ तारखेच्या पत्राबद्दल आभार. प्रश्न तुमच्या विचाराधीन आहे व काय कारवाई करावी हे तुम्ही ठरवायचं आहे. परंतु त्याचा अर्थ तुम्ही ठरवू पाहत असलेली पद्धती चुकीची आहे व त्यामुळं भविष्यकाळात अनिष्ट पायंडा पडेल असा दृष्टिकोन मी बाळगू नये असा नाही.*

*३१ डिसेंबर १९६५ रोजी दुपारी अर्थमंत्रिपदाचा मी राजीनामा देणार असून यापुढील कामाबाबत तुमच्याकडून आदेश घ्यावेत, अशा सूचना सचिवांना देणार आहे.*

*तुमचा*
*टी. टी. कृष्णम्माचारी*

या राजीनामापत्रातील मजकूर वेगळा, अद्वितीयच होता. मंत्रिपद सोडू इच्छिणारी व्यक्ती पंतप्रधानांना पत्र पाठवते व त्यांच्या निर्णयाची प्रतीक्षा करते, ही नेहमीची पद्धत आहे. पंतप्रधान मंत्र्याचा राजीनामा स्वीकारतात किंवा त्याला फेरविचार करण्याची विनंती करतात. सरकारचा मंत्री म्हणून शपथ घेतलेल्या मंत्र्यालाच आपली सूत्रं कधी सुपूर्द करायची याची तारीख व वेळ ठरवता येत नाही. टी. टी. कृष्णम्माचारी यांनी ही प्रथा पाळली नाही. पंतप्रधानांचा जाणूनबुजून अपमान करण्यासाठी त्यांनी असं केलं की घाईघाईत त्यांच्या हातून असं घडलं हे समजायला मार्ग नव्हता.

टी. टी. कृष्णम्माचारी यांच्या पत्रातला मजकूर वाचून त्यांची इच्छा मान्य करण्यावाचून पर्याय नाही, असा निष्कर्ष शास्त्रींनी काढला व खास दूतामार्फत पुढील पत्र त्यांना पाठवलं :

पंतप्रधानांचं निवासस्थान
नवी दिल्ली,
३१-१२-६५

प्रिय कृष्णम्माचारीजी,

तुमचं पत्र वाचून मी व्यथित झालो. या प्रकरणात स्वतंत्र व विश्वासार्ह मत अजमावून पाहण्याची मला गरज का वाटली हे मी आधी तपशीलवारपणं तुम्हांला कळवलं आहेच.

तुम्ही आपल्या पदाचा त्याग करायचं ठरवलं याचं मला फार दुःख होतं. साहजिकच मी व्यथित झालो. तुमच्या राजीनाम्यामुळं गंभीर हानी होईल हे निःसंशय. तरी तुमचा निर्णय मला स्वीकारला पाहिजे. तेव्हा तुमच्या इच्छेनुसार आज दुपारपासून तुमचा राजीनामा स्वीकारावा अशी विनंती मी राष्ट्रपतींना करीत आहे.

तुमचा
लालबहादुर

या नाट्यातील अखेरचं पत्र टी. टी. कृष्णम्माचारी यांचं होतं. त्यांनी लिहिलं :

३१ डिसेंबर १९६५

प्रिय लालबहादुरजी,

३१ तारखेच्या पत्राबद्दल आभार. तुम्ही ज्या भाषेत ते लिहिलं आहे त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. मी आतापर्यंत जबाबदारीच्या जागेवरच होतो याची मला पूर्ण जाणीव आहे. केवळ तुम्हांलाच नव्हे, तर पक्षाला व देशालाही मी जबाबदार होतो. परंतु तुम्ही माझी अशी स्थिती केली की मला दुसरा पर्यायच उरला नाही.

राष्ट्रपतींना सादर केलेल्या व वृत्तपत्रांच्यामार्फत जनतेपुढं मांडलेल्या निवेदनावर माझी कृती व प्रतिक्रिया मला विशद केली पाहिजे, हे तुम्ही मान्य कराल. या संदर्भात आपल्यात झालेला पत्रव्यवहार माझ्या निवेदनासह प्रसिद्ध करण्यास तुमची परवानगी आहे, अशी मला आशा वाटते.

तुमच्या हाताखाली अठरा महिने काम करताना तुम्ही दिलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

तुमचा
टी. टी. कृष्णम्माचारी

त्यानंतर भराभर घडामोडी घडल्या. पंतप्रधानांनी राष्ट्रपती राधाकृष्णन यांची भेट घेऊन टी. टी. कृष्णम्माचारी यांचा राजीनामा स्वीकारण्याची शिफारस केली. तसंच नवे अर्थमंत्री म्हणून सचिंद्र चौधरी यांची नियुक्ती करावी अशीही शिफारस केली.

टी. टी. कृष्णम्माचारी यांनी इतरांप्रमाणंच आपल्या सामर्थ्याबद्दल अवास्तव कल्पना बाळगली व पंतप्रधानांचं सामर्थ्य कमी लेखलं. ताश्कंद परिषद चार दिवसांवर येऊन ठेपली असताना व त्याच्या तयारीत पंतप्रधान गुंतले असताना आपण राजीनामा दिला तर पंतप्रधान तो स्वीकारणार नाहीत, अशी कृष्णम्माचारी यांची अटकळ होती. परंतु अशा दबावाला बळी पडणारे शास्त्री नव्हते.

टी. टी. कृष्णम्माचारी हे अत्यंत कुशल व बुद्धिमान होते. त्यांचा राजीनामा हा सरकारच्या दृष्टीनं व व्यक्तिशः शास्त्रींच्या दृष्टीनं गंभीर होता. कृष्णम्माचारींची माझी ओळख होती व त्यांची माझ्याशी वागणूक अत्यंत प्रेमळपणाची होती. परंतु ते अत्यंत तापट स्वभावाचे व त्यांची जीभ अत्यंत तिखट असल्याचं सर्वांना ठाऊक होतं. त्यांना मित्र होते, प्रशंसक होते, तसेच विरोधकही होते. त्यामुळं त्यांच्या राजीनाम्याबद्दल सार्वत्रिक खेद व्यक्त झाला नाही. टी. टी. कृष्णम्माचारी यांचा राजीनामा तडकाफडकी मान्य करून आपण कोणत्याही प्रकारच्या दबावाला बळी पडत नाही, हेच शास्त्रींनी दाखवून दिलं.

□□



।। सत्तावीस ।।

# ताश्कंद : रोमहर्षक वाटाघाटी

**को**सिजिन यांनी शास्त्री आणि अयूब यांना ताश्कंदला येण्याचं आमंत्रण दिलं, तेव्हा बैठकीची विशिष्ट कार्यक्रमपत्रिका अशी सूचित केलेली नव्हती. त्यामुळं या बैठकीत करायच्या चर्चेबद्दल प्रत्येक शिष्टमंडळाच्या वेगवेगळ्या कल्पना होत्या.

सुरक्षा मंडळाच्या ठराव क्र. २११ (२० सप्टेंबर १९६५) व ठराव क्र. २१४ (२७ सप्टेंबर १९६५) यांची अंमलबजावणी करून भारत व पाक यांच्यामध्ये शांतता प्रस्थापित करणं याला सोविएट युनियननं अत्यंत महत्त्व दिलं होतं.

भारताविरुद्ध उघड वा छुपं आक्रमण परत केलं जाणार नाही असं ठाम आश्वासन मिळालं तरच शांतता प्रस्थापित करता येईल, असं भारताचं म्हणणं होतं. तेव्हा पाकिस्ताननं 'ना युद्ध' करार करावा, अशी भारताची मागणी होती.

काश्मीरबाबत तपशीलवार चर्चा केली जावी व भारतानं त्यासंबंधी स्वायत्त यंत्रणा निर्मावी असं पाकचं म्हणणं होतं. १ जानेवारी १९६६ रोजी नभोवाणीवरून केलेल्या भाषणात अयूब यांनी त्याचा पुनरुच्चार केला होता. कोसिजिन यांनी शास्त्रींवर दडपण आणून त्यांना 'वास्तवाची जाणीव' करून द्यावी व 'जम्मू-काश्मीर प्रश्नाचा तिढा' सोडवावा असं अयूब यांचं म्हणणं होतं.

कोसिजिन यांनी प्रथमापासूनच सक्रिय पण सावध अशी शहाणपणाची भूमिका घेतली होती. चर्चा मुळातच अडकून पडू नये म्हणून त्यांनी मध्यस्थाची भूमिका पत्करली. शिखर परिषदेची पूर्वतयारी म्हणून ३ जानेवारीला सायंकाळीच शास्त्री व

अयूब यांची त्यांनी वेगवेगळी भेट घेऊन चर्चा केली.

रात्री सुमारे आठ वाजता कोसिजिन शास्त्री उतरले होते त्या निवासस्थानावर भेटायला आले. उभयतांत सुमारे सव्वा तास चर्चा झाली. १९६५ च्या ऑगस्टमध्ये शास्त्री यांनी सोविएट युनियनला भेट दिली होती, तेव्हा त्या दोघांत चांगलीच दोस्ती निर्माण झाली होती. दोघांच्या मनात एकमेकांबद्दल अत्यंत आदराची भावना होती. या मैत्रीला पुन्हा उजाळा मिळाला. आपल्या देशात शास्त्रींचं पुन्हा स्वागत करताना अत्यंत आनंद होत आहे, या शब्दांत कोसिजिन यांनी आपल्या भावना प्रकट केल्या. उभय नेत्यांतील वाटाघाटींसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेची माहिती त्यांनी शास्त्रींना दिली. शांतता प्रस्थापित करण्याच्या निकडीवर भर देऊन भारताशी असलेल्या सोविएट युनियनच्या गाढ मैत्रीचं पुन्हा एकवार स्मरण करून दिलं. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता शास्त्री व अयूब यांची प्राथमिक स्वरूपाची भेट निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर एकत्रित भोजन व्हायचं होतं. परिषदेचं औपचारिक उद्घाटन दुपारी चार वाजता होतं. कोसिजिन यांनी या कार्यक्रमाची माहिती शास्त्रींना दिली. कोसिजिन यांच्या प्रयत्नांना शास्त्रींनी तितक्याच प्रेमळपणं प्रतिसाद दिला व कृतज्ञता प्रकट केली.

त्याच सायंकाळी कोसिजिन यांनी अयूबखान यांची भेट घेतली खरी, परंतु ती शास्त्रींशी झालेल्या भेटीसारखी मैत्रीपूर्ण व खेळीमेळीची ठरली नाही. या पहिल्या भेटीतच अयूबखान यांनी आपल्या अरेरावीची झलक दाखविली, असं झामियातिन म्हणतात. अयूब यांनी भारताच्या पंतप्रधानांबद्दल काही अवमानकारक शब्द वापरले व शास्त्रींबरोबर आपण हस्तांदोलन करणार नाही असं सांगितलं. त्यावर कोसिजिन संतापले. शांततेसंबंधी वाटाघाटी करण्याचं निमंत्रण तुम्ही स्वीकारलं असून शास्त्री यांना राष्ट्रप्रमुख म्हणून समान सन्मान व वागणूक दिली जाईल असं कोसिजिन यांनी ठामपणं अयूबना सुनावलं. त्या रुद्रावताराचा योग्य परिणाम झाला आणि अयूबखान यांच्या मस्तकातील गुर्मी उतरली. त्यांनी सहकार्याची भूमिका स्वीकारावी हे पटवून देण्यासाठी कोसिजिन यांनी बराच वेळ चर्चा केली. अखेर अयूबखान तयार झाले. तसंच परिषदेचा प्रारंभ अनुकूल वातावरणात व्हावा म्हणून उद्घाटनाच्या वेळच्या भाषणात कोणाही नेत्यानं काश्मीरचा खास उल्लेख करू नये ही कोसिजिन यांची सूचनाही त्यांनी मान्य केली. अशीच सूचना शास्त्रींनाही करण्यात आली होती व त्यांनीही ती मान्य केली होती.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ४ जानेवारी १९६६ रोजी सकाळी ९.३० वाजता सरदार स्वर्णसिंग, यशवंतराव चव्हाण व भारतीय शिष्टमंडळाचे वरिष्ठ अधिकारी शास्त्रींना भेटायला आले. आदल्या दिवशी कोसिजिन यांच्याशी झालेल्या चर्चेचा तपशील शास्त्रींनी त्यांना सांगितला.

सकाळी ११.३० वाजता कोसिजिन यांनी शास्त्री व अयूब यांचं 'न्यूट्रल व्हिला'मध्ये स्वागत केलं. ताश्कंदला आगमन झाल्यावर तिघे नेते प्रथमच एकत्र भेटत होते. चर्चेला संघर्षाची पार्श्वभूमी असली तरी या बैठकीच्या वेळचं वातावरण सलोख्याचं होतं.

कोसिजिन यांनी अत्यंत काळजीपूर्वक बैठकीचं आयोजन केलं होतं. त्यांचं वागणंच कसं अगदी सौजन्यमय होतं. शास्त्री व अयूब या दोघांचाही विश्वास त्यांनी संपादन केला होता. त्या सद्भावनेच्या वातावरणाला गालबोट लागेल, प्रतिष्ठेला बाधा येईल असं आपल्या हातून काही घडू नये असं शास्त्रींना तसंच अयूबखानांनाही वाटत होतं. एक वाजता आयोजिलेलं भोजनही अगदी प्रसन्न वातावरणात पार पडलं. तोवर कोणीही गंभीर मुद्दा उपस्थित केला नाही. कारण परिषदेचं औपचारिक उद्‌घाटन झाल्यावरच त्याचा उल्लेख करावा असं सर्वसाधारण मत होतं.

भोजनानंतर शास्त्री लगेच आपल्या निवासस्थानी परतले. त्यांनी थोडा वेळ विश्रांती घेतली आणि नंतर परिषदेला जाण्यासाठी ते तयार झाले. पंतप्रधान, त्यांचे सहकारी मंत्री आणि भारतीय शिष्टमंडळाचे अन्य सदस्य परिषदेच्या ठिकाणी वेळेवर पोचले. तेथील व्यवस्था परिपूर्ण व चोख होती. बरोबर चार वाजता परिषद सभागृहात वेगवेगळ्या प्रवेशद्वारांनी तिन्ही शिष्टमंडळांनी एकाच वेळी प्रवेश केला. ठरवून दिलेल्या आपापल्या जागी सारे जण गोलाकार टेबलाशी स्थानापन्न झाले.

सर्वप्रथम भाषण झालं कोसिजिन यांचं. भारत व पाकिस्तान यांचा सारख्याच स्नेहमय शब्दांत त्यांनी उल्लेख केला. एकूण २६ वेळा भारत व पाकिस्तान यांचा त्यांनी उल्लेख केला. त्यांपैकी १३ वेळा आधी भारत व मग पाकिस्तान, तर उरलेल्या १३ वेळा आधी पाकिस्तान व मग भारत या क्रमानं त्यांनी नावं घेतली. ते म्हणाले,

*"भारत व पाकिस्तान हे आमचे दक्षिणेतील शेजारी आहेत. सोविएट युनियन, भारत व पाकिस्तान यांच्यातील मैत्रीचे संबंध दृढ करण्यासाठीच नव्हे, तर या देशांमध्ये शांतता व मैत्री नांदावी म्हणूनही आम्ही नेहमीच एकत्र आलेलो आहोत. परकीय अमलाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी भारत व पाकिस्तान यांची जनता खांद्याला खांदा लावून लढलेली आहे. वसाहतवादाविरुद्ध त्यांनी सारखाच लढा देऊन विजय मिळवला आहे व त्यासाठी सारखाच त्याग केला आहे. आज देखील पूर्वीप्रमाणं भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये संघर्ष व्हावा असं केवळ त्यांच्या शत्रूंनाच वाटत असेल.*

*ताश्कंद येथील बैठक हे पाकिस्तान व भारत यांच्या संबंधातील एक महत्त्वाचं वळण ठरावं, असं आम्हांला वाटतं. अंतिम तोडगा काढण्याच्या भावनेनं या दोन्ही राष्ट्रांचे प्रमुख ताश्कंदला आले आहेत, असा आम्हांला विश्वास वाटतो. सध्याच्या सर्व समस्यांवर एका बैठकीत तोडगे सापडणं कठीण जाईल, हे उघडच आहे. तेव्हा त्यांच्या सोडवणुकीच्या दृष्टीनं मार्ग आखणं, विश्वासाचं व सामंजस्याचं वातावरण निर्माण करणं आणि संबंध सुरळीत होण्यात उद्भवणारे प्रश्न सोडवणं हे महत्त्वाचं काम आहे.*

*असं घडलं तर ते एक महत्त्वपूर्ण 'पुढचं पाऊल' ठरेल. तेव्हा अध्यक्ष अयूबखान व पंतप्रधान शास्त्री दोघेही असा प्रयत्न करतील अशी आम्हांला आशा*

*वाटते. दीर्घकाळ पडून राहिलेल्या प्रश्नांवर विचार करण्यासाठी परस्परांचं हित लक्षात घेऊन, थंड डोक्यानं जेव्हा सरकारं विचार करतात तेव्हा संघर्ष संपुष्टात येतात. एवढंच नव्हे तर ते ज्यातून उद्भवतात ती स्थितीही जवळपास नष्टप्राय होते, असे दाखले आहेत. उभय देशांतील जनमत व शांतताप्रेमी वृत्तपत्रांचे प्रतिनिधी हे साध्य करण्यात मदत करतील असा आम्हांला विश्वास वाटतो.*

*पाकिस्तानचे अध्यक्ष व भारताचे पंतप्रधान यांच्यातील या भेटीकडे साऱ्या शांतताप्रेमी लोकांचं लक्ष लागलं असून ते आशावादी आहेत. पाकिस्तान व भारत यांच्या नेत्यांच्या सुजाण मुत्सद्देगिरीवर त्यांचा विश्वास आहे. ताश्कंद येथील बैठक यशस्वी होईल व भारत आणि पाकिस्तान यांच्यातील जनतेला शांती व भरभराट लाभेल अशी आशा त्यांना वाटते आहे. ताश्कंदहून शुभ वर्तमान कानी पडावं याची प्रतीक्षा ती जनता करीत आहे. ही बैठक फलद्रूप होईल, तसंच राष्ट्राराष्ट्रांत शांतता प्रस्थापित होऊ शकते, सध्याच्या कठीण समयी देखील संघर्ष सोडविण्याचे मार्ग सापडू शकतात यावर पुरोगामी विचारांच्या माणसांचा असलेला विश्वासही त्यामुळं दृढ होईल.''*

कोसिजिन यांच्यानंतर शास्त्री व अयूब यांची भाषणं झाली. दोघांचीही भाषणं प्रतिष्ठेला साजेशी, स्नेहमय, आपुलकीची होती. यजमानांनी केलेल्या उत्तम आतिथ्याबद्दल व मतभेद मिटविण्यासाठी एकत्र येण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल उभय नेत्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. दोघांनीही शांततेचं महत्त्व आपण जाणतो यावर भर दिला. मात्र शास्त्री व अयूब या दोघांनीही संयमित शब्दांत आपली मतभिन्नता प्रकट केली आणि शांतता प्रस्थापिण्याचा सर्वोत्तम मार्ग शोधायला हवा असं बोलून दाखविलं. शास्त्री म्हणाले :

*''बळाचा वापर करणार नाही असं आश्वासन आम्ही परस्परांना देणं याचा अर्थ दुसऱ्याच्या प्रादेशिक एकात्मतेचा आदर करणं होय. पाकिस्तानचं सार्वभौमत्व व प्रादेशिक एकता बिनशर्त मान्य करतो असं आम्ही नेहमीच म्हटलेलं असून मी आताही त्याचा पुनरुच्चार करीत आहे. अर्थात आम्हांलाही तितक्याच ठामपणं आमच्या सार्वभौमत्वाचं व प्रादेशिक एकतेचं जतन करायचं आहे. शांतता व चांगल्या संबंधांसाठी एकमेकांच्या सार्वभौमत्वाबद्दल आदर बाळगणं अत्यंत निकडीचं आहे.''*

''याचा अर्थ उभय देशांत जे अनेक मतभेदांचे मुद्दे आहेत त्यांकडे डोळेझाक करावी असं आपल्याला सुचवायचं नाही'', हे शास्त्री यांनी स्पष्ट केलं. हे प्रश्न बळाचा वापर करून नव्हे, तर वाटाघाटी, चर्चा करून सोडवावेत असं ते म्हणाले. हा मुद्दा अधिक स्पष्ट करताना त्यांनी सांगितलं :

*''अध्यक्ष कोसिजिन यांनी बोलावलेल्या या बैठकीत आपापसातील मतभेद*

*सोडविण्यासाठी बळाचा वापर करू नये, असा करार झाला तर ती महत्त्वाची कामगिरी ठरेल. त्यामुळं उभय राष्ट्रांना शेजाऱ्यांमधील अत्यावश्यक अशा चांगल्या संबंधांचा मार्ग खुला होईल व आमच्यातील बऱ्याच समस्या सोडवणं सोपं होईल. आपण अन्य बाबींचीही चर्चा करायला हवी. त्यांतील काहींच्याबद्दल जरी मतभेद असले व त्यांविषयी त्वरित एकमत होणं शक्य नसलं तरी आपण शांततेचा मार्ग सोडून देता कामा नये.''*

आपल्या भाषणाची सांगता करताना ते म्हणाले :

*''आमच्या खांद्यावर प्रचंड जबाबदारी आहे. उपखंडाची लोकसंख्या ६० कोटी म्हणजे एकूण मानवजातीच्या एकपंचमांश आहे. भारत व पाकिस्तान यांना प्रगती व भरभराट करायची असेल तर त्यांना शांततेनं राहायला शिकावं लागेल. कायमच संघर्ष व शत्रुत्वाचं वातावरण राहिलं तर आमच्या जनतेला आणखी हालअपेष्टा सहन कराव्या लागतील. परस्परांविरुद्ध लढण्याऐवजी दारिद्र्य, रोगराई, अज्ञान यांच्याविरुद्ध लढू या. दोन्ही देशांतील लोकांचे प्रश्न, आशा-आकांक्षा सारख्याच आहेत. त्यांना संघर्ष वा युद्ध नको असून शांतता व प्रगती हवी आहे. त्यांना शस्त्रास्त्र व दारूगोळा नको असून अन्न, वस्त्र, निवारा हवा आहे. आपल्या जनतेच्या या गरजा पुऱ्या करायच्या असतील तर या बैठकीत काही तरी निश्चित व विधायक घडवण्याचा प्रयत्न करायला हवा.*

*ही अत्यंत ऐतिहासिक, मौलिक बैठक आहे. साऱ्या जगाचे डोळे आपल्याकडे लागले आहेत. पाकिस्तानचे अध्यक्ष व भारताचे पंतप्रधान भेटले खरे, पण त्यांना करार करण्यात अपयश आलं असं म्हणण्याची संधी लोकांना मिळता कामा नये. जागतिक घडामोडींच्या व्यापक संदर्भात आमचे प्रश्न हाताळण्याची क्षमता आमच्यात आहे हे कृतीनं दाखवू या.''*

शास्त्रींचं भाषण संपलं तेव्हा उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. मात्र भुत्तो त्यात सामील झाले नाहीत. अयूबनी दटावलं तेव्हा कुठे त्यांनीही टाळ्या वाजवल्या!

नंतर अयूब यांचं भाषण झालं व तेही आधीच्या दोन वक्त्यांइतकंच प्रभावी झालं. भारत व पाक यांच्या साठ कोटी जनतेची प्रगती शांततेवरच अवलंबून आहे, असं तेही म्हणाले. ''आमच्यासाठी शांतता महत्त्वाची आहे, अपरिहार्य आहे,'' असंही त्यांनी सांगितलं. काश्मीरचा संदर्भ मनात ठेवून शांततेबाबत ते म्हणाले,

*''परंतु केवळ शांततेबद्दल शुभेच्छा प्रकट करून शांतता प्रस्थापित होत नसते. त्यासाठी प्रयत्न करावा लागतो. शांतता धोक्यात आणणाऱ्या प्रश्नांना सामोरं जावं लागतं. त्याकडे दुर्लक्ष करणं हे धोकादायक ठरू शकतं हे आम्ही अनुभवलं आहे. संघर्षाचे अंतःप्रवाह कायम असताना शांततेच्या आभासानं कोणत्याही देशाचं समाधान होणार नाही. शांततेचा देखावा हा खऱ्याखुऱ्या शांततेचा पर्याय ठरू*

*शकत नाही. तेव्हा आम्हांला प्रश्नांना सामोरं जायला हवं आणि उभय देशांत ठाम व दीर्घकालीन शांतता प्रस्थापित होईल असं वातावरण निर्माण करायला हवं. उभय राष्ट्रांनी स्वीकारलेल्या तत्त्वानुसार आमच्यातील मूळ प्रश्न सोडवला तर पाकिस्तान भारताबरोबर 'ना युद्ध करार' करायला तयार आहे असा प्रामाणिक प्रस्ताव मी युनोच्या सर्वसाधारण सभेत अलीकडेच मांडला आहे. दोन राष्ट्रांत फूट पाडणारे वाद मिटविण्यासाठी विधायक पावलं उचलली तरच 'ना युद्ध करार' सार्थ ठरू शकतो. असे वाद हे समजूतदारीच्या भावनेनंच मिटू शकतात.''*

याचा अर्थ प्रश्नाला, म्हणजेच काश्मीरच्या समस्येला, समाधानकारक तोडगा सापडला तरच 'ना युद्ध करार' शक्य आहे असं अयूब यांना म्हणायचं होतं. भारत व पाकिस्तान यांच्या भूमिकांत या मुद्द्यावर एकमत होणं कठीण आहे हे स्पष्ट होतं. दोघांनीही आपापले दृष्टिकोन सौजन्यानं मांडले असले तरी मूलभूत समस्येविषयी सामंजस्य निर्माण करण्याची नाजुक कामगिरी आपल्यावर आहे याची जाणीव कोसिजिन यांना झाली असावी.

अयूब आपल्या भाषणाची सांगता करताना म्हणाले,

*''या परिषदेतून शांततेचा उद्घोष व्हावा आणि आपल्या जनतेला आशेचा संदेश दिला जावा. शांततेनं व सन्मानानं सुटू शकणार नाही असा प्रश्न आमच्या उभय राष्ट्रांत नाही. हे प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रामाणिकपणं प्रयत्न केला पाहिजे. कोणी एक राष्ट्र शांततेसाठी अटी घालू शकत नाही, हे लक्षात घेऊन आम्ही प्रयत्नांची सुरुवात केली पाहिजे. समानता व न्याय या शांततेच्या अटी असतात. त्यांचा आदर करणं व त्या पाळणं हे राष्ट्रांनी शिकायला हवं.''*

अशा प्रारंभानंतर शास्त्री आपल्या निवासस्थानी परतले. काही काळ त्यांनी विश्रांती घेतली. त्या रात्री ८.३० वाजता कोसिजिन यांच्याबरोबर त्यांची महत्त्वपूर्ण बैठक होणार होती. प्रश्नांचं स्वरूप स्पष्ट होतं. त्यामुळं काही आश्चर्यकारक घडेल अशी शास्त्रींची अपेक्षा नव्हती.

रात्रीच्या भेटीत कोसिजिन यांनी सुरक्षा समितीच्या ठरावाच्या अंमलबजावणीचा मुद्दा काढला. ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी ज्या जागी लष्कर होतं तिथे ते हलवण्यात यावं असं या ठरावात नमूद केलं होतं. सोविएट युनियननं २११ व २१४ क्रमांकांच्या या ठरावांच्या बाजूनं मत दिलेलं होतं. त्यामुळं या ठरावांची त्वरित अंमलबजावणी व्हावी असं सोविएट रशियाचं मत असल्याचं कोसिजिन यांनी स्पष्ट केलं.

त्या दोघांत झालेल्या संवादाचा गोषवारा असा :

पंतप्रधान शास्त्री : शांतता निर्माण व्हावी म्हणून तुम्ही करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल मी कृतज्ञ आहे. तुमच्या उदात्त हेतूंची आम्हांला जाणीव आहे. आम्ही देखील अत्यंत शांतताप्रिय आहोत. परंतु जेव्हा आमच्याविरुद्ध आक्रमण केलं जातं

तेव्हा स्वसंरक्षणार्थ आवश्यक ती कारवाई करणं भागच पडतं.

५ ऑगस्ट १९६५ पूर्वी आमच्या फौजा ज्या जागी होत्या तिथे त्या हलवाव्यात असं सुरक्षा समितीचं म्हणणं आहे. जीवित-वित्ताची हानी करण्याच्या दृष्टीनं पाकिस्ताननं काश्मीरमध्ये हजारो सशस्त्र घुसखोर पाठवले हे तुम्ही जाणताच. आमच्या सुरक्षा दलांनी त्यांपैकी अनेकांचा सामना केला तरी अजून अनेकांना पकडायचं आहे. त्यांना काढून घेण्याची जबाबदारी पाकनं स्वीकारायलाच हवी.

तसंच भारताविरुद्ध छुप्या सशस्त्र कारवाया करण्याची पाकची सवय आहे, असा इतिहासच आहे. या वेळी ५ ऑगस्ट १९६५ पासून पाकिस्ताननं भारताविरुद्ध छुपं आक्रमणच केलेलं आहे. हाजीपीर खिंड व इतर महत्त्वपूर्ण ठिकाणं ताब्यात घेण्यासाठी व घुसखोरी रोखण्यासाठी स्वसंरक्षणार्थ आम्हांला कारवाई करणं भाग पडलं. त्यासाठी आमच्या शूर सैनिकांना प्राणांची किंमत मोजावी लागली. आम्ही या महत्त्वपूर्ण ठिकाणांवरून आमच्या फौजा मागं घेतल्यावर पाकिस्तान पुन्हा छुपं आक्रमण करणार नाही याची काय हमी? तेव्हा या जागा मोकळ्या करण्याबाबत आमची खरीखुरी अडचण, पंतप्रधान, तुम्ही लक्षात घ्याल असा मला विश्वास वाटतो. अन्यत्र फौजा मागं घेण्यास आमची हरकत नाही.

पंतप्रधान कोसिजिन : आणखी घुसखोरी होऊ नये म्हणून हाजीपीर खिंडीतून, तसंच अन्य महत्त्वाच्या ठिकाणांवरून फौजा मागं घेण्याच्या संदर्भात भारताच्या अडचणींची मला पूर्ण कल्पना आहे. परंतु भारताच्या दृष्टीनं योग्य तो अंतिम निर्णय घेण्यापूर्वी या व्यापक प्रश्नाच्या काही पैलूंचा विचार करणं जरुरीचं आहे.

भारताचा मित्र व तुमच्याशी अत्यंत सलोख्याचे संबंध असलेल्या देशाचा प्रतिनिधी म्हणून मी तुमचं काही गोष्टींकडे लक्ष वेधू इच्छितो. सुरक्षा समितीच्या ठरावान्वये हाजीपीर खिंड व अन्य तत्सम ठिकाणं येथून १९४९ च्या युद्धबंदी रेषेच्या पलीकडे जर भारतानं फौजा हटवल्या नाहीत तर पुढील परिणाम होतील :

१) भारतानं या ठिकाणांहून फौजा हटवल्या नाहीत तर पाकिस्तानही छांब व अन्य भारतीय जागांवरील आपल्या फौजा मागं घेणार नाही. याचा अर्थ लाहोर व सियालकोट भागांतून भारत आपल्या फौजा हटवणार नाही. त्यामुळं इथे काही करार होणार नाही. तेव्हा त्यातून उद्भवणाऱ्या परिस्थितीस भारतात जाऊन तुम्हांला तोंड द्यावं लागेल.

आतासुद्धा 'युद्धबंदी'चं उल्लंघन करण्याचे अनेक प्रकार घडत आहेत. भारताच्या व पाकच्या फौजा समोरासमोर उभ्या असून त्यांच्यात अधूनमधून होणाऱ्या चकमकी चालूच राहतील. अशा धोकादायक स्थितीत पुन्हा संघर्षाचा भडका उडू शकतो हे कोणाही समंजस व्यक्तीला पटेल. ती केवळ तात्त्विक नव्हे, तर प्रत्यक्ष घडू शकणारी बाब आहे.

तेव्हा पुन्हा युद्ध सुरू होण्याच्या शक्यतेकडे दुर्लक्ष करावं इतकं हाजीपीर खिंडीचं महत्त्व भारताला वाटतं काय? याचा तुम्ही विचार करावा.

२) सुरक्षा समितीच्या ठरावाला डावलून हाजीपीर खिंड कब्जात ठेवण्याचा आग्रह भारतानं धरला तर शांततेला धोका उद्भवला अथवा पुन्हा संघर्षाला तोंड फुटलं तर त्याची जबाबदारी भारतावर पडेल.

अशा परिस्थितीत आपल्या ठरावांचं पालन व्हावं आणि शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून पुढं काय कृती करावी याचा विचार सुरक्षा समितीला करावा लागेल. या बाबीचं अत्यंत तातडीनं व पुन्हा पुन्हा मूल्यमापन केलं जाईल आणि त्यानुसार या क्षेत्रात सुरक्षा व शांतता नांदावी म्हणून कोणती पावलं उचलावीत याचा विचार केला जाईल, हे सुरक्षा समितीनं सूचित केलं आहेच. भारत-पाक संघर्षात शांतता व सुरक्षा प्रस्थापित व्हावी म्हणून युनोच्या सनदेच्या सातव्या प्रकरणातील ४१ व ४२ या कलमांनुसार कारवाई करण्याचा विचार सुरक्षा समिती करण्याची शक्यता आहे. या कलमांनुसार शांततेचा भंग करणाऱ्या राष्ट्रावर आर्थिक निर्बंध लादणं वा सशस्त्र बळाचा वापर करणं अशी कृती करता येते. तेव्हा अशी कृती ओढवून घेण्याइतकं हाजीपीर खिंड ताब्यात ठेवण्याचं महत्त्व भारताला वाटतं काय?

२० सप्टेंबर १९६५ रोजी सुरक्षा समितीनं मंजूर केलेल्या ठरावाला सोविएट युनियननं पाठिंबा दिलेला आहे. आणि सध्याच्या परिस्थितीत ५ ऑगस्ट ६५ पूर्वीच्या जागी म्हणजेच १९४९ मधील युद्धबंदी रेषेवर उभयतांनी फौजा मागं घेणं हा सर्वांत उचित मार्ग आहे, असं आमचं मत आहे. भारत व पाकिस्तान यांच्यात पुन्हा युद्धाला तोंड लागण्याच्या शक्यतेकडे आम्ही तटस्थपणं पाहू शकत नाही.

३) भारताचा सर्वांत मोठा शत्रू चीन आहे. भारत व पाक यांच्यातील अलीकडील युद्धाच्या वेळी चीन भारताला धमकावीत होता. भारत-पाक संघर्षात अन्य कोणत्याही राष्ट्रानं हस्तक्षेप करता कामा नये असं दडपण अन्य देशांनी एकजुटीनं आणल्यानं चीननं काही कारवाई केली नाही. परंतु उद्या जर भारतानं सुरक्षा समितीच्या ठरावाचं पालनं केलं नाही तर चीनवर असं काही दडपण राहण्याची शक्यता नाही. चीननं या संदर्भात काही हालचाल केली तर संघर्षाला व्यापक रूप येण्याचा संभव आहे.

४) भारत-पाक युद्धात तुमच्या समंजस नेतृत्त्वामुळं व भारतीय फौजांच्या अभूतपूर्व शौर्यामुळं भारताची प्रतिष्ठा उंचावली आहे. युनोच्या ठरावाचं पालन करून जर भारतानं १९४९ च्या युद्धबंदी रेषेवर फौजा हटवल्या व हाजीपीर खिंड सोडली तर त्याचा अर्थ कोणा परराष्ट्राच्या वा परराष्ट्रांच्या समूहाच्या दडपणाखाली तो वागत आहे असा घेतला जाणार नाही. युनोच्या सनदेनुसार शांततेसाठीच त्यानं हे पाऊल उचललं असं मानलं जाईल. परंतु आता हाजीपीर खिंडीचा ताबा भारतानं सोडला नाही व नंतर मात्र युनोच्या कृतीमुळं वा अन्य बाह्य कारणांमुळं भारताला तो ताबा सोडावा लागला तर किती मानहानी होईल याची कल्पना करा.

५) हाजीपीर खिंड कब्जात ठेवून घुसखोरीला किती प्रभावी प्रतिबंध करता येईल याचाही भारतानं विचार करावा. घुसखोरांना प्रवेश करण्यासाठी अन्यही

जागा आहेत. तसंच चीनच्या धोक्याविरुद्ध भारताला सज्ज राहायला हवं. तेव्हा त्या संदर्भात हाजीपीर खिंडीचं महत्त्व फार नाही, असं मला सुचवावंसं वाटतं.

६) आपली अंतर्गत ताकद– आर्थिक व औद्योगिक– बळकट करून तसंच संरक्षणक्षमता मजबूत करून भारत आपलं रक्षण करू शकेल असं भारताचा मित्र म्हणून आम्हांला वाटतं. त्यासाठी तर भारताला शांततेची जास्त गरज आहे. शांततेच्या वातावरणातच भारताला आपलं लष्कर व अर्थव्यवस्था यांचं आधुनिकीकरण करणं शक्य होईल.

७) १९४९ ची युद्धविराम रेषा पाळण्याचा दुसरा एक मोठा लाभ आहे. ही रेषा १५ वर्षांपूर्वी आखण्यात आली आहे. त्या रेषेवर परत गेल्यामुळं तिचं पावित्र्य व प्रतिष्ठा ही वाढतील. या रेषेचा भंग करणं म्हणजे सुरक्षा समितीनं मान्यता दिलेल्या बाबींचं उल्लंघन करणं ठरेल. तसंच 'ना युद्ध करारा'चा प्रस्ताव मांडून आणि एरवी देखील युद्धबंदी रेषेनुसार जम्मू-काश्मीरचा जो भाग पाकच्या ताब्यात आहे तो परत मिळवण्यासाठी आपण बळाचा वापर करणार नाही, असं भारतानं जाहीर केलं आहे. तसंच भविष्यात हा भाग पाक स्वखुशीनं व शांततेनं परत देईल, असं मानणं अवास्तव ठरेल. तेव्हा १९४९ च्या युद्धबंदी रेषेचं सन्मानानं पालन केलं तरच भारत व पाकिस्तान यांच्यात शांततापूर्ण करार होऊ शकेल. तेव्हा भारताच्या हिताच्या दृष्टीनं युद्धबंदी रेषेचं काटेकोर पालन करणं हे अत्यंत महत्त्वाचं आहे असं आमचं मत आहे. सुरक्षा समितीनंही या रेषेला पुन्हा पुष्टी दिली आहे. त्यामुळं तिचं उल्लंघन करता येणार नाही. १९४९ च्या युद्धबंदी रेषेला धक्का लावणं हे भारताच्या मुळीच हिताचं ठरणार नाही.

८) काश्मीरमध्ये ऑगस्ट १९६५मध्ये प्रवेश केलेल्या घुसखोरांचा प्रश्न भारतानं त्याला योग्य वाटेल त्या पद्धतीनं हाताळावा. कारण या घुसखोरांशी आपला काही संबंध नाही, असं पाकचं म्हणणं आहे.

९) पंतप्रधान महोदय, पाकिस्तान भविष्यात पुन्हा सशस्त्र घुसखोर धाडून छुपं आक्रमण करणार नाही याची काय हमी, असा प्रश्न तुम्ही केला आहे. पहिलं असं की, भविष्यात युद्धबंदी रेषेचा पूर्णतः आदर केला जाईल अशी तरतूद ताश्कंद करारात असलीच पाहिजे. याचाच अर्थ युद्धबंदी रेषेचा भंग करता येणार नाही. युनोचा सदस्य असलेल्या देशानं युनोनं मान्य केलेल्या युद्धबंदी रेषेचा भंग करणं याचा अर्थ युनोच्या सनदेचं उल्लंघन करणं असा होईल. त्यामुळं गंभीर कारवाईला त्या देशाला तोंड द्यावं लागेल. तसंच सोविएट युनियनमध्ये होणाऱ्या कराराला एक वेगळं सामर्थ्य असेलच.

परिस्थितीचे विविध पैलू तपशीलवार विशद करण्यात मी तुमचा फार वेळ घेतला, याबद्दल क्षमा असावी. तुम्हांला व भारतीय जनतेला वाटणाऱ्या काळजीची मला कल्पना आहे. मूलभूत प्रश्नाचा आम्ही तुमचे मित्र या नात्यानं तपशीलवार विचार केला असून निःपक्षपातीपणं आणि प्रामाणिकपणं आमच्या अभ्यासाचे

निष्कर्ष तुमच्यापुढं मांडले आहेत.

तेव्हा पंतप्रधान महोदय, आता तुमच्या महान देशाच्या हिताच्या दृष्टीनं काय निर्णय घ्यायचा हे सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे.

पंतप्रधान शास्त्री : परिस्थितीचं सखोल विश्लेषण केल्याबद्दल कोसिजिन महाशय, मी तुमचा अत्यंत आभारी आहे. तुमचा प्रत्येक शब्द मी अत्यंत लक्षपूर्वक ऐकला. तुमचं म्हणणं खूपच महत्त्वाचं आहे. भारताची शांततेवर निष्ठा आहे हे तुम्ही जाणताच. गेल्या वेळचं युद्ध आमच्यावर लादलं गेलं. आम्हांला आमच्या देशाचं रक्षण करायलाच हवं. आम्हांला भविष्यात शांतता हवी आहे, परंतु आम्ही आक्रमण सहन करणार नाही. आमचं स्वातंत्र्य व प्रादेशिक एकात्मता यांचं रक्षण करण्यास आमच्या फौजा व आमची जनता सदैव तयार राहील. शांतता हवी व तीही सन्मानानं हे आमचं मुख्य उद्दिष्ट आहे. तुमच्या मैत्रीपूर्ण भाषणाबद्दल मी पुन्हा एकदा आभार मानतो. आज रात्री मला या प्रश्नाचा विचार करण्याची इच्छा आहे. तुमचं विश्लेषण न्याय्य व निःपक्षपाती आहे हे मी जाणून आहे. तरीही हाजीपीर खिंड सोडणं हे मला अत्यंत क्लेशदायक ठरेल. मी व्यक्तिशः संमती दिल्यावरच आमच्या लष्करानं या महत्त्वाच्या ठिकाणावर कब्जा मिळवला. त्यासाठी आमचे जवान धारातीर्थी पतन पावले. परंतु घुसखोरांचा प्रवेश करण्याचा हा मार्ग बंद करण्यासाठी हा त्याग करणं आवश्यकच होतं.

पंतप्रधान कोसिजिन : तुमच्या भावनांची मला पूर्ण जाणीव आहे. हाजीपीर खिंड काबीज करण्यात भारतीय फौजांनी अतुलनीय शौर्य दाखवलं हे खरंच. अन्य भागांतही त्यांनी असंच शौर्य दाखवलं. परंतु पंतप्रधान महोदय, युद्ध संपल्यावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्व संबंधित घटक विचारात घेऊन मुत्सद्दी नेत्यांना निर्णय घ्यावे लागतात. युद्धाच्या वेळी शौर्यानं लढा देणं जेवढं महत्त्वाचं तेवढंच शांततेसाठी लढणंही महत्त्वाचं असतं. युद्धात त्याग करावा लागतो आणि देशाच्या व जनतेच्या हितासाठी शांतता प्रस्थापित करण्यासाठीही त्याग करावा लागतो. ती देशाच्या नेत्याची जबाबदारी असते.

पंतप्रधान शास्त्री : कोसिजिन महोदय, मी तुमचा अत्यंत आभारी आहे. यासंबंधी आज रात्री मी साकल्यानं विचार करणारच आहे. अशा गोष्टींचे निर्णय भावनेच्या पोटी नव्हे, तर वास्तवाच्या आधारावर घ्यावे लागतात, हे मला ठाऊक आहे. देशाचं सर्वोत्तम हित लक्षात घेऊन शहाणपणानंच असे निर्णय घ्यावे लागतात. शांततेची शक्यता विस्तारावी याची जबाबदारी घेणं हे माझं कर्तव्य आहे. तेव्हा या बाबींसंबंधी माझी अंतिम भूमिका मी उद्या मांडीन.

असं असलं तरी उभय देशांत चांगले संबंध निर्माण व्हावेत म्हणून पाकिस्ताननं 'ना युद्ध करारा' ला तयार झालं पाहिजे असं मला वाटतं. त्यामुळं यापुढं पाक बळाचा वापर करणार नाही व उभय देशांतील प्रश्न केवळ शांततेच्या मार्गानंच सोडवील याची हमी मिळेल. नाही तर अशी शांतता कायम तणावपूर्ण राहील

आणि परस्परांतील विश्वासाला काही आधार राहणार नाही.

पंतप्रधान कोसिजिन : पंतप्रधान महोदय, सुरक्षा समितीच्या ठरावाबद्दलच्या माझ्या विनंतीचा तुम्ही सर्वार्थानं विचार कराल अशी मला खात्री आहे.

'ना युद्ध करारा'बद्दल बोलायचं तर मला असं वाटतं की, आपल्यातील मतभेद हे बळाचा वापर करून नव्हे, तर शांततापूर्ण मार्गानं सोडवण्याचा निर्धार उभय देशांनी करणं अत्यावश्यक आहे. याबद्दलची कल्पना मी अध्यक्ष अयूबना देईन. आणि तुम्ही देखील उद्या अयूबखान यांच्याशी होणाऱ्या चर्चेच्या वेळी हा मुद्दा उपस्थित करालच.

माझं म्हणणं पुरं करण्याआधी मला काश्मीरच्या प्रश्नाचा उल्लेख करायला हवा. पंतप्रधान महोदय, या प्रश्नाबाबत तुमच्याशी सखोल, तपशीलवार चर्चा आणि वाटाघाटी करण्यास अध्यक्ष अयूब अत्यंत उत्सुक आहेत.

पंतप्रधान शास्त्री : कोसिजिन महाशय, जम्मू आणि काश्मीर हे राज्य भारताचा अविभाज्य भाग असून त्याबद्दल कसल्याही वाटाघाटी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, हे आपण जाणताच. भारताची याबद्दलची भूमिका सुस्पष्ट व खंबीर आहे.

पंतप्रधान कोसिजिन : तुमच्या भूमिकेची मला चांगली कल्पना आहे. उद्याच्या बैठकीच्या वेळी अध्यक्ष अयूब हा प्रश्न काढतीलच. त्यांची भूमिका तुम्हांला ते तपशीलवार सांगतील.

बराय पंतप्रधान महोदय, मी तुमचे पुन्हा एकदा आभार मानतो. आपल्यावर मोठी जबाबदारी आहे आणि आपल्यापुढं ऐतिहासिक संधी आहे. तेव्हा योग्य मार्ग शोधण्याचा प्रयत्न करूया. उद्याच्या आपल्या वाटाघाटींबद्दल मी आशादायी आहे.

त्या दिवशीच्या कामकाजाची सांगता अशा प्रकारे झाली. कोसिजिन यांच्याशी झालेल्या चर्चेत शास्त्रींना आश्चर्य वा चिंता वाटावी असं काहीच नव्हतं. मात्र हाजीपीर खिंडीचा ताबा सोडण्यास भारताची तयारी नाही, या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार शास्त्री यांनी केला. पण या प्रश्नावर कोसिजिन यांनी सखोल तयारी केली होती आणि त्यासंबंधी गंभीर आणि भरीव स्वरूपाची विधानं केली होती. त्याचा विचार भारताला करावा लागणार होता.

५ ऑगस्ट १९६५ पूर्वी ज्या जागी फौजा होत्या त्या जागी त्या हलवाव्यात या सुरक्षा समितीच्या ठरावाला भारताची स्वीकृती मिळवण्याकरिता कोसिजिन यांनी व्यक्तिशः प्रयत्न करण्याचा निर्धार केला होता. ही बाब भारत व पाकिस्तान यांच्यातील वाटाघाटींचा मुद्दा असता कामा नये असं त्यांनी ठरवलेलं होतं. किंबहुना दोन्ही देशांनी हा ठराव स्वीकारायलाच हवा होता आणि त्याबाबत कोसिजिन यांना जॉन्सन, विल्सन यांचा व अन्य महत्त्वाच्या पाश्चात्य नेत्यांचा पूर्ण पाठिंबा होता. या महत्त्वाच्या मुद्द्यावर जर एकमत झालं नसतं तर ताश्कंद परिषद अयशस्वी ठरली असती आणि त्यामुळं पुन्हा

युद्धाला तोंड लागण्याची शक्यता होती. तेव्हा याबद्दल कोणताही धोका पत्करायला कोसिजिन तयार नव्हते. हातचं काही राखून न ठेवता सोविएट युनियनची प्रतिष्ठा त्यांनी पणाला लावली होती. कोसिजिन यांनी ज्या रीतीनं शास्त्रींपुढं बाजू मांडली ती पाहता त्यांनी दबाव टाकण्याचा वा धाकदपटशाचा प्रयत्न केला असं म्हणता येणार नाही, असं माझं मत झालं.

दोघांच्या या चर्चेनंतर मी काही वेळ शास्त्रींच्या समवेत होतो. त्या वेळी त्यांच्यावर कसलाही मानसिक तणाव असल्याचं मला जाणवलं नाही. किंबहुना त्या दिवशीच्या एकूण कामकाजानंतर ते समाधानी असल्याचं दिसलं. अर्थात ऐतिहासिक पेचप्रसंगाला आपणाला सामोरं जायचं असून त्याबाबत कसलाही हलगर्जीपणा चालणार नाही, याचं पूर्ण भान त्यांना होतं.

शास्त्री स्वस्थचित्त होते. हाजीपीर खिंडीचा ताबा सोडला तर अनाठायी टीकेला तोंड द्यावं लागेल याची त्यांना कल्पना होती. त्यामुळं भावनिक प्रतिक्रियाही उमटण्याचा संभव होता. हे कृत्य विश्वासघात करणारं आहे अशी टीका केली जाण्याची शक्यता होती.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ५ जानेवारी रोजी शास्त्रींनी यशवंतराव चव्हाण यांच्याशी बराच वेळ चर्चा केली. हाजीपीर खिंडीच्या पायी शांततेचा बळी देणं योग्य होणार नाही, असं मत संरक्षणमंत्री चव्हाण यांनी व्यक्त केलं. युनोच्या सुरक्षा समितीची इच्छा लक्षात घेऊन आणि देशाच्या हिताच्या दृष्टीनं १९४९ च्या युद्धबंदी रेषेचं पालन करावं, असंही त्यांनी सांगितलं. शास्त्रींनी भारताच्या शिष्टमंडळातील अन्य सदस्यांशीही याबाबत चर्चा केली (सरदार स्वर्णसिंग सोडून, कारण त्यांना बरं नव्हतं.) त्यांनीही चव्हाण यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

परिषदेसाठी निश्चित कार्यक्रमपत्रिका हवी असा पाकचा आग्रह होता, हे सर्वांना ठाऊक होतंच. काश्मीरचा विशिष्ट उल्लेख न करता जर व्यापक भाषेत कार्यक्रमपत्रिका ठरवली तर त्याला शास्त्रींची हरकत नव्हती. त्या वेळी उपस्थित असलेल्या सर्वांनी त्याबद्दल सहमती दर्शवली. नंतर शास्त्रींनी परराष्ट्रमंत्र्यांशी चर्चा केली आणि त्यांनीही त्या अनुल्लेखाला आपली अनुकूलता दर्शविली.

सकाळी ११ वाजता 'न्यूट्रल व्हिला' इथं शास्त्री यांची अयूबखान यांच्याशी भेट ठरली होती. आदल्या दिवशी अयूब यांची ओझरती भेट होऊन थोडं बोलणं झालं होतं, पण पहिली आमनेसामने अशी गाठ आताच पडणार होती. या बैठकीला जाण्यासाठी शास्त्री तयार झाले.

दोघे नेते भेटताच आरंभीच्या शुभेच्छांच्या देवाण-घेवाणीनंतर अयूब यांनी बैठकीच्या कार्यक्रमपत्रिकेचा विषय काढला. त्याला आपली हरकत नाही, परंतु एखाद्या विशिष्ट समस्येचा उल्लेख न करता सर्वसाधारण उद्दिष्टं त्यात नमूद करावीत असं शास्त्रींनी सुचवलं. तेव्हा ही बाब आपापल्या देशाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी हाताळावी असं ठरलं. त्यानंतर अयूब यांनी भारत-पाक संबंधांचा मुद्दा काढला. काश्मीरच्या

समस्येमुळं या संबंधांत बाधा आली आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. आपापल्या देशाची अर्थव्यवस्था सुधारून जनकल्याणकारी कार्यक्रमाला प्राधान्य देणं हे महत्त्वाचं आहे. काश्मीरच्या जनतेला युनोच्या संबंधित ठरावानुसार भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घेऊ द्यावा. मग उभय देशांना मैत्रीचे संबंध विकसित करणं शक्य होईल, असं एकंदर मत अयूबखान यांनी व्यक्त केलं. काश्मीर प्रश्नाबाबत 'संयुक्त स्वायत्त यंत्रणा' निर्माण करावी असंही त्यांनी सुचवलं.

शास्त्रींनी काहीही व्यत्यय न आणता त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं. उभय देशांतील जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीनं मैत्रीचे संबंध राखणं महत्त्वाचं आहे हे शास्त्रींनीही मान्य केलं. जम्मू-काश्मीरच्या बाबतीत मात्र काही बाबी अपरिहार्य व सुस्पष्ट असून त्यांचं आरंभीपासूनच भान बाळगायला हवं असं त्यांनी सांगितलं. स्वातंत्र्यापूर्वी त्या वेळच्या राजकीय नेत्यांच्या संमतीनं एक कायदेशीर चौकट आखण्यात आली होती. त्यात भारताच्या वतीनं नेहरू व त्यांचे सहकारी व पाकच्या वतीने जिना व त्यांचे सहकारी यांचा अंतर्भाव होता. याच कायदेशीर चौकटीच्या अंतर्गत जम्मू व काश्मीर राज्याचं २७ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात सामिलीकरण करण्यात आलं. हे बिनशर्त व अंतिम सामिलीकरण होतं. 'इन्स्टुमेन्ट ऑफ अॅक्सेशन'नं ते सिद्ध झालं असून माउंटबॅटन यांनी ते स्वीकारलं होतं. किंबहुना तात्पुरत्या वा हंगामी सामिलीकरणाची कायद्यात तरतूदच नाही.

या सामिलीकरणाचा एक महत्त्वाचा पैलू लक्षात घ्यायला हवा. जम्मू आणि काश्मीर राज्याचा कोणताही भाग अलग करण्याचा अधिकार भारताच्या पंतप्रधानांना नाही. केवळ निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या संसदेला तो अधिकार आहे. कोणत्याही सार्वभौम राष्ट्राचा प्रादेशिक भाग अलग करण्याचा अधिकार युनोला त्याच्या सनदेमध्ये दिलेला नाही. किंबहुना आपल्या सदस्य राष्ट्रांचं सार्वभौमत्व व प्रादेशिक एकात्मता जपणं हे युनोचं आद्य कर्तव्य आहे.

भारताचा पंतप्रधान– मग तो कोणीही असो– जम्मू-काश्मीरच्या बाबत स्वायत्त यंत्रणा निर्माण करण्याच्या सूचनेचा विचारच काय, त्याकडे तो लक्षही देऊ शकत नाही. मग क्षणभर थांबून शास्त्रींनी विचारलं, "अध्यक्ष महोदय, तुम्ही जर माझ्या जागी असता तर अशीच भूमिका घेतली असती नाही का? देशाचं आणखी एक विभाजन करणारी सूचना भारतीय संसद मान्य करील असं मानणं पूर्णतः अवास्तवच ठरेल."

'स्वयंनिर्णया'च्या हक्काबद्दल बोलताना शास्त्रींनी सांगितलं की, खुद्द शेख अब्दुल्ला यांनीच जम्मू-काश्मीरचं भारतात तातडीनं सामिलीकरण करावं अशी भारताला विनंती केली होती. त्या वेळी अब्दुल्ला यांच्या मताला कायदेशीर स्थान नव्हतं, तरी त्यांचा आवाज हा जम्मू व काश्मीर यांच्या जनतेचा आवाज होता. जम्मू-काश्मीरमधील जनतेचं मत संघटितपणं अजमावावं म्हणून १९४८ साली भारतानं तयारी दर्शविली होती आणि युनोनंही सार्वमताची तयारी केली होती हे खरं आहे. परंतु त्या योजनेखाली पहिलं पाऊल पाकनं उचलायचं होतं. ते असं की, काश्मीरमध्ये बेकायदा घुसलेल्या

आपल्या फौजा प्रथम काढून घ्यायच्या होत्या. परंतु हे अत्यावश्यक पाऊल पाकनं उचललं नाही. अशा तऱ्हेनं ती योजना पाकनंच उधळून लावली आणि आता तर ही योजना मृत, अस्तंगत झाली आहे. त्यातून संबंधित देशाच्या संमतीनंच युनोला मध्यस्थी करणं शक्य आहे. परंतु वर दिलेल्या कारणांमुळं याबाबत युनोनं मध्यस्थी करण्यास भारताची मान्यता मिळणार नाही.

त्यानंतर मूलभूत समस्या काय आहे हे शास्त्रींनी विशद केलं. आपली मतं अधिक परखड व स्पष्ट वाटण्याचा संभव आहे, परंतु परिस्थितीच अशी आहे की, त्याला आपला नाइलाज आहे, असंही त्यांनी सांगितलं.

काश्मीरला स्वयंनिर्णयाचा हक्क द्यावा असा पाकिस्तान आग्रह धरीत आहे तो काही मानवी हक्कांवरील निष्ठेमुळं नव्हे. जातीयवादी प्रचार करून जम्मू व काश्मीर येथील मुस्लीम जनतेपुढं तुम्हांला 'मुस्लीम' पाकिस्तान की 'हिंदू' भारत हवा,' असा 'चॉइस' ठेवता येईल असा पाकचा मानस आहे. भारतात केवळ हिंदूच नव्हेत, तर लक्षावधी मुस्लिम, शीख, ख्रिश्चन आहेत ही बाब सोयिस्करपणं विसरली जाते, हेही शास्त्रींनी स्पष्टपणं सांगितलं.

स्वतःच्या 'मुस्लीम राष्ट्रा'च्या तत्त्वान्वये पाकनं इस्लामी राष्ट्र तयार केलं. भारतानं द्विराष्ट्रवादाचं तत्त्व केव्हाच नाकारलं आहे. तेव्हा या तत्त्वानुसार काश्मीरला अलग करण्याचा कोणताही प्रयत्न भारताच्या ध्येयधोरणाला मूठमाती देणारा ठरेल.

शास्त्री बराच वेळ बोलले. अत्यंत प्रामाणिकपणं व अगदी मनापासून ते बोलत होते. भारताबरोबरचे आपले संबंध हे 'द्विराष्ट्रा'च्या किंवा 'दोन शत्रू राष्ट्रां'च्या तत्त्वावर आधारित ठेवण्याचा जोवर पाक प्रयत्न करीत राहील तोवर शांतता निर्माण होणं वा शेजाऱ्यांत सलोख्याचे संबंध प्रस्थापित होणं शक्य नाही, असंही शास्त्रींनी स्पष्ट केलं. खोलवर रुजलेला हा विद्वेष असून त्यामुळंच भारत व पाक यांच्यातील संबंधांवर परिणाम झाला आहे. पाकिस्तानच त्यावर इलाज शोधून काढू शकतो. उभय राष्ट्रांतील अन्य प्रश्न म्हणजे या मूलभूत रोगाची लक्षणं आहेत. पाकिस्तानबरोबर 'ना युद्ध करार' करण्याची भारताची इच्छा आहे असंही शास्त्री यांनी सांगितलं. आपल्या वक्तव्यावर अयूबखान यांनी निःपक्षपातीपणं प्रतिक्रिया व्यक्त करावी अशी विनंती त्यांनी केली. आपलं भाषण लांबलं याबद्दल त्यांनी दिलगिरीही प्रकट केली. परंतु उभय राष्ट्रांत परस्परसौहार्दाचा नवा मार्ग शोधण्याची आपली प्रामाणिक इच्छा असल्यानं एवढं बोलावं लागलं असा खुलासा त्यांनी केला.

अयूबखान यांनी शास्त्रींचं म्हणणं शांतपणं ऐकून घेतलं खरं, परंतु त्यांची प्रतिक्रिया मात्र अत्यंत निराशाजनक होती. "मला पण शांतता हवी आहे, पण ती सन्माननीय अटींवरच" असं ते म्हणाले. काश्मीर प्रश्न बाजूला ठेवता येईल असं मानणं अवास्तव आहे; परस्परांना मान्य होईल असा तोडगा शोधावा लागेल व म्हणूनच स्वायत्त यंत्रणेचा प्रस्ताव आपण मांडला आहे, असं ते म्हणाले. काश्मीर प्रश्न सोडवल्यावरच 'ना युद्ध करार' करणं शक्य होईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

आपल्या या सूचनेवर आणखी विचार करण्याची विनंती त्यांनी शास्त्रींना केली. त्यांची भेट संपली तेव्हा दोघांच्याही चेहऱ्यावर चिंतेच्या छटा होत्या. उभय नेत्यांच्या मनाचे सूर जुळण्याची चिन्हं कुठेच दिसत नव्हती.

त्या दिवशी दुपारी (५ जानेवारी) भारत व पाकिस्तान यांचे परराष्ट्रमंत्री व ज्येष्ठ अधिकारी यांची परिषदेची कामकाजपत्रिका ठरविण्यासाठी बैठक झाली. बऱ्याच सूचनांवर विचार झाला, परंतु उभयतांना त्यांपैकी एकही मान्य झाली नाही. कामकाजपत्रिकेत काश्मीरचा वेगळा स्पष्ट उल्लेख करावा असा पाकचा आग्रह होता. या संदर्भात लंडनच्या 'गार्डियन'मध्ये (९ जाने.) प्रसिद्ध झालेल्या बातमीत त्यांच्या विशेष प्रतिनिधीनं लिहिलं होतं :

*''लष्करी बळाचा वापर करून काश्मीर ताब्यात घेण्यात अपयश आलं होतं. ताश्कंदमध्ये काही ते हस्तगत करता येणार नाही याचीही त्यांना जाणीव होती. तेव्हा निदान भारताशी या विषयावर चर्चा सुरू करणं त्यांच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं. या प्रयत्नात यश आलं तर जो प्रश्न मिटला आहे तो पुन्हा खुला करण्यास आपण भारताला भाग पाडलं अशी शेखी आपल्या जनतेपुढं ते मारू शकले असते... अखेर कार्यक्रमपत्रिकेविषयी एकमत होऊ शकलं नाही. शिखर परिषदेसाठी विशिष्ट कार्यक्रमपत्रिकेची गरज नाही, असं भारताचं मत होतं.''*

शास्त्री व कोसिजिन यांच्यादरम्यान ५ जानेवारी रोजी सायंकाळी प्रदीर्घ चर्चा झाली. १९४९ च्या युद्धबंदी रेषेवर फौजा हटवल्या जाण्याचा मुद्दा कोसिजिन यांच्या मनात प्रामुख्यानं होता. त्यांच्या चेहऱ्यावर तणावाची छाया होती. चर्चेच्या आरंभीच शास्त्रींनी या मुद्द्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, ''याबाबत मी माझ्या मंत्रिमंडळ सहकाऱ्यांशी चर्चा केली आहे. ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीच्या जागी म्हणजे प्रत्यक्षात १९४९ च्या युद्धबंदी रेषेवर उभय राष्ट्रांनी आपल्या फौजा हटवाव्यात हे तुमचं मत स्वीकारायला मी तयार आहे.'' शास्त्रींचे हे उद्गार ऐकताच कोसिजिन यांच्या चेहऱ्यावरील भाव बदलले. त्यांना झालेला आनंद स्पष्ट दिसत होता. जणू त्यांच्या शिरावरील चिंतेचं मोठं ओझंच दूर झालं होतं. स्मित करीत ते म्हणाले, ''पंतप्रधान महोदय, या धाडसी व समंजस निर्णयामुळं शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनं व ताश्कंद परिषद यशस्वी होण्याच्या दृष्टीनं तुम्ही मोठी निर्णायक कामगिरी बजावली आहे!''

त्यानंतर अयूब यांच्याशी झालेल्या चर्चेची तपशीलवार माहिती शास्त्रींनी कोसिजिनना दिली. आम्ही परस्परांचं म्हणणं शांतपणं ऐकून घेतलं, पण एकमत काही झालं नाही. 'ना युद्ध करार' करायला अयूब यांनी नकार दिला असून कार्यक्रम पत्रिकेबद्दलही एकमत झालेलं नाही याची कल्पना शास्त्रींनी कोसिजिनना दिली.

आदल्या दिवशी ताश्कंद परिषदेचं अधिकृत उद्घाटन झाल्यावर कोसिजिन अयूबखान यांना भेटले नव्हते. अयूब व शास्त्री यांच्यात झालेल्या चर्चेचा तपशील ते प्रथमच ऐकत होते. त्यांचा चेहरा पुन्हा काहीसा चिंताक्रांत झाला. परंतु शास्त्री वा अयूब

यांपैकी कोणाशी ते सहमत आहेत किंवा दोघांशीही सहमत नाहीत याबद्दल त्यांनी काही थांगपत्ता लागू दिला नाही. उद्या सकाळी मी अयूबना भेटेन व आमच्यातील चर्चेची माहिती देईन एवढंच ते म्हणाले.

हाजीपीर खिंडीतील व अन्य भागांतील फौजा ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी होत्या त्या जागी नेण्याबद्दल शास्त्री व कोसिजिन यांच्यात एकमत झाल्याचं बातमीदारांना सांगण्यात आलं नव्हतं. मात्र त्या वेळी 'युनायटेड न्यूज ऑफ इंडिया'चे (यू. एन. आय. चे) प्रतिनिधी असलेले कुलदीप नय्यर यांना यशवंतराव चव्हाण यांच्याशी केलेल्या संभाषणाच्या वेळी याचा सुगावा लागला. त्या आधारावर ५ जानेवारी रोजी आपण पुढील वृत्त पाठवलं, असं नय्यर यांनी मला सांगितलं :

*ताश्कंद, ५ जाने. (यू. एन. आय.) : पाकिस्ताननं काश्मीरमधील घुसखोरीबाबत निश्चित आश्वासन दिलं तर केवळ हाजीपीर खिंड व टिथवाल भागातून आपल्या फौजा हटवण्यास भारत तयार आहे, असं पंतप्रधान शास्त्री यांनी पंतप्रधान कोसिजिन यांना सांगितल्याचं समजतं.*

*पाकिस्ताननं जर छांब-जौरियन, राजस्थान व खेमकरण येथील आपल्या फौजा काढून घेतल्या तर आपणही लाहोर, सियालकोट व राजस्थान येथील आपल्या फौजा मागं घेऊ असंही त्यांनी सोविएट पंतप्रधानांना सांगितल्याचं समजतं.*

*काल रात्री सोविएट पंतप्रधानांशी शास्त्री यांनी दोन तास चर्चा केली, त्या वेळी शास्त्री यांनी वरील मत व्यक्त केल्याचं कळतं. २० सप्टेंबरच्या सुरक्षा समितीच्या ठरावानुसार हाजीपीर व टिथवाल येथून फौजा माघारी घ्याव्यात या मुद्द्यावर सोविएट पंतप्रधानांनी या चर्चेच्या वेळी भर दिला.*

*काश्मीरमधील घुसखोरांसह सशस्त्र जवान हटवण्याशी हे कलम जोडलेलं आहे हे या बैठकीत कोसिजिन यांनी मान्य केल्याचंही समजतं.*

*काश्मीरमधील घुसखोरांचा समाचार पाकच्या ऐवजी भारतानंच घ्यावा असं कोसिजिन यांचं मत आहे. या घुसखोरांची जबाबदारी पाक स्वीकारायला तयार नाही, तेव्हा घुसखोरांना खतम करणं किंवा त्यांच्यावर अन्य कारवाई करणं हे काम भारताचं आहे असं मत कोसिजिन यांनी व्यक्त केल्याचं समजतं.*

*भारत व पाक यांच्यातील वाटाघाटींत अडथळा आला तर आपण मध्यस्थी करायला तयार आहोत, असं कोसिजिन यांनी पुन्हा एकवार सांगितलं. परंतु त्याची तूर्तास गरज नाही असं शास्त्रींनी स्पष्ट केलं. अयूब खान यांच्याशी झालेल्या चर्चेचा गोषवाराही त्यांनी कोसिजिन यांच्या कानी घातला.*

*भारत व पाक यांच्यातील बोलणी अयशस्वी होता कामा नयेत, कारण उभय राष्ट्रांत सोविएट युनियनला स्वारस्य आहे, असंही कोसिजिन यांनी सांगितल्याचं कळतं.''*

कुलदीप नय्यर यांचं हे वृत्त हा शास्त्री-कोसिजिन चर्चेचा चांगला व अचूक

गोषवारा होता. पण फौजा मागं घेण्याबाबत कोसिजिन यांनी जी कारणमीमांसा मांडली त्याचा तपशील त्यात नव्हता! यशवंतराव चव्हाण यांनी शास्त्री-कोसिजिन यांच्यातील चर्चेची केवळ मूलतत्त्वं नय्यरना सांगितली होती. फौजा माघारी घेण्याच्या नाजुक प्रश्नावर झालेल्या एकमताचं वृत्त भारतीय वाचकांना वाचायला मिळालं, परंतु हे एकमत कसं झालं याचा तपशील मात्र त्यांना कळला नाही.

६ जानेवारी रोजी शास्त्री व अयूब यांची भेट झाली नाही. खरं तर दोघांनी त्या दिवशी भेटावं असं ठरलं होतं, पण ही भेट रद्द झाली. तरी तो दिवस चर्चा, वाटाघाटी यांनी भरलेला होता व त्याच्या केंद्रस्थानी कोसिजिन होते. अयूब आणि शास्त्री यांच्या निवासस्थानी त्यांची सतत ये-जा चालू होती.

सकाळी कोसिजिन व रशियाचे परराष्ट्रमंत्री ग्रोमिको यांची अयूब व भुत्तो यांच्यासमवेत सुमारे तीन तास चर्चा झाली. या चर्चेबद्दल मी राजदूत झामियातिन यांना विचारलं, तेव्हा ते म्हणाले,

*"आरंभीच्या चर्चेच्या फेरीमुळं कोसिजिन निराश झाले होते खरे, परंतु शेवटी त्यांना अयूब हे शालीन व सभ्य असल्याचं आढळलं. मात्र अयूब त्यांचं बोलणं सर्वसाधारण स्वरूपाचं होतं. तपशीलवार बोलण्याची जबाबदारी त्यांनी भुत्तोंवर टाकली होती. त्याच वेळी पाकिस्तानच्या बाजूनं दोन भिन्न भिन्न मतं कानांवर पडू लागली. त्यामुळं पाकिस्तानशी वाटाघाटी करणं गुंतागुंतीचं व कठीण होऊन बसलं. भुत्तो हे आडमुठेपणानं वागत आहेत, असं ग्रोमिकोंचं मत पडलं. किंबहुना भुत्तो हे सर्व कल्पनांची वाट लावीत होते. कधी कधी ते एखादी सूचना स्वीकारीत, परंतु नंतर फोन करून त्यात बदल सुचवीत. त्यांना इंग्रजी भाषेचं चांगलं ज्ञान होतं. ते पूर्वी मान्य झालेल्या मजकुरात एखादा स्वल्पविराम टाकावा असं काही तरी अगदी निष्पापपणं सुचवल्याचं दाखवीत, परंतु त्यामुळं त्या वाक्प्रचाराचा वा वाक्याचा अर्थच बदलून जाई! भुत्तोंशी वागताना फारच सावधगिरी बाळगावी लागे. शास्त्रींची गोष्ट अगदी वेगळी. कोणताही प्रस्ताव ते खोलवर विचार करूनच मान्य करीत आणि एकदा त्यांना एखादी गोष्ट पटली की त्यावर ते ठाम असत. ते नेहमीच स्पष्ट काय ते सांगत. त्यामुळं कोसिजिन यांना शास्त्रींबद्दल आदर वाटे."*

भुत्तो अगदी आडमुठेपणानं वागत असले तरी ग्रोमिको काही कमी नव्हते. कडकपणा व मूळ मुद्दा न सोडण्याबाबत ते भुत्तोंइतकेच खंबीर होते. छांब भागातून आपल्या फौजा काढून घेण्यास अयूब आरंभी तयारच नव्हते. पण सुरक्षा समितीच्या ठरावाचं पालन केलं नाही तर काय परिणाम होऊ शकतील हे कोसिजिन यांनी वारंवार सांगितल्यावर मात्र त्यांनी आपला हट्ट सोडला. तसं त्यांनी केलं नसतं तर त्यांच्याविरुद्ध प्रतिक्रिया उमटल्या असत्या. त्याला तोंड देणं त्यांना शक्य झालं असतं का, हा मोठाच प्रश्न होता. छांबच्या बाबत अयूब यांनी आरंभी घेतलेली भूमिका वाटाघाटींत हेतुपुरस्सर सरकवलेलं एक प्यादं होतं याबद्दल माझ्या मनात शंका नाही. आपण जर

छांबचा ताबा सोडला नाही तर शास्त्री देखील लाहोर व सियालकोट यांच्या परिसरातील आपल्या फौजा हटवणार नाहीत, हे अयूबना पक्कं ठाऊक होतं. पाकिस्तान सतत काश्मीरचा प्रश्न लावून धरीत होता व चर्चेचा बराच वेळ त्यावरच खर्च होत होता.

सकाळी अयूब यांच्याशी प्रदीर्घ वाटाघाटी केल्यावर कोसिजिन यांनी दुपारी शास्त्रींशी सुमारे तीन तास चर्चा केली. काश्मीरच्या बाबतीत अयूब हट्टच धरून बसले असून भारत-पाक संबंधांतील हाच मूलभूत प्रश्न आहे आणि त्यासाठी 'स्वायत्त यंत्रणा' निर्माण करणं अत्यावश्यक आहे असं त्यांचं म्हणणं आहे, असं कोसिजिन यांनी शास्त्रींना सांगितलं. जोवर काश्मीरचा प्रश्न सोडवला जात नाही तोवर ' ना युद्ध करारा'चा विचार करता येणार नाही, असंही अयूबनी कोसिजिन यांना स्पष्टपणं सांगितलं होतं. त्यामुळं परिस्थिती कठीण बनली असून त्यातून कसा मार्ग काढावा हे आपण सुचवू शकाल काय, अशी विचारणा कोसिजिन यांनी शास्त्रींकडे केली.

'ना युद्ध करार' म्हणजे खरं तर युनोच्या सदस्य राष्ट्रांवर आपापसातील वाद शांततेच्या मार्गानं सोडवण्याचं जे बंधन आहे त्याचा पुनरुच्चारच आहे, असं सांगून शास्त्री म्हणाले, "पाकिस्तानला जर शांततेचा मार्ग खरंच अनुसरायचा असेल तर मग त्यांना असा करार करायला काय हरकत आहे?" काश्मीरबाबत शास्त्री आपल्या भूमिकेला ठाम चिकटून होते. बळाचा वापर न करता सर्व तंटे शांततेच्या मार्गानं सोडवावेत या युनोच्या सनदेमधील बंधनावर उभय राष्ट्रांनी पुन्हा निष्ठा व्यक्त केली तर त्यानं तुमचं सामाधान होईल काय, असं 'ना युद्ध करारा'च्या मुद्द्याबद्दल बोलताना कोसिजिन यांनी शास्त्रींना विचारलं. घटकाभर विचार करून शास्त्रींनी त्याला होकार दिला. त्यामुळं अयूब यांच्याशी पुढं बोलणी करण्यास कोसिजिन यांना मुद्दा मिळाला, शास्त्रींचा निरोप घेऊन ते बाहेर पडले. त्या दिवशी सायंकाळी अयूब खान यांच्याशी चर्चा करताना ते काय भूमिका घेणार हे त्यांनी सूचित केलं नाही, तरी अडचणींवर मात करता येणार नाही असं काही त्यांच्या वर्तनावरून वाटत नव्हतं.

कोसिजिन बाहेर पडताच शास्त्रींनी तत्काळ आपल्या शिष्टमंडळाची बैठक घेऊन कोसिजिन यांच्याशी झालेल्या चर्चेची माहिती दिली. ताश्कंद परिषदेची फलश्रुती करार होण्यात झाली नाही तरी चालेल, पण काश्मीरबद्दलची भूमिका आपण सोडणार नाही असं शास्त्रींनी सूचित केलं. पाकच्या काश्मीरविषयीच्या मागणीमुळं जर ही परिषद अयशस्वी ठरली तरी त्याबद्दल युनो, सोविएट युनियन वा अन्य कोणीही भारताला बोल लावणार नाही, असंही ते म्हणाले.

सायंकाळी कोसिजिन व अयूब यांच्यात दोन तास चर्चा झाली. परंतु काश्मीरच्या प्रश्नावर अयूब यांच्या भूमिकेत बदल झाला की नाही हे मात्र समजू शकलं नाही.

४८ तासांनंतर ७ जानेवारी रोजी शास्त्री व अयूब यांच्यात पुन्हा थेट बोलणी सुरू झाली. एक बैठक सकाळी ५० मिनिटं झाली, तर दुसरी बैठक सायंकाळी ३५ मिनिटं झाली. या चर्चेच्या वेळी कोणीही मदतनीस हजर नव्हते. त्यानंतर उझ्बेकी कलाकारांच्या नृत्याचा कार्यक्रम होता. दुपारी शास्त्रींनी यजमान कोसिजिन, ग्रोमिको व संरक्षणमंत्री

मॅलिनोवस्की यांना खाना दिला.

अयूबखान यांच्याशी झालेल्या चर्चेची माहिती नंतर शास्त्रींनी मला दिली. काश्मीर व 'ना युद्ध करार' या दोन प्रश्नांखेरीज अन्य बाबींवरही उभय नेत्यांत चर्चा झाली. त्यांपैकी उभयतांना मान्य होणाऱ्या गोष्टींचा करारात समावेश करावा असं ठरलं. या बाबींपैकी कशावरही या दोघांचे फारसे मतभेद नव्हते. काश्मीर आणि 'ना युद्ध करार' यावर मग दोघांत चर्चा सुरू झाली. पुन्हा पूर्वीच्या भूमिकांची उजळणी झाली व ते एकमेकांना आपला दृष्टिकोन पटवून देण्याचा प्रयत्न करू लागले. ही चर्चा सौजन्यपूर्ण वातावरणात होती. दोघेही अस्खलित उर्दूत बोलत होते, आणि आपापली भूमिका सोडायला तयार नव्हते. चर्चेच्या शेवटी पुढील संवाद घडला :

**अध्यक्ष अयूब :** *काश्मीर के मामले में कुछ ऐसा कर दीजिये कि मैं भी अपने मुल्क में मुँह दिखाने के काबिल रहूँ।*

**पंतप्रधान शास्त्री :** *सदर साहब, मैं बहुत माफी चाहता हूँ कि, मैं इस मामले में आपकी कोई खिदमत नहीं कर सकता।*

उभयतांतील चर्चेच्या या अनौपचारिक गोषवाऱ्यावरून दोघा नेत्यांच्या भूमिका अजिबात वेगळ्या होत्या व वाटाघाटींत कोंडी निर्माण झाली होती हे स्पष्ट होतं. काहीशा गंभीर मनोवस्थेतच अयूब व शास्त्री यांनी एकमेकांचा निरोप घेतला. मात्र दोघांतील सौजन्याची भावना टिकून होती. यातून पुढं काय घडणार याची दोघांनाही कल्पना नव्हती.

दरम्यान त्याच दिवशी (७ जाने.) दुपारी झा व कौल यांची ग्रोमिको व अन्य सोविएट नेत्यांबरोबर चर्चा झाली. औपचारिक कार्यक्रम पत्रिकेचा विषय बाजूला ठेवावा असं या बैठकीत ठरलं. उभय देशांच्या नेत्यांच्या शिखर बैठकीत झालेली चर्चा उत्साहजनक नसली तरी संयुक्त करार वा पत्रक यांच्या मसुद्याचा विचार त्यात करण्यात आला. चर्चेसाठी नवा आधार उपलब्ध व्हावा म्हणून मसुदा तयार करायचा हा प्रयत्न होता. याआधीचे मसुदे जरी पाकने नाकारले असले तरी सोविएट शिष्टमंडळाशी आणि विशेषतः ग्रोमिकोंशी चर्चा करून नवा मसुदा तयार करण्याचा भारताचा उत्साह कमी झाला नव्हता.

रात्री दहा वाजता शास्त्री व भारतीय शिष्टमंडळाचे अन्य सदस्य नृत्याच्या एका कार्यक्रमाला हजर राहिले. शास्त्री जेव्हा त्यांच्या निवासस्थानी परतले तेव्हा झा यांनी तयार केलेला कराराचा मसुदा त्यांना देण्यात आला. शास्त्रींनी तो वाचला व त्यातील आरंभीच्या परिच्छेदाकडे माझं लक्ष वेधून तो मला नजरेखालून घालण्यास सांगितलं. त्या परिच्छेदात भारत व पाकिस्तान यांच्यातील राजकीय पातळीवरील संबंधांचा उल्लेख होता. आम्ही त्या साऱ्या मसुद्याचीच चर्चा केली.

भारतीय व पाकिस्तानी फौजा एकमेकांसमोर उभ्या ठाकल्या असताना व त्यांच्यात अधूनमधून चकमकी झडत असताना या मसुद्याच्या सुरुवातीच्या 'राजकीय' परिच्छेदातील

मजकूर जादाच प्रशंसाकारक झाला आहे; त्यात कठोर वास्तवाचं भान राहिलेलं नाही असं शास्त्रींचं मत होतं. त्यांनी काही परिच्छेद व ओळी वेगळ्या तऱ्हेनं पुन्हा लिहाव्यात असं सुचवलं. त्यात पुढील विषय होतेः

१) भारत व पाकिस्तान यांच्यात पूर्ववत सुरळीत संबंध प्रस्थापित करणं,

२) बळाचा वापर न करता शांततेच्या मार्गानं वाद मिटवावे या युनोच्या सनदेतील अटींवरील निष्ठा निःसंदिग्ध शब्दांत पुन्हा व्यक्त करणं, आणि

३) जम्मू-काश्मीरचा काश्मीर असा संक्षिप्त उल्लेख करून त्याबाबत भारत व पाकिस्तान यांच्या भूमिका पुन्हा विशद करणं.

तोवर मध्यरात्र उलटून गेली होती. तुम्ही आता विश्रांती घ्या आणि मसुदा पुन्हा लिहिण्याचं काम सकाळी करा असं मी शास्त्रींना सुचवलं. पंतप्रधान झोपायला गेले, मी आणखी काही वेळ काम करीत राहिलो. मी नव्यानं तयार केलेले काही परिच्छेद व कलमं ही पंतप्रधानांच्या बैठकीच्या खोलीत ठेवली. शास्त्री सकाळी उठताच त्यांना हा मजकूर द्यावा अशा सूचना मी सहकाऱ्यांना दिल्या.

मी अगदी सकाळीच पंतप्रधानांच्या निवासस्थानी पोचलो तेव्हा त्यांनी माझा मसुदा वाचून त्यात दुरुस्त्याही करून ठेवल्या होत्या. आम्ही थोडा वेळ परत चर्चा केली. भारतीय शिष्टमंडळाची बैठक त्या दिवशी सकाळी १० वाजता होणार होती. त्यापुढं मांडण्यासाठी सुधारित मसुदा टाइप करायला देण्यात आला.

भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध पूर्ववत सुरळीत व्हावेत म्हणून सुधारित मसुद्यात म्हटलं होतं :

*"उभय देशांतील संबंध सुरळीत व मैत्रीपूर्ण करण्याचा व उभय देशांतील जनतेत सामंजस्याचे व स्नेहाचे संबंध निर्माण करण्याचा ठाम निर्धार ताश्कंद इथे चर्चा केल्यावर भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष व्यक्त करीत आहेत. भारत व पाकिस्तान यांच्यातील ६० कोटी जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीनं हे उद्दिष्ट गाठणं त्यांना अत्यंत महत्त्वाचं वाटतं".*

वाद मिटवण्यासाठी बळाचा वापर न करण्याबाबत त्यात म्हटलं होतं :

*"युनोच्या सनदेनुसार भारत व पाकिस्तान यांच्यात शेजारी राष्ट्रांचे सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून सर्वतोपरीनं प्रयत्न करावेत याबाबत भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांच्यात एकमत आहे."*

जम्मू-काश्मीरच्या बाबतील पुढील सावधगिरीची शब्दयोजना केली होती :

*"उभय देशांत तणाव चालू ठेवणं हे भारत व पाकिस्तान यांच्यातील जनतेच्या हिताच्या दृष्टीनं तसंच आपापल्या भागात व विशेषतः भारत-पाक उपखंडात शांतता टिकवण्याच्या दृष्टीनं योग्य नव्हे, असे विचार त्यांनी व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर*

*जम्मू-काश्मीरबाबत चर्चा झाली आणि त्यांनी आपापली बाजू मांडली."*

त्यानंतर फौजा काढून घेण्याचं कलम पुढं आलं. ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी उभय राष्ट्रांच्या फौजा जिथे होत्या तिथे त्या हलविल्या जातील, तसंच युद्धबंदी रेषा पाळली जाईल, असा उल्लेख त्यात होता.

उभय देशांच्या अंतर्गत बाबींत ढवळाढवळ न करणं, शत्रुत्वानं भरलेला प्रचार करण्यास प्रोत्साहन न देणं, उभय देशांनी आपले उच्चायुक्त पुन्हा आपापल्या पदांवर पाठविणं, आर्थिक व व्यापारी संबंध पूर्ववत व्हावेत म्हणून पावलं उचलणं या बाबींचा त्यात समावेश होता. दळणवळण व सांस्कृतिक देवाण-घेवाण यांचे प्रश्न, युद्धकैद्यांची परतपाठवणी व अशाच अन्य बाबी यांविषयीची इतर कलमंही त्यात होती. उभय देशांत शांततेची प्रस्थापना व्हावी व संबंध सुरळीतपणं वाढीला लागावेत म्हणून तपशीलवार तरतूद या मसुद्यात केलेली होती.

८ जानेवारीला सकाळी १० वाजता शास्त्रींनी आपल्या निवासस्थानावर भारतीय शिष्टमंडळाची बैठक बोलावली होती. तिला सहकारी मंत्री व शिष्टमंडळातील वरिष्ठ अधिकारी हजर होते. पाकिस्तानचे अध्यक्ष अयूब व पंतप्रधान कोसिजिन यांच्याशी झालेल्या चर्चेचा गोषवारा आणि संभाव्य कराराच्या मसुद्याची माहिती त्यांनी दिली. मसुद्याच्या आरंभीच्या सुधारित परिच्छेदांचा त्यांनी उल्लेख केला. ताश्कंद परिषद यशस्वी व्हावी म्हणून आपण जास्तीत जास्त कोणत्या हद्दीपर्यंत जाऊ शकतो हे त्यावरून स्पष्ट होईल, असं ते म्हणाले. शिष्टमंडळानं सुधारित मसुद्यावर विचारविनिमय केला. सर्व प्रश्नांवरील भारताचं अंतिम धोरण त्यात प्रतिबिंबित होत आहे असं सर्वांचं मत पडलं. हा मसुदा कोसिजिन व ग्रोमिको यांच्याकडे देण्यात येणार होता, आणि ते त्याबाबतचा पाठपुरावा अयुबखान आणि भुत्तो यांच्याकडे करणार होते. सोविएट नेत्यांना ही चर्चा पाक नेत्यांशी मनमोकळेपणं करण्याची संधी मिळावी म्हणून त्याबद्दल गुप्तता राखण्याचं ठरवण्यात आलं.

पंतप्रधान शास्त्री पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार ११ जानेवारीला सकाळी ताश्कंदहून मायदेशाकडे निघणार होते. या कार्यक्रमात आपण बदल करणार नसून करार करायचाच असेल तर तो त्याआधी व्हायला हवा, असं त्यांनी स्पष्ट केलं. भारतीय शिष्टमंडळानं नवा सुधारित मसुदा तयार करून तो ८ जानेवारीला दुपारी विचारार्थ सोविएट व पाक शिष्टमंडळांकडे पाठवला होता, तरी एकूण वातावरण तणावपूर्ण होतं.

परिस्थितीची कोंडी अजून तशीच होती. परदेशी वार्ताहरांना निश्चित वृत्तं मिळत नव्हती. त्यावरून त्यांना या कोंडीची व कदाचित वाटाघाटी फिसकटण्याची शक्यता वाटू लागली होती. 'द वॉशिंग्टन पोस्ट'चे विशेष प्रतिनिधी वॉरेन उन्रा यांनी ८ जानेवारीला पाठवलेल्या आपल्या वृत्तान्तात म्हटलं होतं :

*भारत व पाकिस्तान यांच्यातील मतभेदाचा तिढा आजही कायमच आहे. काश्मीर व संकल्पित 'ना युद्ध करार' हे वादग्रस्त मुद्दे आहेत.*

*दुपारी २.३० वाजता परिषदेच्या पत्रकाचा अंतिम मसुदा भारताचे पंतप्रधान शास्त्री यांच्याकडून पाकचे अध्यक्ष अयूबखान यांना पाठवण्यात आला. दुपारी ३ वाजता शास्त्रींना फोनवरून कळवण्यात आलं की अयूबखान यांचे प्रतिनिधी भेटायला येत आहेत.*

*दुपारी ३.३० वाजता अयूब यांचं उत्तर शास्त्रींना कळवण्यात आलं, त्यात म्हटलं होतं, ''बिलकुल नामंजूर.''*

'द न्यूयॉर्क टाइम्स'च्या खास प्रतिनिधीनं 'सर्वच महत्त्वाच्या प्रश्नांवर पेच कायम' असं ८ जानेवारीच्या बातमीत म्हटलं होतं. लंडनच्या 'द गार्डियन'च्या विशेष प्रतिनिधीनं आपल्या बातमीत म्हटलं होतं :

*''काही महत्त्वाच्या बाबींबद्दल उभयतांनी घेतलेल्या भूमिका पाहता एकमत होण्यास कमी वाव आहे. त्यामुळं वाटाघाटी कोणत्याही क्षणी फिसकटण्याचा संभव आहे. भारतानं पाठवलेला 'ना युद्ध करारा'चा प्रस्ताव पाकनं फेटाळून लावल्यानं या तर्काला पुष्टी मिळते. काश्मीर प्रश्न सोडवल्याशिवाय असा करार करण्याला काही अर्थ नाही, असं त्यांच्या एका प्रवक्त्यानं सांगितलं.*

*''मतभेद व शत्रुत्वाचं वातावरण असलं तरी काही तडजोड घडावी अशी सुप्त इच्छाही आहे. त्यांनी वाटाघाटी उधळून लावल्यास आपापल्या देशांत त्याचा त्यांना राजकीय फायदा होईल. अर्थात त्याचे आर्थिक व लष्करी परिणाम घातक ठरतील याची उभयतांना जाणीव आहे.*

*त्यातून रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांनी आपल्याला यश यावं म्हणून नेटानं व नेकीनं प्रयत्न चालवले असून एक प्रामाणिक मध्यस्थ म्हणून प्रशंसनीय उत्साह दाखवला आहे.''*

भारतीय पत्रकारांनीही अशाच आशयाचे वृत्तान्त पाठवले होते. 'द हिंदुस्तान टाइम्स'चे खास प्रतिनिधी कृष्ण भाटिया यांनी शास्त्री व अयूब यांच्यात एकमत झालेलं नाही, असं म्हटलं होतं. त्यांचा वृत्तान्त असा:

*''आज अधूनमधून भारतीय व पाकिस्तानी शिष्टमंडळांनी एकमेकांशी संपर्क साधला. परंतु मूलभूत प्रश्नांवर पंतप्रधान शास्त्री व पाकचे अध्यक्ष अयूबखान यांच्यात अद्याप एकमत झालेलं नाही असं सांगण्यात आलं.*

*पाकिस्तानची नकारात्मक व आडमुठी भूमिका ठाऊक असूनही ताश्कंद इथे जे उल्हसित वातावरण होतं ते आज सायंकाळी वितळल्याचं दिसतं. सोविएट परराष्ट्रमंत्री ग्रोमिको यांनी दिवसभर खूप परिश्रम घेतले. तरीही काश्मीर प्रश्न सुटल्याखेरीज 'ना युद्ध करार' करण्यात काहीही अर्थ नाही, ही भूमिका सोडायला पाकिस्तानचा नकार कायम होता.*

*वाद मिटवण्यासाठी बळाचा वापर करणार नाही, अशा आशयाच्या संयुक्त*

*पत्रकाला प्रतिसाद देण्यास आपण असमर्थ आहोत, असं अयूब यांनी शास्त्रींना काल संध्याकाळी सांगितल्याचं समजतं''.*

'द टाइम्स ऑफ इंडिया'चे विशेष प्रतिनिधी जी.के. रेड्डी यांनीही वाटाघाटींतील अडचणींचा उल्लेख केला, पण त्यामुळं आता आशाच उरली नाही असं त्यांचं म्हणणं नव्हतं:

*''भारत व पाक यांच्याकडून बळाचा वापर केला जाणार नाही या आशयाच्या संकल्पित कराराच्या मसुद्यावर बोलणी काल रात्री झाली, परंतु या विषयावर उभय देशांच्या भूमिकेत अजून एकमत झालेलं नाही.*

*बळाचा वापर केला जाणार नाही या आश्वासनाच्या मोबदल्यात भारतानं काश्मीर प्रश्नाबाबत काही यंत्रणा उभारण्यास मान्यता द्यावी अशी पाकिस्ताननं आग्रही भूमिका घेतल्यामुळं ताश्कंद येथील वाटाघाटी अत्यंत नाजुक व कठीण अवस्थेत पोचल्या आहेत. काश्मीरचं सार्वभौमत्व हे वादातीत आहे, अशी भारतानं ठाम भूमिका घेतली आहे.*

*कार्यक्रम-पत्रिकेचा मुद्दा उभय राष्ट्रांनी डावलण्याचं ठरवल्यावर गेल्या ४८ तासांत काही विशेष प्रगती झाली नसली तरी वाटाघाटी फिसकटण्याचा संभव नाही. ताश्कंद इथे करार व्हावा म्हणून काही ना काही मार्ग सापडेल अशी आशा भारतीय व सोविएट वर्तुळांत अजूनही रेंगाळते आहे.''*

पाकिस्तानी पत्रकारांनी काश्मीर प्रश्नाची सोडवणूक सर्वांत आधी व्हायला हवी, हा पाक शिष्टमंडळाला प्रचारार्थ सोयीचा वाटणारा मुद्दा उचलून धरला. 'द पाकिस्तान टाइम्स'चे विशेष प्रतिनिधी अमजद हुसेन यांनी ८ जानेवारीच्या वृत्तात म्हटलं होतं :

*काश्मीर प्रश्न न्याय्य व सन्माननीय मार्गानं सोडविला गेला नाही अथवा त्यासाठी काही यंत्रणा निश्चित केली गेली नाही, तर 'ना युद्ध करार' वा समझोता करणं व्यर्थ ठरेल, असं आज पाकिस्ताननं स्पष्ट केलं.*

कराचीच्या 'डॉन'नं आपल्या ९ जानेवारीच्या अंकात पुढील मथळा दिला होता:

**काश्मीरविषयी तोडग्याविना स्थिर शांतता अशक्य.**

त्यांचे विशेष प्रतिनिधी नसीम अहमद यांनी त्यात लिहिलं होतं:

*''भारत-पाक संघर्षाबद्दलची ताश्कंद परिषद आज अखेरच्या टप्प्यावर पोचली, तेव्हा जोवर काश्मीरचा वाद व उभय देशांतील तणावाचं मुख्य कारण दूर केलं जात नाही तोवर भारत-पाक उपखंडात कायमची शांतता निर्माण होणं शक्य नाही, असं पाकिस्ताननं भारताला ठामपणं सांगितलं.''*

पाकिस्तानचे माहिती सचिव व पाक शिष्टमंडळाचे प्रवक्ते अल्ताफ गौहर यांनी दिलेल्या निवेदनाच्या आधारे हे वृत्त देण्यात आलं होतं. एकूण काश्मीर आणि 'ना युद्ध करार' या दोन मूलभूत प्रश्नांवर उभय नेत्यांत एकमत झालेलं नव्हतं, हे स्पष्ट होतं. हे प्रश्न सोडवले नाहीत तर करार होण्याची शक्यता नव्हती.

अडचणींच्या या प्रचंड गराड्यात चीननं भारताला एक खलिता पाठवल्याचं वृत्त येऊन थडकल्यानं भरच पडली. भारत तणाव निर्माण करण्याचे आटोकाट प्रयत्न करीत आहे, सध्याच्या त्याच्या अंतर्गत व बाह्य धोरणांना पोषक म्हणून तो हे करीत आहे, असे आरोप चीननं भारतावर केले होते. भारतानं जर चीनविरुद्ध अतिक्रमण करणं व चिथावणी देणं चालूच ठेवलं तर चीन ठामपणं प्रत्युत्तर देईल, असा इशाराही त्यात दिला होता. भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी १७ सप्टेंबर १९६५ रोजी अशाच प्रकारचा खलिता चीननं भारताला पाठवला होता, त्याचीच या वेळी आठवण झाली.

"पाकिस्तानला सतत पाठिंबा देणाऱ्या चीननं गतवर्षी युद्धात पाठवला होता तसाच खलिता धाडल्यानं पाकचे अध्यक्ष अयूबखान यांना कडक भूमिका घेण्यास प्रोत्साहन मिळालं असणार!" असं लंडनच्या 'द टाइम्स'च्या वार्ताहरानं लिहिलं होतं: 'द टाइम्स'च्या जे. अँथनी लूकस या वार्ताहरानंही लिहिलं: "चीनच्या खलित्यामुळं पाकिस्तानला येथील परिषदेत कडक भूमिका घेण्यास प्रोत्साहन मिळालं, असे तर्क लगेच व्यक्त करण्यात येऊ लागले आहेत." ब्रिटनच्या 'आब्झर्व्हर'नं मथळा दिला होता : "भारत-पाकिस्तानी समझोत्याला पेकिंगच्या इशाऱ्याचा धोका." त्यांच्या वार्ताहरानं लिहिलं होतं:

*"उझबेकच्या शांत नि स्वच्छ राजधानीत आज अचानक एक जोरदार राजकीय चक्री वादळ येऊन थडकलं. त्यामुळं आधीच फारशा सबळ नसलेल्या 'ताश्कंद सद्भावने'चा चुराडा झाला. या वादळाच्या केंद्रबिंदूचा पेकिंगमध्ये कोठवर शोध घ्यावा हा मुख्य प्रश्न आहे.*

*चीन सरकारनं कडक शब्दांत इशारा देणारं पत्र भारत सरकारला पेकिंगहून पाठवलं, त्याचा उद्देश पाकनं ताश्कंद इथे कडक भूमिका घ्यावी असा असू शकेल अथवा वाटाघाटींच्या अत्यंत कठीण समयी अध्यक्ष अयूब यांना अडचणीत आणण्याचाही हेतू असू शकेल. नेहमीची सावधगिरीची व सौजन्याची भाषा आज भारतीय व पाक प्रवक्त्यांनी वापरली नाही आणि या परिषदेवर जवळजवळ पाणीच टाकलं होतं. अर्थात अध्यक्ष अयूब व पंतप्रधान शास्त्री उद्या भेटणार असल्यानं आशेला जागाच नाही असं म्हणता येत नाही."*

**इशाऱ्याचे हादरे :** *मात्र आपल्या सोविएट यजमानांची पंचाईत होऊ नये अशी उभयतांची इच्छा असूनही ताश्कंदचा निरोप घेण्यापूर्वी निदान सर्वसाधारण समझोता होईल की नाही हेही शंकास्पदच आहे.*

*ताश्कंद हे केवळ त्याच्या सुंदर गुलाबांसाठीच नव्हे, तर भूकंपासाठीही प्रसिद्ध*

*आहे. आजचे हादरे पाकिस्तानचे माहिती सचिव अल्ताफ गौहर यांनी सुरू केले. पत्रकारांशी बोलताना त्यांनी परिषद आयोजून जी महान संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल सोविएट सरकारचे आभार मानले. परंतु त्यांचे हे शब्द म्हणजे शोकसभेतील भाषण वाटत होतं!*

चीननं खलिता पाठवण्यासाठी निवडलेली वेळ व ताश्कंद येथील वाटाघाटींची नाजुक अवस्था यांत काही संबंध असला पाहिजे हा तर्क पाक शिष्टमंडळानं अर्थातच फेटाळून लावला.

चीनच्या या नव्या इशाऱ्यावरील भारतीय प्रतिक्रिया जाणून घेण्यास पाश्चात्य वृत्तपत्रांचे प्रतिनिधी उत्सुक होते. ''चीनच्या अशा स्वरूपाच्या नेहमीच्या खलित्याच्या मानानं देखील या वेळच्या खलित्याची भाषा बरीच कठोर वाटते,'' असं मत सी. एस. झा यांनी व्यक्त केलं. खलिता पाठवायला निवडलेली वेळ 'विलक्षणच' आहे, असा शेरा त्यांनी मारला. ताश्कंद परिषदेकडील अपेक्षा मंदावल्या तेव्हाच चीनचं हे पत्र प्रसिद्ध होणं हा केवळ योगायोग आहे काय, असं विचारता झा यांनी सांगितलं की, ''त्यामुळं भारताच्या दृष्टिकोनावर काहीही परिणाम झालेला नाही.'' मग मुत्सद्देगिरीच्या सफाईनं ते म्हणाले, ''त्यामुळं दुसऱ्या कोणावर काही परिणाम झाला आहे काय, यावर मात्र आम्ही मल्लीनाथी करणार नाही!'' १७ सप्टेंबर १९६५ रोजी भारत-पाक युद्ध ऐन भरात असताना चीननं पाठवलेल्या खलित्याइतकंच हे पत्र वाईट आहे, असं शास्त्रींचं मत होतं. सीमेवर काही गंभीर उपद्रव निर्माण करण्याचा चीनचा हेतू नसून केवळ पाकला नैतिक पाठिंबा देण्यासाठी चीन ढवळाढवळ करीत आहे, असा शास्त्रींचा अंदाज होता. प्रत्यक्षात हेच निष्पन्न झालं. तरी पण भारताच्या हिताला बाधा येण्याऐवजी याचा उपयोगच होईल, असंही त्यांना वाटत होतं.

त्या दिवशी दुपारी ४ वाजता शास्त्रींनी ओरिएंटल इन्स्टिट्यूटला भेट दिली. ५ वाजता एका महत्त्वाच्या मुस्लीम प्रार्थना स्थळाला त्यांनी भेट दिली. सायंकाळी ७ वाजता 'अलि शेर नबोई उझ्बेक ऑपेरा व बॅले नाट्यगृहा'मध्ये जाऊन त्यांनी 'स्वान लेक' हे नृत्यनाट्य पाहिलं. दरम्यान ग्रोमिको यांच्या भारतीय व पाकिस्तानी परराष्ट्र मंत्र्यांबरोबर चर्चेच्या फेऱ्या चालू होत्या. त्यातून फारशी काही प्रगती होत नव्हती. तरीही ८ जानेवारीच्या सायंकाळी, तशा कठीण परिस्थितीतही १० जानेवारीला करार होईल, अशी आशा कोसिजिनना वाटत होती. पाकिस्तानी शिष्टमंडळानं कितीही धोकेबाज आणि दिवाळखोर पवित्रा घेतला तरी पाकिस्तानच्या लष्करी स्थितीची नाजुक हालत अयूबना शांततेचा मार्ग स्वीकारायला भाग पाडील, असं कोसिजिन यांचं मत होतं. मात्र पाकिस्तानी शिष्टमंडळ करीत असलेल्या नकारात्मक प्रचाराची कोसिजिन यांना काळजी वाटते, असं सोविएट शिष्टमंडळाचे प्रवक्ते राजदूत झामियातिन यांनी मला सांगितलं. ही परिषद 'निरर्थक' आहे व ती फिसकटणार असं पाक शिष्टमंडळाचे प्रवक्ते जगातील पत्रकारांना वारंवार सांगत होते. सोविएट युनियनचं

शिष्टमंडळ जे 'आशादायी' चित्र उभं करीत आहे ते खरं नव्हे, असंही ते सांगत होते. झामियातिन म्हणाले :

*"एक दिवस मी सोविएट शिष्टमंडळाची भूमिका विशद करण्यासाठी दुपारी दोन वाजता पत्रकार परिषद आयोजिली होती. थोड्या वेळानं मला पाकिस्तान शिष्टमंडळाच्या अधिकृत प्रवक्त्याचा फोन आला. त्याला दोन वाजता पत्रकारांना भेटायचं होतं, तेव्हा मी माझी पत्रकार परिषद चार वाजता घ्यावी असं त्यानं सुचवलं. भारतीय शिष्टमंडळाशी पण तुम्ही याबाबत सल्लामसलत केली का, असं मी त्याला विचारलं. तेव्हा भारतीय शिष्टमंडळाच्या सोयीशी मला काही देणं-घेणं नाही, असं उत्तर त्यानं दिलं... पाकिस्तानी अत्यंत आक्रमकतेनं आपला प्रचार करीत होते. सर्वांत आधी पत्रकारांना भेटण्यासाठी ते धडपड करीत, कारण त्यामुळं आपली बातमी जगभर आधी पोचेल व त्यामुळं जनतेच्या मतावर तिचा प्रभाव पडेल हे त्यांना ठाऊक होतं."*

८ जानेवारीला सायंकाळी कोसिजिन यांनी झामियातिन यांना 'युनायटेड प्रेस ऑफ अमेरिके'चे प्रमुख प्रतिनिधी व प्रभावशाली पत्रकार हेन्री शापिरो यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितलं. १० जानेवारी रोजी करारावर स्वाक्षऱ्या होतील अशी सोविएट पंतप्रधानांना अत्यंत आशा वाटते, असं त्यांना सांगण्याची सूचना त्यांनी दिली होती. झामियातिन यांनी तत्काळ शापिरो यांना पाचारण केलं आणि हा अनपेक्षित व आनंददायी निरोप दिला. शापिरो यांचा विश्वासच बसेना. त्यांनी आनंदून विचारलं, "या बातमीत तुमचा उल्लेख करू ना?" झामियातिन यांनी शांतपणं उत्तर दिलं, "नाही." ते म्हणाले, "माझ्या नावानं तुम्ही जर ही बातमी दिली तर मला सर्व पत्रकारांना ते सांगावं लागेल. तेव्हा तुम्ही नेहमीप्रमाणं सोविएट युनियनमधील खात्रीलायक सूत्रांकडून समजतं, असं नमूद करा म्हणजे झालं!" शापिरो यांना वृत्ताच्या आणखी विश्वासार्हतेची गरज नव्हती. त्यांनी लागलीच बातमी देऊन टाकली. परिषद यशस्वी होण्याची शक्यता सूचित करणारी बातमी देणारे ते एकमेव पत्रकार होते. मात्र आशावाद दर्शवणारा हा सूर कोसिजिन यांनी हेतुपुरस्सर सोडून दिला असला तरी प्रत्यक्षात परिषदेचं भवितव्य अधांतरीच होतं!

९ जानेवारीचा दिवस उजाडला. तो दिवस अत्यंत कठीण प्रश्नांनी भरलेला, कोसिजिन यांनी केलेल्या अथक परिश्रमांचा, जोरात पाठपुरावा करण्याचा, थोडंफार दडपण आणण्याचा आणि अखेर साऱ्या विरोधी वातावरणाची कोंडी फोडून मध्यरात्री यश देणारा ठरला. त्या दिवसाचा आरंभ काहीशा निराश वातावरणातच झाला. परिषद काही करार किंवा संयुक्त पत्रक देखील न निघता फिसकटणार अशीच हवा होती. एकूणच स्थिती कमालीची निराशाजनक होती.

परंतु यजमान कोसिजिन यांनी मात्र हात टेकले नव्हते. ते अजूनही हिंमत हरले नव्हते. किंबहुना सर्वस्व ओतून ते नव्या दमानं प्रयत्नाला लागले होते. ८ जानेवारीला

त्यांनी सारी बोलणी करण्याची जबाबदारी ग्रोमिको यांच्यावर सोपवली होती. आज मात्र पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी स्वतःचं खास धोरण आखलेलं दिसत होतं. चीननं इशारा देणारं पत्र पाठवून केलेल्या हस्तक्षेपामुळं अनपेक्षित असा परिणाम झाला होता. तो म्हणजे अपयशाच्या जबड्यातून यश खेचून आणण्याचा आपला निर्धार कोसिजिन यांनी अधिकच दृढ केला, असं मला वाटतं.

त्या दिवशी कोसिजिन यांनी घेतलेल्या गाठीभेटींचा पुढील तपशीलच ते करीत असलेल्या जोरदार प्रयत्नांची साक्ष देणारा आहे:

| | |
|---|---|
| *स.१० ते दु. १२.३०* | *– पंतप्रधान शास्त्री यांच्याशी चर्चा* |
| *दु. २ ते २.४५* | *– अध्यक्ष अयूब यांच्याशी चर्चा* |
| *दु. ४.४५ ते सायं. ६* | *– अध्यक्ष अयूब यांच्याशी चर्चा* |
| *सायं. ६.४० ते रा. ९.१५* | *– पंतप्रधान शास्त्री यांच्याशी चर्चा* |
| *रा. ९.३० ते ११.३०* | *– अध्यक्ष अयूब यांच्याबरोबर चर्चा व भोजन* |
| *रा. ११.४५ ते रा. १२.४५* | *– पंतप्रधान शास्त्री यांच्याशी चर्चा.* |

त्या वेळी केवळ दोन प्रश्नांवर एकमत झालं नव्हतं व ते होण्याची शक्यताही नव्हती. काश्मीरबाबत शास्त्री यांनी शक्य त्या मर्यादेपर्यंत लवचिक भूमिका स्वीकारली होती. परिषदेच्या कराराच्या मसुद्यात काश्मीरचा उल्लेख करायला त्यांनी तयारी दर्शवली होती. मात्र त्याबाबतची भारताची भूमिका त्यात पुन्हा नमूद करावी अशी अट घातली होती. खरं तर दोन्ही बाजूंच्या भूमिका पुन्हा मांडण्यास त्यांनी संमती दिली होती. आता कोसिजिन यांच्यापुढं प्रश्न होता अयूबखान यांचं मन वळवण्याचा. काश्मीरबद्दल चर्चा शक्यच नाही अशी भारताची भूमिका होती, पण आता काश्मीरचा उल्लेख करण्यास शास्त्रींनी तयारी दर्शवली होती. हे काम साधंसुधं नव्हतं.

दुसरा प्रश्न होता भारतानं मांडलेल्या 'ना युद्ध करारा'च्या प्रस्तावाचा. अयूब यांनी तो फेटाळून लावला होता. वाद हे बळाच्या जोरावर नव्हे, तर शांततेच्या मार्गानं सोडवावेत या युनोच्या सनदेमधील कलमावर उभय राष्ट्रांनी पुन्हा निष्ठा प्रकट केली तरी चालू शकेल, अशी तयारी शास्त्रींनी दर्शवली होती. मात्र यापुढं बळाचा वापर केला जाणार नाही असं खुलं, निःसंदिग्ध व बिनशर्त आश्वासन नमूद करायलाच हवं असं त्यांनी स्पष्ट केलं. या मुद्द्यावर अयूब यांचं मन वळवायला हवं होतं. कोसिजिन यांच्यावर ही दुसरी महत्त्वाची जबाबदारी होती.

कोसिजिन यांच्याकडे संकल्पित कराराची एक प्रत होती. ती घेऊनच त्यांनी शास्त्री यांच्याशी चर्चा सुरू केली. मुळात भारतीय मसुद्यात सर्व संबंधित बाबींचा अंतर्भाव होता. विविध कलमांबाबत सुचवलेला मजकूर किरकोळ बदलांसह स्वीकृत आहे, असं ग्रोमिको व भुत्तो यांच्यात झालेल्या चर्चेवरून गृहीत धरायला हरकत नव्हती. फारसा ठाशीव असा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला गेला नव्हता. काश्मीरच्या बाबतीत बळाचा वापर केला जाणार नाही, असं आश्वासन द्यायला पाकिस्तान तयार

नव्हता, त्याची भूमिका अजून हट्टीपणाचीच होती. म्हणजे अजून परिस्थिती निवळली नव्हती, तिढा सुटला नव्हता.

भारतीय शिष्टमंडळानं आपल्या भूमिकेत आधीच बरीच तडजोड केली आहे याकडे शास्त्रींनी कोसिजिन यांचं लक्ष वेधलं. पाकिस्ताननं मात्र त्या दृष्टीनं कसलीही लवचिकता दाखवली नव्हती. तेव्हा आता प्रश्न त्यानंच आपला हट्टीपणा सोडून देण्याचा होता.

भुत्तो व त्यांचे अन्य सहकारी आपल्या भूमिकेपासून तसूभरही ढळायला तयार नसले तरी मी माझ्या परीनं नेटानं प्रयत्न करीन, असं कोसिजिन यांनी सांगितलं होतं. अयूबखान यांचं मन वळवण्याचा आपण प्रयत्न करूच, कारण ते अधिक समंजस आहेत, असं ते म्हणाले. दुपारी कोसिजिन अयूबखानना दोनदा भेटले. उभयतांत दोन तास चर्चा झाली. अयूब यांच्या निवासस्थानावरून सायं. ६ला ते निघाले व ग्रोमिकोंसमवेत शास्त्रींना भेटायला आले. काश्मीर प्रश्नाचा पुढं पाठपुरावा करावा या भूमिकेला अयूब अजूनही चिकटून होते. युनोच्या सनदेनुसार बळाचा वापर न करण्याच्या कलमावर पुन्हा निष्ठा प्रकट करायला आपण तयार आहोत, परंतु काश्मीरचा प्रश्न 'समाधानकारक'रीत्या हाताळला तरच ती अट कायम होती. त्यांचं हे म्हणणं उत्साहजनक नसलं तरी कोसिजिन त्यामुळं उल्हसित झाले, कारण अयूब यांची अट कायम असली तरी आपल्या मूळ भूमिकेत बदल करायला ते तयार आहेत हे त्यावरून सूचित होत होतं. पंतप्रधान शास्त्रींनी आपल्या मूळ भूमिकेत बदल करून मर्यादित स्वरूपात काश्मीरचा उल्लेख करारात करण्याची तयारी दाखवली आहे असं मी अयूबखान यांना सांगितलं आहे, अशी माहिती देऊन कोसिजिन यांनी शास्त्रींना विचारलं, "आता याबाबत तुम्ही आणखी काही करू शकाल काय?" काश्मीरच्या प्रश्नाबाबत आपण आणखी तडजोड करावी असं कोसिजिन सुचवीत आहेत असं शास्त्रींना चर्चेत प्रथमच त्या क्षणी जाणवलं. ते आपल्याला अशी विनंती केव्हा तरी करतील याची कल्पना त्यांना होतीच. त्यामुळं त्यांचं उत्तर तयारच होतं. ते म्हणाले,

> *"जम्मू व काश्मीर राज्यावरील भारताच्या सार्वभौमत्वाच्या बाबतीत काही यंत्रणा निर्माण करावी या सूचनेचा विचार करण्यास मी तयार नाही आणि यापुढंही तयार होणार नाही हे मी अगदी स्पष्ट शब्दांत सांगू इच्छितो. भारताचे काश्मीरवरील सार्वभौमत्व वादातीत असून तो चर्चेचा विषयच होऊ शकत नाही. मला करार न करताच भारताला परतावं लागलं तरी चालेल, पण मी माझी ही भूमिका बदलणार नाही. भारतात परतल्यावर गरज पडली तर मी माझ्या पदाचा राजीनामा देखील देईन, पण देशाच्या हिताविरुद्ध काहीही करणार नाही. अर्थात त्याचे परिणाम भोगायला आमची तयारी आहे."*

शास्त्री यांच्या या प्रतिक्रियेमुळे कोसिजिन यांना धक्काच बसला. ते हादरून गेले. खुर्चीवरून उठत शास्त्रींचा हात हातात घेऊन ते म्हणाले,

*"पंतप्रधान महोदय, अनहितकारी अशा प्रस्तावावर आपण विचार करावा असं म्हणण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता. अध्यक्ष अयूब यांनी जे सांगितलं ते तुमच्या कानावर मी घातलं, इतकंच. आणखी काही करणं शक्य आहे काय याचा मी केवळ शोध घेत होतो, पण तोही मनात कसलीही स्पष्ट कल्पना ठेवून नव्हे! विविध दृष्टिकोनांतून तुम्ही वारंवार तुमची भूमिका स्पष्ट केलेली आहे हे मला ठाऊक आहे. तुम्हांला जे भारताच्या हिताविरुद्ध वाटतं ते तुम्हांला करण्यास मी कधीच सांगणार नाही याची कृपया खात्री बाळगा. आम्ही तुमचे मित्र आहोत."*

कोसिजिन उदास झाले खरे, परंतु आपण पराभूत झालो आहोत याची छटा त्यांनी दिसू दिली नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील नेहमीचं स्मित मात्र गायब झालं होतं.

रात्री ९.१५ वाजता शास्त्रींच्या निवासस्थानावरून कोसिजिन निघाले. अयूब यांच्यासमवेत ते रात्रीचं भोजन करणार होते आणि वाटाघाटींतून मार्ग काढण्याचा अखेरचा प्रयत्न करणार होते. काही ना काही बातमी मिळेल म्हणून बातमीदार दिवसभर प्रतीक्षा करीत होते. आपापल्या वृत्तपत्रांना बातमी पाठवायची आता वेळ झाली होती. भारतीय व पाकिस्तानी शिष्टमंडळांकडून आशादायक असे काहीच संकेत मिळत नव्हते. अशा वेळी पाकिस्तानी प्रवक्ते अल्ताफ गौहर म्हणाले, "संयुक्त पत्रक म्हणजे काही घरी परतायचं तिकीट नव्हे, तेव्हा पत्रक न काढता देखील तुम्ही परत जाऊ शकता!"

त्यामुळं ९ जानेवारीला रात्री भारतीय व पाक पत्रकारांनी दिवसभराच्या घडामोडींच्या ज्या बातम्या पाठवल्या त्यांत निराशाजनकच सूर होता. यशाची काही शक्यता दिसत नव्हती व कोसिजिन यांचे प्रयत्न (त्या क्षणी ते अयूब यांच्याबरोबर चर्चा करीत होते.) म्हणजे पडझडीतून काही तरी सुटलं-सापडलेलं शोधण्याचा प्रयत्न आहे, असंच मानण्यात येत होतं.

'द स्टेट्समन'चे खास प्रतिनिधी इंदर मल्होत्रा यांनी आपल्या बातमीत म्हटलं होतं :

*"ताश्कंद, ९ जानेवारी : वाटाघाटी पूर्णतः निष्फळ होऊ नयेत वा कोलमडू नयेत म्हणून आज रात्री कोसिजिन अत्यंत नेटानं प्रयत्न करीत आहेत. मात्र त्यांच्या या प्रयत्नांतून काय निष्पन्न झालं हे ही बातमी लिहीत असेपर्यंत समजू शकलेलं नाही.*

*'ना युद्ध करारा'ची घोषणा किंवा काही विशिष्ट प्रश्नांवर भरीव करार होण्याच्या सर्व आशा मावळल्यावर निदान उभय राष्ट्रांनी संयुक्त पत्रक काढण्यास राजी व्हावं, म्हणून कोसिजिन प्रयत्न करीत असावेत हे उघड आहे. परंतु ही मर्यादित कामगिरी पार पाडण्यातही भारत व पाकिस्तान यांच्यात असलेल्या तीव्र मतभेदांमुळे अडचणी येत आहेत."*

'द हिंदुस्थान टाइम्स'चे विशेष प्रतिनिधी क्रिशन भाटिया यांनीही असाच निराशेचा सूर लावला होता :

*''ताश्कंद, दिनांक ९ जानेवारी : जर काही अद्भुत असं घडलं नाही, तर ताश्कंद परिषद पंतप्रधान शास्त्री व अध्यक्ष अयूब यांच्यात एकमत न होताच गुंडाळली जाईल. मूलभूत प्रश्नांवर एकमत होण्याची चिन्हं नाहीत.*

*संयुक्त पत्रक काढण्याच्या बाबतीतही आज सायंकाळी उभय नेत्यांत तीव्र मतभेद असल्याचं समजतं.''*

'इंडियन एक्स्प्रेस'चे देव व मोरारका यांच्याही बातमीत अशीच भावना होती :

*''ताश्कंद दिनांक ९ जानेवारी : ताश्कंद वाटाघाटींतून आता केवळ भारत-पाकिस्तानचं संयुक्त पत्रक निघण्याची शक्यता आहे. तेही भारत व पाकिस्तान यांच्या मसुद्यांतील मतभेद कमी करण्यात सोविएट पंतप्रधान श्री. कोसिजिन यांना कितपत यश येतं यावर अवलंबून आहे.*

*काल वाटाघाटी जवळपास फिसकटल्याच होत्या. श्री. शास्त्री व श्री. अयूबखान यांच्यातील नियोजित भेटही झाली नाही. त्याऐवजी श्री. कोसिजिन परराष्ट्रमंत्री ग्रोमिको व अन्य सल्लागार यांच्यासह उभय शिष्टमंडळांशी चर्चा करीत आहेत.''*

या बातम्या भारतातील वृत्तपत्रांत १० जानेवारी १९६६ रोजी प्रसिद्ध झाल्या. ताश्कंद परिषदेचा तो अखेरचा दिवस होता व पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार ११ जानेवारीस सकाळी शास्त्री काबूलला रवाना होतील असं सांगण्यात आलं होतं.

१० जानेवारीच्या पाकिस्तानी वृत्तपत्रांतही अशीच निराशाजनक वृत्तं झळकली होती. 'डॉन'नं पहिल्या पानावर आठकलमी मथळा दिला होता :

***''ताश्कंद वाटाघाटी आज फिसकटण्याचा संभव!''***

'द पाकिस्तान टाइम्स'च्या अमजद हुसेन यांनी म्हटलं होतं : ***''ताश्कंद शिखर परिषद आज संपण्याची शक्यता.''***

पाश्चिमात्य वार्ताहरांचं एकूण परिस्थितीवरील विश्लेषण काही वेगळं नव्हतं. 'द न्यूयॉर्क टाइम्स'चे जे अँथनी लूकस यांनी म्हटलं होतं :

*''ताश्कंद, सोविएट युनियन, दिनांक ९ जानेवारी : जवळजवळ निष्फळ ठरलेल्या पाकिस्तानी– भारतीय वाटाघाटींतून अखेरच्या क्षणी काही मार्ग काढण्याचा सोव्हिएट पंतप्रधान अलेक्सी कोसिजिन प्रयत्न करीत आहेत... संयुक्त पत्रक न काढताच पाकची मायदेशी परतायची तयारी आहे, असं पाकचे प्रवक्ते अल्ताफ गौहर यांनी सूचित केलं... याचा अर्थ आपल्याला हवा तसा काश्मीरचा उल्लेख केला जाणार नसेल तर संयुक्त पत्रकच काढायला नको, असं पाकिस्तानचं मत आहे असा लावला जातो.''*

लंडनच्या 'द टाइम्स'नं 'काश्मीर प्रश्नावर कोंडी' असा मथळा देऊन काश्मीरच्या

मध्यवर्ती प्रश्नावर काही प्रगती झाल्याशिवाय अन्य प्रश्नांवर करार करायला पाकिस्तानची तयारी दिसत नाही, असं सार काढलं.

'द वॉशिंग्टन पोस्ट'च्या वॉरेन उन्ना यांनी आपल्या विश्लेषणात म्हटलं होतं : "ताश्कंद परिषदेच्या आता उरलेल्या २४ तासांत भारतीय उपखंडातील हे दोन नेते आलंकारिक व मोघम भाषेतील पत्रक काढण्यास राजी होण्याचा संभव आहे. सोविएट युनियननं आयोजित केलेल्या या परिषदेत आरंभी असलेले मतभेद कमी होण्याऐवजी अधिकच तीव्र झालेले दिसतात..."

परिषद अयशस्वी ठरली आहे, असं जाहीर करणारा कोसिजिन यांच्या भाषणाचा एक मसुदाही ९ जानेवारी रोजी तयार करण्यात आला होता. परिषद अयशस्वी का झाली याची कारणमीमांसा व त्याचे संभाव्य परिणाम त्यात नमूद केले होते. गरज पडली तर १० जानेवारीस वापरता येईल या उद्देशानं हा मसुदा तयार केलेला होता, असं झामियात्िन यांनी मला सांगितलं.

शेवटी अयूबना भेटण्यासाठी कोसिजिन गेले होते. शास्त्रींचा तो सारा दिवस वादावादीतील अटीतटीनं भरलेला होता. अयूब यांच्यासमवेत खाना घेतल्यावर आपण तुम्हांला पुन्हा भेटायला येणार आहोत असं कोसिजिन यांनी सांगितलं होतं. त्यामळं दिवस तसा संपलाच नव्हता. मी पंतप्रधानांच्या हालचाली जवळून निरखीत होतो. दडपणाच्या प्रभावाखाली ते आले नाहीत हे पाहून मला खूप बरं वाटत होतं. आम्ही दोघे बोलत असताना कोसिजिन-अयूब यांच्या चर्चेतून काय निष्पन्न होईल असं वाटतं, असं मी विचारलं. तेव्हा शास्त्री म्हणाले,

> *"ते सांगणं कठीणच आहे. भुत्तो यांना करार व्हायला नकोय. पण मला वाटतं, अयूबना शांतता प्रस्थापित व्हायला हवी आहे. सुरक्षा समितीचा आदेश धुडकावून लावण्याची त्यांची इच्छा नसावी. तसंच परिषदेचा बोजवारा उडवून सोविएट युनियनशी असलेले आपले संबंध बिघडविण्याचीही त्यांची इच्छा नसावी. सुरक्षा समितीच्या ठरावाला तत्काळ प्रतिसाद द्यावा व १९४९ च्या युद्धबंदी रेषेवर फौजा हलवाव्यात, असं राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी अयूबना स्पष्टपणं सांगितल्याचंही वृत्त आहे. तसंच भारतीय फौजा शक्य तितक्या लौकर लाहोर व सियालकोट येथून हटवल्या जाव्यात असं अयूबना वाटत असणारच. या परिषदेत काश्मीरचा प्रश्न उपस्थित करण्याची सक्ती आपण करू शकत नाही याची जाणीवही त्यांना आतापर्यंत झाली असावी. करार झाला नाही तर पुन्हा संघर्षाला तोंड लागेल. परंतु त्यांच्या लष्करी यंत्रणेची जबर हानी झालेली आहे. बाह्य मदतीविना त्यांना पुन्हा लढता येणार नाही. आता जर त्यांनी या टप्प्यावर परिषदेचा बोजवारा उडवला तर सोविएट युनियन आणि अमेरिकाही पाकला काही मदत देण्याची, प्रोत्साहन देण्याची शक्यता नाही. भुत्तो हे भावनोद्रेक व संताप यांच्या आहारी जाणारे आहेत. काश्मीरबद्दलचं आपलं कारस्थान फसलं यामुळं ते संतापानं खवळले आहेत.*

*त्यामुळं त्यातून बचावण्यासाठी या परिषदेत काश्मीरचा मुद्दा ते धरून बसले आहेत. परंतु अयूबना वास्तवाची कल्पना असून ते शांततेचा मार्ग निवडतील, असं मला वाटतं. आता त्या दृष्टीनं सोविएट युनियनही आपली सारी ताकद पणाला लावीलच. काय होतंय ते लौकरच कळेल आपल्याला.''*

कोसिजिन यांनी अयूबखान यांच्याबरोबर भोजन घेतलं व चर्चा केली. रात्री ९.३० ते ११.३० पर्यंत ते अयूब यांच्याबरोबर होते. तिथून ते परराष्ट्रमंत्री ग्रोमिको यांच्यासमवेत थेट शास्त्रींच्या निवासस्थानी आले. ते उत्साहानं ओसंडल्यासारखे दिसत होते. त्यांच्या चालण्यात जणू बिजली संचारली होती. अखेर यश मिळाल्याची चिन्हं चेहऱ्यावर दिसत होती. त्यांचा चेहरा उजळून निघाला होता. शास्त्रींशी प्रेमभरानं हस्तांदोलन करीत ते म्हणाले,

*''मी शुभवार्ता घेऊन आलोय. काश्मीरबद्दल तुम्ही सुचवलेला उल्लेख स्वीकारायला तसंच वाद सोडवताना बळाचा वापर करू नये यावर युनोच्या सनदेनुसार पुन्हा निष्ठा व्यक्त करण्याला पाकिस्तानचे अध्यक्ष अयूब तयार आहेत!''*

शास्त्रींची याहून जादा अपेक्षा नव्हतीच. काही तासांपूर्वी जे अशक्यप्राय वाटत होतं ते अंतिम क्षणाला थोडासाच अवधी उरला असताना आता शक्य झालं होतं. शास्त्रींना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. कोसिजिन यांचं त्यांनी मनःपूर्वक, भरघोस अभिनंदन केलं. याच क्षणाची ते वाट पाहत होते. यशाचा तो अविस्मरणीय क्षण होता. कोसिजिन यांनी सांगितलं की, सुरक्षा समितीनं शांतता प्रस्थापित करावी व ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीच्या जागी सर्व सशस्त्र फौजा हलवाव्यात अशी मागणी केली आहे याचं मी अयूबना स्मरण करून दिलं. ही अट बंधनकारक असून तिची पूर्तता भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांनी करायला हवी. भारतानं ही अट आधीच मान्य केली आहे. तेव्हा आता जर सुरक्षा समितीच्या ठरावाच्या कक्षेबाहेर जाऊन काश्मीर प्रश्न पुन्हा त्वरित खुला करावा, असा आग्रह पाकिस्ताननं धरला आणि करार करायला नकार दिला तर शांतता-वाटाघाटी फिसकटून पुन्हा युद्ध सुरू होण्याचा धोका आहे. त्याची सारी जबाबदारी सर्वस्वी पाकिस्तानवर राहील. सुरक्षा समितीचा कायमचा सदस्य या नात्यानं सोविएट युनियनचं हेच मत असून शांतताप्रिय अन्य सदस्य राष्ट्रंही त्याच्याशी सहमत होतील आणि जागतिक मत ठामपणं पाकविरोधी असेल.

''तुम्ही जर करार न करताच निघून गेलात तर तुमची काय प्रतिष्ठा राहील? तुमचं भवितव्य काय असेल? खरंखुरं युद्ध? जागतिक प्रतिक्रिया काय उमटेल? राष्ट्रांचे प्रमुख हे शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकत्र येत असतात.'' असे सवाल कोसिजिन यांनी अयूबना विचारले असं झामियातिन यांनी सांगितलं.

त्यानंतर थोडंसं संभाषण झाल्यावर अयूब यांनी आपला आग्रह सोडला आणि

संकल्पित कराराला मान्यता दिली. पेचप्रसंग सुटला होता. ५ ऑगस्ट १९६५-पूर्वीच्या जागी फौजा हलवण्याचं काम २५ फेब्रुवारी १९६६ पर्यंत पुरं केलं जावं अशी सूचना अयूब यांनी केली. त्या संदर्भात यशवंतराव चव्हाण यांच्याशी चर्चा केल्यावर शास्त्रींनी ती मान्य केली. शास्त्री यांच्या निवासस्थानी कोसिजिन व शास्त्री यांची चर्चा चालू असतानाच भुत्तो यांचा ग्रोमिकोंना फोन आला. तो क्षण थरारक होता. गोठवून टाकणारा होता. आता भुत्तोंच्या मनात काय बरं असावं? अशी शंका ग्रोमिकोंना आली.

ग्रोमिकोंनी फोन घेतला व ते भुत्तोंशी बोलू लागले. सारे जण चिंतातुर नजरेनं त्यांच्याकडे पाहत होते. आरंभी ग्रोमिको यांनी भुत्तोंचं म्हणणं शांतपणं ऐकून घेतलं. नंतर त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे व संतापाचे भाव प्रकटले. त्यांचा सूर एकदम चढला व ते म्हणाले,

*"नाही, नाही, नाही. भुत्तो, तुमचं सारं चूक आहे. तुम्ही याच्याशी सहमत झाला होतात आणि अध्यक्ष अयूब यांनीही याला मान्यता दिली होती. आता तुम्हांला शब्द फिरवता येणार नाही. तसं करणं फार वाईट आहे, फारच वाईट. मेहरबानी करून तुमच्या अध्यक्षांना हे त्वरित कळवा."*

काही क्षण शांततेत गेले. त्या अंतिम क्षणी देखील भुत्तो काही चाल खेळू पाहत होते हे उघड होतं. परंतु ग्रोमिको यांच्या संतापजनक प्रतिक्रियेचा योग्य तो परिणाम झाला. बहुधा अध्यक्ष अयूब यांच्याशी बोलल्यानंतर भुत्तो यांचा काही क्षणांतच पुन्हा फोन आला व त्यांनी आपलं म्हणणं मागं घेतलं.

वाद सोडवताना बळाचा वापर केला जाणार नाही असं युनोच्या सनदेनुसार पुन्हा आश्वासन देण्यासंबंधीच्या करारातील कलमाविषयी भुत्तोंनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. बळाचा वापर केला जाणार नाही यासंबंधीचा भाग वगळावा असं ते सुचवीत होते अशी माहिती ग्रोमिकोंनी कोसिजिन व शास्त्री यांना दिली. खरं तर संबंधित कलमातील साऱ्या मजकुराला भुत्तो व अयूब यांनी आधीच मान्यता दिली होती व त्यामुळं त्यात असा बदल करण्याचा काही प्रश्नच नव्हता. सुदैवानं हे वादळ शमलं.

शास्त्रींनी अयूब यांच्यासाठी १० जानेवारी रोजी दुपारी भोजन आयोजिलं होतं. त्या वेळी अयूब व शास्त्री यांनी कराराला औपचारिक मान्यता द्यावी असं ठरलं. अर्थात ही केवळ औपचारिकताच होती. ताश्कंद कराराचा सारा मसुदा अंतिमतः ठामपणं मान्य झालेला होता. शास्त्रींचा निरोप घेऊन कोसिजिन व ग्रोमिको निघाले तेव्हा पहाटेचा पाऊण वाजला होता. तो सारा दिवसच आशा-निराशेच्या खेळानं भरलेला आणि प्रचंड घडामोडींचा होता. अर्थात त्यातून निघालेल्या फलश्रुतीमुळं शास्त्रींना साहजिकच आनंद झाला होता.

१० जानेवारीची सकाळ नीरव शांततेची होती. भरगच्च घटनांचे, उत्कंठावर्धक

क्षणांचे, वाद-विवादांचे, आशा-निराशेचे दिवस संपले होते. सूर्य चांगलाच झळझळीत दिसत होता. आणि वातावरण चौफेर प्रसन्नतेचं होतं. शास्त्रींना चांगली विश्रांती मिळाल्याचं दिसत होतं. त्यांच्या मनावर कसलाही ताण नसल्याचं जाणवत होतं. सकाळी पलंगावरच बसून शास्त्री काही कागद वाचीत होते. नंतर कपडे चढवून ते बैठकीच्या खोलीत आले. तिथे काही किरकोळ संभाषण झालं. मग खाली बागेत ताज्यातवान्या हवेत चक्कर मारायचं त्यांनी ठरवलं. मीही त्यांच्याबरोबर निघालो. अशा वेळी मी अनेकदा त्यांच्याबरोबर जात असे. दिवसभरात वेळ मिळेल तेव्हा मोकळ्या हवेत फेरफटका मारायला ते बाहेर पडत. आपलं बोलणं ऐकणारं दुसरं कोणीही नाही हे ठाऊक असल्यानं आम्ही मोकळेपणं चर्चा करीत असू. थोड्याच वेळात आम्ही निवासस्थानी परतलो. आता अयूब यांच्यासाठी आयोजिलेल्या भोजनाकडे शास्त्रींचं लक्ष लागलं होतं.

पाकिस्तानचे अध्यक्ष बरोबर दीड वाजता आले. शास्त्रींनी त्यांचं अदबीनं व आदरानं स्वागत केलं. दोघे राष्ट्रप्रमुख सुमारे दीड तास एकत्र होते. ताश्कंद कराराला दोघांनी त्या वेळी औपचारिक मान्यता दिली.

अयूबखान गेल्यावर शास्त्रींनी सांगितलं की, भोजन व चर्चा चांगली झाली. मला त्यांच्याशी तपशीलवार बोलायला वेळच झाला नव्हता. ताश्कंद करारावर स्वाक्षऱ्या करण्याचा समारंभ दुपारी चार वाजता ठरला होता व त्यासाठी शास्त्रींना तयार व्हायचं होतं. ते वेळेवर समारंभस्थळी पोचले. ४ जानेवारीला परिषदेच्या उद्घाटनाच्या वेळी जशी काटेकोर, शिष्टाचाराला धरून व्यवस्था केली होती तशीच याही वेळी होती. उझ्बेक मंत्रिमंडळ बैठकीच्या दालनात तीन वेगवेगळ्या प्रवेशद्वारांतून तिन्ही नेत्यांनी एकाच वेळी प्रवेश केला. (त्याच दालनात उद्घाटन सोहळा झाला होता.) शास्त्रींनी अयूब यांच्याजवळ जाऊन हस्तांदोलन केलं. नंतर उभय नेत्यांनी कोसिजिन यांच्याशी हस्तांदोलन केलं. त्यानंतर ठरवून दिलेल्या आसनांवर सारे स्थानापन्न झाले.

आता तो ऐतिहासिक क्षण अगदी नजीक येऊन ठेपला होता. ताश्कंद कराराची रशियन व इंग्रजी भाषेतील एकेक प्रत शास्त्री यांच्यापुढं, तर दुसरा संच अयूब यांच्यापुढं ठेवण्यात आला. कोसिजिन यांनी सोविएट शिष्टमंडळाचे सरचिटणीस श्री. बेनोडिक्टोव्ह यांना घोषणापत्र वाचून दाखवण्यास सांगितलं. आरंभी रशियन भाषेतून व नंतर ते इंग्रजीतून वाचून दाखवण्यात आलं. शास्त्री व अयूब यांनी पत्राच्या दोन्ही प्रतींवर स्वाक्षऱ्या केल्या. जणू करारातील शांततेवरच स्वाक्षऱ्या झाल्या होत्या, शिक्कामोर्तब झालं होतं. टाळ्यांचा बराच वेळ कडकडाट झाला. सर्वांनी उभं राहून आनंद प्रकट केला.

सारे पुन्हा स्थानापन्न झाल्यावर कोसिजिन सांगता करताना म्हणाले,

*''एकमेकांना मान्य होईल अशा निर्णयांच्या शोधासाठी ज्या उत्साहातं, शांत चित्तानं आणि नेटानं पाकचे अध्यक्ष अयूबखान व भारताचे पंतप्रधान लालबहादुर*

*शास्त्री यांनी प्रयत्न केले त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. या निर्णयांच्या पूर्तीमुळं मैत्री व शांतता यांना बळकटी मिळेल. आज तुम्ही ज्या दस्तऐवजावर स्वाक्षरी केली तो भारत व पाकिस्तान यांच्या अक्षय मैत्रीचं प्रतीक बनावा अशी माझी इच्छा आहे.''*

कोसिजिन अयूबखान यांच्याजवळ गेले व हस्तांदोलन करून त्यांनी त्यांचं अभिनंदन केलं. मग शास्त्रींचे दोन्ही हात हातात घेऊन कोसिजिन म्हणाले, ''या घटनेमुळं भारत व सोविएट युनियन यांची शाश्वत मैत्री तसंच भारत व पाकिस्तान यांच्यातील मैत्री अधिक दृढ बनेल.'' शास्त्रींची प्रतिक्रिया साधीच, पण प्रामाणिक होती. ते म्हणाले, ''परिषदेच्या यशासाठी आणि हे सारं जमवून आणण्यासाठी तुम्ही केलेल्या प्रयत्नांबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहे.'' नंतर शास्त्री, अयूब व कोसिजिन हे एकत्र आले व एकमेकांचे हात धरून उभे राहिले. तिघांच्या चेहऱ्यावर हास्य झळकत होतं. या ऐतिहासिक परिषदेचे तिघेही सारखेच 'हीरो' होते.

परंतु हे सारं अखेरच्या क्षणी कसं घडून आलं? मोठ्या प्रमाणावर आर्थिक व लष्करी मदत करण्याची छुपी ऑफर दिली होती काय? त्यात काही धोका लपलेला आहे काय? त्यात काही गंभीर स्वरूपाची दटावणी दिली गेली काय? बावचळून गेलेले पत्रकार अशा स्वरूपाचे प्रश्न ताश्कंद करारावर स्वाक्षऱ्या झाल्यावर विचारीत होते. परंतु सत्य अगदीच साधं होतं. खरं तर अगदी ऐन वेळी झालेला हा निर्णय होता. कोसिजिन यांची 'जादू' व शास्त्रींच्या अटी स्वीकारण्याचा अयूब यांनी शेवटच्या क्षणी दाखवलेला समंजसपणा यामुळं अपयशाचं यशात परिवर्तन झालं होतं.

परंतु भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये शांतता व चांगले सुरळीत संबंध प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाजूंचा विचार करून तपशीलवार कराराचा मसुदा रात्रीच्या रात्री तयार होऊन त्याला उभय राष्ट्रांनी मान्यता दिली, हे कसं घडलं, याबाबत बरेच तर्कवितर्क व्यक्त केले जात होते. सर्वांत अवघड ठरलेल्या दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर एकदा एकमत झाल्यावर अन्य सर्व कलमं रात्रीच्या रात्री कशी तरी जमवून घेतली गेली असतीलही, असं काही पत्रकारांचं म्हणणं पडलं; परंतु ते खरं नव्हतं. भारतीय शिष्टमंडळानं ताश्कंदला येतानाच आपल्या कल्पनांवर आधारलेला घोषणापत्राचा मसुदा तयार करून आणला होता. कोसिजिन यांच्याही मतांचा काळजीपूर्वक विचार त्यात करण्यात आला होता. हा मसुदा कोसिजिन व ग्रोमिको यांना देण्यात आला. पाकिस्तानी प्रतिनिधींशी कलमवार चर्चा करताना हाच मसुदा आधारभूत म्हणून वापरण्यात आला होता. अयूब यांच्याशी अनेकदा झालेल्या प्रदीर्घ चर्चेच्या वेळी कोसिजिन व ग्रोमिको दोघांनी आपलं कौशल्य पणाला लावून बहुतेक कलमांना त्यांची संमती मिळवली होती. या चर्चेत सुचवण्यात आलेल्या दुरुस्त्या भारतीय शिष्टमंडळाला राजदूत कौल यांच्यामार्फत कोसिजिन व ग्रोमिको यांनी कळवल्या. कौल यांना अस्खलित रशियन भाषा येत होती. कोसिजिन व ग्रोमिको यांची मल्लीनाथी, सूचना लक्षात घेऊन

सी. एस. झा यांनी संपूर्ण मसुदा तयार केला व काही महत्त्वाच्या बाबींबाबत खुद्द शास्त्रींनी त्यात सुधारणा केल्या. याच मसुद्यात काश्मीरबद्दलचे व बळाचा वापर न करण्यासंबंधीचे परिच्छेद होते. त्याला शास्त्रींची मान्यता होती, पण त्या वेळी अयूब यांना ते पूर्णतः अमान्य होतं. हा तपशीलवार मसुदा अयूब व कोसिजिन यांना देण्यात आला. परंतु तो मिळताक्षणीच पाकिस्ताननं फेटाळून लावला. ते निव्वळ कागदाचं चिटोरं आहे, अशी त्याची संभावना पाक शिष्टमंडळानं केली होती. ते काही असलं तरी हा मसुदा हाताशी उपलब्ध होताच. तो दुरुस्त करून केव्हाही वापरणं शक्य होतं. या मसुद्यातील आशय हा वरवरचा आहे व त्याचा काही फारसा प्रभाव पडणार नाही असं पाक शिष्टमंडळाचं मत होतं. काश्मीरबाबत तोडगा निघणार नसेल तर करारच होणार नाही, अशी त्यांची भूमिका होती. अर्थात काश्मीर प्रश्न आणि बळाचा वापर न करणं याबाबत एकमत झालं तर मात्र अन्य कलमं फारशी खळखळ न करता त्यांना मान्य होती. तेव्हा संपूर्ण ताश्कंद घोषणापत्र हे काही अखेरच्या क्षणी जादूनं तयार करण्यात आलं नव्हतं किंवा काही पत्रकारांच्या म्हणण्यानुसार 'घाईघाईनं रात्रीच्या रात्री जमवलेलं नव्हतं. ८ जानेवारी रोजी दुपारी भारतीय शिष्टमंडळानं संबंधितांना हा मसुदा वाटला होता. पाकिस्तानी शिष्टमंडळानं तो फेटाळल्यावर ८-९ जानेवारीस तो जणू गाडून टाकण्यात आला. पण ९ व १० जानेवारीच्या मध्यरात्री कोसिजिन यांनी अगदी ऐन वेळी अयूब यांची मान्यता मिळवल्यावर तो उकरून काढण्यात आला. त्यानंतर सोविएट शिष्टमंडळानं अयूब व शास्त्री यांच्या स्वाक्षरीसाठी योग्य त्या नमुन्यानुसार व शैलीत तो इंग्रजी व रशियन भाषेत तयार करून घेतला.

–हेच ते घोषणापत्र :

## ताश्कंद करार

भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष ताश्कंद येथे एकत्र येऊन भारत व पाकिस्तान यांच्यातील सध्याच्या संबंधांची चर्चा करून आपल्या देशात सुरळीत व शांततेचे संबंध प्रस्थापित करण्याचा आणि आपल्या जनतेत सामंजस्य व मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याचा ठाम निर्धार व्यक्त करीत आहेत. भारत व पाकिस्तान यांच्या ६० कोटी लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनं या उद्दिष्टांची पूर्ती करणं त्यांना अत्यंत महत्त्वाचं वाटतं.

### १

युनोच्या सनदेनुसार भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये चांगले शेजारसंबंध निर्माण व्हावेत म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करण्याचं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे. सनदेनुसार आपसातील वाद बळाच्या जोरावर न सोडवता शांततापूर्ण मार्गांनी सोडवण्यावर ते आपली निष्ठा पुन्हा प्रकट करीत आहेत. आपल्या विभागात आणि विशेषत्वानं भारत-पाक उपखंडातील शांततेच्या हिताच्या दृष्टीनं

किंबहुना भारत व पाकिस्तानातील जनतेच्या हिताच्या दृष्टीनं उभय देशांत तणाव चालू ठेवणं इष्ट नाही असं त्यांना वाटतं. या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरची चर्चा झाली व त्यासंबंधी उभयतांनी आपापली भूमिका मांडली.

२

उभय देशांच्या सर्व सशस्त्र फौजा ५ ऑगस्ट १९६५ पूर्वी ज्या ठिकाणी होत्या तेथे २५ फेब्रुवारी १९६६ पर्यंत हलवण्याचं, तसंच युद्धबंदी रेषेवरही युद्धबंदीविषयक शर्ती पाळण्याचं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे.

३

एकमेकांच्या अंतर्गत बाबींत हस्तक्षेप न करण्याच्या तत्त्वावर भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध आधारलेले असतील असं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे.

४

एकमेकाविरुद्ध प्रचार करण्यास उभय देश प्रोत्साहन देणार नाहीत, तर दोन्ही देशांत मैत्रीपूर्ण संबंध वाढीला लावणाऱ्या प्रचाराला प्रोत्साहन देतील, असं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे.

५

भारताचे पाकिस्तानमधील उच्चायुक्त व पाकिस्तानचे भारतातील उच्चायुक्त यांनी पुन्हा आपापल्या पदावर रुजू व्हावं व उभय राष्ट्रांच्या दूतावासांचं नेहमीचं कार्य सुरळीत चालू करावं, असं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे. 'डिप्लोमॅटिक इंटरकोर्स' बद्दल १९६१ च्या व्हिएन्ना कराराचं उभय देश पालन करतील.

६

भारत व पाकिस्तान यांच्यातील आर्थिक व व्यापारी संबंध, दळणवळण, तसंच भारत व पाकिस्तान यांच्यातील सांस्कृतिक देवाणघेवाण या बाबी पूर्ववत चालू व्हाव्यात या दृष्टीनं पावलं टाकण्याचा विचार करण्याचं व भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील सध्याचे करार अमलात आणण्याच्या दृष्टीनं उपाययोजना करण्याचं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे.

७

आपापल्या देशातील युद्धकैद्यांना मायदेशी परत पाठवावं, असे आदेश योग्य त्या

अधिकाऱ्यांना देण्याचं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे.

८

निर्वासित, बेकायदा स्थलांतरित यांच्या प्रश्नाबाबत उभय राष्ट्रांनी चर्चा चालू ठेवावी, असं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं आहे. लोकांचे मोठ्या प्रमाणावरील लोंढे एकमेकांच्या हद्दीत ये-जा करणार नाहीत, यासाठी योग्य ती परिस्थिती निर्माण करण्याचं उभय राष्ट्रांनी मान्य केलं. संघर्षाच्या संदर्भात जर कोणाची मालमत्ता ताब्यात घेतली असेल तर ती परत करण्याविषयी चर्चा करावी, असंही ठरविण्यात आलं.

९

उभय देशांशी थेट संबंध पोचणाऱ्या बाबींबाबत सर्वोच्च व अन्य पातळीवर दोन्ही देश बैठकी घेणे चालू ठेवतील असं भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष यांनी मान्य केलं.सरकारला पुढील पावलं उचलण्यास उपयोगी होतील असे अहवाल सादर करणासाठी भारत व पाकिस्तान यांच्या संयुक्त समित्या स्थापन करण्याची गरज उभय देशांना पटली आहे.

१०

समाधानकारक फलश्रुतीनं सांगता झालेल्या या बैठकीत विधायक, मैत्रीपूर्ण व उदात्त भूमिका बजावल्याबद्दल सोविएट युनियनचे नेते, सोविएट सरकार व व्यक्तिशः सोविएट मंत्रिमंडळाचे अध्यक्ष यांच्याविषयी मनःपूर्वक कृतज्ञतेची व प्रशंसेची भावना भारताचे पंतप्रधान व पाकिस्तानचे अध्यक्ष नमूद करू इच्छितात. उझ्बेकिस्तान सरकार व जनता यांनी केलेलं जोरदार स्वागत व उदार आतिथ्य याबद्दलही ते आभार प्रकट करीत आहेत.

सोविएट युनियनचं मंत्रिमंडळ व त्याचे अध्यक्ष यांना या कराराच्या घोषणासमयी उपस्थित राहण्यासाठी ते पाचारण करीत आहेत.

| | |
|---|---|
| **भारताचे पंतप्रधान** | **पाकिस्तानचे अध्यक्ष** |
| लालबहादुर शास्त्री | मोहम्मद अयूबखान |

ताश्कंद– १० जानेवारी १९६६.

□□



।। अठ्ठावीस ।।

# ऐतिहासिक कामगिरी

ताश्कंद येथील यशाचे अनेक अर्थ होते. पहिलं म्हणजे भारत व पाकिस्तान यांच्यात शांततेची पुनर्स्थापना होऊन युद्धाचा धोका टळला. युनोच्या सुरक्षा समितीच्या ठरावानुसार शांतता प्रस्थापित झाल्यानं ती जणू सन्माननीय मार्गानं आली. परिषदेत सहभागी झालेल्या तिघांचं हे यश होतं. ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीच्या जागी सशस्त्र लष्कर सहा आठवड्यांत (म्हणजे २५ फेब्रु. १९६६ पर्यंत) हलवण्यास दोन्ही बाजूंनी मान्यता दिली. युद्धबंदी रेषा ही उल्लंघनीय नाही हे मान्य करण्यात आलं. दोघांतील मतभेद बळाचा वापर न करता शांततामय मार्गानं सोडवण्याचं दोन्ही राष्ट्रांनी मान्य केलं. ताश्कंद करारातील ही एक महत्त्वाची तरतूद आहे, असं कोसिजिन यांचं मत होतं, असं झामियातिन यांनी मला सांगितलं. एस. एम. युसुफ (जे पुढं अझिझ अहमद यांच्यानंतर पाकिस्तानचे परराष्ट्र सचिव बनले) यांनी ताश्कंद इथे 'ना युद्ध करारा'चं मूलतत्त्व पाकिस्ताननं स्वीकारलं, बाकी सारा शब्दांचा खेळ आहे असं मत व्यक्त केलं.

दुसरं म्हणजे एकमेकांविरुद्ध प्रचार न करता स्नेहभाव वाढीला लावणाऱ्या प्रचाराला प्रोत्साहन द्यावं यावर दोघांचं एकमत झालं. उभय देशांत पुनश्च राजनैतिक संबंध प्रस्थापित केले जाणार होते आणि उच्चायुक्त पुन्हा आपापल्या जागी रुजू होणार होते. आर्थिक व व्यापारी संबंध व सांस्कृतिक देवाण-घेवाण यांविषयी पावलं टाकण्यात येणार होती. त्यासंबंधीचे सध्याचे करार अमलात आणले जाणार होते. युद्धकैद्यांची

पाठवणी होणार होती. निर्वासित व बेकायदा स्थलांतरित यांचे प्रश्न, लढाईच्या काळात ताब्यात घेतलेली मालमत्ता परत करणं आदी गोष्टींचा विचार करण्याचं ठरलं होतं. सर्वोच्च व अन्य पातळ्यांवर अधूनमधून बैठकी घेण्याचंही उभय राष्ट्रांनी ठरवलं होतं.

या सर्व बाबींचा विचार केला तर ताश्कंद इथे अपेक्षेपेक्षा फार व्यापक, तपशीलवार करार झाला असं म्हणावं लागेल. करारातील आरंभीच्या परिच्छेदांवर शास्त्री खूष होते. त्यात केवळ सीमेवर शांतता पाळण्याचं मान्य करण्यात आलं नव्हतं, तर दोन्ही राष्ट्रांनी त्याहून खूप काही मान्य केलं होतं. १० जानेवारी १९६६ रोजी भोजनाच्या वेळी अयूब शास्त्रींना म्हणाले, ''आपल्याला गरज वाटेल तितक्या वेळा व मध्यस्थाविना एकमेकांशी बोलता यावं म्हणून उभयतात थेट टेलिफोन सेवा हवी.'' त्यांची ही सूचना शास्त्रींनी लगेच मान्य केली. ''कुठं काही चुकतं आहे असं वाटेल तेव्हा किंवा मी काही करावं असं वाटत असेल तेव्हा कृपा करून आपण माझ्याशी या 'हॉट लाइन'वर संपर्क साधा.'' असं अयूब यांनी शास्त्रींना सांगितलं. एवढंच नव्हे, तर उद्या भारतात परतताना वाटेत रावळपिंडीला चहासाठी थांबावं अशी विनंतीही त्यांनी केली. त्यामुळं उभय देशांच्या संबंधांतील नवं पर्व सुरू झालं आहे अशी ग्वाही मिळेल असं त्यांचं म्हणणं होतं!

शास्त्रींची दुसऱ्या दिवशी अफगाणिस्तानला भेट ठरलेली होती. त्यामुळं वाटेत रावळपिंडीला थांबणं शक्य नव्हतं. परंतु शक्य तितक्या लवकर आपण पाकिस्तानला भेट देऊ, असं त्यांनी अयूबना आश्वासन दिलं.

तरीही अयूबखान यांच्या मनात काश्मीरबाबतच्या महत्त्वाकांक्षा अजूनही लहरत आहेत असं आपलं मत असल्याचं शास्त्रींनी मला सांगितलं. अयूब सहजासहजी या महत्त्वाकांक्षा सोडणं शक्य नव्हतं. पाकनं भावी काळात भारताशी संबंध कसे ठेवावे याविषयी मात्र अयूब यांच्या मतात मूलभूत परिवर्तन झालेलं दिसतं असं शास्त्रींचं म्हणणं होतं. शास्त्रींचा पारदर्शी प्रामाणिकपणा, त्यांची सौजन्यपूर्ण वागणूक, एखादा मुद्दा पटवण्याचं त्यांचं कौशल्य यांचा प्रभाव अयूब यांच्यावर पडलेलाही दिसून आला. विद्वेष, छुपा दहशतवाद, बळाचा वापर आदी धुर्तोचं धोरण वापरून काश्मीरचा ताबा मिळणार नाही हे अयूबना उमजलं असावं. अलीकडील युद्ध हे तर अरिष्टच ठरलं याचीही जाणीव त्यांना झाली होती. त्यामुळं शास्त्रींबद्दल मनापासून वाटणाऱ्या जिव्हाळ्याच्या आधारे अयूब यांनी नव्यानं आरंभ करायचं ठरवलं असावं असं समजायला हरकत नाही. शास्त्रींचं निधन झालं नसतं तर भारत-पाक संबंधांचं नेमकं काय झालं असतं याबद्दल आता केवळ तर्कच करणं शक्य आहे. तरीही शास्त्री जर जिवंत राहिले असते तर त्यांनी व अयूब यांनी या नव्या संबंधांना बळकटी आणण्याचे प्रयत्न केले असते असं म्हणता येईल.

ताश्कंद करार करण्याचा निर्णय हे धाडसाचं व मुत्सद्देगिरीचं प्रतीक आहे अशी प्रतिक्रिया आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटली. मुत्सद्दी नेत्यांच्या समंजसपणाचा निदर्शक

असं या कराराचं वर्णन अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांनी केलं. ब्रिटनच्या 'द गार्डियन' या वृत्तपत्रानं हा करार म्हणजे 'एक धिटाईचा प्रयत्न' आहे असं म्हटलं. त्याच्या प्रतिनिधीनं लिहिलं होतं :

*ताश्कंद वाटाघाटी (शास्त्रींच्या निधनाचं वृत्त यायच्या आधी) इतक्या यशस्वी होतील अशी अपेक्षा कोणीही बाळगली नव्हती. याचं श्रेय पंतप्रधान कोसिजिन यांचं पाठपुरावा करण्याचं कौशल्य आणि लालबहादुर शास्त्री व अध्यक्ष अयूबखान यांनी दाखवलेलं सामंजस्य व सदिच्छा यांना जातं. युद्धाला पुन्हा तोंड फुटलं तर ते आपल्या देशांना किती हानिकारक ठरेल याची उभय नेत्यांना कल्पना होती. वाद सोडविण्यासाठी बळाचा वापर करणार नाही, असं त्यांनी युनोची सदस्य राष्ट्रं म्हणून आश्वासन दिलं असून त्यांच्या प्रामाणिकतेबद्दल शंका बाळगायचं कारण नाही. आपल्यातील शीत युद्धामुळं रोजच्या रोज उद्‌भवणाऱ्या वास्तव गुंतागुंतीचंही त्यांना चांगलं भान आलं असावं. त्यामुळं त्यांनी राजनैतिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध सुरळीत करण्याच्या दिशेनं ताश्कंद परिषदेत पाऊल टाकलं आहे. या बैठकीतून दुसरं काही निष्पन्न झालं नाही तरी त्यांनी नव्यानं सुरुवात केली आहे एवढं देखील मोलाचं आहे!"*

'लंडन टाइम्स'च्या दिल्लीच्या वार्ताहरानं लंडनला पाठवलेल्या वार्तापत्रात (११ जाने. ६६) म्हटलं होतं :

*"दिल्लीतील आजच्या सकाळच्या वृत्तपत्रांत ताश्कंद वाटाघाटी फिसकटणार असं तिथे गेलेल्या वार्ताहरांचे एकमुखी वृत्तांत प्रसिद्ध झाले. आज रात्री मात्र वृत्तपत्रांनी खास आवृत्त्या काढून 'ताश्कंद घोषणापत्र' म्हणजे महान राजकीय विजय असं जाहीर केलं. अर्थात ते खरंच आहे.*

*त्यामुळं मिळालेल्या दिलाशात गूढता सामावली आहे आणि हे अद्‌भुत घडलं तरी कसं, असा प्रश्न विचारला जात आहे. हे घोषणापत्र म्हणजे भारताचे पंतप्रधान शास्त्री व सोविएट पंतप्रधान अलेक्सी कोसिजिन यांचा विजय आहे असं मानलं जातं. मात्र पाकचे अध्यक्ष अयूबखान हे स्वाक्षरी करायला तयार कसे झाले याचं लोकांना कोडं पडलं आहे.*

*काश्मीर प्रश्न हा वाटाघाटीसाठी खुला नाही, ही भूमिका भारतानं सोडून दिलेली नाही. तसंच बळाचा वापर केला जाणार नाही हे बंधन उभय राष्ट्रांनी मान्य केलं. त्यामुळं भारतानं 'ना युद्ध करारा'ची केलेली मागणीच जणू जवळपास स्वीकारली गेली आहे.*

*पाकिस्तानला यातून काय लाभ झाला? ५ ऑगस्टपूर्वीच्या जागी फौजा माघारी घेण्याचं मान्य झाल्यामुळं पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील हाजीपीर खिंड येथून भारतीय फौजा मागं घ्याव्या लागतील, त्याबाबत इथे निषेधाचा सूर प्रकट*

*होण्याचा संभव आहे.*

*अर्थात सर्वसाधारण प्रशंसेच्या कोलाहलात अशा तक्रारींचे सूर विरून जातील. गेल्या ऑगस्टमध्ये काश्मीर खोऱ्यात घुसलेल्या गनिमांची जबाबदारी अयूब यांनी ताश्कंद इथे स्वीकारली हे जर खरं असेल व त्यांनी बळाचा वापर न करण्याची तयारी दर्शवली असेल तर भारताला हाजीपीरचा ताबा आपल्याकडे ठेवणं शक्यही झालं नसतं.*

*शास्त्रींनी पार पाडलेल्या भूमिकेला दाद मिळालेलीच आहे. तसंच ताश्कंद घोषणापत्रामुळं या तणावग्रस्त उपखंडात नवं पर्व सुरू होणार असेल तर त्याचं श्रेय अयूबखान यांनाही द्यायला हवं.*

*भारत व पाकिस्तान यांना अमेरिकन आर्थिक मदत पुन्हा सुरू करण्याबाबतच्या साऱ्या अटी ताश्कंद घोषणापत्रामुळं पुऱ्या झालेल्या दिसतात.''*

हे वार्तापत्र मुद्दाम मी जसंच्या तसं दिलं याचं कारण ताश्कंद घोषणापत्रामुळं दिल्लीत व एकूण भारतात उमटलेल्या प्रतिक्रियांचं अचूक प्रतिबिंब त्यात पडलं आहे.

हाजीपीर खिंड व अन्य ठाणी यांबद्दल विचारता शास्त्री म्हणाले की, बळाचा वापर न करणं व युद्धबंदीविषयक शर्तींसह युद्धबंदी रेषेचं पालन करणं याला उभय राष्ट्रांनी संमती दिली असल्यानं युनोचे महासचिव ऊ थांट यांना आपण लिहिलेल्या पत्रातील अटींची पूर्तता झाली आहे असं मी मानतो. याच संदर्भात फौजा मागं घेण्यासंबंधीच्या २० सप्टेंबरच्या युनोच्या सुरक्षा समितीच्या ठरावानुसार कृती करण्यास शास्त्रींनी मान्यता दिली होती. उपखंडातील व्यापक शांतता व सौहार्द लक्षात घेऊन ताश्कंद करार करण्यात आला आहे, असंही पंतप्रधानांनी सांगितलं.

१० जानेवारी रोजी वृत्तपत्रांनी काढलेल्या खास अंकांत तसंच आकाशवाणीवरील बातम्यांत हाजीपीर खिंडीतून फौजा मागं घेण्यात येणार हे वृत्त देण्यात आलं खरं, परंतु हा निर्णय घेण्यामागील पार्श्वभूमी विशद करण्यात आली नाही. कारण ती तेव्हा ठाऊक नव्हती. ताश्कंद कराराचं वृत्त समजताच भारतातील काही विरोधी पक्षनेत्यांनी तत्काळ प्रतिक्रिया व्यक्त केली. हा करार म्हणजे 'विश्वासघात' आहे, असं मत व्यक्त करून हे नेते म्हणाले, ''फौजांनी जे कमावलं होतं ते राजकीय नेत्यांनी गमावलं आहे.'' हा उल्लेख हाजीपीर खिंडीबद्दल होता हे उघड आहे. शास्त्री व त्यांचं मंत्रिमंडळ यांनी परिस्थितीची लष्करी व राजकीय वास्तवता लक्षात घेतलेली होती. सुरक्षा समितीच्या ठरावाचं पालन करण्यास त्यांनी नाराजीनं पण पूर्णतः राष्ट्रीय हित लक्षात घेऊनच संमती दिली होती. वाटाघाटींतील दुबळेपणापायी हाजीपीर खिंड देऊन टाकलेली नव्हती. तसंच काही टीकाकारांनी म्हटल्याप्रमाणं उदार होऊन हाजीपीर खिंड देण्याचाही प्रश्न नव्हता. तसंच या खिंडीवर ज्या जवानांनी अतुलनीय धैर्य दाखवून कब्जा मिळवला होता त्यांचं शौर्य कमी लेखलं गेलं असाही याचा अर्थ नव्हता. आता शांतता अत्यावश्यक आहे असा लष्कराच्या व हवाई दलाच्या प्रमुखांनी

सल्ला दिल्यामुळं हा निर्णय घेण्यात आला होता.

या संदर्भात त्या वेळचे लष्कराचे उपप्रमुख व भारतीय शिष्टमंडळाचे एक सदस्य जनरल पी. पी. कुमारमंगलम यांच्याशी मी चर्चा केली. (आता जनरल कुमारमंगलम हे लष्कराचे सरसेनानी या पदावरून निवृत्त झाले आहेत.) हाजीपीर खिंड ताब्यात ठेवणं लष्कराला साहजिकच आवडलं असतं. परंतु त्यासाठी शांतता धोक्यात घालणं व पुन्हा युद्धाचा धोका पत्करणं इष्ट नाही असं जनरल कुमारमंगलम म्हणाले. त्यांचं म्हणणं असं : "आरंभी शास्त्रींचं मत हाजीपीर खिंडीचा ताबा सोडू नये असंच होतं. परंतु अन्य कोणत्याही कारणानं नव्हे, तर केवळ देशाचं हित लक्षात घेऊन त्यांनी आपलं मत बदलण्याचं धाडस दाखवलं." या संदर्भात कोसिजिन यांनी मांडलेली कारणमीमांसा अगदी अचूक होती, असंही ते म्हणाले.

याबद्दल पुन्हा खात्री करून घ्यावी म्हणून मी एअरचीफ मार्शल अर्जुनसिंग यांना विचारलं, तेव्हा ते म्हणाले, "हाजीपीर खिंडीबाबत बोलायचं तर त्याच्या लष्करी दृष्ट्या असलेल्या महत्त्वापेक्षा त्याला अकारण जादा भावनिक महत्त्व प्राप्त झालं होतं." या खिंडीचा ताबा ठेवण्यापेक्षा शांतता महत्त्वाची आहे, तेव्हा तिथून फौजा काढून घ्याव्यात असा सल्ला पंतप्रधान शास्त्रींना आपण दिला होता, या माहितीलाही त्यांनी दुजोरा दिला.

□□



।। एकोणतीस ।।

## ते अंतीम क्षण...

कोसिजिन यांनी १० जानेवारी रोजी रात्री स्वागत समारंभ आयोजिलेला होता. त्याला हजर राहण्यापूर्वी शास्त्रींनी भारतीय वृत्तपत्र प्रतिनिधींशी थोडा वेळ चर्चा केली. मग त्यांनी कोसिजिन यांची भेट घेतली. त्यानंतर थोडा वेळ विश्रांती घेतली. संध्याकाळी ७.३० वाजता ते आपल्या निवासस्थानावरून निघाले. मी त्यांच्यासमवेत गाडीत बसलो. ते प्रसन्नचित्त होते. रात्री ८ वाजल्यानंतर काही क्षणांतच आम्ही स्वागत समारंभाच्या जागी पोचलो. कोसिजिन यांनी आमचं स्वागत केलं. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता. हस्तांदोलनांची नेहमीची देवाण-घेवाण झाली. पण या वेळी त्यात अधिक ऊब होती. एकूण वातावरण विजयोत्सवाचं होतं आणि प्रत्येक जण दुसऱ्याचं अभिनंदन करीत होता. अयूब हे भुत्तो व असगर खान यांच्यापेक्षा अधिक आनंदित दिसत होते.

रात्री ९.४५ च्या सुमारास शास्त्री परत जाण्याच्या इराद्यानं निघाले. अयूब यांचा त्यांनी ज्या प्रेमभरानं निरोप घेतला तो पाहताना परस्परांना एकमेकांबद्दल मनापासून आदर वाटतो आहे असं जाणवत होतं. अयूब म्हणाले, "खुदा हाफिज." शास्त्रीही उत्तरले, "खुदा हाफिज." शास्त्री पुढं म्हणाले, "अच्छा ही हो गया." अयूब उत्तरले, "खुदा अच्छा ही करेगा."

शास्त्रींनी हस्तांदोलन करून बऱ्याच जणांचा निरोप घेतला. कोसिजिन यांच्याशी ते बोलले व आपल्या मोटारीत जाऊन बसले. मीही त्यांच्या समवेतच परतलो.

आपल्या कामात यश आलं याबद्दल गाडीत बोलताना त्यांनी समाधान प्रकट केलं.

आम्ही परतत असताना ताश्कंदच्या रस्त्यावर जमलेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर उसळलेले आनंदाचे भाव मला अजून आठवतात. आपल्या शहरातील महत्त्वाची परिषद यशस्वी झाल्याबद्दल लोकांना आनंद झाला होता. 'शास्त्री, शास्त्री' अशा घोषणा ते देत होते व हात हलवून पंतप्रधान त्यांना प्रतिसाद देत होते.

रात्री सुमारे १०.१५ वाजता आम्ही निवासस्थानी पोचलो. नंतर त्यांच्या अभ्यासिकेत आम्ही बसलो. दुपारच्या भोजनाच्या वेळी अयूब यांच्याशी झालेल्या चर्चेचं त्यांना स्मरण झालं. संबंधाचं एक नवं पर्व सुरू करण्याबाबत उभय नेत्यांत त्याच वेळी एकमत झालं होतं. त्याची माहिती त्यांनी दिली. सुमारे दहा मिनिटं आमचं बोलणं झाल्यावर शास्त्री म्हणाले, "गेले काही दिवस रोजच आपण मध्यरात्रीनंतर झोपायला जात आहोत, आज लवकर झोपू या. उद्या सकाळी काबूलला जायचं आहे. तिथे फारच गारठा असेल. तेव्हा तुम्ही भरपूर गरम कपडे घातलेले बरे." मी म्हणालो, "ती काळजी मी घेईन, परंतु मला अजून एके ठिकाणी जायचं आहे. इथून काही मैलांवर असलेल्या एका हॉटेलात भारतीय शिष्टमंडळ पत्रकारांना भेटणार असून मला तिथे हजर राहायला सांगण्यात आलं आहे. तेव्हा मला लगेच निघायला हवं." त्यावर तिथे जाणं महत्त्वाचं आहे, तेव्हा तुम्ही निघा, असं शास्त्रींनी सांगितलं. "पण तुम्ही जाणार कसे?" त्यांनी विचारलं. "माझ्यासाठी गाडी तयार आहे. ती मला घेऊन जाईल आणि परत आणून सोडील." मी उत्तर दिलं. त्यावर काळजीच्या सुरात ते म्हणाले, "आताच केवढी थंडी पडली आहे! तुमच्यासाठी असलेली गाडी कितपत चांगली आहे हे मला ठाऊक नाही. तेव्हा तुम्ही माझ्या गाडीतून जा व तिच्यातूनच परत या."

असं म्हणत ते स्वतः बाहेरच्या दरवाज्यापाशी माझ्यासमवेत आले. त्यांच्याच गाडीतून मी जावं असा आग्रह त्यांनी धरला व आपल्या ड्रायव्हरला त्यांनी तशी सूचनाही दिली. शास्त्रींच्या त्या प्रेमळ वागणुकीनं मी भारावून गेलो. मी त्यांच्या मोटारीत जाऊन बसलो. गाडी सुरू झाली. मी बाहेर पाहिलं तेव्हा शास्त्री हात हलवीत माझा निरोप घेत होते. जणू ते आशीर्वाद देत होते. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकत होतं. पण दुर्दैवानं ते त्यांचं अखेरचंच दर्शन ठरलं.

मी हॉटेलवर वेळेवर जाऊन पोचलो. आधी ज्येष्ठ भारतीय पत्रकारांबरोबर बैठक होती. त्यानंतर विदेशी पत्रकारांची भेट ठरली होती. पत्रकार परिषद संपल्यावर मी भारतीय शिष्टमंडळ उतरलं होतं त्या 'इनटूरिस्ट' हॉटेलातील माझ्या खोलीवर आलो. पंतप्रधान राहत होते तिथून ही जागा अडीचशे यार्डांवर होती व तिथे जायला सरळ रस्ता होता. मी झोपायला जाणार इतक्यात फोन खणखणला. "पंतप्रधान अचानक आजारी झाले असून तुम्ही ताबडतोब या," असं थरथरत्या आवाजात जगन्नाथ सहाय यांनी मला सांगितलं. मी अक्षरशः धावतच सुटलो व तीन-चार मिनिटांतच तिथे पोचलो. प्रवेशद्वाराजवळ उभा असलेला सोविएट रक्षक पार हादरलेला होता. मला पाहताच तो धावत पुढं आला व म्हणला, "तुमच्या पंतप्रधानांची अवस्था फार वाईट

आहे, फार वाईट.'' माझ्या काळजाचा थरकाप झाला. मी त्यांच्या शय्यागृहात धावतच घुसलो. तेथील दृश्यावर माझा विश्वासच बसेना. नाही, नाही, हे खरं असणं शक्य नाही, असं मी माझ्या मनाला बजावत होतो. असं कसं घडू शकेल? जेमतेम तीन तासांपूर्वी मी त्यांचा निरोप घेतला, तेव्हा ते अगदी प्रसन्न होते, त्यांची प्रकृतीही चांगली होती. पंतप्रधानांचा रात्री कसलाही कार्यक्रम नव्हता. हे एखादं अनिष्ट स्वप्न ठरावं अशी मी मनोमन प्रार्थना केली. परंतु मी पाहत होतो ती भयंकर दुर्दैवी घटना खरी होती. पंतप्रधानांचा प्राणपक्षी उडून गेला होता.

माझ्या आयुष्यातील तो अत्यंत दुःखदायी क्षण होता. शय्येवर पंतप्रधानांचा केवळ अचेतन देह होता. त्यांचे वैयक्तिक मदतनीस एम. एम. एन. शर्मा यांच्या मांडीवर त्यांचं डोकं होतं. डॉ. चुग अजूनही त्यांच्यात प्राण जागे करण्याचा एका बाजूला प्रयत्न करीत होते, तर दुसऱ्या बाजूला आपली असहाय्यता, निराशा असंबद्धपणं प्रकट करीत होते. "मी पंतप्रधानांचे प्राण वाचवू शकलो नाही,'' असं त्यांनी मला सांगितलं. नंतर त्यांना दुःखावेग आवरता येईना. साऱ्याच जणांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. थोड्याच वेळात सोविएट डॉक्टर येऊन दाखल झाले व हृदयक्रिया पुन्हा चालू व्हावी यासाठी प्रयत्न करू लागले. पण यश आलं नाही.

एकापाठोपाठ एकेक नेते येऊन दाखल होऊ लागले. सरदार स्वर्णसिंग, यशवंतराव चव्हाण, सी. एस. झा., एल. पी. सिंग, एल. के. झा, टी. एन. कौल आणि भारतीय शिष्टमंडळाचे बाकी सदस्य तिथे धावत आले. काही क्षणांतच पंतप्रधान कोसिजिन आले. त्यांनाही आमच्याइतकंच दुःख झालं होतं. त्यांनी आपलं दुःख व्यक्त केलं व ते प्रत्येकाचं सांत्वन करू लागले. थोड्या वेळानं अयूबखान आले. त्यांनाही जबर दुःख झाल्याचं जाणवत होतं. शास्त्रींच्या निधनाच्या बातमीनं धक्का बसलेले भारतीय पत्रकार गटागटानं येऊन दाखल झाले. त्यांत कुलदीप नय्यर, इंदर मल्होत्रा, क्रिशन भाटिया, जी. के. रेड्डी, देव मोरारका आदींचा समावेश होता.

कोसिजिन काही मिनिटांसाठी आपल्या घरी गेले व ग्रोमिको व मॅलिनोवस्की यांच्यासमवेत परतले. कोसिजिन म्हणाले, "शांततेसाठी जे जे शक्य होतं ते ते त्यांनी सर्वतोपरी केलं. ते महान नेते होते, आपल्या काळातील मोठे मानवतावादी नेते होते... आपल्या जनतेसाठी खूप काही करण्याची त्यांची इच्छा होती.'' पंतप्रधानांच्या छायाचित्रासमोर सांत्वन पुस्तिका ठेवण्यात आली होती. त्यावर सर्वप्रथम कोसिजिन यांनी सही केली. त्यानंतर ग्रोमिको यांनी सही केली. त्यांच्या पाठीमागं पत्रकार वॅरिन उन्ना होते, पण परराष्ट्रमंत्र्यांनंतर सही करू इच्छिणाऱ्या मार्शल मॅलिनोवस्की यांना त्यांनी पुढं होऊ दिलं.

नंतर ते सारे रांगेनं पंतप्रधानांच्या शय्यागृहात गेले. सर्वांत पुढं सरदार स्वर्णसिंग होते. शय्येवर शास्त्रीजींचा देह शांतपणं पडलेला होता. त्यांचे डोळे पूर्णपणं मिटलेले नव्हते. ओठही काहीसे उघडलेले होते. त्यांचे करडे केस उघडे पडले होते. त्यांची नेहमीची गांधी टोपी डोक्यावर नव्हती. देहावर तिरंगी झेंडा आच्छादलेला होता.

क्षणभर खाली मान झुकवून सर्वांनी श्रद्धांजली वाहिली.

पंतप्रधानांच्या निधनाचं वृत्त भारताच्या राष्ट्रपतींना तत्काळ कळवण्यात आलं होतं.

पंतप्रधानांच्या कुटुंबियांना हे वृत्त कळवण्याची जबाबदारी माझी होती. पंतप्रधानांचे सर्वांत ज्येष्ठ पुत्र हरिकृष्ण शास्त्री यांना मी ते अविश्वसनीय वृत्त कळवलं. टेलिफोनवर त्यांचा शोक ऐकून माझ्या काळजाचं पाणी झालं.

उझबेकचे उपआरोग्यमंत्री डॉक्टर ऑफ मेडिसिन प्रा. यू. ए. अरियॉव यांच्या नेतृत्वाखालील रशियन डॉक्टरांच्या पथकाला डॉ. आर. एन. चुग हे मदत करीत होते. हृदयक्रिया पुन्हा चालू करण्यासाठी जे शक्य होतं ते त्यांनी केलं, पण अखेर त्यांनी जाहीर केलं की शास्त्रींचं निधन 'इन्फार्क्ट मिओकार्ड'चा म्हणजेच हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानं झालं आहे. त्यांनी दिलेल्या अहवालात शेवटी म्हटलं होतं :

"पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांना पूर्वी देखील हृदयविकाराचा झटका आला होता आणि १० ते ११ जानेवारी १९६६ च्या रात्री सुद्धा त्यांना तसाच तीव्र झटका आला हे लक्षात घेता, त्याच तीव्र झटक्यानं त्यांना मृत्यू आला असं म्हणता येईल."

प्रेताची दुर्गंधी येऊ नये म्हणून देहावर एक विशिष्ट प्रक्रिया करण्यात येते (*embalming*) ती डॉक्टरांनी त्वरित करून ठेवली.

शास्त्रींना त्यापूर्वी १९५९ मध्ये व जून १९६४ मध्ये हृदयविकाराचे झटके आले होते हे सर्वांना ठाऊक असल्यानं शास्त्रींना हृदयविकाराचा झटका आल्यानं त्यांचं निधन झालं या डॉक्टरांच्या अहवालाबद्दल भारतीय शिष्टमंडळाच्या मनात काही शंका येण्याचा प्रश्न नव्हता.

हळूहळू वेळ निघून गेला व पहाट झाली. दिल्लीला जाण्यासाठी पंतप्रधानांचं कलेवर विमानतळावर नेण्याची व्यवस्था करण्यात आली.

## अखेरची यात्रा

पंतप्रधान शास्त्रींचा देह एका शवपेटिकेत ठेवण्यात आला होता. ती शवपेटिका तोफगाडीवर ठेवण्यात आली. सुमारे नऊ वाजता पंतप्रधान कोसिजिन हे त्यांची कन्या लुदमिला ग्रिशानी व उझबेकच्या अध्यक्षा मादाम नसरुद्दिनोव्हा यांच्यासमवेत आले. मुख्य प्रवेशद्वारापर्यंत ते तोफगाडीबरोबर चालत गेले. सोविएट व उझबेकिस्तान सरकारांच्या वतीनं त्यांनी पुष्पचक्रं वाहिली. अन्य संघटनांच्या वतीनंही पुष्पचक्रं ठेवण्यात आली. त्यानंतर शोकयात्रा विमानतळाच्या दिशेनं निघाली. १७ किलोमीटर लांबीच्या मार्गावर दुतर्फा ताश्कंदचे नागरिक निःस्तब्धपणं उभे होते. त्यांच्या चेहऱ्यांवर शोकाचं दाट सावट होतं, महिलांना अश्रू आवरत नव्हते. आदल्याच दिवशी ज्या नेत्याचा आनंदानं जयजयकार केला त्याला दुसऱ्याच दिवशी अंतिम निरोप देण्याची पाळी आली होती. सुमारे दहा लक्ष लोक जमले होते. भारतीय, पाकिस्तानी, सोविएट व उझबेकी ध्वज अर्ध्यावर फडकत होते.

शोकयात्रा विमानतळावर पोचली तेव्हा पाकचे अध्यक्ष अयूबखान सोविएट नेत्यांसमवेत शास्त्रींना अंतिम श्रद्धांजली वाहण्यासाठी हजर होते. तोफगाडीवरून शवपेटिका काढण्यात आली. कोसिजिन व अयूबखान यांनी ती खांद्यावर घेतली व ती ते विमानाकडे घेऊन निघाले. आदल्या दिवशी युद्धात शत्रू असलेला नेता दुसऱ्या दिवशी जिव्हाळ्याचा दोस्त बनला व तिसऱ्या दिवशी अश्रू ढाळणारा शवपेटिकेचा वाहक ठरला, असं उदाहरण जगाच्या इतिहासात क्वचितच असेल. अयूबखान यांना अतीव दुःख झालं आहे हे मी स्वतः न्याहळत होतो.

शास्त्रींचा देह सोविएट विमानात चढवण्यात आला आणि तोफांची सलामी देण्यात आली. एका वाद्यवृंदानं शोकसंगीताचे सूर आळवले व शस्त्रं उलटी करून सोविएट युनियनचे सशस्त्र जवान उभे राहिले. विमान दिल्लीला जाण्यासाठी सकाळी ११ वाजता निघालं, तेव्हा कोसिजिन व अयूब यांच्यासमवेत ग्रोमिको व मॅलिनोव्हस्कीही हजर होते.

## दिल्लीत आगमन

११ जानेवारी रोजी दुपारी २.३० च्या सुमारास रशियाचं विमान दिल्लीला पोचलं. विमानाचा दरवाजा उघडताच तेथील जमावानं 'लालबहादुर की जय'च्या घोषणा सुरू केल्या. विमानातून सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण व स्वर्णसिंग खाली उतरले. विमानतळावर आलेला शास्त्रींचा मुलगा हरिकृष्ण याच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहत होते. यशवंतराव चव्हाण त्याला घेऊन विमानात आले. आपल्या पित्याच्या अचेतन देहाला त्यानं वंदन केलं. त्याला दुःखावेग आवरत नव्हता. चव्हाण यांनी त्याचं सांत्वन केलं व त्याला पुन्हा विमानतळावर नेलं.

शास्त्रींचा देह विमानातून खाली आणण्यात आला. त्यांचा चेहरा स्पष्ट दिसत होता. त्यांचं डोकं उशीवर ठेवलेलं होतं. फुलांनी सजवलेली तोफगाडी सज्ज होती. लष्कराच्या तिन्ही दलांचे प्रमुख जनरल चौधरी, एअर मार्शल अर्जुनसिंग व व्हाइस अॅडमिरल चतर्जी आणि तिन्ही दलांतील एकेक ज्येष्ठ अधिकारी अशा एकूण सहा जणांनी शवपेटिका खांद्यावर घेतली होती. शस्त्रं उलटी करून सैनिकांची तुकडी खडी होती. शवपेटी तोफगाडीकडे नेली जात असताना राष्ट्रपती राधाकृष्णन, उपराष्ट्रपती झाकिर हुसेन, हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा व त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी, दिल्लीला तोवर पोचू शकलेले राज्यपाल व मुख्य मंत्री, राजदूत व उच्चायुक्त यांनी निःस्तब्धपणं व माना झुकवून श्रद्धांजली वाहिली.

माझी पत्नी निर्मला विमानतळावर पोचली होती व शास्त्रींच्या कुटुंबियांचं आपल्या परीनं शक्य होईल तेवढं सांत्वन करीत होती. त्यांच्याचप्रमाणं आमचीही भरून न येणारी हानी झाली होती.

पंतप्रधानांच्या १०, जनपथ या अधिकृत निवासस्थानाच्या दिशेनं तोफगाडीचा प्रवास सुरू झाला. वाटेत सुमारे दहा लाखांहून अधिक लोक आपल्या लाडक्या

नेत्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी लोटले होते. शास्त्रींना लोक भारताच्या नव्या चैतन्याचं प्रतीक मानीत व त्यांच्याबद्दल त्यांना खूप आत्मीयता वाटे. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अतीव दुःख दाटलेलं होतं.

१०, जनपथ इथे जेव्हा शोकयात्रा पोचली, तेव्हा आपल्या पतीच्या देहाला स्पर्श करताच श्रीमती ललिता शास्त्री कोसळूनच पडल्या. त्यांचं कोणीच सांत्वन करू शकत नव्हतं. तो क्षण सर्वांत शोकाकुल होता.

शेजारच्याच १, मोतीलाल नेहरू मार्गावरील शास्त्रींच्या निवासस्थानाच्या शय्यागृहात शास्त्रींचा देह नेऊन जमिनीवर ठेवण्यात आला. शास्त्रींच्या प्रक्रिया केलेल्या देहावर निळसर पट्टे दिसत होते. त्यांच्या कलेवराला स्नान घालण्यात आलं व हिंदू रिवाजाप्रमाणं विधी करण्यात आले. सायंकाळ व्हायला आली तेव्हा शास्त्रींचा देह १०, जनपथवर आणण्यात आला आणि एका चबुतऱ्यावर ठेवण्यात आला. त्याभोवती खूप फुलं रचलेली होती. आपल्या नेत्याचं अंतिम दर्शन घेण्यासाठी रात्रभर लोकांची तिथे रांग लागली होती.

विदेशी नेत्यांमध्ये सांत्वन करण्यासाठी १०, जनपथ इथे सर्वप्रथम आले ते कोसिजिन. जणू पायाला हात लावून भारतीय पद्धतीनं नमस्कार करावा अशा पद्धतीनं ललिता शास्त्रींना त्यांनी नमस्कार केला. कोसिजिन यांनी चेहरा धीरगंभीर ठेवला असला तरी त्यांना झालेलं अपार दुःख व वेदना लपून राहत नव्हत्या. अनेक जागतिक नेत्यांची रीघच लागली. त्यांत अमेरिकेचे उपाध्यक्ष ह्यूबर्ट हंफ्रे, परराष्ट्रमंत्री डीन रस्क व राजदूत चेस्टर बोल्स, ब्रिटनचे लॉर्ड माउंटबॅटन, उपपंतप्रधान जॉन ब्राउन व उच्चायुक्त जॉन फ्रीमन यांचा समावेश होता. भारतीय नेत्यांपैकी मला मोरारजीभाई देसाई दिसले. ते दुःखानं हेलावून गेले होते.

१२ जानेवारी १९६६ रोजी सकाळी ९.३० वाजता शास्त्रींचा देह तोफगाडीवर ठेवण्यात आला आणि या धरतीवरील त्यांच्या अखेरच्या यात्रेला सुरुवात झाली. फुलांच्या थरांवर भारतीय ध्वज आच्छादण्यात आला होता. तोफगाडीच्या अग्रभागी शस्त्रं उलटी करून चाललेली सैनिकांची तुकडी होती. हळूहळू तोफगाडी निघाली. जनपथ, कर्झन रोड, कनाट सर्कस या मार्गांनी ती स्मशानभूमीवर पोचली. वाटेत त्यांचं अंत्यदर्शन घेण्यास हजारो लोक लोटले होते. 'लालबहादुर शास्त्री अमर रहे'चा घोष करताना लोकांना हुंदके व अश्रू आवरत नव्हते. महात्मा गांधींची समाधी असलेला राजघाट व पं. नेहरू यांची समाधी असलेलं शांतिवन यांच्या शेजारीच शास्त्रींवर अंतिम संस्कार करण्यात येणार होते. त्या ठिकाणाला 'विजयघाट' असं सार्थ नाव देण्यात आलेलं आहे.

तिथे तोफगाडी पोचल्यावर शास्त्रींचा देह उचलून अंत्यसंस्कार करण्यासाठी चितेवर ठेवण्यात आला. धर्मगुरूंनी मंत्रघोष सुरू केला. त्यानंतर एकापाठोपाठ एक राष्ट्रीय नेते, मित्र, नातेवाईक यांनी शास्त्रींचं अखेरचं दर्शन घेतलं.

माझ्याही समोर अंतिम वियोगाचा तो क्षण येऊन ठेपला होता. शास्त्रींचा आदर्श

समोर ठेवून त्या अत्यंत दुःखद समयी देखील मनाचा संयम ढळू न देण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. हळूहळू पायऱ्या चढून मी गेलो आणि त्यांच्या पार्थिवापुढं उभा राहिलो. चितेवर तूप घातलं, डोळे मिटून घेतले व हात जोडून प्रार्थना केली. त्या क्षणी दोनच दिवसांपूर्वी ताश्कंद इथं रात्री १०.३० वाजता त्यांच्या निवासस्थानी पाहिलेली शास्त्रींची हसरी मूर्ती माझ्या डोळ्यांपुढं उभी राहिली. आशीर्वाद दिल्यासारखा हात हलवून त्यांनी सस्मित मुद्रेनं मला निरोप दिला होता. पण प्रत्यक्षात त्यांनी घेतलेला तो अखेरचा निरोप ठरला होता. आजमितीस ते दृश्य मला कधीही विसरता येत नाही. ते कायमचं माझ्या मनावर कोरलं गेलं आहे. मी मान लववून निरोप घेतला आणि माझ्या जीवनातलं सर्वांत वैभवशाली नि सर्वांत दुःखद पर्व अस्तंगत झालं. काही क्षणांतच हरिकृष्णानं आपल्या वडिलांच्या देहाला अग्नी दिला. हळूहळू ज्वाळा उसळल्या व शास्त्रींचा पार्थिव देह त्यात विलीन झाला.

कबीरानं म्हटलं आहे :

**दास कबीर जतनसे ओढी**
**ज्यों कि त्यों धर दीनी चदरिया**

याचा अर्थ : "जन्मताना माझं आयुष्य जितकं विशुद्ध होतं तितकंच ते या जगाचा निरोप घेताना आहे."*

शास्त्रींच्या या ऐतिहासिक अंतिम यात्रेला 'द वॉशिंग्टन पोस्ट'चे वार्ताहर वॉरिन उन्रा उपस्थित होते. त्यांनी पाठवलेल्या वृत्तांतात म्हटलं होतं :

"मानवजातीनं ऐतिहासिक दृष्ट्या आपल्यातले महान प्रसंग आपल्या नेत्यांच्या अंतिम यात्रेसाठी राखून ठेवलेले आहेत. आज भारतात असाच प्रसंग होता."

लालबहादुर शास्त्री यांच्या जीवनावरील माझी कहाणी इथे संपते. राजकीय जीवनातील ते मूर्तिमंत सत्य होतं.

□□

---

* (कवी मंगेश पाडगावकर यांनी त्याचा असा अनुवाद केला आहे : *"जपुन वापरुन होती तैशी परत दिली कबिराने चादर"*)



।। तीस ।।

## हमी सो गये दास्ताँ कहते कहते...

**ता**कंद येथे १०-११ जानेवारी ६६ च्या रात्री-पहाटे १ वाजून ३२ मिनिटांनी शास्त्री यांचं आकस्मिक निधन झालं. त्यांचं निधन ज्या परिस्थितीत झालं त्याबद्दल देशातील अनेकांनी व परदेशस्थ भारतीयांनी माझ्याशी बोलताना शंका व्यक्त केल्या होत्या.

ताश्कंद परिषदेच्या त्या सबंध आठवड्यात शास्त्री यांची प्रकृती चांगली ठणठणीत होती हे परिषदेला हजर राहिलेल्या सर्वांनी पाहिलं होतं. सतत चाललेली चर्चा, ताण-तणाव, वाटाघाटी फिसकटण्याचा निर्माण झालेला धोका या सर्व घडामोडींत शास्त्री यांचा एकदाही तोल ढळला नव्हता व त्यांचं वागणं शालीन व प्रतिष्ठेला साजेसं होतं. या सबंध परिषदेत त्यांच्यावर शारीरिक वा बौद्धिक तणावाची पुसटशी छटाही दिसली नव्हती.

१० जानेवारी रोजी शास्त्री एकूण घडामोडींबद्दल तर विशेष खुषीत होते. अयूबखान यांच्या समवेतचा भोजनाचा कार्यक्रम झकास पार पडला होता आणि पाकिस्तानबरोबरच्या मैत्रीच्या नव्या पर्वाची चाहूल दिसू लागली होती. दुपारी ४ वाजता शास्त्रींनी ताश्कंद करारावर स्वाक्षरी केली. सायंकाळी कोसिजिन यांनी आयोजिलेल्या स्वागत सोहळ्याच्या वेळी ते आनंदानं प्रफुल्लित झालेले होते. उपस्थितांमध्ये मिसळून ते गप्पा मारीत होते, हस्तांदोलन करीत होते, पाक व सोविएट शिष्टमंडळाच्या सदस्यांशी शुभेच्छांची देवाण-घेवाण करीत होते. त्यांनी अयूब यांचा निरोप घेताना केलेलं हस्तांदोलन तर

उभयतांच्या जिव्हाळ्यानं ओतप्रोत भरलेलं होतं. आपल्या निवासस्थानाकडे निघताना शास्त्री कोसिजिनना भेटले व त्यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. सबंध दिवसभर मी शास्त्री यांच्याबरोबरच असल्यानं या गोष्टींना मी साक्षीदार आहे.

पूर्वीच नमूद केल्याप्रमाणं रात्री १०-३० वाजता शास्त्रींचा निरोप घेऊन भारतीय शिष्टमंडळानं देशी व विदेशी पत्रकारांसाठी आयोजिलेल्या पत्रकार परिषदेला मी गेलो. तेथून हॉटेलवर मी परतलो तेव्हा जगन्नाथ सहाय यांनी फोन करून पंतप्रधान अचानक आजारी झाल्याचं मला कळवलं. पण मी त्यांच्यापाशी पोचलो त्यापूर्वीच त्यांचं निधन झालेलं होतं.

शास्त्री सहसा आपल्या तब्येतीबद्दल बोलायला उत्सुक नसत, हे इथं नमूद करायला हवं. आपली प्रकृती ही आपण व आपले डॉक्टर चुग यांच्यातील सर्वस्वी खासगी बाब आहे, असं त्यांचं मत होतं. मला हे ठाऊक असल्यानं मी कधीही त्यांच्या प्रकृतीचा विषय संभाषणात काढत नसे व त्यांनीही मला त्याबाबत कधी काही सांगितलं नाही. थोडीशीही विश्रांती न घेता तासन् तास एवढं काम करू नका अशी विनंती माझी पत्नी निर्मला हिनं एकदा त्यांना केली होती. त्यावर शास्त्रींची प्रतिक्रिया नम्र पण ठाम होती. ते म्हणाले, "मला असंच काम करीत राहायला हवं. ते मला नाही बदलता येणार. मला जे काय व्हायचं असेल ते होईल!" त्यांची भूमिका ही अशी अढळ होती. ते काहीही असो, पण त्या दिवशी म्हणजे १० जानेवारी रोजी किंचितही काळजी वाटावी अशी शास्त्रींची तब्येत नव्हती.

मी १०-३० वाजता त्यांचा निरोप घेतला. त्यानंतर सुमारे तीन तासांनी पहाटे १ वाजून ३२ मिनिटांनी शास्त्रींचं प्राणोत्क्रमण झालं. या मधल्या काळात नेमकं काय घडलं हे जाणून घेण्यासाठी जगन्नाथ सहाय व एम. एम. एन. शर्मा यांच्याशी मी तपशीलवार बोललो. हे दोघे शास्त्रींच्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांपैकी होते व शास्त्रींच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांच्याबरोबर होते. त्यांना मी बरीच वर्षं ओळखत होतो. त्यामुळं ते अचूक व खराखुरा वृत्तांत देतील अशी मला खात्री होती. ते शास्त्रींचे अत्यंत एकनिष्ठ सेवक होते. त्यांनी दिलेली माहिती पुढीलप्रमाणं :

सोविएट रशियाच्या स्वागत समारंभाहून परतल्यावर हे दोघे सामानाची बांधाबांध करण्यात गढून गेले. कारण दुसऱ्या दिवशी काबूलला जायचं होतं. दोघेही पंतप्रधानांच्या आधीच परतले होते. डॉ. चुग व पंतप्रधान यांच्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांची उतरण्याची सोय शास्त्रींच्या निवासस्थानाच्या तळमजल्यावर केलेली होती. शास्त्रींसह मी तिथे परतलो तेव्हा सहाय व शर्मा हे तळमजल्यावरील शय्यागृहात होते.

पंतप्रधानांशी थोडं बोलणं झाल्यावर मी निघालो. खुद्द पंतप्रधान मला पोचवायला बाहेरच्या दरवाज्यापर्यंत आलेच होते. त्यानंतर ते आत गेल्यावर पंतप्रधानांचा वैयक्तिक अटेंडंट रामनाथ यानं जेवण वाढू काय, असं शास्त्रींना विचारलं. त्या वेळी जगन्नाथ सहायही शास्त्रींच्या समवेत होते. खरं तर मला फारशी भूक नाही, असं शास्त्री

म्हणाले. पण क्षणभर थांबून त्यांनी पावाचा एक स्लाइस, थोडी भाजी व फळं आणायला रामनाथला सांगितलं. आचारी महमद जान व रशियन आचारी यांनी बनवलेलं हलकं भोजन घेऊन रामनाथ परतला. महमद जान हा भारताचे मॉस्कोतील राजदूत टी. एन. कौल यांचा आचारी. पंतप्रधान व त्यांचे पाहुणे यांच्यासाठी भारतीय पदार्थ बनविण्यासाठी त्याला सरकारच्या परवानगीनं कौल ताश्कंदला घेऊन आले होते. रामनाथनं आणून दिलेलं भोजन शास्त्रींनी घेतलं.

त्याच सुमाराला पंतप्रधानांच्या खासगी सचिवांपैकी व्ही. एस. व्यंकटरमण यांचा दिल्लीहून फोन आला. तो जगन्नाथ सहाय यांनी घेतला. पंतप्रधान दिल्लीला पोचतील तेव्हा विमानतळावर स्वागताची काही विशेष व्यवस्था त्यांना हवी आहे काय, असं त्यांनी विचारलं. सहाय यांनी शास्त्रींना हे सांगितलं. तेव्हा ते उत्तरले, "वे जो ठीक समझें वो करें." सहाय यांनी व्यंकटरमणना हा निरोप दिला.

त्यानंतर ताश्कंद कराराबद्दल सर्वसाधारण प्रतिक्रिया काय उमटली आहे हे व्यंकटरमणना विचारा असं शास्त्रींनी सांगितलं. त्यावर अटल बिहारी वाजपेयी (जनसंघ) आणि एस. एन. द्विवेदी (प्र. स. प.) यांनी केलेली काहीशी टीका वगळता सर्वसाधारण स्वागत झालं आहे अशी माहिती व्यंकटरमण यांनी सहायना दिली. त्यांनी ती शास्त्रींना सांगितली तेव्हा शास्त्री नेहमीच्या मृदू भाषेत म्हणाले, "ते विरोधी पक्षात आहेत व टीका करणं हा त्यांचा हक्कच आहे."

त्यानंतर थोड्या वेळानं सहाय यांनी दिल्लीला शास्त्री यांच्या घरी फोन जोडून दिला. शास्त्रींना पत्नीशी बोलायचं होतं. परंतु ललितादेवींना फोनवरचं बोलणं नीट ऐकू येत नव्हतं. तेव्हा शास्त्री कुटुंबातील अन्य सदस्यांशी बोलले. त्यांच्याकडूनही ताश्कंद करारावर भारतात उमटलेल्या प्रतिक्रियांची माहिती शास्त्रींना समजली. दुसऱ्या दिवशीची सकाळची दिल्लीची वृत्तपत्रं काबूलला येणाऱ्या भारतीय विमानांतून पाठवा, असं शास्त्रींनी त्यांचे तरुण जामात व्ही. एन. सिंग यांना सांगितलं. भारतात चांगली प्रतिक्रिया झाली असून एक-दोन अपरिहार्य टीकात्मक शेरे वगळता ताश्कंद येथील तुमच्या यशाचं स्वागत झालं आहे, असं आपण शास्त्रींना त्या वेळी सांगितल्याची माहिती व्ही. एन. सिंग यांनीही नंतर माझ्याशी बोलताना दिली.

टेलिफोन करून झाल्यावर जगन्नाथ सहाय यांनी काबूलहून दिल्लीला जाताना पाकिस्तानवरून विमानाचं उड्डाण टाळलेलं बरं, असं शास्त्रींना सुचवलं. थोड्याच दिवसांपूर्वी भारताचे नागरी विमान पाकिस्ताननं पाडलं होतं व त्यात गुजरातचे मुख्य मंत्री बलवंतराय मेहता यांचे प्राण गमावले होते, या घटनेचं त्यांनी शास्त्रींना स्मरण करून दिलं. पुन्हा असंच त्यांनी काही केलं तर?... अशी शंका सहाय यांनी काढली. त्यावर शास्त्री उत्तरले, "मला नाही असं वाटत. अध्यक्ष अयूब भले गृहस्थ आहेत आणि आता तर आपण शांततेचा करार केला आहे."

भारताच्या माहिती व प्रसारण खात्याच्या वृत्तचित्र विभागाचे प्रेम वैद्य व नारायणस्वामी हे दोन छायाचित्रकार ताश्कंदला आलेले होते. पंतप्रधानांच्या शय्यागृहाबाहेरून छायाचित्रं

घेण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे, असं सहाय यांनी शास्त्रींना सांगितलं. शास्त्रींनी परवानगी दिली व छायाचित्रकारांसाठी ते उठून उभे राहिले. परंतु त्यांच्या डोक्यावर नेहमीची गांधी टोपी नव्हती. ती घालावी अशी विनंती सहाय यांनी केली आणि मग प्रेम वैद्य व नारायणस्वामी यांनी छायाचित्रं काढली. शास्त्रींचं ते अखेरचं छायाचित्र ठरलं. तोवर ११-३० वाजून गेले होते. जगन्नाथ सहाय तोवर पंतप्रधानांच्या समवेत होते व शास्त्रींना काही त्रास होतोय असं तेव्हा जाणवलंही नव्हतं.

थोड्याच वेळात सहाय शास्त्रींच्या खोलीतून बाहेर पडले. त्यानंतर पंतप्रधानांसाठी रामनाथनं दूध आणून दिलं. मध्यरात्रीच्या साडेबारापर्यंत रामनाथ शास्त्रींच्या शय्यागृहातच होता. शास्त्री पलंगावर पहुडले होते. त्यांनी रामनाथला "आता तू जाऊन झोप" असं सांगितलं. तेव्हाही पंतप्रधानांना काही अस्वस्थ वाटत नव्हतं हे उघड आहे.

जगन्नाथ सहाय कर्मचाऱ्यांच्या शय्यागृहात ११-३० ला परतले होते. एम. एम. एन. शर्मा, डॉ. आर. एल. चुग व सुरक्षा अधिकारी यांच्याबरोबर त्यांनी सामानाची बांधाबांध पुरी केली. अवजड बॅगा व्हरांड्यात नेऊन ठेवण्यात आल्या. डॉ. चुग झोपायला गेले व थोड्याच वेळात त्यांना गाढ झोप लागली. जगन्नाथ सहाय, शर्मा व कपूर हेही झोपायला निघतच होते. इतक्यात पहाटे १ वाजून २० मिनिटांच्या सुमारास पंतप्रधान त्यांच्या शय्यागृहाच्या दाराशी उभे असलेले त्यांना दिसले. त्यांच्या अंगात झोपायला जाताना ते घालीत तसे कपडे होते. त्यांनी टोपी घातली नव्हती, मात्र पायांत चपला होत्या. त्यांच्या हालचालीत घाई नव्हती. काही क्षण ते दरवाज्याशीच थबकले, आत प्रवेश न करताच त्यांनी खोलीभर दृष्टिक्षेप टाकला. तिथे या तिघांना पाहून त्यांनी विचारलं, "डॉक्टर कुठायत?" त्यावर सहाय उत्तरले, "बाबूजी, ते इथंच झोपले आहेत." शास्त्रींना डॉक्टरांची गरज आहे हे ऐकल्याबरोबर सहाय लगेच त्यांना म्हणाले, "तुम्ही शय्यागृहात चला. मी डॉक्टरना घेऊन ताबडतोब येतोच."

शास्त्रींना त्यांच्या शयनगृहाकडे घेऊन जायला शर्मा व कपूर निघाले. ते दोघे पंतप्रधानांना हाताला धरून नेणार होते. पण पंतप्रधान त्यांची मदत न घेताच चालत निघाले. अर्ध्या वाटेवर त्यांना खोकला आला व त्यानंतर ते सारखे खोकतच राहिले. त्यांच्या शयनगृहात शिरल्यावर पंतप्रधानांना पडून राहायची विनंती शर्मा व कपूर यांनी केली. ते बिछान्यावर आडवे झाले. त्यांना बोलायला त्रास होत होता, पण त्यांनी 'फ्लास्क'कडे अंगुलिनिर्देश केला. शर्मांनं त्या फ्लास्कमधील पाणी शास्त्रींना दिलं. तोवर शास्त्री पूर्ण शुद्धीवर होते असं शर्मांनी नंतर सांगितलं, "तुम्ही पाणी प्यायलात, तेव्हा आता बरं वाटेल." असं शर्मा त्यांना म्हणाले.

डॉ. चुग व सहाय धावतच आले. डॉक्टरांनी औषधांची बॅग बरोबर आणलीच होती. त्यांनी शास्त्रींची नाडी तपासली व त्यांना एक इंजेक्शन दिलं. त्या वेळी अत्यंत उद्वेगानं डॉ. चुग पुटपुटले, "बाबूजी, आपने मुझे मौका नहीं दिया."

तोवर पंतप्रधानांच्या काळजात धुगधुगी होती, परंतु त्यांना खूप वेदना होत होत्या. ते सारखे खोकत होते व त्यांना श्वास घेणं जड जात होतं. सतत खोकल्याची उबळ

येत असताना शास्त्री अधूनमधून 'अरे बाप, अरे राम' असं पुटपुटत होते.

डॉ. चुग त्यांची छाती चोळीत होते. त्यांनी त्यांना कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात यश आलं नाही. पहाटे १ वाजून ३२ मिनिटांनी पंतप्रधानांची प्राणज्योत मालवली.

शास्त्रींना आपल्या मृत्यूची चाहूल लागली होती काय? १० जानेवारी रोजी शास्त्रींनी प्रख्यात ऊर्दू कवी साकिब लखनवी यांच्या काही ओळी एका कागदावर लिहून ठेवल्या होत्या. हा कागद जगन्नाथ सहाय यांना सापडला व त्यांनी तो बराच काळ आपल्याजवळ जपून ठेवला होता. त्या ओळी अशा :

**ज़माना बड़े शौकसे सुन रहा था**
**हमी सो गये दास्ताँ कहते कहते**
(सारं जग अत्यंत उत्कंठेनं ऐकत होतं–
मीच झोपी गेलो कहाणी सांगता सांगता...)

भारतातील अनेक जणांना शास्त्रींना नैसर्गिक मृत्यू आला असं वाटत नाही. शास्त्रींना काही तरी देण्यात आल्यामुळं त्यांना हृदयविकाराचा झटका आला अशी शंका ते व्यक्त करतात. शास्त्रींचा चेहरा व त्यांच्या शरीराचा काही भाग निळसर झाला होता, त्यामुळं ही शंका व्यक्त केली जात होती. निळसर डागांची चर्चा झाल्यानं सोविएट डॉक्टरांनी संशय दूर व्हावा म्हणून ४ नोव्हेंबर १९७० रोजी एक निवेदन प्रसृत केलं. त्यात ते म्हणतात :

*"पंतप्रधानांचं शव दिल्लीला पाठवण्यात येणार होतं. ताश्कंदप्रमाणंच तिथंही हवामानामुळं पार्थिव देह लवकर कुजण्याचा संभव असल्यानं डॉ. आर. एल. चुग यांच्या उपस्थितीत शव टिकवून ठेवण्याची प्रक्रिया (Embalming) त्यावर करण्यात आली.*

*'एम्बामिंग'च्या द्रवात तीन लिटर शुद्ध स्पिरिट, एक लिटर फॉर्मालिन व २०० ग्रॅम युरोट्रोपाइन होतं. जांघेतील प्रमुख रोहिणीतून हा द्राव त्यांच्या शरीरात भरण्यात आला. पंतप्रधानांचा चेहरा निळसर पडल्याचा उल्लेख भारतीय वृत्तपत्रांनी केला आहे. ही प्रक्रिया केल्यानं असं घडणं नैसर्गिकच आहे."*

शास्त्रींना मृत्यू आला तेव्हा त्यांच्या चेहऱ्याचा रंग नेहमीसारखाच होता. त्यात काही बदल झालेला नव्हता. मात्र त्यांच्या शवावर ही प्रक्रिया केल्यावर तो निळसर झाला. त्या वेळी जगन्नाथ सहाय यांनी चेहऱ्यावरील या रंगबदलाकडे डॉ. चुग यांचं लक्ष वेधले होतं, तेव्हा हा त्या प्रक्रियेचा थेट परिणाम असल्याचं डॉ. चुग यांनी त्या वेळी सांगितलं होतं.

ते काहीही असो, मला या बाबतीत आणखी एखाद्या तज्ज्ञाचं मत अजमावावं असं वाटलं. या पुस्तकाचं काम मी सुरू केलं तेव्हा मी लंडनमध्ये होतो. लंडन येथील प्रख्यात ज्येष्ठ डॉक्टर डेव्हिड एम. स्पिरो (एम. ए. केंब्रिज, एम. बी, बी. सीएचआयआर.

डी. आर. सी. ओ. जी.) यांना मी बरीच वर्षं ओळखत होतो. त्यांचा वैयक्तिक सल्ला मला अतिशय मोलाचा वाटे. शास्त्रींच्या संदर्भात मी त्यांना विचारलं, तेव्हा याबाबत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पॅथॉलॉजिस्ट व फॉरेन्सिक मेडिसिनमधील तज्ज्ञ डॉ. आयन वेस्ट (एम. बी. सी. एचबी., एफ. आर. सी. पॅथ. डी. एम. जे.) यांचा सल्ला घ्यावा असं त्यांनी सुचवलं. लंडन येथील गाय रुग्णालयातील फॉरेन्सिक मेडिसिन विभागाचे ते प्रमुख होते. २४ सप्टेंबर १९९२ रोजी डॉ. डेव्हिड स्पिरो व मी डॉ. वेस्ट यांना भेटलो. शास्त्रींच्या मृत्यूसंबंधीचे १९६६ व १९७० मधील वैद्यकीय अहवाल त्या दोघांनाही मी दाखवले. तसंच मृत्यूच्या आधीच्या बारा मिनिटांतील घटनाक्रमाचा तपशीलही सांगितला. शास्त्रींचा चेहरा व शरीराचा काही भाग निळसर झाला होता, तेव्हा पुढील दोन गोष्टींबाबत तुम्हा दोघांचं मत मला हवं आहे, असं मी त्यांना सांगितलं. मी विचारलं,

(१) या निळसर रंगाचं काय कारण असावं? तो विषबाधेचा परिणाम असू शकेल काय?

(२) खोकला, श्वास लागणं, गुदमरणं या लक्षणांमुळं शास्त्रींना 'मायोकार्डिअल इन्फाक्र्शन'चा तीव्र झटका आला असं निदान करण्यात आलं होतं. खाद्यपदार्थ, दूध, पाणी वा अन्य कशातून विषारी पदार्थ दिला तर अशी लक्षणं दिसतात का?''

डॉ. आयन वेस्ट यांनी माझं म्हणणं लक्षपूर्वक ऐकून घेतलं व मी सादर केलेली कागदपत्रं अभ्यासली. त्यानंतर त्यांनी पुढील उत्तरं दिली. त्याच्याशी डॉ. स्पिरो पूर्णतः सहमत होते. निळसर रंगाबद्दल डॉ. वेस्ट म्हणाले,

*''नैसर्गिक कारणांनी मृत्यू होणाऱ्यांच्या बाबतीत असा निळसर रंग सुसंगत असतो. तो दोन कारणांमुळे असू शकतो :*

*(१) सायानोसिस (रक्तातून प्राणवायू काढून घेतल्यानं त्वचेचा होणारा गडद निळा रंग) आणि*

*(२) 'एम्बामिंग'ची प्रक्रिया.*

*'एम्बामिंग'मधील द्रावामुळे हिमोग्लोबिनचं प्रमाण (म्हणजेच प्राणवायू काढून घेणं) घटू शकतं. कदाचित या प्रकरणात हे महत्त्वाचं कारण असू शकेल.*

*या प्रकरणी शरीरातून रक्त काढून टाकलेलं नव्हतं (सर्वसाधारणतः रक्त काढण्याची पद्धत आहे.) आणि 'एम्बामिंग'साठी वापरलेलं मिश्रण नेहमीचं नव्हतं, या बाबींचा विचार करायला हवा. एरवी येणाऱ्या निळसरपणापेक्षा या दोन गोष्टींमुळं निळसर रंग अधिक गडद झाला असण्याचा संभव आहे. वापरण्यात आलेला द्राव (जवळजवळ शुद्ध स्पिरिट) कुजण्याची प्रक्रिया विलंबानं सुरू व्हावी म्हणून पुरेसा असला तरी नेहमीच्या मिश्रणानं अधिक चांगला कॉस्मेटिक परिणाम झाला असता. त्या वेळी ताश्कंदमध्ये उपलब्ध असलेलं तंत्रज्ञान व सामग्री यांपैकी जे काही उत्तम होतं ते वापरण्यात आलं असावं.''*

"विषाचा वापर झाला असण्याची कितपत शक्यता आहे," असं विचारता डॉ. वेस्ट म्हणाले,

*"शवविच्छेदन व विषचिकित्सा यांच्या अहवालाशिवाय विष दिलं नव्हतंच असं ठामपणं म्हणता येत नाही. परंतु मला जो पुरावा उपलब्ध करून दिला आहे तो पाहता, असं घडणं अगदी अशक्य दिसतं. शास्त्रींच्या आजाराची लक्षणं व साक्षीदारांनी वर्णिलेली त्यांची त्या वेळची हालचाल पाहता, त्यांना विषबाधा झाली असेल असं वाटत नाही. ती लक्षणंही तीव्र 'मायोकार्डिअल इन्फार्क्शन' अथवा हृदयाला रक्त-पुरवठा कमी झाल्याचं सूचित करणारी आहेत."*

त्यानंतर डॉ. वेस्ट म्हणाले,

*"विषबाधेची शक्यता १०० टक्के फेटाळून लावता येत नसली तरी शास्त्रींच्या पोटात विष गेल्याचा काही पुरावा नाही. याचाच अर्थ उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांचा मृत्यू 'नैसर्गिक कारणांमुळं झाला' या तथ्याशी सुसंगत आहे. त्यांचा मृत्यू नैसर्गिक नव्हता असं म्हणणं उपलब्ध पुराव्याशी सुसंगत नाही."*

प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञाचं हे मत बोलकं आहे. शास्त्रींच्या मृत्यूच्या वेळच्या परिस्थितीसंबंधी आणखी काही माहिती मला नमूद करावीशी वाटते, ती अशी :

१० जानेवारी रोजी सायंकाळी पंतप्रधानांच्या निवासस्थानी घडलेल्या घटनांची या ग्रंथात दिलेली साद्यंत माहिती पूर्ण व बरोबर आहे. मी स्वतः रात्री १०-३० पर्यंत त्या घटनांचा साक्षीदारच होतो. त्यानंतरच्या घटना या पंतप्रधानांच्या दोन वैयक्तिक कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीवर आधारित आहेत. या ग्रंथात त्यांच्या माहितीचा दिलेला वृत्तांत त्यांनी वाचला असून तो अचूक आहे, अशी ग्वाही त्यांनीही मला दिली आहे.

पंतप्रधानांच्या निधनापूर्वीच्या त्या १२ मिनिटांत किंवा त्याआधीच्या काही तासांत शास्त्रींना मळमळत आहे, उलटीची भावना होत आहे किंवा त्यांना भोवळ आल्यासारखं वाटत आहे अशी कोणतीही लक्षणं तिथे हजर असलेल्यांना आढळली नव्हती.

शास्त्री यांच्या पलंगानजीक 'कॉलबेल' बसवलेली नव्हती. शास्त्रींना पूर्वी हृदयविकाराचे झटके येऊन गेले होते. हे लक्षात घेता अशी कॉलबेल नसणं ही गंभीर उणीव होती. मात्र एक बझरची सोय असलेला टेलिफोन त्यांच्या सदनिकेत बसवलेला होता. तो फोन उचलताच डॉक्टरांचे शय्यागृह व वैयक्तिक कर्मचारी शय्यागृह यांतून बझर मोठ्यानं घणघणू लागेल अशी ही व्यवस्था होती. आपल्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांना बोलावून घेण्यासाठी शास्त्री या फोनचा वापर करीत.

पंतप्रधानांच्या शय्यागृहाशेजारील बैठकीच्या दालनात हा बझरयुक्त फोन ठेवलेला होता, त्या दिवशी सायंकाळी शास्त्रींनी आपला बहुतेक वेळ बैठकीच्या दालनातच घालवला. पंतप्रधानांच्या पलंगापासून काही पावलांवरच बैठकीची खोली असली तरी

त्या फोनचं एक 'एक्स्टेन्शन' पलंगाजवळ बसवलेलं नव्हतं. त्यामुळं जेव्हा पहाटे १ वाजून २० मिनिटांच्या सुमारास त्यांना अस्वस्थ वाटू लागलं तेव्हा त्यांना पलंगावरून उठणं भाग पडलं. नजीकच्याच खोलीत असलेला फोन त्यांना वापरता आला असता. परंतु फोनच्या बझरच्या आवाजानं सर्व कर्मचारी जागे झाले असते.

अवेळी सर्वांची झोपमोड कशाला करा असा विचार त्यांनी त्यांच्या हळुवार स्वभावानुसार केला असावा! म्हणूनच फोनच्या जवळून जाताना देखील त्यांनी आणखी काही पावलं टाकून कर्मचाऱ्यांच्या शयनगृहापर्यंतच जायचं ठरवलं असावं. त्या वेळी त्यांना फार अस्वस्थ वाटत नसणार. कारण ते शयनगृहाच्या दरवाज्याजवळ पोचले तेव्हा ते नेहमीसारखेच दिसत होते व त्यांनी डॉक्टरांची अगदी स्पष्ट आवाजात चौकशी केली होती. तिथून आपल्या शय्यागृहाकडे परत जाताना त्यांना खोकला आला व तो अखेरपर्यंत थांबलाच नाही. त्यांचं परतीच्या वाटेवरचं हे चालणं थोडंसंच असलं तरी त्यामुळं त्यांची हालत जास्त बिघडली हे निःसंशय.

ताश्कंद करारावर भारतातील दोघा विरोधी पक्षनेत्यांनी केलेली टीका पंतप्रधानांना फोनवरून समजली होती. त्यामुळं ते अस्वस्थ झाले होते व त्याचमुळं त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा, असं मत काहींनी व्यक्त केलं आहे. हृदयविकाराचा त्रास असलेल्या एखाद्या व्यक्तीला कधीकधी विरोधी वा निराशाजनक वृत्त आकस्मिकपणं कळलं तर त्यामुळं त्याला आणखी एखादा हृदयविकाराचा झटका येण्याचा संभव असतो, असं डॉ. वेस्ट यांनीही मला सांगितलं. जगन्नाथ सहाय व व्यंकट रमण यांच्यात आणि पंतप्रधान व त्यांचे कुटुंबीय यांच्यात फोनवरून बोलणं झालं, तेव्हा मी हजर नव्हतो. त्यामुळं शास्त्रींना ताश्कंद कराराबद्दलच्या प्रतिक्रिया कळल्यावर त्यांच्यावर त्याचा काय परिणाम झाला असेल यावर मी मल्लीनाथी करू शकत नाही. परंतु हे वृत्त ऐकून पुन्हा हृदयविकाराचा झटका यावा इतके ते अस्वस्थ झाले असतील यावर माझा विश्वास नाही.

ताश्कंद करारावर शास्त्रींना त्यांच्या मनाविरुद्ध स्वाक्षरी करण्यास भाग पाडण्यात आलं असावं अशीही शंका काहींनी व्यक्त केली होती. हे निखालस खोटं आहे. शास्त्रींनी या करारावर स्वखुशीनं स्वाक्षरी केली होती व मोठी कामगिरी पार पडली, असं त्यांना वाटत होतं. सोविएट नेत्यांनी कोठलंही दडपण आणण्याचे प्रयत्न केलेले नव्हते. तसंच शास्त्री कोणाच्या दडपणाला बळी पडणारे नव्हते.

सतत संशय व्यक्त केला जाऊ लागल्यानं ताश्कंद इथे शास्त्रींना ठार करण्यात कोणाला स्वारस्य असेल असा विचार मी करू लागलो. असं क्रूर कृत्य एखाद्या रशियन यंत्रणेनं वा व्यक्तीनं केलं असण्याची सुतराम शक्यता नाही असं माझं मत आहे. पंतप्रधानांवर रशियन अत्यंत खूष होते. कोसिजिन, ग्रोमिको व त्यांच्या शिष्टमंडळाचे अन्य सदस्य यांना शास्त्रींबद्दल किती आदर वाटत होता हे मी स्वतः पाहिलं आहे. शास्त्री यांच्या निधनामुळं आपला एक प्रामाणिक व विश्वासू स्नेही हरपला अशीच रशियनांची भावना होती. त्यामुळं त्यांना खरं तर अतीव दुःख झालं होतं.

शास्त्रींच्या पार्थिव देहाची शवचिकित्सा केली गेली नाही, म्हणून शंका व्यक्त केल्या जाऊ लागल्या असं म्हणता येईल. त्या वेळचे केंद्रीय गृहसचिव व ताश्कंद येथील भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य एल. पी. सिंग यांना त्या वेळी शवचिकित्सेबद्दल विचार झाला होता काय असं मी विचारलं. सिंग हे शास्त्रींच्या विश्वासातील निकटचे सहकारी होते. ते म्हणाले, राजदूत टी.एन. कौल यांनी हा विषय माझ्यापाशी काढला होता. परंतु सोविएट डॉक्टर्स व खुद्द पंतप्रधानांचे डॉक्टर चुग यांनी मृत्यूचं निश्चित कारण स्पष्टपणं नमूद केलं होतं. शिवाय शास्त्रींना आधी दोनदा हृदयविकाराचे झटके येऊन गेले होते. या गोष्टी लक्षात घेता आणि शवचिकित्सेची आवश्यकता वाटावी अशी इतर काही कारणं नसताना या बाबतीत काही करण्याची गरज नाही असा त्या दोघांनी निष्कर्ष काढला. यशवंतराव चव्हाण व सरदार स्वर्णसिंग हे त्यानंतर पंतप्रधानांच्या निवासस्थानी हजर होते व शास्त्रींच्या निधनानंतर सर्व सूत्रं त्यांच्याकडे होती. त्यांनीही वरील कारणांसाठीच शवचिकित्सेची मागणी केली नाही.

भारतात पंतप्रधानांचं पार्थिव आणल्यावरही शवचिकित्सा करणं शक्य होतं, असाही एक मुद्दा मांडला जातो. हंगामी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा हे शास्त्रींचा देह अंत्य दर्शनासाठी ठेवला होता त्या १०, जनपथ या निवासस्थानी बराच वेळ हजर होते. ताश्कंद इथे कोणत्या परिस्थितीत शास्त्रींना मृत्यू आला याचा सर्व तपशील नंदांना सांगण्यात आला होता. त्यांनीही शवचिकित्सा करण्याचा आदेश दिला नाही. पंतप्रधानांच्या देहावर निळे डाग आहेत हे सर्वांनी पाहिलं असलं तरी कोणीही शवचिकित्सेची सूचना केली नाही. पंतप्रधानांच्या कुटुंबियांनीही तशी मागणी केली नाही. तेव्हा सर्व पुरावा व परिस्थिती लक्षात घेता, लालबहादुर शास्त्री यांचं निधन हृदयविकारानं झालं हे स्पष्ट आहे. तेव्हा त्याबद्दलच्या शंका-कुशंकांना मूठमाती देणं हीच त्यांच्या स्मृतीला उचित श्रद्धांजली ठरेल.

□□



# उपसंहार

साध्या परिस्थितीत वाढलेले लालबहादुर शास्त्री हा देशाच्या एका खेड्यात जन्मलेला गरीब मुलगा. पण वैयक्तिक गुणांच्या सामर्थ्यावर तो सत्तेच्या सर्वोच्च पदावर जाऊन पोचला– भारताचा पंतप्रधान झाला. त्याचप्रमाणं राष्ट्रीय व जागतिक घडामोडींत त्यानं प्रचंड यश संपादन केलं. परिपूर्ण सभ्य गृहस्थाची कन्फ्यूशियसनं व्याख्या केली आहे. मी जेव्हा शास्त्रींचा विचार करू लागतो तेव्हा मला ती व्याख्या आठवते. कन्फ्यूशिअस म्हणतो: "सभ्य गृहस्थ नऊ गोष्टींचा विचार करतो. डोळ्यांचा वापर करताना तो स्पष्ट ते पाहतो, कानांचा वापर करताना एकवटून ऐकतो, कृपादृष्टी करण्याचा प्रश्न येतो तेव्हा तो मनापासून विचार करताना दिसतो, आचरणाच्या बाबतीत तो आदरणीय असतो, बोलताना तो प्रामाणिकपणं बोलतो, आपली कर्तव्यं पार पाडताना त्याचं वागणं आदरभावयुक्त असतं, शंका येते तेव्हा तो सल्ला घेतो, रागावताना त्याचे परिणाम काय होतील हे तो लक्षात घेतो आणि लाभाच्या वेळी उचित काय आहे याचा विचार करतो."

एक व्यक्ती म्हणून पाहिलं तर शास्त्रींमध्ये एखाद्या महात्म्याची नैतिक लक्षणं होती. सत्याचा मार्ग त्यांनी कधीही सोडला नाही. वैयक्तिक वा व्यावसायिक संबंधांमध्ये ते नेहमीच विनयशील, स्वाभिमानी, दुसऱ्याचा विचार करणारे, शालीन, उदार, निःस्वार्थी, सुसंस्कृत व मृदुभाषी असत.

सरकारचे प्रमुख व देशाचे नेते या दृष्टीनं पाहिल्यास ते बुद्धिमान, दूर दृष्टीचे, हेतू

व निर्णय यांत खंबीर आणि जबर इच्छाशक्ती असलेले होते. सर्वसामान्य माणसाच्या कल्याणासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतलं होतं. ते स्वप्नात वावरणारे नव्हते, तर वास्तवतेचं त्यांना भान होतं. सत्ता त्यांना भ्रष्टाचारी करू शकत नव्हती. क्षणैक भावनेच्या आहारी जाऊन नव्हे, तर सखोल विचार करूनच ते केव्हाही निर्णय घेत. कोणीही त्यांच्यावर दडपण आणू शकत नव्हतं.

ते परम देशभक्त होते. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी आपलं जीवन देशसेवेला वाहिलेलं होतं. जगातील सर्व धर्मांच्या मूलभूत ऐक्यावर त्यांचा विश्वास होता, त्यांची तशी निष्ठा होती. आपल्या देशातील सर्व लोकांनी एक राष्ट्र या भावनेनं राहावं असं त्यांना वाटे.

जगाचा एक नागरिक या नात्यानं आंतरराष्ट्रीय शांतता व सलोखा यांचे ते ठाम पुरस्कर्ते होते. अर्थात शांतता हवी, पण सन्मानपूर्वक असा त्यांचा आग्रह असे. जेव्हा भारतावर आक्रमण झालं तेव्हा शांतताप्रेमी शास्त्रींनी देशाचं सार्वभौमत्व व प्रादेशिक एकात्मता यांचं निर्धारानं रक्षण केलं आणि युद्ध आक्रमकाच्या प्रदेशात नेऊन भिडवलं. देशाच्या सीमेचं रक्षण करण्याचं उद्दिष्ट सफल झालं, तेव्हा त्याच प्रतिस्पर्ध्याशी शांतता व मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी ते मनःपूर्वक  झटले. एक उदात्त आणि अनुकरणीय राजपुरुष म्हणून सारं जग त्यांच्याकडे पाहू लागलं.

शास्त्रींचं निधन झालं तेव्हा त्यांचा सारा जीवनपट निष्कलंक होता. त्यांच्यामागं ना पैसे होते, ना जमीन, ना घर. सत्य व प्रामाणिकपणा यांना वाहिलेलं स्वजीवन हाच राष्ट्रीय जीवनाचा पाया असतो, असं मानणाऱ्या सर्व जाती-जमातींच्या लोकांना प्रोत्साहित करणारं, स्फूर्ती देणारं असं शास्त्रींचं जीवन होतं. आपल्यावर अतिशयोक्त विशेषणांची स्तुतिसुमनं उधळली जावीत अशी इच्छा त्यांनी कधीच बाळगली नाही. त्यांच्या समाधीवर पुढील शब्द कोरले असते तर त्यांना ते बहुधा आवडलं असतं :

**लालबहादुर शास्त्री**

२ ऑक्टोबर १९०४– ११ जानेवारी १९६६

राजकारणातील सत्यनिष्ठ जीवनाच्या स्मृतीप्रीत्यर्थ

□□



# ऋणनिर्देश

या चरित्रग्रंथासाठी पुढील अनेक व्यक्ती, संस्था, ग्रंथालयं यांनी आत्मीयतेने सहकार्य केलं. त्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

नेहरू मेमोरियल म्युझियम अॅण्ड लायब्ररी, संचालक प्रा. रवींद्र कुमार, उपसंचालक डॉ. हरदेव शर्मा, दिल्ली.

माहिती व नभोवाणी मंत्रालयाचे ग्रंथालय, दिल्ली; आकाशवाणी, दिल्ली.

द सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च, संचालक डॉ. व्ही. ए. पै पाणंदीकर.

'द सर्व्हंट्स ऑफ द पीपल सोसायटी'चे सत्यपाल, 'द हिंदुस्थान टाइम्स' दिल्ली व त्याचे माजी मुख्य छायाचित्रकार एन. त्यागराजन.

द फिल्म्स डिव्हिजन, मुंबई.

द लिंडन बेन्स जॉन्सन ग्रंथालय, ऑस्टिन, टेक्सास, अमेरिका आणि डेव्हिड हंफ्रे, जॉन विल्सन, इरिन पारा, क्लॉदिया अॅन्डरसन (सर्व पुराभिलेख विशेषज्ञ) व कर्मचारी जेरेमी दुवाल.

येल युनिव्हर्सिटी ग्रंथालय, कनेक्टिकट, अमेरिका; द ब्रिटिश लायब्ररी, न्यूजपेपर लायब्ररी, कोलिंदेल, लंडन.

अमेरिकेचे भारतातील माजी राजदूत विल्यम क्लार्क (ज्यूनि.) व काउन्सेलर जॉन वॉल्श, पॉल एलिस व व्हिक्टोरिया झबल्यूत, वॉशिंग्टन; ग्रेगरी व कॅथरिन द काल्बरमॅटन, कॅरोलिन व्हान्स, ख्रिस्तिन एगान, मनोजकुमार गगन अहलुवालिया व मायकेल एफ. फोसेली, न्यूयॉर्क; कॅप्टन मंगल सिंग धिल्लाँ, फोर्टवर्थ, टेक्सास; डॉ. डेव्हिड स्पिरो, डॉ. ब्रायन वेल्स, जॉन ग्लोव्हर, इयान पॅरडाइन, डॉ. आर. एन. बर्नारजी, लूसिंडा कोलमन, पॉल वायन्टर, बिल हॅन्सेन, ख्रिस मार्लो, ख्रिस फ्लॅटमॅन व जॉन ब्रूक, इंग्लंड; लिमोनिड झामियातिन, डॉ. बोहदान एम. शेओविच, मॉस्को; जगदीश कुदेशिया, डॉ. दीपक चुग, डॉ. एस. सी. निगम, श्याम गुप्ता, डॉ. यू. सी. राय, राजीव कुमार, विजय नलगिरकर, किरण वालिया, निर्मल कांत व हरिकृष्ण खुराथा, नवी दिल्ली; राजेश शहा, भगवान कोटक, नरेश कोटक, कृष्ण कोटक, मुंबई; योगी महाजन, प्रेम वैद्य व जगदीश श्रीवास्तव, पुणे; निखिलेश्वर मिश्रा, वृजनंदन प्रसाद, पं. राजाराम शास्त्री, वाराणसी; पं. विश्वंभरनाथ पांडे, माजी मंत्रिमंडळ सचिव धर्मवीर, माजी परराष्ट्र सचिव सी. एस. झा, माजी गृहसचिव एल. पी. सिंग, उत्तर प्रदेशचे माजी गृहसचिव गोविंद नारायण सिंग, ईईसी व बेल्जियम येथे भारताचे माजी राजदूत म्हणून काम केलेले के. बी. लाल, भारताचे अमेरिकेतील माजी राजदूत डॉ. अबिद हुसेन, रेल्वे बोर्डाचे माजी अध्यक्ष प्रकाश नारायण, माजी मंत्रिमंडळ सचिव नरेश चन्द्र, माजी परराष्ट्र सचिव मुचकुंद दुबे, माहिती व नभोवाणी मंत्रालयाचे माजी सचिव महेश प्रसाद, प्रशासन सुधार खात्याचे माजी अतिरिक्त सचिव ए. आर. बंदोपाध्याय;

एअर मार्शल अर्जुनसिंग, जनरल पी. पी. कुमारमंगलम, लेफ्ट. जनरल हरबक्ष सिंग, विंग कमांडर ट्रेव्हर कीलर, पत्रकार प्रेम भाटिया, कुलदीप नय्यर व इंदर मल्होत्रा;

डॉ. आयन वेस्ट, लंडन;

स्क्वाड्रन लीडर आर. के. पाल, कमांडर एच. एस. शर्मा, पी. सी. टंडन, डेरेक ली, श्री. व सौ. बॉव्हन, ॲलन व्हेरी, इंग्लंड;

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस;


माझी पत्नी निर्मला, थोरली कन्या कल्पना व तिचे पती प्रभात कुमार श्रीवास्तव; धाकटी कन्या साधना व तिचे पती रोमेल वर्मा;

वरील सर्वांबद्दल मी कृतज्ञ असून या ग्रंथातील मजकूर व त्यातील मते आणि मल्लीनाथी यांची जबाबदारी सर्वस्वी माझी आहे.

**सी. पी. श्रीवास्तव**

## सर्वाधिकार सुरक्षित

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाची दुसरी आवृत्ती किंवा कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा विविध माध्यमांमध्ये रूपांतर जसे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, झेरॉक्स, पुनर्मुद्रण हे पूर्व परवानगीशिवाय करू नये.




काश्मीरमध्ये आंदोलनाचा उद्रेक झाला असताना पं. नेहरूंनी शास्त्रींना तेथे तातडीने पाठविले होते. श्रीनगर येथे गोठवणारी थंडी असल्याने पं. नेहरूंनी स्वत:चा ओव्हरकोट शास्त्रींना दिला. जणू पुढील जबाबदारी शास्त्रींच्या खांद्यावर येणार याचेच ते सूचक होते !

पंतप्रधान म्हणून शास्त्रींनी आपला स्वतंत्र, तेजस्वी ठसा उमटवला. १९६२च्या चीन युध्दातील मानहानीकारक पराभवाच्या पार्श्वभूमीवर, १९६५च्या भारत-पाक युध्दात शास्त्रींनी देशास खंबीर व यशस्वी नेतृत्त्व दिले आणि देशाची प्रतिमा झळाळून निघाली. 'जय जवान, जय किसान'च्या मंत्राने सारा देश भारावून गेला.

ताश्कंद शिखर परिषदेत, मुत्सद्देगिरीने पावले टाकून त्यांनी अखेर अयुब खानना झुकविले. शास्त्रींनी यशाचे अत्युच्च शिखर गाठले, पण आकस्मिक त्यांचे अवतारकार्य संपुष्टात आले !

... तीच ही कहाणी तीस वर्षांनंतर, दप्तरमुक्त झालेल्या अनेक सत्य घटनांच्या साक्षीने लिहिलेली प्रभावी, प्रेरक नि पारदर्शक व आजही भारावून टाकणारी जीवनगाथा !

# लालबहादूर शास्त्री



रोहन प्रकाशन